म. ग्रं. सं. ठाणं
विषय निक्षेप
सं. नं. ५३२

REFBK-0019172

समाजशास्त्राचीं तत्त्वें—भाग ७ वा व ८ वा

उद्योगसंस्था व धंदेसंस्था

REFBK-0019172



हर्बर्ट स्पेन्सर

ह्याच्या

" The Principles of Sociology " ह्या ग्रंथाचा

रा० रा० नारायण लक्ष्मण फडके, बी. ए

ह्यानीं लिहिला.

प्रकाशक

बळवंत गणेश दाभोळकर

नं० ४६८ नारायण पेठ, पुणें सिटी.

मुद्रक

केशव रावजी गोंधळेकर

जगद्धितेच्छु छापखाना, पुणें सिटी.

पुढील ग्रंथ

सुख आणि शांति

हा ग्रंथ

दी राइट आनरेबल **सर जॉन लबक** (लॉर्ड एव्हबरी) ह्यांच्या "on Peace & Happiness of Life" ह्या ग्रंथाधारें रा० रा० **महादेव हरि मोडक, बी. ए.** ह्यानीं लिहिला आहे.

ग्रंथांतील विषय

१. सुख.
२. शरीर.
३. मन.
४. उदयेच्छा.
५. संतोष.
६. आपत्ति.
७. अनुकंपा.
८. शिक्षण.
९. शत्रुमित्र.
१०. श्रीमंती.
११. सृष्टिभय.
१२. सृष्टिप्रेम.
१३. वर्तमान.
१४. वैदग्ध्य.
१५. राष्ट्रांची शांति.
१६. धर्म.
१७. चित्तस्वास्थ्य.
१८. ब्रह्मविद्या.

ग्रंथाचीं पृष्ठें अजमासें ५०० होतील. छपाई व बाइंडिंग उत्कृष्ट करीत आहों. पुण्यांतील वर्गणीदारांस किंमत २ रु०; बाहेरगांवीं व्ही. पी. नें २।४. पांच प्रतींस पोस्टेज व्ही. पी. चा खर्च माफ.

नारायण पेठ ४६८ पुणें सिटी. } **बळवंत गणेश दाभोळकर** ग्रंथप्रकाशक.

आतांपर्यंत प्रकाशित झालेले माझे उपयुक्त ग्रंथ

* फुली केलेल्या ग्रंथांच्यां प्रती शिल्लक नाहींत.

१ **नीतिशास्त्राचीं मूलतत्त्वें**—हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या "The Data of Ethics" ह्या ग्रंथाच्या आधारानें प्रो० चिंतामण गंगाधर भानु, बी. एं. यांकडून लिहविला.

२. **न्यायतत्त्वें**—सदरप्रमाणें "Justice" ह्या ग्रंथाच्या आधारानें. किं० २ रुपये; टपालहंशील ३ आणे.

३. **ज्योतिर्विलास** अथवा **रात्रीची दोन घटका मौज**—रा० रा० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** यांजकडून लिहविला. किंमत १॥ रु०; ट० ह० ३ आणे.

४. **संसारसुख**—दी राइट ऑनरेबल सर **जॉन लबक**, एम. पी. ह्यांच्या "The Pleasures of Life" ह्या ग्रंथाच्या आधारानें रा० सा० **कृष्णाजी परशुराम गाडगीळ** ह्यांकडून लिहविला. किंमत १॥ रु०; टपालहंशील ३ आणे.

५. **शास्त्ररहस्य**—रा० रा० **ना० ल० फडके**, बी. ए.;
* रा० रा० **शं० बा० दीक्षित**; प्रि० **म० शि० गोळे**, एम्. ए; प्रो० **वि० बा० भाटे**, बी. ए.; प्रे० **धों० के० कर्वे**, बी. ए.; रा० सा० **कृ० प० गाडगीळ**; प्रो० **चिं० गं० भानू**, बी. ए.; रा० रा० **ह० ना० आपटे** व रा० रा० **रा० भि० जोशी** ह्या नऊ विद्वानांकडून निरनिराळ्या ९ विषयांवर निबंध लिहवून एकत्र तयार केला.

६. **आत्मनीतीचीं तत्त्वें** आणि **परोपकार**—हर्बर्ट **स्पेन्स-**
* रच्या "The Ethics of Individual Life" व "Beneficence" ह्या ग्रंथांच्या आधारानें यथाक्रम रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. व प्रो० **धोंडो केशव कर्वे**, बी. ए. ह्यांजकडून लिहवून एकत्र केला.

७. **नीतिशास्त्राचे सामान्य सिद्धान्त**—हर्बर्ट **स्पेन्सर** ह्यांच्या "The Inductions of Ethics" ह्या ग्रंथाच्या आधारानें प्रो० **धोंडो केशव कर्वे**, बी. ए ह्यांकडून लिहविला. किंमत १॥॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

८. **धर्ममीमांसा**—**नैसर्गिक धर्म** आणि **भौतिक धर्म**—भट्ट **मोक्षमूलर** ह्यांच्या "Natural Religion" व "Physical Religion" ह्या ग्रंथांच्या आधारानें

रा० •रा० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांकडून लिहविला. किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

९. **राजनीतीचीं मूलतत्त्वें** (भाग १)—हेनरी **सिज**-विक् ह्यांच्या " The Elements of Politics " ह्या ग्रंथाच्या आधारानें रा० रा० **वासुदेव बळवंत पटवर्धन**, बी:ए. व प्रो०**धोंडो केशव कर्वे**, बी.ए. ह्यांजकडून लिहविला. किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१०. **अज्ञेयमीमांसा** (**स्पेन्सरचरित्रासह**)—**हर्बर्ट स्पेन्सर** * ह्यांच्या " First Principles " ह्या ग्रंथाच्या "The Unknowable " भागाच्या आधारानें रा०रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.

११. **धर्ममीमांसा-पितृमूलक धर्म** आणि **आध्यात्मिक धर्म**—भट्ट **मोक्षमूलर** ह्यांच्या " Anthropological Religion" व "Psychological Religion" ह्या ग्रंथांच्या आधारानें रा० रा० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांकडून लिहविला.—किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१२. **जीवनशास्त्राचीं सामान्य तत्त्वें** (पुस्तक १)—रा० रा० **विठ्ठल बाळकृष्ण भाटे**, बी ए. यांजकडून स्वतंत्रग्रंथरूपानें लिहविला. किंमत १॥। रुपये; ट० ह० ३ आणे.

१३. **ज्ञेयमीमांसा** (पूर्वार्ध)—हर्बर्ट **स्पेन्सर** ह्यांच्या " First Principles " ग्रंथाच्या " The Know-able" भागाच्या आधारानें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी.ए. ह्यांकडून लिहविला.–किंमत २॥ रुपये; टपाल हंशील ३ आणे.

१४. **भारतवर्षीय भूवर्णन** (प्राचीन)—रा० रा० * **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांनीं लिहिला.

१५. **ज्ञेयमीमांसा** (उत्तरार्ध)—हर्बर्ट **स्पेन्सर** ह्यांच्या " First Principles " ग्रंथाच्या " The Know-able ". भागाच्या आधारानें रा• रा• **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.—किंमत २॥ रुपये; टपाल हंशील ३ आणे.

१६. **जीवितकर्तव्य** अथवा **संसारकर्तव्य**—दी राइट * ऑनरेबल **लॉर्ड एव्हबरी** ह्यांच्या " The Use of

Life " ह्या ग्रंथाच्या आधारानें रा० रा० दत्तात्रेय नारायण नावर, बी. ए, एल्एल्. बी. ह्यांजकडून लिहविला.

१७. **राणीच्या राज्याचा इतिहास**—जस्टिन मॅकार्थीकृत " A History of Our Own Times " ह्या ग्रंथाधारें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके** ह्यानीं लिहिला.—किंमत २ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१८. **आत्मविद्या**—रा० रा० **हरि गणेश गोडबोले**, बी. ए.
* ह्यानीं आर्यतत्त्वज्ञानाच्या प्राचीन व अर्वाचीन ग्रंथांच्या आधारें स्वतंत्ररीतीनें लिहिला.

१९. **समाजशास्त्राचे मूलसिद्धान्त**—हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या
* " The Principles of Sociology " ह्या ग्रंथाधारें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांनीं लिहिला.

२०. **समाजशास्त्राचे अनुभवजन्य सिद्धान्त व गृहसंस्था**—हर्बर्ट स्पेन्सरच्या " The Principles of Sociology " ह्या ग्रंथाधारें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यानीं लिहिला.
*

२१. **जननमरण-मीमांसा**—रा० रा० **विठ्ठल वाळकृष्ण भाटे**, बी. ए. ह्यांजकडून स्वतंत्र ग्रंथरूपानें लिहविला.—किंमत १॥। रुपये; टपालहंशील ३ आणे.

२२. **राजकीय संस्था**—हर्बर्ट स्पेन्सरच्या " The Political Institutions " नामक ग्रंथाधारें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यानीं लिहिला.
*

२३. **निबंधरत्नमाला**—प्रो० **गो० चि० भाटे**, एम् ए.; ले० क० डॉक्टर **का० र० कीर्तीकर**; प्रो० **के० रा० कानिटकर**, एम्.ए., बी. एस्सी.; प्रो० **वा० ब० पटवर्धन**, बी. ए.; प्रि० **र० पु० परांजपे**, एम् ए., बी. एस्सी.; प्रो. **ह० गो० लिमये**, एम्. ए; प्रो० **वै० का० राजवाडे**, एम्. ए. ह्या ७ विद्वानाकडून निरनिराळ्या ७ विषयांवर निबंध लिहवून एकत्र तयार केला. किंमत.२॥रुपये; टपालहंशील ३ आणे.

२४. **विधिसंस्था व धर्मविषयक संस्था**—हर्बर्ट स्पेन्सरच्या " The Principles of Sociology "

ह्या ग्रंथाधारें रा० रा० नारायण लक्ष्मण फडके, बी. ए. ह्यानीं-लिहिला. किंमत २॥ रु०; टपालहंशील ३ आणे.

२'१. **उद्योगसंस्था व धंदेसंस्था**—हर्बर्ट स्पेन्सरच्या "The Principles of Sociology" ह्या ग्रंथाधारें रा० रा० नारायण लक्ष्मण फडके, बी. ए. ह्यानीं लिहिला. किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

कायम वर्गणीदार व त्यांस मिळणारा फायदा

प्रतिवर्षीं बहुधा दोन नवीन ग्रंथ मी प्रसिद्ध करीत असतों. हे ग्रंथ कोणत्या प्रकारचे असतात त्याची दिशा वरील यादीवरून कळेल. प्रत्येक ग्रंथाच्या अमुक एक प्रती स्वीकारण्याचें लेखी वचन देऊन ठेवलेले ते कायम वर्गणीदार होत. ग्रंथ लहान मोठा असेल त्या मानानें आगाऊ वर्गणीदारांस १॥ किंवा २ रुपये किंमत ठेविली जाते, व त्या किमतींतही खालीं लिहिल्याप्रमाणें कायमच्या वर्गणीदारांस फायदा मिळतो.

(१) पुण्यांतल्यांस ४ आणे कमी पडतात.

(२) बाहेरगांवच्यांस पोस्टेज व व्ही. पी. चा खर्च पडत नाहीं.

(३) पांच प्रती घेणारांस सहा प्रती मिळतात.

ह्या उद्योगास ज्यांस मदत करावीसें वाटत असेल त्यांस कायम वर्गणीदार होण्याविषयीं अगर मिळवून देण्याविषयीं विनंति आहे.

४६८ नारायण पेठ, पुणें सिटी. } **बळवंत गणेश दाभोळकर** ग्रंथप्रकाशक.

प्रस्तावना.

प्रस्तुत पुस्तकांत " समाजशास्त्राचीं तत्त्वें " या ग्रंथाचे सातवा व आठवा असे दोन भाग आलेले असून ते त्याचे अखेरचे भाग होत. ते छापतांना त्यांचा क्रम चुकला आहे; म्हणजे आठवा भाग आधीं छापिला जाऊन सातवा पुढें छापिला गेला आहे. तथापि त्याचें निरीक्षण योग्य क्रमानेंच केलें पाहिजे.

सातवा भाग " धंदेसंस्था " हा असून त्याच्या प्रास्ताविक प्रकरणांत इतर संस्थांप्रमाणें ह्या संस्थांचा उगम काय व उपयोग काय ह्याचा विचार केलेला आहे, आणि असें दाखविलें आहे कीं, इतर संस्थांप्रमाणें ह्याहि संस्था मुळांत पूर्वजपूजेपासून उत्पन्न झालेल्या असून त्यांचा उद्देश अंतर्बाह्य शत्रूंपासून जीवितसंरक्षण किंवा जीवितनियमन व पोषण हा नसून, जीवितवर्धन हा आहे, आणि हें जीवितवर्धन निरनिराळ्या धंद्यांपासून कसें होतें हें थोडक्यांत स्पष्ट केलेलें आहे.

जीवितव्यापारांची वृद्धि व्हावी व ते बिघडल्यास पुनः सुरळीत चालूं लागावे, एतदर्थ पहिला उपयोग वैद्यांचा होत असतो, म्हणून वैद्य व शस्त्रवैद्य ह्यांच्या धंद्याचा विचार प्रथम म्हणजे दुसऱ्या प्रकरणांत केला आहे आणि रोग हे दैविक कारणांनीं उत्पन्न होतात अशी प्रथम समजूत असल्यामुळें उपाध्ये हेच प्रथमतः वद्य कसे बनतात, आणि मागाहून इतर वैद्यांची उत्पत्ति कशी होते हें दाखविलें आहे. तद्वतच सामान्य वैद्य व शस्त्रवैद्य ह्या दोघांची उत्पत्ति निरनिराळ्या रीतीनें कशी झालेली आहे हेंहि त्यांत स्पष्ट केलें आहे.

अखेरीस सामान्य उत्कान्तिनियमास अनुसरून ह्या धंद्यांत विंभिन्नकिरण व संकलीभवन हीं कशीं उत्पन्न होतात हें दाखविलें आहे, आणि हाच क्रम पुढील प्रत्येक प्रकरणांत ठेविलेला आहे.

जीवितव्यापार सुरळीत चालूं लागले म्हणजे त्यांचें वर्धन करण्याचा मुख्य उपाय मन उल्लासित करणें व ठेवणें हा आहे, आणि त्याचें पाहिलें साधन व दर्शक नर्तन व गानवादन हें आहे. म्हणून ह्या कलांचें विवेचन तिसऱ्या प्रकरणांत करून त्यांचीहि उत्पत्ति मुळांत पूर्वजपूजेपासून कशी झालेली आहे, आणि मागाहून त्यांचें विभिन्नीकरण व संकलीभवन होऊन त्यांस सांसारिक स्वरूप कसें आलेलें आहे हें दाखविलें आहे.

मन उल्लसित करण्याचें व ठेवण्याचें, आणि तें तसें झालें आहे हें दर्शविण्याचें, अन्य साधन मनाचे उमाळे शब्दांनीं व्यक्त करून दाखविणें, व शब्दांस अंगविक्षेपांचा दुजोरा देणें हें असतें आणि ही शब्दयोजना उल्लासाच्या प्रमाणाच्या मानानें साधी म्हणजे तालविरहित किंवा तालबद्ध अशी असते; म्हणून वक्तृत्व, काव्य, नाट्य, आणि नाटकरचना ह्यांचा विचार वरीलच पद्धतीनें चवथ्या प्रकरणांत केलेला आहे.

ह्या कलांच्या उत्पत्ति व वृद्धीबरोबर चरित्र, इतिहास, व इतर वाङ्मय ह्यांची उत्पत्ति व वृद्धि होत असते, म्हणून त्यांचा विचार पुढील म्हणजे पांचव्या प्रकरणांत केलेला आहे.

उपाध्या हा जसा प्राथमिक वैद्य, नर्तक, वादक, वक्ता वगैरे असतो, तसाच तो प्राथमिक शास्त्रज्ञ व

तत्त्वज्ञहि असतो; म्हणून ह्या वर्गाची उत्पत्ति उपाध्यापासूनच प्रथम कां व कशी झालेली आहे, आणि त्यांस धंदेवाले हें नांव देणें कितपत सयुक्तिक आहे, हें साहव्या प्रकरणांत स्पष्ट करून दाखविलें आहे,

उपाध्या हा जसा प्राथमिक शास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ असतो तसाच तो प्राथमिक न्यायाधीश व शिक्षकहि असतो; म्हणून ह्या धंद्याची उत्पत्ति त्याच्यापासून कशी होते, आणि पुढें ते हळू हळू विभिन्नीकरण पावून सांसारिक कसे बनतात हें अनुक्रमें सातव्या व आठव्या प्रकरणांत दाखविलें आहे.

पूर्वजपूजा करतांना हळू हळू मृतपूर्वजाला थडगें बांधणें, त्याची प्रतिमा तयार करणें, आणि ती होईल तितकी हुबेहूब दिसावी म्हणून ती रंगविणें ह्यांची जरूरी भासूं लागते, आणि म्हणून प्रारंभीं हेहि धंदे उपाध्या स्वतः करीत असतो, व मागाहून आपल्या देखरेखीखालीं अन्य लोकांकडून करवूं लागतो, म्हणून ह्या कलांचा व धंद्यांचा विचार यथाक्रम नवव्या ते अकराव्या प्रकरणांत केलेला आहे. अखेरच्या म्हणजे बाराव्या प्रकरणांत ह्या सर्व विषयांचा नेहमींच्या पद्धतीप्रमाणें समारोप करून ह्या एकंदर विवेचनावरून आपण काय शिकलें पाहिजे हें दर्शविलें आहे.

असो. अशा रीतीनें "धंदेसंस्थांचें" अगदीं संक्षिप्त दिग्दर्शन झालें. आतां "उद्यमसंस्था" कडे वळूं.

मनुष्य समाज करून राहूं लागला म्हणजे त्यांची नीट व्यवस्था राहण्यास किंवा त्याचें नियमन करण्यास, जशा विधिसंस्था, राजकीयसंस्था व धर्मसंस्था ह्यांची

उत्पत्ति होत असते,आणि माणसाचें जीवितवर्धन होण्यास जशा धंदेसंस्था उत्पन्न होतात, तसें समाजाचें पोषण होण्यास त्यांत हळूहळू उद्यमसंस्था उत्पन्न व्हाव्या लागतात. त्यांची उत्पत्ति प्रथम हळू हळू कशी होऊं लागते, आणि तीस प्रथम अडचणी किती जबर असतात ह्याचा विचार प्रस्तुत भागाच्या पहिल्या प्रकरणांत केला आहे.

ह्या संस्था उत्पन्न होऊन फायदेशीर वनूं लागण्यास कुटुंबांत व समाजांत श्रमविभाग उत्पन्न व्हावा लागतो. त्याची उत्पत्ति हळू हळू कशी होत व वाढत जाते यांचें विवेचन दुसऱ्या प्रकरणांत केलें आहे.

माणसाच्या पोषणाचे कांहीं पदार्थ त्यास प्रारंभीं विशेष श्रमांव्यतिरिक्त मिळत असतात. व कांहीं कमज्यास्त श्रम करून मिळत असतात. प्रथम माणूस विशेष श्रमांव्यतिरिक्त जें मिळेल तेवढ्यावरच बहुधा निर्वाह करीत असतो. आणि उद्योग करून ज्यास्त वस्तु मिळविण्याची संवय त्यास हळूहळूच लागते. ती कशी व केव्हां लागते वगैरे गोष्टींचा विचार तिसऱ्या प्रकरणांत केला आहे.

माणसाच्या प्रत्यक्ष निर्वाहाचे पदार्थ उत्पन्न करण्यास आउतें, हत्यारें वगैरे साधनसामुग्री लागत असते. ती उत्पन्न करणें ह्यास साहाय्यकारी उत्पादन असें नांव देऊन त्याचें विवेचन चवथ्या प्रकरणांत केलें आहे.

माणसाच्या उदरनिर्वाहाचे निरनिराळे पदार्थ निरनिराळ्या ठिकाणीं उत्पन्न होत असल्यामुळें ते सर्वांच्या सोईसाठीं निरनिराळ्या ठिकाणीं पसरावे लागतात ह्यास विभजन हें नांव देऊन त्याचा विचार पांचव्या प्रकरणांत केला आहे.

हें विभजन प्रारंभीं माल उत्पन्न करणाराच करीत असून मागाहून तें करणारेच स्वतंत्र लोक किंवा व्यापारी ह्यांची उत्पत्ति होते. त्यांच्या उत्पत्तीचा व वाढीचा विचार सहाव्या प्रकरणांत केला आहे.

पदार्थांचें विभजन करावयाचें म्हणजे निरनिराळ्या ठिकाणचे पदार्थ निरनिराळ्या ठिकाणीं न्यावयाचे व आणावयाचे, त्यांत त्यांची अदलाबदल किंवा विनिमय हा येतोच; हा त्यांचा विनिमय प्रथम प्रत्यक्षरीत्या होत असूम मागाहून अप्रत्यक्षरीत्या किंवा कोणत्या तरी प्रकारच्या नाण्याच्या द्वारा होत असतो. ह्या दोन गोष्टींचा विचार क्रमानें सातव्या व आठव्या प्रकरणांत केला आहे.

उदरनिर्वाहाचे निरनिराळे जिन्नस सोईप्रमाणें निरनिराळ्या ठिकाणीं जसे ज्यास्त ज्यास्त उत्पन्न होऊं लागतील तशीं हीं निरनिराळीं ठिकाणें एकमेकांवर ज्यास्त अवलंबून राहूं लागतात. आणि त्यांचे एकमेकांशीं ज्यास्त ज्यास्त संबंध येऊं लागतात. ह्या विषयाचा विचार नवव्या प्रकरणांत केला आहे.

समाजसंरक्षण आंतून व बाहेरून योग्य रीतीनें होण्यास त्यांतील व्यक्तींचें जसें विधिरूप, राजकीय व धार्मिक संस्थांनीं नियमन करावें लागतें, तसें समाजपोषणाचे उद्योग नीट चालण्यास ते करणाराचेंहि नियमन त्यासंबंधानें करावें लागतें. म्हणून त्याचा सामान्य विचार दहाव्या प्रकरणांत करून हें नियमन प्रथम कुटुंबपिता करीत असून मागाहून फांद्या फुटून वाढत जाणाऱ्या कुटुंबांतील मुख्य माणूस, किंवा

पितृशास्ता कसा करूं लागतो ह्याचा विचार क्रमानें अकराव्या व बाराव्या प्रकरणांत केला आहे. पुढें एकाच मूळ पुरुषापासून वृद्धि होऊन उत्पन्न झालेल्या अनेक कुटुंबांच्या समूहानें किंवा ज्ञातीनें करावयाच्या नियमनाचा किंवा शासनाचा विचार तेराव्या प्रकरणांत केला आहे.

ह्याहूनही ज्यास्त समाजवृद्धि झाली म्हणजे निरनिराळे उद्योग करणारांच्या निरानिराळ्या जमाती बनूं लागतात, आणि त्या आपल्या घटकांचें नियमन करूं लागतात. त्या विषयाचा विचार चवदाव्या प्रकरणांत केला आहे.

इतका वेळ निरनिराळ्या पोषक पदार्थांची उत्पत्ति, विभंजन, विनिमय, व तीं करणारांचें हळूहळू वाढत जाणारें नियमन, ह्यांचा विचार झाला. आतां हे पदार्थोत्पादन करणारे प्रथम कोण असतात, आणि मागाहून कोण असतात, आणि मागाहून कोण होतात, म्हणजे उत्पादकांचें उत्क्रमण हळूहळू कसें होत जातें, ह्या विषयाचा विचार पंधरा ते अठरा ह्या प्रकरणांत केला आहे.

पहिले पदार्थोत्पादक जे गुलाम व शेतगुलाम किंवा बंदेगुलाम व बंदेनोकर ते जाऊन, म्हणजे, त्यांस स्वातंत्र्य प्राप्त होऊन, जसे त्यांचे स्वतंत्र मजूर बनतात, आणि ह्या मजुरांचे संयुक्त समूह बनतात, तसे त्यांस मजूरी देणारे जे भांडवलवाले त्यांचेहि संयोग बनूं लागतात. ह्या संयुक्तभांडवलाचा विचार एकोणिसाव्या प्रकरणांत केला आहे.

संयुक्तभांडवल व संयुक्तभांडवलवाले ह्यांची जशी उत्पत्ति व वाढ झाली, तसें मजुरांना किंवा वर्गांनाहि

आपलीं मंडळें बनवून भांडवलवाल्यांना आपल्याला न्यायानें वागविण्यास लावणें भाग पडलें. ह्या मंडळांच्या उत्पत्तीचा व वाढीचा विचार विसाव्या प्रकरणांत केला आहे.

भांडवलवाले व मजूर ह्यांच्यामध्यें जी ही झटापट किंवा हिताहितांची चढाओढ सुरू झाली, ती कमी करण्याकरितां, म्हणजे ह्या दोन वर्गांचीं हिताहितें एकच करण्याकरितां, मजुरांना नफ्याचा भाग कोणत्या तरी रूपानें देण्याची प्रवृत्ति हळूहळू होऊं लागली आहे. त्याचा विचार एकविसाव्या प्रकरणांत केला आहे.

प्रत्येकास त्याच्या गुणांनुरूप व श्रमांनुरूप उत्पादित वस्तूंचा भाग मिळावा ही जी सध्यांची समाजस्थिति तिनें संपत्तीची योग्य वांटणी होत नाहीं हें पाहून कुटुंबघटकांप्रमाणें समाजघटकहि जणूंकाय एकत्रच रहावे ह्या तत्त्वाचा प्रसार पुष्कळ ठिकाणीं थोडाफार कोठें कोठें आलीकडे होऊं लागला आहे. ही क्लृप्ति कितपत बरोबर आहे, व ती पूर्णपणें अमलांत आल्यास त्याचे परिणाम काय होतील, ह्याचा विचार बाविसाव्या प्रकरणांत केला आहे.

तेविसाव्या प्रकरणांत जवळच्या भविष्यत्काळीं समाजस्थिति कशी होत जाण्याचा संभव आहे ह्याबद्दल अंदाज करून दूरच्या भविष्यत्काळीं ती कशी होईल हें अखेरच्या म्हणजे चोविसाव्या प्रकरणांत सांगितलें आहे आणि अशा रीतीनें एकंदर विषयाचा समारोप केला आहे.

ना० ल० फडके.

शुद्धिपत्र.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१४	११	व ख	व खत
२५	२६	ह्यांड्यांत	ह्योड्यांत
३१	५	त्याच्यावरून	यांच्यावरून
५१	१४	जिन्नन	जिन्नस
६५	२६	समाजामध्यें	समाजांमध्यें
७७	२०	मागावूं	मागवूं
८०	२	व्यापार	व्यापारी
९०	११	त्याचा	त्याचा
९४	१६	उवेचे	उवेचे
९५	२२	द्रव्याच्या	द्रव्यांच्या
१०२	८	तीं	व तीं
१०५	२०	ल्याची	ल्यांची
१२५	९	शहरामध्यें	शहरांमध्यें
१३४	१६	वुरुष	पुरुष
१३७	२२	घ्यावी	ती घ्यावी
१४०	१	‘ क्रॉफ्ट ’	‘ क्रॅफ्ट ’
१७१	२१	मुलांमांप्रमाणें	मुलामांप्रमाणें
१८३	२०	लाविलात.	करितात.
१९५	१४	जमीनदाराची	जमीनदारीची
२०६	२०—२१	द्रीनें	बुद्धीनें
२१६	२	केले	केले.
२२०	९	जें	जे
२२१	६	कामकऱ्यांत	कामकऱ्यांस
२२५	९	मप्राण	प्रमाण
२३४	२३	त्यांच्यात	त्यांच्याच
२३७	१५--१६	करण्याच्या	करण्याच्या ऐवजीं
२३९	१३	त्याच्या	त्यांच्या
२४०	१६	ज्याला	त्याला

२६२	२५	बेरीज वजाबाकी– बरोबर	बेरीजवजाबाकी बरोबर
२७५	२४	देणें.	देणें,
२८३	१३–१४	गुलाम व्हावयाची	गुलामहावयाची
२८८	१७	अवस्था	अव्यवस्था
२१३	१२	झिजविल्याचें	झिजविल्यानें
२९७	९–१०	केलेच	केलेंच
३२४	२	इजिप्त	इजिप्तचे
३७०	१	पाहिजे,	पाहिजे.
३७४	२०	दैनिक	दैविक
३७६	२२	समजतात.	समजत.
३८०	१०	जाहीं	नाहीं;
३८६	६	बीजरूप	बीजरूपचरित्राचें स्वरूप
३८७	२०	बोंब	नोंद
३८८	२६	नायकिणी	गायकिणी
३९८	१९	ज्यास्तच	ज्यास्तच स्पष्ट
३९९	३	चमत्कारांचें	चमत्कारांचें
४०२	२३	अचार	प्रचार
४०४	२६	आल्बर्ट सम्याग्नप्त,	आल्बर्टस म्याग्नस,
४०५	२३	शेजर	रोजर
४०७	२१	सत्याचें	सत्यांचें
४१५	६	उताऱ्यावरून	उतान्यांवरून
४१६	१४	त्याच्या	त्यांच्या
४३४	२३	जो	त्याजवरचा जो
४४६	१८	शतकामध्यैंच	शतकांपूर्वीच
४४९	२३	उपाध्याप्रमाणें	उपाध्यांप्रमाणें
४५५	१७	मागोमास	मागमोस
४५९	७	त्याची	त्यांची
४६०	३	प्रकारचेंच	प्रकारांचेंच
४६३	२६	डायड्न	ड्रायडन
४६८	२	एक केंद्रीभूत	एककेंद्रीभूत

४७४	१५	सन्मानीत	सन्मानित
४८१	३	इतकेंच	इतकें

परिशिष्ट

१५	१२	अ	असें
,,	२५	संकलनाचा	संकलनाची
१६	१५	फुलांच्या	प्राण्यांच्या
२९	११	नमुन्याचें	नमुन्यांचें
,,	१८	व आणि	आणि
४१	१३	त्याची	तिची
४५	१३	असतें.	असते.

अनुक्रमणिका

उद्योगसंस्था—१. प्रास्ताविक. १.–२. व्यापारविशिष्टीभवन आणि श्रमविभाग. २१–३. मिळविणें आणि उत्पन्न करणें.५३ ४. साहाय्यकारी उत्पादन. ६४–५. विभजन. ६९–६ साहाय्यकारी विभजन. ७४–७. विनिमय. ८५–८. साहाय्यकारी विनिमय. ९२–९ परस्परावलंबन आणि संकलन. १०८–१०. औद्योगिक नियमन. ११६–११. पैत्रिक नियमन. १३०–१२. पितृशास्त्याचें शासन. १४२–१३. ज्ञातिशासन. १४७–१४. जमानशासन.१५७ १५. गुलामगिरी. १७७–१६. शेतगुलामगिरी. १९५–१७. स्वतंत्र मजुरी आणि करार. २०८–१८. संयुक्त स्वतंत्र मजुरी.२२८ १९. संयुक्त भांडवल. २४३–२०. कामकरी मंडळें. २५२–२१. सहकिया. २६९–२२. समाईक समाजपद्धति. २८५–२३. निकट भावी स्थिति ३०२–२४. समारोप. ३२६.

धंदेसंस्था—१. धंद्यांविषयक सामान्य विचार.३३३–२. वैद्य व शस्त्रवैद्य. ३४०–३. नर्तक व वादक. ३५६–४. वक्ता आणि कवि, नट आणि नाटककार. ३७०–५. चित्रकार, इतिहासकार आणि साहित्यकार. ३८४.–६. शास्त्रकार आणि तत्त्वज्ञ. ३९८–७. न्यायाधिश आणि वकील. ४११–८. शिक्षक. ४२५ ९. शिल्पशास्त्रज्ञ. ४३७–१०. मूर्तिकार. ४४५–११. चित्रकार. ४५५–१२. धंद्यांचें उत्क्रमण. ४६६.

समाजशास्त्राचीं तत्त्वें—भाग आठवा

उद्योगसंस्था

प्रकरण पहिलें

प्रास्ताविक

१. बर्फावरून गरगर फिरत जाणारा बर्फाचा वाटोळा गोळा हें संयुक्तसंचयीभवनाचें चांगलें उदाहरण होय. त्या गोळ्याच्या ह्या फिरण्यानें त्याचा जो आकार वाढतो तो दर वेळीं तितक्या तितक्या बर्फाचीच भर पडून वाढतो असें नाहीं, तर दर वेळीं पूर्वीपेक्षां ज्यास्त भर पडून वाढतो. त्याच्या प्रत्येक गिरगिर फिरण्याच्या शेवटीं त्याचें वजन वाढल्यामुळें त्यास बर्फ ओढून घेण्याची ज्यास्त ज्यास्त शक्ति येते, आणि शिवाय, बर्फ ज्यास चिकटावयाचें तो त्या गोळ्याचा पृष्ठभागहि वाढतो. म्हणून त्याच्या वाढी ज्या होतात त्या तिबार प्रमाणांनीं होतात असें स्थूलमानानें म्हणतां येईल. एकादी मोठी आग पसरते ती अशाच प्रमाणावर पसरते. सुक्या कपड्यांवर एक ठिणगी, त्यांचें हळू हळू धुमसणें, लहानशी ज्योत, शेजारच्या हलक्या कठड्यांना आग लागून मोठी ज्वाळा, सामानसुमानास ती ज्वाळा पोंहोचल्यानें बराच वाढलेला ज्वाळेचा झोत, नंतर खोल्यांचे लांकडी पडदे, व तक्तपोशी हीं जळूं लागल्यानें ज्वाळेचा मोठा लोळ, अशी

स्थिति होते. त्यामुळें सगळें घरच्याघर पेटतें, नंतर क़दाचित् शेजारचीं घरें पेट घेतात, आणि नंतर कधीं कधीं कदाचित् सगळी आळीच जळून खाक होते; कारण अग्नीस क्रमें क्रमेंकरून ज्यास्त ज्यास्त भर पडल्यानें तो केवळ प्रत्यक्ष स्पर्शानेंच पसरतो असें नाहीं, तर त्यापासून निघणारी जी उष्णता तिनेंहि पसरतो, आणि म्हणून उष्णतेनें दूरचे पदार्थहि पेट घेतात.

मानवी प्रगतीचा क्रम आणि विशेषतः उद्योगविषयक प्रगति कशी होते, ह्याची एका स्वरूपीं कल्पना जरी वरील उदाहरणांनीं येते तरी अपूर्णपणेंच येते. कारण, कार्यकर शक्तींच्या वृद्धीनें होणारी जी वेगाची संयुक्त वाढ तेवढीच औद्योगिकप्रगतींत दिसते असें नाहीं, तर विरोध कमी झाल्यानें होणारी वेगवृद्धीहि तिचे ठिकाणीं दिसून येते. अनुकूल शक्तीचा प्रभाव दुबार प्रमाणांनीं वाढत असतां प्रतिकूल शक्तीचा त्याच प्रमाणांनीं कमी होत असतो; आणि म्हणूनच प्रारंभीं जेवढी औद्योगिक सुधारणा होण्यास हजार वर्षें लागलीं तेवढी हल्लीं एका वर्षांत बनून येते.

प्राथमिक माणसापाशीं त्याच्या दांतांशिवाय व हातांशिवाय अन्य साधनसामग्री म्हटली म्हणजे त्याच्या सभोंवतीं ज्या स्वाभाविक वस्तू पसरलेल्या असतील त्यांखेरीज, म्हणजे दगड, समुद्रकिनाऱ्यावर गोळा केलेल्या शिंपा, मृत वं मारिलेल्या प्राण्यांचीं हाडें, शिंगें, व दांत, वादळांनीं झाडांच्या तुटून पडलेल्या फांद्या, यांखेरीज अन्य कांहीं नसे. स्थूलमानानें काठ्या व दगड हीं त्याचीं हत्यारें असत; व त्यांपैकीं काठ्या ह्या उघडच ओबडधोबड असत,

कारण त्यांचीं टोंकें कापून टाकण्यास किंवा अंगें गुळ-गुळीत करण्यास त्याच्यापाशीं कांहींच नसे. जनरल पिट–रिव्हर्स म्हणतो त्याप्रमाणें व त्याच्या संग्रहावरून दिसतें त्याप्रमाणें काठीपासून अनेक आउतांची उत्पत्ति झाली; उदाहरणार्थ खणते, सोंटे, भाले, फेंकावयाच्या काठ्या, ढाली व वल्हीं, आणि हीं आऊतें कल्पना-विहीन रानट्याकडून बनवलीं जाण्यास कित्येक युगें जावीं लागलीं. काठी किंवा सोंटा सहजगत्या ह्या किंवा त्या दिशेनें सामान्य आकाराहून भिन्न आकाराचा असल्यास विशिष्ट कामास सामान्य सोंट्याहून ज्यास्त उपयोगीं कसा पडतो हें त्याच्या लक्षांत हळू हळूच आलें; आणि नंतर तो तसल्या आकाराच्या तसल्या काठ्यांचा किंवा सोंट्यांचा उपयोग त्याच कामाकडे करूं लागला; आणि शेवटीं यापासून लांकडाच्या योग्य तुकड्यांस योग्य आकार देण्याची संवय त्यास लागली.

ही अल्प प्रगति होण्यास देखील ओबडधोबड हत्यारांची जरूरी होती; प्रथम काठ्यांवरची साल काढ-ण्यासाठीं, आणि नंतर त्या कापण्यासाठीं; आणि असल्या हत्यारांची उत्पत्ति दीर्घकालामध्यें अगदीं आस्ते आस्ते झाली. दगडी हत्यारांचें युग होऊन गेल्यास किती हजार वर्षें झालीं हें आपल्यास सांगतां येत नाहीं; पण भूगर्भांतील गाळाच्या थरांत आणि नष्टजाति प्राण्यांचे सांगाडे असलेल्या गुहांत सांपड-णाऱ्या ज्या ओबडधोबड रीतीनें कापलेल्या गारा त्यांवरून हें युग फारच प्राचीन काळीं होऊन गेलें असें दिसतें. दगडावर दगड आपटून साल काढण्यास योग्य व कधीं

कधीं कापण्यास योग्य, अशी धार त्यांस आल्यानें माणसास तसले दगड बनविण्याची कल्पना निःसंशय प्रथम आली असली पाहिजे; आणि चांगले तुकडे मिळविण्यासाठीं पुष्कळ गारा फोडण्यापासून तीक्ष्ण धारेनें दगडाच्या चिपा तोडून काढण्याची कला विशेष कुशल रानट्यांस प्रथम साधली असली पाहिजे. लांकडी हत्यारामाणें हळू हळू हे आकार एकमेकांपासून विभिन्नीकरण पावून स्पष्ट आकाराचीं साल काढण्याचीं हत्यारें, कर्वतीसाठीं दांते पाडिलेले दगड, पानाच्या आकाराचीं दगडी पातीं, आणि भाल्यांचीं टोंकें हीं उत्पन्न झालीं असलीं पाहिजेत. त्याच्या नंतरचा जो नव्या दगडांचा काळ त्या काळांत दगडी हत्यारांची सुधारणा उच्चतर नमुन्याच्या माणसाकडून निःसंशय उच्चतर स्वरूपाप्रत झाली असली पाहिजे. प्रथम घांसून तयार केलेल्या घारांच्या कुदळी, व नंतर सर्वच पृष्ठभाग घांसलेल्या कुदळी, अशा माणसांनीं तयार केल्या; आणि नंतर लवकरच मूठ बसवतां यावी एतदर्थ दगडी हत्यारास खोदून भोंकें पाडण्याची आउतें निघालीं. पिट-रिव्हर्सच्या संग्रहांतील बाणाच्या टोंकांपैकीं एकाच्या निरीक्षणावरून हत्यारें उत्पन्न करण्यास हत्यारांचा उपयोग कसा करावा हें त्या काळीं माहीत झालें होतें असें दिसतें. ह्या प्रगतीमुळें त्याबरोबरच लांकडांच्या तुकड्यांनाहि योग्य आकार देण्याचें सामर्थ्य आल्यामुळें मोठालीं कापण्याचीं हत्यारें करण्याचें सामर्थ्य माणसास आलें. आतां झाडांचा सोंट पोखरून लहानशी होडी तयार करण्यास काय काय कृती कराव्या लागतात ह्याचा विचार केल्यास,

पाणी कापून जाण्याची ही साधी योजना देखील करण्याचें सामर्थ्य येण्यापूर्वी माणसाची किती प्रगति झाली असली पाहिजे हें लक्षांत येतें.

कलाकौशल्यांत पुढें पाऊल पडण्यास दीर्घकालपर्यंत ज्या अत्यन्त अडचणी आल्या असतील त्यांची कल्पना वरील विवेचनावरून होणार आहे; आणि प्रगतीचें मुख्य साहाय्यक जें योजनांचें सहकार्य त्याचा ह्या पहिल्या पहिल्या पायऱ्यांवरहि किती उपयोग झाला असेल हेंहि ध्यानांत येणार आहे.

२. पारधीची अवस्था जाऊन धनगरी अवस्था कोणत्या पायऱ्यांनीं माणसास प्राप्त झाली हें आपणास कधीं कळून येईलसें वाटत नाहीं. वनस्पतिभक्षक प्राण्यांस माणसाळण्यास फारच दिवस लागले असले पाहिजेत. रानटी प्राणी पकडून आणि रानांतील फळें गोळा करून होणारा जो उदरनिर्वाह त्यापेक्षां बरींच जनावरें वाळगून जास्त चांगला उदरनिर्वाह होतो असा जेव्हां माणसास अनुभव आला तेव्हांच आपल्या ह्या खंडांत इतकी विस्तृतरीत्या पसरलेली, आणि बहुतेक सुधारलेल्या समाजांच्या रचना व संवयी उत्पन्न करण्यास एवढी कारणीभूत झालेली जी धनगरी अवस्था तिची उत्पत्ति झाली असली पाहिजे.

ह्या धनगरी नमुन्यास प्रथमच ज्या अडचणी आल्या, त्याखेरीज आणखीहि अडचणी त्यास सारख्या येतच गेल्या. गुराढोरांच्या कळपांना खाद्याचा पुरवठा करण्याचा प्रश्न दररोजच नव्यानें उत्पन्न होई, आणि त्यासाठीं त्यांस सारखें स्थलान्तर करीत रहावें लागे. अवर्षणानें जनावरें

मेलीं म्हणंजे धनगरी जीवित सोडून पुनः शिकारी जीवित धारण करण्याची पाळी त्यांस वरचेवर येई. मेंढरांचे कळप व गुरांचे जमाव यांस पाण्याचा योग्य पुरवठा करतां न आल्यामुळें त्यांची हिंमत वरचेवर खचत असली पाहिजे. शिवाय जनावरांवर सारखी नजर ठेवण्याचा बोजाहि फार जड असे. वरें, इतके श्रम करूनहि हिंस्र श्वापदें दिवसा चोरून व रात्रीचीं बेधडक येत असल्यामुळेंहि गुराढोरांची संख्या बरीच कमी होत असे. ह्या मोठाल्या शत्रूंच्या व्यतिरिक्त आंतून व बाहेरून हल्ला करणारे किडे, माशा, जन्तू, इत्यादि क्षुद्र जीवांशीं त्यांस झगडावें लागेच, जसें हल्लीं कालमकलोकांस जनावरें घेऊन डोंगरावर जावें लागतें.

ह्या अन्यप्राणिरूप शत्रूंखेरीज आणखी मनुष्यरूपी शत्रु असतच. जे लोक धनगर बनले, व जे पारधीच राहिले, त्यांच्यामध्यें सारखीं वैरें उत्पन्न होत असलींच पाहिजेत, व म्हणून ते त्यांच्या जनावरांच्या कळपांवर वरचेवर हल्ले करीत असले पाहिजेत. शिवाय निरनिराळ्या धनगरी टोळ्यांमध्येंहि तंटे उत्पन्न होत असलेच पाहिजेत. असले तंटे केवळ चारणीच्या स्थळांबद्दलच उत्पन्न होत असतील असें नाहीं, तर गुरें चोरल्यावरूनहि उत्पन्न होत असतील. असले तंटे दक्षिण-आफ्रिकेतील टोळ्यांमध्यें हल्लीं आंढळून येतात, आणि इंग्लिश व स्कॉच लोक ह्यांजमध्यें त्या दोन देशांच्या सीमेवर थोड्याच शतकांपूर्वीं होत असत.

प्रगतीस होणारे अशा रीतीचे जे हे सामान्य अडथळे त्यांखेरीज कोठें कोठें असल्यासारखेच कांहीं विशि-

ष्ट अडथळे तीस झालेले आहेत. एका समाजानें उच्चतर प्रकारचें सामाजिक जीवित स्वीकारल्यानें जुन्या सामाजिक जीवितास चिकटून राहिलेले जे शेजारचे लोक ते त्यांचा द्वेष करूं लागतात. असल्या ह्या कारणांनीं सारख्या लढाया उत्पन्न झाल्याचीं उदाहरणें आपल्या ह्या खंडांतील प्राचीन ग्रंथांतून आढळून येतात.

यावरून, तर मग, हें स्पष्ट होतें कीं, पारधीस्थितींतून उच्चतर स्थितींत संक्रमण होतांना पुष्कळ व मोठाले अडथळे येत गेले, आणि त्यामुळें असले असंख्य यत्न निःसंशय निष्फळ झाले असले पाहिजेत. सृष्टीकडे पाहतां आपल्यास असें दिसतें कीं, थोड्याशा बीजांस अंकुर फुटावा एतदर्थ अनेक बीजें उत्पन्न होंत असतात. समाजनमुन्यांचेंहि असेंच झालेलें आहे. म्हणून आपल्यास असें अनुमान करण्यास मुळींच हरकत नाहीं कीं, ज्या नमुन्यांपासून सुधारलेले समाज उत्पन्न झाले त्यांची स्थापना अगण्य निष्फळ प्रयत्नांनींच झाली.

२. इतर प्रकारच्या प्रगतीप्रमाणें सामाजिक प्रगति एकाच रेषेंत होत नाहीं तर मूळ कांड्यास फांटे फुटून व पुनः फुटून होत असते. विभिन्नीकरण पावून उत्पन्न झालेली प्रत्येक सामाजिक चीज अन्य प्रकारच्या विभिन्नीकृत चिजांच्यां समूहाला उत्पन्न करीत असते. पृथ्वीवर पसरत असतां मानवजातीस अनेक प्रकारच्या परिस्थिती आढळल्या आहेत; आणि प्रत्येक ठिकाणीं जें सामाजिक जीवित उत्पन्न झालेलें आहे तें कांहीं अंशीं पूर्वीच्या सामाजिक जीवितावरून आणि कांहीं अंशीं नवीन परिस्थितीच्या प्रभावांवरून निश्चित झालेलें आहे.

ह्या सुगाव्याचा परिणाम संख्येनें वाढत जाणाऱ्या लोकसमूहांमध्यें कधीं लहान व कधीं मोठे भेद उत्पन्न व्हावे हा झालेला आहे; म्हणजे, समाजामध्यें जाती व उपजाती उत्पन्न झालेल्या आहेत.

फ्यूजियन, तास्मेनियन, आस्ट्रेलियन व आंदामान-बेटवाले इत्यादि हलक्या जातींचे लोक सर्वांशीं गोळा केलेल्या किंवा पकडलेल्या वन्य खाद्यावर निर्वाह करितात; आणि फ्यूजियन एस्कीमो या लोकांमध्यें अन्य खाद्य मिळण्यासारखेंच नाहीं. इतरत्र, जसें आस्ट्रेलियांत, माणसाळण्यास योग्य असे प्राणी नसल्यामुळें तसले प्राणी व त्यांचीं दूध, लोंकर, इत्यादि उत्पन्नें ह्यांवर निर्वाह होणें शक्यच नाहीं. आणि ह्या पारध करून राहणाऱ्या हलक्या जातींमध्यें शेतकीचा ओनामाहि आपल्यास आढळून येत नाहीं. उत्तर अमेरिकेंतील वरच्या दर्जाच्या ज्या पारधी जाती त्यांची स्थिति याहून भिन्न आहे. त्यांच्यांतील कांहीं पारध, कंदमुळें आणि फळें ह्यांच्यावरच जरी उदरनिर्वाह करितात, तरी दुसरे कांहीं अंशीं शेतकीवरहि निर्वाह करतांना आढळतात. डाकोटालोक हे सामान्यतः पारधीच आहेत; पण त्यांच्यांतील डेवाक्यान्टोन्वान नांवाची एक टोळी धान्य, वालवाटाणे, व भोंपळे वगैरे फळें उत्पन्न करूं लागली आहे. (ह्यांत त्यांनीं बहुधा तिकडे गेलेल्या गोऱ्या लोकांचें अनुकरण केलेलें असावें.) मण्डणलोकांचेंहि असेंच झालें; तेहि वन्य खाद्यावरच केवळ न राहतां धान्य वगैरे उत्पन्न करावयास लागले. त्यांच्यामध्यें राजकीयघटना व जीवितसरणी ह्या बाबतींत सर्वांत जास्त सुधारलेले जे इरोक्वाइस

नामक लोक त्यांच्यांत शेतकीची वाढ बरीच झालेली होती व ती त्यांनीं यूरोपांतील वसाहतकारांपासून उचलली असें त्यांच्या दंतकथांवरून दिसत नाहीं. मार्गनसाहेब त्यांच्यांतील खेड्यांचें वर्णन करतांना म्हणतो कीं, त्या-सभोंवतीं कित्येक एकरपर्यंत पसरलेलीं त्यांचीं शेतें बहु-धा असत, व निरनिराळ्या कुटुंबांच्या शेतांमध्यें मातीचे बांध असत. दुसऱ्या ठिकाणीं तो असें म्हणतो कीं, त्या लोकांचें मका हें धान्य मुख्य खाद्य असे, व त्याची लागवड करून शिवाय ते वालवाटाणेहि लावीत असत. दक्षिण अमेरिकेंत असलेच मोठे फरक दिसून येतात ! आबिपोन व पाटागोनियन लोक वन्यवस्तूंवरच निर्वाह करितात, पण ग्वायना, ब्राझिल वगैरे देशांतील टोळ्या धान्यें लावून तीं खातात. त्यांच्यांत ह्यासंबंधानें निरनिराळ्या पायऱ्या दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ, तुपीलोकांबद्दल आपण वाचितों कीं, त्यांची जमीन तयार करण्याची पद्धति अडाणीपणाचीच असे, ते जी जमीन लागवडीस आणावयाची तिजवरील झाडें तोडीत आणि तीं वाळत तोंपावेतों तेथें पडूं देत. वाळलीं म्हणजे तीं जाळून टाकीत, आणि नंतर त्यांच्या बुंध्यांच्या मध्यें मध्यें जी रिकामी जागा असेल तींत धान्य पेरीत. मंद्रूकसलोकांबद्दल बेट्स् म्हणतो कीं, ते मोठालीं शेतें लावून उदरनिर्वाहास पुरून उरलेलें धान्य विकून टाकितात. तद्वतच उवापीलोकांबद्दल वालेस म्हणतो कीं, ते शेती करून राहणारे लोक आहेत; आणि सतत एके ठिकाणीं राहणारे असल्यामुळें ते ऊंस, नारळ, गाजरें, मका, केळीं द्राक्षें, तंबाखू, मिरीं, नीळ, वगैरेची लागवड करितात.

एवंच जनावरें बाळगण्याची स्थिति शेतकीच्या स्थितीच्या अगोदर सर्वत्रच आलेली दिसत नाहीं. पाश्चात्य देशांमध्यें घनगरी स्थितींत उगम न पावलेल्या पुष्कळ सुधारणा दिसून येतात. प्राचीन मेक्सिकन व मध्य-अमेरिकन लोक वाहक जनावरांच्या मदतीशिवायच पिकें उत्पन्न करीत. आणि त्यांच्यापाशीं घोडे, गुरें, आणि मेंढ्या नसल्यामुळें त्यांस शेताला खतहि मिळत नसे, किंवा पिकें वाहून नेण्यास किंवा नांगर ओढण्यास जनावरेंहि मिळत नसत. दक्षिण समुद्रांतील बेटवाल्यांमध्येंहि असलाच उद्यमविषयक इतिहास दिसून येतो.

पण ह्या ठिकाणीं जनावरांव्यतिरिक्त शेतीचा हा उदय आपणास लक्षांत घ्यावयाचा नाहीं आहे, तर प्रारंभींप्रारंभींच्या पायऱ्यांवर शेतीस किती भयंकर अडथळे येत असतात हे ध्यानांत घ्यावयाचें आहे. ह्याची कांहीं कल्पना दक्षिण अमेरिकेंत माणासाचा सृष्टीशीं जो झगडा चाललेला असतो त्याचें **जेम्स राडवे** ह्यानें जें वर्णन केलें आहे त्यावरून होते. तो म्हणतो:—शेतकऱ्यांनें रानांत पेरणीसाठीं जंगल कापून जी थोडीशी मोकळी जागा केली असेल तिला कवटाळण्यास मागाहून जंगल जणूं काय हात पसरीत असतें. पुढें घुसून येणाऱ्या वेलींचे चाबकासारखे फांटे फळझाडावर पसरतात, आणि त्यांस आपल्या छायेखालीं क्रमाक्रमानें आणितात. शेवटीं शेतकऱ्याच्या घरासभोंवतींहि त्या वाढतात, व घरावर पसरतात. इकडे घराच्या खांबल्यांवर मुंग्यांनीं बहुधा हल्ला करून ते पोकळ केलेले असतात, व पडण्याच्या बेतांत येतात. म्हणून त्यास नवें घर

बांधण्याची जरूर भासूं लागते; आणि तो दुसरीकडे रानतोड करून मोकळी जागा करूं लागतो. अशा रीतीनें जुनी जागा रिकामी पडून सृष्टीचा तेथें पूर्ववत् पगडा बसतो. थोड्या महिन्यांनीं पाहवें तों वाट बुजून, घर पडून, जंगल दुःप्रवेश झालेलें दृष्टीस पडतें.

जंगली शेती व तिच्यांतील अडचणी ह्यांचीं उदाहरणें आपल्या ह्या देशांतील अनेक डोंगरी लोकांमध्यें दिसून येतात. उदाहरणार्थ, लेपचालोक एके ठिकाणीं तीन वर्षांहून ज्यास्त काळपर्यंत क्वचितच रहात असून त्यांच्याबद्दल आपण असें वाचितों कीं, ते जे जमीन मोकळी करितात ती लहान लहान झाडें कापून टाकून व मोठाल्या झाडांच्या फांद्या तोडून करितात; नंतर त्या फांद्या जाळितात, आणि मग जमीन खाजवितात; नंतर पाऊस पडला म्हणजे तींत धान्य पेरितात. बोडो व ढिमाल लोकांविषयीं असें म्हणतात कीं, ते नवी जमीन दर दुसऱ्या वर्षीं मोकळी करितात, व ती करण्यांत जंगलास आग लावून देणें हा अत्यंत खात्रीचा मार्ग असतो. बटलर म्हणतो कीं, कुकीलोक एका जमिनींत एकच पीक काढितात, आणि नंतर ती जमीन सोडितात, आणि पुढच्या वर्षाकरितां कळक कापून नवी जमीन तयार करितात. दुसऱ्या एका टोळीविषयीं मास्टर्स म्हणतोः—नागानें दोन वर्षें एका शेताची लागवड केल्यावर, आणि कधीं कधीं तर एक वर्षच लागवड केल्यावर त्यास त्यांत रान इतकें माजलेलें आढळून येतें कीं, तींत पुनः धान्य पेरण्यांत अर्थ नाहींसा होतो, आणि म्हणून जंगल कापून तो नवीन शेत तयार क-

रितो. क्यारेनलोकांच्या संबंधानें मेसन म्हणतो कीं, त्यांच्यांतील बहुतेकजण दरवर्षीं नवें शेत करितात. ते कांहीं एकर जमीन रानं तोडून मोकळी करितात, तें रान उन्हाळा संपण्याच्या सुमारास तेथेंच जाळतात, म्हणजे त्या राखेचें खत बनतें, आणि पाऊस पडला म्हणजे भात पेरितात. एकदां एक शेत पेरिलें म्हणजे तें १० किंवा २० वर्षें पडित टाकावें लागतें. शिवाय वन्यश्वापदांनीं शेताची नासधूस करूं नये म्हणून रात्रीचा पाहरा करावा लागतो, व तेव्हां तेथें वाघ आल्यास त्यानें आपल्यावर हल्ला करूं नये म्हणून बंदोबस्त करावा लागतो. गोंडलोकांस असेंच करावें लागतें.

कुऱ्हाड हें जें ह्या डोंगरी लोकांहून ज्यास्त सुधारलेल्या लोकांनीं तयार केलेलें हत्यार त्याच्या साहाय्यानेंच ही ओबडधोबड शेती तरी शक्य झालेली आहे. ही गोष्ट ध्यानांत घेतां, प्रारंभीं केवढ्या अनिर्बाय अडचणींशीं लोकांना टक्कर द्यावी लागली असली पाहिजे ह्याची कांहीं कल्पना येईल, कारण त्यावेळीं अणकुचीदार कढया आणि प्राण्याच्या हाडांच्या केलेल्या कुदळी ह्यांखेरीज दुसरीं आउतें नव्हतीं, आणि रोपीं कशीं लावावीं ह्याचें ज्ञान नव्हतें. अशा स्थितींत शेतीची मुळीं उत्पत्ति तरी कशी झाली हेंच आश्चर्यकारक आहे; कारण, तींस मेहनत इतकी मोठी पडून पीक येईल किंवा नाहीं ह्याची इतकी अशाश्वती असे. पण उपरोध कमी होत जाईल तशी प्रगति कशी झपाट्यानें होत जाते ह्याचेंहि उदाहरण एथें दृष्टीस पडतें. जोंपावेतों शेती जमिनीच्या लहान लहान तुकड्यांवरच होत होती

च सभोंवतीं रान पुष्कळ होतें तोंपावेतों तेथें रान केव्हांच उगवत असे. पण शेतांचा विस्तार जसा वाढत गेला आणि रानाचा कमी होत गेला, तसा शेतीस रानाचा उपरोध कमी होत गेला. तथापि हल्लीं देखील शेतांतील रान काढून टाकणें हा केवढा तरी खर्चाचा उद्योग असतो; शिवाय पीक काढल्यावर जमीन साफकरून भाजणें हा खर्च असतोच. शिवाय टोळधाड वगैरे येऊन किंवा कीड वगैरे लागून शेताची नासाडी होते ती निराळीच. यावरून प्रारंभीं जमिनीच्या लागवडीस स्वाभाविक अडचणी किती अपरंपार होत्या हें चांगलें दिसून येतें.

४. ज्या सुधारलेल्या पद्धतीस हल्लीं शेती म्हणतात, आणि जिच्यांत जनावरें आणि रोपे ह्यांची वाढ अशा रीतीनें करितात कीं त्यांची परस्परांस मदत व्हावी, तिला प्रारंभीं वरच्याहूनहि ज्यास्त अडचणी असत. जमीन जेव्हां लागवडीस आणूं लागले तेव्हां आपोआप उगवलेल्या व दूरवर पसरलेल्या रानगवतावर जनावरांचें पोषण करणें सोडून द्यावें लागलें. म्हणून जेथें थोड्याच आवारांत गुरांस गवत किंवा मुळें मिळतील अशा ठिकाणींच वस्ती करणें लोकांस भाग पडूं लागलें. तद्वतच आतां पाण्यासाठीं गुरांस व मेंढ्यांस दूरवर नेणें गैरसोईचें झाल्यामुळें वस्तीच्या ठिकाणीं पाण्याचा कायमचा पुरवठा असणें जरूर पडूं लागलें. शिवाय जाळण्याकरितां, हत्यारांकरितां आणि घरें बांधण्याकरितां साधारण जवळच लांकडाचा पुरवठा असण्याची जरूरी भासूं लागली. म्हणून ह्या सर्व गोष्टी असतील अशीं वसतिस्थानें पूर्वीच्या मानानें अल्पच सांपडत. शिवाय कळाकुसरमिश्रें लोकांचें

पाऊल कांहीं तरी पुढें पडलेलें असण ह्या गोष्टीचीहि त्या वेळीं आवश्यकता होतीच. वाहनाच्या जनावरांचा लागवडीच्या कामीं उपयोग करतां येण्यास जमीन उकरण्यास योग्य असें एक ओबडधोबड आऊत तयार करणें आवश्यक होतें; आणि बराच जोर खर्च करतां येईल अशीं कापण्याचीं हत्यारें बनविणेंहि जरूर पडलें. बिनचाकी-गाडीसारखें खत आणण्याची व पीक नेण्याची मेहनत बरीच कमी करणारें कांहीं तरी वहन बनविल्या-खेरीज पुष्कळशी जमीन बरोबर रीतीनें लागवडीस आणणें शक्य नव्हतें, तद्वतच आपल्या जनावरांचें चोरांपासून व वन्यश्वापदांपासून संरक्षण करण्यास व ख सांठवून ठेवण्यास गोठे बांधणेंहि जरूर असे.

ह्या संक्रमणांतील कांहीं पायऱ्या आफ्रिकेमध्य दिसून येतात. उदाहरणार्थ, हाटटाट व डमारा लोक धनगरी असून भटक्येहि आहेत.बेचुआनालोक आपले कळप चारणीच्या ठिकाणीं नेतात, आणि तेथें त्यांस राहण्याकरितां कुंपलेल्या जागा तयार करितात; आणि त्यांच्या बागांच्या व शेतांच्या सभोंवतींहि बहुधा कुंपणें असतात. त्यांच्या संबंधानें टाम्सन म्हणतो कीं, ते कांहीं अंशीं शेत्ये आहेत; त्यांच्या गुरांपासून व पारधीपासून जें कांहीं त्यांस मिळेल त्यांत थोडीशी भर पडेल इतकेंच त्यांच्या शेतांतून उत्पन्न बहुधा होतें.

काफिरलोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, ते जुनें गवत जाळून टाकून हिरवें गवत नेहमीं मिळवूं शकतात; ते कणखर लांकडाच्या लहान लहान कुदळींनीं खणतात; ते गांवाभोंवतीं व कधीं कधीं धान्या-

च्या शेतांसमोंवतीं कुंपणें घालितात; आणि इरोकोईस-लोकांप्रमाणें ते भुयारांतून धान्याचा सांठा करून ठेवितात. किनाऱ्यावर राहणाऱ्या नीग्रोलोकांपाशीं शेतीच्या कामीं त्यांस मदत करण्यास नांगर नसतो, व जनावरेंहि नसतात. त्यांची शेती म्हटली म्हणजे इतकीच कीं जमिनींत भात पेरावयाचें व एकप्रकारच्या कुदळीनें जमीन जराशी ओरपावयाची; ते एकाच जमीनींतून दोन पिकें कधींच काढीत नाहींत. कांगोमध्यें बोरू-सारखें लांब गवत जाळून जी राख उत्पन्न होईल तिचेंच खत कायतें जमिनीस घालितात; त्यांच्यापाशीं नांगर ओढणारीं जनावरें नाहींत, व नांगरहि नाहींत. जमीन साफ करून भाजावयाची, आणि ओबडधोंबड रीतीनें उकरून तिच्यांत धान्य पेरावयाचें ह्यापलीकडे आशान्टीमध्यें शेतकीची मजल गेलेली नाहीं. आंतील प्रदेशांत रहाणाऱ्या नीग्रोलोकांमध्यें ह्याहून जास्त प्रगति झालेली आहे; त्यांच्यांत नांगरण्याची वगैरे पद्धति याहून बरी असून जनावरेंहि पुष्कळ प्रकारचीं असतात. उदाहरणार्थ, उंट, घोडे, गाढवें, बैल, डुकरें, बकरीं, मेंढ्या, बदकें, कोंबडीं, इत्यादि. ग्यांबिया नदीच्या नजीकचे एका टोळीचे लोक जमिनीस खत घालण्यासाठीं गुरांचें शेण गोळा करितात म्हणून मंगोपार्क सांगतो. फुल्ला हे लोक उच्चतर नमुन्याचे असून त्यांच्यापाशीं गुरें व घोडेहि आहेत, आणि ते एकाच जमिनींतून अनेक पिकें काढितात; ते शेतांतील रान गोळा करून तें जाळितात; आणि ती राख शेणांत मिसळून पावड्यानें जमिनींत पसरतात. आफ्रिकेंतील सर्वांत जास्त

प्रबळ जे डेहामनलोक. त्यांच्यांत शेतीची सुधारणा ह्याहूनहि जास्त झालेली आहे; त्यांच्यापाशीं गुरें, मेंढरें, कोंबडीं,बदकें, आणि बकरीं असतात. त्यांच्यांत जे ज्यास्त उद्योगी असतात ते घरांसभोंवतीं स्वयंपाकघरांतील जो राखेचा वगैरे ढीग जमलेला असेल तोहि शेतावर पेरितात. कांहीं ठिकाणीं एका जमिनींतून वर्षांतून दोन पिकें काढितात. आबिसिनियन लोकांनीं ह्याच्याहि पुढें प्रगति केली आहे. उदाहरणार्थ, हारिस म्हणतो कीं ते लोक कुदळीच्या ऐवजीं नांगराचा उपयोग करितात; आणि नद्यांचें पाणी शेताकरितां कालवे बांधूनहि आणितात; बहुधा ते वर्षांचीं दोन पिकें काढितात. नांगर ओढावयास ते जनावरें लाविताते, आणि बैलांना मुस्क्या घालून त्यांच्याकडून धान्य मळवितात. ते एकंदर ४३ प्रकारचीं धान्यें उत्पन्न करितात.

जमीन उकरण्याच्या आउतांचा हा उपयोग, आणि प्राण्यांपासून उत्पन्न झालेल्या खताचा हा उपयोग ह्या सुधारणेच्या प्रगतींतील फार महत्त्वाच्या पायऱ्या आहेत. कारण त्यांचे योगानें नियमित स्थळीं पुष्कळ वस्ती होणें शक्य होतें. ईजिप्तमधील भिंतींवरच्या चित्रांवरून असें दिसतें कीं तेथें बैलांनीं ओढलेल्या नांगराचा उपयोग लवकरच करूं लागले. हीब्रूलोक जेव्हां ईजिप्त मधील कैदेंतून सुटून गेले तेव्हां ते हें शेतकीचें ज्ञान आपल्याबरोबर घेऊन गेले, आणि त्यांच्यापैकीं कांहींजण जरी पुनः पूर्वींचा आपला धनगरी धंदा करूं लागले, तरी कांहींजण चांगले शेत्ये बनले, आणि शहरें वसवून त्यांत राहूं लागले. ते जमीन नांगरीत, तींत खत घालीत, पेरीत,

कापणी करीत, पेंढ्या बांधीत, धान्य मळीत, पाणी कालव्यांतून आणीत, आणि डोंगरांच्या उतरणीवर शेतें तयार करीत; आणि शिवाय द्राक्षवेली, तेलाचीं फळें व इतर फळेंहि लावीत. आर्य जातींच्या लोकांचेंहि असेंच झालें. ते आरंभीं धनगर असून यूरोपांत हळूहळू पसरले; आणि तेथील मूळच्या जातींस जिंकून गुरें बाळगणारे व धान्यें पिकविणारे बनले, व त्याचा परिणाम-हि वरच्यासारखाच झाला; म्हणजे त्यांचें जीवित स्थाइक बनलें, व त्यांनीं शहरें वसविलीं.

पण अशा रीतीनें जरी उच्चतम परिणाम उत्पन्न झाले आहेत तरी अमेरिकन लोकांच्या उदाहरणांत दिसतें त्याप्रमाणें इतर मार्गांनींहि बरीच प्रगति होऊं शकते हें आपण ध्यानांत ठेविलें पाहिजे.

५. उद्यमविषयक प्रगतीस प्रारंभीं पुष्कळ व मोठाले अडथळे असत, आणि ह्यांपैकीं एकेक अडथळा जसा लोक काढीत गेले तशीच प्रगति ज्यास्त ज्यास्त वेगानें होऊं लागली; म्हणजे, सृष्टीकडून होणारे विरोध जसे हळूहळू कमी झाले, तशी तिच्याशीं व्यवहार करण्याची शक्ति हळूहळू वाढत गेली; ह्या गोष्टी वरील ठोकळ विवेचनावरून जरी वाचकांच्या सामान्यतः लक्षांत आल्या तरी पुरे आहे.

पण मानवी स्वभावापासूनच ज्या अडचणी उत्पन्न झालेल्या आहेत त्या लक्षांत घेतल्याविना ज्या अडचणी काढून टाकण्यास माणसास हजारों वर्षें लागलेलीं आहेत त्यांची बरोबर कल्पना मुळींच येणें नाहीं. कारण मानवी स्वभावाचे मूळचे विशेष अनेक रीतींनीं

सुधारणेला प्रतिकूल होते. पारधीटोळ्यांमध्यें वस्ती वाढल्यामुळें अन्नाची टंचाई उत्पन्न होऊन जी सारखी लढाई सुरू राहते ती स्थाईक औद्योगिक जीविताला अडथळा उत्पन्न करिते; कारण लढाईकरितां माणसें शांततेचे उद्योग सोडून जातात; त्यांस लढाईव्यतिरिक्त सर्व उद्योग तिरस्करणीय वाटूं लागतात; आणि लुटारूपणा करण्यांत प्रतिष्ठा वाटूं लागते; आणि वरचेवर घरांची व मालाची नासाडी होते. उदाहरणार्थ, ब्यारो सांगतो कीं, काफिरलोकांस कधीं कधीं लढाईमुळें किल्येक वर्षें शेती सोडून द्यावी लागे. प्राथमिक ग्रीक लोक जे शेतांवर हत्यारें घेऊन जात ते निरनिराळ्या टोळ्या एकमेकांवर जे हल्ले करीत त्यांनीं नाउमेद होत असलेच पाहिजेत. ह्यावरून हें स्पष्ट दिसतें कीं, जोंपावेतों लुटारूपणाची बुद्धि प्रबल असेल तोंपावेतों उच्चतर सामाजिक स्थिति उत्पन्न होण्यास ती आड येत असली पाहिजे.

रानटी जीवितास योग्य अशी जी मानसिक व शारीरिक घटना ती स्थाईक जीविताला हळूहळूच योग्य बनणार. पारध, साहसी कृत्यें, भटकणें, इत्यादि करण्यांत ज्या वासना तृप्त होतात त्या आपल्यांत देखील जर मृत झालेल्या नाहींत तर रानट्यांमध्यें त्या तिखट असल्याच पाहिजेत, व त्यामुळें त्यांस शांततेनें राहणें असह्य वाटलेंच पाहिजे; आणि ज्या फेरबदलामुळें त्यांच्या शक्तींना व मनोवृत्तींना योग्य असे उद्योग सोडावे लागणार आणि एकसारखे एकच प्रकारचे श्रम करावे लागणार तो फेरबदल त्यांस प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीत्या

तिरस्करणीयच वाटणार. असुधारलेल्या जीवितांतून सुधारलेल्या जीवितांत एकदम संक्रमण झाल्यास तें उघडच घातक होतें; ह्याचा प्रत्यय पाराग्वेमध्यें जेसुइट लोकांनीं जेव्हां तेथील लोकांस नियमित उद्योग करावयास लाविलें तेव्हां चांगला आला. तो असा कीं, त्या लोकांस पोरें होत नाहींशीं झालीं, आणि त्यांची संख्या कमी होत चालली.

रानट्यांची सुधारणा होण्यास हात राखून खर्चण्याच्या संबंधी त्यांस प्राप्त करून घ्याव्या लागतात. अत्यंत हलक्या प्रतीचे लोक खाद्य विपुल असलें म्हणजे पाहिजे तितकें खातात, आणि पुनः भूक लागून मेहनत करणें भाग पडे तोंपर्यंत स्वस्थ पडून राहतात. उच्चतर पारधीटोळ्यांमध्यें हा स्वभावविशेष जरी कमी ठळक असतो तरी शेतकीच्या जीविताला जी सारखी दूरदृष्टि ठेवणें, आणि पुढच्या फायद्याकडे लक्ष देऊन सध्यां त्रास सोसणें जरूर असतें त्याची त्यांच्यांत वाणच असते.

शिवाय, प्रारंभींच्या ज्या स्वभावनमुन्यावर रूढीचा एवढा जुलमी पगडा बसलेला असतो तो चांगलाच सुधारला गेला पाहिजे. टोळींचे प्रघात जरी क्रूरपणाचे असले तरी तरुण रानटी ते मुकाट्यानें सहन करितो, आणि हे प्रघात पवित्र असल्यामुळें सगळेच प्रघात त्यास सामान्यतः पवित्र वाटूं लागतात. सुधारलेल्या हलक्या दर्जाच्या जातींमध्यें देखील ज्या सरणी प्राचीनत्वामुळें पवित्र म्हणून वाटत असतील त्या इतर सरणी त्यांच्याहून चांगल्या असल्या तरी सोडीत नाहींत. जो सुधारणेचा विचार इंग्रजांसारख्या लोकांमध्यें इतका प्रबळ दिसतो तो प्राथ-

मिक लोकांत जागृत नसतो; आणि म्हणून सहजगत्या चांगले मार्ग कोणास सुचले तरी त्यास लोक हट्टानें विरोध करितात.

एवंच एकंदर प्रगतीप्रमाणें औद्योगिक प्रगति प्रारंभीं अनेक कारणांनीं अगदीं मंदमंद रीत्या होत असून ती जी लक्षांत येण्यासारख्या वेगानें होऊं लागलेली आहे ती दीर्घकालोनंच लागलेली आहे, आणि आलीकडेच त्याचा वेग जोराचा झालेला आहे. त्याला अनुकूल शक्ती जशा सारख्या वाढत चाललेल्या आहेत तशा अंतर्बाह्य प्रतिकूल शक्ती कमी होत चाललेल्या आहेत; आणि हल्लीं तर प्रगतीचा वेग इतका झपाट्याचा झालेला आहे कीं, गेल्या शतकांत शास्त्र व साहस ह्यांमुळें झालेली प्रगति तत्पूर्वीच्या एकंदर शतकांत झालेल्या प्रगतीहून ज्यास्त आहे.

प्रकरण दुसरें

व्यापारविशिष्टीभवन आणि श्रम-विभाग

६. हे दोन मथाळे एकाअर्थीं समानार्थक आहेत आणि एका अर्थीं नाहींत. श्रमविभाग ह्या शब्दाचा त्याच्या अत्यन्त व्यापक अर्थीं उपयोग केल्यास ज्या एकंदर—म्हणजे, सरकारी, लष्करी, धार्मिक, धंदेविषयक आणि उद्यमविषयक–क्रियांनीं समाजाचें जीवित चालू रहातें, त्यांचा त्यांत समावेश होतो. पण तो शब्द जरी व्यापारविशिष्टीभवन ह्या अर्थीं योजण्यासारखा आहे, तरी 'कांहींतरी उत्पन्न करण्यांत खर्च केलेली मेहनत' हा जो श्रम शब्दाचा सामान्य अर्थ तेणेंकरून त्याची व्याप्ति आकुंचित झालेली आहे. म्हणजे भौतिक गरजा भागविणें व मानसिक गरजांना भौतिक मदत करणें ह्यांशीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबद्ध असलेलें जें व्यापारविशिष्टीकरण त्यालाच श्रमविभाग हा शब्द लावीत असतात.

वरील लक्षणाच्या दुसऱ्या भागांत, पोषण किंवा नीचतर वासनांची तृप्ति ह्यांशीं संबंध नसलेल्या पुष्कळ सरण्या अंतर्भूत होतात. वाद्यें बनविणारा, छापखान्यांत पुस्तकाचे खिळे जुळणारा, तसबिरा काढणारा, फुलझाडें तयार करणारा, फुलें विकणारा, हे सर्व मूर्त वस्तू उत्पन्न करण्यांत किंवा लोकांत पसरण्यांत प्रत्यक्षरीत्यां गुंतलेले असतात. पण ह्या वस्तूंचा जीवितसंधारणाशीं कांहींच संबंध नाहीं. पुष्कळ जनवर्ग असे आहेत कीं, त्यांच्या श्र-

माच्या योगानें लोकांचें शिक्षण आणि सौंदर्याभिरुचि-संतर्पण हीं होत असतात; पण ज्यांच्या मानसिक श्रमांनीं शिक्षण व मनस्तोषण हीं होतात त्यांचा जरी प्रस्तुतस्थलीं विचार्य श्रमविभागांत आपण समावेश करीत नाहीं, तरी त्या शिक्षणाला व तोषणाला आवश्यक जीं साधनें तीं जे उत्पन्नकरितात त्यांचा समावेश त्यांत करितों.

आणखी एका गोष्टीचें स्पष्टीकरण एथें केलें पाहिजे. सर्व प्रकारच्या धंद्यांमध्यें मानसिक व शारीरिक श्रम यांचें मिश्रण झालेलें असतें. म्हणून धंदेवाल्यांच्या श्रमांप्रमाणें राजकीय, धार्मिक आणि शासनविषयक कामें करणारांचे श्रम मुख्यत्वेंकरून मानसिक असल्यामुळें एकीकडे टेविले तरी ज्या मानसिक श्रमांनीं जिन्नस उत्पन्न करणें व लोकांत पसरणें हीं कामें चाललेलीं असतात ते श्रम शिलक राहतातच. कारखानदार व त्यांचे वरिष्ठ दर्जाचे नोकर, व्यापारी आणि त्यांचे मुख्य कारकून, ह्यांच्या मेहनतींना जरी श्रम हें नांव बहुधा देत नाहींत, तरी त्यांचा समावेश ऐथें केला पाहिजे; कारण ज्या घटनेच्या द्वारा उत्पादन, विभजन, आणि विनिमय हीं होत असतात तिच्या व्यापारांमध्यें त्या (मेहनती) येत असतात.

७. जेव्हां जेव्हां अगदींच साधा नाहीं अशा उद्देशाच्या सिद्धीसाठीं व्यक्ती आपल्या कृती संयुक्त करितात तेव्हां तेव्हां कांहीं श्रमविभाग आपोआप उत्पन्न होतो. फराळपार्टीसारख्या तात्पुरत्या गोष्टीमध्यें देखील हें दिसून येतें. फराळ करण्याची जागा ठरविल्याबरोबर कांहींजण फराळाचे डबे सोडूं लागतात; कांहींजण बस-

ण्यासाठीं गवत पसरूं लागतात; आणि कांहींजण पानें मांडीत असतां कांहींजण झऱ्याचें पाणी आणावयास जातात. सारांश, प्रत्येकजणास असें वाटतें कीं, सगळेचजण एकच काम करावयास लागले तर गोंधळ उडेल, आणि म्हणून ते चटकन् निरनिराळीं कामें हातीं घेतात.

कोणत्याहि सगळ्या कामाचे विभाग पाडण्याची अवश्यकता एकाच माणसाच्या कृतींमध्यें देखील दिसून येते. कल्पना करा कीं एकाच कारकुनाला एकाच चोपड्याच्या अनेक प्रतींसभोंवतीं कागद गुंडाळून त्यावर पत्ता लिहिण्याच्या कामास लाविलें. आतां, रीतसर मार्ग सोडून जर तो गुंडाळावयाच्या कागदाचा एका चोपड्यास लागण्यापुरता कागद कापून घेईल, नंतर सुरी खालीं ठेवील, चोपडें उचलून घेऊन त्याच्या भोंवतीं तो कागद गुंडाळील, नंतर गोंदाची बाटली घेऊन गोंद लावील, आणि पत्यांच्या यादीकडे पाहून पेन दवतींत बुडवून पत्ता लिहील, तर हें उघडच आहे कीं हीं निरनिराळीं कामें करण्यांत व त्याला योग्य उपकरणें दर वेळेस घेण्यांत त्याचा पुष्कळ काळ व श्रम व्यर्थ खर्च होईल. तोच जर रीतसर काम करणारा असेल, तर तो प्रथम सगळीं कव्हरें कापून तयार करील, नंतर तो त्या सर्वांवर पत्ते लिहील, नंतर त्यांच्यांतील दहावीस कव्हरें त्यांच्या कडा सुट्या सुट्या रहाव्या अशा रीतीनें एकमेकांवर लावून सगळ्यांवरून एकदम डिंकाची कांडी फिरवील. नंतर तो प्रत्येक चोपडें कव्हराच्या कागदावर योग्य ठिकाणीं ठेवील, आणि कागद गुंडाळून एकदम चिकटवील. शेवटीं तो तिकिटें लावून बंडलें तयार

करील. ह्या व्यक्तिविषयक श्रमविभागाचें समाजविषयक श्रमविभागामध्यें संक्रमण कसें होतें हें स्पष्टच आहे. कारण हीं निरनिराळीं कामें एकाच माणसानें क्रमानें करण्याच्या ऐवजीं जर निरनिराळीं माणसें तीं करूं लागलीं, तर सामान्यतः ज्यास श्रमविभाग म्हणून म्हणतात तो उत्पन्न होईल.

पण एकच माणूस आपल्या कामाचे निरनिराळे भाग करूं लागला, किंवा अनेक माणसें ते निरनिराळे भाग आपल्यामध्यें वांटून घेऊं लागलीं, म्हणजे जो तात्कालिक फायदा होतो, त्याखेरीज ह्या दुसऱ्या उदाहरणांत दूरवरचा फार महत्त्वाचा असा एक फायदा होतो. एकच माणूस विशिष्ट कामाचा एकच भाग करूं लागला म्हणजे सरावानें त्यास त्या भागाच्या संबंधानें इतकें कौशल्य प्राप्त होतें कीं तो तो भाग सगळे भाग करूं लागणाऱ्या एकाच माणसापेक्षां फारच ज्यास्त जलदीनें व सफाईनें करूं लागतो.

हीं उदाहरणें ध्यानांत ठेवून आतां आपण समाजांत स्वाभाविकरीत्या श्रमविभाग कसा उत्पन्न होतो ह्याचा विचार करूं. तो उत्पन्न होण्यास जीं अनेक कारणें होत असतात त्यांचें क्रमानें निरीक्षण करूं.

८. उद्योगांची जी स्वाभाविकरीत्या निवड माणसें करितात त्यास मूल कारण व्यक्तींमध्यें कांहीं अंशीं शारीरिक आणि कांहीं अंशीं मानसिक असे जे मूलभेद आहेत ते होत. ह्या कारणास आपण संक्षेपतः शारीरिक-मानसिक कारण असें नांव देऊं या.

ह्याचें अत्यन्त परिचित व ठळक उदाहरण म्हटलें

म्हणजे स्त्रीजाति व पुरुषजाति ह्या जातिभेदामुळें उत्पन्न होणारा भेद होय. पुरुष व स्त्रिया ह्यांना अनुक्रमें योग्य असे कांहीं उद्योगविभाग अगदीं प्राचीनतम पाय-यांपासून सर्व पृथ्वीवर दिसून येतात. हे विभाग जरी सर्वत्र सम-स्वरूप दिसत.नाहींत, आणि त्यांना जरी विलक्षण अपवाद दिसून येतात, तरी त्या सर्वांचें बहुधा एक सामान्य स्वरूप असतें; तें स्वरूप कांहीं अंशीं ह्या दोन जातींचीं जीं एकमेकांच्या तुलनेनें सामर्थ्यें व असामर्थ्यें असतात त्यांवरून निश्चित झालेलें असतें, आणि रानटी समाजांत स्त्रियांवर कमींत कमी इष्ट उद्योग जबरीनें लादण्याचें जें पुरुषांमध्यें सामर्थ्य असतें त्यावरून कांहीं अंशीं निश्चित झालेलें असतें. रानटी पुरुष रानटी बायँकां-हून नीतिदृष्ट्या कमी दर्जाचे असतात असें न म्हटलें तरी (कारण वेळ आली म्हणजे बायका पुरुषाइतकाच क्रूरपणा दाखवितात), हें स्पष्टच आहे कीं जे लोक अत्यंत आ-पस्वार्थी असतात त्यांच्यामध्यें बलवान् बलहीनाला वा-ईट रीतीनें वागवावयाचेच; आणि इतर प्रकारच्या वा-ईट वागवणीखेरीज जीं जीं घाणेरडीं कामें बलहीन कर-ण्यास समर्थ असतील तीं तीं त्यांच्यावर लादावयाचेच. अत्यन्त हलक्या जातींमध्यें श्रमविभाग कसा झालेला असतो ह्याचें नमुनेदार उदाहरण फयूजियन लोकांत दिसून येतें. त्यांच्यांत पुरुष लढत, पारध करीत आणि खाण्यासाठीं जनावरें पकडीत असून बायका मुलांचें संवर्धन करणें, चुलींत जाळ करणें, टोपल्या व पाण्या-चे पोहरे, मासे पकडण्याचीं जाळीं व गळ्यांतील मांळा बनविणें; इत्यादि कामांत गुंतलेल्या असतात; त्या हाड्यांत

बसून लहान लहान मासे धरावयास जातात, शिंपांतील मासे पकडतात, होड्या नीट जपून ठेवितात, आणि कधीं कधीं आपल्या यजमानांस इकडे तिकडे वल्हवीत नेतात आण्डामान-बेटवाले,तास्मेनियन लोक, आणि आस्ट्रेलियन लोक ह्यांच्यांत असलाच श्रमविभाग दिसून येतो.

वरच्यापेक्षां उच्चतर नमुन्याच्या पारधी जातींमध्यें असलेच विभाग दिसून येतात; उदाहरणार्थ, डाकोटा, चिपिवायन, कोमांची व चिपिवा लोकांमध्यें. त्यांच्यांतील पुरुष लढणें, पारध करणें, मासे धरणें, घरें व होड्या बांधणें यासारखीं बळाचीं व चातुर्याचीं कामें करीत असून बायका त्यांच्या शक्तींतील सर्व कावाडकष्टांचीं कामें करीत असतात; आणि इरिक्वोइसलोकांप्रमाणें ज्यांच्यांत शेती थोडीशी सुरू झालेली असेल तेथें बायका शेतावरील सर्व काम करितात. पण जेथें चिनूकलोकांतल्याप्रमाणें उद्योग अशा प्रकारचे असतात कीं उदरपोषण करणें दोघांच्याहि शक्तींतील असतें तेथें स्त्रियांचा दर्जा उच्चतर असतो, व त्यांस पुरुष योग्य मान देतात.

दक्षिण अमेरिकेंतील असुधारलेल्या लोकांमध्यें सामान्यतः असल्याच प्रकारच्या गोष्टी दिसून येतात; व त्यांमध्यें जर थोडासा फरक दृष्टीस पडला तर तो त्यांच्यांत शेतीची जी जास्त प्रगति झालेली आहे तिच्यामुळें उत्पन्न झालेला आहे. ब्राझिलियन व क्यारिबियन टोळ्यांबद्दल आपण वाचितों कीं, त्यांच्यांतील पुरुष जेव्हां लढाईत किंवा जनावरें पकडण्यांत गुंतलेले नसतील तेव्हां ते शेतांतील झाडें वगैरे कापून काढण्याचें काम तेवढें आपल्या अंगावर घेतात, आणि लागवड

करण्याचें काम बायकांवर संपवितात. आफ्रिकन लोकांमध्येंहि असलाच संबंध दृष्टीस पडतो. उदाहरणार्थ, हॉटेंटाट व डमारा लोकांमधील पुरुष पारध व लढाई करण्यासेरीज गुरांची राखण करितात, पणं बाकी सर्व कामें बायकांवर टाकितात; म्हणजे, झोंपड्या बांधण्याचें काम देखील बायकांस करावें लागतें. वेचुआना व काफिर लोकांमध्यें बहुधा असेंच असतें. उत्तरेकडील नीग्रो समाजांकडे—उदाहरणार्थ, पूर्व आफ्रिकन, कांगोमधील लोक, किनाऱ्यावरील नीग्रो, आंतील नीग्रो इत्यादि लोकांकडे पाहतां, असें दिसतें कीं, ते बऱ्याच प्रमाणावर शेतकी करणारे बनलेले असून त्यांच्यांतील पुरुष एकंदर श्रमांचा निम्मेपेक्षां ज्यास्त बोजा आपल्याकडे घेतात. ते घरें बांधितात, झाडें लावितात, आणि सुतारकाम, लोहारकाम, चाम्हारकाम आणि वीणकाम इत्यादि कामें करितात. आशान्टी व डेहामी-मध्यें विशिष्ट श्रमाचीं कामें पुरुषांनीं आपल्याकडे घेतल्याचें जास्तच ठळक रीतीनें दिसून येतें. फुल्ला लोक ह्यांच्याहून उच्चतर दर्जाचे असून ते पारधीकडे फारसा वेळ देत नाहींत, आणि त्यांच्यांत स्त्रीपुरुषांमधील श्रमविभाग ज्यास्त प्रमाणानें सुधारलेल्या लोकांतल्यासारखा दिसतो. घरांतील कामांव्यतिरिक्त उदीम करणें एवढेंच काम बायकांकडे असतें, आणि पुरुष गुरें व शेती ह्यांचें काम संभाळितात. आबिसिनियन लोकांमध्यें कांहीं अंशीं असलीच स्थिति आढळते.

ह्याला कांहीं अपवाद कोठें कोठें दृष्टीस पडतात, त्याचीं उदाहरणें " गृहसंस्था " ह्या भागांत दिलेलींच

आहेत; पण ते अपवाद एकीकडे ठेवून आतां एथें आणखी एक सामान्य गोष्ट आपणास सांगणें आहे; आणि ती जरी पूर्वीच सांगितलेली असून तिजबद्दल उदाहरणेंहि दिलेलीं आहेत तरी ती विशेषतः बोधकर असल्यामुळें एथें तिचा आम्ही पुनः उल्लेख करीत आहों.

विभिन्न जातींच्या व एकमेकांपासून दूरदूरच्या प्रदेशांत राहणाऱ्या लोकांमध्यें आपणास असें दिसून येतें कीं, जेथें अपवादरूप परिस्थितीमुळें अगदीं शांति-युक्त असें जीवित उत्पन्न झालेलें आहे, आणि जेथें पुरुष लढाईंत व शिकारींत गुंतलेले दिसत नाहींसे झालेले आहेत, तेथें स्त्रीपुरुष जातींमधील श्रमविभागास माणुसकीचें स्वरूप आलेलें दृष्टीस पडतें; म्हणजे, तेथें पुरुष जड, घराबाहेरील कामें करितात. आणि बायका हलकें, घरांतील काम करितात. "गृहसंस्था" ह्या भागांत ह्या गोष्टींचीं उदाहरणें दिलेलीं आहेतच. बोडो व ढिमाल लोकांमध्यें पुरुष शेतें साफ करणें, जमीन नांगरणें, घरें बांधणें, इत्यादि कामें करीत असून बायका व मुली घरांतील माणसांसाठीं सूत काढून कपडे विणणें व रंगवणें, दारू काढणें, स्वैंपाक करणें इत्यादि घरगुती कामांत पूर्णपणें गुंतलेल्या असतात.

तद्वतच सांताळ नांवाच्या दुसऱ्या एका शांतिशील टोळीच्या संबंधानें आपण असें वाचितों कीं, त्यांच्यांतील मुलगे जमीन नांगरतात, गुरें राखतात, पीक काढितात, घरें बांधितात व दुरुस्त करितात, आणि गाडया व नांगर बनवून तांदूळांपासून एकप्रकारची दारू काढितात, सारांश सर्व प्रकारचें

काम ते करितात; इकडे मुली भाताचे तांदूळ करितात, बियांचें तेल काढितात, स्वयंपाक करितात, जवळच बाजार असला तर जिन्नस आणितात; कोंबडीं, बदकें, डुकरें, कबूतरें, शेळ्या यांची राखण करितात; आणि आईबापें वृद्ध व अशक्त झालीं म्हणजे मुलें त्यांस पोशितात. टोडा लोक असेच शांतिशील असून त्यांच्याबद्दल शार्ट असेंच सांगतो. तो म्हणतो कीं, त्यांच्या बायका यूरोपियन मडमा जें आपलें योग्य काम म्हणून समजतात तेवढेंच करितात, आणि पाणी किंवा लांकूडफांटें आणण्यासाठीं देखील घराच्या दरवाजाबाहेर पडत नाहींत. त्यांच्यापासून अगदीं दूरवर राहणारे, म्हणजे उत्तर अमेरिकेंतील प्यूब्लो लोक ह्यांचें असेंच आहे. ते आपलीं गांवढ्यांतील घरें सभोंवतीं भिंती घालून अशीं सुरक्षित करितात कीं, रानटी लोकांस आंत येतां येऊं नये; आणि ते शुद्ध शेती करून राहतात.

असुधारलेल्या लोकांप्रमाणें सुधारलेल्या लोकांमध्येंहि असलेच भेद दृष्टीस पडतात. फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांमध्यें जेथें लष्करी घटना फार पक्कदशेस आलेली आहे तेथें बायकांना घराबाहेरचे कष्ट फार व सारखे करावे लागतात, आणि इंग्लंड व अमेरिका हे देश घटनेनें कमी लष्करी असून तेथें बायकांस बाहेरचें काम थोडें व हलकें पडतें.

आतां उघडच हे फरक अनिवार्यपणेंच उत्पन्न होतात. जोंपावेतों शत्रु व पारध हीं मारण्यांत पुरुषांना आपलें सामर्थ्य खर्च करावें लागत आहे तोंपावेतों इतर प्रकारचीं कामें स्त्रियांकडे आलींच पाहिजेत; आणि, उलट,

जेथें पुरुष लढाई व शिकार यांत गुंतलेले नसतील तेथें लोकसंख्या वाढत जाईल त्याप्रमाणें त्यांस जिन्नस उत्पन्न करण्याचीं वगैरे कष्टाचीं कामें अंगावर घेणें भागच पडतें.

९. ह्या लिंगभेदाव्यतिरिक्त इतर शारीरिक-मानसिक भेदहि माणसांच्या व्यापारांचा विभागकरण्यांत प्रारंभींच्या व अलीकडील काळीं बरेच कारणीभूत झालेले आहेत.

फ्यूजियन लोक जरी इतके हलके आहेत तरी त्यांच्या संबंधानें देखील फिट्झ्राय असें म्हणतो कीं, त्यांच्या-पैकीं प्रत्येकजणास विशिष्ट धंद्याचें शिक्षण दिलेलें असतें हें पाहून चमत्कार वाटतो. उदाहरणार्थ, एकजण भाला मारण्यास शिकतो; दुसरा गोफिणीचा उपयोग करण्यास शिकतो; तिसरा धनुष्यानें बाण मारण्यास शिकतो; पण अशा रीतीनें एका गोष्टींत ते अत्यन्त प्रवीण झाले म्हणून बाकीच्या गोष्टींत बरेंच प्राविण्य संपादण्यास चुकतनाहींत. तद्वतच हडसनच्या उपसागरावरील इंदियन लोकांविषयीं आपण असें वाचितों कीं, त्यांच्यांतील पुष्कळ लोकांस होडी बांधण्याचें कौशल्य नसतें, म्हणून ज्यांना तें कौशल्य व अनुभव असेल त्यांना त्या कामीं ते लावितात. तद्वतच जवळच्या एस्कीमो लोकांबद्दल तोच लेखक म्हणतो कीं, त्यांच्यातील कांहीं बायका बूट बांधण्यांत कुशल असून कांहीं ऋतूंत त्या बूट बांधण्याव्यतिरिक्त कांहीं उद्योग करीत नाहींत; त्या वेळीं इतर बायका वस्त्रें विणितात. मालागासी लोकांबद्दल एलिस म्हणतो कीं, ते सर्व जरी कांहीं अंशीं शेत्ये व मेंढपाळ असत तरी बरेच जण एकाद्या धंद्यांत उत्तम असून तोच करीत.

आतां पूर्ण सुधारलेल्या लोकांत स्वभाविक योग्यतां-

नुरूप व्यापारविशिष्टीकरणें दृष्टीस पडतात हें प्रसिद्धच आहे; कारण कोणीं कोणता धंदा किंवा उद्योग करावयाचा हें बहुधा यावरूनच ठरत असतें. ह्या दोहोंच्या मधील पायऱ्यांवर माणसांचे धंदे, जाती व जमाती त्यांच्यावरून ठरत असल्यामुळें व्यक्तींस आपल्या नैसर्गिक कलांप्रमाणें ह्या बाबतींत वागतां येत नाहीं. तरी प्रारंभीं हे जाति व धंदेविभाग माणसांच्या स्वाभाविक योग्यतांनुरूपच झाले असले पाहिजेत; आणि पुढें कांहीं अंशीं वंशपरंपरेनें पण बऱ्याच अंशीं शिक्षणानें त्यांच्यामध्यें कांहीं मानसिक-शारीरिक योग्यता स्थापन झाली. आपल्याला ही गोष्ट चांगली परिचित आहेच.

ज्या व्यक्तींना ज्या उद्योगाबद्दल स्वाभाविक योग्यता असेल त्यांनीं ते धंदे स्वीकारण्याखेरीज कधीं कधीं समाजाचे कांहीं सगळे भागच कांहीं विशिष्ट उद्योग उचलीत असतात. पेरूदेशाबद्दल लिहितांना गार्सिलासो म्हणतो कीं, बारीक कापड ज्या प्रांतांतून करीत असत, तेथील लोक तें बनविण्यांत फार हुशार असत, आणि ज्या प्रांतांत लोक कमी हुशार असत तेथें जाडेंभरडें कापड विणीत. आणि कांची नांवाच्या तेथीलच दुसऱ्या एका जातीबद्दल सिएझा आपणास असें सांगतो कीं, ते लोक सोन्यारूप्याचें काम करण्यांत फार कुशल आहेत. फीजी बेटांत असल्याच कारणांनीं उत्पन्न झालेलीं उद्यमविशिष्टीकरणें आढळून येतात. त्यांजपैकीं कांहीं जण लांकडी पडगे, होड्या, वल्हीं वगैरे करण्यांत हुशार असतात, कांहींजण चटया, टोपल्या, वगैरे करण्यांत कुशल असतात, आणि दुसरे कांहीं भांडीं,

जाळीं, हळद, काजळ, इत्यादि करण्यांत हुशार असतात.

राष्ट्राराष्ट्रांमध्यें जीं उद्यमविशिष्टीकरणें होतात तीं असल्याच स्वरूपाचीं असल्यामुळें त्यांचाहि उल्लेख केला पाहिजे. उदाहरणार्थ, इंग्रजलोकांचे अंगीं समुद्रावर काम करण्याची विशेष योग्यता दिसते.

मानसिक-शारीरिक विशेषांवरून दुसरा एक श्रमविभाग उत्पन्न होतो. तो हा कीं दासवर्गांकडे हलके उद्योग लावून देणें. ह्याला कधीं कधीं जबरीशिवाय सुरवात होते. कांहीं जपानी लोक घोडे मारून सोलीत असतात, त्यांच्या संबंधानें आडाम्स म्हणतो कीं, ते लोक जातिबाह्य असून इतर लोकांपासून पृथक् रहात असत, व त्यांच्याशीं त्यांचीं लग्नें होत नसत. कातडें कमावून त्याचें चामडें बनवावें हा त्यांचा धंदा असे. इतर जातींनीं कमावलेल्या चामड्याचे जोडे वगैरे बनविणें ह्यांत कांहीं हलकेपणा नसे, पण कच्चें चामडें कमावणें हें मात्र हलकें काम समजत.

हें विशिष्टीकरण उच्चतर काम करण्याच्या असामर्थ्यामुळें उत्पन्न झालें असलें पाहिजे. ही गोष्ट ह्यावरून खरी दिसते कीं, इंग्लंदामध्येंहि भंगी म्हणून एक वर्ग आहे, व त्याची उत्पत्ति अशाच रीतीनें झाली असली पाहिजे; कारण ज्यास उदरनिर्वाह इतर रीतींनीं करतां येत नसेल तेच असला हा घाणेरडा धंदा पत्करीत असले पाहिजेत. आतां हें उघडच आहे कीं दासवर्ग मुख्यत्वेंकरून लढाईंत केलेले कैदी आणि त्यांचे वंशज ह्यांचे बनलेले आहेत; आणि ज्याअर्थीं सामान्यतः

जितलोक कोणत्या तरी तऱ्हेनें जेत्यांहून कनिष्ट असतात, त्याअर्थीं गुलामवर्ग आणि शास्ता वर्ग ह्यांच्यामधील श्रमविभाग मानसिक–शारीरिक कारणांनेंच उत्पन्न होतो असें मानण्यास हरकत नाहीं. स्पार्टामधील हेलट नामक दासवर्गाची उत्पत्ति बहुधा अशाच रीतीनें झालेली असावी; आणि ज्या अख्रिस्ती नीग्रो लोकांना आज इतकीं शतकें त्यांच्या ख्रिस्ती मालकांनीं फूस-लावून नेलेलें आहे त्यांची स्थिति निःसंशय अशीच आहे. पण हा संबंध सर्वत्रच दृष्टीस पडतो असें नाहीं; कारण कधीं कंधीं श्रेष्ठ लोकांना संख्येनें जास्त किंवा रानटीपणांत जास्त असे कनिष्ट लोक जिंकीत असतात. अशा प्रकारची कांहीं गोष्ट मेक्सिकोमध्यें बनून आली; तेथें सुधारलेले टोलटेक लोक रानटी चेचेमेक व आझटेक ह्या लोकांकडून जिंकले गेले; व हे जेते कनिष्ट लोक शास्ते बनल्यामुळें ते जित श्रेष्ठ लोकांकडून कनिष्ट कामें जबरीनें करून घेऊं लागले. पण ह्यांचीं सर्वांत स्पष्ट उदाहरणें ग्रीस व रोम एथें दृष्टीस पडतात. त्यांना त्यांच्या लढायांतून जे जय मिळत असत ते त्यांचें मानसिक किंवा शारीरिक श्रेष्ठत्व ह्याच्यावर अवलंबून नसत. उदाहरणार्थ, ग्रीक लोकांच्या संबंधानें ग्रोट म्हणतो कीं, त्या असुरक्षिततेच्या काळीं गुलामागिरी हें अरिष्ट पाहिजे त्याच्यावर येऊं शके. रोमनलोकांमध्यें गुलामागिरी स्वभावघटनेच्या हलकेपणावर किती अल्प अवलंबून असे हें मागील भागांत सांगितलेल्या कित्येक उदाहरणांवरून व्यक्त झालेलेंच आहे. आणि तें मामसेनच्या ग्रंथांतील पुढील उताऱ्यावरून आणखी व्यक्त

होतें. "सर्व काम गुलमांकडून करवीत असत. सावकार व पेढीवाले आपल्या पेढ्यांच्या व दुकानांच्या शाखांवरून गुलामांच्या नेमणुका करीत. जकात वसूल करण्याचा मक्ता ज्या कंपनीनें घेतला असेल ती कंपनी निरनिराळ्या जकातनाक्यांवर गुलाम व मुक्त-गुलाम यांना नेमी. इमारती बांधण्याचीं कंत्राटें ज्यांनीं घेतलीं असतील ते गुलाम शिल्पी विकत घेत. व्यापारी ज्या गलबतांतून व्यापाराचा माल आणीत त्यांजवर ह्या लोकांनाच कप्तान व नाखवे नेमीत, व माल आणिला म्हणजे त्यांच्याकडूनच विकीत. खाणी व कारखाने एकंदर गुलामच चालवीत हें सांगावयास नको".

म्हणून श्रमविभागाच्या उत्पत्तीचें मानसिक-शारीरिक जें कारण आहे त्याच्या संबंधानें आपण असें म्हटलें पाहिजे कीं, त्यास स्वतंत्र क्षेत्र सांपडलें म्हणजे त्याच्या-पासून फायदेशीर विशिष्टीकरणें उत्पन्न होतात, पण ह्या कारणाच्या परिणामांत इतर कारणांच्या परिणामांची इतकी मेसळ झालेली आहे कीं, उद्योगधंद्यांच्या घटनेंत त्याचें अंग किती आहे हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं.

१०. उद्योगधंद्यावर परिस्थितिविशेषाचे परिणाम ज्यास्त स्पष्ट होतात असें म्हणणें यथार्थ दिसतें. त्यांचा विचार आपण 'प्रांतिक श्रमविभाग' ह्या सदराखालीं करूं.

सभोंवतालच्या परिस्थितीवरून उत्पन्न होणारीं विशिष्टीकरणें अगदीं रानटी समाजांतून दिसूं लागतात. ओस्टियाक लोकांचे शिकारी व मच्छीमार असे दोन विभाग आहेत; त्यांपैकीं मच्छीमार किंवा कोळी ओबी-नदीच्या कांठावर रहात, आणि शिकारी इतरत्र रहात.

यावरून मासे पकडण्याचा धंदा कोवळ्या समाजांतून देखील पाणीकांठ नजीक असेल तेथेंच उत्पन्न होतो, व अशा रीतीनें स्थाईक उद्योगांना प्रारंभ होतो हें उघड दिसतें. उदाहरणार्थ, सोसैटी बेटांतीलं पुष्कळ रहिवाशी मच्छीमारांचाच धंदा करितात. सुधारलेल्यांप्रमाणें अल्प सुधारलेल्यांवरहि असल्या अन्य स्वाभाविक गरजांचा परिणाम होतो. चिबचा लोकांमध्यें पोयरा लोक मोठे खाणीवाले असत, कारण त्यांच्या देशांत सोन्याच्या खाणी पुष्कळ असत. मेक्सिकोमध्यें जेथें मिठाच्या खाणी आहेत तेथें लोक तोच धंदा करितात. तद्वतच पेरूमध्यें जेथें जोडे करण्याचें सामान विपुल होतं तेथं जोडे करीत, आणि जेथें हत्यारें करण्याची सामग्री सर्वांत विपुल असे तेथें हत्यारें करीत. प्राचीन लोकांपैकीं फिनीश्यनलोकांमध्यें हीच स्थिति असे. उत्तर-फिनीशियामध्यें जहाजें बांधण्याचे कारखाने एकत्र झालेले होते; कारण तो प्रदेश डोंगराळ असल्यामुळें फारसा सुपीक नव्हता, आणि लेबेनानचीं रानें त्यांच्या प्रांतांत होतीं. व्हेनिसमध्येंहि असल्याच कारणामुळें असेंच झालें होतें. तेथें जलमार्ग चांगला असून गैरमाहीत शत्रूस तो अप्राप्य असे. त्यामुळें तेथें व्यापाराची भरभराट होण्यास तें फायदेशीर कारण झालें.

ह्या शास्त्राच्या दुसऱ्या भागांत इंग्लंदच्या इतिहासांत सांपडणारीं असलींच उदाहरणें दिलेलीं आहेत: त्यांच्या जोडीस त्यांस देण्यासाठीं आणखी कांहीं तसलींच उदाहरणें एथें देऊं. "डूम्स डेबुक" ह्या जमिनीच्या नोंदणी ग्रंथावरून असें दिसून येतें कीं, किनाऱ्यावरील कौंटींमध्यें

मिठागर फार असत; उदाहरणार्थ, नार्मनविजयाच्या वेळीं एकट्या ससेक्स प्रांतांत २८५ मिठागर होते. त्याच-प्रमाणें ज्या जिल्ह्यांतून लोंकर पुष्कळ उत्पन्न होत असे तेथें लोंकरीचे कपडे करण्याचे कारखाने निघाले; कारण त्या वेळीं दळणवळणाचीं साधनें अल्प असत. पण पुढें जेव्हां रस्त्यांत सुधारणा झाली तेव्हां यार्कप्रांतांत कापड विणणें जास्त सोईवार असल्यामुळें तो धंदा तेथें निघून गेला. रेशमी कापड विणण्याचा धंदा लंडनाच्या एका भागांत उत्पन्न झाला; कारण तें महाग कापड घेणारें गिऱ्हाईक तेथील दरबारी लोकांमध्येंच सांपडत असे; तेथें तो धंदा एक शतकपर्यंत राहिला; पुढें जेव्हां विण-ण्याचीं यंत्रें निघालीं तेव्हां तो धंदा तेथून निघून काप-साच्या कारखान्यांच्या प्रांतांत गेला. कोळशाच्या खाणींचें किंवा जलशक्तीचें सान्निध्य हें ह्या श्रमविभागाला स्थानवै-शिष्ट्य येण्याचें प्रबल कारण झालेलें आहे, आणि त्यामुळें अशा ठिकाणीं दुरून मजूर नेण्याचें देखील कारखानदारां-नीं पत्करिलेलें आहे. उदाहरणार्थ, कापसाच्या गिरण्यांची स्थापना विशिष्ट ठिकाणीं याच तत्त्वावर झालेली आहे.

समाजशरीराच्या निरनिराळ्या भागांमध्यें पारिस्थि-तिविषयक कारणांवरून जीं विभिन्नीकरणें उत्पन्न होतात तीं पुष्कळ वेळां अनिवार्य ठरतात. उदाहरणार्थ. ज्या डोंगराळ प्रदेशांत मेंढ्याच चरूं शकतात अशा ठिकाणीं गहूं उत्पन्न करण्याची खटपट केली, किंवा जेथें कथील उत्पन्न होतें तेथून तो धंदा काढून दुसरीकडे नेला, तर काय होईल ह्याचा विचार करावा, म्हणजे ही गोष्ट स्पष्ट-पणें ध्यानांत येईल.

११. ह्या कलमांत प्रस्तुत विषयांच्या ज्या भागाचा आम्ही विचार करणार आहों त्यास 'स्थानिक श्रमविभाग' असें नांव देऊं. 'स्थानिक' शब्दाचा अर्थ विशिष्ट प्रांतांतील निरनिराळीं ठिकाणें असा समजावयाचा.

निरनिराळ्या ठिकाणीं स्त्रीपुरुष निरनिराळीं कामें कोणतीं करूं लागतात हे सांगतांना, स्थानिक श्रमविभाग प्रत्येक कुटुंबांतच उत्पन्न होतो ह्या सत्याचें दिग्दर्शन केलेंच आहे. उदाहरणार्थ, बोगल म्हणतो कीं, भूतानमधील लोकांमध्यें प्रत्येक कुटुंबांतील माणसांना अत्यन्त उपयुक्त कलांपैकीं बहुतेकांची माहिती असते, आणि त्यामुळें तीं जरूरीच्या बहुतेक वस्तू उत्पन्न करितात. आणि ही स्थिति प्रारंभींच्या पायऱ्यांवर सामान्यतः सर्वत्र दृष्टीस पडते.

ह्याच्याहून ज्यास्त विभिन्नीकरणाची स्थिति जी दृष्टीस पडते ती ह्या किंवा त्या कुलेंत कांहीं माणसें विशेष कौशल्य दाखवूं लागतात तेव्हां होय. उदाहरणार्थ, नीग्रो लोकांविषयीं लिहितांना डफ म्याकडोनाल्ड म्हणतो कीं, ब्लान्टायरच्या नजीक लांकडी कामाचा स्वतंत्र धंदा म्हणून बहुतेकांस दिसतच नाहीं; कारण बहुतेक माणूस आपापलें लांकडीं काम करितो. पण ह्या लोकांमध्यें श्रमविभाग अन्यरीतीनें उत्पन्न झालेला अन्य मार्गांनीं दिसून येतो; कारण वरील्च्चा लेखक आपणास असें सांगतो कीं, त्यांच्यांत निर्वाहाचें मुख्य साधन जमिनीची लागवड करणें हें आहे; पण जेथें मासे विपुल असलेला तलाव नजीक असेल, तेथें लोक वडीस लागलेंच दुय्यम स्थान प्राप्त होतें: तो आणखी असेंहि सांगतो कीं लोहाराचे धंदेवाले शेतकऱ्यांची हत्यारें करण्यांत

चालेल इतका लोहारीवर पैसा मिळत नाहीं. ताहिती लोकांमध्यें उद्यमविशिष्टीकरण कांहीं अंशीं ह्यापुढें गेलेलें आढळून येतें. लांकूड पोंखरून तेथें बहुतेक लोक लहानशी होडी तयार करूं शकतात; पण मोठा मचवा बांधण्याचें काम जे मुद्दाम शिकलेले असतील तेच करूं शकतात; आणि ह्या बाबतींत बराच श्रमविभाग त्यांच्यांत दिसून येतो.

असल्या पहिल्या पायऱ्या उघडपणें अनिवार्यच आहेत. विशेष कलांमध्यें ज्यांची विशेष बुद्धि चालते असे कांहींजण नेहमीं असावयाचेच. नेहमीं असें घडणारच कीं अशा कलांच्या व्यासंगपाासून नेहभींचा उद्योग केल्याविना उदरनिर्वाह होईल इतका पैसा प्रारंभीं मिळूं नये; आणि असेंहि नेहमीं घडणारच कीं वस्ती ज्या मानानें वाढत ज़ाईल, आणि त्यांच्यावरच्या मागण्या वाढत जातील, त्या मानानें त्याच कलांकडे सर्व लक्ष देणें त्यांस शक्य व फायदेशीरहि होऊं लागावें.

इतर गोष्टी समान असतां, विशिष्ट ठिकाणीं श्रमविभाग किती प्रमाणावर व्हावयाचा हें त्या ठिकाणचे लोक इतर ठिकाणांपासून किती प्रमाणावर अलिप्त आहेत ह्याच्यावर अवलंबून असतें; हा अलिप्तपणा कधीं दूरपणावरून उत्पन्न झालेला असतो; कधीं वांकडेपणावरून उत्पन्न झालेला असतो, आणि ह्या दोन्ही कारणांवरून उत्पन्न झालेला असतो. उत्पन्नविषयक स्वातंत्र्य कसें असतें हें वारा ते पंधरा शतकांत यूरोपांतील मठरूपी संस्थांमध्यें चांगलें दिसून येत असे. उदाहरणार्थ, डॉ० जेसॉप म्हणतो कीं, "मठांतून खाण्याचे, पिण्याचे

व लेण्याचे सर्व पदार्थ मठवाले तेथेंच तयार करीत असत. धान्य त्यांच्याच ज़मिनींत उत्पन्न होई. तें आपल्या घिरट्यांतून ते दळीत; ते आपलीं वस्त्रें आपल्याच मेंढ्यांच्या पाठीवरील लोंकरीचींच विणीत; त्यांचे स्वतःचेच शिंपी, चाम्हार, सुतार व लोहार असत; ते मधमाशांचीं पोळीं स्वतःच राखीत; ते स्वताच्याच बागांतून भाज्या व फुलें उत्पन्न करीत; त्यांना मासे खारे करून ठेवण्याचेंहि चांगलें माहीत असे; व ते स्वताच्या द्राक्षवल्लींच्या बागा लावून स्वताच द्राक्षासव काढीत".

जे प्रांत व गांव लष्करी जमीनदारीचे असत तेथेंहि हें उद्यमस्वातंत्र्य दिसून येई. फ्रान्सांत नवव्या शतकाच्या शेवटीं ही पद्धति जन्मास येऊं लागल्यामुळें व प्रत्येक जमीनदाराच्या जामिनी पृथक झाल्यामुळें, निरनिराळ्या ठिकाणीं उत्पन्न झालेल्या चिजा सर्वत्र पसरण्याचें कमी झालें. प्रत्येक माणूस आपल्या स्वतासाठीं आपण स्वतः किंवा आपल्या नोकरांकरवीं वस्त्रें व हत्यारें तयार करूं लागला. आणि लष्करी जमीनदारीच्या पहिल्या अमदानींत ११९० सालापर्यंत प्रत्येक इस्टेटीवर अत्यन्त भिन्नभिन्न धंदे लोक एकसमयावच्छेदें करीत असत; एकच माणूस मांसविक्या, रोटीवाला, धनगर, वणकर, वगैरे असे. मध्ययुगांत किल्ल्यांतून जरूरीच्या बहुतेक सर्व चिजा करीत असत, व विशेषतः वस्त्रें करीत असत तीं अत्यन्त उच्च दर्जाच्या देखील स्त्रिया सूत काढून व विणून तयार करीत. त्या वेळीं सर्वत्र वांकडीं असल्यामुळें प्रत्येक समूहाला आपल्यावरच सर्व चिजांकरितां अवलंबून रहाण जरूर असे. परकी

राष्ट्रांवर कोणत्याहि जिनसासाठीं अवलंबून राहणें सुरक्षित नाहीं, प्रत्येक जिन्नस आपल्याच देशांत उत्पन्न केलां पाहिजे, व त्यासाठीं परकी जिनसांवर कर बसविले पाहिजेत, हा जो अनिर्बंध-व्यापाराविरुद्ध कोटिक्रम लढविला जात असतो, तो त्या वेळीं प्रत्येक प्रांताच्या संबंधानें लढवीत असत; म्हणजे, प्रत्येक प्रांताला सर्व जिन्नस उत्पन्न करणें जरूर वाटे.

इतर प्रकारचे स्थानिक समूह असेच कमजास्त प्रमाणानें एकमेकांपासून पृथक् असल्यामुळें तेथेंहि अशीच गोष्ट दृष्टीस पडे. उदाहरणार्थ, बाराव्या शतकाविषयीं बोलतांना प्रो॰ कनिंघाम म्हणतो कीं, त्या वेळीं गांवढ्यांतून हल्लींपेक्षां कळाकुसरीचे धंदे करणाऱ्यांचें प्रमाण ज्यास्त असे. प्रत्येक कुटुंबांत, निदान प्रत्येक लहान कुटुंबसमूहांत वस्त्रें व घरांतील इतर उपयुक्त जिन्नस तयार करणारीं माणसें असत, त्यामुळें हल्लीं गांवढ्यांतून शेतीखेरीज जसा दुसरा धंदा दिसत नाहीं, तशी तेव्हां स्थिति नसे. त्या वेळीं शहरेंहि हल्लीं इतकीं गांवढ्यांवर अवलंबून नसत. उदाहरणार्थ, वरील साहेब म्हणतो कीं, शहरांतील लोकांनीं त्या वेळीं गांवढ्यांतील उद्योग हल्लींच्या इतके सोडून दिलेले नव्हते. शहर व खेडें यांच्यांतील विभिन्नीकरण तेव्हां पुरें झालेलें नव्हतें; कदाचित् त्यास प्रारंभहि झाला नव्हता. वास्तविकपणें त्या वेळीं शहरें म्हणजे मोठालीं खेडींच असत. म्हणून प्रत्येक खेड्यांतल्या खेड्यांत व शहरांतल्या शहरांत हल्लींपेक्षां ज्यास्त विभिन्नीकरण असे, कारण तीं एकमेकांवर अवलंबून रहावीं इतकें विभिन्नीकरण त्या दोहोंमध्यें झालेलें नव्हतें.

विशिष्ट ठिकाणीं श्रमविभाग किती व्हावयाचा हें तेथील वस्तीच्या आकारावर अवलंबून असतें. उदाहरणार्थ, एकाद्या खेड्यांत वीसच माणसें असल्यास तेथें तीस धंदे असूं शकणार नाहींत. शिवाय, तेथील लोकसंख्या इतकी असली पाहिजे कीं, प्रत्येक धंदेवाल्यास अंगीं कौशल्य येईल, व कौशल्य येण्यास लागणारीं हत्यारें विकत घेतां येतील इतका उद्योग मिळाला पाहिजे; आणि तिसरी गोष्ट ही कीं, त्याचा उदरनिर्वाह होईल इतकें काम त्यास मिळालें पाहिजे; आणि त्याच्या अभावामुळेंच लहान लहान खेड्यांतून पुष्कळ उद्योग चालत नाहींत. एवंच जेथें वस्ती लहान असेल तेथें श्रमविभाग अल्प होण्यास, आणि ती वाढत जाईल तसा तो मोठा होत जाण्यास तीन प्रकारचीं कारणें आहेत. समाजोत्क्रमणाच्या सर्व पायऱ्यांवर हें सत्य उदाहृत झालेलें दृष्टीस पडतें. लहान टोळ्यांतील धंद्यांच्या मानानें आफ्रिकेंतील नीग्रोसमाजांतून धंदे पुष्कळ असतात; आणि अशा प्रकारचें उद्यमवैविध्य फीजियन लोक, सॅण्डविच बेटवाले, ताहितियन, टाँगन आणि सामोअन लोक ह्यांच्यामध्यें दृष्टीस पडतें. ह्याचा पुरावा प्राचीन समाजांतून विपुल सांपडतो. नाईल नदीच्या कांठचा मुलूख सुपीक असल्यामुळें तेथें वस्ती फार असे, व धंदेहि पुष्कळ असत. उदाहरणार्थ, त्यांच्या लेखांवरून पुढील धंदे तेथें होतेसें दिसतें;—मासेविक्या, पीक काढणारा, रोटीवाला, मध व तेल काढणारा, दूधविक्या, पोळी करणारा, पाणिवाला, कापडवाला, लोंकरीचे कपडे करणारा, दोरखंडें वळणारा, तागाचें कापड करणारा, रंगाचीं वस्त्रें बनवि-

णारा, कपडे धुणारा, झगे विकणारा, सत्रंज्या बनविणारा, चटया बनविणारा, चाम्हार, खाणींत काम करणारा, तांबट, तांब्यावर नकशींचें काम करणारा, लोहार, तरवारी बनविणारा, सोनार, हस्तिदंती काम करणारा, कुंभार, दगड बनविणारा, दगडी काम करणारा, खाणींतून दगड काढणारा, चित्रलिपि कोरणारा, खोदीव काम करणारा, शिल्पी, गंवडी, जहाजें बांधणारा, भिंतीवर चित्रें काढणारा, शेगड्या करणारा, होडीवाला, सुकाण्या, वीणा वाजविणारा, पिपेरी वाजविणारा, नाचणारा, कुरती करणारा, वैद्य, न्हावी, सुगंधी, प्रेतें सुकविणारा व थडगीं बांधणारा, इत्यादि.

ग्रीसमध्यें असेंच झालें; आणि त्यामुळें लहान व मोठ्या ठिकाणीं निरनिराळ्या प्रमाणावर श्रमविभाग कसा झाला त्या गोष्टीस झिनोफनेंनें उल्लेख केलेला आहे. तो म्हणतो:—"लहान शहरांत एकच माणूस पलंग, दरवाजा, नांगर व मेज करितो; आणि पुष्कळ वेळां तोच माणूस घरेंहि बांधितो; आणि एवढे धंदे करून उदरनिर्वाह झाला तर तेवढ्यांत तो संतोष मानितो. आतां एकच माणूस पुष्कळ कामें करावयास लागला तर तीं सर्वच त्याच्या हातून चांगलीं होणार नाहींत हें उघडच आहे. पण शहरांतून एकच प्रकारची वस्तू पुष्कळांना पाहिजे असल्यामुळें तेथें एकच प्रकारचा उद्योग केल्यानें माणसाचा उदरनिर्वाह होऊं शकतो; कधीं कधीं तर एकच माणूस एका उद्योगाचा एकच भाग करितो; उदाहरणार्थ, एकजण पुरुषांचे जोडे शिवतो, व दुसरा बायकांचे शिवतो. कधीं कधीं एकाद्याचा

जोड्यांना नुसते टांके घालून उदरनिर्वाह होतो, दुसऱ्याचा जोड्यांचीं चामडीं कापूनच निर्वाह होतो. कोणाचा वरचींच चामडीं कापून, आणि कोणाचा केवळ तुकडे जोडूनच निर्वाह होतो. आतां जो अगदीं लहान काम करीत असेल त्यानें तें उत्तमप्रकारें केलेंच पाहिजे."

प्रारंभींच्या व मागूनच्या उद्यमविषयक व्यवस्थांमध्यें रोम शहरींहि असाच फरक दिसून येतो. उदाहरणार्थ, मॉमसेन म्हणतोः—"न्यूमा राजाच्या वेळीं कारागिरांच्या आठ जाती होत्या. त्या ह्या होतः पिपेरी वाजविणारे, सोनार, तांबट, सुतार, धोबी, रंगारी, कुंभार आणि चाम्हार." पण ह्यांच्या नंतरच्या काळीं आठांच्या ऐवजीं साठ धंदे सांगितलेले आढळतात, व त्यांतले बहुतेक ग्रीकलोकच करीत असत. आतां फ्रान्साकडे पाहतां अकराव्या-बाराव्या शतकांत तेथें ७६ धंदे असून सोळाव्या शतकांत १७० झाले होते.

स्थानिक श्रमविभाग प्रांतिक श्रमविभागाच्या अंगभूत असतो. एकाद्या ठिकाणीं एकादा उद्योग करण्यास अनुकूल स्थिति असल्यास त्या धंद्यांत पडलेल्या लोकांच्या गरजा भागविणारे इतर धंदेवाले तेथें असावे लागतात. उदाहरणार्थ, एके ठिकाणीं चाकू होत असले, दुसरे ठिकाणीं कापसाचें कापड निघत असलें, आणि तिसरे ठिकाणीं लोंकरींचें निघत असलें, तर त्या त्या धंद्यांत गुंतलेल्या लोकांच्या गरजा भागविण्यास योग्य ते जिन्नस उत्पन्न करणारे लोक तेथें तेथें असावे लागतात.

आणि ह्या ठिकाणीं समाजशास्त्राविषयक श्रमविभाग आणि इंद्रियविज्ञानविषयक श्रमविभाग ह्यांमधील एक

बोधप्रद साम्य ध्यानांत आणण्यासारखें आहे. ह्या दोहों-मधील अनेक साम्यें ह्या शास्त्राच्या दुसऱ्या भागांत दाखविलींच आहेत, आणि ह्या ठिकाणीं आणखी एक दाखवूं. कारण सामाजिकदेहाप्रमाणें व्यक्तिदेहामध्येंहि कोणत्याहि इंद्रियास आपल्या विशिष्ट व्यापारामध्येंच गुंतलेलें राहतां येण्यास त्यामध्यें पोषक, शोधक, आणि उत्तेजक साधनसरण्या भरून गेलेल्या असल्या पाहिजेत. विशिष्ट व्यापार करणारें इंद्रिय एकादा स्नायू असो, किंवा ज्ञानतंतुजाल असो; तें फुप्फुसरूपी असो किंवा आंतड्यांच्या रूपाचें असो; तें यकृत असो, मूत्रपिंड असो, किंवा 'पांक्रियास' नामक इंद्रिय असो; त्यामध्यें मोठ्या रक्तवाहिन्या, लहान रक्तवाहिन्या, सूक्ष्मतम रक्तवाहिन्या, अशुद्ध रक्तवाहिन्या, रस ओढून घेणारीं इंद्रियें, ज्ञानतंतुजालाचा झुपका, आणि त्या इंद्रियाचे घटक जागच्या जागीं ठेवणारें संयोजक मांसाचें जाळें, इतकीं सर्वत्र पसरलेलीं असतातच. ज्ञानतंतूच्या पिशव्या किंवा पित्ताच्या पिशव्या किंवा मूत्रपिंडांच्या पिशव्या ह्यांस प्रांतिक (शरीराचा एक भाग) श्रमविभागापैकीं आपापले कामाचे वांटे योग्य रीतीनें करतां येण्यास त्यांच्यामध्यें पोषक इंद्रियांचीं जाळीं, ज्या द्रव्यावर काम करावयाचें त्याचा पुरवठा करणारीं इंद्रियजालें, त्यांनीं उत्पन्न केलेलें द्रव्य वाहून नेणारीं साधनें, आणि त्यांस उत्तेजन देणारीं इंद्रियें, त्यांच्यांत सर्वत्र पसरलेलीं पाहिजेत.

१२. एथवर आपण प्रांतिक व स्थानिक श्रमविभागाचा विचार केला. आतां प्रत्येक उत्पादक किंवा संविभाजक संस्थेमध्यें जो पोटश्रमविभाग होत असतो

त्याचा विचार करणें आहे. ' श्रमविभाग ' ह्या शब्दाचा जेव्हां आपण उपयोग करितों तेव्हां हाच विभाग बहुधा आपल्या मनांत येत असतो.

हीं विशिष्टीकरणें बऱ्याच लौकरच्या 'पायऱ्यांवर दिसून येतात. उदाहरणार्थ, बर्टन म्हणतो कीं, एशियांतील लोकांप्रमाणें आफ्रिकेंतील लोक श्रमविभागाच्या कामांत फार जबर आहेत. उदाहरणार्थ, घर बांधण्याच्या कामीं ते फार श्रमविभाग करितात. तो म्हणतोः— " कांहीं लोक कुदळीनें खोल खळगा खणीत होते; कांहींजण चिखल तयार करीत होते; आणि कांहींजण झोपडीवर घालण्यासाठीं गवताचें व पानांचें छपर करीत होते. प्रत्यक्ष घरबांधणीस जेव्हां सुरुवात होईल तेव्हां कांहीं जणांची टोळी घर बांधावयाचे ठिकाणीं चिखलाचे गोळे नेऊन देईल, दुसरी टोळी त्यांस योग्य आकार देऊन ते थापील, तिसरी, मुलांमुलींची, ती भिंती बांधणाऱ्या गंवड्यास जमिनीवरून किंवा पराचीवरून हात वर करून देईल, एक गंवडी भिंत सारखी बांधली जात आहे किंवा नाहीं हें पाहून लांकडी खोऱ्यानें ती नीटनेटकी करील, व शेवटीं छपरवाले छपर चढवतील".

ज्या श्रमविभागामुळें जिन्नस तयार होतात त्याची वाढ कशी होते हें इंग्लंदच्या इतिहासावरून चांगलें दिसून येतं. उदाहरणार्थ, सोळाव्या शतकांत कापड करण्याच्या कामीं कित्येक निरनिराळ्या प्रकारचे मजूर कामास लागत असत. विणणारे, धुणारे, कातरणारे, रंगारी, लोंकर साफ करणारे, तिचे निरनिराळे प्रकार लावणारे, सूत काढणारे, आणि साफ करणारे इ०. आणि

पोटविभाग कसे वाढत जातात हें यावरून दिसतें कीं, पन्नाससाठ वर्षांपूर्वीं देखील लोंकरीच्या कारागिरीच्या कामांत वारा प्रकारच्या मजुरांचे चोवीस प्रकार झाले होते.

पण ह्या सविस्तर श्रमविभागाची योग्य कल्पना करण्यास हातानें काम करणाऱ्या लोकांचाच तेवढा विचार ध्यानांत आणून भागावयाचें नाहीं, तर त्यांना दिशा दाखविण्यासाठीं मनानें काम करणाऱ्या लोकांचाहि केला पाहिजे. उद्योगधंदा पक्कदशेस आलेला नसेल तेव्हां एकाद्या जिनसाचा जो कर्ता तो मनानें काम करणारा असतो व हातानें काम करणाराहि असतो; पण तो पक्कदशेस आला म्हणजे हाताचें काम व डोक्याचें काम हीं पृथक् होतात, आणि हाताच्या कामामध्यें जसे अनेक पोटविभाग उत्पन्न होतात, तसे डोक्याच्या कामामध्येंहि होतात. उदाहरणार्थ, बार्मिंघाम एथील एका कारखान्यांत इतके मानसिक मजूर होते;--पहिल्या वर्गांत कारखान्याचे मुख्य, त्यांपैकीं एक सर्वांत श्रेष्ठ; दुसऱ्या वर्गांत मुख्य एन्जिनियर, कारखान्याचा म्यानेजर, अंदाजखात्याचा मुख्य, रोकडखात्याचा मुख्य, पुऱ्या झालेल्या जिनसांच्या वखारीचा मुख्य; तिसऱ्या वर्गांत माल पाठवणारा व त्याचें बिल पाठवणारा कारकून, कोठीवाला कारकून, आणि रोकडखात्यांतील असिस्टण. त्याच्या नंतरच्या वर्गांत मुख्य व कामकरी ह्यांच्या मधले येतात; ओतण्याच्या खात्याचा फोरमन किंवा नाईक आणि फिटरलोकांचा फोरमन, आणि त्याचे असिस्टण. ह्या नियामक वर्गांच्या खालीं कामकरीवर्ग येतात; त्यांपैकीं पहिल्या शाखेंत ११ वर्ग येतात, दुसरींत ९ आणि

तिसरींत सात. एवंच त्या कारखान्यांत डोक्यानें काम करणारांचे ११ प्रकार, अर्धवट डोक्यानें व अर्धवट हातानें काम करणारांचे चार प्रकार, आणि हातानें काम करणारांचे २७ प्रकार होते.

आतां हातानें काम करणाऱ्या लोकांचाच विचार करतां त्यांच्यामध्यें श्रमविभागाचे मुख्य दोन प्रकार दृष्टीस पडतात. एकसमयावच्छिन्न प्रकार आणि क्रमिक प्रकार. उदाहरणार्थ, कांहीं जिन्नस असे आहेत कीं त्यांचे निरनिराळे भाग निरनिराळे कारागीर एकसमयावच्छेदेंकरून करीत असतात, आणि मग ते दुसरे एक प्रकारचे कारागीर एकत्र जोडतात; आणि दुसरे कांहीं जिन्नस असे आहेत कीं, ते निरनिराळ्या प्रकारच्या कारागिरांच्या हातांतून क्रमाक्रमानें जात असून प्रत्येक प्रकारचा कारागीर त्याच्यावर आपापली मखलाशी करीत असतो. ह्या दोन्ही प्रकारच्या वस्तूंचें आपण आतां एकेक उदाहरण पाहूं.

पहिल्याचें उदाहरण आगगाडीच्या इन्जिनाचें घेण्यासारखें आहे. असलीं यंत्रें करण्याच्या एका कारखान्यांत ह्या यंत्राचे निरनिराळे भाग तयार करणारे व ते एकत्र बसविणारे लोक सरासरी पन्नास प्रकारचे आहेत.

दुसऱ्याचें उदाहरण बिस्किटें तयार करण्याच्या कारखान्याचें घेण्यासारखें आहे. असल्या कारखान्यांत पहिलें खातें म्हटलें म्हणजे बिस्किटांना लागणारे कच्चे जिन्नस आणून ठेवण्याचें होय. नंतर पहिली कृति म्हटली म्हणजे निरनिराळ्या बिस्किटांना लागणारे निरनिराळ्या प्रमाणांनीं लागणारे जिन्नस तोलून घेणें ही होय.

नंतर ते एकत्र मिसळावयाचे ही होय, व तीं करण्यास अनेक माणसें असतात. नंतर त्यांचा मळून मलिदा करण्याची कृति येतें, व तो मलिदा वाटोळ्या फिरणाऱ्या प्रेसांतून घालून त्याचे जरूर त्या जाडीचे मोठाले पाट काढणें ही पुढची कृति होय. नंतर ह्या पाटांतून पाहिजे त्या आकाराचे व आकृतीचे बिस्किट पाडण्याच्या यंत्रांनीं ते पाडणें ही कृति येते. नंतर ते मोठाल्या ताटांतून मांडून तीं तीं वाटोळ्या फिरणाऱ्या पट्टयांवरून हळूहळू भट्टींतून काढण्याची, व भट्टीच्या दुसऱ्या टोंकास घेण्याची कृति येते. नंतर ते आकारा-प्रमाणें निरनिराळे काढून त्यांचे पुडे बांधणारांकडे ते पाठविण्याची कृति येते. अखेरीस त्यांच्यावर चिठ्या मारून छाप मारणें ही कृति येते.

समाजशास्त्रविषयक श्रमविभाग आणि इंद्रियविज्ञानविषयक श्रमविभाग ह्यांमध्यें किती निकट साम्यें आहेत हें आणखी एका गोष्टीवरून दिसून येतें. सामाजिक इंद्रियजालाप्रमाणेंच व्यक्तिजालामध्यें ज्ञानतंतुविषयक इंद्रियें आणि दुसरीं अनेक इंद्रियें असे नियामक भाग व काम करणारे भाग असतात ह्या गोष्टीखेरीज दुसरी एक अशी गोष्ट आहे कीं, ह्या इंद्रियांमध्यें एकसमयावच्छिन्न व क्रमिक असा श्रमविभाग आहे. उदाहरणार्थ, हाडें, स्नायू, काळीज, फुप्फुसें, यकृत, मूत्रपिंड, इत्यादि इंद्रियें जर आपल्या क्रिया एकसमयावच्छेदेंकरून करितात, तर पोषक पन्हळाचे निरनिराळे भाग आपल्या क्रिया एकामागून एक अशा क्रमानें करितात. उदाहरणार्थ, चावणें, लाळेंत घोळणें,

गिळणें, बारीक पिष्ट करणें, लगदा बनणें, पांढरा द्रव बनणें, आणि अखेरीस रक्ताशयांत तो वाहून नेणाऱ्या पोटांतील नलिकांनीं तो आपल्यांत ओढून घेणें, ह्या क्रिया क्रमाक्रमानें होत असतात.

श्रमविभागांची ही जी इंद्रियविषयक सांखळी तिला समाजशास्त्राविषयक श्रमविभागांचे दोन जोड जोडलेले आहेत, ही मोठी विलक्षण गोष्ट एथें लक्षांत घेण्यासारखी आहे. नांगरणें, इंगा फिरविणें, पेरणें, पीक काढणें, गाड्यांतून भरणें, मळणें, बाजारांत वाहून नेणें, धान्याच्या व्यापाराच्या वखारींत नेणें, तेथून पीठ करावयास नेणें, आणि शेवटीं तें पीठ रोटीवाल्याकडे नेणें· ह्या कृती प्रथम क्रमानें येतात; पुढें रोटीवाल्याकडे पाव करतांना कांहीं क्रमिक कृती होतात, किंवा बिस्किटें करतांना वर सांगितलेल्या कृती येतात. अखेरीस ते पाव किंवा बिस्किटें जो खातो त्याच्या ठिकाणीं वर सांगितलेले इंद्रियविज्ञानविषयक श्रमविभाग होतात. एवंच नांगरण्यापासून तों पोषकरस बनण्यापर्यंत श्रमविभागाच्या तीन सांखळ्या जणू काय एकाच संयुक्त सांखळीचे तीन भाग बनतात.

१३. आणखी एक कलम एथें घातलें पाहिजे. उत्क्रान्तीच्या सामान्य नियमाशीं प्रतिपाद्य गोष्टी जुळून आहेत असें त्या त्या प्रकरणांतून दाखविलेलें आहे. एथें ज्या द्रव्य व गति ह्यांच्या पुनर्विभजनाचें सर्वत्र उत्क्रमण बनतें त्याच्या मागें जाऊन गति ही अल्पतम विरोधाच्या किंवा महत्तम आकर्षणाच्या, किंवा दोहोंच्या फलशक्तीच्या रेषेंत होते हा नियम औद्योगिक

जगांत सर्वत्र उदाहृत कसा होतो हें लक्षांत घेऊं या.

ज्या प्रदेशांत जित करावयाच्या अडचणी सर्वांत कमी असतील तेथें समाजाची एकंदर वाढ सर्वांत जास्त होते. उदाहरणार्थ, देशाच्या एका सरहद्दीवर शत्रूच्या टोळ्या असल्यास आणि दुसऱ्या सरहद्दीवर नसल्यास, दुसऱ्या सरहद्दीकडे वस्ती पसरते. एका बाजूस सुपीक प्रदेश आणि दुसऱ्या बाजूस नापीक प्रदेश असल्यास, सुपीक प्रदेशाच्या बाजूस समाजाचा गोळा वृद्धिंगत होत जातो. तद्वतच देशाचा एक भाग तापसराईचा व दुसरा निरोगी असल्यास निरोगी भागांत लोकसंख्या वाढत जाते.

प्रांतिक श्रमविभागांमध्यें असलींच कारणें व त्यांचे असलेच परिणाम दिसून येतात. समुद्रकिनाऱ्यावरील लोक अन्नाच्या सांठ्याच्या (माशांच्या) नजीक असल्यामुळें, आंतील प्रदेशांतील जमीन नांगरून उपजीविका करणाऱ्या लोकांशीं प्रतिस्पर्धा करण्यास जाण्यापेक्षां मासे धरून उपजीविका करणेंच त्यांस ज्यास्त सोईवार वाटतें; आणि तेथें मासे विपुल असल्यास आणि आंत राहणाऱ्या लोकांची त्यांना मागणी विशेष असल्यास मच्छिमारांची वस्ती वाढते. गहूं पिकविणें आणि मेंढ्यांचे कळप करणें ह्यांचें असेंच आहे. प्रत्येक जिल्ह्यांतील जमिनीच्या कसाप्रमाणें लोकांस ह्यांतील हा किंवा तो उद्योग करणें ज्यास्त सोईवार वाटतें, आणि त्यांचे प्रयत्न अल्पतम विरोधाच्या रेषांनीं होत असतात. एखाद्या प्रदेशांत योग्य धंदा केल्यानें माण-

साचा त्या धंद्यास योग्य स्वभाव बनला म्हणजे नवा धंदा करण्यास कोणीं सांगितल्यास ते त्यास विरोध करितात; उदारणार्थ, कापड विणणारांस खाणींतून कोळसे काढावयास सांगितलें तर ते विरोध करतील.

स्थानिक श्रमविभागाच्या संबंधानेंहि सदृश कारणें सदृश कार्यें घडवून आणितात. अर्थशास्त्रज्ञांनीं स्पष्ट करून दाखविल्याप्रमाणें कोणी जो विशिष्ट धंदा पसंत करतो, तो तो करण्यास एकंदर सोई किती आहेत व अडथळे किती आहेत ह्या सगळ्याचा विचार करून करितो; आणि आपल्या एकंदर वासनांची तृप्ति करण्यास जो धंदा अल्पतम अडचणीचा असेल तो तो स्वीकारतो. जिन्नस उत्पन्न करणारांवरून दृष्टि काढून त्यांचा उपभोग घेणारांकडे लाविली तरी तीच स्थिति नजरेस येते. जे जे जिन्नस स्वतः घरीं तयार करण्यापेक्षां बाजारांतून विकत घेणें एकंदरींत कमी गैरसोईचें असेल तेच जिन्नस सामान्यतः लोक बाजारांत विकत घेत असतात.

आतां अल्पतम विरोधाच्या रेषांत गति झालेली जी दृष्टीस पडते ती श्रमविभागाच्या असल्या पक्क स्वरूपांतूनच, आणि त्यांना योग्य अशा सामाजिक संस्थांच्या वाढींतूनच दृष्टीस पडत अस नाहीं, तर ती असल्या संस्थांच्या उद्योगांतूनहि दृष्टीस पडते. मागणी व पुरवठा ह्यांचा जो नियम, ज्यामध्यें ज्या ठिकाणीं वस्तु विपुल असतील तेथून जेथें ते कमी असतील तेथें त्यांचे प्रवाह चालू राहतात असें गर्भित होतें, तो ह्या नियमापासूनच निष्पन्न झालेला आहे. कारण ज्या-

अर्थीं सर्वत्र पैसा हा श्रमांचा मोबदला म्हणून समजला जातो, त्या अर्थीं माल अगदीं स्वस्त मिळेल तेथें विकत घेणें ह्याचा अर्थ आपली जरूर कमींत कमी श्रमांनीं भागविणें होय; आणि आपला माल अगदीं महाग विकेल तेथें विकणें ह्याचा अर्थ आपल्या श्रमाबद्दल येईल तितका द्रव्यरूपी ज्यास्त मोबदला मिळविणें आणि म्हणून पुढें करावे लागणारे श्रम कमी करणें, असा होतो.

प्रकरण तिसरें

मिळविणें आणि उत्पन्न करणें

१४. ह्या प्रकरणांत ज्या चमत्कारांचा विचार करणें आहे ते वरच्या शब्दांपैकीं कोणत्याहि एकाच शब्दामध्यें येत नाहींत. ज्या प्रारंभींच्या पायऱ्यांवर माणसें सभोंवतालच्या प्रदेशांत मिळणाऱ्या वन्य वस्तूंवर आपली उपजीविका करितात त्या पायऱ्यांवरून पुढच्या पायऱ्यांवर ते जे जातात ते त्याच वस्तू मेहनतीच्या साह्यानें मिळवावयास लागूनच जातात. आणि मिळविणें व उत्पन्न करणें ह्यांत जो फरक आहे तो ह्या मेहनतीमुळेंच उत्पन्न होतो; म्हणजे काय तर 'उत्पन्न करणें' ह्याचा अर्थ 'श्रमांनीं मिळविणें'.

ह्याचें अत्यन्त ठळक उदाहरण म्हटलें म्हणजे खाणींतून धातू काढणें हें होय. खाणींत कोळसा, लोखंडाचा दगड, किंवा अशोधित तांबें हीं तयार असतात, आणि तीं काढून घेणें हें वास्तविकरीत्या 'मिळविणें' ह्या सदराखालीं येतें; पण ज्याअर्थीं तीं बाहेर काढण्यास श्रम फार लागतात त्याअर्थीं कोळसे वगैरे खाणींतून काढणें हें 'उत्पन्न करणें' ह्या सदराखालीं घालितात. तद्वतच कोळी शेजारच्या समुद्रांत सृष्टीनें तयार करून ठेविलेलेंच खाद्य वर आणितात; पण जाळें वगैरे टाकून मासे धरणें हें काम श्रमाचें असल्यामुळें मासे पकडणें हा उद्योग 'उत्पन्न करणें' ह्या सदरांतच घालितात.

मानवी प्रगतीच्या एका अत्यंत सामान्यस्वरूपीं, साधें

मिळविणें जाऊन त्याबद्दल उत्पन्न करणें जसजसें जास्त ज्यास्त होईल तसतशी ती जास्त झाली असें समजतात; हें उत्पन्न करणें प्रथम हस्तसामर्थ्यानें हात असतें, मागून पशुसामर्थ्यानें होतें, आणि अखेरीस यंत्रसामर्थ्यानें होतें.

१५. हें संक्रमण मंदरीत्या होत असतें; कारण तसें होण्यास मानवी स्वभावास नवें वळण लागावें लागतें, आणि तें लवकरच लागणें शक्य नसतें. ह्याबद्दल पाराग्वेमधील इंदियन लोकांचें उदाहरण अगोदर दिलेंच आहे; आणखी आस्ट्रेलियन लोकांचें देऊं. त्यांच्याबद्दल स्मिथसाहेब म्हणतो कीं, ते लोक ओझीं वहावयाचे नाहींत, किंवा अंग मोडून खणावयाचे नाहींत, किंवा दुसऱ्याच्या कह्यांत रहावयाचे नाहींत; शिवाय यूरोपांत कामकऱ्यांचे हात जसले दिसतात तसले त्यांचे हात दिसत नाहींत. आस्ट्रेलियनाच्या ढालीच्या भोंकांत यूरोपियनाचीं फार तर दोन बोटें जातील, पण जास्त जावयाचीं नाहींत. आतां सुधारलेल्या लोकांचे हात रोज उपयोगांत आणावयाचीं हत्यारें वापरण्यास जे योग्य झालेले आहेत ते हळूहळूच झाले असले पाहिजेत; आणि हल्लींपेक्षां पूर्वीच्या लोकांचे हात दुर्बल असल्यामुळें ते कामाकडे न लावण्याचा जो त्यांचा कल तो जिन्नस उत्पन्न करण्याच्या कामीं सारखा अडथळा आणीत असला पाहिजे.

शिवाय पुढच्या सुखासाठीं हल्लींचें सुख खर्ची घालण्यास रानटी लोक नाखुष असतात हें जें त्यांचें स्वभाववैगुण्य तें त्यांच्या आड येतच असतें. उदाहर-

णार्थ, अस्ट्रेलियन लोकांबद्दल स्मिथसाहेब असें म्हणतो कीं, श्रम करणें जेव्हां सुखाचें असेल तेव्हां तो मेहनत करितो, पुढचा हेतु साधण्यासाठीं गोऱ्या माणंसासारखा तो कष्टावयाचा नाहीं, किंवा चाबकाच्या भीतीनें नीग्रोसारखा खपावयाचा नाहीं.

ह्या मनोवृत्तिविषयक व्यंगाखेरीज दूरदृष्टि उत्पन्न होण्यास जो बुद्धिविषयक व्यापार व्हावा लागतो त्याचीहि उणीव त्यांच्यांत असते; म्हणजे, साधनें, साध्यें आणि किमती हीं योग्य रीतीनें ध्यानांत घेऊन त्यांची तुलना करण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत नसतें. उदाहरणार्थ, उत्तर अमेरिकेंतील इंदियन लोकांविषयीं डॉजसाहेब म्हणतो कीं, एका दिवसाची किंमत अमुक एक असते हें समजण्याच्या प्रगतीच्या पायरीवर ते अद्यापि आलेले नाहींत. कोणत्याहि वस्तूची किंमत ठरवितांना इंदियन प्रथम ह्या गोष्टीचा विचार करितो कीं, ती मला करतां येईल किंवा नाहीं; आणि ती करतां येत असल्यास ती करण्यास आपणास किती दिवस लागतील ह्याची तो पर्वा करीत नाहीं.

चिजा उत्पन्न करण्यास आणखी एक अडचण उत्पन्न होते ती ही कीं, तो (रानटी माणूस) उपास वैगरे काढण्यास, व अगदीं जाडेंभरडें खाण्यास व लेण्यास तयार असतो. आपल्या उघड्या अंगावर पडणारें बर्फ सहन करणारा रानटी उच्चतर माणसाप्रमाणें कपडे मिळविण्यास श्रम करण्यास तयार व्हावयाचा नाहीं. हम्बोल्ट आपणांस सांगतो कीं, ग्वाहिबो लोक एकादें लहानसें शेत करण्याच्या ऐवजीं शिळे मासे,

किडे, वगैरे खाऊन राहील. तसेंच हडसन उपसागरा-जवळील एस्कीमो लोकांविषयीं आपण असें वाचितों कीं त्यांनीं हरिण मारिलें म्हणजे त्याचें रक्त त्याच्याच पोटांतील अर्धवट पचलेल्या अन्नांत मिसळून तसेंच किंवा उकळून ते खातात. ह्या उदाहरणावरून हें उघड होतें कीं, उच्चतर जातींमध्यें जे मनोविकार ठळक झालेले आहेत त्यांची नीचतर जातीमध्यें उणीव असल्यामुळें, मिळविण्यापासून उत्पन्न करण्याकडे संक्रमण होण्यास अडथळा उत्पन्न होतो.

१६. वासना ज्याप्रमाणें संख्येनें व जोमानें वाढत जातील तसें उत्पादन हें त्या वासना तृप्त करण्याचें साधन म्हणून वाढत जातें; आणि निरनिराळ्या प्रकारचीं उत्पन्नें कोणत्या क्रमानें वाढत जावयाचीं हें त्या वासनांच्या कमजास्त जोरावर अवलंबून असतें.

रावने साहेब गोंडलोकांबद्दल जें सांगतो त्यावरून पहिलें विधान उदाहृत होतें. गोंड लोक अत्यन्त आळशी व श्रमविन्मुख असतात असें सांगून तो असें म्हणतो कीं वंजारी (व्यापारी) लोकांनीं त्यांच्यामध्यें नव्या गरजा व अभिरुची उत्पन्न केल्या आहेत आणि त्या भागविण्यासाठीं पैसे मिळवण्याकरितां रानांतील जिन्नस आणून विकण्याच्या कामीं ते जास्त श्रम करूं लागले आहेत. अशा रीतीनें त्यांच्या वासनावृद्धीमुळें जास्त जिन्नस उत्पन्न व्हावयास लागून विनिमयालाहि त्यांच्यांत सुरवात झाली आहे.

दुसरें विधान कांहीं उघड परिणामांनीं उदाहृत होत असून शिवाय कांहीं प्रच्छन्न परिणामांनींहि उदाहृत होत

असतें. आतां हें उघडच आहे कीं; अन्न आणि ऊब ह्या ज्या प्राथमिक गरजा त्या कांहीं अंशांनीं तरी रान-ट्यास देखील भागवाव्याच लागतात; आणि म्हणून उघडच ह्या प्राथमिक गरजा भागतील अशा प्रकारचीं उत्पन्नें प्रथम होत असतात. पण शारीरिक गरजा मुरत्या भागावयास लागण्याच्या पूर्वीं कांहीं मानसिक गरजा उत्पन्न होऊन त्यामुळें दुसरीं कांहीं उत्पन्नें व्हावयास लागूं लागतात. ह्या वासना म्हटल्या म्हणजे लढाई ज्या उत्पन्न करितात त्या होत, आणि वाखाण-णीची वासना ही होय; ह्यांपैकीं पहिल्या वासना हत्यारें उत्पन्न करण्यास कारणीभूत होतात, आणि दुसरी भूषणें उत्पन्न करण्यास कारणीभूत होते. ह्या वासना जरी परस्परांपासून अगदीं पृथक् म्हणून दिस-तात तरी त्या मुळांत एकमेकांशीं संबद्ध अशा आहेत; कारण त्या दोन्हीच्या मुळीं श्रेष्ठ म्हणून मानिलें जाण्याची आणि लोकांपासून वाहवा करून घेण्याची महत्त्वाकांक्षा असते. म्हणून कांहीं अंशीं पारधीकरितां पण फार करून लढाईकरितां हत्यारें उत्पन्न करण्याच्या कामीं रानटी माणूस फार धिम्मे-पणा व चातुर्य खर्च करीत असतो, पण मुळें खणण्या-साठीं किंवा शेतीच्या कामासाठीं तो अणकुचीदार काठीचा तेवढाच उपयोग करितो; आणि म्हणून सुधा-रणेच्या पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर हत्यारें व चिल-खत तयार करण्याच्या कामीं जी कळाकुसराई दृष्टीस पडते ती संसारांतील ज्या इतर उपयुक्त चिजा त्यां-मध्यें दिसणाऱ्या कळाकुसरीहून फार जास्त असते.

उदाहरणार्थ, प्राचीन जपानमध्यें तरवारी करणाराचा धंदा मोठ्या मानाचा समजत; व तो करणारे लोक उच्च कुलांतील असत. मॉमसेन आपणास असें सांगतो कीं, रोमन लोकांचे नांगर जेव्हां ओबडधोबडच असत तेव्हां त्यांचीं हत्यारें आकारानें सुरेख बनलेलीं होतीं. फ्रान्ससंबंधानें वरच्या नंतरच्या एका कालाविषयीं आपण असें वाचितों कीं, तेव्हां तेथें दुसऱ्या कांहीं कारखान्यांचा उल्लेख जरी सांपडत नाहीं तरी शस्त्रें तयार करण्याचे आठ कारखाने असल्याचा उल्लेख सांपडतो. मध्ययुगीन यूरोपामध्यें लढाईचीं हत्यारें आणि घरगुती हत्यारें ह्यांमध्येंहि असाच फरक दिसून येई. इंग्लंदमध्येंहि असेंच होतें. तेथें नार्मन-विजयानंतर इतर उपयुक्त कलांपेक्षां धातु शुद्ध करून त्यांचे जिन्नस बनवण्याची कला जास्त वृद्धिंगत झालेली होती, व तिचा व्यासंग करणारे लोक ज्यास्त उच्च दर्जाचे असत. शिवाय आपण असें वाचितों कीं, पंधराव्या शतकाच्या प्रारंभीं धातूंचे पदार्थ करणारे धंदेवाले पुष्कळ असतः त्या वेळीं चिलखतें करणारे लोक सोनारांइतकेच हुषार व बारीक काम करणारे असत; पण त्याच काळीं किल्या, कुलपें, अडसर इत्यादि रोजच्या उपयोगांतील आउतें अंगदीं ओबडधोबड असत, हें त्यांचे नमुने जे संग्रहालयांतून ठेविलेले आहेत त्यांवरून स्पष्ट होतें.

कांचेचे मणी, भपकेदार वस्त्रें व इतर वस्तू इत्यादि घेण्यासाठीं रानटी लोक मोलवान् वस्तू देत असतात अशा ज्या आपण हजारों गोष्टी त्यांच्यासंबंधानें वाचितों त्यावरून सुंदर किंवा मौल्यवान चिजा लेण्याची

हांव त्यांच्यांत किती प्रबल असते हें स्पष्ट दिसतें. सुधारलेल्या लोकांच्या इतिहासांवरून हीच इच्छा व्यक्त होते. मॉमसेन म्हणतो कीं, रोममध्यें सोनाराचा धंदा अगदीं प्राचीन कालापासून अस्तित्वांत होता. प्रारंभींच्या ऐतिहासिक लेखांत सोन्याचे दागिने व हिरेमांणकें इत्यादि मोलवान् खडे ह्यांना उल्लेख सर्वत्र सांपडतात; व त्यांवरून सर्वत्र असेंहि दिसून येतें कीं, ह्या वस्तू मोठ्या मिळकतीच्या दर्शक असून त्या ज्यांपाशीं असतील ते श्रेष्ठ दर्जाचे म्हणून समजत आणि त्यांच्या योगानें कनिष्ठांस आणण्याच्या कामीं मदत होई. ह्यामुळें ह्या चिजांना इंग्लंदमध्यें इतकी मागणी असे कीं, सोन्यारुप्याचे दागिने करण्याचे कारखाने इंग्लंदांत १४२३ सालीं लंदन वगैरे सात आठ मोठाल्या शहरीं फार असत, आणि म्हणून त्यांतील प्रत्येक ठिकाणीं ते कसास लावून पाहण्याचीं हपीसें स्थापावीं लागलीं होतीं.

परंतु जेथें हे दोन्ही हेतू संयुक्त होतात तेथें हा परिणाम सर्वांत जास्त ठळक होतो. ह्याचीं उदाहरणें प्राचीन काळीं ठळक ठळक लढावय्या ढालींवर नकशीचें काम फार केलेलें असे, आणि लष्करी जमीनदारीच्या काळीं राजे व संपत्तिमान् सरदार तरवारी व चिलखतें ह्यांच्यावर मोलवान् खडे वगैरे बसवीत असत, हीं होत.

हल्लीं देखील वस्तू उत्पन्न करितात त्या मुख्यत्वेंकरून ह्या प्रकारच्या वासनांच्या तृप्त्यर्थ करितात, हें प्रत्येकाच्या घरांत उपयुक्ततेकडे दृष्टि न देतां शोभेकडे दृष्टि देऊन केलेल्या किती वस्तू आढळून येतात हें ध्यानांत आणिल्यानें व्यक्त होणार आहे.

१७. लष्करी व औद्योगिक प्रकारच्या चळवळी आणि समाजनमुने ह्यांच्यामधील विरोध एथें आपल्या दृष्टीस पुनः पडतो. कारण, इतरांवर हल्ला व आपलें संरक्षण ह्यांसाठीं लागणारीं साधनें बनवणाऱ्या कारखान्यांस व कांहीं प्रकारच्या कलांस लष्करी चळवळींमुळें उत्तेजन येतें हें जरी खरें आहे, आणि शंभर टनी तोफा व पंधरा इंच जाडीचीं लढाऊ जहाजांचीं पऱ्यांचीं कवचें करण्याकरितां शोधून काढिलेल्या यांत्रिक पद्धतींनीं अनेक शांततेच्या धंद्यांची सुधारणा झाली आहे हेंहि जरी खरें आहे, तरी बहुतेक बाबतींत संहारक चळवळी उत्पादक चळवळींना प्रतिकूलच झालेल्या आहेत. प्रारंभींच्या काळीं यूरोपामध्यें ज्या सारख्या लढाया चाललेल्या असत त्यांनीं औद्योगिक घटना पुनःपुनः मोडून टाकिली होती. फ्रान्सांत पांचव्या ते दहाव्या शतकांच्या दरम्यान बरेच धंदे भरभराटीस येण्याचे अजीबात बंद झाले किंवा अगदीं नष्टहि झाले. सोळाव्या शतकांत राजरस्त्यांवरून कांटेरी झाडें इतकीं उगवलेलीं होतीं कीं त्यांनीं मार्ग दिसेनासे देखील झाले. जर्मनीमध्यें त्याच शतकांतील तीस वर्षांच्या युद्धानें सामाजिक घोंटाळा पूर्णपणें उत्पन्न झाला. लोकांना त्या काळीं लुटाऱ्यांशीं लढण्यासाठीं शेतांतून हत्यारें घेऊन जावें लागत असे. हा विरोध अशा प्रत्यक्ष रीतीनेंच दृष्टीस पडतो असें नाहीं, तर अप्रत्यक्ष रीतींनीं ह्याहूनहि ज्यास्त दृष्टीस पडतो. जगांत सर्वत्र रानटी व अर्धवट सुधारलेल्या समाजांतून पुरुष लढत नसतील तेव्हां शिकार करीत असल्यामुळें

कांहीं उत्पन्न करावयाचें तें बायकाच करितात. ह्याचा तात्कालिक परिणाम हा होतो कीं, अशा समाजांतून उत्पन्न फार थोडक्या प्रमाणावर होत असतें. दूरवंरचा परिणाम हा होतो कीं, उत्पन्न कमी झाल्यामुळेंच केवळ नव्हे तर बायकांची जननशक्ति कमी होऊनहि लोकसंख्या कमी होते, आणि समाजसामर्थ्यास धक्का बसतो; कारण बायकांवर कामाचा बोजा फार घातल्यानें त्यांची गर्भधारणशक्ति कमी होते.

आणखी एक दूरवरचा परिणाम ह्यापासून उत्पन्न होतो; तो हा कीं, उत्पन्नामध्यें सुधारणा व्हावयाची ती होत नाहीं. प्रारंभींच्या पायऱ्यांवर फेरबदल करण्याच्या लोक अत्यन्त विरुद्ध असतात; त्यांच्यांत सुधारणेचा विचारच नसतो. आणि रानटी पुरुष पुराणप्रिय असले तर रानटी स्त्रिया त्याच्याहूनहि पुराणप्रिय असतात. हा स्त्रीपुरुष जातींमधील भेद आपल्यामध्यें-हि दृष्टीस पडतो. एवंच उत्पादकांच्या समूहांतून पुरुष निघाल्यानें उत्पन्नांचा संचय प्रत्यक्षरीत्याच कमी होतो असें नाहीं, तर सुधारलेल्या उत्पादनसरणींचा स्वीकार न केल्यामुळें संचयवृद्धि व्हावयाची बंद होऊन गुणसुधारणाहि होत नाहींशी होते.

सुधारणेला हिसका अशाच रीतीनें बसतो असें नाहीं. ज्या मानानें एकाद्या समाजाची युद्धशीलता ज्यास्त ज्यास्त ठळक असेल त्या मानानें लढाईव्यतिरिक्त धंद्यांबद्दलचा तिटकारा लोकांच्या मनांत ज्यास्त ज्यास्त असतो. ते उत्पादनाचें काम अगदीं कमी बुद्धीच्या माणसांकडे संपवितात. आणि उच्चतर

बुद्धीचे माणूस त्यांस मदत करावयास गेल्यास त्यांची बेअब्रू होते. उद्योगधंदेवाल्यांना पहिल्याहून ज्यास्त चांगला मार्ग दाखविणारें जें ज्ञान तें मिळविणें आणि त्यांच्यांत पसरविणें ह्यांनाहि असल्या समाजांत धक्का बसतो, कारण विचार करणारे आणि शिकविणारे ह्यांची लढणारे थट्टा करीत असतात.

एकंदर गोष्टींकडे व्यापक दृष्टीनें पाहतां, आणि उत्पन्न करणारे व खर्च करणारे(ह्या वर्गांत लढवय्यांचाच विशेष भरणा असतो.) असे समाजाचे दोन वर्ग करतां आपणांस असें म्हणतां येईल कीं, ह्यांतील दुसरा वर्ग नेहमीं पहिल्या वर्गावर चरत असल्यामुळें त्याच्या वाढीला धक्का आणितो, आणि कधीं कधीं त्या वर्गावर फाजील मागणी करून त्याची संख्या कमी करून त्यास क्षयहि लाविता.

१८. एवंच औद्योगिक चळवळींची उन्नति अनेक तऱ्हांनीं युद्धविषयक चळवळीच्या अवनतीवर अवलंबून असते. लढाईच्या योगानें एकीकडे पुरुषांची मृत्युसंख्या वाढत जाऊन दुसरीकडे स्त्रियांची जननशक्ति कमी होते, आणि अशा रीतीनें लोकसंख्येस धक्का बसतो. शिवाय तिच्या योगानें औद्योगिक लोकांनीं जें खर्चापेक्षां ज्यास्त उत्पन्न किंवा भांडवल जमविलें असेल त्याचा खर्च होतो किंवा नाश होतो. आणि शिवाय शांततेच्या वेळच्या धंद्यांविषयीं लोकांच्या मनांत तिरस्कारबुद्धि उत्पन्न झाल्यामुळें धंदेवाल्यांस चांगली दिशा कोणी दाखवीत नाहीं.

शांततेच्या योगानें लोकसंख्या वाढून त्यांच्या

गरजा भागविणें कठीण पडूं लागल्यामुळें, सतत उद्योग, काटकसर, आणि सुधारलेल्या उत्पादनपद्धती यांस उत्तेजन मिळूं लागतें. गरजांचा ताण पडल्यामुळें लोकांस जे जे धंदे त्यांस अत्यन्त योग्य असतील व ज्यांपासून त्यांस अत्यन्त फायदा होण्यासारखा असेल ते ते स्वीकारणें भाग पडूं लागतें. आणि लोकसंख्या वाढून प्रत्येक धंद्यास पुरेसे लोक मिळूं लागले म्हणजे विशिष्ट धंद्यांची संख्या वाढत जाणें शक्य होऊन जातें. शिवाय उद्योगाविशिष्टीभवन ज्यास्त ज्यास्त झाल्यानें प्रत्येक धंदेवाल्याचें कौशल्य वाढत जाऊन पूर्वीहून ज्यास्त चांगले जिन्नस उत्पन्न होऊं लागतात इतकेंच नाहीं, तर प्रत्येक प्रकारचा जिन्नस ज्यास्त चांगला निघूं लागल्यानें एकंदर उत्पादन कमज्यास्त प्रमाणानें सुकर होऊं लागतें.

एवंच सर्व तऱ्हांनीं लोकसंख्येची वृद्धि आपल्या क्रियांनीं व प्रतिक्रियांनीं असा एक समाजदेह उत्पन्न करिते कीं, तो जसा वाढत जाईल तसा ज्यास्त विजातीय होत जातो. इकडे उत्पन्नाचे संचय व गुणधर्म ह्यांची सुधारणा होण्याचें तात्कालिक कारण चढाओढ हें असतें.

प्रकरण चवथें

साहाय्यकारी उत्पादन

१९. आतांपर्यंत उत्पादनाचा जो विचार केला आहे तो जे पदार्थ स्वतःच माणसाच्या वासनांची तृप्ति करितात त्या पदार्थांच्याच उत्पादनाचा केलेला आहे. पण माणसें जे जिन्नस उत्पन्न करितात त्यांपैकीं बरेच जिन्नस ह्याखेरीज असतात, आणि ते साहाय्यकारी उत्पन्नें ह्या सदराखालीं येतात; म्हणजे त्यांना स्वतःचीच अशी किंमत कांहीं नसते, तर तात्कालिक वासनातृप्ति करणाऱ्या ज्या चिजा त्या उत्पन्न करण्याच्या कामीं ते माणसांस मदत करितात ह्या दृष्टीनेंच त्यांची किंमत असते.

प्रधान उत्पादन आणि साहाय्यकारी उत्पादन ह्यांची उत्पत्ति एकसमयावच्छेदेंकरून होते. धारेचे दगडांची स्वताची किंमत कांहींच नसून लांकडास आकार देण्याच्या किंवा कातडीं साफ करण्याच्या कामींच त्यांचा उपयोग होत असे; आणि मुळें खणून काढण्याकरितां उपयोगांत आणिलेल्या अणकुचीदार काठ्या उदरंभरणास साहाय्यभूत म्हणून उपयुक्त समजल्या जात, म्हणून प्रस्तुतदृष्ट्या धारेचे दगड किंवा अणकुचीदार टोंकाच्या काठ्या तयार करणें ही सरणी साहाय्यकारी उत्पादनाची होती. आणि धनुष्यें, बाण, मासे धरण्याचे हाडाचे गळ, इत्यादि जे जिन्नस प्रत्येक रानटी माणूस आपल्यासाठीं तयार करितो त्यांचीहि गोष्ट अशीच आहे.

पण जोंपावेतों मुख्य उत्पादक आणि साहाय्यकारी

उत्पादक हे दोघे एकच असतात तोंपावेतों आह्मी आतां ज्याचें विवेचन करणार आहों तें साहाय्यकारी उत्पादन अस्तित्वांत येत नाहीं. जेव्हां निराळ्या प्रकारचा कामकरी, प्राथमिक अर्थीं उत्पादन न करतां दुय्यम अर्थीं उत्पादक बनतो आणि उत्पादनाला लागणारा हा किंवा तो पदार्थ उत्पन्न करूं लागतो, तेव्हांच तें उत्पादन अस्तित्वांत येतें.

२०. आतां साहाय्यकारी उत्पादकाची उत्पत्ति कांहीं अंशीं श्रमविभागाच्या उत्पत्तीबरोबरच होते हें उघडच आहे; आणि ह्यामध्यें अंतर्भूत होणाऱ्या श्रमविभागास फारच लवकर सुरवात होते. स्कूलक्राफ्ट लिहितो कीं, चिपिवा लोकांत अशी दंतकथा आहे कीं, उत्तरेकडील (उत्तर अमेरिकेंत) टोळ्यांमध्यें बंदुका निघण्यापूर्वीं असा एक लोकवर्ग होता कीं, त्यास 'बाणांचीं टोकें करणारा' असें म्हणत; ते योग्य दगडांची निवड करीत व त्यांचीं हीं टोकें बनवीत; आणि लढवय्यांस तीं देऊन त्यांजबद्दल प्राण्यांचीं कातडीं आणि मांस घेत. तो म्हणतो कीं, मातीच्या भांड्यांच्या संबंधानेंहि असेंच असे; म्हणजे, फ्लारिडा वगैरे उत्तर अमेरिकेंतील प्राचीन टोळ्यांमध्यें तीं बनविणारांचा एक स्वतंत्र वर्ग असे. आणि कॉल्बेन आपणास असें सांगतो कीं, हॉटेंटाटलोकांमध्यें श्रीमंतलोकांना स्वतःचीं चिलखतें करण्याचा आळस असल्यामुळें गरीब लोक तीं तयार करितात व गुरें घेऊन त्यांच्या ऐवजीं तीं त्यांस देतात. पण आफ्रिका व एशियाखंडाचे कांहीं भाग ह्यांमधील अल्पशा सुधारलेल्या समाजामध्यें लोहाराचा वर्ग

जो दृष्टीस पडतो तें प्रस्तुत गोष्टीचें अत्यन्त स्पष्ट उदाहरण होय. कारण लोहार जे जिन्नस तयार करितो त्यांपैकीं बहुतेक प्रत्यक्ष वासनातृप्ति करणारे नसून ज्या वस्तू तीं तृप्ति करितात त्या करण्यास ते साहाय्यभूत होत असतात; म्हणजे काय, तर, लोहार हा साहाय्यकारी उत्पादक आहे.

२१. प्रारंभींच्या सुधारलेल्या समाजांतून असल्या विशिष्टीकरणांचीं उदाहरणें सांपडतात. क्यारिलिंजियन राजांच्या अमदानीच्या संबंधानें लिहितांना लेव्हासूर म्हणतो कीं, सोनार तेव्हां धातू ओतण्याचें व त्यांच्या मिश्रणाचें काम करीत असे; त्यांच्या चिजा बनवीत असे; दागिन्यांवर कोरींव काम किंवा नक्षी करीत असे; हिरे, माणकें त्यांत बसवीत असे; आणि ते आपल्या हातांनीं साफ करी, किंवा त्यांस तजेला देई. आपलीं सर्व हत्यारें कशीं तयार करावयाचीं हेंहि त्यास माहीत असे. ह्या शेवटच्या विधानावरून हें उघड दिसतें कीं, सोनारांच्या वैगरे कामासाठीं लागणाऱ्या हत्यारांची संख्या ती करण्याचा स्वतंत्र धंदा बनावा इतकी त्या वेळीं वाढली नव्हती. ती मागणी जेव्हां पुष्कळ वाढली तेव्हां तो स्वतंत्र धंदा बनला. म्हणजे सोनार हा मुख्य उत्पादक तेवढा राहून त्याला लागणारीं व इतर तसलींच हत्यारें तयार करणारा साहाय्यकारी उत्पादक बनला.

प्रत्येक मोठाल्या कारखान्याची वाढ होतांना अशाच पायऱ्यांवरून त्याला जावें लागलें आहे. इंग्लंदांत सोळाव्या शतकांत कापड विणण्याच्या कारखान्यांची

अशाच रीतीनें वाढ होत गेली. सुतार व कपाटें करणारे ह्यांचेंहि असेंच झालेलें आहे. हत्यारांप्रमाणेंच कच्चा द्रव्यांचें झालेलें आहे. विटा, दगडांचे पाट, फळ्या, चुना, कड्या, कुलपें, वगैरे घर बांधावयास लागणारें सर्व सामान साहाय्यकारी उत्पादकच बनवीत असून तें प्रत्यक्ष स्वतंत्रपणें वासनातृप्ति करीत नाहीं, तर एकत्र करावें तेव्हांच (घराच्या रूपानें) करितें.

साहाय्यकारी उत्पादन हल्लीं किती महत्त्वाचें बनलेलें आहें हें शेतकरी जीं अनेक आउतें हल्लीं उपयोगांत आणितो त्यावरून स्पष्ट दिसतें. हल्लीं शहरेंच्या शहरें साहाय्यकारी उत्पादनाच्या कारखान्यांनीं भरलेलीं दिसतात. उदाहरणार्थ, शेफील्डसारख्या ठिकाणीं चाकू, कातऱ्या वगैरे कापण्याचींच हत्यारें बनत असतात. बार्मिंघाममध्यें सुताराला लागणारे खिळे व स्क्रू वगैरे होतात. इ० इ०

२२. परंतु सर्वांत विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आणखी एक वाढ सांगावयाचीच राहिली आहे. उत्पादन सुलभ व्हावें एतदर्थ साहाय्यकारी साधनें करण्याच्या कारखान्यांमागून हीं साधनें तयार करण्याच्या साधनांचे कारखाने उत्पन्न झालेले आहेत.

ह्याचें अत्यन्त परिचित उदाहरण म्हटलें म्हणजे रोजच्या उपयोगाचे पदार्थ तयार करण्याचा चरक होय. इतर चरकांचे व यंत्रांचे भागांना आकार देण्यासाठीं उपयोगांत आणिलेला चरक हें त्याच्याहून ज्यास्त ठळक उदाहरण होय. आणि अनेक कामासांठीं लागणाऱ्या अगदीं सरळ कांबी व अगदीं सपाट पाट तयार करणारा जो रंधा त्याचा उपयोग चरकाचे पाट तयार

करण्याच्या कामीं होत असल्यामुळें तो साधनरूप यंत्रांच्या एक पायरीमागचा आहे. हे संबंध वाफेनें चालणाऱ्या घणानें ह्याहूनहि चांगल्या रीतीनें उदाहृत होतात. कोणत्याहि मानवी वासनेच्या प्रत्यक्ष तृप्तीच्या कामीं त्याचा कांहीं उपयोग नाहीं. मानवी वासना तृप्त करण्याच्या कामीं प्रत्यक्ष मदत करणाऱ्या वस्तू उत्पन्न करण्याच्या कामींहि तो उपयोगाचा नाहीं. पण ज्या लोखंडाच्या मोठाल्या गोळ्यांना तो सामान्यतः बरेचसे योग्य आकार देतो त्यांचेच पुढें यंत्रांचे निरनिराळे भाग बनत असतात. आणि हीं यंत्रें देखील मानवी गरजांची भागवणी अप्रत्यक्षरीत्याच करितात; कारण त्या गरजा भागविण्याच्या कामीं मदत करणाऱ्या चिजा करण्याच्या कामीं तीं मदत करीत असतात.

कोणी जर कोणताहि एकादा धंदेक्याटलाग उघडला, किंवा त्यांचेंच एकादें वर्तमानपत्र घेतलें, आणि त्यांतील सचित्र जाहिरातींकडे नजर फेंकिली, तर हल्लीं मुख्य उत्पादन त्या उत्पादनापासून एक, दोन, किंवा तीन पायऱ्याहि दूर असलेल्या साहाय्यकारी उत्पादनावर किती अवलंबून आहे, हें पाहून त्याचें मन थक्क होईल.

प्रकरण पांचवें

विभजन

२३. विभजन हा श्रमाविभागाचा आवश्यक साहाय्यकारी आहे. निरनिराळ्या माणसांनीं निरनिराळे उद्योग एकलक्षानें करावे ह्यास ही गोष्ट अगदीं आवश्यक आहे कीं त्यांनीं उत्पन्न केलेले जिन्नस परस्परांमध्यें खेळावे.

ही अदलाबदल प्रारंभीं उत्पादक व उपभोगक ह्यांच्यामध्यें प्रत्यक्षरीत्या होत असून प्रारंभापासून तीस दोन स्वरूपें येत असतात. उपभोगक उत्पादकाला तुझ्या उत्पन्नाचा जो जादा भाग असेल त्यांतील कांहीं मला दे म्हणून विनंती करितों; किंवा उत्पादक आपल्याजवळ जादा उत्पन्न आहे ही गोष्ट उपभोगकाच्या लक्षांत आणितो, अशा आशेनें कीं, तें त्यास देऊन त्याच्या ऐवजीं समान मोलाचें दुसरें कांहीं त्यापासून घ्यावें. ह्या दोन पद्धतींचीं अनेक उदाहरणें स्वदेशीं व परदेशीं दिसून येतात. उदाहरणार्थ, मर्व्ह एथील लोकांचें वर्णन करतांना ओडोन्होव्हन म्हणतोः— इतर देशांतून विकणारे हे अमुक जिन्नस कोणास पाहिजे काय म्हणून ओरडत असतात. पण मर्व्ह एथें ह्याच्या उलट आहे; ज्यास जो जिन्नस पाहिजे असेल तो तो कोणापाशीं आहे काय म्हणून ओरडत एथें बाजारांतून जात असतो; विकणारा आपले जिन्नस गिऱ्हाईकाच्या नजरेस आपण होऊन पाडीत नाहीं. हें त्या लोकांचें करणें जरी आपणांस विलक्षण वाटतें तरी आपण देखील

दुकानांत जाऊन अमुक जिन्नस आहे काय म्हणून विचारीतच असतों; ते जणुंकाय दुकानाबाहेरून विचारितात.

ह्याच्या उलट सरणी आपल्या सभोंवतीं दररोजच चाललेली आहे. विकणारानें जिन्नस हवे काय म्हणून विचारावें आणि गिऱ्हाइकानें होय म्हणावें ही पद्धति तेलवाल्यापासून तों भाजीवाल्यापर्यंत रस्त्यांतून फिरणाऱ्या धंदेवाल्यांमध्यें दिसून येते. कांहीं दुकानदार दुकानाबाहेर उभे राहून तसेंच करतांना कधींकधीं आढळून येतात.

हा फरक एथें सांगण्याचें कारण हें आहे कीं, तो अगदीं प्रारंभींच्या पायऱ्यांवरहि दिसून येतो, आणि त्यामुळें एकमेकांपासून ठळक रीतीनें भिन्न अशा दोन विभजनसरणी त्याजपासून उत्पन्न होतात.

२४. हाटेटांट लोकांत संरक्षक हत्यारें करणारा गुरें घेऊन त्याऐवजीं तीं देतों म्हणून वर सांगितलें; ही विभजनपद्धति मुद्दाम होऊन लक्षांत येणारी नसल्यामुळें तिचें वर्णन प्रवाशांनीं जरी वरचेवर केलेलें आढळून येत नाहीं, तरी हीच विभजनपद्धति प्राथमिक आहे ह्यांत बिलकूल संशय नाहीं. एकादी चीज करण्याबद्दल एकाद्या माणसाची प्रसिद्धि होई तोंपावेतों त्यानें त्या चिजा करण्याकडे विशेष लक्ष द्यावें इतकी मागणी त्या चिजांना उत्पन्न व्हावयाची नाहीं. आणि दुसरें कांहीं मोबदला घेऊन ती दुसऱ्यास देण्याच्या रूपाचें विभजन उत्पन्न व्हावयाचें नाहीं. पण जेव्हां एकादी व्यक्ति किंवा टोळी विशेष चातुर्यामुळें किंवा स्थानिक सौलभ्यामुळें कोणतीं तरी एकादी वस्तु किंवा वस्तुवर्ग करण्याच्या कामीं

प्रसिद्धीस येते,तेव्हां उत्पादकलोक उपभोगकांना त्या घ्या म्हणून म्हणूं लागतात, आणि त्यांना त्या देण्याकरितां प्रवास करूं लागतात. ह्यांचीं कांहीं उदाहरणें एथें देऊं. ग्वायनामध्यें प्रत्येक टोळी कांहीं विशेष चीज तयार करीत असते; आणि तिच्यांतील लोक ती घेऊन वैर करण्याऱ्या टोळ्यांकडे देखील त्यांनीं तयार केलेल्या चिजा तिच्या मोबदला घेण्यासाठीं जात असतात. ह्या व्यापाऱ्यांना शत्रूच्या देशांतून देखील जातांना कोणी त्रास देत नाहीं. मॉस्किटो लोकांच्या संबंधानें बँक्रॉफ्ट लिहितो कीं, त्यांच्या हांडुरास या देशांत शेजारच्या शेजारच्या टोळ्यांमध्यें जरी लढाया चालत तरी मालाची अदलाबदल करण्यासाठीं ते त्या कांहीं काळ बंद ठेवीत असत. आणि न्यूगिनीमधील पापुअन लोकांमध्यें देखील ह्यांचीं कांहीं उदाहरणें दृष्टीस पडतात. ते आपल्या बायकांनीं केलेलीं मातीचीं भांडीं घेऊन आपल्यास पाहिजेत ते इतर जिन्नस घेण्यासाठीं होड्यांतून वसून दुसऱ्या ठिकाणीं जातात.

आतां उपाभोगक आपल्यासाठीं कांहीं जिन्नस करण्यासाठीं सांगतो तशा प्रकारचा हा व्यापार असो, किंवा उत्पादक स्वताच जिन्नस तयार करून उपभोगकाकडे घेऊन जातो तशा प्रकारचा हा व्यापार असो; त्यामध्यें विभजनाचा प्राथमिक प्रकारच दिसून येतो. म्हणजे, त्यांत जिन्नस करणारापासून त्याचा उपयोग करणाराकडे त्या जिन्नसाची प्रत्यक्ष संक्रान्ति होत असते.

२५. उत्क्रमण होत असतां घाऊक विकणाराचें उत्क्रमण किरकोळ विकणारापासून होत असतें; आणि

प्राथमिक स्वरूपीं आपणच उत्पन्न केलेली वस्तु आपणच विकणारा माणूस किरकोळ व्यापारी असतो; मग ती वस्तु त्यानें हस्तकौशल्यानें तयार केलेली असो, किंवा जमिनींत उत्पन्न केलेली असो. ह्याशिवाय कामकरी लोक कामासाठीं गांवांत फिरून आपल्या कौशल्याचीहि विक्री करीत असतात. लांकूडफोड्ये, खडीवाले, टांकी लावणारे, कलई करणारे, हीं ह्याचीं उदाहरणें प्रसिद्ध आहेतच.

असलीं उदाहरणें आपल्या इकडेच आढळून येतात असें नाहीं, तर इंग्लंदांतहि आढळून येतात. उदाहरणार्थ, जोडे करणारेच सर्वत्र ते विकीत असतात; आणि रस्त्यांतून चाकूकातरीस धार देणारे आणि फाटक्या खुर्च्या विणणारे ह्यांचें ओरडणें तिकडेहि ऐकूं येतें.

२६. उत्पादक आणि विभाजक एकच असणें हें जें औद्योगिकघटनेचें प्राथमिक स्वरूप त्या स्वरूपीं जत्रा किंवा कधीं कधीं भरणारे बाजार विशेषेंकरून भरत असतात.

अशा प्रकारच्या जत्रा सर्वत्र आढळून येतात. कांगो लोकांत त्या भरतात असें **मान्हेरो** वर्णन करितो; **मामसेन** म्हणतो कीं, ह्या जत्रा आठवड्याच्या बाजाराहून भिन्न असून त्या रोममध्यें फार प्राचीन काळापासून भरत असत. इंग्लंदांत तेराव्या शतकांत दुकानें फार थोडीं असत, म्हणून लोक वार्षिक ज्या मोठाल्या जत्रा त्यांतून जात, आणि आपल्या प्रांतांत उत्पन्न न होणाऱ्या वस्तू विकत घेत. हल्लीं जत्रांच स्वरूप जरी बरेंच बदललेलें आहे तरी त्यांतून चिजा तयार करणारेच त्या विकावयास आणतांना दृष्टीस पडतात.

लोकवस्ती वाढत जाईल तसे जत्रांखेरीज आणखी

बाजार उत्पन्न होतात, आणि कांहीं काळानें ते जत्रां-चेंच काम करूं लागतात. आफ्रिकेमध्यें देखील ही गोष्ट घडून आलेली आहे. लिव्हिंग्स्टन सांगतो कीं, मान्युएमामध्यें बाजार ही मोठी संस्था आहे. बर्टन म्हणतो कीं डेहामेमध्यें मोठे चार बाजार आणि लहान पुष्कळच आहेत; आणि एग्बामध्यें प्रत्येक खेड्यांत बाजार असून तेथें बायका टोपल्यांतून जिन्नस विकावयास ठेवून झाडाखालीं बसलेल्या आढळतात. मध्य आफ्रिकेंत मार्किटांना टोको असें नांव असून तीं ल्वालाबाच्या बाजूनें पुष्कळ आहेत. निरनिराळ्या प्रांतांतील पुरुष एकमेकांशीं लढत असतील तेव्हां बायका आपली कोणाशीं लढाई नाहींच असें समजून एकमेकांच्या मुलखांत जिन्नस विकावयास जातात, व त्यांस कोणी त्रास देत नाहीं. आणि मामसेन म्हणतो कीं, रोममध्यें प्रारंभींच्या कालीं असेंच असे. तेथें महिन्यांतून चारदां, म्हणजे सरासरी दर आठव्या दिवशीं शेतकरी शहरास जिन्नस विकण्यास व विकत घेण्यास आणि इतर कामें करण्यास जात असत.

इंग्लंदांत प्रांतिक शहरांतून आठवड्याच्या बाजारांत जरी घाऊक व्यापार होत असतो तरी अंडीं, लोणी, कोंबडीं बदकें, फळें इत्यादिकांची देवघेव प्राथमिक तऱ्हेवरच होत असते.

पण हल्लींच्या ह्या व्यापारविषयक चळवळीच्या काळांत उत्पादक व उपभोगक ह्यांच्यामधील प्रारंभींचे प्रत्यक्ष संबंध जाऊन त्यांच्याऐवजीं बहुतेकांशीं अप्रत्यक्ष संबंध उत्पन्न झालेले आहेत.

प्रकारण ६ वें

साहाय्यकारी विभजन

२७.ज्यास सामान्यतः विभजन म्हणून म्हणतात त्याचा बराच भाग ज्यास आह्मीं एथें साहाय्यकारी विभजन म्हटलें आहे त्यांत येतो. पक्कदशेस आलेल्या औद्योगिक संस्थांत मध्यस्थ व्यापारी उत्पादक व उपभोगक ह्यांचे परस्परसंबंध जोडीत असतात; आणि हें मध्यस्थांचें जाळें प्रथम फार साधें असून हळू हळू गुंतागुंतीचें होत जातें.

माणसें जेव्हां आपापल्यासाठींच एकादी चीज उत्पन्न करण्या ऐवजीं आपल्या साठीं व इतरांसाठीं आणि हळूहळू विशेषतः इतरांसाठींच चिजा उत्पन्न करूं लागलीं, तेव्हां जसा वास्तविक उत्पादक अस्तित्वांत आला, तसा माणसें जेव्हां स्वतःच उत्पन्न केलेल्याच चिजा विकण्याऐवजीं इतरांनीं उत्पन्न केलेल्या चिजा-हि विकावयास लागून त्या चिजांची संख्या व संचय वाढवूं लागलीं, आणि त्याच धंद्यांत आपला सर्व वेळ घालवूं लागलीं, तेव्हां वास्तविक विभाजक किंवा मालाची पसरणी करणारा अस्तित्वांत आला. ह्या सरणीच्या पहिल्या पायऱ्यांच्या संबंधानें सहजच लेखी पुरावा सांपडत नसल्यामुळें सध्याच तशासारख्या कांहीं गोष्टी कोठें कोठें दृष्टीस पडतात त्यांवरून त्यांच्या संबंधानें अनुमान केलें पाहिजे. उदाहरणार्थ, तूप, लोणी वगैरे जिन्नस ताजे व अमळ स्वस्त मिळावे म्हणून शहरांतील लोक कोठें कोठें शेजारच्या खेड्यांतील धनगराला ते

आपल्यासाठीं आणण्यास सांगून ठेवितात; तें बरें पडतें असें समजलें म्हणजे शेजारचे लोक त्यांच्या जवळून तें घेऊं लागतात; अशा रीतीनें त्याची गिऱ्हाइकी वाढली म्हणजे ती न घालविण्यासाठीं तो आपल्या गांवांतील इतर धनगरांपासून तें विकत घेऊन गिऱ्हाइकांस पुरवूं लागतो, आणि पुढें कांहीं दिवसांनीं तोच धंदा करूं लागतो.

२८. अशाच रीतीनें दुकानदारीची उत्पत्ति कशी झाली असेल ह्याच्या उलगड्याचें साधन आफ्रिकेंत आढळून येणाऱ्या कांहीं गोष्टींमध्यें दिसून येतें. नीग्रो-लोक बऱ्याच मोठ्या प्रमाणावर व्यापार करणारे आहेत आणि कित्येक ठिकाणीं त्यांच्या देवघेवीच्या मंडळांना कधीं कधीं जमण्याची स्थिति जाऊन नेहमीं जमण्याची स्थिति प्राप्त झालेली आहे. लोआंगोमध्यें रोज बाजार भरतो, व त्यास सकाळीं दहा वाजतां सुरवात होते. आणि तिंबक्तूमध्यें आठवड्यांतून अमुकच दिवशीं बाजार भरावयाचा असें नसून तो रोज भरतो, व त्या-साठीं एके ठिकाणीं पन्नास फूट औरसचौरस पटांगणासभोंवतीं दुकानें बांधिलेलीं आहेत. ह्या शेवटच्या विधानावरून रोजच्या रोज माल आणून दुकान मांडण्याची स्थिति जाऊन माल एके ठिकाणींच नेहमीं ठेवण्याची स्थिति तेथें प्राप्त झालेली दिसून येते. शिवाय स्वतांचाच माल विकणाऱ्या दुकानदारापासून, आपला व दुसऱ्याचा माल विकणाऱ्या दुकानदाराची विभिन्नीकरणानें उत्पत्ति कशी होते हेंहि विचार करतां ध्यानांत येण्यासारखें आहे. आपल्यामध्यें देखील जो माल टिकण्यासारखा नाहीं अशा मालाचे व्यापारी संध्या-

काळीं तो स्वस्त दरानें विकूं लागतात. त्याचप्रमाणें माल टिकाऊ असला तरी बाजारांत ज्यांनीं डोक्यावरून विकावयास आणिला आहे, ते तो न विकल्यास संध्याकाळीं परत डोक्यावरून घरीं नेण्याच्या ऐवजीं अंमळ कमी दरानें द्यावयास कबूल होतील. तो कोण घेणार? तर अर्थात् तेथें जे कायम दुकानें घालून बसले असतील तेच तो घेणार; आणि अशा रीतीनें ते दुसऱ्याच्या मालाचे विकणारे बनणार. ह्या पद्धतीचा परिणाम अखेर असा होतो कीं, हे दुकानदार स्वतः उत्पन्न केलेला माल विकण्याच्या ऐवजीं इतरांनींच उत्पन्न केलेला माल विकणारे बनतात.

असल्याच रीतीनें फेरीवाला उदमी, म्हणजे गिऱ्हाइकाला आपल्याकडे न बलावतां गिऱ्हाइकाकडे जाणारा उदमी बऱ्याच प्रारंभींच्या पायरीवर उत्पन्न होतो. ही पद्धति कशी उत्पन्न झाली असेल हें सुचविणाऱ्या गोष्टी वरचेवर घडून येतात. खेडेगांवांतून शहरास कोणी जात असलें म्हणजे अमुक जिन्नस मजसाठीं घेऊन ये असें त्यास शेजारचे लोक सहज सांगतात. आतां लोकवस्ती जेव्हां पातळ असे तेव्हां असल्या व ह्याच्या उलट (कांहीं जिन्नस बाजारांत विकावयास नेण्याच्या) विनंत्या सहजच होत असतील; कारण, तेव्हां रस्ते चांगले नसून सुरक्षितहि नसत. म्हणून कांहीं मजुरा देऊनहि लोक असलीं कामें लोकांकडून करून घेण्यास तयार होत, आणि अशा रीतीनें फेरीवाले वगैरे लोकांची उत्पत्ति झाली.

२९. जागच्या जागीं बसून आणि फेरी घालून मा-

लाची वांटणी करणाऱ्या लोकांमध्यें कांहींजण इतरांहून ज्यास्त व्यवहारकुशल असल्यामुळें आपला व्यापार इतका वाढवितात कीं ते किरकोळ व्यापाऱ्यांचे घाऊक व्यापारी बनतात.

ज्या फायद्याच्या लालचीनें प्रथम दुकानांची स्थापना झाली त्याच लालचीनें पुढें हळूहळू वखारींची स्थापना झाली, व तेथून दुकानदार मालाची खरेदी करूं लागले. प्रारंभींचा किरकोळ व्यापारी इकडे तिकडे विखरलेल्या उत्पादकांपासून आपल्या दुकानांतील मालाचा भरणा करीत असल्यामुळें त्याच्याकडे कांहीं तरी प्रकारच्या मालाचा तुटवडा पडावयाचाच. म्हणून जेथें वस्ती वाढलेली असेल तेथें तो आपल्याहून मोठ्या प्रमाणावर किरकोळ व्यापार करणाऱ्याकडे जात असेल; आणि अशा रीतीनें त्या मोठ्या व्यापाऱ्याकडे जसे ज्यास्त ज्यास्त किरकोळ व्यापारी जात जातील तसा तोच व्यापारी घाऊक व्यापारी बनेल. अशा रीतीनें घाऊक व्यापाऱ्याची उत्पत्ति झाली. तो जसजसा घाऊक व्यापारी बनत चालला तसा जिन्नस आणण्यासाठीं दूर देशीं व प्रांतीं जाऊं लागला, म्हणजे तो व्यापारी बनला, किंवा दुरून जिन्नस मागावूं लागला. अशा व्यापाऱ्याची उत्पत्ति कशी होते हें हल्लीं देखील दिसून येतें. एकादा लोण्याचा मोठा व्यापारी असला तर तो गवळी आपल्याकडे लोणी घेऊन येण्याची वाट न पाहतां तोच त्यांच्याकडे जातो आणि त्यांस आगाऊ पैसे देऊन अमळ स्वस्त दरानें त्यांनीं आपल्यास लोणी पुरवावें म्हणून त्यांजपासून करार करून घेतो. तेहि गांवांत

माल नेण्याचे श्रम वांचावे, व एकादे वेळीं बाजारांत फारच लोणी आल्यास बऱ्याच स्वस्त दरानें विकावें लागतें तें लागूं नये म्हणून अशा करारास कबूल होतात. अशा रीतीनें मोठा लोण्याचा व्यापारी बनला म्हणजे शहरांतील धाकटे व्यापारी त्याजकडे जाऊं लागतात. गहूं वगैरे धान्याच्या संबंधानें असेंच होतें हें प्रसिद्धच आहे. राली ब्रदर्ससारखे व्यापारी देशावर अगोदर पैसा पेरून मागून येणारा गहूं आपलासा कसा करितात हें सर्वांस ठाऊकच आहे.

उलट जातीच्या व्यापाऱ्यांची उत्पत्ति अशीच झालेली आहे. डोक्यावर माल घेऊन विकणाऱ्या लहान फिरस्त्यांपासून मोठ्या ठिकाणीं व्यापार करणाऱ्या मोठ्या फिरस्त्यांची उत्पत्ति झाली. असल्या घाऊक व्यापाराची उत्पत्ति रानटी लोकांमध्यें देखील, जेथें त्यांचा सुधारलेल्या लोकांशीं संबंध येतो तेथें कधीं कधीं झालेली दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, हडसन नामक उपसागराजवळ राहणाऱ्या एस्कीमो लोकांबद्दल टर्नर असें सांगतो कीं, ते लोक वर्षांतून एकदां लोंकरीचीं कातडीं व इतर ज्यास्त मोलवान पदार्थ नेऊन त्यांच्या ऐवजीं दारूगोळा, बंदुका, सुऱ्या, कानशी, वगैरे लोखंडी पदार्थ आणि तंबाकू आणण्यासाठीं व्यापारी धक्क्यावर तीन, चार, किंवा पांच बिनचाकी गाड्या पाठवितात. ज्यांनीं स्वतः तो प्रवास केलेला असेल व ज्यांस रस्ता माहीत असेल असे कांहीं लोक निरनिराळ्या छावण्यांतून ह्या कामासाठीं ते निवडितात. व प्रत्येकजण आपलीं लोंकरीचीं कातडीं देऊन काय आणावयाचें हें सांगून ठेवितो.

अशाच प्रकारच्या विभजन-सरण्या ईजिप्त वगैरे देशांत प्रारंभापासून होत्या ह्याबद्दल पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, मुव्हर्स आपल्यास असें सांगतो कीं, उत्तर ईजिप्तमध्यें जेव्हां मोठाले उत्सव होत असत, तेव्हां फिनीशियामधून वर्षांतून दोनदां लमाणें येत असत. आणि आसीरियन लोकांमध्यें देखील वाळूच्या मैदानांतून त्यांचा माल नेण्यासाठीं उंटांचीं लमाणें असत. व तीं मोठालीं असल्यामुळें दरवडेखोरांपासून त्यांस बहुधा उपद्रव होत नसे. क्यांटबरीस जाणाऱ्या यात्रेकरूंची चॉसर कवीनें जी हकीगत दिलेली आहे तिजवरून पाहतां इंग्लंदांत देखील प्राचीनकाळीं असेच घोड्याच्या पाठीवरून माल नेणाऱ्या व्यापाऱ्यांचें जमाव तेथें बनलेले होते असें दिसतें. ह्या व्यापार-सरणीमुळें जशी व्यापाऱ्यांची उत्पत्ति होते तशी माल नेणारांची किंवा लमाणवाल्यांचीहि होते. उदाहरणार्थ, लान्सडेल सांगतो कीं, मोगोलियन लोकांमधील लामा-नामक उपाध्ये धार्मिक कामें करितात इतकेंच नाहीं, तर चीन देशांत मधील रुक्ष मैदानांतून माल नेण्या-आणण्याचीं कत्रांटेंहि ते करीत असतात.

ह्याच कलमाखालीं कामिशन घेऊन माल पाठविणारांची उत्पत्ति येते. हे लोक स्वतांच घाऊक व्यापार करण्याच्या ऐवजीं तो करणारांसाठीं त्यांचें जेथें दळणवळण असेल तेथून माल आणून देण्याचें पत्करीत असतात. जो व्यापारी स्वतः किंवा मुनीमाच्या द्वारा दूर देशीं जात असेल तो आपल्या शहरच्या दुसऱ्या एकाद्या व्यापाऱ्यानें विनंति केल्यास त्याच्यासाठीं तेथें

ठोकळ माल विकील किंवा विकत घेईल; आणि असें तो एकदां करूं लागला म्हणजे ज्यास्त ज्यास्त व्यापार त्यास आपल्यासाठीं कमिशन देऊन तसें करावयास सांगूं लागतील. हल्लीं इंग्लंदांतील ज्या ग्रंथप्रकाशकांनीं अमेरिकेंत आपल्या धंद्याच्या शाखा स्थापन केल्या आहेत, ते दुसऱ्या इंग्लिश प्रकाशकांचे एजंट बनले आहेत. आणि हा एजन्सीचा धंदा त्यांच्या स्वतांच्या धंद्याच्या मानानें कमी किंवा ज्यास्त होणें हें परिस्थितीवर अवलंबून राहील. कधीं कधीं एकाद्या व्यापाऱ्याचा हाच धंदा ज्यास्त वाढतो, आणि मग तो स्वतांचा माल आणण्यानेण्याचा धंदा सोडून देऊन इतरांचें आणण्यानेण्याचेंच काम करूं लागतो.

२०. अशा रीतीनें एकंदर विभाजक मंडळ घटित होत असतां त्याचा प्रत्येक मोठाला घटक आकारास येत असतो. कारकून, हमाल, शिपाई, इत्यादिकांखेरीज प्रत्येक व्यापारी कारखान्यांत त्या त्या कामाला योग्य असे, कामकरी-वर्ग असतातच. ठोकळ व्यापाऱ्याचा धंदा जोंपावेतों लहान असतो तोंपर्यंत किरकोळ व्यापाऱ्यांना पुरवावयाचा माल तो स्वतांच विकत घेत असतो. पण त्याचा धंदा वाढत जाईल तसें त्या कामावर मुनीम नेमणें त्याला भाग पडूं लागतें. अशा रीतीनें माल खरेदी करणारांचाच एक वर्ग उत्पन्न होतो; त्यांचें काम निरनिराळ्या व्यापाऱ्यांसाठीं अनेक ठिकाणीं माल तपासून, पसंत करून विकत घेणें हेंच बनतें. ह्याच कामामध्यें उलट सरणीनें आणखी एक मुनीमवर्ग उत्पन्न होतो; त्याचें काम मालकाच्या वतीनें गांवोगांव फिरून, माल किरकोळ व्यापाऱ्यांस दाखवून

मागण्या वाढविण्याचें असतें. शिवाय विशिष्ट धंद्याच्या निरनिराळ्या शाखांचे निरनिराळे मुख्य असतात; आणि कधीं कधीं ह्या प्रत्येकाकडे कांहीं स्वतंत्र भांडवल दिलेलें असून त्याच्यावर होईल तेवढा नंफा त्यानें करावयाचा असतो;आणि त्याला त्या कामावर ठेवावयाचें किंवा नाहीं हें त्याच्या कर्तबगारीवर अवलंबून असतें.

एवंच उत्पादक सरण्यांमध्यें जशा निरनिराळ्या घटना उत्पन्न होतात तसल्याच विभाजक सरण्यांमध्येंहि हळूहळू उत्पन्न होतात.

३१. मालाची पसरणी करण्यासाठीं सजीव साधनांची ही जी वाढ होत गेलेली आहे तिच्या बरोबर जरूर त्या निर्जीव साधनांची—म्हणजे माणसें, माल, आणि मजकूर हीं नेण्याच्या साधनांचीहि वाढ झालेली आहे. ह्या दोहोंची एकमेकांवर नेहमीं क्रिया व प्रतिक्रिया होत गेलेली आहे; म्हणजे वहनमार्ग सुधारत जातील तसें विभजन वाढलेलें आहे, आणि विभजन वाढत जाईल तसें वहनमार्ग सुधारत गेलेले आहेत.

नदीच्या कांठावर राहणाऱ्या लोकांना नदी हा आयताच वहनमार्ग सांपडतो, आणि अगदीं पहिल्या पायऱ्यांवर देखील ह्या मार्गानें पुष्कळ व्यापार कधीं कधीं उत्पन्न झालेला आहे. बोर्नियोमधील समुद्रावरील डायाक लोकांमध्यें असें झालेलें आहे, आणि आफ्रिकन लोकांतहि असेंच झालेलें आहे. उदाहरणार्थ, नायजर नदीवरील निरनिराळ्या शहरांमध्यें दळणवळण आणि व्यापार फार मोठा आहे. जेनी व तिंबक्तु ह्यांच्या दरम्यान साठ ते ऐंशी होड्यांचे अनेक प्रकारच्या

मालांनीं भरलेले तांडे वरचेवर आढळून येतात. पण जेथें स्वाभाविक वहनमार्ग नसतील तेथें वरचेवर जाण्यानें जेवढे मार्ग बनलेले असतील त्यांपलीकडे इतर मार्ग नसतांत. उदाहरणार्थ, पूर्वआफ्रिकेबद्दल बोलतांना बर्टन म्हणतो कीं, तेथें अत्यंत रहदारीचे रस्ते म्हटले म्हणजे बकऱ्यांच्या मार्गासारख्या पायवाटाच असून त्या एक किंवा दोन विती रुंद असतात, आणि प्रवासाच्या ऋतूंत माणसांच्या व जनावरांच्या रहदारीनें बनलेले असतात. उघड्या व रुक्ष ठिकाणीं कोठें कोठें असल्या चार किंवा पांच वाटा कांहीं अंतरपर्यंत समान्तर गेलेल्या दिसून येतात. गोल्डकोस्टवरील अशल्या वाटांच्या संबंधानें बास्मन लिहितो कीं, जो रस्ता दोन मैल लांब असावयाचा तो वांकडातिकडा व उंचसखल असल्यामुळें तीन मैल लांब बनतो. सांडविचनामक बेटांच्या पुष्कळ भागांतून असेंच आहे. तेथें खेड्याखेड्यांना जाणारे रस्ते एक फुटाहून ज्यास्त रुंद नसून फार वांकडे तिकडे असतात. रहदारीमुळें रस्ता कसा बनतो, आणि त्याच्यावर जसजशी ज्यास्त रहदारी पडेल तसा तो त्याच कामीं ज्यास्त ज्यास्त उपयुक्त कसा बनत जातो, हें ह्या ठिकाणीं आपल्यास दिसून येतें.

डायाक लोकांसारख्या थोड्याश्या सुधारलेल्या कांहीं लोकांमध्यें झाडें एकेरीं जमिनीवर टाकून ठराविक रस्ते बंनवितात, आणि कधीं कधीं दुहेरीं झाडें टाकून बनवितात. न्यूगिनीमध्यें असले कृत्रिम मार्ग चिखलांत मनुष्य रुपूं नये म्हणून बनवावे लागतात. नीग्रो, डायाक व न्यूझीलंदर वगैरे लोकांमध्यें ओहोळ वलांडण्यास अ-

सलीं झाडें आडवीं टाकलेलीं असतात, व कोठें कोठें हात टेंकण्यास त्यांना दोन्ही बाजूंनीं कठडाहि उभारितात. आपण असें वाचितों कीं, तांदूळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं न्यावयांस अडचणी असल्यामुळें त्यांची किंमत निरनिराळ्या ठिकाणीं अगदीं निरनिराळी असते असें राफल्स सांगतो, तद्वतच ब्रूक डायाक लोकांबद्दल असेंच सांगतो; ह्यावरून असल्या अडचणींमुळें किमतींत फरक उत्पन्न होऊन विभजनास कसें उत्तेजन मिळतें हें ध्यानांत येतें. आपल्याला ह्या गोष्टीचीहि आठवण होते कीं, ह्या फेरबदलांस लोकवस्तीच्या वाढीनें उत्तेजन येतें; कारण तेणेंकरून मालास ज्यास्त मागणी उत्पन्न होऊन तो निरनिराळ्या ठिकाणीं नेणें किंवा त्याचें विभजन करणें फायदेशीर होतें. शिवाय माल एके ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं वरचेवर जाऊं लागला म्हणजे फायद्याच्या लालचीनें विशेष हिंमतदार लोक दळणावळणाचे मार्ग सुधारूं लागतात. आफ्रिकन लोकांमधील विशेष पुढें गेलेल्या जातींमध्यें देखील ही गोष्ट दिसून येतें. उदाहरणार्थ. डेहामीबद्दल बर्टन असें लिहितो कीं त्यांच्या देशांत रस्त्यांतून जकातीचीं नाकीं सर्वत्र आढळतात. तेथें जकातदार रस्त्यावर एक आडवी दोरी टांगतो, आणि सर्वांनीं आपापल्या कवड्या दिल्या खेरीज ती सोडीत नाहीं. इंग्लंदांतही रस्त्यांची सुधारणा अशाच रीतीनें झालेली आहे. तद्वतच चांगले रस्ते, चांगल्या गाड्या आणि चांगल्या आगगाड्या ह्यांबरोबर आणखी एक फेरबदल होऊन गेलेला आहे तोहि विसरतां कामा

नये. तो हा कीं, पूर्वीं जो मालाचा उत्पादकच तो नेणाराहि असे ती स्थिति जाऊन माल नेणें हाच एक स्वतंत्र धंदा बनलेला आहे.

आतां एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं बातम्या पोंचविण्याचीं साधनें जशीं वाढत गेलेलीं आहेत तशी विभजनास ज्यास्त मदत झालेली आहे हें सांगावयास नकोच. ज्याकाळीं राजे व सरदार ह्यांनाच जासूद पाठवितां येत असत त्या काळीं व्यापाऱ्यांस धंदा चालविण्यास स्वतः प्रवास करावा लागत असे. पण पोष्टाची पद्धति जशी सुरू होऊन सुधारत चालली, तसें मालाचें विभजन जलद व थोडक्या खर्चांतहि होऊं लागलें आणि अशा रीतीनें मागणी व पुरवठा ह्यांमध्यें चोहों कडे समतोल उत्पन्न होऊं लागला. आणि हल्लीं तर तारायंत्र व टेलिफोन (ध्वनिवाहक यंत्र) सुरू झाल्यापासून विभजनव्यापार जणूंकाय पूर्णतेसच पावलेला आहे.

प्रकरण ७ वें

विनिमय.

२२. विभजन आणि विनिमय ह्यांची अर्थात् एकदमच मुळांत उत्पत्ति होते, कारण मूलस्वरूपीं ते एकाच सरणीचे भाग असतात. म्हणून विभजनविषयक प्रकरणास जेथून सुरवात केली तेथूनच सुरवात करून तत्संबंधी चमत्कारांचा विचार केला पाहिजे.

सेंद्रिय चमत्कारांप्रमाणेंच सेंद्रियोत्तर चमत्कारांचें होतें; म्हणजे, उत्क्रान्तिदृष्ट्या त्या चमत्कारांचा विचार करूं लागलें म्हणजे पूर्वीं आपल्यास कल्पना नव्हती अशा त्यांच्या प्रारंभींच्या व अगदीं सरळ पायऱ्या आपल्या नजरेस येतात. ह्याचें उत्तम उदाहरण विनिमयाच्या पहिल्या पायऱ्या हें होय.

मानवीव्यवहारविषयक गोष्टींमध्यें विनिमयाइतकी साधी दुसरी गोष्ट असेल असें वाटत नाहीं; आणि विनिमयाच्या बुडीं असलेली कल्पना रानटी लोकांपैकीं अगदीं जडबुद्धीच्या माणसास देखील समजत असेल असें आपल्यास वाटतें. पण वास्तविकरीत्या तशी गोष्ट नाहीं. "विधिविषयक संस्था" ह्या प्रस्तुत शास्त्राच्या अवश्या भागांत विनिमयाची उत्पत्ति नजराणे देणें व घेणें ह्या चालीपासून झाली असें म्हणण्यास कारणें दिसतात असें म्हटलें होतें. तेथें ह्या संबंधानें जो पुरावा दिला होता त्याशिवाय आणखीहि पुरावा तें म्हणणें बरोबर आहे असें दाखविण्यास पुरेसा सांपडतो. आस्ट्रेलियांतील रानटी लोकांना

विनिमय समजत नाहीं असें विधान एका प्रवाशानें केलेलें आढळतें. व तें खरें असेलसें प्रथमदर्शनीं वाटत नाहीं. पण तशींच विधानें दुसऱ्या प्रवाशांनींहि केलेलीं आढळून येतात. उदाहरणार्थ, न्यूगिनीमधील लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, त्यांच्यांत व्यापार किंवा विनिमय दिसत नाहीं; पण निरनिराळ्या टोळ्यांचे लोक एकमेकांस भेटावयास गेले म्हणजे भेटी घेऊन जातात; त्या भेटी त्यांच्यापाशीं ज्या वस्तू ज्यास्त असतील त्यांच्या बनलेल्या असतात; पण साऱ्या किमतीच्या वस्तू म्हणून एकमेकांस त्यांनीं दिलेल्या आढळून येत नाहीं. हा पुरावा डॉ० **माक्रे** ह्यानें दिलेला आहे. **आल्बर्टिस** हा त्या लोकांबद्दल असेंच सांगतो. तेथील एक माणूस त्याच्या जहाजावर आला होता त्याच्याबद्दल तो असें सांगतो कीं, "त्याच्या कमरेंत करगोटा होता तो मला दे, व त्याबद्दल तुला कांहीं मणी देतों असें मीं त्यास खुणांनीं सुचविलें; पण तें त्यास समजेलसें दिसलें नाहीं; तो आपल्या लोकांशीं कांहीं बोलला, आणि त्यानें मंला आपला करगोटा दिला. व त्याबद्दल कांहीं मणी व एक आरसा त्यानें मजपासून घेतला. (त्या आरशांत तोंड बघण्याचें त्यास भय वाटे.) पण पुढें जेव्हां तो किनाऱ्यावर जावयास निघाला तेव्हां तो आपला करगोटा परत मागूं लागला; तेव्हां त्यानें तो मला विकला आहे हें त्याच्या डोक्यांत कांहीं केल्या भरेना; आणि करगोटा त्यानें परत घेतल्यास त्यानें मला ते मणी व तो आरसा हीं परत दिलीं पाहिजेत हेंहि त्या-

च्या लक्षांत येईना ". दुसरें एक अंमळ निराळ्या प्रकारचें उदाहरण सामोआमधील आपल्या नजरेस येतें. टर्नर म्हणतो कीं मर्तिकाच्या वेळीं त्यांच्यांत प्रत्येकजण भेट आणीत असे, आणि दुसऱ्या दिवशीं ह्या भेटीची पुनः वांटणी होऊन प्रत्येक भेट आणणारास कांहीं तरी परत भेट मिळत असे. नूटकासौंड नामक ठिकाणच्या टोळ्यांविषयीं ब्यांक्रॉफ्ट असें सांगतो कीं, ते आपले विनिमय बऱ्याच हुशारीनें करितात; त्यांची भेटी देण्याची पद्धति देखील एकप्रकारचा व्यापारच आहे; कारण एका उत्सवप्रसंगीं जी भेट दिलेली असेल तेवढ्याच किमतीची पुढच्या प्रसंगीं आपणास भेट मिळेल असा प्रत्येकास पूर्ण भरंवसा असतो. आफ्रिकेमध्यें ह्या पद्धतीचें एक निराळें स्वरूप दृष्टीस पडतें. उदाहरणार्थ, बिहीनो लोकांविषयीं बोलतांना क्यापेलो व आयव्हेन्स असें म्हणतात कीं, आफ्रिकेंत यूरोपियनास कांहीं विकावयाचें नाहीं, पण भेट म्हणून द्यावयाचें अंशी जी खराब चाल आहे तीस अनुसरून हे लोक यूरोपियनास कांहीं दिलें कीं त्याजपासून त्याच्याबद्दल हळूहळू त्याच्यापाशीं असेल नसेल तें काढून घेतात; यामुळें शेवटीं त्यास ह्या भेटीच आपल्यास नकोत असें म्हणण्याचा प्रसंग येतो.

एवंच असें सिद्ध होतें कीं, व्यापारी दळणवळण आणि औद्योगिक घटना ह्यांना आवश्यक असा जो विनिमय त्याची मूळ कल्पना संतर्पणवासनेपासून उत्पन्न होणाऱ्या कांहीं विधिविषयक कृतींपासून उत्पन्न होत असते.

३३. संचय आणि मूल्य ह्यांच्या मापांच्या अभावीं

'अमक्या बरोबर अमुक' ही सममूल्याची कल्पना संदिग्ध राहिलीच पाहिजे. जेव्हां विनिमय केल्या जाणाऱ्या वस्तू संचयानें किंवा स्वरूपानें अगदींच भिन्न असतील तेव्हां सममूल्याची वाण स्पष्टपणें लक्षांत येते. व्यापारविषयक व्यवहार प्रथम किती ओबडधोबड असतात हें चालिकाटा नांवाच्या इंदियन लोकांच्या पुढील उदाहरणावरून दिसून येतें. डाल्टन म्हणतो कीं, "ह्या संशयी, व सहज क्षुब्ध होणाऱ्या रानटी लोकांमध्यें आणि मैदानावरील थंड डोक्याच्या लुच्चा व्यापाऱ्यांमध्यें जो सौदा चाललेला असतो तो पाहणें मोठें गमतीचें असतें. ते लोक आपण आणलेल्या जिनसा देऊन बहुधा मीठ घेत असत. आणि तें कोणत्याहि रीतीनें मापून किंवा तोलून घेण्यास मुळींच तयार नसत. दुकानापुढें बसून ते आपल्या टोपलींतून द्यावयाचा जिन्नस हळूच बाहेर काढितात, आणि तो मांडीखालीं धरून आपले दोन्ही घाणेरडे हात स्वच्छ पांढऱ्या मिठांत घालितात; त्या दोन हातांनीं येईल तितकें मीठ आपल्या टोपलींत टाकण्याचा यत्न ते करितात, पण व्यापारी त्यांच्या हातावर हात मारून निम्में मीठ आपल्या टोपलींत पाडितो; मग त्या दोघांत भयंकर तंटा उत्पन्न होतो, व अखेरीस व्यापारी आणखी कांहीं चिमटी मीठ द्यावयास कबूल होतो."

विनिमयाच्या सामान्य मापाच्या (नाण्याच्या) अभावीं आणखीहि अडचणी उत्पन्न होतात. त्यांपैकीं एक अडचण ही कीं, ज्यांस एकमेकांजवळ असलेले जिन्नस पाहिजेत असे लोक एकमेकांकडे 'आणण्याची

पंचाईत. डॉ० वार्थ याला या संबंधानें आफ्रिकेंत आलेल्या अनुभवांवरून ही गोष्ट चांगली व्यक्त होते. तो म्हणतो कीं, कुकावामध्यें सोमवारच्या बाजारास धान्य आणणारा छोटा शेतकरी कवड्या घेऊन तें द्यावयाचा नाहीं, किंवा डालरहि द्यावयाचा नाहीं. म्हणून ज्याच्यापाशीं केवळ डालरच असून धान्य द्यावयाचें असेल त्यास प्रथम डालर देऊन कवड्या घेतल्या पाहिजेत, मग कवड्या देऊन 'कुलगु' किंवा सदरा घेतला पाहिजे; आणि अशा रीतीनें अदलाबदली करतां करतां शेवटीं त्याच्या हातांत धान्य येतें. त्यामुळें बाजारांत गेलें म्हणजे माणसास इतके श्रम होतात कीं, वरील साहेब म्हणतो, माझे नोकर बाजारांत गेले म्हणजे अगदीं थकून येत असत.

विनिमयाची पक्कसरणी सुरू होण्यास अडाणी माणसांच्या गैरसमजुतीमुळें एक अडचण उत्पन्न होते तिला एथें उल्लेख करणें इष्ट दिसतें. उदाहरणार्थ, चित्राली लोकांबद्दल क्यापटिन यंगहसबंड असें सांगतो कीं, त्यांस रुपये म्हणजे दागिनेच वाटत, आणि म्हणून कामाबद्दल मजुरा म्हणून ते घेणें त्यांच्या ध्यानांत येत नसे. बनायोमधील इंदियन लोकांविषयीं पिम व सीमन असें म्हणतात कीं, त्यांस पैशाची किंमत बरोबर समजत नाहीं, आणि त्यांस असें वाटतें कीं सौदा करण्याची खरी खुबी म्हटली म्हणजे जिनसाची जी दुकानदारानें किंमत मागितली असेल तिच्याहून भिन्न किंमत देणें ही होय. त्यांच्यापैकीं चार असामी एका दुकानांत एक फणी विकत घ्यावयास गेले, तिची किंमत दुकानदारानें अर्धा क्रौन (अडीच शिलिंग) मागितली; पण ते म्हणूं ला-

गेले कीं तीन शिलिंग घेशील तरच आम्ही ती फणी घेऊं!

३४. पूर्वीच्या प्रकरणांप्रमाणें ह्या प्रकरणांतहि असल्या प्राथमिक व्यवहाराचे हल्लीं अवशेष काय दृष्टीस पडतात तें पाहूं.

जिनसांच्या अदलाबदलीस योग्य स्वरूप येण्याच्या पूर्वी जो विनिमय अगदीं प्रारंभीं दृष्टीस पडतो तो मदतीची अदलाबदल हा होय. उदाहरणार्थ, मरुत्से लोकांविषयीं होलब असें सांगतो कीं घरें बांधीत असतांना ते एकमेकांस मदत करण्यास इतके तयार असतात कीं, कांहीं पदार्थ कमी असल्यास त्याचा पुरवठा लागलाच होतो; ही मदत ते या शर्तीवर करितात कीं त्यांस तशी मदत जरूर लागेल तेव्हां ती मिळावी. अशा प्रकारच्या मदतीच्या अदलाबदली असुधारलेल्या लोकांमध्यें अगदीं सामान्य आहेत हें पूर्वी आपल्या नजरेस आलेंच आहे; आणि ज्याअर्थी सारख्याच जातीचे श्रम ते किती वेळ केले ह्यावरून मोजतां येतात त्याअर्थी त्यावरून समतेची किंवा सममूल्याची कल्पना प्रथम उत्पन्न होते. अशा प्रकारचे व्यवहार अपल्यांत देखील दृष्टीस पडतात. लावणीकापणीच्या वेळीं आपल्याकडेहि शेतकरी एकमेकांस मदत करीत असतात; व विशेषतः जेथें मजूर महाग असतील तेथें असें होतें. कोठें कोठें आपल्या बागेंत उत्पन्न होणाऱ्या जिनसांचाहि अशाच रीतीनें मोबदला होत असतो.

दारूच्या पिठ्यामध्यें देखील अशा रीतीच्या चाली आढळून येतात. आज यानें त्यास दारू पाजली, तर

उद्यां त्यानें यास पाजावयाची अशी चाल असल्या लोकांत आढळून येते. या उदाहरणावरून विनिमयाची उत्पत्ति संतर्पणावरूनच मुळांत उत्पन्न झालेली आहे हेंहि लक्षांत येतें; कारण दारू पाजणें म्हणजे खुश करणेंच होय.

ही चाल मुलांमध्येंहि दिसून येते. तींहि एकमेकांस पाळी पाळीनें मधल्या सुटींत वगैरे खाणें घेऊन देत असतात, व ही चाल गिरणींत वगैरे काम करणाऱ्या मजूर वगैरे लोकांतहि दिसून येते.

प्रकरण आठवें

साहाय्यकारी विनिमय

३५. नाण्याच्या अभावीं श्रम व काळ ह्यांचा किती मोठा व्यय करावा लागतो हें क्यामेराननें आफ्रिकेमधील आपल्या प्रवासवर्णनांत चांगलें दाखविलेलें आहे. त्याच्या मनांत कावेली येथें एक होडी भाड्यानें घ्यावयाची होती. होडीच्या मालकाला मोबदला हस्तिदंत पाहिजे होता; तेव्हां त्यासंबंधानें क्यामेरान म्हणतोः— "माझ्याजवळ हस्तिदंत मुळींच नव्हता; पण महमद इबन सालिब ह्याच्यापाशीं असून त्यास कपडा पाहिजे होता. तो माझ्यापाशीं नसून महमद इबन परीब ह्याच्यापाशीं होता, व त्यास त्याबद्दल तार पाहिजे होती. सुदैवानें ती माझ्यापाशीं होती. म्हणून मी त्याला द्यावयाची तितकी तार दिली, तेव्हा त्यानें सालिबला कपडा दिला, त्यानें होडीवाल्याला हस्तिदंत दिला, आणि मग मला ती होडी वापरावयास मिळाली". आतां अशा अडचणी पडूं लागल्या म्हणजे नाण्याची जरूरी भासूं लागलीच पाहिजे. आतां हें नाणें कशाचें करावयाचें हें स्थल व परिस्थिति ह्यांवर अवलंबून राहतें, पण तें कशाचेंहि बनवलेलें असलें तरी, पोषण, संरक्षण, आणि संभूषण ह्या ज्या तीन मुख्य गरजा त्यांपैकीं एकीची तरी भागवणी त्या पदार्थानें होत असते.

सजीव किंवा निर्जीव खाद्य मोजतां येण्यासारखें असल्यामुळें त्याचा प्रारंभीं नाणें म्हणून उपयोग करि-

तात. दक्षिण आफ्रिकेंतील धनगरी जातींमध्यें गुरांचे कळप ही माणसांची मुख्य मालमत्ता असते. आणि म्हणून त्यांच्यांत बायका व गुलाम ह्यांच्या किंमती गुरांच्या रूपानें देत असतात. प्राचीन धनगरी जातींमध्यें गुरें हेंच नाणें असे हें इंग्रजींत धनहीन ह्यास "impecunious" म्हणून जो शब्द आहे त्याचा अर्थ "ज्याच्यापाशीं गुरें नाहींत असा" असा आहे ह्यावरून देखील दिसून येतें. रोमन लोकांमध्येंहि गुरें हेंच प्राथमिक नाणें असे असें **मामसेन** सांगतो. पुढें तांब्याचेंहि नाणं तेथें सुरू झालें. प्राचीन इंग्रजांमध्यें बैल हें नाणें असे, आणि वेल्शलोकांमध्यें तें बरेंच काळ सुरू राहिलें.

आतां हें गुरांचें नाणें मोठ्या व्यवहारासच उपयोगी पडेल हें उघडच आहे, म्हणून अन्य ठिकाणीं लहान व्यवहाराकरितां अन्य खाद्याचा उपयोग करितात. उदाहरणार्थ, कांहीं ठिकाणीं सुकवलेले मासे, आणि कांहीं ठिकाणीं धान्य यांचा उपयोग नाणें म्हणून करितात. पूर्वी झांजिबारमध्यें टामा नामक जोंधळ्यासारख्या धान्याचा लहान किमतीचें नाणें किंवा मोड म्हणून उपयोग करीत. मोंगोलियामध्यें चहाच्या मोठाल्या वड्या बनवून त्यांचाच नाण्याच्या ऐवजीं उपयोग करितात. त्या विटांच्या आकाराच्या असल्यामुळें त्यांस 'चहाच्या विटा' म्हणून म्हणतात. म्हणून बाजारांत खेरदीस जातांना ह्या विटांचें पोतें पाठीवर टाकून जावें लागतें. सुलू बेटांत ह्या कामीं तंबाकूचा उपयोग करितात. बरब्रिज म्हणतो कीं, सुलू लोकांस आपल्या दे-

प्रकरण आठवें

साहाय्यकारी विनिमय

३५. नाण्याच्या अभावीं श्रम व काळ ह्यांचा किती मोठा व्यय करावा लागतो हें क्यामेरानें आफ्रिकेमधील आपल्या प्रवासवर्णनांत चांगलें दाखविलेलें आहे. त्याच्या मनांत कावेली येथें एक होडी भाड्यानें घ्यावयाची होती. होडीच्या मालकाला मोबदला हस्तिदंत पाहिजे होता; तेव्हां त्यासंबंधानें क्यामेरान म्हणतोः– "माझ्याजवळ हस्तिदंत मुळींच नव्हता; पण महमद इबन सालिब ह्याच्यापाशीं असून त्यास कपडा पाहिजे होता. तो माझ्यापाशीं नसून महमद इबन परीब ह्याच्यापाशीं होता, व त्यास त्याबद्दल तार पाहिजे होती. सुदैवानें ती माझ्यापाशीं होती. म्हणून मी त्याला घ्यावयाची तितकी तार दिली, तेव्हा त्यानें सालिबला कपडा दिला, त्यानें होडीवाल्याला हस्तिदंत दिला, आणि मग मला ती होडी वापरावयास मिळाली". आतां अशा अडचणी पडूं लागल्या म्हणजे नाण्याची जरूरी भासूं लागलीच पाहिजे. आतां हें नाणें कशाचें करावयाचें हें स्थल व परिस्थिति ह्यांवर अवलंबून राहतें, पण तें कशाचेंहि बनवलेलें असलें तरी, पोषण, संरक्षण, आणि संभूषण ह्या ज्या तीन मुख्य गरजा त्यांपैकीं एकीची तरी भागवणी त्या पदार्थानें होत असते.

सजीव किंवा निर्जीव खाद्य मोजतां येण्यासारखें असल्यामुळें त्याचा प्रारंभीं नाणें म्हणून उपयोग करि-

तात. दक्षिण आफ्रिकेंतील धनगरी जातींमध्यें गुरांचे कळप ही माणसांची मुख्य मालमत्ता असते. आणि म्हणून त्यांच्यांत बायका व गुलाम ह्यांच्या किंमती गुरांच्या रूपानें देत असतात. प्राचीन धनगरी जातींमध्यें गुरें हेंच नाणें असे हें इंग्रजींत धनहीन ह्यास "impecunious" म्हणून जो शब्द आहे त्याचा अर्थ "ज्याच्यापाशीं गुरें नाहींत असा" असा आहे ह्यावरून देखील दिसून येतें. रामन लोकांमध्यें गुरें हेंच प्राथमिक नाणें असे असें मामसेन सांगतो. पुढें त्यांच्यांतहि नाणें तेथें सुरू झालें. प्राचीन इंग्रजांमध्यें बैल हें नाणें असे, आणि वेल्शलोकांमध्यें तें बऱ्हें बराच काळ सुरू राहिलें.

आतां हें गुरांचें नाणें मोठ्या व्यवहारासच उपयोगी पडेल हें उघडच आहे, म्हणून अन्य ठिकाणीं लहान व्यवहाराकरितां अन्य खाद्याचा उपयोग करितात. उदाहरणार्थ, कांहीं ठिकाणीं सुकवलेले मासे, आणि कांहीं ठिकाणीं धान्य यांचा उपयोग नाणें म्हणून करितात. पूर्वीं झांजिबारमध्यें टामा नामक जोंधळ्यासारख्या धान्याचा लहान किमतीचें नाणें किंवा मोड म्हणून उपयोग करीत. मोंगोलियामध्यें चहाच्या मोठाल्या वड्या बनवून त्यांचाच नाण्याच्या ऐवजीं उपयोग करितात. त्या विटांच्या आकाराच्या असल्यामुळें त्यांस 'चहाच्या विटा' म्हणून म्हणतात. म्हणून बाजारांत खेरदीस जातांना ह्या विटांचें पोतें पाठीवर टाकून जावें लागतें. सुलू बेटांत ह्या कामीं तंबाकूचा उपयोग करितात. बरब्रिज म्हणतो कीं, सुलू लोकांस आपल्या दे-

शांतील तंबाकूपेक्षां चीन देशांतील हलका तंबाकू ज्यास्त पसंत पडतो, आणि लहान लहान खेड्या करतांना ते हा तंबाकू नाणें म्हणून देतात. आफ्रिकेसारख्या कांहीं ठिकाणीं मसाल्याच्या पदार्थांचा असाच उपयोग करितात. किसामा प्रदेशांत खडकी मिठाच्या खाणी आहेत. ह्या मिठाचे अष्टपैलू तुकडे कापून ते वेताच्या डब्यांतून ठेवितात, व त्यांचा नाण्याप्रमाणें उपयोग करितात. आबिसिनियामध्यें असेंच आहे म्हणून मान्टीरो सांगतो.

एवंच नाण्याच्या प्रारंभींच्या पायरीवर मुख्य जरूरीची गोष्ट ही आहे कीं, तें ज्याचें बनवावयाचें तो पदार्थ सर्वांस पाहिजे असा असला पाहिजे; आणि दुसरी आवश्यक गोष्ट ही कीं त्याचे सामन्यतः सारखे तुकडे पडण्यासारखे असावे.

३६. आतां शरीरसंधारणाच्या खाण्याच्या खालच्या प्रतीच्या वस्तू म्हटल्या म्हणजे उवेचे जिन्नस होत. म्हणून थिंलकीट लोकांमध्यें ऑटर नांवाच्या जलचराचीं कातडीं हीच त्यांची मुख्य मालमत्ता असते, व त्यांचा नाण्याच्या ऐवजीं ते उपयोग करितात. आणि इतरत्र जेथें दुसऱ्या जनावरांचीं कातडीं वापरतात तेथें त्यांचाच नाणीं म्हणून उपयोग करितात.

वरच्याहून अधिक सुधारलेले लोक कापड आणि तें ज्यांचें बनवतात ते पदार्थ नाणें म्हणून उपयोगांत आणितात. उदाहरणार्थ, ग्यारो लोकांमध्यें दोन पौंड वजनाचे कापसाचे गठडे मोड म्हणून उपयोगांत आणतात असें डाल्टन सांगतो कुकी लोकांमध्यें बंगाली लोकांपासून कोंबडीं

घेतलीं म्हणजे त्यांच्या वजनाचा कापूस मोबदला देतात. आफ्रिकेमध्यें नाण्याऐवजीं कपड्याचा उपयोग करितात असें विल्सन म्हणतो. हा कपडा ते हात घालून मोजितात, आणि म्हणून गुरें वगैरे विकावयास ते लोक बाजारांत आले म्हणजे ज्याचे हात लांब असतील असा कोणी माणूस बरोबर घेऊन येतात. व्लांटायरमधील लोकांबद्दल डफ म्याकडोनाल्ड असें सांगतो कीं, त्या लोकांस सोनेंरुपें मुळींच माहीत नाहीं; त्यांस त्यापेक्षां कापडाचीच किंमत जास्त वाटते.

कोठें कोठें नाणीं म्हणून उपयोगांत आणण्याच्या कापडाचे विशिष्ट आकाराचे तुकडे केलेले असून त्यांच्यावर कांहीं सुंदर आकृतीहि काढलेल्या असतात. टर्नर म्हणतो कीं, सामोआमध्यें चांगल्या चटया हच्चि लोकांची अत्यन्त मोलवान मालमत्ता समजली जाते; व त्या ते नाण्याप्रमाणें देतात घेतात. आपल्या ह्या खंडांतील खालकालोकांत रेशमी शेल्यांचा नाण्याच्या ऐवजीं उपयोग करितात, पण त्यांचे नजराणे देत नाहींत; तिबेट व मोंगोलियामध्यें ते नजराणे म्हणून देतात. ह्यावरून नजराण्यांना विनिमयाचें, आणि विनिमयाला नाण्याचें रूप कसें येत जातें हें लक्षांत येत असतें.

३९. आतां आत्मसंरक्षणाच्या ज्या वस्तू, म्हणजे शस्त्रें व आउतें, त्यांचा उपयोग नाण्याप्रमाणें कसा होऊं लागतो हें पाहूं. ज्या कच्चा द्रव्याच्या असल्या वस्तू बनतात त्यांचा प्रथम विनिमय होत असून कधीं कधीं नाण्यासारख्या उपयोग होऊं लागतो. आफ्रिकेच्या कांहीं भागांत लोखंड व तांबें ह्यांचे नियमित

संचय मूल्यमापक झालेले आहेत. वर्टन आपणास सांगतो कीं, बॉनी वगैरे ठिकाणीं 'ऊकाक' किंवा लोखंडाची कांब ही किमतीची मापक असे, हल्लीं तिच्या ऐवजीं तांब्याच्या कांबी उपयोगांत आल्या आहेत. इतर ठिकाणीं हत्यार बनवलेल्या लोखंडाचा किंवा पोलादाचा असाच उपयोग होतो. उदाहरणार्थ, ईशान्य आसाममध्यें डाव हें लोकांचें शस्त्र असून नाणेंहि आहे. आतां शस्त्रांचा उपयोग नाण्याच्या ऐवजीं फारसा होत नाहीं. ह्याचें कारण हें कीं, शस्त्र हें प्रत्येकाजवळ असतेंच. आणि त्यामुळें त्याची जरूरी विशेषशी भासत नाहीं.

आउतांचा उपयोग नाण्याच्या ऐवजीं एके ठिकाणीं तरी करितातसें दिसतें. ख्रिस्तीशकापूर्वी चवथ्या शतकापर्यंत चीन देशांत साध्या धातूंचा वजनानें विनिमय होत असून नाण्यासारखाहि उपयोग होत असे; पण तत्पूर्वी आउतांचें नाणें उत्पन्न झालेलें होतें. ख्रिस्तीशकापूर्वी सातव्या व चवथ्या शतकांच्या दरम्यान कुदळ हें तेथें नाणें होतें. सातव्या शतकांत तांब्याच्या साधारणपणें सारख्या वजनाच्या सुऱ्यांचा उपयोग तेथें कापण्याच्या व मूल्य देणाच्या दोन्ही कामीं करीत. पावडीं आणि माल "पावडीं व कापड" ह्या दोहोंचाहि अर्थ संपत्ति असा असे. म्हणून पुढें हळू हळू नाण्यांप्रमाणें उपयोगांत आणलेल्या हत्यारांचा कापण्याचा भाग कमी कमी होत चालला.

पण चिनी लोकांचीं नाणीं फारच संकीर्ण असत. तेथें ख्रिस्तीशकापूर्वी अकराव्या शतकांत सोन्याचे नि-

यमित वजनाचे घन तुकडे नाणीं म्हणून उपयोगांत आणीत असत. शिवाय तेथें तांब्याच्या आंगठ्यांचा नाणीं म्हणून उपयोग करीत असत. आणि ह्या कड्या किंवा आंगठ्या दोरींत अडकवून नेण्यास ठीक पडे. चिनी लोकांचें हल्लींचें नाणें ह्याच नाण्यापासून उत्पन्न झालें असावेंसें दिसतें.

३८. आतां भूषणसाधनांचा नाण्यांच्या ऐवजीं उपयोग कसा करितात तें पाहूं. शरीरें रंगवून, गोंदून घेऊन, नाक, कान, मनगट, पायाचा घोंटा इत्यादि ठिकाणीं दागिने घालून रानटी लोक आपणांस असें दाखवितात कीं, शारीरिक गरजा पूर्ण किंवा अर्धवट-पणें भागविल्यानंतर त्यांच्या ठिकाणीं अत्यंत उत्कट इच्छा म्हटली म्हणजे इतरांपेक्षां ज्यास्त भूषणें घालून इतरांना आपल्या कह्यांत आणण्याची असते. म्हणून भूषणें आणि भूषणद्रव्यें ह्यांची जरूरी पहिल्यापासून प्रत्येकास वाटलेली आहे आणि ह्या वस्तू नेण्याआणण्यास फार सोईच्या असतात. त्यांचीं नाणीं बनण्यास ही अनुकूल अशी एक गोष्ट आहे. आपण वाचितों कीं, लोखंड व मणी हे थिंलकीट लोकांना इतके आवडतात कीं ते हे पदार्थ मिळविण्यासाठीं आपलीं मुलें देखील मोबदला द्यावयास कबूल होतील; आणि कुचीन व एस्किमो हे जे त्यांच्या शेजारचे लोक त्यांच्या हकीकतीवरून पाहतां ते मण्यांचा भूषणें व नाणीं असा दुबार उपयोग कसा करितात हें दिसून येतें. त्यांच्याविषयीं असें सांगतात कीं, ते मोठे व्यापारी आहेत; त्यांची संपत्ति मणी ही असते, व त्यांचा ते नाण्या-

प्रमाणें उपयोग करितात, आणि त्यांच्यांतील श्रीमान् लोक ह्या मण्यांचीं पेंढींच्या पेंढीं त्यांचे निरनिराळ्या प्रकारचे हार बनवून गळ्यांत लटकवून देतात; ते नाकांत व कानांत शिंपांचीं भूषणें घालितात. ब्यांक्राफ्ट सांगतो कीं, क्यालिफोर्नियनलोकांमध्यें देखील शिंपांचें नाणें मुख्यत्वेंकरून चालतें. ह्या शिंपा एक ते दोन इंच लांब असून त्यांची किंमत त्यांच्या लांबीवर अवलंबून असते. पालिनिशियामध्यें असेंच आहे. पॉवेल म्हणतो कीं, न्यूब्रिटनमध्यें तेथील लोकांचें नाणें कवड्यांच्या शिंपांचें बनलेलें असून त्या वेताच्या तुकड्यांत ओंवलेल्या असतात. आणि कूट म्हणतो कीं, सालोमन-बेटवाल्यांमध्यें ह्या कवड्यांच्या माळा तांबड्या व पांढऱ्या रंगाच्या असतात. त्यांच्याहून ज्यास्त किंमतीचें नाणें म्हटलें म्हणजे कुत्र्याचे दांत हें होय; त्यांची किंमत ते सोन्याप्रमाणें समजतात; आणि ज्याच्यापाशीं ते पुष्कळ असतील तो त्यांस भोंकें पाडून त्यांचा पट्टा बनवून तो आपल्या गळ्यास बांधितो. चीन देशांत प्रारंभीं असेंच असे, आफ्रिकेमध्यें अद्यापहि सर्वत्र असेंच आहे. बेट्झ म्हणतो की, नीग्रो लोक कवड्यांचा उपयोग नाण्यांप्रमाणें करीत असून काफिर, हाटेंटांट, हसनी-आरब लोक त्यांचा दागिन्यांप्रमाणें उपयोग करितात.

भूषणांना नाण्यांचें स्वरूप जसें येत जातें तसें त्यांचें मूल्य कमजास्त ठरणें हें मुख्यत्वेंकरून तीं तयार करण्यास किंवा शोधून काढण्यास जे श्रम पडतात त्यांजवर अवलंबून राहूं लागतें. न्यूहेब्रिडिसमध्यें चटया टांगून खालीं विस्तव सारखा पेटविलेला ठेवून त्यांजवर

काजळीचा सारखा चकचकीत थर उत्पन्न करितात, आणि ह्या चट्या मोलवान म्हणून समजतात, असें कूट सांगतो, ह्यावरून वरील गोष्ट स्पष्टपणें दिसून येते. ह्यावरून सोनें व रुपें ह्यांस इतकें मूल्यवान् कां समजतात हेंहि स्पष्ट होतें. तें त्यांच्या सौंदर्यावरून नव्हे, तर ते धातू मिळविण्यास जे श्रम पडतात त्यावरून होय. नाहीं तर आल्युमिनम ब्राँझ ही धातु सोन्याइतकीच चकचकीत आहे, आणि पॅस्ट नांवाची काच व हिरा सारखींच तेजस्वी आहेत. पण पहिल्यास दुसऱ्याइतके श्रम पडत नाहींत, व म्हणून मोलवान समजत नाहींत.

३९. मूल्यवान् धातूंचा उपयोग प्रथम भूषणासाठीं होत असून त्यांचें नाणें बनण्याच्या अगोदर तीं मोजण्याच्या योग्य सरणी स्थापन करणें अवश्य होतें. भूषणांचाच नाणीं म्हणून जेव्हां उपयोग करितात तेव्हां देखील त्यांची किंमत मोजणीवरूनच ठरवितात हें अगोदर आपल्या नजरेस आलेंच आहे. उदाहरणार्थ, शिंपांच्या माळांची किंमत त्यांच्या अमुक हात किंवा विती इत्यादि लांबीवरून ठरवितात. ही सरणी धातूंना लागू करतां येत नसल्यामुळें त्यांचें मूल्य वजनावरून ठरविणें भाग पडूं लागलें, व हें वजन करणें ताजवा निघाला तेव्हांच शक्य झालें. पण वजनाचीं मापें गुंज, वाल, इत्यादि सेंद्रियपदार्थांचींच प्रथम बनल्यामुळें सोनें व रुपें यांचे विशिष्ट वजनाचे तुकडे हीं किंमतीचीं मापें बनलीं. पुष्कळ काळपर्यंत दर सौद्याच्या वेळीं हे तुकडे प्रत्यक्ष वजन करून देत घेत असत; उदाह-

रणार्थ, इजिप्शन लोकांमध्यें; त्यांना नाणीं पाडण्याची युक्ति कधीं सुचली नाहीं.

पुढें जेव्हां नाणीं निघालीं तेव्हां प्रथम तीं एकाच नांवाचीं पण निरनिराळ्या वजनाचीं अशीं निघालीं; कारण, तीं सरकारानें काढलेलीं नसून खासगी व्यक्तींनीं किंवा मंडळ्यांनीं काढिलेलीं असत. पुढें जेव्हां तीं सरकार काढूं लागलें तेव्हां त्यांचीं वजनें व किमती निश्चित होऊं लागल्या, आणि कांहीं राजांनीं नाणीं हलक्या धातूचीं काढल्यामुळें जरी कधींकधीं मोठीं अनिष्टें उत्पन्न होत, तरी एकाच वजनाचीं व किमतीचीं नाणीं असणें ह्यापासून होणारा फायदा कायमच राही.

पण नाणीं निघाल्यापासून मुख्य फायदा हा झाला कीं, जिनसांचें विभजन फारच वाढलें व सुलभ झालें. बहुतेक प्रकारचे सौदे करण्यापुरता पैका खिशांतून किंवा पिशवींतून नेतां येऊं लागला. विकण्याच्या व विकत घेण्याच्या वस्तूंचीं मूल्यें निश्चितपणें ठरवतां येऊं लागलीं. म्हणजे ठराविक किमतीची उत्पत्ति झाली. निरनिराळ्या प्रकारच्या श्रमांबद्दल काय मजुऱ्या द्यावयाच्या हें सर्वांस कळूं लागलें. आणि सर्वांत विशेष सोय ही झाली कीं, आपल्यापाशीं विकावयास असलेला जिन्नस कोणास पाहिजे हें शोधून काढीत बसण्याची जी विभजनास येणारी मुख्य अडचण ती अगदीं नाहींशी झाली. शिवाय, मालांच्या किमती ठरून जाऊन सर्वांस माहीत झाल्यामुळें देवघेव करणारांमधील सौदे पूर्वीं जे अनिश्चित किमतींनीं होत, तो अनिश्चितपणा बराचसा नाहींसा झाला. शेवटचा फायदा हा

झाला कीं, ठराविक किमतीमुळें चढाओढीस जागा उत्पन्न झाली. कारण किमतीची तुलना करून जेथें जिन्नस स्वस्त मिळेल तेथें घेतां येऊं लागला; आणि त्यामुळें जो तो आपला माल कमी खर्चानें उत्पन्न करण्याची व ठिकठिकाणीं नेण्याची खटपट करूं लागला.

४०. विनिमयसाधनांची वाढ अशीच मुकाट्यानें आणखीहि झालेली आहे. विनिमयाच्या कामीं पूर्वीं उपयोगांत आणिलेल्या वस्तूंपेक्षां नाणीं जरी फारच कमी अवजड असलीं तरी मोठाले सौदे करण्याच्या कामीं तीं अवजडच होत. शिवाय, खासगी टांकसाळी काढून टाकिल्यावर राजांनीं नाणीं हलक्या धातूंचीं काढावीं, किंवा तीं कातरून अथवा घांसून कमी किमतीचीं बनवावीं ह्या गोष्टी सुरू असल्यामुळें त्यांचें वजन करणें व त्यांजबद्दल तंटे उत्पन्न होणें इत्यादि गोष्टी कायमच राहिल्या. ह्या नाण्यांत आणखी एक व्यंग ह्याहूनहि मोठें होतें. तें हें कीं, नाण्याच्या रूपानें किमती द्यावयाच्या त्या लागल्याच द्याव्या लागत; आणि त्यामुळें पुष्कळ सौदे व्हावयाचे बंद होत. ही अडचण काढून टाकण्यासाठीं अपुऱ्या सौद्यांची, म्हणजे आधीं माल देऊन मग किंमत देण्याची किंवा आधीं किंमत देऊन मग माल देण्याची पद्धति सुरू झाली; म्हणजे, उधारीची व चिठ्ठी लिहून देण्याची पद्धति सुरू झाली. माल देणारा किंवा पैसा देणारा गिऱ्हाइकापासून किंवा दुकानदारापासून तो घेतल्याची पावती देऊन योग्य किंमत किंवा माल पुढें केव्हां तरी किंवा ठराविक वेळीं दे-

ण्याचें अभिवचन देऊं लागला. ह्यापासून पुढें कागदी नाण्याची किंवा नोटांची पद्धति उत्पन्न झाली.

नोटींच्या योगानें रोख किंमत देण्याची व किंमत बरोबर सहजपणें नेण्याची ह्या दोन गरजा भागण्या-व्यतिरिक्त दुसऱ्या आणखी दोन गरजा भागावयास लागल्या. इटालीमध्यें ज्या काळीं नाणीं इतकीं निर-निराळ्या प्रकारचीं असत कीं, त्यांचें वजन करण्यास व तीं खरीं-खोटीं पहाण्यास फार वेळ लागत असे, त्या काळीं तसलीं बरींच नाणीं त्यांचें वजन ठरवून एखाद्याच्या ताब्यांत देऊन त्याची चिठ्ठी घेण्याची वहि-वाट सुरू झाली, व ज्याला पैसे द्यावयाचे असतील त्यास ती देण्याची चाल सुरू झाली. इंग्लंदमध्यें व्या-पारी लोक आपले पैसे टॉवर नामक इमारतींत ठेवीत असून पहिल्या चार्लस राजानें जेव्हां तेथून एकदां दोन लाख पौंड उपटले तेव्हांपासून ते आपला पैसा आ-पल्या सोनारांच्या भुयारांतून ठेवूं लागले, व त्याऐवजीं त्यांच्या चिठ्या घेऊं लागले. ह्याचा उपयोग देणीं दे-ण्याच्या कामीं ते करूं लागले. पुढें ह्या चिठ्यांस व्यापा-राच्या सोईसाठीं चिठींतील रकम नांव न घालतां ती ज्याच्यापाशीं असेल त्यास देण्याच्या चिठ्यांचें किंवा ब्यांकनोटांचें स्वरूप आलें.

ह्याच्या पुढची वाढ म्हटली म्हणजे ब्यांकांचे चेक ही होय. ही पद्धति इंग्लंदांत पुष्कळ दिवस सुरू असून यूरोपांतील इतर देशांत नुक्तीच सुरू झाली आहे. इंग्लं-दांत हे चेक नोटांप्रमाणेंच त्या त्या ठिकाणीं चालतात. ह्याशिवाय ब्यापाऱ्यांस चोपडींत लिहून देऊन उधारी

व्यापाराची पद्धति अमलांत आलेली आहे. ह्याच्या योगानें एकमेकांशीं सौदा करणाऱ्या व्यापाऱ्यांस रोकड पैसे न देतां वर्ष सहा महिने व्यापार करून अखेरीस हिशेब करून निघेल त्या देण्याघेण्याचा निकाल करतां येतो; व हे निकालहि चेक देऊनच करतां येतात.

हल्लींचे सगळे मोठाले सौदे आणि बरेच लहान सौदे ह्या पतपद्धतीच्या धर्तीवर चालतात. एखाद्या व्यापाऱ्याचा व्यांकेशीं असलेला हिशेब पाहिला तर तो त्याच्या देण्याघेण्यांचा हिशेब असतो, आणि हीं देणींघेणीं एकमेकांत सारखीं वजा जात असून त्यांचा मेळ बसत असतो. हल्लीं ह्या पद्धतीची वाढ इतकी झालेली आहे कीं, लंदन सारख्या ठिकाणीं निरनिराळ्या व्यापाऱ्यांच्या ह्या देण्याघेण्यांचा हिशेब दिवसांतून तीनदां होत असतो.

समाजांमध्यें उत्क्रमणाचीं जीं निरनिराळीं उदाहरणें दृष्टीस पडतात, त्यांमध्यें ह्या रानट्यांस एकमेकांनीं देण्याच्या नजराण्यांपासून तों लाखों लोकांच्या व्यापारी सौद्यांचा मेळ थोड्याशा कारकुनांनीं लंदनांतील एका हपीसांत करीत जाण्यापर्यंतचें जें हें उत्क्रमणाचें उदाहरण त्याच्या इतकें मासलेवाईक उदाहरण दुसरें कचितच असेल.

प्रकरण नववें

परस्परावलंबन आणि संकलन

४१. औद्योगिक विभिन्नीकरणाबरोबर जें औद्योगिक संकलन होत गेलें आहे त्याला बराचसा उल्लेख गेल्या सहा प्रकरणांत गर्भितरीत्या आलेला आहे. म्हणून सामाजिक उत्क्रमणाच्या ह्या विशेषाचीं मुद्दाम उदाहरणें देऊन त्याच्यावर जोर देण्यापूर्वी ह्या उल्लेखांची गोळा-बेरीज करून दाखविणें इष्ट दिसतें.

लोखंडाचे कारखाने असले तर पिकांव, पावडीं, आणि धातूच्या पत्र्याला भोंकें पाडण्याची सळई इत्यादि करणें शक्य होतें. हीं हत्यारें आणि इतरत्र तयार केलेली सुरंगाची दारू व डिनामिट यांच्या संयोगावर खाणीचें काम अवलंबून राहतें. खाणींतून काढिलेले निरनिराळे धातू व कोळसे यांच्यामुळेंच हत्यारें व उडणारीं द्रव्यें हीं बनवतां येतात. एवंच ह्या निरनिराळ्या वस्तूंची उत्पत्ति एकमेकींवर अवलंबून आहे; आणि एकंदर वस्तूंच्या उत्पत्तीचें असेंच आहे. ह्या उत्पादनसरणींप्रमाणेंच विभजनसरणीहि एकमेकींवर अवलंबून आहेत. कोणत्याहि ठिकाणीं किरकोळ व्यापारसरणी मोठ्या प्रमाणावर असण्यास तिच्या बरोबर तेथें घाऊक व्यापारसरणीहि असलीच पाहिजे; कारण मोठाले पदार्थसंचय त्या ठिकाणीं आल्याशिवाय किरकोळ व्यापाऱ्यांस आपले व्यापार करतां येत नाहींत. वरें,

मालाचें किरकोळ विभजन असेल तरच घाऊक विभजन शक्य होणार; कारण किरकोळ विकणारे नसल्यास घाऊक माल आणणें निरुपयोगी होईल. शिवाय ह्या दोन विभजनसरण्यांची उत्क्रान्ति उत्पादकघटनेच्या उत्क्रान्तीबरोबरच होत असून त्याचें उत्क्रमणाहि त्यांच्यावर अवलंबून असतें. आतां विभजन मोठ्या प्रमाणावर होण्यास रस्ते, वहनें, कालवे, होड्या, जहाजें, हीं असलींच पाहिजेत, आणि त्यांचीहि उत्पत्ति जसजसे निरनिराळे जिन्नस ज्यास्त ज्यास्त उत्पन्न होत जातील तशीच होणार; बरें, ह्या जिनसांच्या उत्पत्तीची वाढ निरनिराळ्या जिनसांचें निरनिराळ्या ठिकाणीं विभजन होणें ह्या गोष्टीवरच अवलंबून असणार. शिवाय ह्या दोन्ही प्रकारच्या काळीं विनिमयाच्या ऐवजीं क्रयविक्रय उत्पन्न होण्याचें साधन पक्क होत जाणें ह्याच्यावर अवलंबून असणार. नाण्याची चांगली पद्धति सुरू झाली म्हणजे विनिमयाच्या मार्गांतील अडचणी नाहींशा होतात; वस्तूच्या परस्परसापेक्ष किमती ठरवतां येतात; चालू किमती लक्षांत घेतां येतात; त्यामुळें चढाओढ उत्पन्न होऊन जिन्नस स्वस्त व मोठ्या प्रमाणावर होऊन त्याची जातहि सुधारूं लागते. आणि अशा रीतीनें उत्पादन व विभजन सुलभ होण्यास विनिमयसाधनाचें विभिन्नीकरण व पक्कीभवन व्हावें लागतें; कारण, धातूच्या नाण्याला निरनिराळ्या प्रकारच्या कागदी नाण्याची जोड दिल्याखेरीज मोठाले व दूरवरचे असे जे व्यापारी सौदे त्यांस अडथळा येतो.

एवंच हें परस्परावलंबन किती मोठें झालें आहे तें

पहा. निरानिराळ्या प्रकारचीं उत्पन्नें एकमेकांस सहाय्य करितात. विभजनाला लागणारे रस्ते व वहनें ह्यांसंबंधानें तें अनेकप्रकारच्या उत्पन्नांवर अवलंबून असून त्याच्या योगानें उत्पादन विपुल व विविध होतें. इकडे नाण्याची सरणी वाढून विभिन्नीकरण पावेल तशीच उत्पादनास मदत होऊन विभजनाचें प्रमाण वाढत जातें. एवंच हे व्यापार चालविणाऱ्या घटना परस्परांच्या प्रभावानें ज्यास्त ज्यास्त संकलन पावत जातात.

४२. पण ह्या संकलनाची बरोबर कल्पना येण्यास त्याचे जे याहून विशिष्ट असे इतर प्रादुर्भाव ते ध्यानांत घेतले पाहिजेत.

ह्यांतील पहिला प्रादुर्भाव म्हटला म्हणजे निरानिराळ्या सरण्यांची आणि साधनांची ज्यास्त व्यापक आणि विविध रीतींनीं सहाक्रिया हा होय. घरांतील मोलकरीण चिंध्यांची केरसुणी वाटोळी फिरवून पाणी कसें काढून टाकिते हें पाहून कोणाच्या असें लक्षांत आलें असलें पाहिजे कीं, मध्योत्सारिणी शक्तीच्या योगानें अनेक वस्तू सुकवितां येतील, व दुसऱ्या कांहीं पृथक् करतां येतील. हा विचार त्याच्या मनांत आल्यापासून जे परिणाम झाले त्यांतील कांहीं एथें सांगतों. ओल्या साखरेचे गोळे सभोंवार चाळणीसारखीं छिद्रें पाडलेल्या वाटोळ्या फिरणाऱ्या नगाऱ्यांत घातले असतां त्यांना चिकटलेला पाक सुटा होतो, आणि ते शुष्क होतात. भिजलेले कपडे असल्या नगाऱ्यांत घालून वाटोळे फिरविले म्हणजे त्यांच्यांतील बहुतेक पाणी निघून जातें, आणि केवळ ओलेपणा तेवढा शिल्लक रहातो. आणि

हल्लीं ह्याच पद्धतीनें दुधांतील कमी पातळ भाग (लोणी) ज्यास्त पातळ भागापासून पृथक् करितात.

असल्या उदाहरणांत पूर्वीं उपयोगांत आणिलेल्या सरण्या सुलभ करणारी नवी सरणी त्यांजपासून भिन्न असते. पण दुसऱ्या कांहीं उदाहरणांत नवी सरणी जुन्यांशीं इतकी संकलित झालेली असते कीं, ती त्यांच्यांतून निघालेली म्हणून दिसते. उदाहरणार्थ, आंतून जाणारा हवेचा प्रवाह गरम करणारें एथें एक यंत्र आहे. त्याच्या एका टोंकास ही हवा त्या यंत्रांत जोरानें घालविण्यास वाफेच्या यंत्रानें काम करणारा एक पंप आहे, आणि दुसऱ्या टोंकास त्या गरम झालेल्या हवेचा प्रवाह लोखंडाच्या भट्टींत घालणारी एक फुंकणी आहे. अशा रीतीनें भट्टींत थंड हवा गेल्यानें ती जितकी तापावयाची त्याहून उष्ण हवेनें ज्यास्त तापते, आणि लोखंड तितकें ज्यास्त वितळतें. आणि हल्लीं या यंत्रांत आणखी सुधारणा झाली आहे. ती ही कीं, ह्या वितळलेल्या लोखंडास पुनः तापवून कांबीच्या लोखंडाचें स्वरूप देण्याच्या ऐवजीं हें वितळलेलें लोखंड कांबीचें बनण्याच्या भट्टींत एकदम वाहून जावें अशी योजना त्याच यंत्रांत नवीन केली आहे; ह्यामुळें ओतींव लोखंड पुनः तापविण्यास लागणारे कोळसे वांचतात.एवंच ह्या ठिकाणीं तीन प्रकारचीं यंत्रें एकत्र जोडलेलें नवें यंत्र बनविलेलें आहे.

पण निरनिराळ्या योजनांच्या सहक्रियेचें उत्तम उदाहरण म्हटलें म्हणजे यंत्रांची वाढ हें होय. पूर्वी तरफ, उतरण, पाचर, स्क्रू, चाक. फिरकी इत्यादि यांत्रिक

शक्तींचा उपयोग पृथक् पृथक्च करीत असत; पण पुढें हळू हळू त्यांच्या संयोगानें ज्यांस आपण यंत्रें म्हणून म्हणतों त्यांची उत्पत्ति झाली. कारण पाणचक्की, माग, वाफेचें यंत्र, छापखाना, इत्यादि यंत्रांत ह्या यांत्रिक शक्ती अनेक कारणांसाठीं अनेक रीतींनीं संयुक्त झालेल्या असतात. पूर्वीच्या यंत्रांची हल्लींच्या यंत्रांशीं तुलना करतां असें दिसतें कीं, त्यांची संमिश्रता वाढविल्यानें तीं ज्यास्त ज्यास्त संमिश्र अशा उत्पादनक्रियांस योग्य बनलेलीं आहेत.

हल्लींच्या कालाची वैशेषिक अशी एक पुढची पायरी एथें सांगितली पाहिजे. ती ही कीं, एकाच यंत्रांत संकलित केलेल्या अनेक योजनांच्या सहक्रियेव्यतिरिक्त हल्लीं अनेक यंत्रांची सहक्रिया आपल्या नजरेस येते. वर्तमानपत्राच्या छापखान्यांत, व विशेषतः कागद तयार करण्याच्या भागांत, याचें उदाहरण दृष्टीस पडतें. कागद तयार करण्याची जुनी पद्धति अशी होती कीं, एक चाळणीसारखें ताट घेऊन तें चिंध्यांच्या वगैरे कुट्टून तयार केलेल्या पातळ लगद्यांत बुडवावयाचें, मग तें बाहेर काढावयाचें, व त्यांतील पाणी निघून जावें म्हणून एकीकडे ठेवावयाचें, त्यांतील ओला थर सुटा करावयाचा, आणि नंतर निघालेला कागद दाबावयाचा व कापावयाचा. ह्या ऐवजीं हल्लीं कागद करण्याचें यंत्र वाफेनें चालतें; त्यामध्यें लगद्यापासून सारखें वाटोळें फिरणारें कागदाचें जाळें निघत असल्यामुळें थोड्याच वेळांत त्यांतील बहुतेक ओलावा निघून जातो, शिलक राहिलेला ओलावा पिळून निघावा म्ह-

णून तो चक्रांमध्यें जाऊन वाटोळा फिरतो, नंतर तो तापविलेल्या रुळावरून गरगर फिरून वाळतो, आणि नंतर त्याचे तुकडे पडतात, किंवा लांबच्या लांब गुंडाळें निघतें. हें गुंडाळें वर्तमानपत्रांसाठीं हवें असेल, तर तें एक-दोन मैल लांबीचें घेऊन छापण्याच्या यंत्राला अडकविलें जातें. हें यंत्र वाफेच्या योगानें चालत असून हा एकसंधी कागद तें आपल्यांत सारखा ओढून घेतें, तो एकदां एका बाजूनें आणि पुनः दुसऱ्या बाजूनें छापून काढून पलीकडे टाकून देतें, तेथें त्याचे दुसऱ्या एका यंत्रानें कापून निवून वर्तमानपत्राचे निरनिराळे कागद पडतात, व कोठें कोठें त्यांची घडीहि पडते. कागद तयार करण्यास योग्य पाण्याचा बराच पुरवठा लागत असून जागाहि बरीच लागत असल्यामुळें जेथें वर्तमानपत्र छापितात तेथें तो बहुधा तयार करीत नाहींत, परंतु जाग्याची व पाण्याची अडचण नसल्यास एकमेकांशीं जोडलेल्या अनेक यंत्रांच्या एका टोंकास पातळ लगद्याचा प्रवाह सोडावयाचा आणि दुसऱ्या टोंकास छापून घडी केलेलें वर्तमानपत्र घ्यावयाचें, अशी व्यवस्था करतां येईल.

हें जें साधनांच्या सहक्रियेचें उदाहरण—हें जें यंत्रांचें संकलन—तें एकंदर औद्योगिकसंघटनेमध्यें दिसणारीं जीं ह्याहून ज्यास्त व्यापक पण कमी स्पष्ट अशीं संकलनें त्यांचा नमुना ह्या दृष्टीनें आपण त्याकडे एथें पाहिलें पाहिजे.

४२. फोड करून पहाण्याच्या पूर्वी आपल्याला असें वाटत असतें कीं, कोणत्याहि उपयुक्त किंवा चै-

नीच्या वस्तूचा जो बाहेरून दिसणारा कारखानदार असतो तोच ती सर्वथा उत्पन्न करीत असतो. इतर कित्येक माणसें जीं उपादानें तयार करून त्यास पुरवितात त्यांची तो बहुधा केवळ जुळणी करीत असतो हें आपण विसरतों. ह्याचें खरोखरच प्रथम हातीं येणारें, ह्या पुस्तकाचें उदाहरण घेऊं. ही चीज पैदा करण्यास निरनिराळ्या ठिकाणीं पसरलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या कामकऱ्यांनीं हातभार लाविलेला आहे. उदाहरणार्थ, त्याचा मुख्य घटक कागद हा एके ठिकाणीं केलेला आहे, छापण्याची शाई दुसरे ठिकाणीं केलेली आहे, आणि छापण्याचें यंत्र तिसरे ठिकाणीं केलेलें आहे; परंतु ह्या गोष्टी एकीकडे ठेवून त्याचे छापलेले फर्मे बुक बांधणाराकडे पाठविले एथून सुरवात करून त्यांची जुळणी करण्यास कोणाकडून कशी मदत होते हें आपण पाहूं. जुन्या दोऱ्यांचा लगदा करून बनविलेले घट्ट पुठ्ठे एक कारखानदार पाठवितो; दुसऱ्याकडून बुकाच्या पाठीला लागणारा मजबूत पण लवचीक विणीचा पुठ्ठा येतो; दुसऱ्यांकडून फर्मे शिवण्यास लागणारा दोरा, फर्मे एकत्र शिवण्यास लागणारी सुतळी, त्यांच्या एकत्र जुळलेल्या पाठी एकमेकांस चिकटून राहाव्या म्हणून त्यांस लावावयाचा सरस, पुठ्यावर पसरावयाचें रंगीत कापड—जें करावयास विणकरी व रंगारी हे दोघे लागत असतात—आणि सोनेरी अक्षरांनीं नांव छापलें असल्यास त्यासाठीं लागणारा सोन्याचा वर्ख, हीं येतात. शिवाय ही गोष्ट ध्यानांत आणा कीं, ह्याखेरीज प्रत्येक मिनिटास ह्या कामीं इतर कारखा-

नीच्या वस्तूचा जो बाहेरून दिसणारा कारखानदार असतो तोच ती सर्वथा उत्पन्न करीत असतो. इतर कित्येक माणसें जीं उपादानें तयार करून त्यास पुरवितात त्यांची तो बहुधा केवळ जुळणी करीत असतो हें आपण विसरतों. ह्याचें खरोखरच प्रथम हातीं येणारें, ह्या पुस्तकाचें उदाहरण घेऊं. ही चीज पैदा करण्यास निरनिराळ्या ठिकाणीं पसरलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या कामकऱ्यांनीं हातभार लाविलेला आहे. उदाहरणार्थ, त्याचा मुख्य घटक कागद हा एके ठिकाणीं केलेला आहे, छापण्याची शाई दुसरे ठिकाणीं केलेली आहे, आणि छापण्याचें यंत्र तिसरे ठिकाणीं केलेलें आहे; परंतु ह्या गोष्टी एकीकडे ठेवून त्याचे छापलेले फर्मे बुक बांधणाराकडे पाठविले एथून सुरवात करून त्यांची जुळणी करण्यास कोणाकडून कशी मदत होते हें आपण पाहूं. जुन्या दोऱ्यांचा लगदा करून बनविलेले घट्ट पुठ्ठे एक कारखानदार पाठवितो; दुसऱ्याकडून बुकाच्या पाठीला लागणारा मजबूत पण लवचीक विणीचा पुठ्ठा येतो; दुसऱ्यांकडून फर्मे शिवण्यास लागणारा दोरा, फर्मे एकत्र शिवण्यास लागणारी सुतळी, त्यांच्या एकत्र जुळलेल्या पाठी एकमेकांस चिकटून राहाव्या म्हणून त्यांस लावावयाचा सरस, पुठ्यावर पसरावयाचें रंगीत कापड—जें करावयास विणकरी व रंगारी हे दोघे लागत असतात—आणि सोनेरी अक्षरांनीं नांव छापलें असल्यास त्यासाठीं लागणारा सोन्याचा वर्ख, हीं येतात. शिवाय ही गोष्ट ध्यानांत आणा कीं, ह्याखेरीज प्रत्येक मिनिटास ह्या कामीं इतर कारखा-

नदारांनीं तयार केलेल्या कित्येक हत्यारांची जरूरी लागत असते. हीच स्थिति सर्वत्र आहे—हीच स्थिति आपल्या रहावयाच्या घरांच्या संबंधानें आणि त्यांच्यांतील अनेक वस्तूंपैकीं प्रत्येकीच्या संबंधानें खरी आहे:

एवंच औद्योगिक घटनेंत सर्वत्र एकप्रकारचें जाळें दृष्टीस पडत असून त्या जाळ्याच्या योगानें प्रत्येक कारखान्याचा पुष्कळ इतर कारखान्यांशीं संबंध जोडून दिलेला आहे, व त्या इतर कारखान्यांपैकीं प्रत्येक इतर पुष्कळांशीं जोडलेला आहे; आणि प्रत्येक कारखान्यांत उत्पन्नाचीं अनेक सुतें एकत्र गुंडाळून विशिष्ट प्रकारचें उत्पन्न तयार केलें जात आहे. सारांश, निरनिराळ्या प्रकारच्या अनेक उत्पादकांच्या ठिकाणीं दिसून येणारा जो श्रमविभाग त्याची योग्य कल्पना करणें असल्यास त्यांच्यांतील विभिन्नीकरणाबरोबरच त्यांच्यांतील संकलनहि ध्यानांत घेतलें पाहिजे.

४४. परंतु अद्यापि आपल्यास एक परस्पर-प्रभाव लक्षांत आणिला पाहिजे. प्रत्येक जिनसाची उत्पत्ति बऱ्याच अंशीं दुसऱ्या पुष्कळ जिनसांच्या उत्पत्तीवर अवलंबून असते. इतकेंच नाहीं, तर, उलट, प्रत्येक जिनसाच्या उत्पत्तीचा दुसऱ्या पुष्कळ उत्पन्नांवर परिणाम घडत असतो. म्हणजे, पुष्कळांचा एकावर आणि एकाचा पुष्कळांवर परिणाम घडत असतो.

रबराच्या कृतीकडे पाहिलें म्हणजे ह्याचें नमुनेदार उदाहरण लक्षांत येतें. प्रारंभीं तो हिंदुस्थानांत उत्पन्न होत असून त्याचा [illegible] योग केवळ शिसपेन्सिलीच्या खुणा घांसण्याकडेच ह[illegible] असल्यामुळें त्यास इंग्रजींत

'इंडिया रबर' (हिंदुस्थानांतील घांसणारा) असें नांव पडलें. पण आलीकडे साठसत्तर वर्षांत त्याच्यापासून घरगुती व खासगी उपयोगाचे पुष्कळ जिन्नस तयार करूं लागले आहेत इतकेंच नाहीं, तर कित्येक धंद्यांमध्येंहि त्याच्या योगानें सुधारणा झालेली आहे. यंत्रांचे पट्टे, आगीच्या बंबांचे नळ, व इतर पुष्कळ धंद्यांत लागणाऱ्या नळ्या, चामड्याच्या ऐवजीं त्याच्याच करूं लागले आहेत. त्याचा उपयोग आगगाड्यांचे वगैरे बफर, इन्जिनांतील व बंबांतील उघडणारे–मिटणारे पडदे, नळ्यांचे सांधे धुवून काढण्याचे ब्रश, इत्यादि जिन्नस करण्याकडे होऊं लागला आहे, आणि आलीकडे घोडगाड्या व पायगाड्या ह्यांच्या चाकांना त्याचींच वेष्टणें करूं लागले आहेत. अशा रीतीनें रबराच्या तयार करण्यानें पुष्कळ दुसरे पदार्थ तयार करण्याच्या कृतींत फरक झालेला आहे.

'बेसेमर स्टील' नांवाच्या पोलादाच्या कृतीचे परिणाम ह्याच्याहून विशेष लक्षांत ठेवण्यासारखे व महत्त्वाचे झालेले आहेत. हा जिन्नस १८५० सालापर्यंत इतका महाग असे कीं, त्याचा उपयोग शस्त्रांचीं पातीं करण्याकडेच तेवढा करीत असत; पण त्याचा उपयोग हल्लीं लढाईचीं चिलखती जहाजें, जलद जाणाऱ्या मोठाल्या आगबोटी व इतर जहाजें, तसेच त्यांचे बायलर, पंखे, नांगराचे साखळदंड, नांगर, इत्यादि मोठाल्या वस्तू बनविण्याकडेहि होऊं लागला आहे. ओढावयास लागणारे दोर, दोरखंड आणि मोठाले टांगपूल ह्यांच्या कामीं पोलादाच्या तारेचा फारच उपयोग

करूं लागले आहेत; आणि पूर्वीपेक्षां ज्यास्त मोठें नद्यांवरील व दऱ्यांवरील पूल, पोलादाचे करतां येऊं लागले आहेत. घरांतून बहारें, बहालें, वगैरे लांकडाचीं करण्याच्या ऐवजीं पोलादी करूं लागले आहेंत; आणि न्यूयार्क वगैरे शहरांतून पंधरा-पंधरा वीस-वीस मजली इमारती पोलादाच्या मोठाल्या सांगाड्यांवरच सांवरल्या जात आहेत. दंताळ चाकें, आंस, तरफा, चौकटी, वगैरे सर्व प्रकारच्यां यंत्रांत लोखंडाच्या ऐवजीं पोलादाचा उपयोग करूं लागले आहेत. पेले, तोंटें, वाट्या, कढया, झांकण्या, वगैरे पातळ पोलादी पत्र्याच्या करूं लागले आहेत, आणि जरा जाड पत्र्याच्या कलईच्या ताटल्या त्यांच्याच करितात. १८९२ सालीं एकट्या युनैटेड-स्टेट्समध्यें दोन लाख टन पोलादाचे खिळे तयार झाले. पण नव्या पोलादाचा सर्वांत ज्यास्त परिणाम आगगाड्यांवर झालेला आहे; कारण, आगगाड्यांमध्यें तेणेंकरून अत्यन्त सुधारणा झालेली असून रस्त्याचे रुळांत तर लोखंडाच्या ऐवजीं पोलादाचा उपयोग करूं लागल्यामुळें क्रान्तिच उडून गेलेली आहे.

ह्याच्याहूनहि आणखी परिणाम ह्याचे झालेले आहेत. ह्या स्वस्त रीतीनें तयार केलेल्या पोलादामुळें वर सांगितल्याहून पुष्कळ ज्यास्त कारखान्यांत जशी सुधारणा झालेली आहे तशीच त्याच्या योगानें दुसरीकडेहि सुधारणा झालेली आहे. ह्याचें एक उदाहरण घेऊं. एक पोलादी रूळ सहा लोखंडी रुळांहून ज्यास्त वेळ टिकतो; आणि आगगाडीच्या एकंदर कारखान्यांत झिजलेल्या रुळांच्या ऐवजीं रूळ घालण्याचाच खर्च ज्या-

अर्थी फार असतो, त्याअर्थी पोलादी रूळांचा उपयोग केल्यानें खर्च फार वांचतो, आणि त्यामुळें माणसें व माल नेण्याचे दर कमी करतां येतात; त्यामुळें पुष्कळ जिनसांच्या किमती उतरतात, आणि पूर्वी जे जिन्नस गाडीभाड्याच्या महर्घतेमुळें विशिष्ट ठिकाणीं जाऊं शकत नव्हते तेथें ते जाऊं लागतात. जहाजांमध्यें पोलादाचा उपयोग करूं लागल्यामुळें समुद्रावरून येणाऱ्या मालाच्या किमतींत व प्रसारांत असेच अनेक फेरबदल झालेले आहेत; कारण पोलादी जहाजांत लोखंडी जहाजापेक्षां एकचतुर्थांश माल जास्त नेतां येतो.

४५. ह्या सगळ्यापासून निघणारें तात्पर्य महत्त्वाचें आहे. धंद्यांचें परस्परावलंबन प्रारंभीं दिसतें त्याहून फारच ज्यास्त संमिश्र आहे, आणि त्यांचें संकलन आपणांस एकदम वाटतें त्याहून फारच ज्यास्त निकट आहे. सर्व उद्योग म्हणजे एकप्रकारचें फार गुंतागुतीचें जाळें असून त्याचे मध्य पुष्कळ ठिकाणीं आहेत, आणि त्यांचीं सुतेंहि सर्वत्र पसरलेलीं आहेत; त्यामुळें सर्व उद्योगांचा एकमेकांशीं इतका संबंध येतो कीं, त्यांच्यापैकीं एकांत बराचसा फेरबदल झाल्यास बाकीच्या सर्वांत प्रतिध्वनिरूप फेरबदल होऊन जातात. ज्या फार फार प्राचीनकाळीं दगडाच्या पात्यांचा उपयोग सोंट्यांना आकार देण्याच्या कामीं करीत असत तेव्हपासून जी सहक्रिया सुरू झाली आहे, ती वाढत चालली आहे, आणि त्याबरोबरच कामकऱ्यांची सहक्रियाहि वाढत चालली आहे; ती हर्ली इतकी वाढली आहे कीं, माणसें आणि हत्यारें ह्यांचे ज्याचे भाव एकमेकां-

वर अवलंबून आहेत असें एक जाळें बनून गेलेलें आहे. सारांश, इतर सर्व गोष्टींप्रमाणें ह्या गोष्टींतहि प्रगति जी झालेली आहे ती असंबद्ध समस्वरूपापासून सुसंबद्ध विविधस्वरूपाकडे झालेली आहे.

आपल्या सभोंवतालच्या हजारों गोष्टींकडे नजर न पुरवितां पुष्कळ लोक असें म्हणतात कीं, धंद्यांची संघटना बनवणें आवश्यक आहे. म्हणजे, त्यांस वाटतें कीं, हल्लीं तशी संघटना झालेली नाहीं. हीं सर्व अद्भुत विशिष्टीकरणें आणि हे सर्व अनेक फांद्या फुटलेले संबंध त्यांच्या लक्षांत येत नाहीं; किंवा त्यांपैकीं थोडेसे त्यांच्या लक्षांत आल्यास तें एकंदर संबंधाचे केवळ अत्यन्त सूक्ष्म अंश आहेत हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं.

शरीराच्या पृष्ठभागावर बसलेल्या माशीस त्याच्या अंतर्घटनेची जितकी कल्पना असते, तितकीच सरासरी ह्या लोकांना ज्या सामाजिक घटनेंत ते बुडून गेलेले आहेत तिच्याबद्दलची असते.

प्रकरण दहावें
औद्योगिक नियमन

४६. नियमन हें शासनाचें एक स्वरूप असल्यामुळें त्यांत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जबरीचा समावेश होतो; गुलामाचा मालक गुलामावर करितो ती प्रत्यक्ष जबरी होय; आणि शेतकरी शेतांत काम करणारावर चालवितो ती अप्रत्यक्ष जबरी होय; कारण त्या कामकऱ्यास माहीत असतें कीं, कामांत आळस केल्यास शेतकरी आपल्यास काढून टाकील आणि मग आपल्यास उपासमरीची पाळी येईल. म्हणून त्यांच्या अत्यन्त व्यापक स्वरूपीं सर्व प्रकारचीं नियमनें सजातीयच आहेत; मग ते नियमन करणारे एकमेकांपासून कितीहि भिन्न असोत, नियमनाच्या सरणी कितीहि निरानिराळ्या असोत, आणि नियमनाकडे दुर्लक्ष केल्यापासून होणारे अनर्थ कितीहि विजातीय असोत.

एवंच जबरी ही सगळ्याच नियमनप्रकारांच्या बुडीं जर आहे तर औद्योगिक नियमन आणि राजकीय व धार्मिक नियमन ह्यांमध्यें प्राथमिक संबंध असला पाहिजे. उत्क्रान्तीच्या नियमापासून असें अनुमान निघतें कीं, हीं निरानिराळ्या प्रकारचीं नियमनें प्रारंभीं एकाच नियमनाचे भाग असले पाहिजेत, आणि सामाजिक प्रगतीच्या क्रमामध्यें राजकीय व धार्मिक नियंत्रणें जशीं हळू हळू पृथक् बनलेलीं आहेत, तसें औद्योगिक नियमनहि त्या दोहोंपासून पृथक् बनलेलें आहे.

आणखी एक अनुमान त्यापासून निघतें. ह्या अनेक प्रकारच्या नियमनांमध्यें फरक अवश्यमेवच उत्पन्न होत असतां त्यांबरोबरच ह्या तिहींचेहि प्रारंभींचे विशेष आणि नंतरचे विशेष ह्यांमध्येंहि फेरबदल उत्पन्न झाले पाहिजेत. कारण ते सर्व मानवी स्वभावावरून निश्चित होत असतात, आणि सामाजिक प्रगतीमुळें माणसांत उत्पन्न झालेला कोणताहि सामान्य फेरबदल राजकीय, धार्मिक, आणि औद्योगिक शासनांचे गुणधर्म बदलून व्यक्त होईल. ह्यांपैकीं ह्या किंवा त्या प्रकारच्या शासनाचें जबरीचें स्वरूप जसें कमजास्त कडक होईल तसें इतरांचेंहि कमजास्त कडक होत जातें.

ह्या सामान्य कल्पना बरोबर आहेत असें दाखविणारीं उदाहरणें आतां दिलीं पाहिजेत; आणि नंतर पुढच्या पुढच्या प्रकरणांतून निरूपिल्या जाणाऱ्या औद्योगिक शासनविषयक निरनिराळ्या चमत्कारांचा विचार करीत असतां त्या आपल्या ध्यानांत आपण वागविल्या पाहिजेत.

४७. प्रारंभीं राजकीय आणि औद्योगिक नियमनांचा केंद्र एकच असतो ह्याबद्दलचा पुरावा ज्या रानटी समाजांत शास्ता तोच एकटा व्यापारी असतो तेथें दिसून येतो. उदाहरणार्थ, बारोटसे लोकांविषयीं सर्पाल्पिन्टो लिहितो कीं, त्या लोकांत सर्व व्यापार राजाशींच चालतो, व त्यालाच तो चालविण्याचा अधिकार असतो. ग्रीनलंड लोकांत प्रत्येक खेड्यांतील नाईक मुख्य व्यापारी असतो, व तो फायदा होईल तेव्हां क्रय व विक्रय करीत असतो. मंद्रकस लोकांविषयीं

बेट्स सांगतो कीं, त्यांच्याशीं ज्यास व्यापार करावयाचा असेल त्यानें प्रथम आपला माल लहान लहान नायकांमध्यें वांटून द्यावा लागतो, आणि त्याच्या किमतीसाठीं तीन चार महिने थांबावें लागतें. आणि एलिसच्या वेळीं सॅण्डविच बेटांतील बहुतेक सर्व बंदरांतील व्यापार राजा व नाईक ह्यांनीं आपल्या हातांत घेतलेला होता. प्राचीन युकाटनमध्यें असेंच असे. आकुलनचा मालक आपोम्पोलन ह्याच्या संबंधानें कोर्टिस सांगतो कीं, तो त्या देशांतील सर्वांत धनिक व्यापारी आहे. आतां प्राथमिक शास्ता उत्पादक किंवा व्यापारी असो वा नसो तो बहुधा उद्योगधंद्याचें नियमन करीत असतो. अंगास सांगतो कीं, न्यूझीलंदमधील नाईक शेतकीच्या व घरबांधणीच्या कामांवर देखरेख ठेवीत असत. पूर्वआर्फ्रिकेंत पेरणी किंवा कापणी नायकांच्या परवानगीशिवाय होत नाहीं, आणि ही परवानगी तो आपला फायदा पाहून देत असतो. प्राचीन सान्-साल्व्हेदारमध्यें रोपें लावण्याचा हुकूम करण्याचें काम नायकाचें असे. उदाहरणार्थ, मणिपुरच्या मुरम लोकांमध्यें नायकानें परवानगी दिल्याविना किंवा आपली लावणी पुरी केल्याविना कोणास आपल्या भाताची लावणी करण्याची मुभा नसे. दुसऱ्या ठिकाणांसंबंधानें आपण असें वाचितो कीं, तेथील नाईक उत्पादनाचें नियमन करून शिवाय विनिमयाचेंहि करितात. डूरी म्हणतो कीं, मादागास्कारच्या किनाऱ्यावर राजे किंवा नाईक परकीयांशीं व्यापार कोणत्या अटींवर करावा हें

ठरवितात. आफ्रिकेंतील इड्डा प्रांताबद्दल लेर्ड व ओ-ल्डफील्ड म्हणतात कीं, तेथील लोक आपल्या राजा-च्या परवानगीशिवाय आमच्याशीं कोणताहि व्यापार करूं शकत नसत. पाटागोनियन लोकांची स्थिति अ-शीच असे. ते आपले तीर व धनुकल्या राजाच्या पर-वानगीविना कोणास देत नसत. ह्या ठिकाणीं आम्रखी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, कांहीं जराशा सुधारलेल्या लोकांत उद्यमविषयक शासन राजकीय शासनापासून भिन्न व्हावयास लागलेलें दृष्टीस पडतें. बर्टन आपल्यास सांगतो कीं, व्हिड्डामध्यें एक व्यापारी नाईक आहे; फीजीमध्यें औद्योगिक नाईक आहेत; आणि साकरन डायाक लोकांमध्यें राजकीय-नायकाखेरीज एक व्यापारी नाईक आहे.

ह्या बाबतींत प्राचीन लोकांचे इतिहास हल्लींच्या लोकांच्या इतिहासांशीं जुळतात. रामीसीस नामक राजांच्या कारकीर्दीतील अधिकाऱ्यांच्या यादीकडे पा-हतां ते राजे बराच व्यापार करीत असत असें दिसतें. मूव्हर्स सांगतो कीं, फिनिशियामध्यें परदेशांशीं होणारा बहुतेक घाऊक व्यापार राष्ट्र, राजे, व सरदार ह्यांचे हातीं असे. बैबलांतील उल्लेखांवरून असें दिसतें कीं, राजेलोक व्यापारासाठीं लांब लांब देशीं सफरी करावयास जात. भविष्यवादी इझेकेल म्हणतो कीं, टिरसचा राजा मोठा धूर्त व्यापारी असे. बैबलावरून असेंहि दिसतें कीं, डेव्हिड राजा देखरेख करणारांमा-र्फत मोठालीं पिकें काढीत असे, व गुरेंढोरेंहि बाळगीत असे; आणि सालोमन राजा द्राक्षवेलीचे मळे लावीत

असून शिवाय जल व खुष्कीच्या मार्गानें दांडगा व्यापार चालवीत असे.

४८. सामान्यतः असें म्हणतां येईल कीं, प्राथमिक लोकांमध्यें जो शास्ता बनतो तो सामर्थ्यवान् व शहाणाहि असतो; कारण त्याचा शहाणपणा हा बऱ्याच अंशांनीं त्याच्या अधिकाराचें कारण असतें. म्हणून आपल्यास असें अनुमान करण्यास हरकत नाहीं, कीं त्याचें राजकीय शासन जरी मुख्यत्वेंकरून त्याच्या स्वतःच्या हितास अनुकूल धोरणानें चाललेलें असतें तरी कांहीं अंशीं लोकांच्या हितास अनुकूल असेंहि तें असतें, तद्वतच त्याच्या औद्योगिक शासनाचेंहि धोरण जरी प्रथम स्वतास श्रीमान् करण्याकडे असलें तरी मागाहून आपले लोकहि श्रीमान् करण्याकडे असलें पाहिजे. यावरून असेंहि अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, त्याचें ज्ञान इतरांहून ज्यास्त असल्यामुळें त्याचे हुकूम बहुधा हितकर दिसणारे व कधीं कधीं खरोखरच हितकर असे असले पाहिजेत. म्हणून तो मरून देव बनल्यानंतर त्याच्या सामान्यवर्तनाविषयक आज्ञा जशा पवित्र मानिल्या जातात, तशा उद्यमविषयक आज्ञाहि मानिल्या जातात; म्हणजे, उद्यमविषयक कमज्यास्त धार्मिक शासन उत्पन्न होतें.

हीब्रू लोकांच्या धर्मग्रंथांत आठवड्यांतून एक विश्रांतीचा दिवस ठराविलेला असून, आणि गुलाम व इतर नोकर यांच्या संबंधाचे हुकूम असून उद्योगधंदे कसे चालवावे ह्यासंबंधानें सविस्तर नियम दिलेले आहेत. नांगरणें, पेरणें, आणि कळप राखणें ह्यासंबं-

धाच्या दैविक आज्ञा त्या ग्रंथांत जाहेत. तद्वतच घरें कशीं बांधावीं व वस्त्रें कशीं तयार करावीं ह्यासंबंधानें कांठ केवढाले राखावे एथपर्यंत नियम घालून दिलेले आहेत. ग्रीक लोकांमध्यें ऋतुविषयकांविधी दैविक आज्ञांस अनुसरूनच होत असत. उदाहरणार्थ, काम करणारांनीं केलेलें काम पहाण्यास आणि त्यांस पगार देण्यास महिन्याचा तिसावा दिवस युक्त म्हणून समजत असत. कोंकरें व मेंढे ह्यांची खच्ची करण्यास आणि मेंढवाड्यांत मेंढ्यांस घालण्यास महिन्याचा सहावा दिवस शुभ समजत असत; डुकर आणि बैल ह्यांची खच्ची करण्यास आठवा दिवस, आणि खेचरांची करण्यास बारावा दिवस युक्त समजत; तसेंच धान्याची मळणी घालण्यास आणि सुतारानें लांकडें कापण्यास सतरावा दिवस योग्य समजत. जेथें जेथें पुष्कळ लोक मिळून एकादा उत्सव करितात तेथें तेथें क्रयविक्रय करण्यास संधि सांपडते. जगन्नाथ येथें महारथोत्सवाचेच वेळीं मोठी जत्रा भरत असते. मक्केमध्यें असेंच होतें. आलकॉक म्हणतो कीं, जपानमध्यें असेंच आहे. तेथें निरनिराळ्या उत्सवाचे वेळीं निरनिराळ्या देवळांतून पाळीपाळीनें जत्रा भरत असतात. प्राचीन ग्रीस व रोम एथेंहि असेंच असल्याबद्दल पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, कर्शस सांगतो कीं, ग्रीस देशांत प्राचीनकाळीं क्षेत्राचे ठिकाणीं मोठा व्यापार चालत असे, त्यामुळें इतरत्र बंडाळी होत असली तरी पवित्र बंदरें, पवित्र रस्ते, देवळें ह्या ठिकाणीं शांतता व सुरक्षितता असे. ह्या जत्रांचे ठिकाणीं सृष्टींतील अनेकविध उत्पन्नांची माहिती होई,

आणि तीं देऊन फार फायदा कसा करून घ्यावा हें त्यांस समजे. ह्या ठिकाणीं निरनिराळ्या शहरामध्यें सारख्या दळणवळणाची स्थापना होई, आणि समुद्रापलीकडील जिनसांच्या वखारी स्थापन होत.

ह्याबरोबरच धर्माधिकाऱ्यांच्या आश्रयाखालीं पेंढ्यांची स्थापना झाली. कर्श्यस म्हणतो कीं, देव हे देशांतील पहिले सावकार होत, देवळें पहिल्या पेढ्या होत, आणि धर्माधिकारी हे भांडवलापासून फायदा काय होतो हें समजणारे पहिले लोक होत. व्यापारी आपलें भांडवल पुजाऱ्यांच्या स्वाधीन करितात, कारण, देवळापेक्षां त्या वेळीं अधिक सुरक्षित ठिकाण नसतें; आणि पैसे रिकामे ठेवण्यांत फायदा नाहीं हें समजण्याइतके ते शहाणे असतात. धार्मिक शासन एवढ्याचवर संपत नाहीं; तर शेतीचीं कामें देखील कांहीं विशिष्ट धार्मिक उत्सवांचे काळीं होत असत. रोममध्येंहि असेंच असे. मॉमसेन म्हणतो कीं तेथेंहि आव्हेन्टाईनवरील देवळाच्या उत्सवाचे वेळीं जत्रा भरत असत. शिवाय सणांचे दिवशीं काम करण्याची तेथें मनाई असे. ही मनाई पेरणी पुरी झाल्यावर येणाऱ्या उत्सवांच्या संबंधानें विशेषतः लागू असे; त्या वेळीं केवळ शेतकरी, व त्यांचे मजूर ह्यांनींच विश्रांति घ्यावी असें नसे, तर बैलांकडूनहि त्या वेळीं काम घेण्याची मनाई असे. रोममध्यें द्राक्षें तोडण्यास देखील धर्माधिकाऱ्याची परवानगी घ्यावी लागे; इतकेंच नाहीं तर त्यांना द्राक्षांचा एक घोंस स्वतः तोडून त्या कामास सुरवात करून द्यावी लागे.

तद्धतच नव्या मद्यार्चीं पिपें उघडण्याचें धर्माधिकाऱ्यानें जाहीर केल्याखेरीज तें विकण्याचीहि परवानगी नसे.

ज्यूलोकांमध्यें सावकारांना देवळांतून हाकून दिल्याचा उल्लेख सांपडतो; ह्यावरून त्या लोकांतहि प्रारंभीं व्यापाराची उत्पत्ति देवळांतच झाली असें दिसतें. ह्याचा उद्देश व्यापारी सौद्यांना भट साक्षीदार मिळावे हा असे.

४९. आतां यूरोपच्या उत्तर इतिहासांत औद्योगिक शासन हा राजकीय शासनाचा एक भाग असे ही गोष्ट इतकी प्रसिद्ध आहे कीं, त्याबद्दल उदाहरणें द्यावयास नको. तथापि पूर्वकालीं त्यांचा संयोग किती पूर्ण झालेला असे हें दाखविणें इष्ट दिसतें.

मध्यकालीन दिवसांत प्रथम स्थानिक मुख्य; आणि मागाहून लष्करी जमीनदार ज्या प्रदेशावर कारभार करी तेथून सर्व प्रकारचे जिनसांचा पुरवठा होत असल्यामुळें इतर गोष्टींप्रमाणें उत्पादनपद्धतींवरहि तो आपला ताबा चालवीत असे. शेतगुलाम व सामान्य गुलाम यांच्या पावेतों सर्वांच्या इतर आचरणाप्रमाणें औद्योगिक आचरणावरहि नायकाचें शासन चाले. फ्रान्सांत लष्करी जमीनदारीच्या वेळीं खेडेगांवांतील शेतकीच्या धंद्यांखेरीज शहरांतून व्यापारी–उद्योग सुरू झाले, तेव्हां सरकारचा अधिकार त्यांच्यावरहि चालू झाला. लष्करी जमीनदार गृहस्थ असो, भट असो, राजा असो, मंडळ असो, वा मठ असो, त्याचा अधिकार इतर गोष्टींप्रमाणें उद्योगधंद्यावरहि चाले; म्हणून कोणताहि धंदा करण्याचा व धंदेजमातीचे कारभारी नेमण्याचा हक्क लोकांस त्याच्यापासून विकत घ्यावा

लागे. हल्लीं कांहीं व्यापारांसंबंधानें लेसन (परवाना) घेण्याची जी पद्धति दृष्टीस पडते ती तेव्हां सार्वत्रिक असे. पुढें कित्येक शतकांच्या झगड्यानंतर जमीनदारी-सरकारें जेव्हां एका मुख्य सरकारच्या ताब्यांत गेलीं, तेव्हां तें सरकारहि उत्पादन, विभजन, आणि विनिमय ह्यांच्यावर अनियंत्रित अधिकार चालवूं लागलें. ही सत्ता किती अनियंत्रित असे हें ह्यावरून दिसतें कीं फ्रान्सांत असें मत स्थापन झालें होतें कीं श्रम करण्याचा हक्क हा राजाचा हक्क आहे, व तो लोकांनीं राजापासून विकत घेतला पाहिजे. ह्याबरोबरच तेथें असंख्य औद्योगिक नियम केलेले असून ते अमलांत आणण्यास शेंकडों हपीसर नेमलेले होते; ह्या अतिरेकाचा परिणाम तेथें इतका भयंकर झाला कीं, राज्यक्रांतीच्या पूर्वी उत्पादन व विभजनविषयक संस्था बहुतेक निर्जीव झाल्या होत्या.

इंग्लंदांतहि विकण्याचा हक्क स्वाभाविक नसून तो राजापासून विकत घ्यावा लागे. बाजार भरविण्याचा हक्क हा वंशपरंपरेनें लोकांचा किंवा टोळीचा नसे; तो राजाच्या विशेष हक्कांपैकीं असे. तेथें द्यावयाच्या जकाती व भाडीं सरकारी अधिकारी ठरवीत. व्यापारी शहरास आला म्हणजे त्यास कोणताहि सौदा गुप्तपणें किंवा योग्य मर्यादांच्या बाहेर करण्याची परवानगी नसे; त्यास आपला व्यापार ठरवलेल्या बाजारांत करावा लागे; आणि तेथें देखील त्या शहरांतील लोक देवळांतून सकाळची प्रार्थना करून येऊन त्यांना पाहिजे त्या जिनसांची ते खरेदी करी तोंपावेतों त्यास एकी-

कडे उभें राहवें लागे. नंतर घंटा वाजे, आणि मग बाजारांत जें शिल्लक राहिलें असेल त्यांतून मिळेल तें त्यास घ्यावें लागे. त्याला कांहीं विकावयाचें असेल तें हि तेथेंच विकावें लागे; आणि त्यानें विकावयास आणिलेले धान्य वगैरे खाद्य पदार्थ बेलिफांच्या परवानगीशिवाय परत नेण्याची त्यास मनाई असे.

असल्या प्रकारचे हे हुकूम सर्वत्र आढळून येतात. आणि यावरून प्रारंभीं औद्योगिक शासन राजकीय शासनापासून किती अल्प अंशानें भिन्न होतें हें दिसून येतें.

५०. उद्यमविषयक धार्मिक शासन प्राचीन काळीं जसें मुख्यत्वेंकरून सहजगत्या सुरू झालें तसें तें आधुनिक कालींहि सहजगत्याच उत्पन्न झालेलें आहे. बलिदान आणि पूजा ह्याकरितां माणसें विशिष्टकाळीं विशिष्ट स्थळीं जमा होत आलेलीं आहेत, आणि त्याबरोबर तेथें क्रयविक्रय सुरू झालेला आहे. उत्सवांचीं नांवें आणि जत्रांचीं नांवें कोठें कोठें एकत्र आढळतात ह्यावरून हें स्पष्ट दिसतें. फ्रान्समध्यें अशा रीतीनें क्रयविक्रयसंमेलनांची उत्पत्ति कशी झाली ह्याचें बोर्केलॉटनें चांगलें वर्णन केलेलें आहे. तो म्हणतोः—प्रथम लोक उत्सवाचे ठिकाणीं केवळ भक्तिभावानें येत. मग तेथें जो पहिला क्रयविक्रय सुरू झाला तो खाण्याच्या पदार्थांच्या संबंधानें झाला; कारण इतके लोक जमतील तेथें खाद्याची जरूर लागावयाचीच. नंतर मग आपल्या गांवीं जे धान्य वगैरे पदार्थ मिळत नाहींत किंवा फार महाग मिळतात ते तेथें घेण्याचें लोकांचे मनांत येऊं लागलें. अशा रीतीनें व्यापाराची उत्पत्ति होऊन उत्स-

वाचे वेळीं जत्रा भरूं लागल्या. शालामेल म्हणतो कीं, पारिसमध्यें देवळाच्या सभोंवतालच्या प्रदेशांत बाजार भरत असे; ह्यावरून धार्मिक विधींवरून केवळ तात्कालिक नव्हे तर कायमच्या व्यापाराचीं देखील स्थानें कशीं निश्चित होत हें स्पष्ट दिसतें. पण त्या देशांत व्यापारावर धर्माचें जसें अप्रत्यक्ष वजन असे तसें प्रत्यक्षहि असे; कारण, पुष्कळ ठिकाणीं उपाध्येलोकांचा जत्रांवर अधिकार असे, व उत्सवप्रसंगीं ते त्या जत्रा विधिपूर्वक उघडीत असत.

इंग्लंदच्या प्रारंभींच्या इतिहासांत असलाच पुरावा सांपडतो. तेथें तर देवळेंहि शब्दशः च व्यापारस्थानें झालेलीं आढळून येतात. मिसेस ग्रीन प्राचीन म्युनिसिपालिट्यांच्या कागदपत्रांतील सारांशांत म्हणते:—म्युनिसिपालिटीचे लोक देवळांत सर्व प्रकारच्या कामाकरितां जमत असत, म्हणजे शहरचे हिशेब तपासणें, गांवच्या समाईक जमिनींची वांटणी करणें, मालमत्तेच्या देणग्या देणें, सोजिर भाड्यानें घेणें, किंवा मेयर निवडणें. हीं कामें ते तेथें करीत असत. प्रार्थना चालली असतां म्युनिसिपालिटीनें देवळांत सभा भरूं नये, एतदर्थ उपाध्यानें तीस पैसे दिल्याचें देखील आपण वाचितों. देवळांत व्यापार केल्यानें तें भ्रष्ट होतें हा समज लोकांत लॉड च्या (पहिल्या चार्लस राजाच्या) कारकीर्दीपावेतों उत्पन्न झालेला दिसत नाहीं.

मागें सुचविल्याप्रमाणें हा प्रघात पडण्याचें कारण देवास साक्ष ठेवून देवघेव केल्यानें दिलेली रक्कम किंवा जिन्नस परत येणें ज्यास्त सुरक्षित होतें असें लोकांस

वाटे हें असावें; आणि एका काळीं बाजारांत देवघेवीचे व्यापार जसे दिवाणी कामदारांसमक्ष होत असत, तसे पूर्वी कदाचित् कोठें भटांसमक्ष होत असावे.

हें जें धर्माकडून होणारें उद्योगधंद्याचें अप्रत्यक्ष नियमन त्याखेरीज प्रत्यक्ष नियमनहि होत असे. उदाहरणार्थ, रविवार, सणाचे दिवस, आणि संतांचे दिवस ह्या दिवशीं काम करण्याची मनाई ही त्यापैकींच होय. जरी हल्लीं ह्या निषेधांपैकींच बरेच जुनेपुराणे झालेले आहेत, आणि बाकीच्यांकडे पुष्कळ लोक दुर्लक्ष करितात, तरी एकाकाळीं उत्पादन, विभजन आणि विनिमय यांच्यावर त्यांचा बराच आळाबंदा असे.

५१. लोकांवरील निरनिराळ्या प्रकारचीं नियंत्रणें विभिन्नकिरण पावलीं आहेत आणि औद्योगिक नियमन धार्मिक व राजकीय शासनापासून स्वतंत्र झालेलें आहे, ही गोष्ट आतांपर्यंत दिलेल्या पुराव्यावरून बरीच स्पष्ट झालेली आहे. पण ह्या ठिकाणीं विशेषतः लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही कीं ह्या सर्व प्रकारच्या शासनांतील जबरीचा भाग ह्याबरोबरच कमी होत गेलेला आहे. सर्वांत ज्यास्त सुधारलेल्या लोकांत तरी लोकसत्तेच्या वृद्धीमुळें प्रारंभींचा अनियंत्रित अधिकार जसा आकुंचित झाला आहे, आणि बहिष्कार व शाप ह्यांच्या जोरावर चालणारें धर्माधिकाऱ्यांचें प्रारंभींचें कडक शासन जसें मृतप्राय होत चाललें आहे, तसें उद्योगधंद्याचें नियमन सइलावत गेलें आहे. पूर्वीं कामकरी, कारागीर, व्यापारी, इत्यादिकांवर केवळ सरकारच कडक अंमल चालवी असें नाहीं, तर व्यापारी-जमाती वगैरे ज्या

निरनिराळ्या धंदेवाल्यांच्या सभा त्याहि तसाच अंमल चालवीत. प्रारंभींच्या औद्योगिक शासनाचें सामान्य स्वरूप लेव्हासूरनें फ्रान्सांत चवदाव्या शतकांत व्यापारी शासन कसें असे ह्याबद्दलचें जें संक्षिप्त वर्णन केलेलें आहे त्यावरून चांगलें दिसून येतें. तो म्हणतो:—हे देशांतून आणि इतरत्रहि प्रवास करणारे जे घाऊक व्यापारी त्यांस 'मर्सर' ही संज्ञा असून, गंवड्यांप्रमाणें त्यांच्याहि मोठाल्या सभा असत; त्या सभांत पुष्कळ प्रांतांतील व्यापारी येत, व त्यांच्यावर त्यांच्या एका व्यापारी राजाचा अंमल चाले. उत्तर, दक्षिण, व मध्यम भाग एथें एकेक व्यापारी राजा असून इतर प्रांतांतूनहि असे. शिवाय प्रत्येक शहरांतून वगैरे व्यापाऱ्यांचे खासगी बंधुसमाज असत. व्यापारी राजा आपल्या प्रांतांतील सामान्य व्यापारावर कडक देखरेख करी. कोणाहि व्यापाऱ्यास त्याच्या परवानगीखेरीज माल विकावयास काढण्याची परवानगी नसे; त्याचें न्यायाचें कोर्ट असून वसूलहि असे.

व्यापारी जमाती इंग्लंद व इतर देश यांमध्यें लोकांच्या धंदेउद्योगावर अशाच तऱ्हेचा अंमल करीत. प्रत्येक शहरांत एकेक व्यापारी—सरदारमंडळ उत्पन्न झालें; आणि तें जसें आपल्या घटकांच्या व्यवहाराचें नियमन करी तद्वतच कामकऱ्यांच्या जीविताचेंहि नियमन करी, आणि व्यक्तिस्वातंत्र्य बऱ्याच आकुंचित मर्यादांत आणून ठेवी. हें त्यांच्या कांहीं नियमांवरून दिसून येतें. उदाहरणार्थ, परकी लोकांस आपला माल घरोघर फिरविण्याची मनाई असे; कोठें त्यांनीं

आपला माल आपल्याच हातानें विकतां कामा नये असा निर्बंध असे; कोठें त्यांनीं तो ठोकळ विकावा असें असे आणि किरकोळ विकूं लागल्यास तो सर्व जप्त केला जाई; कोठें असा नियम असे कीं, परकीयांनीं आपला माल विकावयास आणिल्यानंतर अमुकएक आठवड्यांनींच विकावयास काढिला पाहिजे, अगोदर काढतां कामा नये.

ओद्योगिक नियमनाच्या ह्या प्रकाराचीं आणखी कांहीं उदाहरणें पुढच्या एका प्रकरणांत दिलीं जातील. प्रारंभीं राजकीय आणि धार्मिक शासन जेव्हां जबरीचें असे तेव्हां औद्योगिक शासनहि तसेंच असे इतकें एथें दाखविणें पुरे आहे.

हें सत्य पुनःपुनः व जोरानें प्रदिपादण्याचा हेतु हा आहे कीं, ह्या ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणांत तें आपणास नेहमीं ध्यानांत ठेवावें लागेल. एरवीं औद्योगिक-घटनेचीं हल्लींचीं स्वरूपें काय आहेत हें आपल्यास समजणार नाहीं, किंवा पुढें हळूहळू त्या घटनेस कोणतीं स्वरूपें येण्याचा संभव आहे ह्याची आपणास योग्य कल्पना बनवतां येणार नाहीं.

प्रकरण अकरावें

पैत्रिक नियमन

५२. ह्या प्रकरणांत येणाऱ्या बहुतेक सर्व विषयाचा वरील मथाळ्यांत जरी समावेश होतो तरी सगळ्याच विषयाचा होत नाहीं; कारण, ह्या प्रकरणांत कांहीं गोष्टी अशा सांगावयाच्या आहेत कीं, त्या ह्या मथाळ्याखालीं येत नाहींत. म्हणून त्या गोष्टींच्या संबंधानें तेवढें 'कौटुंबिक नियमन' हें नांव या प्रकरणास अत्यन्त योग्य होईल.

कारण कुटुंबाचें नियमन सर्वत्र नवरा व बाप ह्यांच्याच हातांत असत नाहीं. सेमिटिक व आर्य लोकांच्या इतिहासाचेंच अध्ययन करणारे इतिहासकार पैत्रिक शासन व कौटुंबिक शासन ह्या दोहोंचा अर्थ एकच असें समजत आले आहेत. पण इतर जातींच्या लोकांच्या इतिहासावरून ही समजूत सर्वथैव खरी नाहीं असें म्हणावें लागतें. आतां असें सिद्ध झालें आहे कीं, रानटी लोकांत बहुधा नात्याची गणना पुरुषांकडून न करतां स्त्रियांकडून करितात, आणि म्हणून मालमत्तेवरील वारसदारीचा हक्क स्त्रीवंशांत संक्रान्त होत असतो. ह्यामुळें सर हेनरी मेन वगैरे लेखकांनीं प्राथमिक कौटुंबिक समूहाच्या संबंधानें बसविलेल्या कल्पनांत फेरबदल करणें प्राप्त झालेलें आहे. हा फेरबदल करण्यास आणखी एक कारण असें झालें आहे कीं, इजिप्शन, पेरूव्हियन इत्यादि लोकांसारख्या बरीच सुधा-

रणा झालेल्या लोकांतहि हीच नात्याची पद्धति सुरू होती. मात्र तिच्यांत पेरूदेशांतील इन्काराजांच्या संबंधानें एवढा फरक होता कीं, त्यांनीं आपल्या बहिणीच्या मुलीशीं किंवा बहिणीच्या मुलीच्या अभावीं अन्य अगदीं जवळच्या स्त्री—आपल्या मुलीशीं लग्न केलें पाहिजे असा निर्बंध होता, आणि अशा रीतीनें राजाधिकाराची संक्रान्ति स्त्रीवंशाप्रमाणें पुरुषवंशांतहि होत असे.

ह्याचा परिणाम कांहीं ठिकाणीं असा झाला आहे कीं, स्त्रियांना प्रारंभीं जें क्रूरपणानें सामान्यतः वागवितात त्यांत सुधारणा झालेली आहे; आणि कोठें कोठें त्यांस कौटुंबिक व सामाजिक दोन्ही प्रकारची सत्ता प्राप्त झालेली आहे. ह्याचें ठळक उदाहरण ईजिप्त देशांत दिसे, कारण तेथें बऱ्याच राण्या स्वेच्छाचारी आढळून येत, आणि थोड्याशा असुधारलेल्या टोळ्यांत नायकी बायकांकडे वंशपरंपरेनें जाते. ह्या पद्धतीमुळें ताहिती बेटांत स्त्रियांच्या सामाजिक हक्कांत अशी सुधारणा झालेली दिसत असे कीं, तेथें पुरुषांप्रमाणें स्त्रियांसहि घटस्फोट करण्याचा अधिकार असे. टाँगनलोकांतहि स्त्रियांचा अधिकार बराच असे. मालागासीलोकांत पुरुषांपेक्षां स्त्रियांकडेच ज्यास्त अधिकार असे. पण पुष्कळ ठिकाणीं वारसदारीचा हक्क स्त्रीवंशांतून संक्रांत होत असूनहि त्यांची पूर्ण दास्याची जी स्थिति तींत सुधारणा झालेली दिसत नाहीं. ह्याचीं उदाहरणें आस्ट्रेलियन, तास्मेनियन, म्नेक, चिपिवायन, डाकोटा, क्रीक, ग्वायनामधील लोक, आरावाक, क्यारिब वगैरे पुष्कळ लोकांत सांपडतात. तेथें सर्व बाबतींत मुलें हीं

नवऱ्याचीं न समजतां बायकोचीं समजत असूनहि नवरा व बाप ह्यांच्या बायकोवरील व मुलीवरील अधिकारास मर्यादाच दिसत नाहीं.

आफ्रिकेमध्यें मिश्र पुरावा सांपडतो. त्याकडेहि लक्ष दिलें पाहिजे. पश्चिम आफ्रिकेंतील बाबु लोकांमध्यें स्त्रीवंशामध्यें द्रव्यसंक्रान्ति होत असून स्त्रियांची स्थिति कांहीं बाबतींत कनिष्ठ व कांहीं बाबतींत श्रेष्ठ दिसते. एक कनिष्ठपणा हा दिसतो कीं, मृतमाणसाची इतर मालमत्ता ज्याच्याकडे जाईल त्याच्याकडे त्याच्या बायकाहि जातात. शिवाय, बायको मेली म्हणजे नवऱ्यावर अपराध केल्याचा आरोप येण्याचा संभव असतो, आणि त्यामुळें तिच्या आप्तांप्रत त्यास दंड द्यावा लागतो; ह्या भीतीमुळें नवरा बायकोस फार कडकपणानें वागवीत नाहीं. शिवाय तेथें असें आहे कीं गुलामस्त्रियांच्या मुलांवर नवऱ्याचा जरी पूर्ण अधिकार चालतो तरी इतर स्त्रियांच्या मुलांवर चालत नाहीं.

पण ह्या कारणामुळें वैवाहिक संबंध आणि कौटुंबिक शासन ह्यांमध्यें जो फेरबदल उत्पन्न होतो त्याखेरीज कोठें कोठें स्त्रियांचें पुरुषांवर विशेष वजन दिसून येतें, व त्याचा परिणाम उद्योगधंद्यावर झालेला दिसून येतो. पुष्कळ ठिकाणीं व्यापार बायकांच्या स्वाधीन असतो. आणि कित्येक ठिकाणीं पुरुष बायकांच्या हुकमाप्रमाणें वागतात, ह्याचीं उदाहरणें अगोदरच्या भागांतून दिलेलींच आहेत. ह्याचें त्याहूनहि ठळक उदाहरण न्यूबिटनमध्यें सांपडतें. तेथें विकावयाचें काय व त्याबद्दल घ्यावयाचें काय ह्या-

बदलचे हुकूम बायका पुरुषांस करीत असतात. जिन्नस घ्यावयाचे ते बायका पारखून घेतात व आपल्या ताब्यांत ठेवितात. बोर्निओमध्यें औद्योगिक समता असून कौटुंबिक समताहि कांहीं अंशीं दिसून येते. सेंट जॉन म्हणतो कीं, डायाक लोकांमध्यें विवाह म्हणजे एक समाईक व्यापारच आहे. डायाक लोकांच्या बायकांबद्दल बाइल म्हणतो कीं, त्यांच्याकडे कामाचा फाजिल भाग येत नाहीं, आणि त्यांचें कुटुंबांत वजन बरेंच असतें. सेंट जान सांगतो कीं, समुद्रकांठच्या डायाक लोकांमध्यें नवरा बायकोच्या मागून जातो, आणि तिच्या आई-बापांच्या घरीं राहून त्याचीं कामें करितो; आणि ब्रूक सांगतो कीं, मूका वगैरे ठिकाणीं मालाना लोक रहात असून त्यांच्यांत बायका दरवाजे बंद करून बसतात, आणि नवरे मासे घेऊन आले नाहींत तर त्यांस घरांत घेत नाहींत. एवंच, या ठिकाणीं घरगुती उद्योगाचें नियमन पुरुषांच्या हातीं न दिसतां बायकांच्या हातीं दिसतें. आपल्या देशांत कॉश नामक डोंगरी लोकांमध्यें धनसंक्रान्ति स्त्रीवंशांत होत असून नेहमींचे वैवाहिक संबंध अगदीं उलट आहेत. त्यांच्यांत पुरुषानें लग्न केलें म्हणजे तो बायकोच्या आईकडे राहूं लागतो. व त्या दोघींच्या हुकमाप्रमाणें वागतो. लग्नें मुली लहान असतांच, पण त्यांस विचारून, आया जुळवून आणितात. शिवाय, त्यांच्यांत मोठ्या बायकांस नवरा निवडण्याचा व एक मेल्यास दुसरा करण्याचा, हक्क आहे.

एवंच कांहीं ठिकाणीं पुरुष स्त्रियांपेक्षां ज्यास्त शक्तिमान् असूनहि तेथें औद्योगिक शासनाच्या बाबतींत

स्त्रियांचा अधिकार पुरुषांहून ज्यास्त दिसतो. मग तो स्त्रीवंशांत धनसंक्रान्ति होण्याचा परिणाम असो वा नसो.

५२. ह्या अपवादात्मक उदाहरणांवरून बहुतेक सर्वत्र पुरुषांकडे सृष्टीच्या देणग्यांमुळें वर्चस्व असतें, व त्या वर्चस्वाचा ते प्रत्येक रीतीनें उपयोग करितात, म्हणजे इतर बाबतींप्रमाणें उद्योगधंद्याच्या बाबतींतहि कुटुंबांतील सर्व माणसांवर हुकूम चालवितात, ह्या गोष्टीचीच केवळ आठवण होते. कारण जेथें स्त्रियांचा आधीनपणा अमर्यादित असतो तेथें मुलांचाहि असला पाहिजे असें गृहीत करण्यास हरकत नाहीं; आणि म्हणून इतर बाबतींप्रमाणें उद्योगधंद्याच्या बाबतींतहि ते त्यांजवर स्वेच्छाचारी सत्ता चालवितात. खरोखरच प्रारंभीं राजकीय शासन, धार्मिक शासन व औद्योगिक शासन हीं एकच असतात हें सत्य आपल्यास ह्या ठिकाणीं त्याच्या अगदीं सरलस्वरूपीं दृष्टीस पडतें; कारण कुटुंबांतील मुख्य पुरुष किंवा पुरुषरूपी मुख्य कुटुंबघटकांकरितां सामान्य वर्तननियम घालून देत असतो, मृतपूर्वज व कुटुंबदेव ह्यांचा प्रतिनिधि व पुजारी ह्या नात्यानें त्याजकडे आलेला सर्व अधिकार त्यांजवर चालवीत असतो, आणि रोजच्या कामाची दिशा वाटेल तशी घालून देत असतो.

साहजिकच, जेथें राजकीय घटना फारच अल्प प्रमाणावर उत्पन्न झाली असेल, किंवा मुळींच झाली नसेल, तेथें बापाच्या अधिकाराला मर्यादा घालण्यास कांहींच नसतें; मात्र मुलें त्यास विरोध करण्यास किंवा त्याच्यापासून पळून जाण्यास समर्थ असलीं तर गोष्ट

निराळी. वेडुइन लोकांच्या कुटुंबांत हा प्रतिबंध अमलांत असलेला दृष्टीस पडतो; त्यांच्यांत आपण बापाच्या आधीन आहों हा मनोविकार मुलांच्या ठिकाणीं फारच अल्प असतो, व मुलगा आपल्याकरितां निराळा तंबू सहजच उभारूं शकतो. म्हणून त्या लोकांत बापमुलांमध्यें नेहमीं तंटे होत असतात. पण असलीं अपवादात्मक उदाहरणें लक्षांत घेऊनहि सामान्यतः आपणास असें म्हणतां येईल कीं, सामान्यतः प्रारंभींच्या शेतीभाती करून व गुरेंढोरं बाळगून राहणाऱ्या लोकांमध्यें निरनिराळ्या कुटुंबसमूहांवर बापाचा अमर्याद अधिकार असतो. भटकण्याच्या व विखरलेल्या शेतकरी कुटुंबाच्या स्थितींत स्थापन झालेलें हें शासन स्वसंरक्षण किंवा परातिक्रमण ह्यासाठींच जेव्हां सामाजिक समूह उत्पन्न होतात तेव्हांहि कायम राहतें. आणि जे पुरुष आपल्या कुटुंबांत बायकापोरांस ठार करण्यापावेतों अनियंत्रित सत्ता आपल्या कुटुंबावर चालवितात तेच पुरुष समूहावर राज्य करून कायदेहि करीत असल्यामुळें ही कौटुंबिक स्थिति सुधारणेच्या प्रारंभीच्या एकंदर पायऱ्यांवर कायम राहते. ह्याचें फार ठळक उदाहरण म्हटलें म्हणजे चीन देशाचें होय. त्यांच्या अत्यन्त प्राचीन ग्रंथांत कुटुंब हा समाजाचा पाया होय असें सांगितलें आहे असें सांगून डुग्लस लिहितो कीं, कुटुंबांत आईबाप जिवंत असतांलि तोंपावेतों मुलगा त्यांच्या कह्यांत राहतो, आणि त्यानें धंदा वगैरे काय करावयाचा हें तीं ठरवीत असतात. मुलाच्या स्वातंत्र्यावर त्यांचा जितका पूर्ण अधिकार असतो ति-

तकाच द्रव्यावरहि असतो. प्रौढवयांत आलेले मुलगे हात न उगारतां मुकाट्यानें आईबापांचा मार खाण्यास तयार होतात. आतां कुटुंबांतील मुख्यपुरुष हेच सार्वजनिक अधिकारी असल्यामुळें हा अमर्यादित अधिकार पुष्कळ काळपर्यंत कसा कायम राहतो ह्यासंबंधानें वरील लेखक म्हणतोः—प्रत्येक ग्रामवस्तीच्या कामावर आठ कुटुंबांचे मुख्य देखरेख करीत असत. ही पद्धति हल्लींहि बऱ्याच अंशीं अमलांत आहे. पूर्वीप्रमाणें हल्लींहि कुटुंबांतील सर्व माणसांवर कुटुंबमुख्याचा अनियंत्रित अधिकार चालतो. त्याच्या मुलांमुलींचे जीव देखील त्याच्या हातांत असतात; आणि त्याची बायको, रांडा, व आश्रित ह्यांच्याशीं त्याचें वर्तन इतर कुटुंबमुख्यांच्या मनास चीड येईल अशा प्रकारचें नसेल तर त्याबद्दल कोणी त्यास विचारीत नाहीं. मुलानें बापाची आज्ञा मोडिल्यास तो त्यास तुरुंगांत पाठवूं शकतो.

प्रारंभींच्या रोमन लोकांमध्येंहि असेंच होतें, डुरुई म्हणतोः—"त्यांच्यांत सर्वत्र कुटुंबाच्या बापाचाच उल्लेख सांपडतो; कारण घरांत तोच काय तो माणूस असतो; बायको, मुलें, कुळें, गुलाम हीं सर्व किल्हार होत, तीं केवळ काम करून घेण्याचीं यंत्रें असतात; त्यांस स्वतःची इच्छा नसते किंवा नांव नसतें, आणि तीं त्या बापाच्या पूर्ण अधिकारांत असतात. तो उपाध्या व न्यायाधीशहि असल्यामुळें त्याचा अधिकार अनियंत्रित असतो; त्याचाच काय तो देवांशीं बोलण्याचालण्याचा व्यवहार चालतो; कारण तोच काय तो कौटुंबिक धर्मविधी करीत असतो, आणि धनी या नात्यानें तो गुलामांचे जीव व

शक्ति ह्यांची व्यवस्था लाविती. नवरा या नात्यानें, बायकोनें खोट्या किल्ल्या बनविल्यास किंवा शपथ मोडिल्यास तिला तो देहान्त शिक्षा देतो. बाप या नात्यानें जें मूल व्यंग असलेलें जन्मास येईल त्यास तो ठार करितो, व इतरांस विकून टाकितो; व तीनदां त्यांस विकील तेव्हां त्यांजवरचा त्याचा हक्क जातो. त्यांचें वय कितीहि झालें किंवा त्यांस कितीहि मान मिळाले तरी ते ह्या दास्यांतून मुक्त होत नाहींत." यावरून प्राचीन काळीं बाप हा उद्योगधंद्याचा पूर्ण नियामक असे हें स्पष्ट दिसतें, त्या वेळीं बायको व मुलें ह्यांची स्थिति गुलामांप्रमाणें असे. म्हणजे गुरांच्या कृतींवर मालकाचें जितकें नियंत्रण चालतें तितकेंच त्यांच्या वरहि चाले.

५४. प्रारंभीं सर्व यूरोपभर असल्याच प्रकारची स्थिति असे हें यावरून दिसतें कीं, फ्रान्सांत तेराव्या शतकापर्यंत मुलानें बापाची नाखुशी केल्यास त्यास तुरुंगांत घालण्याचा अधिकार असे; ह्याचा अर्थ असा होतो कीं, मुलाकडून पाहिजे तें काम करून घेण्याचा बापास अधिकार असे. इंग्लंदांत जरी बापाची मुलावरील सत्ता इतकी कळसास गेलेली नव्हती, तरी एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत लग्नाच्या संबंधानें मुलांस आईबापांची संमति घ्यावी लागे. ह्यावरून पूर्वी उद्योगधंद्याच्या संबंधानेंहि घ्यावी लागत असेल असें वाटतें. त्या वेळीं शेतकरीलोकांत आईबाप व मुलें ह्यांमध्यें काय संबंध असत हें जेफ्रिस साहेबाच्या ग्रंथांतील पुढील उताऱ्यावरून दिसतें:—"या काळीं अर्धा डझन मुलगे असणें ह्याची शेतकऱ्यास मोठी धन्यता

वाटे; कारण प्रत्येक मुलगा वयांत येईल तसा शेतावर खपूं लागे, आणि अशा रीतीनें मजुरीचा फायदा करून देई. मुली दूधदुभत्याचें काम संभाळीत, व कधीं कधीं दूधहि काढीत, किंवा गवत कापावयास जात. घरांतील माणसांस लागणारे कपडे त्या सूत काढून विणून तयार करीत. सारांश मुलें म्हणजे बापाचीं नोकर असत. त्याच्या परवानगीविना त्यांस एक पाऊ-लहि टाकतां येत नसे. आईबापांच्या आज्ञेंत राहून त्यांस मान देणें हा सर्वांत मोठा सद्गुण समजला जात असे. त्यांचीं लग्नें आईबापच करून देत. मुलगा तीस वर्षांचा झाल्यावर त्याम कदाचित् नांवाचें तरी स्वताचें शेत मिळे; तरी पण बापाचा ताबा त्याच्यावर असेच. तो सांगेल त्याप्रमाणें त्यास शेत नांगरावें व पेरावें लागे. त्याला खर्चाहि त्याच्या हुकमाप्रमाणेंच करावा लागे. अशी ही स्थिति बाप मरेपर्यंत चाले.'' हीच स्थिति अद्यापिहि बऱ्याच अंशीं अस्तित्वांत आहे; कारण वयांत येईपर्यंत मुलगा हा कायद्यानें बापाचा नोकर समजला जातो, आणि मुलीस फूसलावून नेणाराबर बाप जी तिकडे फिर्याद करितो ती आपला नोकर हिरावून नेला ह्या मुद्यावर करितो.

आतां जुलमीपणा हा राजकीय, धार्मिक व औद्योगिक नियमनांतून एकसमयावच्छेदेंकरूनच कमी होत जातो ह्याबद्दलचा पुरावा एथें लक्षांत घेण्यास आपण विसरतां कामा नये. कारण तिकडे हल्लीं राजकीय व धार्मिक स्वातंत्र्य जसें वाढत गेलें आहे तसा बाप मुलांवर स्वताच्या फायद्यासाठीं जबरी करण्याच्या ऐवजीं

मुलांच्या फायद्यासाठीं बहुधा स्वतावरच जबरी करितो; आणि त्यांनीं धंदा काय करावयाचा हें बहुतेक त्यांच्याच इच्छेवर ठेवितो.

५५. पूर्वीच्या कलमांतून बापाचें कौटुंबियांवर प्रारंभींच्या पायऱ्यांवर सामान्यतः साम्राज्य कसें चालतें हें दृश्य झालेलें आहे, व तें उद्योगधंद्यावरहि चालतें हें अप्रत्यक्षरीत्याच व्यक्त झालेलें आहे. पण बापाचा मुलांवर इतर कामांत जर अनियंत्रित अधिकार चालत असेल तर उद्योगविषयक बाबतींतहि चालला पाहिजे असें अनुमान काढावयास लावणाऱ्या गोष्टी सांगतां येण्यासारख्या आहेत.

सुधारणेच्या पहिल्या पायऱ्यांवर जगांत सर्वत्र उद्योगधंदा बापाचा मुलाकडे जात असतो ह्यावरून बाप मुलास काय धंदा करावयाचा हें सांगत असला पाहिजे हें दिसून येतें. बापाचा अधिकार अशा रीतीनें चालण्यास अनेक कारणें होत असत. मुलगा नेहमीं घरांत असल्यामुळें तेथें चालणारा धंदा तो कांहीं अंशीं सहजगत्याच शिके. तेव्हां दुसरीकडे जाऊन अजीबाद नवा धंदा शिकण्यापेक्षां तोच धंदा पुरता शिकणें त्यास ज्यास्त सुलभ जाई. ह्या गोष्टीस दुसरें एक कारण असें होई कीं, प्रारंभीं जिन्नस तयार करण्याच्या पद्धती गुप्त ठेवीत असत. अमुधारलेला व अर्धवट सुधारलेला माणूस स्वभावतःच देवभोळा असल्यामुळें जी जी पद्धति त्यास समजत नाहीं ती ती दैविक आहे असें तो मानितो; उदाहरणार्थ, आफ्रिकेंत अजून देखील लोहार हा जादूगार म्हणून समजला जातो. धंदा ह्या अर्थी इंग्रजींत जो

'क्रॉफ्ट' शब्द आहे त्यामध्यें कौशल्य, लुच्चेगिरी, इत्यादि कल्पनाहि समाविष्ट होतात. हें कौशल्य कुटुंबांत गुप्त रहावें असा उद्देश असे. अशा रीतीनें मुलांस बापाचा धंदा शिकून व अभ्यासानें त्यांत निपुण होऊन त्याच्या देखरेखीखालीं तो करणें जणूं काय भागच पडे.

अशा रीतीनें स्वाभाविकरीत्या उत्क्रांत झालेला जो हा प्रघात तो पुष्कळ समाजांत कायद्यानें आवश्यकच करून टाकलेला आढळतो, व ह्यामध्यें कायदे करणारांनीं मोठा शहाणपणा खर्च केलेला आहे, व त्यापासून फायदाहि फार आहे, असें समजतात. ह्याचें उदाहरण प्राचीन चीन देशांत सांपडतें. तेथें गवयाचा मुलगा गवई, हपीसराचा हपीसर, कारागिराचा कारागीर, व्यापाऱ्याचा व्यापारी व शेतकऱ्याचा शेतकरी असे. प्राचीन ईजिप्तमध्यें असेंच असे. तेथें बापाच्या धंद्याव्यतिरिक्त धंदा करण्याची मुलास परवानगी नसे. तेथील शिलालेखांवरून असें दिसतें कीं, एकच धंदा—उदाहरणार्थ, शिल्प्याचा—एकाच कुटुंबांत तेवीस तेवीस पिढ्या रहात असे. ग्रीसमध्येंहि अशाच रीतीनें रूढीस कायद्याचें स्वरूप आलेलें होतें. उदाहरणार्थ, आथेन्समध्यें एकच धंदा एकानें केल्यास त्यामध्यें तो विशेष निपुण होईल असें समजून दोन धंदे एकाच माणसानें करण्यास कायद्याची मनाई असे. प्राचीन मेक्सिकोमध्यें असेंच असे. तेथील लोकांच्या संबंधानें क्लाव्हिगारो असें म्हणतो कीं, त्यांच्यांत मुलगे बहुधा बापाचा धंदा शिकत; अशा रीतीनें विशिष्ट कला एकाच कुटुंबांत कायमच्या झाल्यामुळें राष्ट्राचा फायदा होई.

ह्यापुढें धंदेजमातीची घटना व नियमन ह्यासंबंधाचा विचार करतांना आपल्यास असें आढळून येईल कीं, असलेच कल व त्यांपासून असलेच परिणाम झांलेले सर्वत्र दिसून येतात. ह्या ठिकाणीं आपल्यास एढीच गोष्ट लक्षांत घ्यावयाची आहे कीं बापाची उद्योगविषयक नियामक सत्ता त्याच्या एकंदर सत्तेमध्यें अवश्यच गर्भित होत असे.

प्रकरण बारावें

पितृशास्त्याचें शासन

५६. फार रानटी टोळ्यांत आणि विशेषेंकरून पारध करणाऱ्या टोळ्यांत बापाचा श्रेष्ठ अधिकार त्याच्या शारीरिक किंवा मानसिक श्रेष्ठत्वावर अवलंबून असल्यामुळें, आजाचा श्रेष्ठ अधिकार कोणीं ओळखीत नाहीं. पण जेथें आधीनपणाचा मनोभाव फार खोल असेल तेथें पैत्रिक नियमनापासून पितामहनियमन, व त्यापासून प्रपितामहनियमन उत्पन्न होतें. सहजच बापाचा अधिकार प्रारंभींच्या पायऱ्यांवर चांगलाच ठळक असल्यामुळें त्यापासून पितृशास्त्याचा अधिकार उत्पन्न होतो. आणि त्याच्या मरणाच्या वेळीं हा अधिकार त्याच्या सर्वांत वडील पुरुषवंशजाकडे, आणि तो जिवंत नसल्यास त्याच्या वडील मुलाकडे गेल्यामुळें तो कुटुंबसमूहाचा शास्ता बनतो, व तो इतर अधिकाराबरोबर उद्यमविषयक अधिकारहि चालवितो.

हल्लींच्या सुधारलेल्या राष्ट्रांना जन्म देणाऱ्या जातींकडे पाहतां असें दिसतें कीं, पितृपूजेपासून पित्राज्ञा मानण्यास उत्तेजन मिळालेलें आहे. मृतबापाचें भूत होतें असें समजून त्याचें बली देऊन संतर्पण करीत असल्यामुळें, व तो रागावल्यास आपलें नुकसान करील असा समज असल्यामुळें, दुसरा असाहि समज उत्पन्न होतो कीं, तो जिवंत असतां त्यास जे चिडवतील त्यांच्यावर तो मेल्यावर सूड घेईल. म्हणून एरवीं झाले

असते त्याहून लोक त्याच्या फार ज्यास्त आधीन होतात. आणि तो जेव्हां आजा किंवा पणजा बनेल तेव्हां ही आधीनता कायम राहते इतकेंच नाहीं तर वाढते देखील; कारण त्या वेळीं आज्ञाभंग करणाऱ्या वंशजांना त्यानें शिक्षा करण्यास आपल्या दैविकशक्ती चालविण्याचा काल जवळ आलेला असतो.

पितृशास्त्याचा अधिकार वाढण्यास आणखी एक कारण होतें; तें मालकीचा हक्क मानणें हें होय. जे मुलगे उदरनिर्वाहार्थ आपल्या बापावर अवलंबून नसतील व ज्यांच्या बांट्यास त्याच्या मरणाच्या वेळीं कांहीं यावयाचें नसेल त्यांनीं त्याच्या आज्ञा पाळण्याचें एक कारण नाहींसें होतें. म्हणून मालकीबद्दलचा पूज्यभाव लोकांच्या मनांत इतका पूर्ण झाला कीं, आजा किंवा पणजा दुबळा झाला तरी त्याची जमीन त्याच्याकडेच आहे असें समजावयाचें, म्हणजे त्याचें शासन मजबूद होतें.

५७. ह्याचा कांहीं पुरावा हल्लीं अस्तित्वांत असलेल्या लोकांमधील आतां देऊं. पैकीं अगदीं सरल व स्पष्ट पुरावा आफ्रिकेमध्यें सांपडतो. बेचुआना लोकांमधील वस्तुस्थितीचें वर्णन करतांना लिव्हिंगस्टन म्हणतोः—तेथील सरकार पितृशासनरूप आहे, कारण तेथें मनुष्य बाप या नात्यानें आपल्या मुलांचा नाईक असतो. ते आपल्या झोंपड्या त्याच्या झोंपडीच्या सभोंवतीं बांधितात. प्रत्येक झोंपडीसमूहाच्या मध्याच्या नजीक 'कोटला' नामक एक जागा असते, व तिच्यांत चूल असते; तेथें ते काम करितात, खातात, किंवा बसून गांवांतील वर्तमानें एकमेकांस सांगतात. गरीब मा-

गूल श्रीमंताच्या कोटल्यास जाऊन मिळतो, व नंतर तो त्याचा मुलगा झाला म्हणून समजतात. दुय्यम नायकाच्या असल्या मंडलासभोंवतीं दुसरीं अनेक मंडलें असतात; आणि मुख्य नायकाच्या कोटल्याच्या सभोंवतालच्या कोटल्यांचें मिळून शहर बनतें.

ह्यावरून मूळचा पितृशासित समूह त्याच्याशीं नातें नाहीं असे लोक त्याच्यांत आल्यानें कसा वाढतो व भिन्नस्वरूप होतो हें लक्षांत येतें. अंदाधुंदीच्या काळांत सर्वत्र असें होतच असलें पाहिजे कीं, आपल्या समूहांतून पळून गेलेला माणूस एकटा असल्यामुळें आश्रयार्थ दुसऱ्या एकाद्या समूहांत जावा, व त्या समूहाच्या मुख्याचा अंकित बनावा. ह्याचा परिणाम काय होतो तें दक्षिण आफ्रिकेंतील स्थितीचें लिव्हिंगस्टन वगैरेनीं जें वर्णन केलेलें आहे त्यावरून स्पष्ट होतें. तेथें पितृशासित सरकारच्च काय तें सर्वांस माहीत असे; प्रत्येक गांवचा एक नाईक असे; आणि प्रत्येक वडील माणसाकडे गांवाचा एकेक भाग असे. प्रत्येकजण कोणाच्या तरी आश्रयाखालीं असे; आश्रयदाता मेल्यानें एकादा नीग्रो अनाथ झाल्यास त्यास गुलाम करून विकला जाण्याची बरीच भीति असे.

हा प्रघात, व समूहमुख्यास 'बाप' म्हणण्याचा प्रघात ह्यांचा सहजच परिणाम असा होतो कीं, कांहीं पिढ्या गेल्यानंतर बाहेरून समूहांत आलेले लोक त्या समूहांतील मूळपुरुषांचे वंशज म्हणून आपल्यास समजूं लागतात. स्काटलंदांतील डोंगराळ प्रदेशांत एका-

च आडनांवाचे लोकांचे जे क्लान किंवा ज्ञातिसमूह बनत ते ह्याच तत्त्वावर बनत.

परकी लोकांस टोळींत घेण्यास सर्वत्र दोन कारणें झालेलीं आहेत; एक टोळींत येऊं पाहणारास आश्रयाची जरूरी हें, आणि दुसरें टोळीच्या नायकास आपली टोळी होईल तितकी प्रबल करण्याची इच्छा हें. रानटी लोक जिंकलेला शूर माणूस आपल्या टोळींत घेत, रोमन लोक दत्तक घेत, आणि लष्करी जमीनदार सशस्त्र माणूस बाहेरून आल्यास त्यास आपलासा करीत, ह्या सर्व गोष्टींचें मूळ हेंच आहे. प्रारंभीं सेमिटिक लोकांमध्यें बहुधा असेंच असावें. आब्राहाम व लाट यांच्या लोकांमध्यें तंटा झाल्याविषयीं जें आपण वाचितों ते लोक बहुधा त्यांचीं मुलें किंवा गुलाम नसून दत्तक घेतलेले परकी लोक असावे.

आतां हें उघडच आहे कीं पितृशासित समूहांत अशा रीतीनें जे हे बाहेरून आलेले लोक त्यांची योग्यता समूहघटकांच्या योग्यतेहून भिन्न असे. कोठें कोठें अशा लोकांची गांवांत वस्ती निराळीच असून त्यांच्याकडे गांवांतील अगदीं हलकीं कामें असत; पैकीं एक काम गांवांच्या व शेतांच्या मर्यादा ठरविणें हें असे. आपल्याकडील महारमांगांची हकीकत बहुधा अशीच असावी.

पण जेथें कुटुंबपद्धति व ज्ञातिपद्धति कमी टळक असेल आणि जेथें बाहेरचे लोक विशिष्टसमूहांत केवळ स्वेच्छेनें आलेले असतील, तेथें परक्यांची स्थिति कमी भिन्न असते, आणि कधीं कधीं ते मूळ समूहांत अगदीं

णूस श्रीमंताच्या कोटल्यास जाऊन मिळतो, व नंतर तो त्याचा मुलगा झाला म्हणून समजतात. दुय्यम नायकाच्या असल्या मंडलासभोंवतीं दुसरीं अनेक मंडलें असतात; आणि मुख्य नायकाच्या कोटल्याच्या सभोंवतालच्या कोटल्यांचें मिळून शहर बनतें.

ह्यावरून मूळचा पितृशासित समूह त्याच्याशीं नातें नाहीं असे लोक त्याच्यांत आल्यानें कसा वाढतो व भिन्नस्वरूप होतो हें लक्षांत येतें. अंदाधुंदीच्या काळांत सर्वत्र असें होतच असलें पाहिजे कीं, आपल्या समूहांतून पळून गेलेला माणूस एकटा असल्यामुळें आश्रयार्थ दुसऱ्या एकाद्या समूहांत जावा, व त्या समूहाच्या मुख्याचा अंकित बनावा. ह्याचा परिणाम काय होतो तें दक्षिण आफ्रिकेंतील स्थितीचें लिव्हिंगस्टन वगैरेनीं जें वर्णन केलेलें आहे त्यावरून स्पष्ट होतें. तेथें पितृशासित सरकारच्च काय तें सर्वांस माहीत असे; प्रत्येक गांवचा एक नाईक असे; आणि प्रत्येक वडील माणसाकडे गांवाचा एकेक भाग असे. प्रत्येकजण कोणाच्या तरी आश्रयाखालीं असे; आश्रयदाता मेल्यानें एकादा नीग्रो अनाथ झाल्यास त्यास गुलाम करून विकला जाण्याची बरीच भीति असे.

हा प्रघात, व समूहमुख्यास ' बाप ' म्हणण्याचा प्रघात ह्यांचा सहजच परिणाम असा होतो कीं, कांहीं पिढ्या गेल्यानंतर बाहेरून समूहांत आलेले लोक त्या समूहांतील मूळपुरुषांचे वंशज म्हणून आपल्यास समजूं लागतात. स्काटलंदांतील डोंगराळ प्रदेशांत एका-

च आडनांवाचे लोकांचे जे क्लान किंवा ज्ञातिसमूह बनत ते ह्याच तत्त्वावर बनत.

परकी लोकांस टोळींत घेण्यास सर्वत्र दोन कारणें झालेलीं आहेत; एक टोळींत येऊं पाहणारास आश्रयाची जरूरी हें, आणि दुसरें टोळीच्या नायकास आपली टोळी होईल तितकी प्रबल करण्याची इच्छा हें. रानटी लोक जिंकलेला शूर माणूस आपल्या टोळींत घेत, रोमन लोक दत्तक घेत, आणि लष्करी जमीनदार सशस्त्र माणूस बाहेरून आल्यास त्यास आपलासा करीत, ह्या सर्व गोष्टींचें मूळ हेंच आहे. प्रारंभीं सेमिटिक लोकांमध्यें बहुधा असेंच असावें. आब्राहाम व लाट यांच्या लोकांमध्यें तंटा झाल्याविषयीं जें आपण वाचितों ते लोक बहुधा त्यांचीं मुलें किंवा गुलाम नसून दत्तक घेतलेले परकी लोक असावे.

आतां हें उघडच आहे कीं पितृशासित समूहांत अशा रीतीनें जे हे बाहेरून आलेले लोक त्यांची योग्यता समूहघटकांच्या योग्यतेहून भिन्न असे. कोठें कोठें अशा लोकांची गांवांत वस्ती निराळीच असून त्यांच्याकडे गांवांतील अगदीं हलकीं कामें असत; पैकीं एक काम गांवांच्या व शेतांच्या मर्यादा ठरविणें हें असे. आपल्याकडील महारमांगांची हकीकत बहुधा अशीच असावी.

पण जेथें कुटुंबपद्धति व ज्ञातिपद्धति कमी ठळक असेल आणि जेथें बाहेरचे लोक विशिष्टसमूहांत केवळ स्वेच्छेनें आलेले असतील, तेथें परक्यांची स्थिति कमी भिन्न असते, आणि कधीं कधीं ते मूळ समूहांत अगदीं

मिळून जातात. पण समूहमुख्याच्या आज्ञा मानण्याचें व आश्रय दिल्याबद्दल त्याची नोकरी करण्याचें कबूल केल्यासच कोठेंहि त्यांत येऊन मिळण्याची परवानगी मिळत असते.

५८. पितृशासितसमूहांच्या घटनेच्या व वृद्धीच्या संबंधानें आणखी एक गोष्ट अशी ध्यानांत ठेवावयाची कीं समूहासमूहांमध्यें सारख्या लढाया होत असण्यावर ती कांहीं अंशीं अवलंबून असते. आफ्रिकेखेरीज अन्य ठिकाणचींहि यासंबंधानें उदाहरणें सांपडतात. उदाहरणार्थ, बाल्कन लोकांमध्यें सारख्या लढाया सुरू राहिल्यामुळें त्यांच्यांत कुटुंबसमूहच परवांपर्यंत कायम राहिले होते.

पण ह्या प्रकरणाचा मुख्य उद्देश पैत्रिकशासन आणि ज्ञातिशासन ह्यांच्यामधील दुवा जोडून देण्याचा आहे. कुटुंबसमूहाची वाढ होऊन पैत्रिक समूह बनणें, आणि पुढें आससमूह बनणें ह्यांच्या योगानें मूळचें पैत्रिक सरकार वृद्धिंगत होतें आणि स्वरूपान्तर पावतें, आणि ह्या गोष्टी अगदीं हळूहळू होतात. ही संक्रान्ति पूर्वींच्या कलमांवरून दिसत असल्यामुळें ज्ञातिशासनाच्या विषयाचा विचार करण्याची आतां आपली तयारी झाली आहे.

प्रकरण तेरावें
ज्ञातिशासन

५९. अर्भकाच्या कांहीं कृती कांहीं प्रारंभींच्या सामाजिक कृतींच्या दर्शक असतात, हें विधान ऐकून ज्यांस उत्क्रान्तिमताचा तिटकारा आहे ते थट्टेनें हंसूं लागतील. तथापि उत्क्रान्तिमतवाद्यास ही गोष्ट स्पष्टपणें दिसली पाहिजे कीं, हजारों वर्षें रानटी स्थितींत असतां सतत आलेल जे अनुभव त्यांच्या योगानें सेंद्रिय फेरबदल झाले असले पाहिजेत; आणि म्हणून ह्या फेरबदलांचीं चिन्हें हातांत खेळणाऱ्या मुलाच्या ठिकाणीं दिसल्यास त्यास आश्चर्य वाटणार नाहीं. पूर्वीं कधीं कोणी जेथें गेलेला नाहीं अशा बेटांवरील पक्षी मनुष्यापाशीं इतक्या निर्भयपणें वागतात कीं, ते वाटेनें माणूस चाललें असतां त्याच्या मार्गांतून देखील उठत नाहींत. पण ज्या पक्ष्यांचा अगणित युगें माणसाशीं संबंध आलेला आहे त्यांना माणसाविषयीं उपजतच भीति उत्पन्न होते, व त्यामुळें पक्ष्याचें पोर घरट्याबाहेर पडल्यापासून माणसाच्या वाऱ्यास उभें रहात नाहींसें होतें. त्याचप्रमाणें अगणित मानवी पिढ्यांमध्यें परकी म्हटला म्हणजे शत्रु असें जें मानसिक साहचर्य उत्पन्न झालेलें आहे, तें सारखें पुनःपुनः उत्पन्न झाल्यानें अर्धवटरीत्या सेंद्रियच झालेलें आहे, किंवा हाडीं खिळलेलें आहे. म्हणून अपरिचित चेहरा अर्भकाच्या दृष्टीस पडला म्हणजे प्रथम तें आपलें नाक तोंड वगैरे हळूहळू आंवळूं लागतें, व नंतर लवकरच तोंड एकीकडे फिरवून रडूं लागतें.

ही जी एथें असंबद्ध दिसणारी गोष्ट ती या ठिकाणीं सांगण्याचा उद्देश असा आहे कीं, प्रारंभीं सामाजिक समूह नात्याच्या बंधनांनींच बांधलेले रहात असत हें आधींच स्पष्ट झालेलें सत्य विशेष ठळक रीतीनें लक्षांत यावें. हल्लींप्रमाणें प्राचीनकाळींहि आप्त हे आयतेच बनलेले मित्र असत, आणि आप्तविरहित इतर हे वर्तमान किंवा भावी शत्रू असत. म्हणून प्रारंभीं ज्ञातिसंघ हा आप्तसंघ असे, आणि त्यांतील माणसें जीं एकमेकांस चिकटून रहात तीं इतर माणसांपासून स्वसंरक्षण करण्यासाठीं रहात. ह्यामुळें बाह्य संघांपासून भीति जितकी ज्यास्त तितकी ही चिकाटी ज्यास्त जोराची असे, आणि ती भीति जितकी कमी होईल तितकी ती कमी जोराची होई.

i सुधारलेल्या लोकांच्या पूर्वजांमध्यें दिसणाऱ्या उदाहरणांशीं आमचा मुख्यत्वेंकरून संबंध आहे; पण त्या उदाहरणांकडे लक्ष पुरविण्याच्या पूर्वी असुधारलेल्या लोकांतील, आणि विशेषतः ज्यांच्यांत स्त्रियांकडून नातें गणंतात त्या लोकांतील उदाहरणांकडे लक्ष देऊं.

६०. पैकीं पहिलें उदाहरण असें देऊं कीं, ज्यामध्यें स्त्रीवंशांत द्रव्यसंक्रांति स्पष्ट दिसून येते, आणि अमक्याचेंच जनकत्व जरी दिसून येत नाहीं तरी समूहामधील जनकत्व दिसून येतें. तें उदाहरण व्हेनेझ्वेला देशाच्या किनाऱ्यावर हेरेरा यास प्रथम दिसलेल्या लोकांचें होय. तो म्हणतोः—ते ज्या घरांतून रहात होते तीं सर्वसामान्य असून इतकीं विस्तृत होतीं कीं त्यांच्यांत १६० लोक रहात; तीं मजबूत बांधिलेलीं

असून त्यांच्यावर आच्छादन माडाच्या झांवळ्यांचें होतें व तीं घंटाकृति होतीं. ते विवाहविषयक कोणताच कायदा किंवा नियम पाळीत नसत, व लागतील तितक्या बायका करीत, व त्यांच्यांतील बायका लागतील तितके नवरे करीत असत; नवराबायको एकमेकांस पाहिज तेव्हां सोडून जात, व त्याबद्दल त्यांस कोणीहि दोष देत नसे. त्यांच्यांत एकमेकांबद्दल मत्सर म्हणून मुळींच नसे, व एकमेकांवर न रागावतां तीं सुखानें रहात. मार्गन म्हणतो, ह्यावरून त्यांच्यांत बायका व पुरुष या दोहोंच्याहि संबंधानें समाईक व्यवहार दिसून येतो, व त्यामुळें त्यांस खाण्यापिण्यांतहि तसलाच व्यवहार ठेवणें जरूर पडे असें दिसतें. आतां ज्या उत्तर अमेरिकन लोकांमध्यें नातें स्त्रियांकडून गणीत असत, आणि ज्यांच्यांत आप्तकुटुंबांचीं ज्ञातिगृहें बनलेलीं असत, त्यांच्या संबंधानें पुरावा देऊं. पैकीं जे कोलंबियाच्या मैदानावर रहात त्यांविषयीं लयुइस व क्लार्क म्हणतात कीं, "त्यांच्या मोठाल्या घरांतून कित्येक कुटुंबें एकत्र रहात. त्यांमध्यें आई, बाप, मुलगे, सुना, नातवंडें इत्यादि मंडळी असे, त्यांचें सर्वांचें खाणेंपिणें एकत्र असे, व तंटाबखेडा क्वचितच येई."

"आल्यूट लोकांचीं घरें फार मोठीं असत, तीं ५० ते ८० यार्ड लांब, व २० ते ४० यार्ड रुंद असत. त्यांतून ते लोक ४०, ५०, १०० असे रहात; त्यांत त्यांचा उद्देश एकमेकांचें एकमेकांस संरक्षण करता यावें व ऊब मिळावी हा असे."

"मण्डण लोकांच्या कुटुंबांतून २० ते ४० लोक

असून कोलंबियांतील लोकांच्या कुटुंबांतून सरासरी तितकेच असतात; शोशोनी लोकांत सात सात कुटुंबें एकत्र रहातात. तद्वतच, सॉक, इरोक्वोइस, आणि क्रीक लोकांत कित्येक कुटुंबें एके ठिकाणीं वाढतात. मार्गन म्हणतो त्यांचें खाणेंपिणें एकत्र असतें. मायाइंदियन-नामक लोकांत एकेक वस्तींत १०० माणसें असतात; त्यांचीं शेतें सर्वांचीं मिळून असून ते त्यांजवर सर्व मिळून खपतात, व पीक येईल तें सगळेजण वांटून घेतात. त्यांचें सर्वांचें जेवण एकाच झोंपडींत तयार करितात, आणि प्रत्येक कुटुंब आपल्यास लागेल तेवढें त्यांतून घेऊन जातें. ह्यां शेवटच्या उदाहरणांत कुटुंबें निरनिराळ्या घरांतून रहातांना दृष्टीस पडतात; पूर्वीच्या उदाहरणांतून तीं एकाच लांबलचक घरांत राहत असल्याचें आपल्यास आढळून आलें होतें.

ह्या टोळ्यांतून पूर्वजपूजेचें केवळ कोंवळें स्वरूप दृष्टीस पडतें; आणि त्याबरोबरच पितृशास्त्याच्या अंकित असणें हा जो संयोगबंध तो त्यांच्यांत दिसत नाहीं. कोलंबियन लोकांतील वयांत आलेल्या कुटुंबांतील माणसांच्या संबंधानें आपण असें वाचितों कीं, तीं अशा स्थितींत वृद्ध माणूस कुटुंबाचा मुख्य म्हणून समजत नाहींत; कारण घरांतील सर्व कामें व जबाबदाऱ्या त्याच्याहून तरुण लोकांवर पडत असतात. हीं कुटुंबें वृद्धिंगत होऊन त्यांचे जसे समूह, टोळ्या व राष्ट्रें बनत जातील तसा बापाचा अधिकार प्रत्येक मंडळाचा मुख्य चालवीत असतो. पण त्याची नायकी वंशपरंपरागत नसते.

६१. फेरबदल झालेल्या ज्ञातिपद्धतीच्या आणखी

उदाहरणें, जुन्या जगांतील (अमेरिका हें नवें जग) कांहीं असुधारलेल्या लोकांत दृष्टीस पडतात. विंटर बॉटम म्हणतो कीं सेरालोनच्या शेजारील मुलखांत शेतांची लागवड खेड्यांतील सगळेजण मिळून करितात, आणि येईल तें पीक सर्व कुटुंबांत त्यांतील माणसांच्या संख्येच्या मानानें वांटून देतात. उत्तर सेलिबिसमधील लोकांबद्दल अनुभवी प्रवासी व काळजीपूर्वक निरीक्षण करणारा वालेस साहेब म्हणतो कीं, एथील खेड्यांतून काफीच्या व भाताच्या शेतांची लागवड सगळे खेडवळ मिळून करितात. आठवड्यांतील कोणत्या दिवशीं शेतांत काम करणें आवश्यक आहे हें गांवांतील थोडीं वृद्ध माणसें ठरवितात, आणि कामकरी जमण्यासाठीं सकाळीं सात वाजतां घंटा वाजते. कापणी केली म्हणजे प्रत्येकजण आपला प्रमाणशीर वांटा त्यांतून उचलतो. सुधारणेच्या पहिल्या पायऱ्यांवर सार्वजनिक शेतें आणि सामान्य श्रम अशी ही पद्धति पुष्कळ ठिकाणीं दृष्टीस पडते.

पाडम नांवाची एक या देशांत डोंगरी जात आहे. तिच्या संबंधानें असलेंच पण कांहीं अंशीं भिन्न उदाहरण दृष्टीस पडतें. त्यांच्याविषयीं डाल्टन म्हणतोः— त्यांचें सामान्य गृह २०० फूट लांब असून त्यांत १८ किंवा १७ शेगोट्या असतात. गांवनाईक किंवा ग्रामपिते मुख्य शेगोटीच्या सभोंवतीं जमतात. ते कोणासहि मुख्य नायकाची पदवी पटकावूं देत नाहींत. सार्वजनिक कार्याचा विचार करण्याकरितां प्रतिष्ठित माणसें तेथें दररोज जमतात. ते एकमेकांचा सल्ला घेतल्याशि-

वाय कांहीं करीत नाहींत असें दिसतें. त्यांचा हुक्म पोरें ओरडत जाऊन गांवांत तावडतोब कळवितात. कोणीं अपराध केल्यास ती सार्वजनिक शरमेची गोष्ट समजतात, व त्याबद्दल सार्वजनिक बळी देतात. त्याचा खर्च अखेरीस अपराध्यावर पडतो. स्वतंत्र माणसाचा जीव घेण्याचा किंवा इतर शारीरिक शिक्षा करण्याचा ज्ञातीस अधिकार नसतो, पण गुलामाचा जीव घेण्याचा तीस अधिकार असतो. सामान्य गृहांत गांवांतील सर्व अविवाहित लोक व गुलाम निजावयास येतात, व त्यांवरोबर त्यांस प्रसंगीं मदत करण्यास व देखरेख करण्यास विवाहितांपैकीं कांहींजण पाळीपाळीनें येतात. जो लग्न करील तो वायकोसह स्वतंत्र घर करून रहातो; तें बांधण्यास ज्ञातींतील इतर लोक त्यास मदत करितात.

हें उदाहरण संक्रमणरूप आहे, कारण ह्या ठिकाणीं खासगी मालकीचा हक्क बऱ्याच अंशीं ओळखलेला दिसत असून ज्ञातीचीहि मालमत्ता व उद्यमशासन दिसून येतें, व ह्या ज्ञातिपद्धतीचा उद्देश सुरक्षितता हा मुख्यत्वेंकरून दिसतो.

६२. गतप्रकरणांत पितृशासनाचें संक्रमण ज्ञातिशासनांत होतें असें म्हटलें होतें तो विषय आतां पुनः हातीं घेऊन, वृद्धांविषयीं तरुणांस वाटलेली पूज्यबुद्धि ही हें संक्रमण उत्पन्न करण्यांत मुख्यत्वेंकरून कारणीभूत होते, ह्याचें उदाहरण होगार्थ साहेबाच्या एका आलीकडील ग्रंथांतील देऊं. तो म्हणतो कीं लीव्हान्टमधील प्रत्येक खेड्यांत तरुणांस वृद्धाविषयीं वाटणारी पूज्यबुद्धि हा ज्ञातिशासनाचा मुख्य पाया आहे. आर्य-

लोकांमध्यें देखील हें सत्य सर्वत्र उदाहृत झालेलें आढळून येतें.

पितृशासित समूह वृद्धिंगत होऊन उत्पन्न होणाऱ्या ज्या ज्ञातिरूप संघटना त्यांचें उदाहरण पूर्वयूरोपांतील जीं संयुक्त घराणीं त्यांच्यांत दृष्टीस पडतें. उदाहरणार्थ, हर्झेगोव्हेनिया व बॉस्निया या टर्कीच्या प्रांतांमध्यें पायीं प्रवास करणारा ईव्हान्स साहेब म्हणतो कीं तुर्कीं लोकांनीं ते जिंकून त्यांतील पूर्वींची सामाजिक घटना मोडून टाकिल्यानंतर त्यांनीं पुनः बहुतेकांशीं पितृशासित व्यवस्थाच धारण केली. नवीन वसाहतकारांना दिलेल्या जमिनी ते समाईकपणें धारण करूं लागले; तो समाईकपणा सगळ्या गांवाचा नसून एका कुटुंबाचाच असे. ह्या कुटुंबांतून तीनतीनशें माणसें असत; तीं सर्व एकाच कंपाउंडांत राहून तें एक खेडें बनलेलें असे. कोठें कोठें गावांत दोन कुटुंबें असत. कांहीं ठिकाणीं शांतता आणि त्याबरोबर झालेली औद्योगिक प्रगति यांचे योगानें ही ज्ञातिघटना पुनः मोडकळीस आली आहे. उदाहरणार्थ, राडोव्हाट्झ प्रांतामध्यें जरी पूर्वींची व्यवस्था अस्तित्वांत आहे, आणि प्रत्येक झोंपडींत जरी गृहपिता व गृहमाता आहे, व सर्व वस्तूंवर सर्वांची समाईक मालकी असते, तरी कुटुंबें पूर्वींपेक्षां बरींच लहान आहेत. सर्व्हियन, रशियन वगैरे इतर स्लाव्ह जातीच्या लोकांत असलीच स्थिति दिसून येते.

ह्या ज्ञातिसंघांतील औद्योगिक व्यवस्थांच्या संबंधानें सर्व्हियन लोकांत गृहपिता कुटुंबांतील माणसांनीं काय काय उद्योग करावयाचे तें ठरवितो, त्यांच्या वतीनें

मालमत्ता धारण करितो, आणि त्यांच्या पसंतीनें व्यापार करितो; इकडे गृहमाता बायकांवर ताबा चालवून त्यांस घरांतील धंदे लावून देते.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट एथें सांगितली पाहिजे. गडवडीच्या काळीं परस्परसंरक्षणार्थ बनविलेले हे ज्ञातिसंघ इतरत्र विस्कलन पावत असतां माँटिनीग्रोमध्यें त्यांचें मूळचें स्वरूप कायम राहिलेलें आहे. त्यांच्या संबंधानें सर हेन्री मेन म्हणतो:—तेथील लोकांत मुख्य कल्पना ही दिसते कीं गृहसमूह ज्या अर्थीं घटकांच्या अपराधांबद्दल जबाबदार धरिला जातो त्या अर्थीं त्यांनीं मेहनत करून उत्पन्न केलेले जिन्नसांवर समूहाची मालकी असली पाहिजे; आणि म्हणून त्यांच्यांत असा नियम आहे कीं कुटुंबांतील कोणीं माणसानें दूरदेशींहि जाऊन व्यापार वैगेरे करून पैसे मिळविल्यास त्याचा हिशेब त्यानें कुटुंबमुख्यास दिला पाहिजे. ह्यावरून उघड दिसतें कीं, मांटिनीग्रोमधील लोक ज्या सारख्या लढाया चालवितात त्या ही पद्धति त्यांच्यांत कायम राहण्याचें कारण आहे.

६३. ज्याप्रमाणें सरल संयुक्तसमूह वाढून त्यांचे संयुक्त कुटुंबसमूह बनतात, तसेच संयुक्त कुटुंब एकाच घरांत रहाण्यास पंचाईत पडेल एवढें मोठें झालें म्हणजे गृहवस्त्यांच्या ग्रामवस्त्या बनतात; आणि त्यांचा आतां आपल्यास विचार कर्तव्य आहे.

अशा प्रकारच्या ग्रामवस्त्या आपल्या ह्या देशांत ख्रिस्तीशकापूर्वीं चवथ्या शतकांत असल्याविषयीं पुरावा सांपडतो. आणि तेव्हांपासून त्यांच्यांत जरी अने-

क कारणांनीं अनेक प्रकारचीं स्वरूपान्तरें झालेलीं आहेत तरी त्यांचें मूळचें स्वरूप अद्यापि झांकलेलें नाहीं.

६४. वेल्समध्यें ह्याबद्दल स्पष्ट व अलग असा पुरावा सांपडतो. सीभाम त्या प्रांतांतील प्रारंभींच्या सामाजिक घटनेचें वर्णन करतांना म्हणतो कीं, ज्ञातीच्या गृहांत अविभक्त कुटुंबांतील माणसें नातूपणतूपर्यंत एकत्र रहात असत, व त्यांची इस्टेट सर्वांची समाईक असे. पण हें सर्व एकाच पूर्वजाच्या वंशजांस लागू असे. ज्याचें त्याच्याशीं नातें नसेल तो त्यांचा दास समजला जाई. पुढें स्थावर व जंगम मिळकत ह्यांमध्यें भेद उत्पन्न झाला, व पहिली तेवढी समाईक राहून दुसरी ज्याची त्याची स्वतंत्र समजूं लागले.

इंग्लंदांत ग्रामवस्तीची वाढ इतर लोकांनीं येऊन स्वाऱ्या केल्यामुळें वेल्सप्रमाणें झाली नाहीं. त्या लोकांनीं यूरोपांत पूर्वीं असलेले ज्ञातिप्रघात आपल्याबरोबर इंग्लंदांत आणिले, आणि कांहीं अंशीं नव्याच पद्धतीवर तेथें वस्त्या केल्या. असें होतें तरी एकाच गोतांतील कित्येक माणसें एकत्र जमीन घेऊन शहर वसवीत असत.

परंतु उद्यमविषयक ज्ञातिशासन मुख्यत्वेंकरून वर दाखविलेल्या कारणावरून विशिष्ट स्वरूप पावलें होतें तरी कांहीं अंशीं त्यास कारण सोईवार नाण्यांची वाण आणि त्यामुळें चढाओढीचा अभाव हें झालेलें होतें. उदाहरणार्थ, ज्या वेळीं विशिष्ट व्यक्तीनें इतरांचें काम किती केलें हें ठरविण्यास नाणें नव्हतें, आणि इतरांच्या मानानें ह्याच्या कामाची किंमत ठरविण्याचें साधन नव्हतें तेव्हां त्याला त्याच्या मेहनतीचा मोबदला कसा देतां

आला असता, ह्या गोष्टीचा आपण विचार केल्यास प्रथम समाईक रीतीनें राहण्याची वमागाहून जमिनीचे किंवा उत्पन्नाचे भाग वांटून देण्याची पद्धति कां व कशी अमलांत आली हें आपल्या लक्षांत येईल. अविभक्त मिळकत आणि समाईक इस्टेट ही स्थिति जाऊन विभक्त व ज्याची त्याची खासगी इस्टेट ही स्थिति साहजिकच हळूहळूच आली, आणि नाण्याची वाढ हें त्यास कारण झालें व त्याचें कार्यहि झालें. त्याच्यायोगानें निश्चित विभजन करणें ज्यास्त सुसाध्य झालें, आणि निश्चित विभजन जसजसें वाढत चाललें, तसतशी मजुरा देण्यास नाण्याची जरूरी ज्यास्त भासूं लागली.

प्रकरण चवदावें

जमातशासन

६५. अर्वाचीन कल्पना प्राचीन कालांत संक्रान्त करून, हल्लीं आपण कांहीं गोष्टी ज्या हेतूंनीं करितों त्याच हेतूंनीं असुधारलेले किंवा अर्धवट सुधारलेले लोक त्या करीत असत अशी कल्पना केल्यामुळें सामाजिक चमत्कारांच्या भलत्याच उपपत्त्या पुष्कळ वेळां लोक करीत असतात. उदाहरणार्थ, पुष्कळ लोकांची अशी समजूत दिसते कीं, लोकांच्या रूढींमध्यें जीं चिन्हें दिसतात तीं त्यांनीं मुद्दाम ठरविलीं होतीं. पण सर्वत्र हीं चिन्हें एकाकाळीं प्रत्यक्ष उपयोगांत असलेल्या वस्तूंचींच अवशिष्ट दर्शक आहेत. एकाद्या टोळीचें किंवा व्यक्तीचें जें विशिष्ट चिन्ह रानटी लोकांत दृष्टीस पडतें तें त्यांनीं प्रथम विचारपूर्वक ठरवून ग्रहण केलेलें असतें असें नाहीं; तर तें पूर्वज वगैरे नात्यानें त्या व्यक्तीशीं किंवा टोळीशीं संबद्ध म्हणून पवित्र समजून तिनें तें घेतलेलें असतें. म्हणजे, त्या वस्तूस चिन्हस्वरूप प्रथमतः प्राप्त न होतां मागाहून प्राप्त होत असतें. सरदारांच्या वगैरे निशाण्यांची उत्पत्ति अशाच रीतीनें झालेली आहे.

असुधारलला माणूस नूतन कल्पना काढणारा नसतो; जशी प्रारंभीं आऊतें व शस्त्रें साध्या काठीपासून किंवा सोंट्यापासून सहजगत्या हळूहळू फेरबदल होऊन उत्पन्न झालेलीं आहेत, तीच स्थिति सर्वत्र आहे. प्रारंभीच्या सामाजिक जीवितांतील प्रचार व सरण्या हेतुपूर्वक सुरू

केलेल्या नव्हत्या, तर न समजतां झालेल्या फेरबदलांनीं त्या उत्पन्न झाल्या. जी गोष्ट रूढ झाली असेल तिच्यांत जाणून फेरबदल करण्यास प्राथमिक माणसाची नूतन कल्पनाविहीनताच आड येते असें नाहीं, तर त्याचें प्रस्तुत-स्थितिप्रेमहि आड येतें. असुधारलेल्या व अर्धवट सुधारलेल्या माणसावर रूढीचा पगडा फारच जोरानें बसतो. म्हणून ज्या संस्थांचे मूळ उगम आम्ही शोधून काढण्यास पाहतों त्या संस्था उद्देशपूर्वक उत्पन्न न होतां सहजगत्या वाढ होऊन बनलेल्या आहेत. निरनिराळ्या प्रकारच्या सभा, मंडळ्या, सहकारी मंडळें, वगैरे हल्लीं कशीं बनतात हें आपल्यास परिचित असल्यामुळें रानटी माणूसहि तसाच प्रेरित होऊन तसल्याच पद्धतीवर तीं बनवीत असेल असें आपल्यास वाटतें; पण त्याच्या कृतींची अशी उपपत्ति लावण्यांत आपली चूक होते.

सामाजिक उत्क्रमणाची पहिली पायरी अनुद्दिष्ट रीतीनें आक्रमिली जाते हें जें पूर्वीं प्रतिपादिलेलें सत्य तें ह्या गोष्टीचा एक पुरावा होय. हॉबिस व रूसो समजत तसा सामाजिक करार माणसांनीं कधीं केलेला नाहीं. जेव्हां विशेष शूर असा एकादा वीर लढाईत प्रसिद्धीस येऊन आपल्या सभोंवतीं आपल्याहून कमी शूर माणसें गोळा करता झाला तेव्हां अंकितपणास सुरवात झाली; आणि पुढच्या लढायांतून तो सहजच अग्रणीत्व करूं लागला. जरी, प्रथम, लढाया होत नसतील त्या अवधींत त्याला आपला मुख्य म्हणून ते लोक मानीत नसत, तरी सहजच त्याचा त्यांच्यावर विशेष प्रभाव असे, व त्या प्रभावापासून शेवटीं त्याची नायकी स्थापन

झाली. आणि मुख्य सामाजिक संस्थेची उत्पत्ति जर अशा असंकल्पित रीतीनें झालेली आहे, तर दुय्यम संस्थांचीहि तशीच झाली असेल ह्याबद्दल मुळींच संशय नको.

ह्याचा अर्थ असा कीं जमाती ह्या मुद्दाम बनविलेल्या नाहींत. त्या जगांत सर्वत्र आढळतात ह्यावरूनहि तीच गोष्ट व्यक्त होते. त्या जर मुद्दाम बनविलेल्या असत्या तर कोठें कोठेंच दृष्टीस पडत्या; पण त्या निरनिराळ्या अनेक लोकांमध्यें होत्या व आहेत. म्हणून सहजच असा प्रश्न उद्भवतो कीं, त्यांची उत्पत्ति पूर्वीच्या कोणत्या सामाजिक रचनेपासून झालेली असावी ? ह्या प्रश्नाचें उघड उत्तर असें आहे कीं, त्यांची उत्पत्ति कुटुंबसमूहांपासून झाली. शहरांतील प्रभाव आणि शहरांतील धंदे ह्यांचे योगानें त्यांचें मूळस्वरूप हळू हळू बदलत चाललें. पैकीं गेल्या तीन प्रकरणांत त्यांच्या मूळ स्वरूपाचा तेवढाच आपण विचार केला होता.

ग्रामवस्ती स्वरूपानें गांवढी असतांच हळू हळू भिन्न स्वरूप धारण करूं लागली होती हें अगोदर आपल्या नजरेस आलेलेंच आहे; कारण कांहीं विशिष्ट धंदे विशिष्ट व्यक्ती किंवा कुटुंबें करावयास लागलीं. पुढील औद्योगिक घटनांची उत्पत्ति ह्या बीजांपासूनच झाली असली पाहिजे. गत प्रकरणांतून अनेक उतारे देऊन दाखविल्याप्रमाणें ह्या ग्रामवस्त्यांमध्यें औद्योगिक शासनाप्रमाणें राजकीय शासनहि असे. ही दोन शासनें प्रारंभीं जरी समस्वरूपच होतीं, तरी उत्क्रमण होतां होतां तीं लवकरच भिन्नस्वरूप होऊन गेलीं; आणि सगळ्या राजकीय मंडळामध्यें असलेलें औद्योगिक मंडळ निराळें होऊं लागलें, आणि

जे कोणी त्यांच्याशीं नात्यानें संबद्ध नसतील अशा आगंतुक लोकांस विशेषहक्कविहीन समजून त्यांस आपल्या बाहेर टाकूं लागले. असली एकादी ग्रामवस्ती चांगल्या परिस्थितींत असल्यामुळें नेहमींहून ज्यास्त मोठ्या आकाराची झाली, किंवा असल्या कित्येक वस्त्या एकत्र होऊन शहर बनलें, म्हणजे काय झालें असलें पाहिजे असा आपण प्रश्न केला तर आपल्यास असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, उद्योगधंद्यांत असलेल्या लोकांचीं संख्या जशी वाढत गेली तसे त्यांजमध्यें निश्चित संयोग झाले असले पाहिजेत, आणि विशिष्ट धंद्यांत असलेल्या लोकांच्या संख्या लहान प्रमाणावर वाढल्यामुळें त्यांच्यांत लहान प्रमाणावर संयोग होऊन निरनिराळ्या धंद्यांत विभक्तपणा उत्पन्न झाला असला पाहिजे. निरनिराळ्या धंदेजमातींना जमाती हें नांव प्राप्त होण्यापूर्वी त्या अनिश्चितस्वरूपीं अस्तित्वांत असल्या पाहिजेत. पुढें धंदेजमात ही संस्था जेव्हां लोकांच्या परिचयाची झाली तेव्हां नव्या जमाती जुन्यांच्या नमुन्यावर जरी निश्चितस्वरूपानेंच उत्पन्न झाल्या असतील तरी प्रारंभीच्या जमाती कृत्रिम रीतीनें व निश्चित स्वरूपानें उत्पन्न झाल्या असतील अशी कल्पना आपल्यास करतां येत नाहीं. पण आतां ही प्राथमिक कल्पना ध्यानांत ठेवून ह्यासंबंधानें प्रत्यक्ष पुरावा काय सांपडतो तो पाहूं या.

६६. अगोदर हें दाखविलेंच आहे कीं, धंदे जसे विशिष्टस्वरूप होत जातील तसे ते कुटुंबाचे धंदे बनून जातात, आणि कुटुंबांचीं जशीं गोतें बनत जातील तसे ते वाढणाऱ्या आप्तसमूहाचे विशिष्ट धंदे

बनत जातात. प्रत्येक वंशजास कुटुंबाच्या धंद्यांतील खुब्या सहज समजत असल्यामुळें, आणि दुसऱ्या एकाद्या कुटुंबाच्या धंद्यांत कामकरी म्हणून प्रवेश होणें तितकेंच कठीण असल्यामुळें, तो सहजच वंशपरंपरागत धंद्यांत पडतो; आणि मग ज्ञातिधंदे-वैशिष्ट्यें सहजच स्थापन होतात. ह्यांचीं प्रथम नष्ट व प्राचीन अशा समाजांतील उदाहरणें देऊं.

हीब्रू लोकांच्या संबंधानें पाहतां त्यांच्यांत 'रोटीवाल्याचा रस्ता' म्हणून नांव होतें ह्यावरून जरुशलेममध्यें रोटीवाले एकाच गल्लींत रहात हें स्पष्ट दिसतें. तद्वतच 'पन्हेर करणारांची दरी' म्हणून एक नांव त्यांच्यांत आढळतें, त्यावरूनहि तीच स्थिति दिसून येत. तद्वतच 'टालमड' नांवाच्या त्यांच्या पवित्र ग्रंथावरून असें दिसतें कीं, सोनार, रुपेंकार, वीणकर, आणि लोहार त्यांच्या देवळाच्या आवाराच्या निरनिराळ्या भागांत रहात असत. तद्वतच 'नेहेमिया' नामक ग्रंथांत सोनार, औषधें तयार करणारे आणि मसाल्याचें सामान विकणारे यांच्या जमातीसारख्या कांहींस उल्लेख केलेला आढळतो.

अशा रीतीनें आपोआप उत्पन्न झालेल्या रूढीस हळूहळू कायद्याचें स्वरूप कसें येतें हें प्राचीन ईजिप्तच्या उदाहरणावरून लक्षांत येतें. रालिन्सन लिहितो कीं, तेथें जरी मुलगा बापाचा धंदा नेहमींच किंवा अवश्यच करूं लागे असें नाहीं तरी हा प्रघात इतका सामान्य, बहुतेकांशीं इतका सार्वत्रिक, असे कीं तो पाळणें सर्वांस भागच आहे, आणि निरनिराळे धंदे

करणारे वर्ग ह्या निरनिराळ्या जातीच आहेत, असें तिन्हाइतास वाटे. रोममध्यें असले कारागिरांचे विशिष्ट विभाग फार प्राचीन काळीं उत्पन्न झाले होते हें अक-राव्या कलमांत सांगितलेंच आहे.

आतां अर्वाचीन लोकांकडे वळूं. चीन देशांत पूर्वजपूजा इतकी प्रचलित असून कुटुंबघटना इतकी ठळक असल्यामुळें तेथें रेशमी कापड विणणारे, रंगारी, सोन्याचा वर्ख करणारे, लोहार, घिरटवाले, सुया करणारे, सुतार, गंवडी, न्हावी, जस्तवाले, मच्छीमार-होडीवाले, चहावाले, पेढीवाले, यांच्या जमाती तेथें आहेत. ह्या निरनिराळ्या जमातींची उत्पत्ति त्यांतील प्रत्येक एकाच कुटुंबांतील माणसें प्रथम तो करूं लागलीं ह्यापासूनच झाली असली पाहिजे.

धंदे कुटुंबांपासून उत्पन्न झाले हें इतरत्र त्यांच्या वसतिस्थानावरून दिसून येतें. कारण जमाती जर आसांच्या समूहांपासून उत्पन्न झालेल्या असतील तर विशिष्ट धंदेवाले एकमेकांच्या सन्निध रहावे हें साहजिकच दिसतें. कायरो शहरीं हें वसतिसान्निध्य अद्यापि नजरेस पडतें. ब्रह्मदेशांतहि असेंच आहे. आणि सैबिरियामध्येंहि तसेंच आहे. निजनिनॉव्हगोराड ह्या शहरीं निरनिराळ्या रस्त्यांचीं नावें तेथें विकल्या जाणाऱ्या जिनसांवरून पडलेलीं आहेत. आणि प्राचीन इंग्लंदमध्येंहि असेंच असे. केम्बल म्हणतो कीं, चाम्हारगल्ली, घोडगल्ली, मासगल्ली, जोडेगल्ली, ढालगल्ली, इत्यादि जीं नांवें निरनिराळ्या धंद्यांवरून निरनिराळ्या रस्त्यांना दिलेलीं आढळून येतात तीं नार्मनलोकांनीं इंग्लंद

जिंकिलें त्याच्या पूर्वीपासून अस्तित्वांत आहेत. आतां, नेहमींप्रमाणें, ज्याची उत्पत्ति प्रथम रूढी म्हणून झाली त्यास पुढें कायद्याचें स्वरूप आलें. कारण सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं इंग्लंदांत असा कायदा पसार केला कीं, चीपसाइड व लांबर्ड स्ट्रीट ह्या रस्त्यांवरील सोनार-आळींत सोनार आणून भरावे; आणि हें करण्यांत जे म्युनिसिपल हपीसर कसूर करितील त्यांस दंड करावे.

ह्या सर्व गोष्टी निरनिराळ्या ठिकाणच्या व काळ-च्या जातींमध्यें दिसत असल्यामुळें आपणास असें अनुमान करणें भागच आहे कीं, जमाती ह्या सर्वांना सामान्य अशा कांहीं घटनेपासून उत्पन्न झाल्या असल्या पाहिजेत, आणि वाढत जाणारा कुटुंबसमूह हीच ती घटना असली पाहिजे.

६७. जमातीची मूळ स्वरूपीं उत्पत्ति आप्तसमूहापासून झाली ह्याविषयींच्या पुराव्यापैकीं अत्यन्त बळकट पुरावा म्हटला म्हणजे ज्या धार्मिक बंधानें त्यांतील घटक एकत्र राहत तो बंध होय; आणि हा बंध ते लोक सर्वांनीं मिळून पूजा करण्याकरितां एकत्र जमत ह्यावरून व्यक्त होतो. यूरोपीय राष्ट्रांत ही गोष्ट तेथें ख्रिस्ती धर्म चालू होण्याच्या पूर्वी दिसत असे, कारण, त्या वेळीं कुटुंबांतील वडील पुरुष पूर्वजांच्या भुतांना बळी देत असे, व कुटुंबांतील इतर सर्व माणसें तेथें तेव्हां जमत असत. पुढें जेव्हां ख्रिस्ती धर्म सुरू झाला तेव्हां प्रार्थनेसाठीं तीं एकत्र जमूं लागलीं; म्हणजे पूर्वीची संवय कायमच राहिली.

समूहाच्या घटकांची ग्रामवस्ती बनली असो वा

करणारे वर्ग ह्या निरनिराळ्या जातीच आहेत, असें तिन्हाइतास वाटे. रोममध्यें असले कारागिरांचे विशिष्ट विभाग फार प्राचीन काळीं उत्पन्न झाले होते हें अक्राव्या कलमांत सांगितलेंच आहे.

आतां अर्वाचीन लोकांकडे वळूं. चीन देशांत पूर्वजपूजा इतकी प्रचलित असून कुटुंबघटना इतकी ठळक असल्यामुळें तेथें रेशमी कापड विणणारे, रंगारी, सोन्याचा वर्ख करणारे, लोहार, घिरटवाले, सुया करणारे, सुतार, गंवडी, न्हावी, जस्तवाले, मच्छीमार-होडीवाले, चहावाले, पेढीवाले, यांच्या जमाती तेथें आहेत. ह्या निरनिराळ्या जमातींची उत्पत्ति त्यांतील प्रत्येक एकाच कुटुंबांतील माणसें प्रथम तो करूं लागलीं ह्यापासूनच झाली असली पाहिजे.

धंदे कुटुंबांपासून उत्पन्न झाले हें इतरत्र त्यांच्या वसतिस्थानावरून दिसून येतें. कारण जमाती जर आसांच्या समूहांपासून उत्पन्न झालेल्या असतील तर विशिष्ट धंदेवाले एकमेकांच्या सन्निध रहावे हें साहजिकच दिसतें. कायरो शहरीं हें वसतिसान्निध्य अद्यापि नजरेस पडतें. ब्रह्मदेशांतहि असेंच आहे. आणि सैबिरियामध्येंहि तसेंच आहे. निजनिनॉव्हगोराड ह्या शहरीं निरनिराळ्या रस्त्यांचीं नावें तेथें विकल्या जाणाऱ्या जिनसांवरून पडलेलीं आहेत. आणि प्राचीन इंग्लंदमध्येंहि असेंच असे. केम्बल म्हणतो कीं, चाम्हारगल्ली, घोडगल्ली, मासगल्ली, जोडेगल्ली, ढालगल्ली, इत्यादि जीं नांवें निरनिराळ्या धंद्यांवरून निरनिराळ्या रस्त्यांना दिलेलीं आढळून येतात तीं नार्मनलोकांनीं इंग्लंद

जिंकिलें त्याच्या पूर्वीपासून अस्तित्वांत आहेत. आतां, नेहमींप्रमाणें, ज्याची उत्पत्ति प्रथम रूढी म्हणून झाली त्यास पुढें कायद्याचें स्वरूप आलें. कारण सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं इंग्लंदांत असा कायदा पसार केला कीं, चीपसाइड व लांबर्ड स्ट्रीट ह्या रस्त्यांवरील सोनार-आळींत सोनार आणून भरावे; आणि हें करण्यांत जे म्युनिसिपल हपीसर कसूर करितील त्यांस दंड करावे.

ह्या सर्व गोष्टी निरनिराळ्या ठिकाणच्या व काळ-च्या जातींमध्यें दिसत असल्यामुळें आपणास असें अनुमान करणें भागच आहे कीं, जमाती ह्या सर्वांना सामान्य अशा कांहीं घटनेपासून उत्पन्न झाल्या असल्या पाहिजेत, आणि वाढत जाणारा कुटुंबसमूह हीच ती घटना असली पाहिजे.

६७. जमातीची मूळ स्वरूपीं उत्पत्ति आप्तसमूहापासून झाली ह्याविषयींच्या पुराव्यापैकीं अत्यन्त बळकट पुरावा म्हटला म्हणजे ज्या धार्मिक बंधानें त्यांतील घटक एकत्र राहत तो बंध होय; आणि हा बंध ते लोक सर्वांनीं मिळून पूजा करण्याकरितां एकत्र जमत ह्यावरून व्यक्त होतो. यूरोपीय राष्ट्रांत ही गोष्ट तेथें ख्रिस्ती धर्म चालू होण्याच्या पूर्वी दिसत असे, कारण, त्या वेळीं कुटुंबांतील वडील पुरुष पूर्वजांच्या भुतांना बळी देत असे, व कुटुंबांतील इतर सर्व माणसें तेथें तेव्हां जमत असत. पुढें जेव्हां ख्रिस्ती धर्म सुरू झाला तेव्हां प्रार्थनेसाठीं तीं एकत्र जमूं लागलीं; म्हणजे पूर्वीची संवय कायमच राहिली.

समूहाच्या घटकांची ग्रामवस्ती बनली असो वा

नगरवस्ती बनली असो, त्यांच्यांत असलेच संबंध असल्याच रीतीनें उत्पन्न झाले व कायम राहिले. कांहीं राष्ट्रांचे इतर राष्ट्रांनीं वरचेवर पराजय केल्यामुळें आणि त्या कारणानें सामाजिक घोंटाळे उत्पन्न झाल्यामुळें ह्याविषयींचा पुरावा अस्पष्ट झाला आहे. पण त्यांतील कांहीं एथें देऊं. मेक्सिकोविषयीं लिहितांना प्रेस्कॉट म्हणतो कीं, तेथील निरनिराळ्या व्यापारांची रचना कांहीं अंशीं जमातीच्या धर्तीवर झालेली होती; त्यांतील प्रत्येकास शहरचा स्वतंत्र भाग नेमून दिलेला असे, त्याचे स्वतंत्र नाईक, स्वतंत्र देव, स्वतंत्र उत्सव वगैरे असत. मुन्हर्स साहेब ह्यांच्यापासून फार दूर प्रदेशांत राहणाऱ्या फिनिश्यन लोकांविषयीं असलीच हकिकत सांगतो. तो म्हणतो, जेथें पुष्कळ फिनिश्यन व्यापारी रहात तेथें त्यांनीं स्थावर इस्टेट मिळविलेली असे, आणि जमातीचे सामान्य व विशेष हक्क संपादन केलेले असत. उदाहरणार्थ, मेम्फिस व जरुशलेम एथें अशी स्थिति असे, आणि त्याठिकाणीं त्यांचीं वसतिस्थानें इतरांपासून अगदीं स्वतंत्र असून त्यांच्या राष्ट्रीय देवांचीं देवळेंहि असत. ह्या जमाती प्रत्येक फिनिश्यन शहरवाल्यांच्या पृथक् असत; कोठें निरनिराळ्या शहरांतील फिनिश्यन लोक एकत्र राहिल्यास त्यांच्या तितक्या निरनिराळ्या जमाती असत. प्रारंभीच्या इंग्लिश लोकांमध्यें असलेच संबंध दिसून येत. ब्रेन्टानो म्हणतो कीं, त्यांच्यांत धंदेजमाती इतर जमातींसारख्याच धार्मिक जमातीहि असत. उदाहरणार्थ, आबट्सबेरी एथील जमात क्यानूट राजाच्या वेळापासून अस्तित्वांत असून

तिचा उद्देश जमातीच्या दुबळ्या घटकांचें पोषण करणें, मेलेल्यांस मूठमाती देणें, त्यांच्यासाठीं प्रार्थना व इतर विधी करणें वगैरे असे. ह्या जमातींतील लोक सेंटपीटरच्या दिवशीं त्याचा उत्सव करण्यासाठीं एकत्र जमत. शिवाय ते एकत्र बसून जेवीत. एक्झीटर एथील जमात अगदीं अशाच प्रकारची होती; पण तिचा उद्देश एकत्र जमून पूजा व प्रार्थना करणें हा विशेष ठळक असे. हा धार्मिक विशेष पुष्कळ काळपर्यंत कायम राहिला हें मिसेस ग्रीनच्या पंधराव्या शतकाच्या इतिहासावरून स्पष्ट दिसतें. पण त्याच्या मूलस्वरूपीं ह्या कुटुंबसमूहाला केवळ धार्मिक स्वरूपच असे असें नाहीं, तर राजकीय स्वरूपहि असे; आणि त्यामुळें स्वतंत्र सामाजिक घटना उत्पन्न करण्याचें बीज त्याजमध्यें दिसे.

६८. हे प्रारंभींचे समूह अर्धवट राजकीय स्वातंत्र्य उपभोगीत ह्याचें कारण त्यांच्यांत परस्पर वैरें असत हें होय. रानटी लोकांच्या टोळ्या शेजारीं शेजारीं असल्या म्हणजे त्या एकमेकांच्या मुलखाचें अतिक्रमण करीत असल्यामुळें त्यांच्यांत सारखीं वैमनस्यें चालू राहतात.

ही स्थिति मोठालीं शहरें उत्पन्न झाल्यावरहि कांहीं अंशीं कायम राहते. म्हणून इंग्लंदांत पुष्कळ काळपर्यंत एका जिल्ह्यांतील व्यापारी दुसऱ्या जिल्ह्यांत गेल्यास त्यास परदेशांतील माणसासारखा वागवीत. उदाहरणार्थ, कनिंघाम म्हणतो कीं, नॉरिच जिल्ह्यांतील व्यापारी लंदनास गेला असतां त्यास बेल्जम किंवा फ्रान्स देशांतील व्यापाऱ्याप्रमाणें समजत. ह्याचा एक परिणाम असा झाला कीं, अशा माणसाशीं व्यवहार करावयाचा

तो म्युनिसिपालिटीच्या द्वारा करीत असत; आणि त्यास एकाद्या देणेंदारावर फिर्याद करावयाची असल्यास तीहि म्युनिसिपालिटीच्याच द्वारा करीत असत.

असें होण्यास अवश्यच जमातीची घटना व म्युनिसिपालिटीची घटना ह्या दोन्ही वस्तुतः एकच असाव्या लागत. क्यांटर्बरी, लंदन, विंचेस्टर वगैरे ठिकाणीं असलेल्या जमाती बऱ्याच अंशीं स्थानिक व्यवहार पाहणाऱ्या संस्था असत. पुष्कळ ठिकाणीं जमातीचे घटक व शहरचे रहिवाशी हे बहुतेकांशीं एकच असत; आणि चवथ्या एडवर्डच्या कायद्यानें शहरचा कारभार पाहण्याचा अधिकार वस्तुतः धंदेवाले व कळाकुसरीवाले ह्यांसच दिला होता. ब्रेन्टानो सांगतो कीं, शहरांत कांहीं ठराविक किमतीची जमीन धारण करणारे पूर्ण नागरिक म्हणून समजले जात, आणि त्या सगळ्यांची मिळून एक जमात बने, आणि जमातीचा कायदा तोच शहरचा कायदा असे.

परंतु, उत्क्रान्तिनियमास अनुसरून, वाढ जशी मोठी होत गेली तशी ही प्राथमिक एकरूपता जाऊन विविधरूपता उत्पन्न होऊं लागली हें ह्यावरून दिसतें कीं, लंदनांत राजकीय कारभार औद्योगिक कारभारापासून इतक्या लौकर भिन्न झाला कीं प्रारंभींच्या जमातव्यापाऱ्याचा मागमोस तेथें बहुतेक मुळींच दिसत नाहीं. शिवाय आपल्या नजरेस असें येतें कीं सर्व प्रकारच्या नियमांची उत्पत्ति एकाच प्राथमिक नियमनापासून विभिन्नीकरणानें झालेली आहे ह्या सत्याच्या सामान्य निदर्शनाप्रमाणें विशिष्ट निदर्शनेंहि दृष्टीस प-

डतात. पूर्व यूरोपांतिल संस्थानांप्रमाणें कमी पुढें गेलेल्या समाजांत पूर्वीची ज्ञातिघटना म्युनिसिपल व व्यापारविषयक घटनांमध्यें अद्यापिहि दिसून येते.

६९. आतां ह्या व्यापारी जमातींच्या उद्यमविषयक स्वरूपांकडे पाहतां पहिली गोष्ट आपल्या ध्यानांत पुनः अशी येते कीं औद्योगिक शासन हें राजकीय शासनाच्या अंकित असतें. ह्या जमातींस संयुक्त स्वरूप सनदांनीं आलें; व ह्या सनदा प्रारंभीं मुख्य उपाध्या, किंवा जमीनदार, किंवा मठाधिपति वगैरेपासून विकत घेत असत, व मागाहून जेव्हां ह्यांचेच राजे बनले तेव्हां राजांपासून विकत घेऊं लागले. असल्या सनदेनें कामगार निवडण्याचा, व्यापार चालविण्यास अधिकार देण्याचा, आणि उद्यमविषयक नियम बनविण्याचा, अधिकार जमातीस मोबदला घेऊन राजा देत असे. उघडच जमाती जेव्हां वस्तुतः म्युनिसिपालिट्याच असत तेव्हां हें अर्धवट राजकीय स्वरूप त्यांच्या अंगीं आलें, आणि पुढें जेव्हां त्या त्यांजपासून भिन्न झाल्या तेव्हां देखील तें स्वरूप त्यांच्या अंगीं बऱ्याच अंशीं कायम राहिलें. ह्याबद्दलचा एक पुरावा असा सांपडतो कीं त्यांचे स्वताचे कायदे व कोर्टें असत, व त्यांत दिवाणी खटल्यांचा निकाल होत असे.

प्रारंभीं ह्या व्यापारी जमातींत विशिष्ट ठिकाणीं धंदा करणाऱ्या सर्व व्यापाऱ्यांचा समावेश होत असे. त्यांतील प्रत्येकजण जी चीज तो विकीत असेल तिचा बनवणारा असे, कारण बऱ्याच प्रमाणावर जिन्नस बनविणाऱ्या कारागिरापाशीं पुरेसें सामानसुमान आणि माणसें असून

तो त्यांच्यांतून नवे कारागीर बनवीत असे. तो जमातीचा घटक असल्यामुळें जमातीचे हक्क त्याच्या बायकोस, मुलींस, व मोलकरणींस प्राप्त होत असत, आणि बहुतेक ठिकाणीं त्याच्या विधवेलाहि प्राप्त होत. पण प्रारंभीं प्रत्येक धनी जरी कामकरी असे तरी कालेंकरून शहरें जशीं वाढत गेलीं, आणि कांहीं धंद्यांची इतरांहून ज्यास्त भरभराट झाली तसे त्यांच्यांत भेद उत्पन्न होऊं लागले; म्हणजे, विभिन्नीकरणास सुरवात झाली. ते जमातीचे शास्ते बनल्यामुळें जमातींत सरदारवर्ग उत्पन्न झाला. आणि कामकऱ्यांच्या वर्गापासून भिन्न असा धनीवर्ग जसा उत्पन्न होत गेला तसा तो जमातीचे हक्क आपल्याचकडे घ्यावयास, आणि कामकऱ्यांस मोठी प्रवेशफी वगैरे ठेवून तिजपासून वगळावयास पाहूं लागला. उदाहरणार्थ, स्काटलंदांत असा नियम असे कीं जो स्वतः आपल्या हातांनीं आपला धंदा करावयाचें सोडून मजुरांकडून करवील त्यासच जमातीचा घटक करावें.

अशा रीतीनें बनलेलीं व वृद्धिंगत झालेलीं जीं संयुक्त मंडळें तीं आपल्या घटकांचें इतरांपासून संरक्षण करीत असून ते आजारी किंवा गरीब असल्यास त्यांस मदत करीत असत, आणि त्यांच्यावर कांहीं योग्य नियंत्रणें घालीत; तरी त्यांचा मुख्य उद्देश कृत्रिम हक्क मिळवून ते संभाळावयाचे हा असे. ह्यांतील मुख्य हक्क सर्व प्रकारचे पदार्थ विकण्याचा व विकत घेण्याचा हा असे, आणि त्यांचा मुख्य उद्योग सर्व व्यापारावर नजर ठेवून हे त्यांचे हक्क जो कोणी मोडील त्यास दंड करून किंवा इतर रीतीनें शिक्षा करणें हा असे.

आणि एकट्याच्याच विशिष्ट हक्कांचें संरक्षण व संवर्धन करीत असतां ह्या मंडळांचा सहजच इतरांशीं विरोध उत्पन्न होई; ते इतर म्हटले म्हणजे म्युनिसिपलमंडळें, आणि असंयुक्त कामकरी वर्ग. ह्याचें अगदीं प्राचीन उदाहरण म्हटलें म्हणजे बाहेरून शहरांत आलेल्या कारागिरांचें होय. उदाहरणार्थ, विंचेस्टर, मार्लबरो, आक्सफर्ड, बिव्हरली, वगैरे अनेक शहरांतून वीणकरास नागरिकाचा हक्क मिळूं नये म्हणून फारच खबरदारी घेतलेली होती, आणि त्यामुळें कोर्टांतून नागरिकाविरुद्ध त्याची फिर्याद चालत नसे. पुढें विणकरांनीं पैसे भरून राजाकडून नागरिकाचे हक्क विकत घेतले, व मग त्यांस त्यांच्यावर फिर्याद करतां येऊं लागल्या. ह्याप्रमाणेंच देशी कामकरी आपलीं मंडळें बनविण्याचे हक्क विकत घेऊं लागले; उदाहरणार्थ, चवथ्या एडवर्डाच्या कारकीर्दींत एक्झीटरच्या शिंप्यांनीं तसें केलें.

परंतु एथें आपल्यास मुख्यत्वेंकरून ध्यानांत आणावयाची गोष्ट ही आहे:—ह्या स्थानिक औद्योगिक सरकारांनीं असें गृहीत केलेलें दिसतें कीं. कोणताहि उद्योग करणें हा प्रत्येकाचा नैसर्गिक हक्क नसून तो नागरिकानें विकत घेतला पाहिजे. फ्रान्सांत राजांच्या अमदानींत असा स्पष्ट नियम होता कीं, मेहनत करण्याचा हक्क हा राजाचा हक्क आहे, व तो त्याच्यापासून लोकांनीं पैसे देऊन विकत घेतला पाहिजे; हें ऐकून आपणास आश्चर्य वाटतें, पण पूर्वी जमातीहि असाच हक्क सांगत असत, व तो नागरिक होऊं पाहणाराला विकीत असत, हें ध्यानांत आणिलें म्हणजे तें आश्चर्य कमी होतें.

७०. पुढच्या पायऱ्यांवर ज्यास्त ज्यास्त विभिन्नीकरण आणि त्यामुळें वाढती विविधजातीयता हीं दिसून येऊं लागलीं. उदाहरणार्थ, व्यापारीजमात प्रथम सर्व नागरिकांची बनलेली असून मागून जशी ती त्यांजपासून भिन्न झाली, तशा नंतर तिच्या ऐवजीं निरनिराळ्या धंद्यांच्या पृथक् धंदेजमाती उत्पन्न झाल्या. त्या उत्पन्न करण्यास अनेक कारणें एकत्र जुळलीं. पूर्वी पौर्वात्य व पाश्चात्य दोन्ही देशांत शहराच्या निरनिराळ्या भागीं निरनिराळे आप्तसमूह निरनिराळे धंदे करीत एकत्र रहात असें आळ्यांच्या वगैरे नांवांवरून पूर्वी दाखविलेलेंच आहे. ह्या सर्व धंदेवाल्यांचें पूर्णपणें जमत नसे हें उघडच दिसतें; म्हणजे, त्यांच्या जमाती निरनिराळ्या बनण्यास मुळांत कारण होतें हें स्पष्ट दिसतें.

जोंपावेतों शहरें लहान होतीं आणि हे धंदेवाल्यांचे समूह प्रत्येकीं लहान होते तोंपावेतों त्यांचा सामान्य संयोग कायम राहिला; आणि पुढें जेव्हां त्यांच्यांत व्यापारी व कामकरी असा ज्ञातिभेद उत्पन्न झाला, तेव्हांहि तो तसाच राहिला. पण पुढें जेव्हां शहरें मोठालीं झालीं तेव्हां जमातीच्या घटकांमध्यें आपापसांत मत्सर उत्पन्न होऊन त्याचा परिणाम असा झाला कीं, प्रत्येक धंद्याची स्वतंत्र जमात बनावयास लागली. ह्यास अनुकूल असें आणखी एक कारण झालें.

शहराच्या ज्यास्त वाढीबरोबर त्याच्या कारभाराचें काम-मग तें म्युनिसिपालिटी करीत असो, व्यापारी जमात करीत असो, वा दोघेंहि करीत असोत—वाढलें व संकीर्ण झालें, आणि म्हणून त्याचे पोटविभाग के-

ल्याशिवाय तें करतां येईनासें होऊं लागलें. म्हणून ह्या दोन्ही प्रकारच्या सामान्य स्थानिक सरकारांपैकीं प्रत्येकास आपले कांहीं अधिकार विशिष्ट स्थानिक सरकाराकडे सोंपविणें बहुतेकांशीं भागच पडूं लागलें. उदाहरणार्थ, असें म्हणतात कीं, लंदन शहरांत पूर्वीं अस्तित्वांत असलेल्या अधिकाऱ्यांनीं धंदेजमाती स्थापन केल्या, आणि त्यांस शहरच्या अधिकाऱ्यांनीं किंवा स्थानिक जमात-व्यापाऱ्यानें आपले कांहीं विशिष्ट अधिकार सोंपवून दिले. बीव्हर्ली शहराविषयीं चवदाव्या शतकांतील असें एक विधान आढळतें कीं. तेथील व्यापारी जमातीचें एक काम असें असे कीं, लहान लहान जमाती नेमून त्यांचा एक अध्यक्ष नेमावयाचा; ह्यामुळें प्रत्येक प्रकारच्या धंद्याचे स्वताचे कायदे असत, मात्र त्यांच्यावर बारा सुभेदारांची देखरेख असे, व त्यांस ते नियम पसंत पडावे लागत. कांहीं ठिकाणीं विशिष्ट धंदेजमातींना हे अधिकार म्युनिसिपालिट्यांनीं दिलेले असत. उदाहरणार्थ, एक्सीटर शहरांत चाम्हारांच्या जमातीस आपले हक्क प्रतिवर्षीं तेथील म्युनिसिपल अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करावे लागत व दंड भरून त्यांस ते पुनः विकत घ्यावे लागत. तथापि पुढें ज्यास कायद्याचें स्वरूप येतें तें प्रारंभीं रूढीच्या स्वरूपानें पुष्कळ काळ अस्तित्वांत असतें. हा सामान्य नियम आपण ध्यानांत ठेविल्यास आपल्यास असें अनुमान करतां येईल कीं, सामान्यतः धंदेजमाती म्युनिसिपालिट्यांनीं वगैरे नवीनच उत्पन्न केलेल्या नसून त्यांस त्यांजकडून अधिकार मिळण्यापूर्वीं त्या पुष्कळ-

काळपर्यंत अस्तित्वांत असल्या पाहिजेत. ही गोष्ट एक्सीटरच्या चाम्हारांच्या वरील उदाहरणावरूनच स्पष्ट होते.

आतां ह्या धंदेजमाती सार्वजनिक फायद्यासाठीं न बनतां त्या त्यांच्या घटकांच्याच फायद्यासाठीं बनत असत हें एरवीं देखील स्पष्टरीत्या नजरेस येतें. उदाहरणार्थ, बाराव्या शतकांत सोनार, खाटीक, हातमोजे विणणारे, चाम्हार वैगेरे लोकांनीं राजाच्या परवानगीविना आपल्या जमाती केल्याबद्दल त्यांस दंड झालेले आढळून येतात. अशा रीतीनें केवळ धंदेवाल्यांनींच पृथक् पृथक् जमाती बनविल्या असें नाहीं, तर त्यांच्या मालकांनींहि बनविल्या. उदाहरणार्थ, तिसऱ्या एडवर्डाच्या कारकीर्दीत व्यापाऱ्यांच्या कंपन्यांच्या जमाती बनल्या, आणि रूढीस कायद्याचें निश्चितस्वरूप देण्याचा कल जो सर्वत्र दृष्टीस पडतो त्यास अनुसरून असा कायदा केला कीं, व्यापाऱ्यांनीं प्रत्येकीं एकाच कोणत्या तरी जिनसाचा व्यापार करावा, आणि कारागिरांनींहि प्रत्येकीं एकेक प्रकारचाच जिन्नस तयार करावा. ह्याचा परिणाम सहजच असा झाला कीं मूळच्या व्यापारी जमातींचें सामर्थ्य कमी होऊं लागलें, आणि शेवटीं ती जमातच नाहींशी झाली.

ह्या धंदेजमातींचे नियामक व्यापार अंतर्बाह्य असत. आंतून त्या धंद्याच्या रूढींना निश्चित स्वरूपें देत, आणि ते मोडणाऱ्या जमातीच्या घटकांना शिक्षा करीत. एकमेकांशीं अयोग्य चढाओढ बंद करण्यासाठीं त्या हलक्या जातीचा कच्चा माल वापरण्याची त्यांस मनाई करीत, एकमेकांचे तयार होत असलेले विद्यार्थी फूसलावून

नेऊं देत नसत, आणि रात्रीचें काम करूं देत नसत. गुन्हा करणाऱ्या घटकांना पकडण्याकरितां ते पकड्ये नेमीत, आणि कधीं कधीं काम बंद ठेवावयाचे किंवा सुट्ट्यांचे दिवसहि ठरवीत. पण त्यांचे मुख्य उद्देश जमाती बाहेरच्यांना आपल्याशीं चढाओढ करूं न देणें, आणि जमातीच्या घटकांना फायदा मिळत असेल त्यांत कमतरता पडूं नये म्हणून त्यांची संख्या बेताबाहेर वाढूं न देणें, हे असत. म्हणून शिप्य कोणत्या अटींवर घ्यावयाचे, आणि बाहेरचे लोक कोणत्या अटींवर लावावयाचे हें जमात ठरवून ठेवी. ते शिप्यांस मालक होऊं देत नसत, घटकांच्या मुलांना तेवढे जमातीचे हक्क देत. द्रव्याविषयक व इतर अडथळे उत्पन्न करून जमातीचा घटक होणें त्या दुर्घट करून टाकीत. जमातीचे घटक नसणाऱ्या कामकऱ्यांना जमात बनवूं देत नसत; आणि कोणीं कोणीं काय काय धंदे करावे ह्याबद्दल जमातीजमातींमध्यें तंटे उत्पन्न होत.

तद्वतच हीहि गोष्ट आपण ध्यानांत आणण्यास विसरतां कामा नये कीं औद्योगिक सरकार आणि राजकीय सरकार ह्यांचा मूळचा संयोग अनेक रीतींनीं दिसून येई. जमातींचे घटक तेवढे शहरांतील स्वतंत्र नागरिक समजले जात, व त्यांसच निवडणुकीचा हक्क असे. जमातींचे पुढारी असतील तेच शहरांतील मुख्य अधिकारी असत. आणि कोठें कोठें जमातींच्या स्वाधीन म्युनिसिपालिट्याहि आपले कांहीं अधिकार करीत असत.

७१. ह्या स्थानिक औद्योगिक संस्थांचें हें संक्षिप्त वर्णन आधींच संकीर्ण झालेलें आहे, पण त्यांच्या अनेक

पोटप्रकारांचें जर वर्णन त्यांत घातलें असतें तर तें आणखीच संकीर्ण झालें असतें. कारण निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या परिस्थितींत निरनिराळ्या वेळीं त्यांना कमज्यास्त भिन्न स्वरूपें प्राप्त झालेलीं आहेत. तद्वतच केवळ इंग्लंदांतीलच जमातींचें वर्णन न करतां शेजारच्या फ्रान्स वगैरे देशांतील जमातींचीं वर्णनें जर केलीं असतीं तर तें त्याहूनहि संमिश्र झालें असतें. पण त्यापासून उत्पन्न होणारी भावना वस्तुतः आहे तीच राहिली असती. फ्रान्सांत ही पद्धति इतकी वृद्धिंगत झालेली होती कीं, तेथें शंभर धंदेजमाती बनलेल्या होत्या. पारीसमध्यें त्यांचा व म्युनिसिपल संस्थांचा इतका निकट संबंध असे कीं अगदीं प्रारंभीं त्यांच्याकडे कांहीं पोलिसांचीं कामेंहि असत, आणि लढाईच्या वेळीं त्यांस किल्ले-संरक्षकांचें काम करावें लागे. तेथेंहि इंग्लंदप्रमाणें कांहीं काळ शिप्य बनून राहावें तेव्हां स्वतंत्र धंदा करण्याची परवानगी मिळे. धंद्याच्या मालकास एका वेळीं एकाहून अधिक शिप्य बाळगण्याची मनाई असे. कोणतें काम कोणीं करावें ह्याबद्दल जमातीजमातींमध्यें वरचेवर तंटे लागत.

जमाती जेव्हां अस्तित्वांत आल्या तेव्हां जो विरोध सामान्यतः सर्वत्र दिसत असे त्याचीच छाया त्यांच्या सामान्य धोरणांत दिसून येते. मोठाले समूह जी गोष्ट ज्यास्त दांडगाईच्या मार्गानें करीत तीच हे लहान समूह शांततेच्या मार्गानें करीत. आपल्या मुलखाचें संरक्षण करण्याकरितां किंवा ज्यास्त मुलूख मिळविण्याकरितां प्रत्येक राष्ट्र शेजारच्या राष्ट्रांशीं कलह करी; प्र-

त्येक राष्ट्र जो मुलूख व्यापून असेल त्या मुलखांत सरदारांचे लष्करी जमीनदारीच्या पद्धतीनें धारण केलेले जमिनींचे तुकडे असत, व ते श्रेष्ठत्व किंवा दुसरा कांहीं फायदा मिळविण्याकरितां एकमेकांशीं लढत. नगरघटकजनसमूह कधीं कधीं आपल्या असल्या जमीनदारांशीं झगडा करीत, आणि इतर शहरच्या लोकांस बहुधा वैर करणाऱ्या परकीयांप्रमाणें समजत. आणि प्रत्येक शहरांत व्यापाऱ्यांच्या ज्या पृथक् मंडळ्या उत्पन्न झाल्या त्या परकीयांशीं वैरभाव करून एकमेकांशींहि कमज्यास्त प्रमाणानें वैर करीत असत.

परंतु आपल्यास मुख्यतः ध्यानांत ठेवावयाची गोष्ट ही कीं, प्रत्येक जमात आपल्या घटकांच्या हिताच्या संरक्षणार्थ एकीकडे स्वसंरक्षण व परातिक्रमण अशा साधनांनीं झगडत असतां, दुसरीकडे घटकांना जमातींच्या जबरीच्या शासनाला नमून रहावें लागे. पोटास मिळविण्याचा धंदा ज्यास करावयाचा असेल त्यास जमातीचा घटक बनणें आणि तिच्या संधारणार्थ कर देणें जरूर असे. जमातीच्या अधिकाऱ्यांना नमून असणें आणि त्यांनीं ठरविलेल्या कायद्याप्रमाणें वागणें हें त्यांस अगदीं आवश्यक असे. प्रत्येक जमातबंधूनें काम कसें करावें व व्यापार कसा करावा ह्यासंबंधानें अनेक प्रकारच्या मर्यादा घालून दिलेल्या होत्या. कोणी कांहीं नियम मोडतो कीं काय हें पाहण्यासाठीं हेर नेमिलेले असत, आणि कोणीं कांहीं नियम मोडेल्याचें ठरल्यास त्यास दंडाधी किंवा दुसरी कांहीं शिक्षा करीत.

एवंच ज्यास 'स्वतंत्र नागरिक' म्हणून म्हणत तो फार संकुचित अर्थींच स्वतंत्र असे. एकंदर जीवितक्रमाच्याच संबंधानें नव्हे तर धंदा करण्याच्या संबंधानेंहि तो जसा देशाच्या सरकारच्या हुकमांच्या आधीन असे तसा ह्या स्थानिक औद्योगिक सरकाराच्या हुकमाच्याहि आधीन असे.

प्रकरण पंधरावें

गुलामगिरी

७२. गेल्या चार प्रकरणांत औद्योगिक नियमनाच्या ज्या बाबींचा विचार केला त्यांच्याबरोबर अन्य प्रकारची एक बाब होत होती; ती आतांपर्यंत सोईसाठीं ध्यानांत घेतलेली नव्हती, म्हणून आतां तिचा प्रारंभापासून मागमोस लाविला पाहिजे.

सामाजिक उत्क्रमणाच्या ज्या स्वरूपांचा आपण ह्या ठिकाणीं विचार करणार आहों तीं बरोबर लक्षांत येण्यास आधुनिक कालच्या मनोभावनांनीं उत्पन्न होणारे कांहीं पूर्वग्रह आपण अगोदर आपल्या मनांतून काढून टाकिले पाहिजेत. प्रत्येक राष्ट्रास जसा आपला धर्म तेवढाच सयुक्तिक वाटत असतो, तशाच आपल्याच तेवढ्या सामाजिक व्यवस्था प्रत्येकास योग्य व बरोबर म्हणून वाटत असतात. रूढीवरून उत्पन्न झालेले मनोविकार व दृढ समज असे कांहीं बलवत्तर असतात कीं, तेणेंकरून सत्यसमज उत्पन्न होणें बहुतेक अशक्य होऊन जातें.

आलीकडच्या काळांत संवयीवरून अशी कल्पना उत्पन्न झालेली आहे कीं, गुलामगिरी ही अपवादरूप संस्था आहे; पण सर्व समाजांचा सर्व काळचा विचार करतां असें दिसतें कीं, गुलामगिरी ही नियमरूप आहे, आणि स्वातंत्र्य हें अपवादरूप आहे. रूढ कल्पना अशी आहे कीं गुलाम हा अवश्यच पायांखालीं तुडविला जाणारा प्राणी असतो, पण पुष्कळ ठिकाणीं त्याची

चांगली काळजी घेतली जात असते, त्यास फाजील काम दिलें जात नाहीं, आणि त्याला कडक रीतीनें वागविलें जात नाहीं. गुलामांच्या स्वातंत्र्यविषयक कल्पना आपल्यासारख्याच असतात असें गृहीत करून आपण अशी कल्पना करीत असतों कीं, त्यांस स्वेच्छाचारी अंमल अगदीं नकोसा झालेला असतो; पण त्यांस आपली पराधीनता कधीं कधीं इतकी अल्प वाटत असते कीं, ते ज्यांना धनी नाहीं अशा आपल्या जातिबांधवांची थट्टा करीत असतात. त्यांच्या परिस्थितींत आपल्या मनोवृत्ती जशा प्रकारच्या होतील तशाच त्यांच्याहि असतील असें गृहीत करून ते दुःखी असलेच पाहिजेत असें आपण समजतों; पण पुष्कळ वेळां ते आमच्यापेक्षांहि ज्यास्त आनंदी दिसतात. शिवाय, आपण जेव्हां स्वतंत्र माणूस व गुलाम यांची तुलना करितों, तेव्हां स्वतंत्र माणूस हा स्वताचा मालक असतो असें आपल्यास वाटतें; पण पुष्कळ वेळां गुलामावर त्याचा मालक जितका कडक धनीपणा चालवीत असेल त्याहून ज्यास्त कडक धनीपणा सभोंवतालची स्थिति स्वतंत्र माणसावर चालवीत असतो; कारण पुष्कळ वेळां माणसाच्या जबरदस्तीहून सृष्टीची जबरदस्ती ज्यास्तकडक असते. नेहमीं लोक अशी चुकीची कल्पना करून चालत असतात कीं, हल्लीं जशी मजुरांची स्वतंत्रस्थिति आहे तशीच प्रारंभींच्या पायऱ्यांवरहि होती; पण पैसा अस्तित्वांत येण्यापूर्वीं मजुरी देणें बहुतेकांशीं अशक्यच असतें; कारण कामकऱ्यास अन्न, वस्त्र, आणि रहाण्यास निवाऱ्याची जागा यांखेरीज इतर कांहीं देतां येत नाहीं.

शिवाय लोक असें गृहीत करितात कीं आपल्यामध्यें मजुरांना श्रम करण्याचें किंवा न करण्याचें स्वातंत्र्य असल्यामुळें जसें समाजाहित साधतें तसें सर्वत्र व सर्वकाळीं साधत असेल; पण प्रारंभींच्या पायऱ्यांवर कामाचें वळण न लागलेला प्राथमिक माणूस सारखे श्रम करण्यास राजी नसतो, आणि ज्या लक्ष लावून सारखें काम करण्याच्या संवयीमुळें हल्लींची सुधारलेली स्थिति शक्य झालेली आहे ती संवय जबरीच्या अमदानींतच प्राप्त होत असते.

तेव्हां एथवर आपल्या समजुतींत काय काय फेरबदल केले पाहिजेत हें जें सांगितलें तें ध्यानांत ठेवून आपल्या सामाजिक जीवितावरून जी दृष्टी आपली बनलेली आहे ती आपण सोडिली पाहिजे आणि सामाजिक जीविताच्या अन्य स्वरूपांत योग्य अशा अन्य दृष्टींनीं उपलब्ध पुराव्याकडे पाहिलें पाहिजे.

७२. प्रारंभीच्या पायऱ्यांवर गुलामागिरीवरून कांहीं तरी कमीपणा, आणि विशेषतः शारीरिक कमीपणा व्यक्त होत असतो. असुधारलेल्या समाजांत आणि प्राचीन समाजांत मुलाची गुलामागिरी आणि पकडून आणिलेल्याची गुलामगिरी ह्यांवरून हें व्यक्त होत असतें. मुलांस मुलामांप्रमाणें वागविण्याची व त्यांस गुलाम म्हणून विकण्याची सत्ता त्यांच्या जीव घेण्याच्या किंवा ठेवण्याच्या सत्तेबरोबर सहजच आईबापांस असे. ह्या सत्तेचा उपयोग पुष्कळ रानटी व अर्धवट सुधारलेले लोक करीत असतात. उदाहरणार्थ, प्राचीन काळीं ज्यू लोक सावकारांचें देणें देण्याकरितां आपलीं मुलें विकीत असत, आणि

हल्लीं सर्केश्यन लोक आपल्या मुली विकीत असतात. ही सत्ता कधीं कधीं मुलांशिवाय इतरांवरहि चालवीत असतात. उदाहरणार्थ, ब्लांटायरमधील नीग्रो लोकांच्या संबंधानें डफ म्याकडोनाल्ड असें सांगतो कीं, त्यांच्यांत पुष्कळ वेळां कर्जदार सावकारास देण्याबद्दल आपले आप्त देतो; अशा घावयाच्या माणसांत बहिणी प्रथम येतात, मागाहून मुली येतात, नंतर भाऊ, आणि शेवटीं आई व बाप.

परंतु गुलामगिरी उत्पन्न होण्यास जें अत्यन्त सामान्य कारण होतें तें लढवय्येपणाच्या संबंधानें कमीपणा हा होय. ज्या पायऱ्यांवर लढाया म्हणजे व्यक्तीव्यक्तींचेच संग्राम असतात तेव्हां हा कमीपणा शक्ति किंवा चपळाई यासंबंधाचा असून तो कोणाकडे आहे हें संग्रामाच्या निकालावरून उघडच व्यक्त होत असतें. म्हणून असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, सामान्यतः गुलामगिरी हा एक लढाईचा परिणाम आहे.

गुलामगिरी उत्पन्न करणारा दुसरा कमीपणा म्हटला म्हणजे गुन्हा करणें हा होय. पुष्कळ लोकांत गुन्हेगारास गुलाम करीत असत, किंवा हल्लींहि करितात. ज्यू लोकांत चोरी करणारास गुलाम करीत. तद्वतच प्राचीन निकाराग्वामध्यें चोर चोरी करणाराचें नुकसान भरून देईपर्यंत कायद्यानें त्याचा गुलाम बनत असे. ग्वाटिमालामध्यें असेंच असे. हल्लीं आंगोलामध्यें बहुतेक प्रत्येक प्रकारच्या अपराधाबद्दल गुलामगिरीची शिक्षा देतात, व ती त्यासच देतात असें नाहीं तर त्याच्या कुटुंबांतील प्रत्येक माणसास देतात. प्राचीन काळीं

यूरोपांत अपराधांबद्दल गुन्हेगारांस गुलाम करीत असत, आणि ह्लींहि एका अर्थीं करितात; कारण ज्या कैद्यांस काम करावयास लाविलात ते सरकारचे गुलामच असतात. रशियामध्यें कैद्यांस खाणीवर काम करण्यास लावीत असल्यामुळें ते वस्तुतः गुलामच असत.

ह्याच्यामागून कर्जदाराची गुलामगिरी येते. कित्येक वेळां माणूस केवळ दुर्दैवानें कर्जदार बनत असतो, पण सामान्यतः कर्जबाजारीपणाचें कारण कांहीं तरी स्वाभाविक व्यंग हें असतें. इतर पुष्कळ लोकांप्रमाणें ज्यूलोकांत कर्जदारास सावकार गुलाम करूं शकत असे. उदाहरणार्थ, माथ्यूसच्या वेळीं दिवाळखोरांस त्यांच्या माणसांसहित विकतां येत असे, व तत्पूर्वी ही चाल पुष्कळ दिवस अस्तित्वांत होती. प्राचीन इंग्लिश लोकांतहि देणेंकऱ्यांस गुलाम बनविण्याचा घेणेंकऱ्यास अधिकार असे.

गुलामागिरीचीं दुसरीं आणखी दोन कारणें असून तीं वरच्याहून कमी सामान्य आहेत. पैकीं एक दुर्बलास चोरून नेणें हें होय; हा प्रचार जेथें गुलामागिरी ही एक औद्योगिक संस्था बनली होती तेथें उत्पन्न होऊं लागला. अफ्रिकेतील लोकांत आपणास कोणीं धरून नेऊं नये, ह्याबद्दल नेहमीं खबरदारी घ्यावी लागे. स्काटलंदांत थोड्या काळापूर्वीं लोकांस पकडून नवीन वसाहतींवर जहाजांत घालून पाठविण्याची चाल असे. गुलामागिरीस आणखी एक कारण कधीं कधीं फाजील कर द्यावयास लागल्यामुळें प्राप्त झालेलें दारिद्र्य हें होत असे. रोमनलोकांच्या अमलाखालीं हें कारण पुष्कळ ठिकाणीं झालेलें दृष्टीस

पडे. पुष्कळ लोक निर्दय करांनीं धुळीस मिळून उदरनिर्वाहासाठीं इतरांचे गुलाम बनत.

गुलामगिरीचीं निरनिराळीं कारणें अशा रीतीनें सांगून त्यांचीं एकेक दोन दोन उदाहरणें दिलीं; म्हणून आतां तिचें मुख्य कारण जी लढाई तिचा विचार करावयास लागूं. आणि उद्यमसंस्था म्हणून तिला काय काय स्वरूपें प्राप्त होतात तीं पाहूं.

७४. ज्या टोळ्या पारधीच्या पायरीच्या वर चढलेल्या नाहींत त्यांच्यांत जिंकलेल्यांस गुलाम बनविण्याची चाल फारशी दिसत नाहीं. अशा लोकांत जितांस जर खाऊन टाकिलें नाहीं तर दत्तक घेतात. औद्योगिक चळवळीच्या अभावीं गुलामांचा बहुतेक कांहींच उपयोग नसतो; आणि जेथें पारध दुर्मिळ असेल तेथें त्यांस खावयास घालाव्या लागणाऱ्या अन्नाइतकी देखील त्यांची किंमत नसते. पण जेथें चिनूक लोकांसारख्या मासे धरणाऱ्या टोळ्यांमध्यें पकडलेल्या माणसाचा उपयोग होऊं शकतो, किंवा जेथें धनगरी किंवा शेतकीची पायरी प्राप्त झालेली असते, तेथें जित माणसास जिवंत ठेवणें फायदेशीर होऊं लागतें; म्हणून त्यांस ओळखण्याजोगी अंगव्यंगरूपी कांहीं खूण करून त्याजवरून त्यांस कामास लावितात.

ह्याबद्दल प्रथम सांगावयाचीं उदाहरणें संक्रमणस्थितींतील म्हणजे ज्या स्थितींत कांहीं कैद्यांना खातात व कांहींस गुलाम करून ठेवितात त्या स्थितींतील आहेत. प्राचीन मेक्सिकोमध्यें अशी स्थिति असे; झुरिटा म्हणतो कीं तेथें गुलाम पुष्कळच असत; पण

क्राव्हिगारो म्हणतो कीं त्यावेळीं लढाईंत कैद केलेल्यांपैकीं बऱ्याच जणांस त्यांच्या नरभक्षकदेवांस बळी देत असत; आणि अर्थात् तो रक्तमांसरूपी नैवेद्य पुजारी सेवीत असत. फीजी बेटांत अर्वाचीन काळीं हीच स्थिति दृष्टीस पडे.

जेथें नरमांसभक्षण जोरांत नसेल किंवा नष्ट झालें असेल तेथें लढाईंत पकडलेल्या लोकांस घरगुती गुलाम करितात किंवा शेतगुलाम करितात, किंवा दोन्ही करितात. आफ्रिकेंतील डमारा नामक नीच स्थितींतील लोकांविषयीं असें सांगतात कीं ते आळशी लोक आहेत. त्यांच्यांत बायकांनीं करावयाचें काम गुलामांकडे सोंपवितात, व ते त्यांच्याच जातींतील गरीबीस आलेले लोक असतात किंवा पकडलेले जंगली लोक असतात. ह्याहून ज्यास्त पुढें गेलेल्या आफ्रिकेंतील समाजांत असलीच स्थिति दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, डेहामन लोकांविषयीं बर्टन म्हणतो कीं त्यांच्यांत शेतीच्या कामावर गुलाम लावीत असल्यामुळें त्या कामाचा इतर लोक तिरस्कार करितात. अशान्टीमध्येंहि लोकांजवळ हजारों गुलाम असून त्यांचा उपयोग धन्याची शेती करण्यांत किंवा उदीम करण्यांत लावितात.

आपल्या ह्या आशियाखंडांतहि ह्याचीं अनेक उदाहरणें दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ, बलुची लोक स्वतः शेतकी करीत नाहींत तर जुट म्हणून जित लोक त्यांच्यांत आहेत त्यांच्याकडून करवितात. लंकेमध्यें १८४५ सालापर्यंत याक्को व नाग ह्या मूळच्या लोकांचा असाच उपयोग करीत. टेनेंट म्हणतो कीं, सीलोनमध्यें

गुलामगिरी ही जातीवर अवलंबून असे; आणि जे जातीचे गुलाम असतील त्यांस आजन्म खपावें लागे. त्यांच्याच मेहनतीनें तेथील भव्य तलाव तयार झालेले होते.

प्राचीन काळीं लढाईपासून गुलामगिरी प्राप्त होई हें सर्व जातींच्या इतिहासांवरून दिसतें. अर्धवट स्वतंत्र अशा मुसलमान लोकांखेरीज इजिप्शन लोकांत एक गुलामवर्ग होता, आणि त्यांच्या लेखांवरून व चित्रांवरून पाहतां लढाईमुळें त्या वर्गांत वरचेवर भर पडत असे असें दिसतें. आसीरियन लोकांमध्येंहि असेंच होतें असें दिसतें. हीब्रूलोकांतहि ते इजिप्शन लोकांचे गुलाम होण्याच्या पूर्वी व नंतर थोडे-फार गुलाम बाळगीत असत.

रोमन लोकांत लढायांतून गुलाम करीत असून त्यांस जनावरांप्रमाणें काम करावयास लावीत. लेव्हासूर म्हणतो कीं, जर्मन लोकांनीं जेव्हां गॉलदेश जिंकिला तेव्हां सरकारी कारखान्यांतून, खासगी कुटुंबांतून, आणि जमातींतूनहि त्यांस गुलाम कामकरी दिसून आले; त्यांपैकीं कांहींजणांस त्यांनीं आपल्याकडे घेतलें, आणि स्वतंत्र कारागिरांपैकींहि कित्येकांना गुलाम केलें.

७५. कच्चा व पक्का प्रकारच्या गुलामगिरीमध्यें, म्हणजे ज्या प्रकारांत गुलामवर्ग लहान आणि फारसा भिन्नस्वरूप पावलेला नसतो त्या प्रकारामध्यें आणि ज्यांत तो मोठा आणि व्यवस्थित स्वरूपास पावलेला असतो त्यामध्यें, कांहीं भेद दाखवितां येईल.

प्राथमिक सामाजिक समूहांत गुलामांचे मोठाले जमाव बनूं शकणार नाहींत. व्यक्तिव्यक्तींनीं लढाईंत केलेले गुलाम टोळींत विखरलेले असतात. त्यांतील बा-

यका असतील त्या घरगुती काम करीत्त असून सामान्यतः रखेल्या म्हणून वागविल्या जातात, आणि पुरुष असतील त्यांना ज्यास्त जड कामें सांगतात. ह्या स्थितींत गुलाम व कुटुंबांतील माणसें ह्यांमध्यें स्पष्ट भेद दिसत नाहीं. हीब्रू लोकांत हुशार व विश्वासू गुलाम देखरेख्ये आणि मुख्य घरगुती नोकर ह्या पदवीस चढत असत. त्यांच्या कायद्यांवरून व रूढींवरून ते गुलामांस क्रूररीतीनें वागवीत नसत असेंच दिसतें. बर्कहार्ट म्हणतो कीं, आरब लोकांत गुलामांना चांगल्या रीतीनें वागवितात, कारण कीं, त्यांस वाईट रीतीनें वागविल्यास ते पळून जातील अशी त्यांस भीति असते. हारिस म्हणतो कीं, आबिसीनियन लोकांतहि गुलामांना कडक रीतीनें वागवीत नसत. हीब्रू लोकांप्रमाणें आफ्रिकन लोकांतहि कोठें कोठें गुलाम दत्तकमुलाच्या पदवीस चढतो. उदाहरणार्थ, आशान्टीमध्यें गुलाम कधीं कधीं आपल्या मृत धन्याच्या इस्टेटीचा वारस बनतो. लिव्हिंग्स्टन म्हणतो कीं, आफ्रिकेंत गुलाम धरून आणिला म्हणजे त्यास पहिल्यापासून मुलाप्रमाणें वागवितात, व तोहि आपल्या धन्यास व धनिणीस आईबापांप्रमाणें मानितो. त्यास आपल्या धन्यास सोडून राज्यांत पाहिजे तेथें जातां येतें. ह्यावरून ही घरगुती गुलामगिरी घरगुती नोकरीहून फारशी भिन्न दिसत नाहीं. कारण घरगुती नोकरास धन्याचे हुकूम मानावे लागत असून घरगुती गुलामाप्रमाणेंच एकसारखें खपावें लागतें. दोघांनाहि खावयास अन्न व रहावयास जागा द्यावी लागते; आणि नोकरास जरी पगार मिळतो

तरी त्यांतलि बराच वस्त्रप्रावरण विकत घेण्यांत खर्च होतो, व तें गुलामास आयतेंच मिळत असतें. शिवाय गुलामास मजुरी नाहीं तर चिरीमिरी मिळत असून पैसे जमविण्याची परवानगी असते. आतां नोकरास धन्याची नोकरी पाहिजे तेव्हां नोटी सदेऊन सोडतां येते हें जरी खरें आहे तरी एकाची सोडिल्यास दुसऱ्याची धरावी लागते.

पण दुसरे देश जिंकून जे समाज मोठाले झाले आहेत त्यांच्याकडे पाहतां ह्याच्याहून फार वाईट तऱ्हेची गुलामगिरी दृष्टोत्पत्तीस येते. अशा ठिकाणीं वस्ती पुष्कळ असते आणि शेतकी सुरू असते; म्हणून ज्यांचें काम घरांत नसेल त्यांस शेतावर पाठवितां येतें. अशा रीतीनें घरगुती गुलामांपासून भिन्न असा गुलामवर्ग हळूहळू उत्पन्न होतो. ही संक्रमणास्थिति मादागास्कारमध्यें दिसून येते असें वर्णन आढळतें. तेथें ज्यापाशीं गुलाम पुष्कळ असतील तो त्यांपैकीं कांहींस गुरांकडे लावितो, कांहींस बागेकडे लावितो, कांहींजण सर्पण गोळा करितात; आणि स्त्री-गुलामांपैकीं कांहीं सूत काढण्याचें, कापड विणण्याचें, आणि जाळीं बनविण्याचें काम करीत असून, कांहीं धुण्याचें व इतर घरगुती कामें करितात. पण तेथें गुलामांस बाहेरच्या कामास लावण्यापासून फार वाईट परिणाम झाला आहे; तो हा कीं, त्यांस ते बाहेर देशीं मालाप्रमाणें विकण्यासाठीं पाठवूं लागले आहेत. आफ्रिकेंत कोठें कोठें ही संस्था ह्याच्याहूनहि ज्यास्त वृद्धिंगत झालेली आहे. उदाहरणार्थ, मरुत्सेलोकांविषयीं होलब म्हणतो कीं, त्यांच्यांत शहरांसभोंवतीं खेडीं असून त्यांच्यांत हे गुलाम रहात असतात, आणि

तेथें ते धन्याचीं शेतें नांगरून त्याचीं गुरेंढोरेंहि पाळितात. आशान्टीमध्यें प्रत्येक सरदारापाशीं हजारों गुलाम असून त्यांचा उपयोग धन्याचीं शेतें करण्याकडे किंवा व्यापार करण्याकडे करितात.

प्राचीन काळीं ही गुलामगिरीची पद्धति फारच वृद्धिंगत झालेली होती. फिनिश्यन लोकांच्या शहरांबद्दल मुव्हर्स म्हणतो कीं, त्यांच्यांतील बरीच मोठी वस्ती गुलामांची असे आणि त्यांचा उपयोग शेतीखेरीज दुसऱ्या उद्योगधंद्यांकडे करीत असत. सगळे धंदे व कारखाने गुलामांनीं भरलेले असत, आणि लढाऊ व व्यापारी गलबतांवरहि हजारों गुलाम काम करण्यास असत. ग्रीसमध्येंहि असेंच असे. आथेन्समध्यें धनी आपल्या जमिनी आपणच लावीत असल्यास त्या कामीं तो पुष्कळ गुलाम लावीत असे, आणि त्यांच्यावर देखरेख करण्यासाहि गुलामच असे. रोममध्यें रोमन सरदारांच्या शेतीवर हजारों गुलाम खपत असत. ते फार असल्यामुळें त्यांच्यावर योग्य देखरेख ठेवणें कठीण पडे म्हणून त्यांच्या पायांत कधीं कधीं कामावर असतांनाहि बिड्या घालीत असत.

यूरोपखंड रानटी स्थितींत होतें तेव्हां घरगुती व शेती दोन्ही प्रकारची गुलामागिरी होती हें निःसंशय आहे; कारण गुलामागिरी उत्पन्न करणारे कलह तेथें तेव्हां सारखे सुरू असत. उदाहरणार्थ, प्राचीनकाळीं इंग्लंदांत गुलामांच्या बाजारांत क्रयविक्रय चालत असे, आणि बाहेर देशीं इतर मालाप्रमाणें ते विकण्यास पाठवीत असत. त्यांपैकीं कांहींजण जन्मतःच गुलाम असत, आणि कांहीं

स्वतंत्र नागरिक गरीबीमुळें आपणास विकून घेऊन गुलाम बनत असत.

आतां ख्रिस्ती लोकांत जर ही शेतगुलामांची चाल दिसत नाहीं, तर त्याच्याहूनहि रानटी अशी चाल दिसते. ती गुलाम पकडून आणणारांपासून ते विकत घेणें, आणि त्यांस आपल्या शेतांतून चाबकाच्या माराखालीं काम करावयास लावणें, ही होय.

७६. गुलामगिरीचा औद्योगिक संस्था या दृष्टीनें अद्यापि आपण फारसा विचार केलेला नाहीं. म्हणून त्या विषयाच्या स्पष्टीकरणार्थ एथें कांहीं महत्त्वाच्या गोष्टी सांगूं. गुलामगिरीच्या प्राथमिक स्वरूपावरून समाजाचा नियामक भाग कामकरी भागापासून भिन्नस्वरूप कसा होतो हें दिसतें.

एका माणसानें दुसऱ्यास आपल्या कामास लावावें ही प्रवृत्ति सर्वत्र दृष्टीस पडते. प्रारंभीच्या पायऱ्यांवर कामकरी त्याजकडून काम करून घेणारापेक्षां शारीरिक दृष्ट्या व बहुतकरून मानसिक दृष्ट्या कमी दर्जाचा असतो; म्हणून मेहनत करणें ही हीनत्वाची खूण बनून जाते. ह्यामुळें आळसास अभिमानाचा दुजोरा मिळतो. नंतर ह्यांत तिसऱ्या एका मनोवृत्तीची भर पडते. शत्रू व प्राणी ह्यांशीं लढणें हाच धंदा माणसांना योग्य म्हणून समजला जातो. अशा रीतीनें शास्ता लढवय्या वर्ग आणि शासित कामकरी वर्ग ह्यांच्यांत भेद उत्पन्न करण्यास तीन कारणें एकत्र होतात.

ह्या प्राथमिक विभिन्नीकरणाच्या मागून योग्य वाढ झाल्यास, दुय्यम विभिन्नीकरणें उत्पन्न होतात. उदा-

हरणार्थ, ग्रीसमधील गुलामगिरीच्या संस्थेबद्दल हीरेन असें म्हणतो कीं, गुलाम घरगुती, शेतकीचें, खाणींचें, आणि नावेवरील काम करीत असून बहुतेक प्रकारच्या कारखान्यांतूनहि त्यांस लावीत असत. ह्या कारखान्यांतून ते कामकऱ्यांप्रमाणें रावत इतकेंच नाहीं, तर देखरेख्यांचेंहि काम करीत; कारण मालकांस तें काम करण्याचेहि श्रम नको असत. रोममधील समाज ह्याच्यापेक्षांहि ज्यास्त युद्धशील असल्यामुळें तेथें हें पोटविभिन्नीकरण ह्याच्याहूनहि ज्यास्त ठळक दिसे. कारण तेथें हातकामाचे उद्योग करणारे व त्यांजवर देखरेख ठेवणारे तेवढेच गुलाम असत असें नाहीं, तर उदीम-व्यापार करणारे व निरनिराळे धंदे करणारे हेहि गुलामच असत. सारांश, लढाई व राज्यकारभार ह्याखेरीज इतर सर्व गोष्टी ते करीत असत; आणि त्यांची एकंदर घटनाहि लष्करी पद्धतीवरच असे.

ह्यानंतरच्या काळीं यूरोपभर लढाया सारख्या चालू होत्या तोंपावेतों अशासारखेंच विभिन्नीकरण तेथें उत्पन्न झालें; म्हणजे, यूरोपांतील प्रत्येक राष्ट्रांत पोषक वर्ग पोष्यवर्गापासून निश्चितपणें भिन्न झालेला होता.

७७. गुलाम व गुरूं ह्यांमध्यें ज्यांत मुळींच भेद समजला जात नाहीं असा जो गुलामगिरीचा अत्यन्त नीच प्रकार तो, व तिचा अत्यन्त सौम्य प्रकार ह्यांमध्यें अनेक पायऱ्या आहेत. म्हणजे, गुलामाची स्थिति स्वतंत्र माणसाच्या स्थितीपासून निरनिराळ्या अंशांनीं भिन्न असते.

जेथें राजकीय नियंत्रणें असत नाहींत तेथें सहजच दिसणारी जी धन्याची अत्यन्त सत्ता ती जेथें कायद्याचें

राज्य बरेंच वृद्धिंगत झालेलें असूनहि युद्धशीलता अत्यन्त असते तेथें दृष्टीस पडते. फीजीमध्यें असेंच असे. प्राचीन मेक्सिकन लोकांमध्येंहि असेंच असे, व ते लोक पुष्कळ गुलामांस देवांपुढें बळी देत. रोमन लोकांना आपल्या मुलाचा जीव घेण्याची देखील जशी सत्ता असे तसा गुलामाचाहि घेण्याची असे. म्हणून ते त्यांचे हाल-हाल करूं शकत, त्यांस जनावरांशीं टक्कर देण्यास पाठवूं शकत, किंवा समुद्रांतील माशांना खाऊं घालूंहि शकत; आणि ही सत्ता हेड्रियन बादशहाच्या अमदानीपर्यंत कायम राहिली. परंतु जीं राष्ट्रें रोमन राष्ट्राइतकीं दुसऱ्यांचे देश जिंकण्याच्या कामीं रत नसत, आणि ज्यांस रक्तपात करण्याची इतकी हौस नसे, त्यांच्या ठिकाणीं गुलामाचा जीव घेण्याची सत्ता धन्यास नसे. उदाहरणार्थ, ईजिप्तमध्यें कोणीं गुलामास ठार केल्यास तो खून समजून त्यास देहान्त शिक्षा करीत. आथेन्समध्यें गुलामाचा जीव घेतल्यास जरी देहान्त शिक्षा होत नसे, तरी त्याबद्दल प्रायश्चित्त द्यावें लागे, आणि कधींकधीं हद्दपारीचीहि शिक्षा होई. कोणीं आपल्यावर हात टाकिल्यास त्याच्यावर फिर्याद करण्याचा ग्रीक गुलामास हक्क असे ह्यावरूनहि त्याची स्थिति इतर गुलामांपेक्षां उच्च असे हें दिसतें.

जेथें माणसाची स्वतावरच मालकी नसेल किंवा फार मर्यादित असेल तेथें त्याची इतर वस्तूंवर मालकी मुळींच नसणार किंवा तसलीच असणार. हीब्रू लोकांत अशी स्थिति असे असें कांहीं म्हणतात. आपल्या ह्या देशांत प्राचीनकाळीं असेंच असे, कारण तेथें गुलामांस

मालमत्ता धारण करतां येत नसे. इतरत्र मालकीचा हक्क प्रथम रूढीवरून उत्पन्न होऊन मागून कायद्यानें कायम झाला. ग्रीक लोकांत गुलामास मालमत्ता धारण करण्यास कायद्याचा प्रतिबंध नसे; आणि रोममध्यें त्याचा स्वतःच्या जीवावरहि हक्क नसल्यामुळें मालमत्तेवरहि जरी नसे, तरी मागून त्यास संचय करूं देण्याचा तेथें प्रघात पडला. हा प्रघात पुढें इतका संमत झाला कीं, त्याला लग्न करण्याचा हक्क त्यांतील कांहीं संचय कमी करून देत असत, आणि शेवटीं, दुसऱ्या शतकांत, विशिष्ट प्रसंगीं त्याचा मालमत्तेवरील हक्क कायद्यासहि संमत झाला, व मृत्युपत्रानें तो इतरांस देण्याचाहि हक्क कांहीं अंशीं त्यास मिळाला.

गुलामाचा मालमत्ता धारण करण्याचा हक्क जसा हळूहळू स्थापन झाला, तशी त्यास द्रव्यसंचय देऊन आपणास स्वतंत्र करून घेण्याचीहि मुभा मिळूं लागली. जुलमी व रक्तपाताभिलाषी मेक्सिकन लोकांतहि ही गोष्ट दिसून येई. तेथें गुलामास लग्न करण्याची आणि मालमत्ता धारण करण्याची मुभा असे, आणि मालमत्तेच्या जोरावर ते आपणास मुक्त करूनहि घेत असत. मादागास्कारमध्यें गुलामांना भांडवल देऊन व्यापारांत त्यांचा प्रवेश करून देत असत, आणि त्यांत नफा मिळेल त्यांतील अर्धा त्यास मिळत असे. ह्यावरून तो आपली मुक्तता करण्यासाठीं तो संचय करीत असेल असें दिसतें. ग्रीसमध्येंहि द्रव्य सांठवून गुलामास आपणास मुक्त करून घेतां येत असे. तद्वतच, रोममध्येंहि गुलामास द्रव्यसंचय देऊन प्रथम करारानें व मागून काय-

द्यानें आपलें स्वातंत्र्य कमावतां येत असे. आणि पुढें पुढें तर हा प्रघात इतका सामान्य झाला कीं त्यास काय द्यानें बंधन घालावें लागलें.

कांहीं ठिकाणीं अशी व्यवस्था दिसते कीं, गुलामानें कांहीं धंदा स्वतंत्रपणानें करावा, आणि नफ्याचा काहीं भाग मालकास द्यावा. मादागास्कारमध्यें अशी चाल असे हें वर सांगितलेंच आहे. आथेन्समध्येंहि असेंच असे. याचा अर्थ असा कीं, गुलाम जणूं काय आपल्या शरीराचा उपयोग करण्यासाठीं भाडें देत असे, व त्याची स्थिति हल्लीं पुष्कळ कर देणाऱ्या माणसासारखीच बहुतेक असे.

७८. ह्यापेक्षां ह्या विषयाचा ज्यास्त विस्तार एथें करण्याचें कारण नाहीं. एथें आपल्याला गुलामागिरीचा विचार औद्योगिक उत्क्रमणाचा एक भाग ह्या दृष्टीनें करावयाचा आहे; आणि म्हणून तिच्याबरोबर अस्तित्वांत असणाऱ्या इतर संस्थांशीं तिचे संबंध काय असतात, आणि सामाजिक संधारण करण्याच्या कामीं ती कितपत उपयोगीं पडते हें पाहणें आहे. म्हणून घरगुती गुलामांचा एथें फारसा विचार करणें नलगे.

गुलामगिरीची उत्पत्ति लढाईपासून होते, आणि लढाई जितकी जोरांत असेल तितकी ती ज्यास्त विस्तृत व ज्यास्त कडक असते, हें सामान्य सत्य होकारार्थी व नकारार्थी दोन्ही पुराव्यांवरून, म्हणजे गुलामगिरीची वृद्धि व क्षय ह्या दोन्हींवरून, दिसून येतें. उदाहरणार्थ, रोमन लोकांची पुष्कळ दिवसांची युद्धशील अमदानी वस्तुतः संपल्यानंतर तेथें गुलामगिरीची तीव्रता कमी

झालेली व ती विस्कलित झालेली दिसून येते. कारण आतां लढाईंत केलेल्या गुलामांचा पुरवठा कमी झाल्यामुळें गुलामांस लग्न करूं देऊन त्यांची संख्या वाढविणें त्यांस भाग पडूं लागलें, व त्यामुळें अर्थात् गुलामांची स्थिति पहिल्याहून सुधारली. एवंच लढाई जोरांत होती तों गुलामगिरीहि जोरांत होती, व ती कमी झाली तशी गुलामगिरीहि सौम्य झाली हें दिसून येतें.

आतां औद्योगिक नियमनाचें एक स्वरूप ह्या दृष्टीनें गुलामगिरीचा विचार करतां असें दिसतें कीं, प्रारंभींच्या ज्या झगड्याच्या व राज्यें बनण्याच्या पायऱ्या त्या चढून जात असतां गुलामगिरी अस्तित्वांत असणें हें स्वाभाविक दिसतें. प्रत्येक समाजांतील सर्व पुरुष लढाईंत गुंतलेले असतां इतर कामें करण्याच्या कामीं बायकांस मदत करण्याकरितां लढाईंत पकडलेल्या शत्रूंची फार जरूरी असे. एवंच अशा स्थितींत गुलामगिरीची संस्था ही एक आवश्यक गोष्ट बनून गेली; कारण जे लोक लढाईंत पकडलेल्या लोकांस धान्य वगैरे उत्पन्न करण्याच्या कामीं लावितील ते जे लोक तसें न करतां त्यांस मारतील त्यांच्याहून प्रबल होत असत.

उलटपक्षीं, लढाई कमी होऊन जेथें पुरुषांची मृत्युसंख्या कमी होते, आणि गुलामांची वृद्धि होत नाहीं, तेथें त्या पुरुषांनीं कांहीं तरी काम करणें जरूरच होतें. एवंच, सामाजिक संधारणासाठीं गुलाम नाहींत अशा मजूरांचा वर्ग उत्पन्न होतो. ह्यावरूनहि गुलामगिरीचें साहचर्य लढाईशीं कसें असतें, व दोन्हीहि एकदम क्षीण कशा होत जातात, हें स्पष्ट दिसतें.

दुसरी एक गोष्ट ह्याचसंबंधानें अशी ध्यानांत आणावयाची कीं, गुलामांची मजुरी आणि इतरांची मजुरी ह्यांची प्रतिस्पर्धा सुरू झाली म्हणजे, गुलामांची मजुरी कमी फायदेशीर ठरल्यामुळें कमी होऊं लागते, इतर कामकऱ्यांच्या मानानें गुलामास उत्साह कमी असल्यामुळें, काळजी मुळींच नसल्यामुळें, आणि त्यांजवर देखरेख ज्यास्त ठेवावी लागल्यामुळें त्यास कामास लाविल्यानें तितका फायदा होत नाहीं. म्हणून इतर मजुरांची संख्या पुरेशी उत्पन्न होईल तशी गुलामगिरी हळूहळू नाहींशी होऊं लागते.

प्रकरण सोळावें

शेतगुलामगिरी

७९. लोकांच्या सामाजिक संस्थाविषयक बहुतेक कल्पना गत व प्रस्तुत सुधारलेल्या व अर्धवट सुधारलेल्या राष्ट्रांच्या इतिहासांवरून बनलेल्या असल्यामुळें त्या अंशतःच खऱ्या असतात; त्या संकुचित असतात हा त्यांच्यांत कमीपणा असतो. म्हणून पुष्कळ ठिकाणच्या व पुष्कळ काळच्या पुष्कळ लोकांचे सामाजिक इतिहास त्यांनीं पाहिल्यास त्यांच्या ह्या कल्पनांत बराच फरक होईल, आणि त्यांच्या हें लक्षांत येईल कीं, त्यांस जें विशिष्ट म्हणून वाटतें तें सामान्यच आहे.

उदाहरणार्थ, **साहेब** म्हणतात, नेहमींचें बोलणें आणि लिहिणें ह्यांकडे पाहतां लोकांचा समज असा झालेला दिसतो कीं, जमीनदाराची लष्करी पद्धति ही एक विलक्षण सामाजिक घटना होती, व ती यूरोपांतच तेवढी दृष्टीस पडे. पण वस्तुतः पाहतां तसल्याच प्रकारच्या घटना परस्परांपासून दूर असलेल्या व परस्परांहून अगदीं भिन्न अशा लोकांमध्यें दृष्टीस पडतात. सर्वत्र लहान लहान समाजांतून जे झगडे चाललेले असतात त्यांत बहुधा पुष्कळांचा पराजय एकाकडून होत असतो, व त्यामुळें जमिनीच्या संबंधानें कोणत्या तरी प्रकारची अंकितता उत्पन्न होत असते; म्हणजे, छोटे नाईक मोठ्या नायकांचे अंकित बनतात. उदाहरणार्थ, प्राचीन मेक्सिकोमध्यें तेथील राजाच्या कह्यांत तीस

संस्थानिक होते, व त्या प्रत्येकाच्या मुलखांत एक लाख वस्ती असे, आणि दुसरे तीन हजार सरदार होते, त्यांची प्रजा ह्याहून कमी असे. सोसैटी बेटांमध्येंहि यूरोपियन लोक प्रथम गेले तेव्हां तशीच स्थिति असे. उदाहरणार्थ, फार्स्टर आपणास सांगतो कीं, तेथें मुख्य नाईक किंवा राजा हाताखालील नायकांस प्रांत देतो, व ते पोटनायकांस आपल्या जमिनी विभागून देतात. आफ्रिकेमध्येंहि अशीच स्थिति असे. उदाहरणार्थ, आशान्टीमधील नायकाचा गुलाम त्याच्या प्रत्यक्ष धन्याच्या हुकमाव्यतिरिक्त त्या नायकाची आज्ञा मानीत नसे; म्हणजे, गुलामाचा गुलाम आपल्या धन्याच्या धन्याची आज्ञा मोडूं शके.

आतां हें उघडच आहे कीं, ह्या सामान्य राजकीय घटनेबरोबर ती ज्याच्यावर अवलंबून असते अशी कामकऱ्यांची सामान्य घटना उत्पन्न झालेली आहे. लष्करी जमीनदारीच्या इतर अवयवांप्रमाणें शेतगुलामगिरी हा जो अवयव तो जगाच्या सर्व भागांत दिसून येतो.

८०. उत्क्रमसरणीचा एक परिणाम म्हणून अंकितपणाचे निरनिराळे प्रकार एकमेकांत मिसळून गेलेच पाहिजेत. गुलामगिरीच्या निरनिराळ्या प्रकारांमधील भेद ज्या अर्थीं अनिश्चित आहेत त्या अर्थीं गुलामगिरी व शेतगुलामगिरी ह्यांमध्यें, व शेतगुलामगिरीच्या निरनिराळ्या प्रकारांमध्यें अनिश्चित फरक असलाच पाहिजे. ह्या दोन भिन्न संस्थांचें वर्णन करण्यांत पुष्कळ गोंधळ उत्पन्न झालेला दिसतो; आणि ह्याचें कारण हेंच कीं खुद्द त्या संस्थांमध्येंच गोंधळ झालेला आहे. उदाहरणार्थ,

संस्थानिक होते, व त्या प्रत्येकाच्या मुलखांत एक लाख वस्ती असे, आणि दुसरे तीन हजार सरदार होते, त्यांची प्रजा ह्याहून कमी असे. सोसैटी बेटांमध्येंहि यूरोपियन लोक प्रथम गेले तेव्हां तशीच स्थिति असे. उदाहरणार्थ, फार्स्टर आपणास सांगतो कीं, तेथें मुख्य नाईक किंवा राजा हाताखालील नायकांस प्रांत देतो, व ते पोटनायकांस आपल्या जमिनी विभागून देतात. आफ्रिकेमध्येंहि अशीच स्थिति असे. उदाहरणार्थ, आशान्टीमधील नायकाचा गुलाम त्याच्या प्रत्यक्ष धन्याच्या हुकमाव्यतिरिक्त त्या नायकाची आज्ञा मानीत नसे; म्हणजे, गुलामाचा गुलाम आपल्या धन्याच्या धन्याची आज्ञा मोडूं शके.

आतां हें उघडच आहे कीं, ह्या सामान्य राजकीय घटनेबरोबर ती ज्याच्यावर अवलंबून असते अशी कामकऱ्यांची सामान्य घटना उत्पन्न झालेली आहे. लष्करी जमीनदारीच्या इतर अवयवांप्रमाणें शेतगुलामगिरी हा जो अवयव तो जगाच्या सर्व भागांत दिसून येतो.

८०. उत्क्रमसरणीचा एक परिणाम म्हणून अंकितपणाचे निरनिराळे प्रकार एकमेकांत मिसळून गेलेच पाहिजेत. गुलामगिरीच्या निरनिराळ्या प्रकारांमधील भेद ज्या अर्थीं अनिश्चित आहेत त्या अर्थीं गुलामगिरी व शेतगुलामगिरी ह्यांमध्यें, व शेतगुलामगिरीच्या निरनिराळ्या प्रकारांमध्यें अनिश्चित फरक असलाच पाहिजे. ह्या दोन भिन्न संस्थांचें वर्णन करण्यांत पुष्कळ गोंधळ उत्पन्न झालेला दिसतो; आणि ह्याचें कारण हेंच कीं खुद्द त्या संस्थांमध्येंच गोंधळ झालेला आहे. उदाहरणार्थ,

आपण असें वाचितों कीं, ग्रीक लोकांत गुलाम कारागीर स्वतंत्रपणें उद्योग करीत आणि फायदा होईल त्याचा नियमित भाग मालकास देऊन बाकीचा आपण ठेवीत; आणि आपण असें वाचितों कीं, राशियांत शेतगुलामगिरी बंद होण्यापूर्वी सरदारलोक आपल्या शेतगुलामांस कांहीं पैसे घेऊन धंदे करण्याची परवानगी देत; ह्यावरून ह्या दोन प्रकारच्या गुलामांच्या स्थितींत फारसा फरक दिसत नाहीं; म्हणून हलक्या प्रतीच्या समाजांत शेतगुलामगिरीचें स्वरूप अनिश्चित असणें हें स्वाभाविक दिसतें.

आफ्रिकेमध्यें मरुत्से लोकांत ह्याचें उदाहरण दृष्टीस पडतें. ह्या लोकांच्या, होलब म्हणतो, १८ मोठ्या टोळ्या असून त्यांचे ८३ लहान पोटविभाग केलेले होते. ह्या टोळ्या मरुत्से लोकांच्या अंकित असत, पण त्यांच्यापैकीं एकचतुर्थांशाहून ज्यास्त त्यांस खंडणी देत नसत. अन्यासा नांवाची एक टोळी मकालोलो लोकांची अंकित असून तिची स्थिति ह्याच्याहून अगदीं भिन्न आहे; त्या लोकांत नायकाचें शेत पुरें केल्याशिवाय स्वताचें शेत लावतां येत नाहीं; त्यांनीं मारलेल्या पारधीपैकीं बरीच त्यास द्यावी लागते; आणि त्यांना लढाईतील कैद्यांप्रमाणें वागवितात. इकडे डमारामध्यें ह्याच्या उलट स्थिति दृष्टीस पडते. तेथील गुरांढोरांपैकीं चतुर्थांश नायकांचीं असून लोकांना त्यांजवर देखरेख ठेवावी लागते; त्याबद्दल त्यांस गाईंचें दूध मिळतें. व कधीं कधीं एकादें वांसरूं किंवा कोंकरूं मिळतें. कूकी लोकांत नाईक धान्य व मजुरी ह्या दोन रूपानें वसूल करितात. प्रत्येक कामकरी माणूस एक

टोपलीभर म्हणजे सरासरी दोन मण धान्य नायकास देतो, डुकरें किंवा कोंबडींबदकें यांपैकीं एकेक पोर देतो, आणि पारधीपैकीं एकचतुर्थांश देऊन प्रत्येक मारलेल्या हत्तीचा एक सुळा देतो. नायकाचीं शेतें नांगरण्यासाठीं सगळ्या लोकांस वर्षांतून चार दिवस खपावें लागतें. प्राचीन यूकाटनमध्यें अशीच स्थिति असे. तेथें सामान्य लोक आपल्या खोतांचीं शेतें नांगरीत व घरें बांधीत. आणि धरलेल्या माशांपैकीं व पारधीपैकीं कांहीं भाग त्यांस देत. प्राचीन मेक्सिकोमध्यें गुलामांस घर, दार, बायको, शेत वगैरे सर्व करण्याची परवानगी असे, मात्र त्यास नियमित काळीं घर बांधणें, शेत नांगरणें, वगैरे कामीं धन्यास मदत करावी लागे. परंतु पुढें जेव्हां तेथें स्प्यानिश वगैरे लोक गेले तेव्हां ते त्यांस जनावरांप्रमाणें वागवूं लागले. मादागास्कारमध्यें गुलामास उत्पन्नाचा कांहीं भाग घेऊन शेत करण्याची परवानगी देत, म्हणजे त्यांस शेतगुलामाच्या पदवीस चढविलें होतें, हें गतप्रकरणांत सांगितलेंच आहे.

८१. हीं प्रास्ताविक उदाहरणें आतां पुरीं करून ह्या संस्थेचा विस्तार व स्वरूप ह्याबद्दल ह्याच्याहून ज्यास्त पद्धतशीर रीतीनें विचार करूं. पैकीं ज्या समाजांत ही संस्था सार्वत्रिक होती किंवा आहे त्यांचा विचार प्रथम करूं.

डेहामीमध्यें राजा प्रत्येक वस्तूचा मालक असल्यामुळें प्रत्येकजण त्याचा गुलाम किंवा शेतगुलाम असतो. मादागास्कारमध्यें असलीच स्थिति आहे. तेथील सर्व लोकांस सरकारी कामावर बिनमजुरी पाहिजे तितका-

वेळ लावतां येतें. पण ह्याखेरीज निरनिराळे धंदे करणारे सरकारी गुलाम तेथें आहेत त्यांस जन्मभर मजुरीविना सरकारी काम करावें लागतें; त्यांच्यावर कर.मुळींच नसतो, पण त्यांस आपल्या व कुटुंबाच्या पोषणाची तजवीज करावी लागते. कोरियामधील लोकांमध्यें देखील सरकारी गुलामगिरी किंवा वेठ आढळून येते.

आतां प्राचीन काळच्या उदाहरणांकडे पाहतां इजिप्तचें.उदाहरण प्रथम देण्यासारखें आहे. तेथील भव्य मनोरे बांधीत असतां तेथील लोक सरकारचे बंदे कामकरीच असले पाहिजंत. राजाच्या हुकमावरून त्यांच्या टोळ्यांच्या टोळ्या त्यांच्या घरांतून धरून आणीत असत. आसीरियामध्यें सर्व नाहीं तरी बऱ्याच लोकांची अशीच स्थिति असे. तेथील राजे जिंकलेल्या लोकांस देशांतील निरनिराळ्या भागांत पाठवीत असत, आणि आपली कीर्ति अखंड करण्यासाठीं भव्य इमारती बांधवीत असत. स्पार्टामधील शेतगुलाम खेड्यांतून रहात असत, तेथील शेतें लावीत, आणि स्पार्टामध्यें रहाणाऱ्या आपल्या मालकांस खंड देत; तथापि धन्यापेक्षां राष्ट्राचाच ताबा त्यांजवर ज्यास्त असे, कारण तो ताबा धन्यांवरहि असे. आथेन्समध्यें निरनिराळ्या प्रकारचे उद्योग करणारे गुलाम असून देवळांतून नोकरी करणारेहि बंदेनोकर असत, व ते देवाला दिलेलीं शेतें नांगरीत.

८२. रोममध्यें असलेल्या शेतगुलामगिरीची स्थिति आपल्या बरोबर लक्षांत यावी एतदर्थ, तेथें सारखी लढाई सुरू राहिल्यामुळें रोमन समाजाचें स्वरूप कसें

झालें होतें हें ध्यानांत घेतलें पाहिजे. युद्धशीलता ज्या मानानें कायमची बनत जाईल त्या मानानें लष्करी घटना सर्वच समाजांत येऊं पाहते हें सत्य ह्याच्या अगोदर बरेच वेळां सांगितलें आहे. कारण राष्ट्राची शक्ति इतर राष्ट्रांवर योग्य रीतीनें चालवितां येण्यास सर्व राष्ट्राच्या कृती पूर्णरीत्या एकमेकींशीं सुसंबद्ध केल्या पाहिजेत; आणि म्हणून समाजांतील लढवय्या भागाप्रमाणें उत्पादक भागावरहि अनियंत्रित सत्ता चालवावी लागते. कित्येक शतकें लढाया केल्यामुळें रोमन राष्ट्रास असलें स्वरूप फारच कडक रीतीचें आलेलें होतें. ग्रीक लोकांत वरचेवर होणाऱ्या लढायांमुळें अशी कल्पना उत्पन्न झालेली होती कीं नागरिक हा स्वताचा नसून किंवा कुटुंबाचाहि नसून आपल्या राष्ट्राचा आहे; पण रोममध्यें लढाया सारख्याच होत असल्यामुळें ही कल्पना ह्याच्याहि पुढें गेलेली होती; कारण तेथें तो केवळ राष्ट्राचाच म्हणून समजला जात नसून त्याचा अंकित समजला जात असे, व आमरण त्यानें आपल्यास नेमून दिलेलें काम नेमक्या ठिकाणींच करावें असें असे. उदाहरणार्थ, राज्यकारभार करणारे लोकांस तेंच काम करणें भाग असे, कायदे करणाऱ्या सभेच्या सभासदांना तसेंच करणें भाग असे, आणि लढवय्यांचेहि तसेंच असे. सारांश, तेथें ही बंदेनोकरी सार्वत्रिक होती; म्हणजे तेथें सरकारी कामें करणारे बंदेनोकर असत, लढवय्ये बंदेनोकर असत आणि शेत्येहि बंदेनोकर असत.

शेतावरील बंदेनोकरीची उत्पत्ति मिश्र रीतीनें झाली.

त्यांतील कांहीं बंदेनोकर रोमन लोकांनीं उध्वस्त केलेले प्रदेश पुनः लागवडीस आणण्यास लावलेले जर्मन लोक होते. पण जमिनीवरील सरकारी बंदेनोकरांची उत्पत्ति दुसऱ्या अनेक रीतींनीं झाली होती. उदाहरणार्थ, रोमन सैन्यांना पैसे, धान्य, शिपाई ह्यांचा पुरवठा करण्याकरितां निरनिराळे सरकारी बंदेनोकर उत्पन्न झाले होते. सारांश, लढण्याच्या यंत्रास माणसें, माल व खाद्य ह्यांचा पुरवठा करण्याकरितां ते अस्तित्वांत आलेले होते.

८३. रोमन राज्यांतील सामाजिक घटनांचा मध्ययुगीन यूरोपांतील समाजघटनांवर कितपत परिणाम झाला हें समजण्याचा आपणास मार्ग नाहीं. तथापि ही बंदेनोकरांची पद्धति यूरोपच्या लोकांस प्राचीनकाळापासून परिचित होती. उदाहरणार्थ, टासिटसनें केलेल्या वर्णनावरून त्यांच्यांत बंदेनोकर होते असें दिसतें, व ते कैद केलेले शत्रु किंवा त्यांचे वंशज असले पाहिजेत. तो म्हणतो कीं त्यांच्या मालकांना, म्हणजे टोळींतील लोकांना, शेती करण्यापेक्षां लढणें व पारध करणें हें ज्यास्त आवडत असे, आणि म्हणून ते शेतीची व्यवस्था, स्त्रिया व कुटुंबांतील दुबळीं माणसें ह्यांजकडे सोंपवीत असत. पुढें जर्मन लोकांनीं जेव्हां फ्रान्सदेश जिंकिला तेव्हां तेथें अस्तित्वांत असलेले निरनिराळे प्रकार आणखी संमिश्र बनले. पण हें मिश्रण अपूर्ण होतें. जर्मन लोकांनीं फ्रान्स देश जिंकिला तेव्हांपासून तीन प्रकारचे अंकित लोक होते; पक्के गुलाम, ज्यांना कांहीं हक्क आहेत असे गुलाम, आणि बंदेनोकर. पुढें

हळूहळू कमी स्वतंत्र अंकित कमी होऊन ज्यास्त स्वतंत्र अंकित वाढत चालले. ही गोष्ट फ्रान्सांत घडून येण्याचें एक कारण असें सांगतात कीं, तेथें राजाची सत्ता वाढल्यामुळें लष्करी जमीनदारांची कमी झाली; ह्यामुळें शेतगुलाम जमीनदारांच्या ऐवजीं राजाचेच अंकित झाले. पण ह्या गोष्टीचें हें जरी एक कारण असलें तरी दुसरें एक सहचारी कारण होतेंच, व तें जमीनदारांमधील लढाया कमी झाल्या हें होय. ह्या लढाया चालत होत्या तों पावेतों त्यांना सर्व प्रकारच्या अंकितांची जरूर असे, व त्यांस आपल्या पूर्ण कह्यांत ठेवणेंहि आवश्यक असे. पण हे सरदार जसे राजाचे अंकित बनत गेले तसें हें कारण कमी होत चाललें. म्हणून आपल्या धन्यासाठीं विशिष्ट जमीन लावणारा शेतगुलाम तिचा मालक बनला, आणि आपल्या यजमानास धान्य व मजुरी ह्या रूपानें, व शेवटीं द्रव्यरूपानें, खंड देऊं लागला.

आतां इंग्लंडची स्थिति ह्या प्रश्नाच्या संबंधानें काय आहे तें पाहूं. आपणांस असें गृहीत करण्यास हरकत नाहीं कीं, ज्या आंग्लोसाक्सन लोकांच्या समूहांनीं पूर्वीच्या सेल्टिक लोकांस जिंकून व त्यांपैकीं कांहींस मारून व कांहींस गुलाम करून निरनिराळ्या ठिकाणीं वस्ती केली, त्यांचे निरनिराळे नाईक असलेच पाहिजेत. आणखी असेंहि गृहीत करण्यास हरकत नाहीं कीं, हे रानटी लढवय्ये हल्लीं रानटी लोकांत सर्वत्र दिसतो तशा प्रकारचा निष्ठाभाव आपल्या नायकांप्रत दाखवीत असलेच पाहिजेत. आणि ह्यांपासूनच पुढें सरदारी ग्रामांची उत्पत्ति तेथें झाली असली पाहिजे असें अ-

नुमान करण्यास हरकत दिसत नाहीं. इतर ठिकाणांप्रमाणें इंग्लंदांतहि दास्याच्या निरानिराळ्या पायऱ्या दिसत असत. आंग्लोसाक्सन लोकांच्या कारकीर्दीपासूस इंग्लंदांत गुलाम असत, ते बहुधा जित सेल्ट लोक असत, त्यांस इतर मालमत्तेप्रमाणें विकीत व विकत घेत असत, आणि त्यांस कायदेशीर हक्क असत, तथापि त्यांस द्रव्यसंचय करतां येत असे. शिवाय जमिनीशीं संबद्ध असे शेतमजूर असत. आणि शिवाय जमिनीचे बरेचसे स्वतंत्र धारेकरी असत. ह्या सर्वांचें संरक्षण जमीनदार करीत असे, आणि त्यांच्यावर आरोप आल्यास न्यायासनापुढें उभे करीत असे, आणि त्यांचे दंड भरीत असे. ह्यावरून हे जमीनदारीचे समूह पूर्वीच्या लष्करी समूहांवरून उत्पन्न झाले असतील हें अनुमान बरोबर दिसतें.

तिसऱ्या हेन्रीच्या वेळीं शेतगुलामाचें जमीनदाराच्या इच्छेवर पूर्णपणें अवलंबून रहाणें कमी व्हावयास लागलें. फ्रान्साप्रमाणें इंग्लंदांतहि ते ज्या जमिनींशीं संबद्ध होते त्या त्यांच्या ताब्यांत गेल्या, आणि त्यांनीं गुलामासारखीं करावयाचीं जीं कामें त्यांचेबद्दल मोबदले उत्पन्न झाले. आणि हे फेरबदल इंग्लंदांत इतर देशांच्या अगोदर झाले, कारण नार्मन लोकांनीं तो देश जिंकिला तेव्हां स्थानिक शास्ते मुख्य शास्त्याचे अंकित बनल्यामुळें स्थानिक लढाया नष्ट झाल्या. आणि सामान्य युद्धेंहि कमी झालीं.

८४. हें एकंदर वर्णन पुरें करण्यासाठीं प्रशिया व रशियामधील शेतगुलामगिरीच्या अगदीं शेवटच्या स्थितीची कांहीं हकीकत सांगणें जरूर दिसतें.

प्रशियामध्यें शेतगुलाम मुख्यत्वेंकरून सरदारांच्या इस्टेटीवर असून त्यांना जरी त्यांच्याशीं निष्ठेनें वागण्याची शपथ द्यावी लागे, आणि कांहीं प्रकारचीं देणीं द्यावीं लागत व कामें करावीं लागत, आणि आपल्या मुलांसह शेतावरच रहावें लागे, तरी त्यांस नागरिकाचे सामान्य हक्क असत; मात्र लग्न करणें वगैरे कांहीं महत्त्वाच्या बाबतींत त्यास यजमानाचें मत द्यावें लागे. इकडे सरदारासहि गुलामाबद्दल कांहीं कर्तव्यें करावीं लागत. शेतगुलामास जरूर लागेल तेव्हां त्यानें त्यास मदत करावी, व उदरनिर्वाहाचें साधन पाहून द्यावें, त्याच्या मुलास शाळेंत वगैरे पाठवावें, व उद्योगास लावावें, अशी कल्पना असे; आणि त्या गुलामांचा इतरांशीं कांहीं संबंध आल्यास त्यांचा पक्ष द्यावा लागे. एवंच तेथें गुलामांची स्थिति अर्धवट स्वातंत्र्याची व अर्धवट दास्याची असे.

आतां रशियाकडे पाहतां तेथें हीच गोष्ट कांहीं फरकानें दृष्टीस पडते. प्रारंभीं शेतकरी गुलामांपासून निराळे असून ते जमिनीचे स्वतंत्र मालक असत, व त्यांच्या ग्रामवस्त्या बनलेल्या असत. पुढें जेव्हां स्थानिक सरदार उत्पन्न झाले, व गडबडी सुरू झाल्या, तेव्हां गरीब व शक्तिहीन यांस इतरत्रप्रमाणें रशियांतहि शक्तिमानाचा आश्रय करणें भाग पडूं लागलें; म्हणजे, आपल्या सुरक्षिततेसाठीं कांहीं अंशीं शक्तिवानाचा दास बनणें, व त्याची कांहीं नोकरी बजावणें, त्यांस जरूर पडूं लागलें. शिवाय, जेथें त्यांस लागवडीस नसलेली जमीन (जी विपुल असे) घेण्याची इच्छा

प्रशियामध्यें शेतगुलाम मुख्यत्वेंकरून सरदारांच्या इस्टेटीवर असून त्यांना जरी त्यांच्याशीं निष्ठेनें वागण्याची शपथ घ्यावी लागे, आणि कांहीं प्रकारचीं देणीं द्यावीं लागत व कामें करावीं लागत, आणि आपल्या मुलांसह शेतावरच रहावें लागे, तरी त्यांस नागरिकाचे सामान्य हक्क असत; मात्र लग्न करणें वगैरे कांहीं महत्त्वाच्या बाबतींत त्यास यजमानाचें मत घ्यावें लागे. इकडे सरदारासहि गुलामाबद्दल कांहीं कर्तव्यें करावीं लागत. शेतगुलामास जरूर लागेल तेव्हां त्यानें त्यास मदत करावी, व उदरनिर्वाहाचें साधन पाहून द्यावें, त्याच्या मुलास शाळेंत वगैरे पाठवावें, व उद्योगास लावावें, अशी कल्पना असे; आणि त्या गुलामांचा इतरांशीं कांहीं संबंध आल्यास त्यांचा पक्ष घ्यावा लागे. एवंच तेथें गुलामांची स्थिति अर्धवट स्वातंत्र्याची व अर्धवट दास्याची असे.

आतां रशियाकडे पाहतां तेथें हीच गोष्ट कांहीं फरकानें दृष्टीस पडते. प्रारंभीं शेतकरी गुलामांपासून निराळे असून ते जमिनीचे स्वतंत्र मालक असत, व त्यांच्या ग्रामवस्त्या बनलेल्या असत. पुढें जेव्हां स्थानिक सरदार उत्पन्न झाले, व गडबडी सुरू झाल्या, तेव्हां गरीब व शक्तिहीन यांस इतरत्रप्रमाणें रशियांतहि शक्तिमानाचा आश्रय करणें भाग पडूं लागलें; म्हणजे, आपल्या सुरक्षिततेसाठीं कांहीं अंशीं शक्तिवानाचा दास बनणें, व त्याची कांहीं नोकरी बजावणें, त्यांस जरूर पडूं लागलें. शिवाय, जेथें त्यांस लागवडीस न-सलेली जमीन (जी विपुल असे) घेण्याची इच्छा

होई तेथें भांडवलाकरितां आपल्याहून श्रीमान् लोकांचें कर्ज काढावें लागे, आणि म्हणून देणेंदार या नात्यानें ते त्यांच्या शेतांवर बांधले जात. शिवाय रोमप्रमाणें रशियामध्येंहि सर्व समाज लष्कराच्या धर्तीवर ठेविला जाऊं लागला. म्हणून लहान लहान राजे व सरदार आपल्या जमिनी झारापासून धारण करूं लागले, व अशा रीतीनें ते जेव्हां राजाचे अंकित जमीनदार बनले तेव्हां शेतकरी त्यांचे शेतगुलाम झाले. ही सर्व स्थिति साम्राज्य स्थापन करण्याकरितां बादशहांस ज्या सारख्या लढाया कराव्या लागत त्यामुळें अर्थात् उत्पन्न झाली.

८५. ह्या एकंदर विवेचनांत औद्योगिक घटना ह्या दृष्टीनें ह्या संस्थेचा फारसा विचार आलेला नाहीं. तथापि एवढें आपल्या नजरेस आलें आहे कीं, समाजाच्या ज्या प्राथमिक स्थितींत गुलामवर्गास लढवय्या वर्गाला संसारांतील आवश्यक वस्तूंचा पुरवठा करावा लागे त्या स्थितींत ह्या संस्थेची उत्पत्ति झालेली असल्यामुळें समाजांचें उत्क्रमण जसें होत चाललें तशी ती लढवय्या वर्गाला पोसणारी कायमची कामकरी संस्था बनली.

ज्या सरणीच्या योगानें लढाईच्या काळीं सर्व सामाजिक कृती स्वसंरक्षण व परातिक्रम ह्यांच्याकरितां एकत्र होतात त्या सरणींची अंकितता, सुसंबद्धता, आणि घनीभूतता हीं निरनिराळीं स्वरूपें आहेत. अशा समाजांतील घटक लढवय्या असो, किंवा इतर कामें करणारा असो, त्याच्यावर समूहाचा ज्यास्त ज्यास्त ताबा बसत जातो. शिवाय आपण असें पाहतों कीं, देशांतील लढाया बंद झाल्या म्हणजे समाजाचा घटकां-

वरील तावा जरी कमी होत जातो तरी पुनः त्या सुरू झाल्यास तो वाढत जातो. म्हणजे पूर्वी जेथें शिपाया-चा धंदा स्वीकारण्याची पाहिजे त्याच्या खुशीची गोष्ट असेल तेथें ती जबरीची होऊन जाते. शिवाय कर वाढतात, व जबरीनें कर्जे घेतात. ह्याचा अर्थ असा होतो कीं, नागरिकाची आपल्या मत्तेवरील सत्ता कमी झाली आहे, म्हणजे गुलामगिरीकडे तो एक पायरी पुढें गेला आहे. शेतगुलामगिरीच्या संबंधानें हा परि-णाम जर्मनींत तीस वर्षांच्या युद्धाच्या नंतर चांगला झालेला दृष्टीस पडत होता. दुसरी एक गोष्ट अशी ध्यानांत ठेवावयाची कीं, यूरोपांत इंग्लंड देश सर्वांत कमी युद्धशील असल्यामुळें तेथें शेतगुलामगिरी तेरा-व्या शतकांत वस्तुतः नाहींशी झाली होती, पण फ्रा-न्सांत १७८९ पर्यंत अस्तित्वांत राहिली, प्रशियामध्यें १८१० पर्यंत राहिली, आस्ट्रियांत १८४८ पर्यंत रा-हिली, आणि रशियांत १८६१ पर्यंत राहिली.

शेतगुलामगिरी कमी होऊन नाहींशी होण्यास ह्या अप्रत्यक्ष कारणाखेरीज एक प्रत्यक्ष कारण होत असतें; तें हें कीं, माल उत्पन्न करण्याच्या कामीं असल्या का-मकऱ्यांचा चांगला उपयोग होत नाहीं. ह्याचें कारण तो फायद्यातोट्याचा मालक नसतो, व स्वताच्या बु-द्धीनें व हिमतीवर कांहींहि करण्याची त्यास मोकळीक नसते हें होय. फार कशाला? अंगावर काम घेऊन तें करणारे लोक व रोजमजुरीवर तें करणारे लोक ह्यांच्या काम करण्याच्या पद्धतींत व उत्साहांत फरक पाहवा, म्हणजे ही गोष्ट ताबडतोब लक्षांत येते.

ह्यावरून, तर मग, सामान्य सिद्धान्त कांय निघतो? असा निघतो कीं, युद्धशील अमदानीस जबरीची सहक्रिया आवश्यक असून योग्यहि असते; आणि औद्योगिक अमदानीच्या वाढीबरोबर स्वौच्छिक सहक्रिया सहजगत्याच उत्पन्न होत असून ती तिला योग्यहि असते. आणि पहिल्या सहक्रियेपेक्षां ती ज्यास्त फलदायक असल्यामुळें ती तिच्या ऐवजीं सहजच उत्पन्न होत जाते.

प्रकरण सतरावें
स्वतंत्र मजुरी आणि करार

८६. ह्या प्रकरणाचा प्रारंभ आणि गतप्रकरणाचा शेवट ह्यांच्यांत फारसा फरक नाहीं; कारण तेथें वर्णिलेली पायरी एथें वर्णावयाच्या पायरींत न समजतांच स्वरूपान्तर पावत असते. जितक्या अंशांनीं सहक्रियेचें जबरीचें स्वरूप नष्ट होईल तितक्या अंशांनीं तें स्वैच्छिक बनतें; कारण माणसें जेव्हां कांहीं गोष्ट एकत्र मिळून करीत असतात तेव्हां ती ते खुशीनें करीत असतात, किंवा नाखुशीनें करीत असतात. किंवा सर हेन्री मेन म्हणतो त्याप्रमाणें समाजाचे घटक बाहेरून लादलेल्या स्थितीच्या बंधनांनीं एकत्र झालेले असतात, किंवा स्वेच्छेनें केलेल्या कराराच्या स्थितीच्या बंधनांनीं एकत्र झालेले असतात.

८७. कांहीं स्वरूपीं करारांस्थिति प्रारंभींच्याच पायऱ्यांवर उत्पन्न होते. एकमेकांनीं एकमेकांस देणग्या देण्याची स्थिति जाऊन त्याबद्दल एकमेकांस वस्तू मोबदला देण्याची स्थिति आली म्हणजे प्रत्येक अदलाबदलीचा व्यापार हा एक तत्क्षणिक करारच बनतो. कारण दिलेल्या प्रत्येक चिजेबद्दल कांहीं तरी चीज परत मिळेल अशी देणाराची कल्पना असते. ह्याचप्रमाणें असुधारलेल्या व अर्धवट सुधारलेल्या लोकांत एकमेकांचीं कामें करण्याबद्दलचे करार उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, एकादा घर बांधीत असला, किंवा शेत कापीत असला म्हणजे त्याचे शेजारी त्यास जी मदत करिता-

त ती अशा गर्भित समजुतीवर करितात कीं, तसलीच मदत प्रत्येक शेजाऱ्यास तो पुढें करील; म्हणजे, कामाबदल काम मोबदला देण्याचा त्यांच्यांत करार असतो. आणि एकाद्यास असल्या भावी मदतीची जरूरी नसल्यामुळें तो जेव्हां त्या ऐवजीं कांहीं मूर्त वस्तू ज्याचें तो काम करील त्याजपासून स्वीकारतो तेव्हां मेहनतीबद्दल मजुरा देण्यास प्रारंभ झाला म्हणूय समजावें.

अशा रीतीनें कांहीं ठिकाणीं करारास लवकरच सुरवात झाली तरी त्यास पुढें पुष्कळ अडथळे येतात. प्रारंभीं स्त्रियांखेरीज लढवय्ये व गुलाम केलेले कैदी एवढेच समाजांत असतात. त्या वेळीं मजुरा देऊन मिळणारा मनुष्य अस्तित्वांत नसतो. शिवाय त्यावेळीं देणीं मालाच्या रूपानें द्यावीं लागत असतात व त्याची किंमत अजमासानें ठरवावी लागत असते. कांहीं तरी प्रकारच्या नाण्याची उत्पत्ति झाली तरी माणसें मजुरीनें लावण्याची चाल सामान्य होई तोंपावेतों त्यांच्या मजुरीचे ठराविक दर बनावयाचे नाहींत. ह्याशिवाय ही स्थिति सामान्य होण्यास नैतिक अडथळे येतात. कारण त्या वेळीं लढवय्या नसणें, आणि गुलाम करितात तें काम करणें, हें अगदीं कमीपणाचें समजत असतात. म्हणून मजुरी घेऊन काम करणारा वर्ग उत्पन्न झाला तरी तो वाढण्यास फार कठीण जातें. अगदीं शांतिशील असे जे एस्किमो लोक त्यांच्यांत जे कोणी सील मासे धरण्याच्या कामीं मंद असतील, किंवा होडी गमावल्यामुळें भिकारी झाले असतील ते त्यांच्याहून बरी स्थिति

असलेल्यांचे मदतनीस बनतात; पण त्यांस देखील असें करण्यानें आपली अब्रू जाते असें वाटतें.

अशा अडचणी आहेत तरी मजुरांची जी गुलामांपेक्षां उच्चतर संस्था ती वाढत जाते. कांहीं अर्धवट सुधारलेल्या लोकांमध्यें शेतगुलाम असून स्वतंत्र मजूरहि असतात. एवंच ताहितीमध्यें, एलिस म्हणतो कीं, हलक्या दर्जाचे नाईक कामकरी मजुरीनें लावीत असत, व मजुरीबद्दल त्यांस कांहीं डुकरें किंवा कपडा देत असत. इकडे सामोअन लोकांमध्यें गुलामवर्ग नसून एका मुख्य सुताराबद्दल असें सांगितलेलें आढळतें कीं, तो माणूस कामावर गेला म्हणजे आपल्या बरोबर दहा किंवा बारा माणसें घेतो, त्यांपैकीं कांहीं रोज मजूर म्हणून जातात, व ते त्याजपासून मजुरी घेतात.

पण इतर पुष्कळ संस्थांप्रमाणें, शेतकीची स्थिति प्राप्त होऊन वस्ती वाढली, आणि इतरांचे मुलूख जिंकून कांहीं समाज एकत्र झाले, म्हणजे स्वतंत्र मजुरीची किंवा भाडोत्री मजुरीची स्थिति प्राप्त होत असते. ही सरणी अशी आहे कीं, तिच्या योगानें एकीकडे समूहांचें संकलन होत असतां दुसरीकडे पृथक् पृथक् व्यक्तींचा वर्ग उत्पन्न करिते. प्राचीन लोकांमध्यें असें झाल्याचा पुरावा आपल्यास सांपडतो. त्यांच्यांत बहुतेक काम जरी गुलाम करीत असत, तरी कांहीं काम स्वतंत्र माणसें करीत असत. उदाहरणार्थ, ईबर्स म्हणतो कीं, इजिप्शान लोकांत भाडोत्री मजूर पुष्कळ असत. इथिओपियन लोक मजुरी करण्यास तयार असल्यामुळें त्यांस आपल्या देशाच्या दक्षिण भागांत त्यांनीं घेतलें होतें. बाबि-

लोनियामध्येंहि असेंच असे याबद्दल पुरावा सांपडतो. हीब्रूलोकांताहि तसेंच असे. त्यांच्या धर्मग्रंथांत अशी एक आज्ञा आढळते:—" मजुरीनें लाविलेला माणूस गरीब व गरजू असला म्हणून तूं त्यास त्रास देऊं नको, मग तो तुझा देशबांधव असो किंवा बाहेरून आलेला असो." बरें, ग्रीस व रोममध्यें शास्तेवर्ग आणि गुलामवर्ग ह्यांखेरीज मजूर असलेले स्वतंत्रवर्ग असत, हें यावरून दिसतें कीं आथेन्समध्यें पुष्कळ लोक बाहेरून आलेले असून व्यापार-उदीम चालवीत असत, आणि रोममध्यें स्वतंत्र नागरिकांखेरीज स्वतंत्र केलेले असे लोक असत, व त्यांपैकीं बहुतेकांना डोक्याचे किंवा हाताचे श्रम करण्याखेरीज उदारनिर्वाहार्थ दुसरें साधन असेल असें वाटत नाहीं.

८८. स्वतंत्र कामकरीवर्ग उत्पन्न होण्यास अनेक कारणें झालेलीं आहेत; व त्यांपैकीं कांहींचा परिणाम फार झालेला आहे व कांहींचा अल्प झालेला आहे.

पहिलें व सर्वांत ज्यास्त सामान्य कारण गुलामांनीं मालकास पैसे देऊन स्वतंत्र होणें हें झालेलें आहे. गुलामांस द्रव्यसंचय करण्याची परवानगी मिळाल्यामुळें जगाच्या अनेक भागांत ही गोष्ट होऊन गेलेली आहे. कारण हें द्रव्य देऊन ते आपलें स्वातंत्र्य विकत घेत असत. उदाहरणार्थ, हीब्रू लोकांत ही गोष्ट झालेली आढळते. रोमन लोकांतहि असेंच झालें. आंग्लोसाक्सन लोकांत तसेंच होऊन गेलें. आणि अशा रीतीनें स्वतंत्र कामकऱ्यांचा वर्ग वृद्धिंगत झाला.

दुसरें कारण कांहीं गुलामांस त्यांच्या मालकांनीं

कांहीं न घेतां स्वतंत्र केलें हें होय. उदाहरणार्थ, हीब्रू लोकांत त्यांच्या जातीचे गुलाम स्वतंत्र करण्याबद्दल कायद्यानें तजवीज केली होती. रोममध्येंहि हा प्रघात सामान्य झाला, आणि पुढें त्याच्याबद्दल एक धार्मिक विधीहि उत्पन्न झाला. ख्रिस्ती लोकांमध्येंहि पुण्य संपादण्यासाठीं म्हणून लोक गुलामांस मृत्युपत्रानें स्वतंत्र करीत. पुढें ह्याच हेतूनें ते शेतगुलामहि स्वतंत्र करूं लागले.

अशा रीतीनें पुण्याई संपादन करण्यासाठीं जी चाल सुरू झाली ती इतर फायद्यांच्या दृष्टीनें वृद्धिंगत झाली. कारण लोकांच्या लक्षांत असें आलें कीं, गुलामाच्या कामापासून फायदा होत नाहीं; म्हणून पैसे घेऊन त्यास मुक्त करणें हेंच ज्यास्त फायदेशीर होय; आणि त्यास मजुरी देऊन त्याजपासून काम करून घेणें हें त्याहूनहि ज्यास्त फायदेशीर होय. आतां लोक स्वार्थदृष्टिच विशेष असतात ही गोष्ट ध्यानांत घेतां, गुलामवर्ग कमी होऊन स्वतंत्र वर्ग वाढण्यास हेंच मुख्य कारण झालें असलें पाहिजे असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

कांहीं ठिकाणीं लष्करी जमीनदारांनीं स्वताचा फायदा करण्यासाठीं शेतगुलामांस मुक्त केलें. म्हणजे, त्यांस आपल्या शेतांवरून अजीबाद हांकून दिलें, व जमीन आपल्या ताब्यांत घेतली. त्यामुळें त्यांचा जसा जमिनीवरील धारेकऱ्याचा हक्क गेला, तशी गुलामागिरीहि गेली. जर्मनीमध्यें ही गोष्ट बऱ्याच मोठ्या प्रमाणावर घडून आली. तीस सोळाव्या शतकाच्या आधींच सुरवात झाली होती, आणि पुढें ती झपाट्यानें चालून जमीनदारांच्या फायद्यासाठीं तीस कायद्याचेंहि स्वरूप आलें.

इंग्लंदमध्यैंहि सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं अशाच प्रकारची स्थिति होऊं लागली. ह्यास कारण सार्वजनिक कुरणें सरकारानें आपल्याकडे घेतलीं हें होय. कारण, तेणेंकरून धारेकऱ्यांच्या गुरांस चरण पुरतें न मिळाल्यामुळें त्यांच्याकडून शेतीचें काम पहिल्याप्रमाणें होत नाहींसें झालें. म्हणून जमीनदार त्यांस आपल्या शेतांवरून हांकून देऊं लागले. अशा रीतीनें शेतगुलामांची संख्या तेथें कमी होऊन स्वतंत्र कामकऱ्यांची वाढूं लागली. पण यापूर्वीं तेथें प्लेग येऊन जेव्हां मजुरांची संख्या कमी झाली होती तेव्हां मजुरांचे कायदे पसार होऊन त्यांस अर्धवट गुलामांची स्थिति पुनः प्राप्त होऊं लागली होती. पुढें पुनः ही स्थिति बदलली.

अशा रीतीनें शेतगुलामांच्या हळू हळू होणाऱ्या मुक्ततेखेरीज कोठें कोठें त्यांच्या एकदमच मुक्तता होऊन गेल्या. उदाहरणार्थ, फ्रान्सांत कधीं कधीं एकादा जमीनदार पैसे घेऊन गांवांतल्या सगळ्याच लोकांना अशा रीतीनें मुक्त करीत असे. शिवाय, फिलिप आगस्टस नांवाच्या राजानें सरदारांचें सामर्थ्य कमी करून आपलें वाढविण्यासाठीं गुलामांना मुक्त होण्याच्या विशेष सवलती दिल्या होत्या.

तथापि ह्यायोगानें अशा लोकांची गुलामगिरी पूर्णपणें नाहींशी होत नसे. ह्याचेंहि उदाहरण फ्रान्सांतच आढळतें. तेथें पुष्कळ ठिकाणीं लहान लहान शेतांचे मालक असलेले जे शेतकरी त्यांना जमीनदारांना अनेक प्रकारचीं देणीं द्यावीं लागत. उदाहरणार्थ, कांहीं ठिकाणीं त्यांस सरदाराची भाडें म्हणून फुकट मजुरी करावी लागे;

शिवाय, जत्रा व बाजार ह्या ठिकाणीं दंस्तुरी द्यावी लागे. शिवाय, जमीनदाराचे घिरटावर त्याचें धान्य दळणें, त्याच्या रगाड्यावर त्याच्या द्राक्षांचा आसव काढणें, त्याच्या चुलाणांत त्याच्या भाकरी भाजणें, इत्यादि कामें करून घेण्यासाठीं त्यास पैसे द्यावे लागत. शिवाय जमीन विकावयाची असेल तर त्यास दंड द्यावा लागे. हीं देणीं पुष्कळ शेतकऱ्यांस इतकीं असह्य होत कीं त्यांस शेत लावण्यापासून फारसा फायदा होत नसे. ह्याचा परिणाम असा झाला कीं, त्या देशांतील मोठी राज्यक्रांति होण्यापूर्वीं तेथील पुष्कळ प्रदेश ओसाड पडून गेले; किंवा तेथें जंगल वाढलें. ह्यामुळें अर्थात् तेथें जमिनीपासून वियुक्त अशी पुष्कळ लोकसंख्या उत्पन्न झाली. इंग्लंदमध्यें हीच गोष्ट पुष्कळ अंशांनीं नाहींतरी कांहीं अंशांनीं घडून आली.

ह्या मोठ्या कारणांखेरीज कांहीं लहान कारणेंहि झालेलीं आहेत, व तींहि प्रारंभापासूनच झालेलीं आहेत. नायकी उत्पन्न झाल्याबरोबर पळपुट्ये उत्पन्न होतात; ते एका नायकानें वाईट रीतीनें वागविल्यास दुसऱ्या नायकाकडे आश्रयार्थ पळून जातात. उदाहरणार्थ, आबिपोन लोक एकाच नायकास चिकटून रहात नाहींत; तर कांहीं कारणांव्यतिरिक्तहि एका नायकास सोडून दुसऱ्याकडे जातात. पाटागोनियन लोकांचेंहि असेंच आहे. म्हणून त्यांचे नाईक त्यांस फार गरीब रीतीनें वागवितात, व कधीं कधीं त्यांच्या गरजाहि पुरवितात; कारण एरवीं ते दुसऱ्या नायकाकडे जातात. बेचुआना लोकांबद्दल लिव्हिंग्स्टन असें म्हणतो कीं, त्यांच्यांतील

कुटुंबेंच्या कुटुंबें कधींकधीं नायकास सोडून रात्रींच्या रात्रीं दुसऱ्या गांवीं पळून जातात, आणि कधीं कधीं सगळा गांवच जातो, आणि अशा रीतीनें नाईक अगदीं एकटा पडतो. असल्या ह्या कृति हलक्या सामाजिक स्थितींत सा. मान्यतः होत असून कधीं कधीं त्या वरवरच्याहि स्थितींत होत असतात. उदाहरणार्थ, रशियामध्यें शेतगुलाम एका जमीनदारानें वाईट रीतीनें वागविल्यास दुसऱ्याकडे जात असत, व तेव्हां लहान लहान नायकांमध्यें नेहमीं तंटे असल्यामुळें असले लोक मदतनीस म्हणून त्यांस पाहिजे असत. आतां हे दुसरीकडून आलेले लोक जमिनीला बांधलेले नसल्यामुळें ते शेतगुलामांहून ज्यास्त स्वतंत्र असत. शिवाय वरिष्ट लोकांचीं जीं राखेपासून झालेलीं मुलें तींहि स्वतंत्रवर्गांतील लोकांची संख्या वाढविण्यास कारणीभूत होत; आणि शिवाय ज्यांच्या जमिनी कांहीं कारणानें गेल्या असे धारेकरी व त्यांचीं मुलें ह्यांचीहि भर ह्या स्वतंत्र कामकरी वर्गांत पडत असे.

८९. अशा रीतीनें गुलामगिरीबद्दल पैसे भरून, पैसे न भरतां नोकरीबद्दल पैसे भरून, अर्धवट गुलाम असे धारेकरी काढून लाविल्यानें, पळपुट्ये बाहेरून देशांत आल्यानें लहान लहान स्वतंत्र धारेकरी गरीब झाल्यानें, त्यांना मुलें झाल्यानें, आणि वरिष्ट वर्गांतील लोकांच्या राखांस मुलें झाल्यानें, हळू हळू बनलेला जो स्वतंत्र गांवढेकरी वर्ग त्याची स्थिति कशी असे ती आतां पाहूं.तसें करण्यास इंग्लंदांतील शेतकरीवर्गाकडेच नजर देऊं. काढून टाकलेले सोजीर आणि नोकर आणि वर सांगितलेले काढून टाकलेले धारेकरी आणि बंद केलेल्या मठांचे आश्रित

ह्यांना कांहीं उद्योग नसल्यापासून उत्पन्न होणारे जे अनर्थ ते टाळण्याकरितां कडक कायदे इंग्लंदांत पसार केले ह्याचा परिणाम असा झाला कीं, आठव्या हेन्रीसारख्या लोभी राजांचे व लष्करी जमीनदारांचे अन्यायाच्या वागवणुकीनें भटकावयास लागलेले जे अनेक भिक्षेकरी व इतर लोक ते अर्धवट गुलाम बनले. ह्या अनेक निराधार लोकांपैकीं जे उपासमरीनें मेले नाहींत ते लुटारूपणा करूं लागले; आणि त्याबद्दल ते एक फांशीं जाऊं लागले, किंवा त्यांस शिक्षा म्हणून त्यांजकडून ठराविक दरांनीं काम करून घेऊं लागले. पुढें सहाव्या एडवर्डाच्या वेळीं ह्या लोकांची स्थिति इतकी वाईट झाली कीं, त्यांच्या अंगावर 'भटक्ये किंवा गुलाम' असे शिक्के मारूं लागले. पुढें हळूहळू प्रत्येक गांवच्या भिकाऱ्यांस पोसण्याचें काम त्या त्या गांवच्या लोकांवर टाकूं लागले. म्हणजे काय, तर, त्या लोकांचा जमिनीशीं जो पूर्वीचा संबंध तो कांहीं अंशीं पुनः अस्तित्वांत आला, आणि त्यांस जमिनीच्या उत्पन्नाचा कांहीं भाग मिळूं लागला. ह्या वेळीं कामकरी जरी नांवाचा स्वतंत्र असे तरी त्यास पाहिजे तिकडे जाण्याची मोकळीक नसे, त्यास ठराविक मजूरी द्यावी लागे, आणि शरीरकष्टांखेरीज इतर उद्योग करतां येत नसे.

पण त्या वेळीं हळूहळू निघून जावयास लागलेली जी सामाजिक स्थिति तिचें चित्र डोळ्यांपुढें आणिल्याखेरीज त्या काळीं व्यक्तिस्वातंत्र्याला किती बंधनें होतीं हें बरोबर लक्षांत यावयाचें नाहीं. ज्या समूहांचे संयोग होऊन मोठाले समाज बनलेले आहेत ते हल्लीं

एकमेकांत इतके पूर्ण रीतीनें मिसळून गेलेले आहेत कीं, ते एकाकाळीं अगदीं वियुक्त होते अशी कल्पना करण्यास आपल्यास कठीण पडतें. पण अगदीं प्रारंभींचे जे विरोध ते इतके कायम राहिले होते कीं प्रत्येक साध्या व संयुक्त समूहास इतर साध्या व संयुक्त समूहांपासून आपलें संरक्षण करून घ्यावें लागत असे. त्यामुळें प्रत्येक समूहाचे घटक त्या समूहास बांधलेले असत. सारांश माणूस वास्तविक स्वतंत्र असा कोठेंच नसे. तो गांवाला किंवा इस्टेटीला बांधलेला असे, व तो गांव किंवा इस्टेट त्याचें संरक्षण करण्यास बांधलेला असे.

मजूर नांवाचा स्वतंत्र झाल्यावर देखील शेतकऱ्याच्या कुटुंबांत जमीनदार व कूळ ह्यांच्यामधील संबंधांसारखे संबंध कांहीं अंशीं बराच काळपर्यंत दिसत असत असें कांहीं शिलक राहिलेल्या रूढींवरून दिसून येतें. कारण जमीनदाराच्या घरांत त्याचे आश्रित त्याच्यापेक्षां सखल जाग्यांत बसून त्याच्याच बरोबर जेवीत असत, तसेंच परवांपर्यंत शेतकऱ्याचे मजूर शेतकऱ्याच्या घरांत रहात असत, व जेवीत-खात असत; म्हणजे, जणूं काय, ते त्याच्याच कुटुंबाचे घटक असत आणि अंधाधुंदीच्या काळांत अशा प्रकारची व्यवस्था परस्परसंरक्षणार्थ असणें जरूरच असे.

शेतांत खपणाऱ्या मजुराचें स्वातंत्र्य बराच काळपर्यंत बरेंच मर्यादितच राहिलेलें होतं आणि कांहीं प्रांतांत अद्यापिहि तें मर्यादितच दिसतें. परवांपर्यंत शेतकरी लोकांत मुलगे बापांचे अगदीं अंकित असत हें पूर्वी सांगितलेलेंच आहे; तसेच त्यांचे मजूरहि त्यांचे अंकित

असत. ते इतके कीं त्यांनीं कोठें रहावयाचें, कोणाशीं लग्न करावयाचें, वगैरे सर्व शेतकरी ठरवीत असत. ह्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं अगदीं स्वतंत्र असा शेतमंजूर अलीकडेच अस्तित्वांत आलेला आहे.

९०. ह्याहून जास्त जलद फेरबदल शहरांतून होऊन गेले. हे फेरबदल प्रारंभीं बहुतेक असल्याच प्रकारचे असत; कारण प्रारंभीं ग्रामजीवित आणि नगरजीवित ह्यांमध्यें फारसा फरक नसे. सरदारांच्या किल्ल्यांभोंवतीं घरें बांधलीं जाऊन शहरें बहुतकरून बनल्यामुळें त्यांच्यावर जमीनदारांचा सभोंवतालच्या प्रदेशांतील लोकांवरल्या इतकाच ताबा असे. पण त्यांना त्यांचें स्वातंत्र्य मिळणें अनेक तऱ्हांनीं वरच्याहून ज्यास्त सुलभ झालें; आणि ज्या शहरांतून किल्ल्यांचें वर्चस्व नसे तेथें तें विशेषच सुलभ झालें असेल असें म्हणण्यास हरकत नाहीं.

आतां आपण प्रथम शहरांत आलेल्या शेतगुलामांचा विचार करूं. कांहीं काळानंतर मालकांना त्यांच्यावर परत हक्क सांगतां येत नसे, आणि म्हणून ते नांवाचे स्वतंत्र बनत असत. पण वस्तुतः ते स्वतंत्र नसत; कारण गांवढे गांवांतील अंमल आणि शहरांतील अंमल ह्यांत फारसा फरक नसे. म्हणून पळून आलेला शेतगुलाम शहरांत आश्रयविहीन, साधनविहीन, आणि न्यायासनापुढें आधारविहीन असल्यामुळें त्यास एकाद्या सुखवस्तू नागरिकाचा आश्रय करून त्याची अर्धवट गुलामगिरी पत्करण्याव्यतिरिक्त अन्य मार्ग नसे. कोणताहि धंदा करण्यास, किंवा शिष्यपण केल्याशिवाय

काणत्याहि धंदेवाल्याकडे रोजमजुरीनें राहण्यास तो समर्थ नसल्यामुळें, उपाशीं मरणें, किंवा नागरिक घालील त्या अटी कितीहि जबर असल्या तरी मुकाट्यानें मान्य करणें ह्याखेरीज अन्य मार्ग त्यास नसे. शिवाय स्वतंत्र हातधंदे करणारांखेरीज बंदेहातधंदेवाले असत; म्हणजे त्यांजवरील लष्करी जमीनदारांचा ताबा अद्यापि निघून गेलेला नव्हता. उदाहरणार्थ, ब्रेन्टानो म्हणतो कीं, ११ व्या शतकापर्यंत यूरोपांतील वस्ती अधिकारी, वृद्ध स्वतंत्र माणसें, आणि बंदे ह्यांची बनलेली असे. ह्या शेवटच्या वर्गांत बहुतेक हातधंदेवाले येत; त्यांस कांहीं कर द्यावे लागत असून त्यांच्या जमीनदारांकरितां कांहीं कामें करावीं लागत असत. हें त्याचें म्हणणें यूरोपांतील इतर देशांसंबंधानें आहे. खुद्द इंग्लंदांत बंदे लोकांना स्वातंत्र्यप्राप्ति ह्याच्या आधींच व्हावयास लागली होती. उदाहरणार्थ, हालाम म्हणतो कीं, बरचे शेतगुलाम १४ व्या शतकाच्या पहिल्या पन्नाशीच्या अगोदरच शहरांत पळून जाऊन मजुरीचे कामकरी बनले होत. तथापि शहरांत आलेल्या ह्या शेतगुलामांना अर्धवट बंदेपणाची स्थिति पत्करावी लागे हें ह्यावरून दिसतें कीं शहरांतील मूळचे जे कामकरीवर्ग त्यांचीहि स्थिति तशीच असे.

हें ह्यावरून दिसतें कीं कोणत्याहि माणसानें कोणत्याहि धंदेवाल्याचें शिष्यत्व केल्याविना तो धंदा त्यास करतां येत नसे; असले शिष्य धंदेजमातीच्या लोकांतील मुलग्यांखेरीज इतरांस होतां येत नसे; शिष्यावर मालकाचा कडक अंमल असे; आणि तो रोज काम

करावयास लागला तरी त्याचा त्याच्यावरचा ताबा जात नसे; आणि शिवाय त्यानें कांहीं मोठी रकम भरल्याविना त्यास जमातीचा घटक बनतां येत नसे, आणि औद्योगिक व नागरिक दृष्ट्या स्वतंत्र होतां येत नसे. ह्याचा परिणाम असा होत असे कीं, खुद्द नागरिकाच्या वंशजांस देखील कधीं कधीं धंदे करण्याची मुभा न मिळाल्यामुळें त्यांस केवळ कामकरी कळाकुसच्ये रहावें लागे, आणि पूर्ण स्वातंत्र्य मिळत नसे.

बरें, जें पूर्णपणें स्वतंत्र असत—म्हणजे जमातींचे घटकहि—ते आधुनिक अर्थीं स्वतंत्र नसत. जमात म्हणजे एक अधिकारीमंडळ असे. जमातीचा एक मुख्य असून त्याच्या खालीं जमातीच्या कौन्सीलाचे सभासद असत; त्यांच्या खालीं काम करून घेण्याचा अधिकार असलेले लोक येत; त्याच्या खालीं त्यांचे शिकून तयार झालेले दुय्यम येत; आणि मुख्य माणसांच्या कह्यांत सामान्य जमातवाले रहावे अशी योजना केलेली असे. शिवाय जमातीच्या सामान्य घटकास आपला धंदा पाहिजे तसा चालवितां येत नसे. त्यानें केव्हां, कोठें, कसें, व किती पैसे घेऊन काम करावें हें सर्व ठरलेलें असे. जमातींच्या घटनेची बारीक रीतीनें छान करून मिसेस ग्रीन म्हणते कीं, त्यांच्या मुळाशीं जबरीचें तत्त्व असे. शिवाय जे जमातवाले किल्ले असलेल्या ठिकाणीं असतील त्यांस त्यांची तटबंदी बांधणें, संभाळणें, आणि दुरुस्त ठेवणें हीं कामें करावीं लागत, आणि निरनिराळ्या धंदेवाल्यांना निरनिराळ्य

बुरजांचें संरक्षण करावें लागे. शिवाय, गांवाच्या सुधारकीसाठींहि त्यांस खपावें लागे, आणि लढाईवर जावें लागे.

एवंच ज्याकाळीं शेतगुलाम आश्रयार्थ शहरांतून येऊं लागले तेव्हां त्यांची स्थिति खेडगांवांतील त्यांच्या भाईबंदांपेक्षां जरी ज्यास्त स्वतंत्रतेची असे तरी फारशी नसे.

९१. कामकऱ्यांत आणखी स्वातंत्र्य मिळालें तें जुलमापासून ते पळून आले तेव्हां मिळालें. आजपर्यंत स्वातंत्र्यप्राप्तीकरितां गांवढ्यांतील लोक शहरांत पळून आले होते, आणि आतां शहरांतील लोक त्याच हेतूनें गांवढ्यावर जाऊं लागले. उदाहरणार्थ, १३७६ सालीं सौदाम्पटन एथील लोकांनीं अशी तक्रार केलेली आढळते कीं करांचें ओझें असह्य झाल्यामुळें अर्धे लोक घरें सोडून गेले आहेत, व बाकीच जात आहेत. ह्याखेरीज कांहीं लोक जमातीचें शासन आपल्यास लागू होऊं नये म्हणून बाहेर जात असत. पुष्कळ कारागिरांना अशी शपथ घ्यावी लागे कीं, शिष्यपण पुरें झाल्यावर जमातीच्या परवान्याविना आपण स्वतंत्र धंदा करणार नाहीं. म्हणून ते लोक धन्यापाशीं रहावयाचें टाळूं लागले, आणि शहराबाहेर धंदे काढूं लागले, आणि जेथें म्युनिसिपालिट्या नसतील अशा म्यांचेस्टर, बर्मिंघाम वगैरे शहरीं जाऊन राहूं लागले. ह्या दोन्ही तऱ्हांनीं नांवाच्या नव्हे तर खऱ्या स्वतंत्र कामकऱ्यांच्या वर्गांत भर पडूं लागली.

अशा रीतीनें जमातींचा अधिकार व भरभराट ह्यांत कमीपणा येऊं लागल्यामुळें त्यांची घटना बिघडूं लागली; आणि कांहीं ठिकाणीं त्यांची मालमत्ता जप्त

केल्यागुळें त्यांचा एकदमच मोक्ष झाला. ह्या गोष्टी जुलमी 'स्टुअर्ट' घराण्याच्या अमदानींत घडून आल्या. पण ह्याचा अनपेक्षित असा एक सुपरिणाम असा झाला कीं, इतर लोकांप्रमाणें ह्या जमातींच्या घटकांनाहि आपले धंदे पाहिजे तसे चालविण्याची ह्यामुळें मुभा मिळाली. अशा रीतीनें स्वतंत्र मजुरीचें क्षेत्र वृद्धिंगत झालें.

९२. एथें आपल्यास परत मागें जाऊन दुसऱ्या एका मार्गानें पुनः हळूहळू पुढें गेलें पाहिजे. कारण कांहीं देशांत जमाती मोडत चालल्या असतां इतर देशांत गृहवस्त्या आणि ग्रामवस्त्या मोडत चालल्या होत्या.

परस्परसंरक्षणाच्या आवश्यकतेमुळें आप्तजन जरी एकमेकांस चिकटून राहून संघ बनवीत असत, तथापि परिस्थिति योग्य झाल्याबरोबर हे संघ विस्कळित करण्यास पहिल्यापासून एक कारण अस्तित्वांत होतेंच. तें हें कीं, संघापैकीं जे उद्योगी व हुशार असतील त्यांस आपल्या ह्या गुणाचा विशेष फायदा न मिळाल्याबद्दल वाईट वाटत असतें; कारण अविभक्त कुटुंबांत सगळ्यांची प्राप्ति एकत्र करून सगळ्यांच्या खर्चाकडेच लागत असते. उदाहरणार्थ, दक्षिण स्लाव्होनियन लोकांतील गृहवस्त्यांच्यासंबंधानें सर हेन्री मेन म्हणतो कीं, ह्या वस्त्यांमध्यें जो साहसी व उत्साही असेल त्यास हा अविभक्तपणा आवडत नाहीं. तो बाहेर रगड पैसा कमावितो, आणि तो कुटुंबाच्या पेटींत आणून ठेवण्यास कबूल होत नाहीं.

जेथें शांतता असल्यामुळें असा विस्कळितपणा होणें शक्य झालें तेथें तो ह्या कारणामुळें कधींच सुरू होऊन

तेव्हांपासून सुरू आहे. उदाहरणार्थ, राडोव्हाट्झ् एथील लोकांविषयीं आर्थर इव्हान्स म्हणतो कीं, सीमेवरच्या इतर भागांप्रमाणें एथें कुटुंबें तितकीं मोठीं नाहींत; ह्याचें कारण असें दिसतं कीं, कायद्यास टाळून तीं विभक्त होत असलीं पाहिजेत. रशियाप्रमाणें बल्गारियामध्येंहि असेंच होत आहे; आणि आपल्या या देशांतहि अविभक्तपणा कमी होऊन कुटुंबांतून विभक्तपणा वाढत आहे हें प्रसिद्ध आहे; आणि त्यास कारण कुटुंबांतील जो माणूस इतरांहून ज्यास्त पैसे कमावीत असेल त्यास तो आपल्यापाशींच ठेवावा व पूर्णपणें स्वतंत्र व्हावेंसें वाटतं हें होय.

ह्यासंबंधानें ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे कीं, रोमन वगैरे लोकांत गुलामांस द्रव्यसंचय करण्याची परवानगी दिल्यामुळें ते जसे शेवटीं स्वतंत्र झाले, तसेच अविभक्त कुटुंबांचेहि घटक त्यांस असली परवानगी मिळाल्यमुळें स्वतंत्र झाले. कारण आपण पूर्ण स्वतंत्र व्हावें ही इच्छा प्रत्येकास असतेच.

अशा रीतीनें लोकसमूह अनेक रीतींनीं स्वतंत्र झाले ही गोष्ट जरी खरी आहे, तरी बहुतेक देशांतून ते अद्यापि पूर्ण स्वतंत्र झालेले नाहींत. खुद्द इंग्लदांत देखील १८१४ सालापर्यंत लंदन खेरीज करून इतरत्र कोणासहि त्या त्या धंदेवाल्याची शिष्यवृत्ति केल्याखेरीज तो धंदा स्वतंत्रपणें करतां येत नसे. आणि १८२४ सालापर्यंत बाहेर देशीं रहावयास जाण्याची तेथील लोकांस पूर्ण मुभा नसे. शिवाय, त्या सालापर्यंत हलक्या कारागिरास काम मिळविण्यास देशांतल्या देशांत पाहिजे तिकडे जाण्याची परवानगी नसे.

९३. ह्या प्रकरणाच्या प्रारंभीं असें दाखविलें होतें कीं, स्वतंत्र मजुरी आणि करार हीं परस्परसंबद्ध आहेत. आतां इतका वेळ मजूर स्वतंत्र बनण्यास जीं अनेक कारणें होतात त्यांचा विचार केला असल्यामुळें त्याबरोबरच कराराची वृद्धि कशी होत जाते हें आपण पाहूं. आतां स्वतंत्र मजुरींत करार गर्भित होत असल्यामुळें, मजूर जसे ज्यास्त ज्यास्त स्वतंत्र होत गेले आहेत तसा करार हा ज्यास्त ज्यास्त पसरत गेला आहे.

अर्धवट सुधारलेल्या लोकांच्या अगदीं प्रारंभींच्या लेख असलेल्या काळांत करार केलेले आढळून येतात. उदाहरणार्थ, आब्राहामनें म्याकपेल्हापासून गुहा विकत घेतली तेव्हां. जमीनजुमला व गुलाम विकत किंवा भाड्यानें घेण्याकरितां पुष्कळ करार केलेले आसिरियन लोकांच्या शिलालेखांतून आढळून येतात. एशेनबर्ग म्हणतो कीं रोममध्यें व्यापारी जमातीचे घटक सरकाराकरितां, किंवा खासगी गृहस्थांस गुलाम बाळगतां येत नसत म्हणून त्यांच्याकरितां करार करून कामें करीत असत.

सहक्रियेचें कराररूपी हें नवें स्वरूप आपल्यास सरल आणि सहज लक्षांत येण्याजोगें असें दिसतें; पण प्रारंभीं लोकांस तें तसें वाटत नसे. रानटी लोकांस प्रारंभीं जशी अदलाबदल कळत नसे, तसे व्यापारविषयक सवदे प्रारंभीं यूरोपांतल्या लोकांच्या लक्षांत चटकन् येत नसत. कारण कौटुंबिक संबंधांत अदलाबदलीची कल्पना येत नाहीं. शिवाय प्रारंभीं जमीन वगैरे बरोबर मोजण्याचीं योग्य साधनें नसत. अदलाबदल सुरू

झाली तेव्हां असलीं साधनें ज्यास्त ज्यास्त उत्पन्न होऊं लागलीं, आणि तीं जशीं वाढत चाललीं तशी अदलाबदलहि वाढत गेली. प्रथम हात, पाऊल, तांदूळ, गुंज अशीं स्वाभाविक वजनें मापें होतीं; तीं अगदीं तंतोतंत व सरकारी अशीं हळूहळूच झालीं, व तीं तशीं झालीं तसेंच निश्चित करार करणें शक्य होऊं लागलें. अमक्या वजनाच्या अमुक वजना किंवा मापाबरोबर अमुक जिन्नस अमुक वजनाचा किंवा मापाचा द्यावयाचा ही समप्राण कल्पना तेव्हांच उत्पन्न झाली.

कराराची वृद्धि पुरी होण्यास किमतीचीं निश्चित मापें (नाणीं) उत्पन्न होणेंहि आवश्यक होतें. प्रारंभींच्या पायऱ्यांवर नाणीं नसल्यामुळें अदलाबदलीस कसे अडथळे येत हें आठव्या प्रकरणांत दाखविलेंच आहे. प्रथम नाणें जनावरें वगैरे खाण्याच्या पदार्थांचें कसें बनलेलें असे, व त्यांच्या किंमती निरनिराळ्या कशा असत, हें तेथें आपल्या दृष्टीस पडलेंच आहे. पुढें हत्यारें, आऊतें, कापड वगैरे पदार्थ जेव्हां नाणीं बनलीं तेव्हां देखील किंमती अनिश्चितच असत. नंतर छापील धातूचीं नाणीं उत्पन्न झालीं; पण टांकसाळीचें काम प्रथम अनेक लोक अनेक ठिकाणीं करीत असल्यामुळें त्यांच्या वजनांतहि कमज्यास्तपणा उत्पन्न होत असे. नंतर सरकारी टांकसाळी उत्पन्न झाल्या. तरी कांहीं राजे नाणें हलकी धातु मिसळून हलकें करीत, त्यामुळें नाण्यांत अनिश्चितपणा पुनः उत्पन्न झाला होता. आलीकडेच नाणीं शुद्ध झाल्यामुळें तीं व त्यांच्या आधारावर बनलेले करार निश्चित बनले आहेत. पण कोठें कोठें कागदी ना-

ण्यांची किंवा नोटांची कमी किंमत होऊन करारांस अजूनहि अनिश्चितपणा येत असतो.

. आणखी एक कारण ध्यानांत घेतलें पाहिजे. लेखनकला सुरू होण्यापूर्वी, आणि माणसांचीं वचनें हल्लींपेक्षां कमी विश्वसनीय असत तेव्हां, करारांना संशयितपणाच्या रूपाचा अनिश्चितपणा असे. म्हणून करार साक्षीदारांसमक्ष करावे लागत असत; आणि नंतर सरकारी अधिकाऱ्यांदेखत करावे लागत.

शिवाय करारांची बृद्धि होण्यास मानवी स्वभावांत योग्य फेरबदल झाले पाहिजेत. हलक्या पायऱ्यांवर सर्व गोष्टी, सर्व व्यवहार, सर्व कल्पना तंतोतंत नसतात. इतकेंच नाहीं, तर तंतोतंतपणा लोकांस आवडत नसतो. अशिक्षितांना अनिश्चितपणा विशेषच आवडतो. उदाहरणार्थ, आचारी जिन्नस मोजून मापून न घालतां अजमाशानें घेतात. अशा पायऱ्यांवर हत्यारें ओबडधोबड असतात, आणि तयार केलेल्या जिनसांच्या रेषा, वांकणें आणि पृष्ठभाग कधींहि अगदीं बरोबर नसतात; सर्व अनिश्चित असतें. रस्ते अरुंद असून अत्यन्त अनियमित असतात; रस्त्यांना खडी नसते, किंवा मर्यादा नसते; पुष्कळ वेळ घिसाघिस करून प्रथम सांगितलेल्या किंमतींच्या निंमे किंमतीस दुकानदार जिन्नस विकतात; आणि स्पष्ट करार करण्याचा त्यांस कंटाळ असतो. करारावद्दल बोलणें करावयाचें तें बेताबातानें करावें लागतें; एकदम कोणास वांधून घेऊं लागल्यास तो बुजून जातो; आणि अगोदर बक्षीस किंवा इसार द्यावा लागतो. अशा प्रकारच्या चालींचा मागमोस इं

अज लोकांतहि सांपडतो; त्यांच्यांत डझन पाव द्याव-याचे म्हणजे तेरा देतात; मापें कापून देण्याच्या ऐवजीं भरून देतात; आणि देवाला म्हणून एक ज्यास्त टा-कितात. आतां हे असले सवदे, आणि ह्यांकांतून पै-पर्यंत हिशेब करून नक्की रक्कम होईल तेवढीच घेण्या-देण्याचे सवदे ह्यांच्याकडे पाहतां करारानें कच्चें स्वरूप आणि पक्क स्वरूप ह्यांमधील फरक लक्षांत येतो.

एवंच जबरीच्या सहक्रियेपासून स्वैच्छिक सहक्रिये-कडे प्रगति चालली असतां स्वतंत्र मजुरी आणि करार हीं एकमेकांस शक्य करून जरी एकत्र वृद्धि पावत असतात, तरी त्यांपैकीं प्रत्येकाची वाढ इतर कारणां-वरहि अवलंबून असते. त्यांच्यापैकीं कोणाचीहि वाढ जशी दुसऱ्याच्या वाढीशिवाय होत नाहीं, तशी दुस-ऱ्या कांहीं गोष्टी वृद्धि पावल्याशिवायहि ती होत नाहीं. सारांश, सामाजिक इंद्रियजालाचे निरनिराळे भाग पर-स्परांवर अवलंबून असतात इतकेंच नाहीं, तर त्यांच्या-वर कार्य करणारीं कारणेंहि परस्परांवर अवलंबून असतात.

प्रकरण अठरावें
संयुक्त स्वतंत्र मजुरी

९४. आतांपर्यंत आपण सर्वांशीं नाहीं तरी मुख्यत्वेंकरून व्यक्तीव्यक्तींमधील औद्योगिक संबंधांचा तेवढा विचार केला. आतां एक धनी व अनेक मजूर ह्यांचे जे औद्योगिक संबंध त्यांचा विचार करूं.

असल्या ह्या घाऊक मजुरीचीं प्रारंभींचीं स्वरूपें अर्थात् जबरीचीं असत. ईजिप्तमधील मनोरे आणि आसीरियामधील मोठालीं गृहें जबरीनें लोकांकडून करून घेतलीं गेलीं. फिनिश्यन लोकांच्या कारखान्यांतून गुलाम कामकरी असून त्यांच्या जहाजांवरूनहि तेच असत. ग्रीक लोकांमध्यें कालवे वगैरे खणण्यासारखीं सार्वजनिक कामें गुलामांकडून करून घेत असत हें उघड आहे. रोमन लोकांतहि असेंच असे. मध्ययुगांतील ज्या मोठमोठ्या इमारती दृष्टीस पडतात त्या अशाच रीतीनें तयार झाल्या असल्या पाहिजेत; उदाहरणार्थ, ख्रिस्ती लोकांचीं देवळें आणि सरदारांचे किल्ले शेतगुलामांच्या श्रमांनीं तयार झाले असले पाहिजेत. शिवाय तटबंदीच्या शहरांतून तेथील व्यापारीजमातवाल्यांस त्या बांधण्याच्या व दुरुस्त करण्याच्या कामीं लावीत हें उघडच आहे.

वास्तविकरीत्या कांहीं शतकांपूर्वीं असें होणें आवश्यकच असे. कारण मोठालीं कामें करण्यास जितके मजूर लागतात तितके स्वतंत्र मजूर फारच थोड्या ठिकाणीं असत.

९५. स्वतंत्र किंवा अर्धवट स्वतंत्र कामकऱ्यांमध्यें अगदीं प्रथम संयोग बनला तो जहाजांवर काम करणाऱ्यांमध्यें बनला. आतां लढाईच्या वेळच्या लढाऊ जहाजांवरील खलाशी सर्वच स्वतंत्र बनले असें नाहीं. कारण वेठीनें धरलेल्या खलाशांस नोकरी करणें भागच असल्यामुळें त्यांची स्थिति त्यासंबंधानें गुलामांपेक्षांहि वाईट असते; कारण त्यांनीं अवज्ञा केल्यास त्यांस देहान्तशिक्षाहि मिळत असते. पण व्यापारी जहाजांवरील खलाशांस वरील विधान कांहीं अंशीं लागू आहे. "कांहीं अंशीं" असें म्हणण्याचें कारण हें कीं, त्यांनीं करार केला असेल तितके दिवसपर्यंत ते गुलामांसारखेच असतात; कारण त्यांनाहि कडक रीतीनें वागवीत असून आज्ञाभंगाबद्दल कडक शासन होत असतें. तेव्हां त्यांना स्वतंत्र मजूर ही संज्ञा एवढ्याच दृष्टीनें द्यावयाची कीं प्रथम करार करावयाचा किंवा नाहीं ह्यासंबंधानें ते स्वतंत्र असतात.

आतां संयुक्त रीतीनें काम करणाऱ्या स्वतंत्र मजुरांमध्यें रस्ते, कालवे, आणि आगगाड्या तयार करण्याकरितां बनलेल्या कंपन्यांचे नोकर येतात. रस्तेपट्टी घेण्याचीं नाकीं असलेले रस्ते कित्येक पिढ्यांपूर्वीं ज्या नायकांनीं व नोकरांनीं केले त्यांच्याबद्दल आपल्यास फारशी माहिती नाहीं. तथापि एवढें स्पष्ट दिसतें कीं, जरूर तो पैसा ठिकठिकाणच्या लोकांपासून गोळा केला होता, व रस्त्यावर पट्टी गोळा करून त्याचें व्याज वसूल करावयाचें होतें; आणि असाहि संभव दिसतो कीं, ठिकठिकाणच्या लोकांनीं मैल दोन मैल रस्ता कं-

त्राटानें तयार केला असावा, व त्या कामावर शेजारच्या शेतांवरील मजूर लाविले असावे.

प्रथम आगगाड्यांचे रस्ते बांधावयास लागले तेव्हां देखील रस्त्याचे लहान लहान भाग निरनिराळ्या कंत्राटदारांना देत असत; व तेथें उंचवटे कापून काढणें, दरडी बांधणें, पूल बांधणें, वगैरे सर्व कामें ते करीत असत. त्यांपैकीं कांहींजणांना पुष्कळ फायदा झाला, व ते श्रीमान् बनले. आणि नंतर सर्वच रस्ता बांधण्याचें काम ते अंगावर घेऊं लागले. पण पुढें पोट-कंत्राटदार उत्पन्न होऊन ते मातीचें काम, विटांचें काम, वगैरे निरनिराळीं कामें करूं लागले.

पुढें हा विभाग ज्यास्त ज्यास्त सूक्ष्म होत गेला; म्हणजे अनेक पोटविभाग ह्या कंत्राटदारांमध्यें व कामकऱ्यांमध्यें उत्पन्न झाले, आणि कांहीं विवक्षित कामकऱ्यांवर एकेक मुकादम येऊं लागला. अशा रीतीनें हीं कामें पूर्वीहून ज्यास्त चोखरीतीनें होऊं लागलीं, कारण जे ज्या कामांत चांगले असतील त्यांसच त्याज़वर नेमूं लागले.

एवंच औद्योगिक घटना लष्करी घटनेच्या धर्तीवरच बनलेली आहे. रोमन लोकांत लष्करी घटना फार पक्क झालेली असून शिपायांचे पोटविभाग जसे पुष्कळ झालेले असत तसे गुलामांचेहि झालेले असत. पेरूमध्येंहि असेंच असे. तेथें कामकऱ्यांचे सहस्र, शतकें, दशकें असे विभाग केलेले असून प्रत्येक विभागावर एकेक हपीसर असे. हल्लींहि सुधारलेल्या देशांतून मजूर स्वतंत्र आहेत तरी त्यांचे असेच सरळ समूह, संयुक्त स-

मूह, आणि दुबार संयुक्त समूह बनलेले आढळतात. आतां कोणतीहि संयुक्त क्रिया चांगल्या रीतीनें करण्यास—मग ती लढण्याची असो किंवा काम करण्याची असो—अशा प्रकारच्या घटनेची जरूरी आहे ही गोष्ट इतर बाबतींप्रमाणें ह्या बाबतींतहि सामाजिक रचना आणि इंद्रियजालरचना ह्यांच्यांत साम्य दिसतें ह्यावरून लक्षांत येईल. कारण शरीरांतील प्रत्येक इंद्रिय अनेक लहान भांगांचें बनलेलें असून ते भाग एकत्र मिळून मोठाले भाग बनलेले असतात, आणि तसले भाग एकत्र होऊन त्यांच्याहून मोठाले भाग बनलेले असतात. उदाहरणार्थ, स्नायू बनण्यास आकुंचनक्षम कित्येक दोऱ्या एका आच्छादनांत ठेविलेल्या असतात; असल्या अनेक गुंडाळ्या ह्याच्याहूनहि मोठ्या आच्छादनांत एकत्र झालेल्या असतात आणि त्या त्यांच्याहून मोठ्या आच्छादनांत गुंडाळलेल्या असतात. पित्त वगैरे उत्पन्न करणाऱ्या नळ्यांची घटना अशाच प्रकारची आहे. सामाजिक इंद्रियजाल आणि व्यक्तिविषयक इंद्रियजाल ह्यांच्यामधील हें साम्य सहक्रियेकरितां आवश्यक आहे. आतां हें उघडच आहे कीं ज्या हजारों तंतूंचा मिळून स्नायू बनलेला असतो ते जर केवळ एकत्र जुळलेले असले, तर त्या सर्वांचें एकदम आकुंचन व्हावें असा ज्ञानतंतूंचा व्यापार त्यांजवर पसरला नसता. परंतु बारीक बारीक फांद्या फुटणाऱ्या मुख्य ज्ञानतंतूंतून जर हा व्यापार सुरू झाला तर तो त्या सर्व तंतूंना (स्नायुतंतूंना) एकदम आकुंचित करूं शकेल. समाजांतहि असेंच होतें. रानटी लोकांचे

मोठाले जमाव आणि व्यवस्थित लष्कर ह्यांच्यामधील लढायांवरून असें दिसून येतें कीं, अशासारखेच शिपायांचे संयुक्त व पुनःसंयुक्त समूह बनविले तरच ते चांगल्या रीतीनें लढूं शकतात. असें समजा कीं एकाद्या सुधारलेल्या देशांतील व्यवस्थित फौज शिपायांचा केवळ एक घोळका बनली, तर दुसरी एकादी व्यवस्थित फौज तिचा सहजच पराभव करील यांत बिलकूल शंका नाहीं. आणि ह्या ठिकाणीं आपल्या दृष्टीस असें पडतें कीं, मोठालीं कामें करण्याकरितां लाविलले जे मोठमोठाले कामकऱ्यांचें समूह त्यांचीहि घटना त्याच धर्तीवर झालेली आहे. निरनिराळे समाजसुधारक समाजाची सुधारणा करण्याच्या हेतूनें ज्या अनेक युक्त्या सुचवितात त्यांचा विचार करतांना हें सत्य नेहमीं ध्यानांत बागाविलें पाहिजे, म्हणून त्याला एथें विशेष जोरानें उल्लेख केला आहे.

आणखी एक व्यापक सत्य ध्यानांत आणिलें पाहिजे. आपल्या नुक्तेंच असें नजरेस आलें कीं, स्वतंत्र मजुरी आणि करार हीं अवश्यच एकदम उत्पन्न होतांत. कारण तीं परस्परसंबंधी आहेत. म्हणून सहजच त्यांची वाढ बरोबर होते, व तीं लहानाचीं मोठीं होतात. प्रारंभीं करारानें काम करणारा हा हुशार असा एक मजूर असतो, व तो कांहीं ठरीव रकमेवर कांहीं ठरीव काम करावयाचें कबूल करितो, आणि आपल्या मदतीस आपल्यासारखेच दुसरेच मजूर घेतो, व त्यांचा तो मुकादम बनतो. ह्या कामांत त्यास यश आलें तर त्यास ह्याहून ज्यास्त मोठें काम कंत्राटानें अंगावर घेण्याचें सामर्थ्य येतें.

आणि, अशा रीतीनें, तो धूर्त असल्यास पायरीपायरीनें मोठा कंत्राटदार बनतो. ह्याचा पुरावा हा कीं कांहीं दिवसांपूर्वीं असले कांहीं कंत्राटदार असे होते कीं त्यांस लिहितां देखील येत नसे. पुढें आगगाड्यांचे रस्ते बांधणाऱ्या कंपन्यांनीं कंत्राटदार नेमण्याचा प्रघात अगदीं फिरला; म्हणजे, कंत्राटदारलोक इन्जिनिअर व वकील ह्यांच्या साह्यानें कंपन्या बनवूं लागले, व त्यांजपासून फायदेशीररीतीनें कामें मिळवूं लागले. एकादी संस्था प्रथम कांहीं विशिष्टकार्य करण्याकरितां अस्तित्वांत आणिली असतां कांहीं काळानें स्वतःचें पोषण हेंच तिचें प्रधान उद्दिष्ट कसें बनतें, आणि तें कार्य करणें दुय्यम उद्दिष्ट कसें होतें हें ह्यावरून दिसून येतें.

९६. हे स्वतंत्र माणसांचे संयोग त्यांचें विशिष्ट काम संपलें म्हणजे मोडत असून ते जे संयोग मोडत नाहींत त्यांच्या मागून उत्पन्न होत असतात. हे संयोग अर्थात् कारखान्यांतून काम करणारांचे होत.

. आतां ह्या कारखान्यांत काम करणारांच्या उत्पत्तीकडे पाहतां ते प्रारंभींचे धनी, रोजमजूर, आणि शिष्य ह्यांच्यापासून उत्पन्न झाले असले पाहिजेत. प्रत्येकानें अमुकच कामकरी लाविले पाहिजेत असे जमातींचे नियम असत. ह्यावरून असें दिसतें कीं, ज्यांची सरशी असेल ते धनी आपली कामकऱ्यांची संख्या नेहमीं वाढवूं पाहत असले पाहिजेत. ह्याचें उदाहरण असें सांपडतें कीं, १३४० सालीं ब्रिस्टल एथील टामस ब्लांकेट नामक गृहस्थानें आपल्या घरांत अनेक माग व विणकर लाविल्यांबदल त्यास दंड झाला होता. शहर सो-

ह्मून सभोंवतालच्या भागांतून कारखाने जे सुरू झाले त्यास कारण जमातींच्या ह्या कायद्यांच्या बंधनांतून सुटून जावें, हेंच असलें पाहिजे.

प्रारंभीं ही संख्या वाढण्यास मांडवलाच्या कमतरेची अडचण असे. त्या वेळीं जमिनी, घरें, आणि गुरेंढोरें हीच संपत्ति असे, व ती बहुतेक लष्करी जमीनदार व त्यांचे आश्रित ह्यांच्या ताब्यांत असे. पुढें नगरवासियांच्या हातांत व्यापाराचा माल आणि नाण्यांचे संचय ह्यांच्या रूपानें संपत्ति आली ती हळूहळूच आली असली पाहिजे. गहाणांखेरीज दुसऱ्या ठेवी त्यावेळीं नसत, आणि त्यांचे पैसे पाहिजे तेव्हां करण्याची सोय नसे. एवंच संयुक्त स्वतंत्र मजुरीच्या वाढीस कृत्रिम अडचणींखेरीज स्वाभाविक अडचणी असत.

निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या परिस्थितीमुळें जरी निरनिराळ्या गोष्टी दिसून येतात तरी एक सामान्य गोष्ट त्यांच्यांत दिसून येते. ती ही कीं प्रथम सारखींच कामें करणाऱ्या कामकऱ्यांचे अगदीं साधे समूह सर्वत्र बनले. व्यक्तींना व्यवस्थित स्वरूप प्राप्त होण्यापूर्वीं त्या एकत्र गोळा झाल्या पाहिजेत. आणि म्हणून कारखान्यांची पद्धति उत्क्रान्त होत असतां विभिन्नीकरण आणि संयोगीभवन होण्यापूर्वीं साधें संकलन होऊन गेलें. उदाहरणार्थ, इंग्लंदांत प्रथम अनेक एकेरे विणकरी असत, त्यांचे माग त्यांच्यात घरांत असत, आणि ते स्वतंत्ररीतीनें काम करीत; आणि कांहीं वेळ मध्यें मध्यें शेतीकडे खर्च करीत. पुढें असें झालें कीं, हे विणकरी मालकांपासून किंवा मुख्य व्यापाऱ्यांपासून

माल घेऊं लागले, आणि त्याचें आपल्या कुटुंबांतील माणसांच्या सहाय्यानें किंवा इतर माणसें लावून कापड बनवूं लागले; आणि त्या कापडाबद्दल ठरीव किंमत मालकापासून घेऊं लागले.

ह्या ठिकाणीं विणकरी हा ' धनी व कामकरी ' ह्या स्थितींतून ' धन्यासाठीं काम करणारा ' ह्या स्थिती-प्रत पावलेला आपल्या दृष्टीस पडतो; तथापि तो धन्याच्या घरीं काम न करतां आपल्याच घरीं करीत असतो. कांहीं धंद्यांमध्यें ही स्थिति तिच्याहून ज्यास्त पक्क स्थितीबरोबर अद्यापि दृष्टीस पडते. ही गोष्ट लोंकर व कापूस विणण्याच्या संबंधानेंच झाली असें नाहीं तर इस्टाकण्या करणें, खिळे बनविणें, आणि कपडे शिवणें ह्यांच्या संबंधानेंहि झाली आहे. ह्याच्या पुढच्या संक्रमणाची एक पायरी गेल्या शतकांत कापड तयार करणाऱ्या पांतांत दिसून आली; कारण तेव्हां कपड्यांचे कारखानदार लोंकर घाऊक खरेदी करून विणणारांस स्वताच्या किंवा धन्याच्या घरीं विणावयास देऊं लागले. पुढें हळूहळू धन्याच्या घरींच काम करण्याचा प्रघात वाढूं लागला.

आतां पहिली पद्धति मोडून दुसरी वाढत जाण्याचें कारण ती ज्यास्त फायदेशीर आहे हें अर्थातच होय. निरनिराळे राहून काम करणाऱ्या गरीबलोकांच्या यंत्रांपेक्षां श्रीमान् कारखानदारानें पुरविलेलीं यंत्रें अर्थातच ज्यास्तच चांगलीं असणार. शिवाय धन्याकडे कामें केलीं म्हणजे अर्थातच तो तीं नियमानें आणि पद्धतशीर रीतीनें करून घेणार, आणि त्यामुळें काम ज्यास्त

चांगलें होणार. तद्वतच, कच्चा माल कारखानदार घाऊक घेत असल्यामुळें त्यांस तो ज्यास्त स्वस्त मिळणार. ह्या सर्व कारणांमुळें पुष्कळ कामकऱ्यांकडून एकल काम करून घेणारा कारखानदार तयार केलेला माल एकेक-ट्या काम करणारांपेक्षां ज्यास्त स्वस्त विकूं शकतो.

तथापि ह्यासंबंधानें ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, हा बदल कमज्यास्त प्रमाणावर होणें हें समाजांचें जुनें स्वरूप जाऊन नवें प्राप्त होणें ह्याच्यावर आणि धंद्यांच्या स्वरूपावर अवलंबून असतें. उदाहरणार्थ, जर्मनींत लष्करी जमीनदारीचे कांहीं संबंध अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत शिलक होते, उद्योगधंद्याची जमातपद्धति बऱ्याच ठिकाणीं अमलांत होती, आणि तेथें गांववस्ती आणि शहरवस्ती ह्यांचें विभिन्नीकरण अजूनहि इतकें अपुरें आहे कीं, तेथें लोक उन्हाळ्यांत शेतांतून काम करितात, आणि हिंवाळ्यांत मागावर विणीत रहातात. ह्यामुळें तेथें कारखान्यांतून काम करण्याच्या पद्धतीबरोबर झोंपड्यांतून काम करण्याची पद्धतिहि बरीच दिसून येते.

तथापि एथें आपल्यास विशेषतः ही गोष्ट ध्यानांत ठेवावयाची कीं, अशा रीतीनें मजुरांचें संकलन झालें म्हणजे औद्योगिक संबंध बदलून जातात. हा बदल तीन प्रकारचा दृष्टीस पडतो. जो माणूस पूर्वी कांहीं काळ शेती, व कांहीं काळ इतर धंदा करीत असेल तो आतां सर्वकाळ तो धंदाच करूं लागतो. त्याबरोबरच खेडेगांवचें जीवित आणि शहरचें जीवित ह्यांमध्यें स्पष्ट भेद उत्पन्न होतात. आणि प्रारंभीं माल उत्पन्न करणारे व

काम करणारे जे एकच असत ती स्थिति बदलून भांडवलवाले व कामकरी असे भिन्न वर्ग उत्पन्न होतात.

९७. इंग्लंदांत ट्युडर घराण्याच्या अमदानींत पुष्कळ कामकरी एकत्र जमवूं लागल्यामुळें बराच श्रमविभाग उत्पन्न झाला. उदाहरणार्थ, कापडाच्या संबंधानें कापूस पिंजणारे, सूत काढणारे, विणणारे, लोंकर कातून काढणारे, त्या रांगेनें उभ्या करणारे, रंगविणारे, गठ्ठे बनवणारे, ते बांधणारे, इत्यादि भेद उत्पन्न झाले. पण ह्याच्याहूनहि ज्यास्त सूक्ष्म श्रमविभाग उत्पन्न व्हावयाचा तर तो निरनिराळे कामकरी एकाच छपराखालीं काम करावयास लागतील तेव्हांच होईल. ह्याबद्दलचें आडाम स्मिथनें दिलेलें उदाहरण फार चांगलें लागू पडतें. एक टांचणी करावयाची तर ती पुरी होण्यास अठरा असामींच्या हातांतून जावी लागते; हे अठरा प्रकारचे कामकरी जर निरनिराळ्या बांकांवर काम करण्याच्या निरनिराळ्या घरांतून तें करीत असले तर त्या कामास अर्थात् फारच अडथळा येईल. पण कामकऱ्यांचें हें संकलन, विभिन्नीकरण आणि संयोगीकरण अनेक यंत्रें चालविणारी एकच शक्ति उपयोगांत आणूं लागले तेव्हांच शक्य झालें. ६ व्या शतकांत देखील फ्रान्स-देशांत धान्य दळण्याच्या कामीं जलशक्तीचा किंवा पाणचक्कीचा उपयोग करूं लागले होते. आणि सोळाव्या शतकांत ह्या चक्कीचा उपयोग इतर कामीं करूं लागले. कोणा एका चतुर माणसास अशी युक्ति सुचली कीं विणण्यासारखी जी क्रिया एकाच क्रमानें पुनःपुनः द्यावयाच्या त्याच त्याच गतींची बनलेली असते ती यंत्रानें

घडवून आणतां येईल. ही कल्पना जेव्हां एका गोष्टी-च्या संबंधानें साध्य झाली तेव्हां ती लवकरच इतर गोष्टींला लावूं लागले, आणि हालणारे दांडे व फिर-णारे पट्टे ह्यांच्या योगानें पाणचक्कीची शक्ति अनेक यंत्रांच्या ठिकाणीं संक्रान्त करूं लागले. ह्याचा परिणा-म असा झाला कीं, कामकऱ्यांस यंत्र हालवावयास लागत नाहींसें होऊन फक्त त्याजवर देखरेख ठेवण्या-चें काम राहिलें. इंग्लंदांत असला कारखाना प्रथम अठराव्या शतकाच्या प्रारंभीं डार्बी शहरीं रेशमाचा सुरू झाला. पुढें तसलेच कापसाचे कारखाने आर्कर्रा-इट, क्राम्प्टन आणि हारग्रीव्हस् ह्यांनीं सुरू केले. आतां हे कारखाने अर्थात् जेथें नदीचें पाणी उंचावरून पडत असेल अशा ठिकाणींच झाले आणि म्हणून ते दूरदूरहि पसरले गेले.

पुढें जवळ जवळ असलेल्या मोठाल्या गिरण्यांतून माल तयार करण्याची जी हल्लींची पद्धति सुरू झाली ती जलशक्तीबद्दल जेव्हां वाफेच्या शक्तीचा उपयोग करूं लागले तेव्हां सुरू झाली. ह्याचा एक परिणाम असा झाला कीं, पाण्याच्या पुरवठ्याप्रमाणें वाफेचा पुरवठा ऋतूप्रमाणें कामज्यास्त प्रमाणावर होणारा नस-ल्यामुळें कारखान्यांतून नेहमीं सारखेंच काम निघूं लागलें. दुसरा परिणाम कारखाने पाण्याचा पुरवठा पाहून दूर दूर बांधणें अनावश्यक झालें. त्यामुळें पुष्कळ गि-रण्या एकत्र गोळा होऊन त्यांना लागणारा कच्चा माल बाहेरून आणणें आणि त्यांनीं तयार केलेला पक्का माल बाहेर नेणें दोन्ही सर्वांस सुलभ पडूं लागलीं. अशा री-

तीनें अनेकं यंत्रांच्या एका गिरणींत होणाऱ्या संकल-नाखेरीज अनेक गिरण्यांचें एका शहरांत संकलन झालें.

९८. पण आतां ह्या उत्क्रमणाचा यांत्रिक प्रगति किंवा औद्योगिक प्रगति ह्या दृष्टीनें विचार करण्याच्या ऐवजीं कामकऱ्यांच्या जीविताच्या दृष्टीनें त्याचा विचार करूं या. त्या दृष्टीनें पाहतां त्यांचा कांहीं बाबतींत जरी फायदेशीर परिणाम होतो तरी पुष्कळ बाबतींत नुकसानकारक होतो. सर्व प्रकारचे जिन्नस स्वस्त झाल्यामुळें इतर लोकांप्रमाणें जरी कामकरी लोकांचा ते जिन्नस वापरणारे ह्या दृष्टीनें फायदा होतो, तरी ते जिन्नस उत्पन्न करणारे ह्या दृष्टीनें त्यांचें फार नुकसान होतें; आणि हें नुकसान वरील फायद्याहून कदाचित ज्यास्त असतें.

त्याच्या ज्यास्त ज्यास्त शारीरिक व मानसिक शक्ती यांत्रिक कारखान्यांमुळें निरुपयोगी होऊन जातात. ही गोष्ट वाफेच्या यंत्रांतीलच ज्या सुधारणा त्यावरूनहि लक्षांत येते. प्रारंभीं या यंत्रांतील पडदे योग्य वेळीं उघडण्यास व मिटण्यास एक पोरगा लागत असे. पुढें हे पडदे आपोआप उघडूं व मिटूं लागण्याची युक्ति निघाली, आणि ह्या पोराचें काम ह्यापुरतें नाहींसें झालें. तथापि वाफेचा पुरवठा योग्य ठेवण्याकरितां कांहीं दिवस त्याची जरूरी लागत असे. इन्जिनास करावयाचें काम जेव्हां एकदम कमी किंवा ज्यास्त होत असे तेव्हां ज्या भोंकांतून बायलरमधून वाफ निघावयाची तें लहान-मोठें करण्यास एका माणसाची जरूरी लागत असे. पण ह्याच्याबदल लवकरच 'गव्हर्नर' नांवाच्या एका

यंत्राची त्या कामावर स्थापना झाली. आतां माणसाचे स्नायू आणि ज्ञानतंतू ह्यांचें जें हें काम यंत्रांनीं होऊं लागलें आहे तें केवळ इंजिनाच्या संबंधानेंच होऊं लागलें आहे असें नाहीं तर इंजिनानें चालणारीं जीं अनेक यंत्रें त्यांच्या संबंधानेंहि होऊं लागलें आहे. म्हणजे त्यांपैकीं प्रत्येक त्याच्यासाठीं जें कांहीं माणसाला करावें लागत असे तें तें स्वतः करूं लागलें आहे. त्यामुळें तें योग्य वेळीं थांबू शकतें, किंवा आपला एकादा भाग थांबवूं शकतें, किंवा त्याला नेमून दिलेलें काम संपलें म्हणजे घंटा वाजवूं शकतें. तेव्हां त्यानें केलेलें काम घेणें व त्यास नवें काम देणें, आणि एकादा दोरा तुटला असला तर बांधणें अशासारखी दुरुस्ती करणें, एवढेंच काम त्याच्यावर देखरेख ठेवणारास राहतें.

अशा रीतीनें यंत्रें आपापलीं कामें जशीं आपोआप करितात तशीं कामकऱ्यांचीं कामें देखील ज्यास्त ज्यास्त यंत्रवत् होत जातात. त्याजबरोबर ज्याला यंत्राकडे लक्ष सारखें द्यावें लागत असल्यामुळें, व त्यामुळें ज्ञानतंतुजालाच्या कांहीं भागांवर विशेष ताण व इतरांवर कमी ताण पडल्यामुळें त्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दोन्ही प्रकारची इजा होते. अशा रीतीनें त्याच्या मानसिक घटनेस तितक्या मानानें कुरूपता येत असून शिवाय शारिरिकघटनेसहि येते; कारण त्यास कधीं वाजवीहून ज्यास्त गरम आणि कधीं ज्यास्त थंड हवेंत श्वासोच्छ्वास करावा लागतो आणि त्याचें काळीज व पोटांतील इंद्रियें ह्यांच्यावर फाजील ताण बसेल अशा रीतीनें त्यास पुष्कळ तास उभें रहावें लागतें. आतां,

पूर्वी, हातमागावर काम करणाऱ्या माणसास माग चालवतांना निरनिराळ्या स्नायुविषयक क्रिया कराव्या लागत असत, मध्यें मध्यें विसावा मिळे, आणि कधीं कधीं वीणकामाऐवजीं शेतांत किंवा बागेंत काम करावयास सांपडे, ह्या गोष्टी ध्यानांत आणतां औद्योगिक प्रगति कामकऱ्यास अत्यन्त घातक झाली आहे असें म्हणणें आपणास भाग आहे.

त्यांच्या सामाजिक संबंधांत देखील ह्यामुळें सुधारणेच्या ऐवजीं पीछेहाटच झालेली आहे. गिरणींतील काम करून मजुरी मिळवणारा माणूस थोड्याशा मुदतीची नोटीस देऊन काम सोडण्यास मोकळा असल्यामुळें तो अगदीं स्वतंत्र असतो हें खरें आहे; पण वास्तविकरीत्या ही स्वतंत्रता एकप्रकारच्या गुलामगिरीबद्दल दुसऱ्या प्रकारची गुलामगिरी पत्करण्याची असते. कारण त्याला एकच धंदा येत असल्यामुळें आपल्या कंटाळवाण्या आयुष्याचा बराच भाग ह्या गिरणींत घालवावयाचा एवढेंच ठरविण्याची त्यास मोकळीक असते. म्हणून धन्याच्या जबरीपासून गुलामास जेवढा त्रास होत असेल त्याहून ज्यास्त त्रास त्यास पुष्कळ वेळां परिस्थितीच्या जबरीपासून होतो.

एकंदरींत असें दिसतें कीं समाजाची प्रगति चालली असतां प्रत्येक समाजाचे लहान-मोठे भाग सगळ्या समाजाच्या फायद्यासाठीं बळी पडत असतात. समाजाच्या अगोदरच्या पायऱ्यांवर हा बळी जीवनार्थ कलहाकरितां टोळ्या व राष्ट्रें यांमध्यें सतत चालणाऱ्या लढायांमध्यें

जे लोक मरतात त्यांच्या रूपानें घावा लागत असतो; आणि पुढच्या पायऱ्यांवर व्यापारविषयक झगडा व त्याबरोबर होणारी प्रतिस्पर्धा ह्यामध्यें जे लोक मरतात त्यांच्या रूपानें घावा लागतो. दोन्ही प्रकारच्या पायऱ्यांवर माणसें पुढील पिढ्यांच्या फायद्यासाठीं खर्ची पडत असतात; आणि जोंपावेतों उदरनिर्वाहाच्या साधनांहून ज्यास्त संतति उत्पन्न होत जाईल तोंपावेतों ह्यास कांहीं उपाय दिसत नाहीं.

प्रकरण एकोणिसावें

संयुक्त भांडवल

९९. ज्यास हल्लीं समाईक भांडवलाचा धंदा म्हणून म्हणतात त्याच्या पहिल्या पायऱ्यांकडे पाहतां, प्रत्येक प्रकारची प्रगति इतर प्रकारच्या अनेक प्रगतींवर कशी अवलंबून असते हें अनेक तऱ्हांनीं दिसून येतें; आणि ज्या औद्योगिक रचना हल्लीं आपल्यास विशिष्ट स्वरूपानें दिसतात त्या अस्पष्ट अशा एका बीजापासून इतर रचनांशीं मिसळलेल्या अशा कशा उत्पन्न झाल्या हेंहि दिसून येतें.

ज्या संचित रकमेस आपण भांडवल म्हणून म्हणतों त्याची उत्पत्ति कांहीं विशिष्ट प्रचारांवर व परिस्थितीवर अवलंबून असते. जे लोक मृताबरोबर त्याच्या मोलवान् चिजा पुरून टाकून कधीं कधीं त्याच्या जनावरांसहि ठार करीत व त्यांचीं फळझाडेंहि तोडून टाकीत, त्यांच्यांत म्हणण्यासारखी संपत्ति जमेल अशी आशा करावयास नको. शिवाय अशा लोकांत लढाया सतत होत असल्यामुळें कांहीं जमलेली संपत्ति असल्यास ती त्यांत खर्च होई किंवा शत्रूच्या हातीं जाई. शिवाय ती नाईक व राजे प्रजेपासून हिरावून घेत. त्यांच्या ह्या अमर्यादित लोभामुळें लोकांस संपत्ति जमविणें निरर्थक वाटे, किंवा ती पुरून ठेवणें इष्ट वाटे; आणि त्यामुळें तिचा उपयोग जिन्नस उत्पन्न करण्याच्या कामीं होत नसे.

आणखी एक अडचण त्या वेळीं असे. ज्या वेळीं गुरें व मेंढ्या ही श्रीमान् माणसाची मुख्य जंगम संपत्ति असे, त्या वेळीं भांडवलाच्या हल्लींच्या अर्थीं तें फारसें असणें संभवनीय नसे. गुरें वैगरे पाहिजे तेव्हां विकतां येत नसत तीं विकण्याचा बाजार कधीं कधींच भरे; आणि किंमत येई तीहि हल्लींसारख्या नाण्याच्या रूपानें येत नसे. बरें, नाणें जोंपावेतों रोखीच्या रूपाचें असे, आणि नोटांसारखें पतीच्या रूपाचें नसे, तोंपावेतों मोठाले व्यापार करणें सोईचें किंवा शक्यहि नसे.

शिवाय हल्लींचें जें समाईक व्यापाराचें स्वरूप समाईक भांडवलाच्या कंपन्यांतून दृष्टीस पडतें, तें साध्या समाईकपणापासून उत्क्रान्त झालेलें आहे, व तो समाईकपणा कुटुंब आणि जमात ह्या घटनांत मुळांत दिसत असे. बाप आणि मुलगे, आणि नंतर इतर आप्त जेव्हां एकच धंदा करीत असून अविभक्त स्थितींतून विभक्तपणाच्या स्थितींत आले, तेव्हां ते संयुक्त मालकी आणि नफ्याची वांटणी ह्या तत्त्वावर आपला धंदा चालवूं लागले. आणि जे लोक स्वसंरक्षण वैगरे सामान्य हिताच्या गोष्टींसाठीं एकत्र जमत, त्यांनीं कधींकधीं सर्वांच्या फायद्यासाठीं आपली संपत्तिहि एकत्र जमवावी हें साहजिकच आहे.

दुसरी एक गोष्ट अशी ध्यानांत ठेवावयाची कीं ह्या प्रारंभींच्या कंपन्या केवळ औद्योगिक नसून कांहीं अंशीं युद्धशीलहि असत. ज्या काळीं सरदारलोक एकमेकांशीं लढत, ज्या काळीं ह्या लष्करी जमीनदारांपासून शहरांतील लोकांस स्वसंरक्षण करावें लागे, आणि

ज्या काळीं एक शहर दुसऱ्याच्या विरुद्ध असे, तेव्हां जमाती देखील एकमेकांविरुद्धच असत, आणि कंपन्याहि असत. हल्लीं देखील हा विरोध त्यांच्यामध्यें कांहीं अंशीं दिसून येतो, आणि पूर्वी ज्यास्तच दिसून येई..

१००. हे व्यापारी संयोग निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या काळीं उत्पन्न झाले, असें कोठें कोठें मिळणाऱ्या माहितीवरून दिसतें. इटाली देश कलांप्रमाणें उद्योगधंद्यांतहि इतर यूरोपीय राष्ट्रांच्या पुढें असल्यामुळें तेथें पेढीसारखी संस्था बाराव्या शतकांत उत्पन्न झाली असें दिसतें.

पण ह्याच्याहून ज्यास्त ठळक व महत्त्वाच्या कंपन्या म्हटल्या म्हणजे परदेशांशीं व्यापार करण्यासाठीं स्थापिलेल्या कंपन्या होत. ह्यांचीं प्रारंभींचीं उदाहरणें जिनोआ व पीसा ह्या शहरीं दृष्टीस पडतात. तेथें ह्या व्यापारी कंपन्या वरचेवर लढाया करीत असल्यामुळें त्यांस राजकीय स्वरूप प्राप्त झालें. 'हान्सियाटिक लीग' नांवाची जी व्यापारी संस्था पुढें हॅन्स शहरांतून उत्पन्न झाली तिचेंहि असेंच होतें; ते व्यापारी प्रथम परस्परसंरक्षणार्थ एकत्र झाले असून पुढें त्यांनीं आरमारेंहि तयार केलीं, व त्यांच्या सहाय्यानें उत्तरसमुद्रांतील चांचेलोकांचा समाचार घेतला.

ह्या मंडळ्यांचें ह्या समयीं युद्धशील स्वरूप हें मुख्य स्वरूप असे; कारण त्यांतील व्यापारी जो नफा होईल तो सर्वांनीं सारखा वांटून घ्यावयाचा ह्या तत्त्वावर समाईक व्यापार करीत नसत, तर स्वतंत्ररीतीनें करीत, आणि मंडळीचा केवळ स्वसंरक्षणार्थ आश्रय घेत. इंग्लं-

दांत कित्येक व्यापारी आपलें भांडवल एकत्र करून माल विकत घेऊन व जहाज तयार करून परदेशीं पाठवीत असत असें आपण वाचितों. अशा कंपन्या प्रश्नम तेराव्या शतकांत बनल्या, व त्यांपैकीं पहिलीसि हाम्बुर्गकंपनी हें नांव असे. पुढें इलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींत अशा कंपन्या ज्यास्त झाल्या; त्यांचीं नांवें जोखमदार कंपन्या अशा अर्थाचीं असत; ह्यावरून त्यांना चांचे वगैरे लोकांशीं लढाया कराव्या लागत, व इतर जोखमें संभाळावीं लागत हें स्पष्ट दिसतें. पुढें ह्या कंपन्या नवीन स्थळें शोधून काढून तीं राजाच्या नांवानें आपल्या ताब्यांत घेऊं लागल्या; आणि विशिष्ट स्थळांशीं व्यापार आपणच करावयाचा अशा तऱ्हेचे विशिष्ट हक्क राजापासून मिळवूं लागल्या. ह्या कंपन्यांना नियमित असें जें स्वरूप प्रथम आलें तें ईस्ट इंडिया कंपनी बनल्यापासून आलें. पण हा फेरबदल एकदम उत्पन्न न होतां हळूहळू उत्पन्न झाला. प्रथम ह्या कंपन्या जहाजाच्या प्रत्येक सफरीपुरत्याच बनत असत. पुढें १६१२ त ईस्ट इंडिया कंपनी कायमची समाईक भांडवलाची कंपनी बनली.

पण ह्या काळीं बनलेल्या इतर कंपन्यांप्रमाणें हीहि यशस्वी झाली नाहीं; तर इतर कंपन्यांमध्यें तीसहि पुष्कळ कर्ज झालें; आणि तिनें राज्य कमावून त्याच्यावर पैसे मिळविले नसते तर तिचेंहि ती मोडण्यापूर्वी कधींच दिवाळें निघालें असतें. ह्यावरून कृत्रिम आश्रय दिलेले धंदे बरकतीस येत नाहींत हें स्पष्ट दिसतें. कारण ह्या कंपन्यांस विशिष्ट मुलखांत, इतर कोणास

व्यापार करूं न देण्याचा विशिष्ट हक्क असे, आणि ह्या व इतर हक्कांच्या संरक्षणार्थ सैन्यें ठेवण्याचाहि अधिकार असे.

पुष्कळ लोकांचीं नियमित लहान भागांच्या रूपानें भांडवलें एकत्र करून व्यापारधंदा करण्याची पद्धति जी एकदां सुरू झाली ती पुढें हळूहळू अनेक दिशांनीं पसरली. उदाहरणार्थ, बिमे उतरणें, खाणी खणणें, समुद्र होरून जमिनी तयार करणें, वगैरे कामासाठीं कंपन्या तयार झाल्या; व त्यांतल्या बऱ्याच कंपन्यांचा अव्यवस्था वगैरे अनेक कारणांनीं फुगाहि लवकरच फुटला. तथापि त्यांपैकीं कांहीं कायमच्या औद्योगिक घटना होऊन बसल्या. वर सांगितल्यासारख्या कंपन्या अस्तित्वांत आल्यावर पुढें पाण्याचा पुरवठा करणाऱ्याहि कंपन्या निघाल्या.

१०१. ह्या कंपन्यांबद्दलच्या बारीक सारीक हकीकती देण्याचें एथें कारण नाहीं. ह्या औद्योगिक संस्थांच्या घटनेमध्यें फेरफार कसे होत गेले आहेत हें पाहणें एथें विशेष महत्त्वाचें आहे.

आप्तांच्या वगैरे सामान्य समाईक भागीदाऱ्यांपासून संयुक्त भांडवलाच्या कंपन्या उत्पन्न झाल्या हें वर सांगितलेंच आहे. ह्या कंपन्या बेताबाहेर वाढलेल्या भागीदाऱ्याच होत असें सरकारास वाटत असे म्हणून त्या बंद करणें त्यास इष्ट वाटे. शिवाय त्यास असें वाटे कीं, पूर्वीं ज्या गोष्टी आपल्या परवानगीखेरीज करतां येत नसत त्या ह्या कंपन्या तशा परवानगीविना करूं लागल्या आहेत; म्हणून तसें त्यांनीं करूं नये अशा हेतूनें सरकार कायदे करूं लागलें. १७१९ सालीं जो फुग्यासारख्या पोकळ कंपन्यांविरुद्ध कायदा झाला त्या-

चा एक हेतु हाच होता. तथापि अनेक कामांसाठीं कंपन्या बनतच राहिल्या, आणि त्यांत भागीदारांची नफानुकसानीबद्दलची जबाबदारी त्यांच्या त्यांच्या भागापुरती नसून सर्व भांडवलाबद्दल असे. ह्या कंपन्या सगळ्याच बुडत असें नाहीं, तर कांहीं यशस्वी होत. ह्यावरून ही पद्धति मुळांतच वाईट नव्हती असें दिसतें. म्हणून त्याच्या मार्गांत कायद्यानें उत्पन्न केलेल्या अडचणी हळूहळू कमी होऊं लागल्या. १८२६ सालीं ह्या कंपन्यांतील भागीदारांची व्यक्तिशः जबाबदारी कायम ठेवून व्यापार करण्याच्या सनदा मिळाव्या असा कायदा झाला. पुढें त्यांस एका विशिष्ट प्रतिनिधी मार्फत फिर्याद करण्याचा व करून घेण्याचा अधिकार मिळाला; आणि १८४४ सालीं कंपनी सर्टिफिकिट घेऊन नोंदली म्हणजे पुरे असा कायदा झाला.

अशाच कंपन्या इंग्लंदाखेरीज इतर देशांतहि उत्पन्न झालेल्या आहेत. त्यांच्या घटनांत थोडेबहुत फरक आहेत. त्यांत मुख्य फरक हा आहे कीं, इंग्लंदांत असल्या कंपन्या बनविण्याचा लोकांना नैसर्गिक हक्क आहे असें समजतात, आणि यूरोपांतील इतर देशांत तो हक्क सरकारचा आहे, व लोकांस तो त्याच्यापासूनच प्राप्त होतो असें समजतात; आणि म्हणून सरकारानें अशी परवानगी कोणास दिल्यास त्या देण्यास 'देणगी' असें म्हणतात.

कंपन्या बनवण्याच्या मार्गांतील अडथळे जसे कमी कमी झाले आहेत तशी धंद्यांची वाढ मनस्वी होत गेली आहे आणि ही वाढ कंपन्यांखेरीज झाली नसती. उदाहरणार्थ,

हल्लीं आपणांस जे रस्ते, गोद्या, आगगाड्या, कालवे वगैरे दृष्टीस पडतात त्यांतील बहुतेक संयुक्त भांडवल उभारण्यास विशेष सवलती मिळाल्या नसत्या तर झाले नसते.

ह्या संयुक्त भांडवलाच्या औद्योगिक मंडळ्यांच्या वाढीची शेवटची पायरी अद्यापि सांगावयाची आहे.ती ही कीं, त्यांतील नियामक भाग अगदीं कमी झाला आहे. प्रारंभीं धंदा करण्याच्या कामीं मुख्य व स्थानिक सरकारें व्यक्तींवर फारच बंधनें लादीत असत; आणि लोकहि आपल्या धंद्यांच्या नियमनासाठीं व रक्षणासाठीं जे संयोग बनवीत असत ते सरकाराच्याच परवानगीनें बनवीत असत, व त्याकरितां त्यांस फी भरावी लागत असे. मंडळ्या बनवण्यास सरकारी कायद्याचे जे अडथळे असत त्यांतील शेवटचा १८५५ सालीं काढून टाकिला. तोंपर्यंत असा कायदा होता कीं, कंपनीपासून लोकांचें नुकसान होऊं नये म्हणून कंपनीचा जो कोणीहि एकादाहि भाग विकत घेईल त्यास कंपनीस देणें झाल्यास त्या सर्व देण्याबद्दल जबाबदार धरावें. पण ह्या वर्षीं असा कायदा झाला कीं, त्यास ह्या देण्याबद्दल त्याच्या भागापुरतेंच जबाबदार धरावें; मात्र भागीदारांची जबाबदारी भागापुरती आहे असें कंपनीनें जाहीर करावें. म्हणून अशा कंपनीचे नांवापुढें 'मर्यादित' ह्या अर्थाचा 'लिमिटेड' हा शब्द लावितात, व त्याचा अर्थ भागीदाराची जबाबदारी मर्यादित (भागापुरती) आहे असा असतो.

ह्याचे परिणाम काय झाले आहेत तें सर्वांस विदितच आहे. 'कायद्यांतील ह्या फेरबदलामुळें पूर्वीसार-

ख्या अनेक पोकळ कंपन्या उत्पन्न झाल्या आहेत व त्यांचीं दिवाळींहि निघालीं आहेत. म्हणजे लोक पूर्वीं-प्रमाणें अद्यापहि भपकेदार जाहीरपत्रांनीं फसतात. पण अनेक उपयुक्त कामेंहि त्यामुळें सुरू होऊन पुरीं झालीं आहेत. एक अनपेक्षित परिणाम असा झाला आहे कीं, पुष्कळ खासगी धंद्यांना मर्यादित जबाबदारीच्या कंपन्यांचें स्वरूप आलेलें आहे. पण ह्यामुळें त्यांचा फायदा झाला आहे किंवा नाहीं ह्याबद्दल संशयच आहे; पण हिय्याचीं अनेक लहान कामें त्यामुळें भांडवल उभारलें गेल्यामुळें होऊं लागलीं आहेत. त्याचा दुसरा फायदा हा झाला आहे कीं, ज्यांनीं थोडथोडेच पैसे सांठविले आहेत अशांचे पैसे व्याजीं लागूं लागले आहेत. त्यामुळें इंग्लंदसारख्या देशांतून बिनव्याजी भांडवल आतां बहुतेक दिसतच नाहींसें झालें आहे.

ह्या विषयाची रजा घेण्यापूर्वी हें सांगणें इष्ट दिसतें कीं इतर प्रमाणें ह्या उदाहरणांतहि नियमनाचें जुलमी स्वरूप राजकीय दृष्ट्या, धार्मिक दृष्ट्या, आणि औद्योगिकदृष्ट्या एकदमच कमी होत जातें. पुष्कळ पुराव्यावरून आपल्यास असें दिसून आलेलें आहे कीं, व्यक्तीला नागरिक ह्या दृष्टीनें आणि धार्मिक बाबतींत जसें ज्यास्त स्वातंत्र्य प्राप्त होत गेलें आहे तसें त्याच्या धंद्याच्या संबंधानेंहि प्राप्त झालें आहे; आणि एथें आपल्यास असें दिसून येतें कीं त्याला त्याबरोबरच उद्योगधंद्यासाठीं संयोग बनवण्याचें स्वातंत्र्य प्राप्त झालें आहे. फार तर काय, पण आंदोलनाच्या सार्वत्रिक नियमास अनुसरून पूर्वीं जेथें फार बंधनें होतीं तेथें आतां फार स्वातंत्र्य उत्पन्न झालें

आहे. हल्लीं भांडवल उभारण्यास व कंपन्या बनवण्यास फारच सोई झाल्या आहेत. उदाहरणार्थ, कंपनीच्या डिरेक्टरांनीं ती उभारणारांशीं जे कांहीं ठराव केले असतील ते सर्व भागीदारांस न समजावतां त्यांजकडून पैसे गोळा करण्यास हल्लीं कायद्याचा प्रतिबंध नाहीं. पण कायद्याच्या तत्त्वांकडे नजर देतां असें करूं देणें योग्य दिसत नाहीं. कारण भागीदारांपासून डिरेक्टर लोक जे पैसे घेतात ते त्यांचा विशिष्ट उपयोग करावयाचा ह्या शर्तींवरच घेतात; म्हणून त्याबद्दलची सर्व माहिती त्यांनीं भागीदारांस दिलीच पाहिजे. नाहीं तर तो ठराव पूर्ण होत नाहीं, आणि कंपनी बुडाल्यास तिच्या देण्याची जबाबदारी भागीदारांवर रहात नाहीं. म्हणून असल्या करारांची अंमलबजावणी कायद्यानें करतां कामा नये.

प्रकरण विसावें

कामकरी मंडळें

१०२. जे लोक एके ठिकाणीं रहातात किंवा एकच प्रकारचें काम करितात त्यांचीं हिताहितें कांहीं बाबतींत एक असतात, आणि कांहीं बाबतींत भिन्न असतात. उदाहरणार्थ, एकाच टोळीच्या किंवा राष्ट्रांतील लोकांचें स्वसंरक्षण हें हित सर्वांचें एकच असतें; पण इतर हितें भिन्न असतात; म्हणून त्या बाबतींत त्यांचे एकमेकांशीं तंटे होतात. एकच धंदा करणारांचें असेंच आहे. ते एकमेकांशीं स्पर्धा करणारे असल्यामुळें त्यांचे एकमेकांशीं भेदभाव असतात. उदाहरणार्थ, असें म्हणत असतात कीं, एकाच धंद्याच्या दोन माणसांचें कधीं जुळावयाचें नाहीं. पण इतर धंदे करणारांच्या संबंधानें त्यांचीं हिताहितें एकच असतात; आणि म्हणून ते सर्वांच्या संरक्षणासाठीं एकत्र होतात. प्राचीनकाळीं व्यापाऱ्यांमध्यें ह्या सामान्य नियमाचीं उदाहरणें कशीं दृष्टीस पडत हें गेल्या प्रकरणांतून दिलेल्या इतिहासावरून दिसून आलेंच आहे. ह्या ठिकाणीं, व्यापाऱ्यांच्या कामकऱ्यांमध्यें तीं कशीं दृष्टीस पडतात, हें पाहणें आहे.

धनी व कामकरी ह्यांच्यांत पृथक्पणा उत्पन्न होण्यापूर्वीं देखील कारागीरलोक रानटी समाजांतून सर्वांच्या फायद्यासाठीं एकत्र झाल्याचीं उदाहरणें आढळतात. उदाहरणार्थ, टर्नर आपल्यास असें सांगतो कीं, सामोआमध्यें अशी ठराविक चाल आहे कीं, घराच्या

बाजू आणि एक टोक पुरें झालें म्हणजे मजुरीचा मुख्य भाग देऊन टाकावयाचा; आणि अशा वेळीं सुतारास दिलेली मंजुरी त्यास पुरेशी न वाटल्यास तो उठतो आणि चालता होतो. बरें, ज्या नायकाचें तें घर असेलं त्यास त्याच्या ऐवजीं दुसरा सुतार लावतां येत नाहीं. कारण त्यांचा असा कडक नियम आहे कीं, जें काम एकानें टाकिलें तें दुसऱ्यानें पत्करावयाचें नाहीं. अशा रीतीनें मजुरीचे दर कायम ठेवण्याचा त्यांच्यांत मुकाट्यानें ठराव केलेला दिसतो. आफ्रिकेच्या कांहीं भागांत असाच कांहीं प्रकार दिसून येतो. उदाहरणार्थ, रीड म्हणतो कीं गाबून नदीवरच्या वस्तींत एकप्रकारचा कामकरी संयोग दृष्टीस पडतो, व त्यांनीं केलेले नियम जे मोडतील त्यांस मार मिळतो: किनाऱ्यावरचे लोक यूरोपियन लोकांशीं होणारा सर्व व्यवहार आपल्या हातांत ठेवण्यास पाहतात; आणि म्हणून झाडींतील टोळींतला एकादा माणूस गोऱ्या माणसास कांहीं विकतांना अढळल्यास त्यानें रूढिभंग केला म्हणून समजतात. पण हल्लींच्या सारखे कामकरी-संयोग बनण्यास सामाजिक उत्क्रमणाची बरीच पुढची पायरी आक्रमावी लागते. पहिली गोष्ट ही व्हावी लागते कीं मजुरी देणारा आणि घेणारा ह्यांच्यांत स्पष्ट पृथक्करण उत्पन्न व्हावा लागतो; आणि दुसरी गोष्ट ही व्हावी लागते कीं मजुरी मिळवणारे बरेच लोक एकेठिकाणीं जमाव लागतात. म्हणजे, ते एकेठिकाणीं पुष्कळ रहाणारे पाहिजेत, किंवा पुष्कळ जमून काम पहात फिरणारे पाहिजेत. आतां ही गोष्ट हळूहळूच बनून आली हें उघडच आहे; पण जेव्हां

सौ बनून आली तेव्हां कामकरीलोक त्यांच्या कारखानदार मजुरांविरुद्ध संयोग बनवूं लागले. पूर्वी धंदेजमाती असत त्यांचा उद्देश हाच असे. पण हे कामकरीसंयोग धंदेजमातींपासून उत्पन्न झाले असा पुरावा सांपडत नाहीं; आणि उलट पुरावा पुष्कळ सांपडतो. जरी सामान्यतः प्रत्येक पुढील संस्था पूर्वीच्या एकाद्या संस्थेपासून उत्पन्न झाली म्हणून दाखवितां येते, तरी पूर्वी अस्तित्वांत असलेल्या कांहीं प्रकारच्या संस्थांसारख्या संस्था सारख्याच परिस्थितींत अगदीं नव्यानेंच कधीं-कधीं उत्पन्न होतात; आणि कामकरीसंयोग हें ह्याचेंच एक उदाहरण आहे. कारण तो धंदेजमातीपासून उत्पन्न झालेला नसून केवळ त्याचें त्याच्याशीं स्वरूपसाम्य आहे, व ती कामकऱ्यांचीच तेवढी जमात आहे.

१०४. ह्यावरून, तर मग, कामकरीसंयोग बनण्यास दोन आवश्यक गोष्टी दिसतात; एक सगळ्यांचीं सारखीं हिताहितें, आणि दुसरी पुष्कळ कामकरी एके ठिकाणीं गोळा झालेले असणें. ह्या दोन गोष्टींचें प्रमाण निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळें असल्यामुळें अर्थात् निरनिराळ्या ठिकाणीं हे संयोग निरनिराळ्या प्रमाणावर उत्पन्न झाले आहेत. असल्या संयोगांचीं बीजें लंदनशहरीं सहजच सर्वांच्या अगोदर दृष्टीस पडूं लागलीं. उदाहरणार्थ, चवदाव्या शतकाच्या शेवटीं आणि पंधराव्याच्या प्रारंभीं तेथील कामकरी जोडेवाले, जिनवाले, आणि शिंपी हे लोक योग्य मजुरी मिळावी म्हणून एकत्र होऊं लागले आहेत अशा तक्रारी कानावर येऊं लागल्या. पुढें इतर ठिकाणचे चाम्हार तसेंच करूं ला-

गले. आणि ज्यांना स्वताचें काम करीत सारखें बोलत रहातां येतें त्या लोकांत हल्लीं जसे आपल्यास कडक राजकीय वावदूक आढळून येतात, तसे त्या वेळीं बीजभूत कामकरीसंयोग शिंपी, चाम्हार व जिनगर ह्यांच्यांत दिसूं लागले; कारण ह्या लोकांस हातानें काम करतांना तोंडानें वटवट चालवतां येते.

बीजें बहुधा त्यांपासून उत्पन्न झालेल्या वस्तूपासून गुणविशेष आणि उद्देश ह्या बाबतींत भिन्न असतात; कामकरीसंयोग बनण्यास हिताहितसादृश्य आणि स्थानिकसंकलन ह्या दोन गोष्टी आवश्यक असल्यामुळें ते कधीं कधीं उत्सवप्रीत्यर्थ एकत्र जमणें, अंत्यविधीकरितां एकत्र जमणें, इत्यादि संमेलनांपासून देखील कधीं कधीं उत्पन्न झालेले आहेत. कारण अशा रीतीनें कांहीं लोक एकत्र जमले म्हणजे त्यांच्यांत काम आणि मजूरी ह्यांच्याबदल बोलणें निघावयाचेंच; आणि ते सर्व एकच धंदेवाले असले तर विशेषच निघावयाचें. असें असलें म्हणजे त्यांची एकाद्या बाबतींत विशेष तक्रार असेल तर ती नाहींशी करून घेण्यासाठीं सर्वांनीं एकत्र व्हावयाचें असा निश्चय कधीं कधीं ते करावयाचे. पुढें सहजच असें होऊं लागलें कीं, मूळ कामासाठीं गोळा केलेले पैसे ते ह्या कामाकडे खर्च करूं लागले. अशा रीतीनें सगळ्यांनीं दिलेल्या पैशाचा व्यय बहुमतानें भलत्याच कामाकडे होऊं लागला; आणि कामकरीसंयोगाची वाढ यूरोपांत हल्लीं जी झाली आहे ती याच तत्त्वावर झाली आहे. कारण संप करावयाचें जेव्हां बहुमतानें ठरतें तेव्हां न्यूनमतवाल्यांस तो मुका-

व्यानें कबूल करावा लागतो किंवा तोंपावेतों भरलेल्या पैशांस मुकावें लागतें.

कामकऱ्यांच्या जमातींच्या इतिहासाचा एथें आपणास सविस्तर विचार करावयाचा नाहीं. त्यासंबंधानें इतकेंच सांगणें पुरे दिसतें कीं सतराशें साल्यापूर्वीं त्यांचे कायम संयोग बनलेले नव्हते. परंतु पुढचें शतक पुरें होई तोंपावेतों तसले पुष्कळ संयोग उत्पन्न झाले; व ते दडपून टाकण्यासाठीं कायदेहि झाले. उदाहरणार्थ, तिसऱ्या जार्ज राजाच्या वेळीं १८०० सालाच्या सुमारास असा कायदा झाला कीं कोणीहि मजूर मजुरी वाढवून घेण्यासाठीं किंवा कामाचे तास कमी करण्यासाठीं संयोग करील त्यास तीन महिन्यांची कैद होईल.

१०५. हे कायदे पुढें रद्द झाले; पण ते रद्द करण्यापासून दुसऱ्या वाईट गोष्टी उत्पन्न झाल्या. त्या अशा कीं, मजूरलोक त्यांस मिळालेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग करूं लागले. कामकरीसंयोग जिकडे तिकडे उत्पन्न होऊं लागले आणि ते मालकांप्रमाणेंच जुलूम करूं लागले. ग्लासगोमधील गिरणींतील मजूर, राइन-नदीवरील खलाशी, शेफील्डमधील सुऱ्यांचीं पातीं करणारे, आणि लंदनांतील जहाजें बांधणारे वगैरे मजूर आह्मांस अमुक अमुक सवलती पाहिजेत म्हणून मालकांस जोरानें सांगूं लागले, आणि त्या मिळाव्या म्हणून दांडगाई करूं लागले. निरनिराळ्या धंद्यांमध्यें आणि निरनिराळ्या ठिकाणीं क्रिया व प्रतिक्रिया झाल्यामुळें ह्या संयोगांची प्रगति सारखी होत गेली नाहीं म्हणून पुष्कळ नवे संयोग उत्पन्न झाले व जुने मोडले. आणि व्यापारा-

मध्यें मंदी उत्पन्न होऊन कामें जेव्हां बंद पडूं लागलीं तेव्हां ह्या संप करणाऱ्यांच्या प्रत्ययास असें आलें कीं आपल्यास वाटतं तसे मजुरीचे दर ठरवितां येत नाहीं. पण हंगामी संयोग कायमचे बनूं लागले; आणि हळूहळू लहान लहान संयोग एकत्र बनूं लागले. १८२७ सालीं लांकडें तयार करणारे आणि सांधे जोडणारे सुतार ह्यांनीं एक राष्ट्रीयमंडळ बवाविलें. १८२९ सालीं इंग्लंद, स्काटलंद आणि आयर्लंद ह्यांमधील सर्व चामवाल्यांचीं मंडळें एकत्र झालीं. त्याच सुमारास घरं बांधण्याच्या कामीं लागणारे निरनिराळ्या प्रकारचे मजूर एकत्र झालें. इतके दिवस जे संयोग बनत ते एकेक धंद्यांतील कामकऱ्यांचेच बनत असत; पण यापुढ सगळ्या धंद्यांतील कामकऱ्यांचे संयोग बनूं लागले. ह्याचा उद्देश सर्व उत्पादकवर्ग एकत्र करावे हा असे; कारण बहुजनसमज अद्यापि असा असे कीं शारीरिक काम करणारे तेवढेच उत्पादकवर्ग होत, आणि मानसिक श्रम करणारे नव्हत. असला पहिला संयोग बनविण्याची खटपट १८३० सालीं झाली, पण ती लवकरच फिसकटली. १८३४ सालीं दुसरा असलाच प्रयत्न सर राबर्ट ओवेन ह्यानें केला, व लवकरच निरनिराळ्या धंद्यातील पांच लाख तरी कामकरी त्या मंडळास येऊन मिळाले. पण ह्या मंडळामध्यें आपापसांत तंटे उत्पन्न होऊन तें लवकरच मोडलें. नंतर पोटमंडळेंहि मोडूं लागलीं; पण पुढें कांहीं काळानें तीं पुनः बनूं लागलीं.

ह्या संबंधानें ह्याहून ज्यास्त विशेष माहिती देण्याची जरूरी नाहीं. फक्त हीं मंडळें हल्लीं केवढालीं मोठीं झालीं

आहेत एवढेंच पाहूं. १८९२ सालीं इंजिनियर व जहाजें बांधणारे ह्या दोन धंद्यांच्या लोकांमध्यें २६० मंडळें होतीं, आणि त्यांचे २८७००० मजूर सभासद होते. खाणवाल्यांमध्यें ३४७००० लोक असल्या मंडळांचे सभासद होते.

१०६. पूर्वीच्या व्यापाऱ्यांमध्यें आणि धंदेवाल्यांमध्यें हिताहितसादृश्य हें जसें संयोगबंधन असे, तसें हल्लींच्या मजुरांमध्यंहि असल्यामुळें त्यांनीं त्यांच्याच पद्धतीचा स्वीकार केला आहे. म्हणजे ज्या गोष्टी आपल्यापैकीं कोणास नुकसान करणाऱ्या असतील त्यांस ते सर्व मिळून विरोध करीत आले आहेत, आणि ज्या फायदा करणाऱ्या असतील त्या जोरानें अंमलांत आणण्याची खटपट करीत आले आहेत.

कांहीं विशिष्ट काळपर्यंत विशिष्ट धंदा करणारांचें शिष्यत्व केल्याविना तो धंदा करावयाचा नाहीं असा पूर्वी इंग्लंदांत निर्बंध असल्यामुळें त्या काळीं एकच धंदा करणारे लोकांची एकाच शहरांतील संख्या बेताचीच असे. शिष्यत्वाचा कायदा प्रत्येक जमातींत असल्यामुळें प्रत्येक शहरांत ह्या धंद्यांबाहेरचीं कामें करणारी व अर्धवट गुलाम अशी लोकवस्ती कसा तरी उदरनिर्वाह करणारी असे. कामकऱ्यांच्या जमाती ह्या चश्मणें आपल्यांत पाहिजे त्यास येऊं देत नाहींत; तर त्यानें कांहीं दिवस उमेदवारी केली पाहिजे असा निर्बंध करितात. ह्यांत त्यांचा हेतु आपल्या धंद्यांत चढाओढ कमी व्हावी हा असतो; आणि ह्याचा परिणाम

कांहीं लोक कोणत्याच धंद्यास योग्य नाहींत असे बनण्याकडे होतो.

ह्याच उद्देशानें प्राचीन जमाती मालकांनीं बेताचेच शिष्य आपल्याकडे शिकावयास ठेवावे असा निर्बंध करीत, आणि त्यांचेंच अनुकरण अर्वाचीन जमाती करीत आहेत. ह्या बाबतींत जुन्या व नव्या जमाती ह्यांच्यांत स्पष्टच संबंध दिसून येतो. कारण अर्वाचीन मंडळांनीं अगदीं प्रथम जी खबरदारी घेतली ती हे शिष्य नियमित ठेवण्याबद्दलचे जे कायदे ते जिवंत करून अमलांत आणण्याविषयीं घेतली. आणि हें त्यांचें सामान्य धोरणच बनून गेलें. उदाहरणार्थ, गारेची काच करणारे, छापखान्यांत काम करणारे, आणि इन्जिनियरांच्या हाताखालीं काम करणारे ह्या सर्वांचा उद्देश नवीन शिकणाऊ लोक धंद्यांत फार येऊं द्यावयाचे नाहींत हें पाहण्याकडे असतो.

धंदेमालकांच्या जमातींच्या अमदानींत सरकारानें किंमती ठरवण्याचा प्रघात फार असे. पण ह्या जमाती देखील सरकारच्या वतीनें किंवा स्वतः होऊन किंमती ठरवीत अशाबद्दलचा कांहीं पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, कनिंघाम म्हणतो कीं मजुरीचे दर व किंमती ठरविण्याचा जमातींचा अधिकार सहाव्या एडवर्डाच्या कारकीर्दींत मर्यादित केलेला दिसतो. ह्या नियमांचा उद्देश अर्थात् जिन्नस कमी किंमतीनें कोणी विकूं नये, किंवा ज्यास्त जिन्नस उत्पन्न करून किंमत कमी करूं नये हा असे. तोच उद्देश कोणी कमी मजुरी पत्करूं नये ह्या नियमाचा असे.

कायदे केले म्हणजे ते अमलांत आणण्याची शक्ति अंगीं पाहिजेच; नाहीं तर ते केले व न केले सारखेच. प्राचीन जमाती आपले कायदे म्युनिसिपालिट्यांकडून अमलांत आणवीत असत; कारण त्या वेळीं जमातीचे कारभारी हेच बहुधा म्युनिसिपालिट्यांचेहि कारभारी असत. पण अर्वाचीन जमातींचा म्युनिसिपालिट्यांशीं कांहींच संबंध नसल्यामुळें त्या आपले कायदे आपणच अमलांत आणण्याची खटपट करितात. ही गोष्ट ते प्रारंभापासूनच करीत आले आहेत. उदाहरणार्थ, वीसबीच एथील चाम्हारांनीं जेव्हां ज्यास्त मजुरी मिळावी म्हणून संप केला तेव्हां त्यांनीं असें जाहीर केलें कीं, कोणी बाहेरगांवचा चाम्हार जर कमी मजुरी घेऊन एथें काम करण्यास आला तर त्याचा हात किंवा पाय आह्मी मोडून टाकूं. अशाच प्रकारची पद्धति कमज्यास्त प्रमाणावर अद्यापि सुरू आहे.

प्राचीन जमाती आणि अर्वाचीन जमाती ह्यांच्यामध्यें आणखीहि एकप्रकारचें साम्य दिसतें. तें हें कीं, कोणकोणत्या धंदेवाल्यांनीं कोणकोणते धंदे करावे ह्याबद्दल जसे प्राचीनकाळीं तंटे पडत, तसे कोणकोणत्या कामकऱ्यांनीं कोणकोणतीं कामें करावीं ह्याबद्दल हल्लीं तंटे पडतात.

पण एका बाबतींत प्राचीन व्यापारीजमाती आणि अर्वाचीन कामकरी जमाती ह्यांचें धोरण भिन्नभिन्न दिसतें, आणि त्याचें कारण त्यांचें भिन्न हेतुत्व हें होय. पूर्वीचे कारागीरिसमाज आपल्यांतील लोक कामें कशीं करितात व माल कसला वापरतात ह्या-

वर थोडींशी देखरेख करीत असत; पण त्यांत त्यांचा हेतु ते जिन्नस विकत घेणाऱ्या लोकांचें नुकसान होऊं नये हा नसे, तर कोणास इतरांहून ज्यास्त फायदा होऊं नये हा असे. आतां हल्लींच्या कामकऱ्यांच्या मजुरीचे दर ठराविक असल्यामुळें कोण काम बरोबर करितो, व कोण कमी करितो हें पाहण्यांत त्यांच्या मंडळांचें नफानुकसान कांहीं नाहीं. उलट, काम कमी तास करावयास पडावें हें पाहण्यांतच त्यांचें हित असतें, आणि कोणी आपल्याहून ज्यास्त किंवा ज्यास्त चांगलें काम करूं लागल्यास ते त्यास धमकावणी देतात.

ह्या अनेक प्रकारच्या साम्यांवरून आणि वरील भेदावरून प्राचीन व अर्वाचीन जमातींचें स्वरूप एकच आहे हें दिसून येतें.

१०७. प्रतिबंधक माणूस मालाच्या स्वतंत्र व्यापारास प्रतिबंध करो, किंवा मजुरीच्या स्वतंत्र देवघेवीस प्रतिबंध करो, त्या प्रतिबंधाचें अंतःस्वरूप एकच असतें. ह्यावरून आणखी एक साम्य आपल्या नजरेस येतें.

कांहीं वर्षांपूर्वी पार्लमेंताच्या एका सभासदानें अशी सूचना पुढें आणिली कीं, सर्व आयात मालावर शेंकडा दहा पौंड जकात द्यावी. ह्यांत त्याचा हेतु केवळ शेतकरीवर्गाचाच नव्हे तर सर्वच वर्गांचा फायदा करण्याचा होता; आणि तो अर्थात् त्यांस आपले जिन्नस महाग विकतां येतील ह्या दृष्टीनें होता. पण लोक जसे जिन्नस तयार करितात तसे त्यांस ते वापरावेहि लागतात. म्हणून उत्पादक ह्या दृष्टीनें जर लोकांचा फायदा

होणार होता तर उपभोगक ह्या दृष्टीनें तोटा होणार होता; आणि ही गोष्ट ह्या सभासदानें लक्षांत घेतली नव्हती.

पार्लमेंताच्या सभासदांची जर ही गति, तर कामकरी मंडळांची असलीच गैरसमजूत झाल्यास त्यांत नवल तें कसलें ? त्यांतील प्रत्येक कामकरीवर्गास, मग तो सुतारांचा असो, गंवड्यांचा असो, विणकरांचा असो, छापखान्यांत खिळे जुळणारांचा असो, सर्वांस असें वाटतें कीं, आपण संयोग न बनवतां जी मजुरी आपल्यास मिळेल त्याहून ज्यास्त मजुरी संयोग बनवून मिळविणें हें आपल्या फायद्याचेंच आहे. त्याला त्यामुळें ज्यास्त मजुरी मिळते तेवढी दिसते, पण ती खर्च होऊन कशी जाते तें दिसत नाहीं. पण ती खर्च होऊन जाते ह्यांत बिलकूल संशय नाहीं. कामकरी मंडळांना देखील आतां हें समजूं लागलें आहे कीं, आपण जो जिन्नस उत्पन्न करितों त्याच्या किंमतीच्या पलीकडे यजुरीचे दर वाढवितां येत नाहींत, आणि वाढविल्यास त्या जिनसाची किंमत वाढवावी लागेल. म्हणून सर्व प्रकारच्या धंद्यांत जर कामकरी-मंडळें हल्लींप्रमाणें स्थापन झालीं, आणि त्यांस आपापल्या मजुरीचे दर हल्लींहून वाढवतां आले, तर अर्थात् ते जे जे जिन्नस उत्पन्न करितात त्या सर्वांच्या किंमती वाढतील, आणि मजुरीच्या रूपानें त्यांच्या खिशांत जर ज्यास्त पैसा येईल, तर त्यांस जे जिन्नस लागतात त्यांच्या ज्यास्त किंमतीच्या रूपानें त्यांच्या खिशांतून ज्यास्त पैसे बाहेर जातील. मिळून वेरीज वजाबाकीबरोबर होईल.

१०८. कामकरी मंडळांतला माणूस त्या मंडळाच्या

बाहेरच्या माणसाबद्दल असें म्हणत असतो कीं, कमी मजुरीनें काम करून माझें काम काढून घेण्याचा त्यास काय हक्क आहे ? त्याला तेणेंकरून आपलें नुकसान झाल्यासारखें वाटतें, आणि ज्याच्या योगानें आपलें नुकसान होईल तें अन्यायाचें असलेंच पाहिजे असेंहि वाटतें. पण दोन दुकानदारांपैकीं एक दुकानदार जर एकादा जिन्नस त्यास कमी किंमतीनें देऊं लागला तर तो त्या दुसऱ्या दुकानदाराचा अन्याय करीत आहे असें त्यास वाटतें काय ? मुळींच वाटत नाहीं. उलट, जो दुकानदार कमी नफा घेऊन जिन्नस विकतो तोच चांगला असें त्यास वाटतें. सारांश, त्याच्या फायद्याची गोष्ट तेवढी त्यास न्यायाची वाटते, आणि तोट्याची गोष्ट अन्यायाची वाटते.

शिवाय, कामकरी-मंडळांतला माणूस आणि बाहेरचा माणूस ह्यांच्यामध्यें जो हा तंटा चालतो त्यांमध्यें त्यांच्याखेरीज कामकऱ्यांना लावणारे जे लोक त्यांच्या नफ्यातोट्याचा प्रश्न येतो हेंहि त्याच्या लक्षांत येत नाहीं. सारांश, तो आपला फायदा व्हावा म्हणून आपल्या मंडळाबाहेरच्या माणसाचें आपल्या कृतीनें जसें नुकसान करितो तसें मालकांचेंहि करितो. म्हणजे, एकाच्या फायद्यासाठीं दोघांचें नुकसान होतें.

ह्यावर कोणी जर असें म्हणेल कीं, मालकानें आपलां नफा कमी करून कामकऱ्यास ज्यास्त मजुरी द्यावी, तर त्यास असें उत्तर आहे कीं, चढाओढीमुळें त्याचा नफा अगोदरच इतका कमी झालेला असतो कीं, त्यानें ज्यास्त मजुरी दिल्यास एक आपलें दिवाळें काढिलें पा-

हिजे किंवा मालाची किंमत वाढविली पाहिजे• आणि त्यानें किंमत वाढविली म्हणजे तो पदार्थ घेणाऱ्या सर्व लोकांचें नुकसान अर्थात् होणार.

•१०९. आतां कामकरीसंयोग बनविण्याच्या धोरणाचे परिणाम पैशाच्या दृष्टीनें काय होतात हें पाहूं. म्हणजे, पुष्कळ धंद्यांतील लोकांचे पुष्कळ वर्षांचे आंकडे घेऊन या संयोगामुळें कामकऱ्याच्या राहणींत कांहीं सुधारणा झाली आहे कीं काय हें पाहूं.

इंग्लंदांतील शेतावर खपणाऱ्या मजुरांच्या स्थितीकडे पाहतां असें स्पष्ट दिसतें कीं, कांहीं प्रकारच्या परिस्थितींत कामकरी-मंडळें बनविल्यानें कांहीं फायदा होत नाहीं, पुष्कळ शेतें हल्लीं कुळें नाहींत म्हणून रिकामीं पडलीं आहेत अशा जाहिराती पाहण्यांत येतात. ह्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, शेताची लागवड करण्यापासून कुळांस हल्लीं फायदा होत नाहीं म्हणून शेतमजूर संयोग बनवून जर ज्यास्त मजुरी मागूं लागले तर आणखीहि जमीन ओस पडेल; आणि मग मजुरांना मागणी तितकी कमी होईल. एवंच ज्यास्त मजुरी मागण्याचा परिणाम पुष्कळ ठिकाणीं मुळींच मजुरी न मिळणें हा होईल.

हीच स्थिति इतर धंद्यांतहि कमज्यास्त प्रमाणावर आहे हें लंकाशायरमधील गिरण्या कधीं कधीं कमी तास कशा काम करितात, आणि कधीं कधीं अगदीं बंद कशा रहातात, ह्यावरून लक्षांत येतें. संप केला म्हणजे कामकऱ्याचें दुबार नुकसान होतें. एक त्याची मजुरी जाते, आणि दुसरें त्यानें थोडे थोडे पैसे भरून जम-

विलेला फंड कमी होतो. संपाच्या योगानें मजुरीचा दर वाढला तरी देखील वर सांगितल्याप्रमाणें झालेलें नुकसान भरून येतें किंवा नाहीं ह्याचा वानवाच आहे आणि मालक व. लोक ह्यांचें नुकसान होतें ह्यांत तर बिलकूल संशयच नाहीं.

कधीं कधीं ह्या संपांच्या योगानें ह्याहूनहि ज्यास्त नुकसान होतें. तें हें कीं, कधीं कधीं तेणेंकरून एकादे ठिकाणीं एकादा धंदा कायमचाच बसून जातो. आणि ह्या बाबतींत पूर्वीचे धंदेवाल्यांचे संयोग आणि हल्लींचे कामकरीसंयोग ह्यांमध्यें आणखी एक साम्य दिसून येतें. पूर्वीं धंदेजमातींच्या कडक बंधनामुळें कामगारलोक शहर सोडून बाहेर आपला धंदा करूं लागत, किंवा फार दूरवरहि जात; तसेंच हल्लींच्या कामकरी मंडळांच्या कडक कायद्यांमुळेंहि होतें. ह्याचें उदाहरण १७७३ सालीं चांगलें दिसून आलें. कारण त्या वेळीं स्पिटाफील्डस् एथील विणकरांना म्याजिस्ट्रेट ठरवितील तो मजुरीचा दर मागण्याची मुभा मिळाल्यामुळें कापड विणण्याचा खर्च इतका वाढला कीं पुढील पन्नास वर्षांत तेथून तो धंदा उठून म्यांचेस्टर, नॉरिच, वगैरे ठिकाणीं गेला. ह्याच्या आलीकडचें, आणि कामकऱ्यांच्या संयोगामुळेंच प्रत्यक्ष घडून आलेलें उदाहरण म्हटलें म्हणजे टेम्स नदीवरील जहाजें बांधणारांचें होय. त्यांचे मजूर फाजील मजुरी मागूं लागल्यामुळें तेथें जहाजें बांधण्यांत किफायत होत नाहींशी झाली, आणि त्यामुळें तो धंदा उत्तरेकडे गेला; आणि म्हणून जे त्या कामांतील मजूर लंदनांत राहिले आहेत ते 'आह्मांस काम द्या' म्हणून सरकारी आरमारखात्यापाशीं तोंड वेंगाडूं लाग-

ले आहेत. असल्या ह्या कामकरीमंडळांच्या मागण्यांचा परिणाम कांहीं धंदे इंग्लंदांतून समूळ बाहेरदेशींच निघून जावे असा देखील होईल; कारण यूरोपांतील इतर देशांत पगार कमी आणि कामाचे तास ज्यास्ती अशी स्थिति असल्यामुळें त्यांस त्यांनीं तयार केलेल्या वस्तू कमी दरानें विकतां येतात. ' जर्मनींत तयार झालेले ' जिन्नस इतर देशींच नव्हे तर इंग्लंदांतहि ज्यास्त ज्यास्त खपूं लागले आहेत, आणि असें म्हणतात कीं, इंग्लंदांत खपणाऱ्या काचेपैकीं नऊदशांश बाहेर देशांतून येते.

मजुरीचे कायमचे दर मालक किंवा मजूर ह्यांच्या इच्छांवर अवलंबून न राहतां इतर कारणांवर अवलंबून असतात, हें इंग्लिश मजुरांस त्यांच्याच देशाच्या इतिहासावरून चांगलें समजण्यासारखें आहे. तिसऱ्या एडवर्डाच्या कारकीर्दींत जेव्हां प्लेगामुळें पुष्कळ लोक मरून गेले तेव्हां मजुरांची संख्या कमी झाल्यामुळें मजुरीचे दर आपोआप वाढले; आणि कायदे व शिक्षा यांच्या योगानें ते कमी करण्याचे सर्व प्रयत्न फुकट गेले. उलटपक्षीं, व्यापाराची मंदी असेल तेव्हां कितीहि संप केले तरी मजुरीचे दर कायमचे वाढूं शकत नाहींत असाहि प्रत्यक्ष अनुभव आहे. सारांश, जेथें मजुरांना मागणी फार असेल तेथें मजुरीचे दर कमी करतां येत नाहींत, आणि जेथें कमी असेल तेथें वाढवतां येत नाहींत.

११०. असें जर आहे तर कामकरीमंडळांबद्दल काय म्हणावयाचें? पूर्वीं जेव्हां तीं एकमेकांस सहाय्य करण्याकरितां बनवीत असत तेव्हां त्यांचा उपयोग निःसंशय मोठा होत असे; आणि हल्लींहि त्यांचा उपयोग

ह्या कामीं जितक्यापुरता होत असेल तितक्यापुरतीं तीं प्रसंशनीयच होत. पण एथें जो आपण त्यांचा विचार करीत आहों तो त्यांच्या मालकांशीं व सामान्य जन-समूहाशीं त्यांचे जे संबंध येतात त्यांच्या दृष्टीनें करीत आहों. तर मग, त्या दृष्टीनें आपण असें म्हणावयाचें कीं काय, कीं एकाद्या धंद्यांतील कामकऱ्यांस कांहीं काल-पर्यंत संपामुळें ज्यास्त मजुरी मिळाली तरी तेणेंकरून सामान्य जनसमूहाचें नुकसान होतें, आणि इतर धंद्यां-तील मजुरांस ती तशीच मिळूं लागली तर त्यांत को-णाचाच कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं? आपण असें म्हणावयाचें कीं काय, कीं कामकरीमंडळांच्या खटपटी-पासून शेवटीं त्यांचा फायदा न होतां त्यामुळें नुकसान मात्र फार होतें?

नाहीं; असें म्हटल्यास अतिशयोक्ति होईल. सामा-जिक उत्क्रमणाच्या हल्लींच्या पायरीवर असलीं मंडळें बनणें हें स्वाभाविकच आहे; आणि हल्लींच्या परिस्थि-तींत त्यांच्यापासून फायदाहि होऊं शकेल. कोणीं अ-तिक्रमण केलें कीं त्यास विरोध करणें आणि उलट त्या-च्यावर अतिक्रमण करणें हें सर्वत्रच दिसून येतें; आणि हल्लींच्या अर्धवट युद्धशील व अर्धवट उद्यमशील स्थितींत उलट अतिक्रमण होईल ह्या भीतीनेंच अति-क्रमण करण्याचा कल आंवरून धरिला जातो.

मालकांचें पूर्वींचें कडक व क्रूरपणाचें वर्तन ध्या-नांत घेतां, असें म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं कीं हल्लीं ते जे मजुरांस अन्यायानें वागवीत नाहींत त्यास कारण त्यांस प्रतिबंध होतो हें होय. कामकरी

मंडळें संप करण्यास तयार आहेत हें जाणून ते व्यापारास तेजी असते तेव्हां मजुरीचे दर वाढविण्यास पूर्वीहून जास्त तत्पर दिसतात; आणि धंद्यास मंदी येईल तेव्हां एरवीं धंदा चालवतांच येणार नाहीं असें होईल तेव्हांच ते कमी करितात.

कामकरी-मंडळांचें महत्त्व ध्यानांत आणून मालक कामकऱ्यांशीं पूर्वीपेक्षां ज्यास्त सभ्यपणानें वागतात; म्हणजे, ह्यामुळें त्यांची योग्यता वाढली आहे. शिवाय मालक ह्याच कारणामुळें मजुरांची सोय-गैरसोय पूर्वीहून ज्यास्त पाहतात; आणि त्यांची प्रकृति बिघडणार नाहीं अशा खबरदाऱ्या कारखान्यांतून घेतात. म्हणून मजुरीच्या दृष्टीनें कामकऱ्यांचा कायमचा फायदा झाला नाहीं तरी शारीरिक व नतिक वागणुकीच्या दृष्टीनें त्यांचा कायमचा फायदा होतो.

तिसरा फायदा कामकरीमंडळें बनवणें व योग्य त्या गोष्टी करणें ह्यामुळें कामकऱ्यांस एकप्रकारचें वळण लागतें हा होय. सामाजिक जीविताच्या सुधारणेचें मुख्य स्वरूप पाहतां एकत्र राहण्याची व काम करण्याची योग्यता अंगीं ज्यास्त ज्यास्त येणें हें होय; आणि ही योग्यता अशीं मंडळें बनवून त्यांचा कारभार योग्य रीतीनें चालवण्यास व फंड भरण्यास जो उत्साह लागतो, व जें आत्मसंयमन करावें लागतें तें उत्पन्न करून उत्पन्न होते व वाढते. आणि ह्यामुळें त्यांस विचार व विकार ह्यांच्या ज्या संवयी लागतात तेणेंकरून सामाजिक घटनेची पुढील जी उच्चतरस्थिति तिला माणसें ज्यास्त योग्य होत जातात.

प्रकरण एकविसावें

सहक्रिया

११९. एकंदर सामाजिक जीवित सहक्रियेमुळें चालतें. राष्ट्राच्या एकंदर चळवळींचे दोन मुख्य विभाग होत असून ते सहक्रियेचेच प्रकार आहेत; समजून उमजून केलेली सहक्रिया आणि न समजतां केलेली सहक्रिया; एक युद्धशील आणि दुसरी उद्यमशील. सेनापति, त्याच्या हाताखालील कामगार, आणि सामान्य शिपाई, हे जे सैन्याचे घटक, ते विशिष्ट हेतु साधण्यासाठीं जाणून बुजून सहक्रिया करितात. निरनिराळ्या धंद्यांतून गुंतलेले लोक, आपापले खासगी उद्देश साधीत असून, सामाजिक उद्देशहि न समजतां साधीत असतात. कारण त्यांच्या कृती एकत्र होऊन त्या सर्व समाजाच्या गरजा भागवीत असतात; पण त्या करा म्हणून त्यांस कोणी हुकूम करीत नसतो, आणि त्या ते सर्वांचें हित साधण्याच्या उद्देशानें नव्हे तर आपापले उद्देश साधण्यासाठीं करीत असतात.

पण हल्लींच्या काळांत सर्वांच्या उद्देशासाठीं म्हणून उद्योगधंदा करण्याचे कांहीं प्रकार उत्पन्न झाले आहेत. समाईक भांडवलाच्या कंपन्यांचे भागीदार जी सहक्रिया करितात तो ह्या सहक्रियेचा एक प्रकार होय. असले भागीदार जरी ज्या उद्देशासाठीं एकत्र झाले असतील तो स्वतःच साध्य करीत नाहींत, तरी भागाचे पैसे भरून, आणि व्यवस्थापक-मंडळ नेमून तेवढ्यापुरती जाणून-

बुजूनची सहक्रिया करितात. सहक्रियेचा दुसरा एक प्रकार कामकरीमंडळांच्या कृती हा होय. जंरी ह्या मंडळाचे घटक माल उत्पन्न करण्याच्या कामीं सहक्रिया करीत नाहींत तरी त्यांच्या मंडळांचे नियमांचा उत्पादनावर परिणाम घडत असतो; आणि त्यांची सहक्रिया ठळकरीतीनें जाणूनबुजूनची असते.

पण ह्या प्रकरणांत ज्या सहक्रियेचा आपण विचार करणार आहों तो प्रकार नवीनच सुरू झालेला आहे, व त्यालाच तो शब्द हल्लीं लावीत असतात. म्हणून एथें आपणास ज्या प्रश्नाचा विचार करणें आहे तो हा कीं, समाजाचें पोषण जें व्हावयाचें तें पूर्वीच्या सहजगत्या उत्क्रान्त झालेल्या व न समजतां होणाऱ्या सहक्रियेनें उत्तमप्रकारें होईल किंवा या नवीन प्रकारानें होईल ?

११२. सामाजिक जीविताच्या, अगदीं प्रारंभींच्या पायऱ्यांवर समजून उमजूनची औद्योगिक सहक्रिया तत्सल्याच युद्धविषयक सहक्रियेशीं निकट रीतीनें संबद्ध झालेली असते. मानवी शत्रूंच्या विरुद्ध सर्वांनीं मिळून कृति करण्याच्या संवयीस पशुरूप शत्रूंविरुद्ध किंवा भक्ष्यरूप प्राण्यांविरुद्ध कृति करण्याच्या संवयींचें सहजच स्वरूप येतें. असल्या प्रकारची सहक्रिया लांडग्यासारख्या हुशार प्राण्यांमध्यें देखील दिसून येते; आणि पारधी टोळ्यांमध्यें ती सर्वत्र दिसून येते; उदाहरणार्थ, उत्तर अमेरिकेंतील रानटी लोक रानटी रेड्यांवर असेच पुष्कळजण मिळून हल्ले करीत असतात. कधीं कधीं असले प्राणी धरण्याकरितां ह्याच्याहूनहि ज्यास्त भानगडीची सहक्रिया करावी लागते. ब्यारो व ग्याल्टन असें सांगतात

कीं, पुष्कळ बुशमेन मिळून मोठाले सांपळे वन्य पशू पकडण्याकरितां तयार करितात.

दुसऱ्या कांहीं असुधारलेल्या व अर्धवट सुधारलेल्या लोकांमध्यें ह्याच्याहून ज्यास्त स्पष्टपणें उद्यमविषयक अशा बीजभूत सहक्रिया दिसून येतात. उदाहरणार्थ, बोडो व ढिमाल लोकांविषयीं हाडसन सांगतो कीं, ते एकमेकांस घरें बांधण्यांत आणि शेतें साफ करण्यांत मदत करितात; आणि त्याबद्दल पोटभर दारू पाजण्याखेरीज दुसरा कांहीं मोबदला देत नाहींत. त्याचप्रमाणें नाग लोकांविषयीं ग्रेंज सांगतो कीं, त्यांच्यांत घरें बांधण्यास एकमेकांस मदत करण्याची चाल आहे; मात्र त्याबद्दल घराचा मालक त्यांस मेजवानी देतो. आराकेनियन लोकांविषयीं टामसन असें सांगतो कीं, त्यांच्यांत लग्नें व मर्तिकें ह्या वेळचीं जेवणें जरी सर्वांस फुकट घालीत असतात तरी शेत नांगरणें, मळणी करणें, घर बांधणें वगैरे जीं पुष्कळ लोकांनीं करावयाचीं कामें तीं पुरीं झाल्यावर जीं जेवणें घालितात तीं त्या कामाला ज्यांनीं हातभार लाविलेला असेल त्यांसच घालितात. प्राचीन यूकाटानीस लोकांच्या बायका एकमेकींस विणण्याच्या व सूत काढण्याच्या कामीं मदत करीत आणि पुरुषांना शेतकामाबद्दल जसला मोबदला मिळे तसला त्यांनाहि ह्या कामाबद्दल मिळे. प्राचीन सिंघालीस लोकांमध्यें शेतीसाठीं पाण्याचे मोठाले संचय करून ते सर्व शेतांस पुरविण्याचें काम सर्व गांवकरी मिळून करीत असत. उत्तर अमेरिकेंतील पापागास लोकांविषयीं ब्यांक्रॉफ्ट म्हणतो कीं, ते लोक आपलीं शेतें नद्यांतून

कालवे वांधून आणून त्या पाण्यावर करितात. हें कालवे दुरुस्त ठेवण्याचें काम सगळेजण मिळून करितात; आणि शेतीचें काम ज्या त्या कुटुंबांतील माणसें करितात.

ह्यावरून असा सिद्धान्त करण्यास हरकत दिसत नाहीं कीं जे अर्धवट सुधारलेले लोक कालवे बांधून शेती चालवीत असतात ते तीं कामें पुष्कळजण मिळून करीत असतात.

११३. 'सहक्रिया' शब्दाचा मर्यादित अर्थ न घेतां व्यापक घेतला तर वर सांगितल्याखेरीज दुसऱ्या पुष्कळ सामाजिक रचना त्या सदराखालीं येतील हें आपल्या लक्षांत येईल. त्या कोणत्या तें पाहूं.

इंग्लंदांत जीं अनेक लहान-मोठीं मित्रमंडळें दृष्टीस पडतात तीं ह्या सहक्रियेचीं अत्यंत ठळक उदाहरणें होत. असलीं मंडळें स्थानिक असून जिल्हानिहायहि तेथें आहेत, आणि कांहीं त्याच्याहूनहि ज्यास्त व्यापक आहेत. आग, पाणी, वगैरेपासून होणाऱ्या अपघातांबदल विमे उतरणाऱ्या बऱ्याच मंडळ्या ह्यामध्येंच येतात. 'बऱ्याच' म्हणण्याचें कारण ज्या कंपन्या भांडवल घालून त्यावर नफा मिळविण्याच्या उद्देशानें स्थापिलेल्या आहेत त्या ह्या सदरांत येत नाहींत. ह्या सर्व मंडळांतून घटकांनीं एकत्र काम करणें जरी आढळत नाहीं, तरी एकमतानें चागणें आढळून येतें.

जर्मनी, आस्ट्रिया, इटाली वगैरे देशांतून ज्या शेतकऱ्यांच्या पतपेढ्या स्थापन झाल्या आहेत त्या ह्याच सदरांत येतात. ह्या पेढ्यांचे भागीदार नेहमींच्या सावकारांकडून पैसे कर्जाऊ न घेतां आपल्याच पेढीवरून

म्हणजे बस्तुतः एकमेकांपासूनच घेतात. ह्या पेढ्यांची व्यवस्था भागीदारांनीं नेमिलेलेच व्यवस्थापक करितात, आणि ते विश्वासू असतील तर त्यांपासन निःसंशय फायदा होतो.

दुसऱ्या एका प्रकारच्या सहकारी मंडळ्या रशियांत दृष्टीस पडतात. त्यांस ' आर्टेल ' असें म्हणतात. ह्या मंडळ्यांचे घटक समाईक भांडवल जमा करून समाईक मेहनत करितात, किंवा नुसती समाईक मेहनतच करितात, आणि कांहीं व्यापार किंवा धंदा करितात. प्रत्येक घटक सारखेंच काम करितो, व सारखाच नफा घेतो. सर्व घटक एकमेकांच्या कामाबद्दल व वर्तनाबद्दल जबाबदार असतो. ही पद्धति दहाव्या शतकांत प्रचारांत आली म्हणून म्हणतात. त्या वेळीं नीपरनदीवरील कांहीं कॉसाक लोक स्वसंरक्षण व परातिक्रम ह्यांकरितां एकत्र होऊं लागले आणि कांहीं काळपर्यंत एक मुख्य नेमूं लागले; तो सर्वांच्या कामावर देखरेख ठेवून मिळेल ती लूट सर्वांस सारखी वांटून देत असे. लष्करी कामासाठीं जाणून बुजून संयोग करण्यापासून तसलेच संयोग उद्योगधंद्यांसाठीं करण्याची स्थिति संक्रमणानें उत्पन्न होते म्हणून जें वर सांगितलें त्याशीं हें उदाहरण जुळतें. ह्या मंडळ्या अनेक प्रकारचे धंदे करणाऱ्या आहेत. उदाहरणार्थ, सुतार, चित्रकार, लोहार, गवंडी, हमाल, इत्यादि सर्वांच्या असल्या मंडळ्या बनलेल्या आहेत. त्यांच्यावर लोक मोठाल्या रकमा देखील विश्वासतात. ह्याचें कारण हें आहे कीं ते नवे सभासद फार बारीक तपास करून घेतात. ह्या मंडळ्या मूळचीं जीं संयुक्त कुटुंबें

त्यांपासून उत्पन्न झालेल्या दिसतात. त्या कुटुंबांतून कुटुंबमुख्याची सत्ता अनियंत्रित असते, आणि तशीच ह्या मंडळांतूनहि आहे.

बलगेरियामध्यें असलींच कांहीं मंडळें होतीं व आहेत; पण त्यांची भरभराट दिसत नाहीं. रोटीवाले, गवंडी, बागवाले अशांचीं असलीं मंडळें तेथें बनलेलीं आहेत.

११४. सहक्रिया शब्दाचा सध्यां जो प्रचलित अर्थ आहे त्या अर्थीं त्या क्रियेचा विचार करण्यापूर्वी आणखी एक प्रकारच्या औद्योगिक संस्थांचा विचार केला पाहिजे. ह्या संस्था म्हणजे ज्याच्यांत कामकऱ्यांना नफ्याचा भाग मिळतो त्या होत.

असल्या संस्था कांहीं अंशीं जरी कामकऱ्यांचें कल्याण करण्याच्या उद्देशानें स्थापन झालेल्या आहेत तरी कांहीं अंशीं काम चांगलें व्हावें हाहि उद्देश त्यामध्यें आहे. कारण नुसती मजुरीच दिल्यानें काम तितकें चांगलें होत नाहीं असें समजतात; आणि शिवाय देखरेखहि विशेष ठेवावी लागते. म्हणून असें समजतात कीं कामकऱ्यास नफ्याचा वांटा दिल्यानें मालकाचाच नफा होतो. हा नफ्याचा वांटा देण्याचे तीन प्रकार सध्यां प्रचलित दिसतात:—१. वर्षाअंतीं नफ्याचा वांटा कामकऱ्यास रोख देणें. २. नफ्याचा वांटा कामकऱ्याची ठेव म्हणून कांहीं विशिष्ट कालपर्यंत ठेवून घेणें, आणि त्यावर व्याज जमेल त्यासहित तो त्यास पुढें देणें. ३. नफ्याच्या वांट्याचा कांहीं भाग कामकऱ्यास रोख देणें. आणि कांहीं भाग ठेव म्हणून ठेवून घेणें. ह्यांपैकीं तिसरा प्रकारच विशेष प्रचारांत दिसतो.

असल्या सर्व उदाहरणांत नफ्याचा वांटा कोणत्या तरी स्वरूपानें कामकऱ्यास देण्याव्यतिरिक्त कामकरी व मालक ह्यांचा संबंध नेहमींचाच असतो. पण कांहीं कारखानदार कामकऱ्यांस भांडवलाच्या मालकीचाहि कांहीं भाग देतात, आणि कारभारावरील देखरेखींत त्यांस घेतात. अशा एका कारखान्याचें वर्णन मिल्ल साहेबानें ७५ वर्षांपूर्वी आपल्या अर्थशास्त्रावरील ग्रंथांत दिलें असून तो कारखाना अद्यापि भरभराटींत आहे.

पण अशा प्रकारचे नफ्याचा वांटा कामकऱ्यांस देणारे शेंकडों कारखाने भरभराटीस आल्याचीं जशीं उदाहरणें तिकडे दृष्टीस पडतात, तसे ते बुडाल्याचींहि दृष्टीस पडतात,व तीं इतर देशांपेक्षां इंग्लंदांत ज्यास्त दृष्टीस पडतात.

ह्या पद्धतींतिल कांहीं दोष एक कारखानदार दाखवितो ते असेः—पुष्कळ प्रसंगीं नफा नवीन शोध, सुधारणा, काटकसर वगैरेमुळें होत असतो, आणि त्यांत कामकऱ्यांचें कांहींएक अंग नसतें, आणि म्हणून त्यांस ह्या नफ्याचा भाग देणें म्हणजे फुकट दान करण्यासारखेंच आहे. २. सर्व कामकऱ्यांस नफ्याचा वांटा सारखाच दिल्यानें कांहींस त्यांच्या योग्यतेहून ज्यास्त आणि कांहींस कमी मिळतो, कारण सर्वच सारखे हुशार किंवा सारखें मन लावून काम करणारे असत नाहींत. ३. नफ्याचा वांटा जर कामकऱ्यास द्यावयाचा तर तोट्याचाहि दिला पाहिजे, पण तसें तर कोणी करीत नाहीं. ४. कामकऱ्यांस हिशेब दाखवीत नसल्यामुळें, आणि दाखविले तरी समजण्यासारखे नसल्यामुळें, कारखानदार आपल्यास नफ्याचा योग्य वांटा देतो किंवा नाहीं

ह्याबद्दल कामकऱ्याच्या मनांत कमज्यास्त संशय नेहमीं रहात असला पाहिजे.

हे दोष काढून टाकण्याकरितां कांहीं कारखानदार असें करितात कीं, अमुक एक कामास अमुक एक वेळ लागणें योग्य आहे असें ठरवितात, आणि त्यापेक्षां कमी वेळांत जो तें काम करील त्यास तितका ज्यास्त पगार देतात. कांहीं ठिकाणीं अशा रीतीनें होणाऱ्या फायद्याचा निम्मे भाग त्यास देतात.

पण ह्या रीती जरी पहिल्याहून ज्यास्त न्याय्य आहेत तरी त्यासाठीं दररोज हिशेब ठेवावे लागतात, आणि ते ठेवण्यास जो खर्च लागतो तो नफ्यांतून वजा होतो.

११५. आतां आपण ज्या संस्थांस 'सहकारी' म्हणून सामान्यतः म्हणतात त्यांचा विचार करूं; मात्र त्या सर्वांस हें नांव लागू पडतें किंवा नाहीं ह्याचा वानवाच आहे.

उत्क्रान्तीच्या सामान्य सरणीस अनुसरून त्यांचीं बीजें अस्पष्टरीत्याच सहकारी अशीं होतीं. असल्या संस्था प्रथम पावबिस्कुटांच्या निघाल्या; कारण भाकरीच्या महागाईचें कारण रोटीवाले होत असें लोकांस चुकीनें वाटे, आणि ते कणकींत भेसळ करितात असें कदाचित् यथार्थरीत्या वाटे. म्हणून इंग्लंदांत कांहीं ठिकाणीं सहकारी तत्त्वावर पिठाच्या गिरण्या स्थापन झाल्या, आणि कांहीं ठिकाणीं रोटीसंस्था स्थापन झाल्या. पण ह्या संस्थांतून जे पीठ किंवा भाकरी नेत तेच तेथें काम करीत असें नाहीं. त्यांचा हेतु केवळ आपणांस चांगली भाकर मिळावी एवढाच असे.

पुढें वीस वर्षांनीं प्रथम ब्रायटन मुक्कामीं आणि नंतर इतरत्र सहकारी दुकानांची स्थापना झाली; त्यांत त्या दुकानांचे जे कामकरी भागीदार त्यांस लागतील त्याच जिनसा बहुधा विकीत असत. पण ह्या दुकानांचा अंतिमहेतु फार दांडगा होता. तो हा कीं, भांडवलांत नफ्याची भर घालतां घालतां एवढी मोठी रक्कम जमवावयाची कीं तेवढ्यावर उत्पन्न व खर्च सारखे वांटून घेणारे (किंवा समाईक) समाज स्थापन करतां यावे. कांहीं काळानें त्यांपैकीं कांहींची भरभराट इतकी झाली कीं, नेहमींच्या उपयोगांतील कांहीं वस्तु तयार करण्याचे कारखाने त्यांनीं काढिले, व त्यांत आपल्यांतीलच कांहीं कामकरी ठेवूं लागले. आणि नंतर असल्या निरनिराळ्या मंडळ्यांचे जे निरनिराळे लहान लहान कारखाने त्यांत उत्पन्न होणाऱ्या जिनसांपैकीं भागीदारांस पुरून उरणारे जिन्नस एकमेकांस देण्याचीं दुकानें स्थापन झालीं. पण हीं सर्व मंडळें थोडक्याच वर्षांनीं नाहींशीं झालीं; ह्याचें एक कारण त्यांच्या जिनसांत बायकांस प्रिय अशा निरनिराळ्या तऱ्हा नसत, दुसरें कारण तेथें उधारीवर जिन्नस मिळत नसे, आणि तिसरें कारण त्यांच्यांत योग्य काटकसर नसे.

पुढें वीस वर्षें कामकरीवर्गाचे पुढारी राजकीय चळवळींत गुंतले असल्यामुळें त्या काळांत ह्यासंबंधानें कांहींएक झालें नाहीं. नंतर ही सहकारी चळवळ पुन जिवंत झाली, व तिचाहि उद्देश सहकारी समाज स्थापन करण्याचा होता. नवीन मंडळाचें राशडेल एथें दुकान निघालें. ह्यांनीं एक नवीन ट्रम अशी काढिली कीं, नफा

होईल तो भागीदारांमध्यें किंवा नोकरांमध्यें घांटून न देतां गिऱ्हाईकांमध्यें ते जिन्नस घेतील त्या मानानें वांटून द्यावयाचा. ह्याचा परिणाम असा झाला कीं, त्या दुकानाची फार भरभराट झाली, आणि लवकरच तसलीं दुकानें इतरत्र निघून त्यांचीहि लवकरच भरभराट झाली. ह्यामुळें ५० वर्षांत असल्या दुकानांचे १० लाख भागीदार झाले, तीन कोटी साठ लाखांचा त्यांचा वर्षाचा व्यापार होऊं लागला, सरासरी तीस लाख वर्षास फायदा होऊं लागला, आणि एक कोटी दोन लाखांचें त्यांचें भांडवल जमल.

ह्या संस्थांचा उद्देश जसा गिऱ्हाईकांस स्वस्तदरानें जिन्नस पुरविण्याचा असे तसाच ते स्वस्तदरानें तयार करण्याचाहि असे. वरचेवर अशा सूचना लोक करीत आले होते कीं, जिनसांची एक मुख्य वखार स्थापावी, आणि त्यांतून किरकोळ दुकानांना लागणारा माल त्यांनीं स्वस्तदरानें द्यावा. ह्यासंबंधानें केलेले कित्येक यत्न फुकट गेल्यावर १८६४ सालीं असली एक वखार म्यांचेस्टर मुक्कामीं स्थापन झाली. नंतर लवकरच तेथें एका सहाकारी पतपेढीचीहि स्थापना झाली.

ह्या वखारीचे आणखी कांहीं विशेष एथें सांगण्यासारखे आहेत. प्रथम राशडेल एथील वखारीचें काम जरी भागीदारच कांहींएक न घेतां पाळीपाळीनें करीत असत तरी त्यांचें काम जसें वाढत चाललें तशी पगारी कामदार नेमण्याची आवश्यकता त्यांस भासूं लागली. पुढें त्यांनीं असा ठराव केला कीं, असले पगारी कामगार व्यवस्थापक मंडळांत कधीं नेमूं नयेत, आणि मागा-

ह्न असा ठराव केला कीं, त्यांना व्यवस्थापकमंडळ निवड-ण्याच्या कामीं आपलें मतहि देण्याचा अधिकार असूं नये.

आतां ह्या सर्व विशेषांचा विचार करतां त्यांस 'सह-कारी' हें नांव कितपत लागू पडतें हें पाहूं. ह्यांपैकीं मध्यम वर्गाच्या लोकांचे जे संचय आहेत त्यांस 'सह-कारी' हें नांव लागू पडत नाहीं. त्यांचीं भांडवलें भागां-च्या रूपानें जमविलेलीं असल्यामुळें, व त्यावर भागी-दारांस व्याज रोकडीच्या किंवा ठेवीच्या रूपानें देत असल्यामुळें, आणि ते आपले जिन्नस भागीदारांप्रमाणें बिनभागीदारांनाहि विकीत असल्यामुळें त्या केवळ स-माईक भांडवलाच्या संस्था आहेत. ह्या दुकानांतून भा-गीदार कांहींच काम करीत नाहींत हें ध्यानांत घेतलें म्हणजे त्यांस सहकारी हें नांव कसें बिलकूल लागू पडत नाहीं हें स्पष्ट दिसतें. हे भागीदार कांहीं प्रकारचें व-र्तन करितात इतकेंच म्हणतां येईल पण एकत्र काम करितात असें म्हणतां येणार नाहीं. यांना सहकारी म्ह-णावयाचें तर कर्मणुकीसाठीं वगैरे बनवलेले जे 'क्लब' किंवा कळप त्यांसहि सहकारी म्हणावें लागेल.

राशडेल एथील संचयासारखे जे संचय किंवा व-ख्वारी तीं केवळ जिन्नस वापरणारांचीं संयुक्त मंडळें होत, व तीं बनवण्यांत त्यांचा हेतु जिन्नस आपणास दुकान-दारांस नफा द्यावयास न लागतां मिळावे एवढाच दिसतो.

मध्यम वर्गाच्या किंवा कामकरीवर्गाच्या ह्या संस्थां-च्या संबंधानें हेंहि एथें सांगणें जरूर दिसतें कीं त्यांची भरभराट होण्यास कारण त्यांची सहकारी घटना नसून त्यांचा रोकडीचा व्यापार हें होय; कारण त्यामुळें भांडवल

कमी पुरून हिशेब ठेवण्याचा खर्चहि कमी लागतो. शिवाय ह्या वखारींतून माल घेणारे तेथें स्वतः जात असल्यामुळें दुकानदारांना माल घरीं पोंचविण्यास व उधारी वसूल करण्यास जो खर्च लागतो तो लागत नाहीं; आणि त्यामुळेंहि त्यांस इतर दुकानांहून जिन्नस स्वस्त दरानें विकतां येतात, व तितकी त्यांची भरभराट ज्यास्त होते.

११६. आतां खऱ्या सहकारी संस्थांचा विचार करूं. ह्या संस्थांचे घटक खरोखरच एकमेकांच्या फायद्यासाठीं एकत्र काम करीत असतात.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें ही सहकारित्वाची कल्पना फार जुनी आहे. एकंदर सहकारी चळवळीच्या पहिल्या पहिल्या अमदानींत असले कारखाने काढण्याचे निष्फळ प्रयत्न करण्यांत आले; आणि मागाहूनहि तसले प्रयत्न करण्यांत आले आहेत. पण असले शुद्ध प्रयत्न यशस्वी होत नाहींतसें दिसतें. ह्याचें कारण कमी दर्जाच्या कामकऱ्यांस वरच्या दर्जाच्या कामकऱ्यांना ज्यास्त वेतन मिळावें हें सहन होत नाहीं. तद्वतच नफ्याचा भागहि वेतनाच्या मानानें मिळावा हेंहि त्यांस योग्य वाटत नाहीं. तद्वतच डोक्याचें काम करणारांस हातानें काम करणाऱ्यांहून ज्यास्त पगार मिळावा हेंहि त्यांस सहन होत नाहीं. अशा रीतीनें त्यांचा समतोल वरचेवर बिघडतो, आणि बहुतकरून नष्ट होतो.

११७. तर मग स्वताचाच कारभार पाहणारे कामकऱ्यांचे संयोग कधींच यशस्वी व्हावयाचे नाहींत असें आपण म्हणावयाचें कीं काय? ह्यास उत्तर असें आहे

कीं वर सांगितलेल्या ज्या अडचणी त्या कदाचित् नेहमींच कायम राहतील, तथापि अगदींच टाळतां येणार नाहींत असें नाहीं, आणि दुसऱ्या कांहीं प्रकारच्या अडचणी ह्याहून ज्यास्त महत्त्वाच्या आहेत त्या कदाचित् टाळतां येतील.

औद्योगिक सहकारी मंडळ्यांचे घटक कामकरी मंडळ्यांच्या घटकांप्रमाणें ठराविक वेतन घेत असल्यामुळें त्यांच्यांहि कल्पना व विचार तसलेच असतात. आतां कामकरी मंडळ्यांचे घटक अमुक कामास अमुक मजुरी ह्या वेतनपद्धतीच्या विरुद्ध असतात, आणि तें त्यांचें करणें बरोबरहि आहे. कारण असलें काम जलद होतें असें पाहून कारखानदार मजुरीचे दर कमी करीत असतात, आणि त्यामुळें मजुरांचें अखेरीस नुकसान होतें.

पण जेथें कामकरी सहकारी तत्त्वावर एकादा कारखाना चालवीत असतील तेथें कारखान्याचे मालक तेच असल्यामुळें ठराविक कामास ठराविक मजुरी अशा रीतीनें त्यांनीं वेतन घेतल्यास त्यांत कोणाचेंच नुकसान नसून सर्वांना राहील तो नफा त्यांच्या मजुरीच्या मानानें वांटून दिल्यास न्यायच होतो; आणि कामाप्रमाणें मजुरी मिळत असली म्हणजे काम करण्यांत जसा कोणी विनाकारण आळस करीत नाहीं, तसाच एकादे वेळेस थकवा वगैरे आल्यास प्रकृति बिघडवून सर्व दिवस कामहि करावें लागत नाहीं. शिवाय कामावर देखरेख ठेवण्याचा खर्च कमी झाल्यामुळें तितका फायदा ज्यास्त वाढतो.

हा द्रव्यदृष्टीनें फायदा झाला; आतां नैतिक फायदा पहा. कामकऱ्यांमधील मत्सर नाहींसा होतो. प्रत्येकास

कामाप्रमाणें त्याच्या त्याच्या मजुरी मिळत असल्यामुळें दुसऱ्यास आपल्याहून विनाकारण ज्यास्त मजुरी मिळते असें कोणास वाटण्याचें कारण रहात नाहीं. नाईक अमक्याचा मजुरीचा दर ज्यास्त लाविती व अमक्याचा कमी लाविती असें कोणास म्हणावयास नको.

आतां जेथें कामें मोठालीं व घोंटाळ्यांचीं असून एकेकट्यानें त्याचे भाग करण्यासारखे नसतील तेथें तीं कांहीं मजूर मिळून ठरावून घेऊं शकतात. आणि अशा रीतीनें तेथेंहि वरील सर्व फायदे होऊं शकतात.

आतां असल्या ह्या व्यवस्थांचा औद्योगिक उत्क्रमणाच्या पायऱ्या ह्या दृष्टीनें विचार करतां काय म्हणतां येईल? आपल्या दृष्टीस हें अगोदर पडलेंच आहे कीं, समाज जसा उच्चतर नमुन्याचा होत जातो तसें राजकीय आणि धार्म्मिक नियमनाबरोबर औद्योगिक नियमन कमी जुलमी होत जातें. ह्या ठिकाणीं हा जुलमीपणा कमींत कमी झालेला दृष्टीस पडतो; प्रत्येक कामकरी ह्या ठिकाणीं कामाच्या संबंधानें आपला मालक असतो; आणि व्यवस्था राहण्यासाठीं बहुमतानें केलेल्या नियमांनीं तेवढा बांधलेला राहतो. अशा रीतीनें युद्धशीलतेच्या वेळची जी जुलमी सहक्रिया ती जाऊन तिच्या ऐवजीं उद्यमशीलतेच्या वेळची स्वैच्छिक सहक्रिया पूर्णपणें स्थापन होते. मालक निराळा व कामकरी निराळे अशी जी प्रस्तुतची पुष्कळ ठिकाणीं दिसणारी स्थिति त्या स्थितींत कामकऱ्याला पूर्ण स्वातंत्र्य नसतें. कारण मजुरीचे दर व कामाचे तास हे जरी ठरलेले असतात, तरी आपण वेळ गमावल्यास कामावरून दूर

करितील ही भीति असते, आणि देखरेख करणाराची नेहमीं त्याजवर नजर असते. पण प्रथम वर्णिलेल्या स्थितींत ह्या सर्व बाबतींत तो पूर्णपणें स्वतंत्र असतो.

दुसऱ्या दृष्टीनें ह्या गोष्टींकडे पाहतां असें म्हणतां येईल कीं अशा रीतीनें जन्मतःसिद्ध किंवा ठराविक स्थिति जाऊन करारी स्थिति पूर्णपणें प्राप्त होते. जों-पर्यंत कामकरी केवळ मजुरीच मिळविणारा असतो तों-पर्यंत ठराविक स्थितीचीं चिन्हें पूर्णपणें नष्ट होत नाहींत. दिवसाचे ठराविक तासपर्यंत ठराविक रकमेकरितां तो आपल्या शक्ती धन्याच्या स्वाधीन करीत असतो, आणि तोंपावेतों त्याची त्याच्यावर मालकी असते. म्हणजे, तत्पुरती त्याची स्थिति गुलामाचीच असते, आणि त्याजवर देखरेख ठेवणाराची गुलाम व्हावयाची असते. ठराविक स्थितीचा आणखी एक अवशेष त्याच्यामध्यें असा दिसत असतो कीं, 'अमुक अमुक मजुरी मिळविणारा मजूर' असे त्याचे व इतरांचे वर्ग लागत असतात व त्या वर्गाचा जो मजुरीचा दर असेल तो त्यास मिळत असतो. पण वर सांगितलेल्या स्थितींत करारी स्थिति पूर्णपणें स्थापन होते. कारण, प्रत्येकजण ठराविक मजुरीस ठराविक काम करण्याचें स्वतः होऊन कबूल करितो, आणि त्याला कोणी हुकूम करीत नाहीं, किंवा त्याचा वर्ग पाडीत नाहीं. सारांश, त्याचा सर्व व्यवहार आणि प्रत्येक व्यवहार कराराप्रमाणें चालत असतो.

ह्या व्यवस्थेपासून आणखी एक गोष्ट साध्य होते. फल गुणानुरूप मिळावें हा जो न्यायविषयक नियम त्याशीं ही व्यवस्था अनुरूप आहे. कारण ह्या व्यवस्थेंत जो

जशी मेहनत करील तसें त्यास उत्पन्न होतं असतें. तसें गुलामगिरीच्या स्थितींत, किंवा अर्धवट गुलामगिरीच्या स्थितींत किंवा सध्यांच्या मजुरांच्या स्थितींत होत नाहीं.

पण ह्या ठिकाणीं ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, वरील हेतु साध्य होण्यास शील चांगलें असलें पाहिजे. समाजाचे उच्चतर नमुने उत्पन्न होण्यास स्वभावाचे उच्चतर नमुने बनले पाहिजेत हें ह्या व पूर्वीच्या ग्रंथांतून अनेक ठिकाणीं अनेक तऱ्हांनीं दाखविलेलेंच आहे; तेव्हां त्यावरून सहजच असा गर्भितार्थ निघतो कीं, उत्तम माणसें असतील तरच उत्तम औद्योगिक संस्था स्थापन होतील. तरी एकंदरींत मालक व मजूर एकच असलेल्या कारखान्यांत उत्पन्न ज्यास्त आणि देखरेखीचा खर्च कमी असल्यामुळें ह्या पद्धतीची वाढ झपाट्यानें होण्याचा संभव आहे.

प्रकरण बेविसावें

समाईक समाजपद्धति

११८. पुष्कळ नाहीं तरी कांहीं समाईक समाजपद्धतिवाल्यांस ही गोष्ट माहीत आहे कीं, ते ज्या पद्धतीनें लोकांनीं रहावें म्हणून म्हणतात तशासारख्या पद्धति सुधारणेच्या प्रारंभींच्या पायऱ्यांवर अस्तित्वांत होत्या, आणि हल्लींहि कांहीं मागसलेल्या व पुष्कळ असुधारलेल्या लोकांत त्या दृष्टीस पडतात. ज्ञातिशासनावरील तेराव्या प्रकरणांत तांबडे लोक, हिंदूलोक आणि पौर्वात्य यूरोपांतील कांहीं मागसलेले लोक ह्यांच्यांतील समाईकरीतीनें राहण्याचीं उदाहरणें दिलीं होतीं. ह्या समाईक राहणीपासून फायदे काय होतात आणि नुकसान काय होतें हें आणखी उदाहरणें दिल्यास लक्षांत येणार आहे. उदाहरणार्थ, उत्तर अमेरिकेंतील मूळच्या लोकांविषयीं **मेजर पॉवेल** असें म्हणतो कीं. त्यांचे समाज नात्याच्या आधारावर बनलेले असत. त्यांच्यांत बहुतेक सर्व मालमत्ता सगळ्या ज्ञातीची किंवा टोळींची असे. त्यांनीं मिळविलेलें खाद्य देखील ते सारखें वांटून घेत असत. ह्याच्या योगानें अर्थात् उद्योग्याचें नुकसान होई, आळसास उत्तेजन मिळे आणि काटकसरहि कमी होई. ह्या पद्धतीचा आणखी एक परिणाम असा होई कीं, जातींत कोण कितपत हुशार किंवा कुशल किंवा उद्योगी आहे इकडे सर्वांचें लक्ष असे. जातीला जो सर्वांत ज्यास्त जिन्नस मिळवून देईल त्याचें महत्त्व तीस

सर्वांत ज्यास्त असे. म्हणून हुशार पारधी किंवा मासे-माऱ्या ह्यास त्यांच्यांत विशेष मान मिळे; आणि जी स्त्री ज्यास्त फळें किंवा मुळें किंवा वीं गोळा करून आणील किंवा शेत चांगलें नांगरील तीस सर्वांत ज्यास्त मान मिळे.

यूरोपांतील बाल्कन डोंगरांतील कांहीं रहिवाशांत असलेच विशेष आढळून येतात किंवा येत यावरून ते विशिष्ट स्थितींतल्या लोकांत एकत्र असणें हें स्वाभाविक आहे असें दिसून येतें. 'येत' असें म्हणण्याचें कारण असें कीं, त्यांच्यांतील नेहमींची लढाई जशी कमी होत चालली आहे तसा हा समाईकपणाहि त्यांच्यांतून जात चालला आहे. कारण लढाई असली म्हणजे इतर बाबतींत समाजघटकांनीं सर्व समाजाच्या कह्यांत राहणें जसें जरूर असतें तसें पदार्थ उत्पन्न करणें आणि त्यांचा उपभोग घेणें ह्या बाबतींतहि असतें.

एवंच समाज युद्धशील असेल तोंपावेतों समाईक समाजपद्धति समाजास स्वाभाविक असते; आणि समाज जसा ज्यास्त ज्यास्त उद्यमशील होत जाईल तशी ती अयोग्य बनूं लागते.

११९. सर्वत्र बंधुत्वाची स्थिति असावी ही कल्पना इतकी मोहक आहे, आणि हल्लींची जीवनार्थ परस्पर कलहाची स्थिति इतकी दुःखमय आहे, कीं तिच्यांतून सुटून पहिल्या स्थितीस पावण्याची खटपट माणसांनीं करावी हें अगदीं स्वाभाविक आहे, किंबहुना अनिवार्यच आहे. आपल्या सभोवतीं जीं भयंकर स्थितिवैषम्यें सर्वत्र दृष्टीस पडतात तीं पाहून ह्या वैषम्यांपासून दुःखें सोसणारे, आणि त्यांच्याबद्दल कळव-

ळा करणारे; दोघेहि त्यांच्या समजुतींनं सम अशी जी सामाजिक स्थिति ती स्थापण्याचा यत्न करितात, हें साहाजिकच आहे. शहरांत, आपल्या गिरणींत काम करणाऱ्या मजुरांकडे दुलर्क्ष करणाऱ्या गिरणीवाल्यांकडे पाहून त्यांच्या मनांत स्नेहभाव उत्पन्न होत नाहीं; आणि खेडेगांवांत, बड्या सरदाराची बायको गाडींतून बसून चालेली पाहून नांगऱ्यांच्या मनांत आपली गरिबीची व कष्टमय स्थिति आणि जमीनदाराची श्रीमंतीची व चैनीची स्थिति ह्यांतील वैषम्य पाहून राग उत्पन्न झाल्यास त्यांतहि नवल नाहीं. कधीं कधीं क्लबांतून आरामखुर्चीवर पडून चैन करणाऱ्या व कधीं कधीं हातांत बंदूक घेऊन रानांतून शिकार करीत फिरणाऱ्या निरुपयोगी सुखवस्तु प्राण्याकडे पाहून आंग मोडून काम करणाऱ्या सुतारास किंवा लोहारास, 'पात्रता कमी तितकी चैन ज्यास्ती' अशी जी ही स्थिति तिला धिःकार असो असें वाटल्यास, आणि ही समाजस्थिति बदलून नवी स्थापना करण्याची इच्छा त्याचे मनांत आल्यास, त्यांतहि नवल नाहीं.

अशा प्रकारची नवी स्थिति स्थापन करण्यासाठीं किती अनेक यत्न झालेले आहेत आणि किती अनेक यत्न फसलेले आहेत हें एथं सांगण्याची जरूरी नाहीं. त्यापैकीं अगदीं अर्वाचीन असें एकच उदाहरण देऊं. ते दक्षिण आस्ट्रेलियांतील ग्रामवसाहतींचें होय. ह्यांची स्थापना सरकारानें सरकारी पैशानें केली होती. त्यांची चवकशी करण्याकरितां नुकतेंच एक कमिशन नेमिलें

होतें. त्यांच्यापुढें एका वसाहतींतील कांहींजणांनीं दिलेल्या जबान्यांचा एथें सारांश देतों.

हॅरिबट म्हणालाः—" मला वाटतें मी एथें आलों तेव्हां फार करून काम करीत असें; पण हल्लीं माझे विचार बदलले आहेत, आणि मला वाटतें इतरांचेहि बदलले आहेत. ते म्हणतात एवढ्या मोठ्या कुटुंबाकरितां आपण काम करूं नये. आम्ही लोक समाईक सामाजिक स्थितीस योग्य नाहीं. आम्हांला तसलें शिक्षण मिळालेलें नाहीं. मी आलों तेव्हां समाईक समाजवाला होतों; पण मला असा अनुभव आला कीं, असल्या माणसास एथें राहणें अशक्य आहे. एथील एकंदर पद्धति बिघडलेली दिसते. हे लोक सहक्रिया करण्यास देखील अयोग्य दिसतात; मग समाईकरीतीनें कसले राहणार ? माझी अशी कल्पना होती कीं, आपण बंधुत्वाच्या प्रेमानें एथें राहूं शकूं. "

फ्रान्सिस पीटर शेली म्हणालाः—" असल्या वसाहतींत मोठाल्या अवस्था न समजतां उत्पन्न होऊं शकतात. कधीं कधीं असा प्रसंग येतो कीं, एकादा माणूस पुष्कळ काम करीत असूनहि त्यानें सुचविलेली एकादी सुधारणा त्याच्याहून कमी काम करणारे लोक बहुमत करून हाणून पाडतात; किंवा इतरांना ज्या सवलती ते देतात ते त्या अशा माणसाला देत नाहींत, आणि अशा रीतीनें त्यास जीव नकोसा करितात. धनिकांप्रमाणें एथील लोकांनाहि अधिकार व पदवी यांची हाव आहे; फरक इतकाच कीं त्याच्यापेक्षां हे लोक ज्यास्त आपलपोटे आहेत.

टामस. मायर म्हणालाः—" माझें असें मत आहे कीं, हल्लींची समाईकरीतीनें राहण्याची पद्धति फार दिवस टिकणार नाहीं. १०० पौंड आगाऊ देण्याचें ठरविलें तरी टिकणार नाहीं. याचें कारण आमच्यांत असावी तितकी एकी नाहीं. आह्मी एकमतानें काम करीत नाहीं. त्यामुळें एकमतानें झालें असतें त्याहून निम्मेंहि काम झालेलें नाहीं. दोन वर्षांपूर्वी समाईकपद्धतीचा मी सर्वांत ज्यास्त अभिमानानी होतों; पण आतां ती अगदीं फुंकट आहे अशी माझी खात्री झाली आहे. "

विलियम बेट्स् म्हणालाः-माझें मत विभक्त राहणीच चांगली असें झालें आहे. मी एथें आलों तेव्हां माझें मत समाईकपद्धतीस अनुकूल होतें. जमीन सर्व लोकांची मिळून असावी असें मी म्हणत असें. मला वाटत होतें कीं, आपण एथें भाऊबहिणींप्रमाणें राहूं आणि वरचा स्वर्ग खालीं आणूं. पण एथील गळेकापूपणा पाहून माझें मत अगदीं बदललें आहे. एथें जो सर्वांत अधिक मेहनत करील त्यास त्याबद्दल कांहींच फायदा मिळत नाहीं. "

पॉट्रिक जॉन कॉन्वे नांवाचा एका वसाहतीचा अध्यक्ष म्हणालाः—" मला वाटतें वसाहतवाले जर पृथक् पृथक् आपआपल्यासाठीं खपतील तर वसाहत उदयास येईल. जमीन खरोखरच चांगली आहे; आणि पाण्याचा पुरवठा असला म्हणजे तिच्यांत पाहिजे तें उत्पन्न होईल. पण वसाहतवाले समाईक काम करूं शकत नाहींत; हमरीतुमरीवर येतात आणि मारामा-

रीहि करितात; मलाहि मार खाण्याचा प्रसंग आलेला आहे; आणि मार देणारास कांहीं शिक्षा झालेली नाहीं.''

बहुतेक सर्व साक्षीदारांचा बोलण्याचा भाव असाच दिसतो. मतभेद, दांडगाई, आळस आणि बंडाई हींच त्यांच्या सांगण्यांत येतात; आणि ते असें म्हणतात कीं समाईक समाज चांगला असा जो आह्मांस भ्रम होता तो आतां चट् निघून गेला आहे.

आतां अशा ह्या गोष्टी चुका आणि अव्यवस्था ह्यांमुळें होतात असें समाईकपद्धतीचे वाली म्हणतात. माणसांची स्वभावघटना हल्लींसारखी आहे तोंपावेतों ही पद्धति यशस्वी व्हावयाची नाहीं ही गोष्ट ते बहुधा कबूल करीत नाहींत; आणि जे कोणी कबूल करितात ते म्हणतात कीं एक कोणी तरी चांगला जोरदार असा अधिकारी जर अशा वसाहतींवर असेल तर त्या नीट चालतील, आणि नेहमींच चालतील. हें त्यांचें म्हणणें कसें अजीबात चुकतें हें आतां पाहूं.

१२०. प्रस्तुत शास्त्राच्या ''गृहसंस्था'' ह्या भागांत उपजातिजीविताचा सामान्य नियम असा दाखविला होता कीं, जीवित कोवळें असेल तोंपावेतों '' पात्रता जितकी कमी तितकी बडदास्त ज्यास्त '' हा नियम त्यास लागू करावा लागतो. आणि जीवित प्रौढ झालें म्हणजे पात्रता आणि फलप्राप्ति हीं समप्रमाणांत ठेवावीं लागतात. उपजातीप्रमाणेंच समाजास जर टिकाव धरून रहावयाचें असेल तर ह्या दोन परस्परविरुद्ध तत्त्वांस अनुसरूनच त्यानें वागलें पाहिजे. समाजाचा कायदा कुटुंबास लावून मुलांस अर्भकावस्थेपासून तीं मेहनत करतील

त्या मानानें खाऊं घातल्यास सर्व मुलें मरून जाऊन समाजच नष्ट होईल. बरें, समाजास कुटुंबाचा कायदा लावून पोटासाठीं समाजघटक जितकी कमी मेहनत करतील तितका उत्पादित वस्तूंचा भाग देऊं लागल्यास समाजांतील अत्यंत योग्य माणसांची संख्या कमी होऊन आणि अत्यन्त अयोग्य व्यक्तींची वाढून समाजास कीड लागेल. आतां समाईकसमाजपद्धतीवाल्यांच्या मतांकडे पाहतां कुटुंबजीविताचा नीतिसिद्धान्त आणि इतर जीविताचा नीतिसिद्धान्त ह्यांमधील ह्या भेदाकडे ते कमजास्त प्रमाणानें दुर्लक्ष करितात असें दिसतें. त्यांचा उद्देश कमजास्त प्रमाणानें किंवा सर्वस्वीं कुटुंबव्यवस्थेचा कायदा सर्व समाजव्यवस्थेस लावण्याचा दिसतो. त्यांच्या म्हणण्याचा इत्यर्थ, प्रत्येकापासून त्याच्या शक्तीप्रमाणें मेहनत घ्यावी, आणि त्याच्या जरूरीप्रमाणें त्यास खावयास घालावें, असा निघतो.

स्वाभाविक कार्यकारणपरंपरेची जाणीव अल्पसुशिक्षित लोकांत अंधकच आहे, आणि अत्यन्त सुशिक्षित लोकांतहि फारच अपुरी आहे. एका कारणापासून अनेक कार्यें उत्पन्न होतात, आणि हें प्रत्येक कार्य दुसऱ्या अनेक कार्यांचें कारण बनतें, ही वर्धमान कार्यपरंपरा त्यांच्या लक्षांत येत नाहीं. पिढ्यानुपिढ्या अधिक योग्य माणसांचें नुकसान करून कमी योग्य माणसांना पोषिल्यापासून काय परिणाम होईल असा प्रश्न समाईक समाजिस्ट आपल्यास करीत नाहींत. कनिष्ठांच्या मुलांचें यथायोग्य संगोपन व्हावें म्हणून श्रेष्ठांवर त्यांचें नेहमीं ओझें घातल्यानें त्यांच्या (श्रेष्ठ) मुलां-

च्या संगोपनांत व्यत्यय आल्यास मानवजात हळू हळू दुर्बल होत जाईल ही गोष्ट त्याच्या नजरेस आणून दिली तरी ती तो लक्षांत घेत नाहीं. हल्लींचीं दुःखें नाहींशीं करण्याची जी त्यास आशा वाटते तिनं त्याचें मन इतकें भरून जातें कीं त्याच्या योजनेनं भविष्यकाळीं हल्लींच्याहूनहि ज्यास्त दुःखें उत्पन्न होतील ह्या विचारास त्याच्या मनांत जागाच रहात नाहीं.

आतां कमी योग्यतेच्या माणसास त्याच्या कमी योग्यतेमुळें जीं दुःखें भोगावीं लागतात तीं ज्यास्त योग्यतेच्या व्यक्तींना त्यांच्याबद्दल कळवळा येऊन त्यांनीं आपखुशीनं कमी केल्यास त्यापासून एकंदरींत फायदाच होईल; कारण तसें करतांना आपल्या मुलांच्या संवर्धनांत कमीपणा यावा इतकी झीज ते बहुधा सोसणार नाहींत. पण जे लोक समाज या नात्यानेंच योग्यता आणि फलप्राप्ति ह्यांमधील स्वाभाविक संबंध नाहींसा करूं पाहतील ते लवकरच आपल्यासच नाहींसें करून घेतील. जीवितव्यापाराला अयोग्य अशा लोकांची संख्या वाढून त्यांना हळू हळू होणाऱ्या क्षयाच्या व्यथा भोगाव्या लागतील, किंवा उत्तमांचें नुकसान करून कनिष्ठांचें संवर्धन करण्याचा मूर्खपणाचा मार्ग ज्यांनीं स्वीकारिलेला नाहीं असे कोणी अन्य लोक येऊन त्यांचा पाडाव करतील.

१२१. जीवशास्त्रदृष्ट्या समाईक समाजिष्टांचें मत जसें अगदीं घातक आहे तसें मानसशास्त्रदृष्ट्या अंगदीं मूर्खपणाचें आहे. कारण माणसाच्या मनाची घटना त्यास अनुकूल अशी मुळींच नाहीं.

त्यांनां पाहिजे तसा समाज बनण्यास तो अशा जोरदार सहानुभूतीच्या लोकांचा बनलेला असला पाहिजे कीं, त्यांच्यांतील जे लोक आपल्या ज्यास्त सामर्थ्यांनीं ज्यास्त फायदे करून घेत असतील ते त्यांपैकीं त्यांचा खर्च भागून उरेल तो भाग दुसऱ्यांस देण्यास तयार असावेत. त्यांनीं आनंदानें अशा तत्त्वास अनुसरून वागलें पाहिजे कीं, त्यांच्या श्रमाचें त्यांस योग्य फळ मिळूं नये,. तर त्यांच्या इतकी मेहनत जे करीत नसतील त्यांस त्यांची स्थिति यांच्याइतकी चांगली होईल इतका त्या फळाचा भाग यांनीं त्यांस द्यावा. इतरांहून ज्यास्त सामर्थ्याचा द्रव्यदृष्टीनें कोणास फायदा तर होऊं नये, उलट निरर्थक शरीर किंवा मेंदू झिजविल्याचें नुकसान मात्र व्हावें; म्हणजे त्यांची इतरांबद्दल सहानुभूति इतकी बळकट असावयाची कीं, त्यांनीं जन्मभर आत्मत्याग करीत रहावयाचें. आतां दुसऱ्यांचा फायदा करून देणारा ह्या दृष्टीनें व्यक्तीचें शील जर असें असलें पाहिजे, तर दुसऱ्याकडून फायदा करून घेणारा ह्या दृष्टीनें तें कसें असलें पाहिजे हें पाहूं.

आतां व्यक्तीव्यक्तींच्या नैतिक स्वभावांत वारीकसारीक भेद असले तरी सर्वांची सामान्य नैतिक घटना एकच असली पाहिजे हें उघडच आहे. ज्याचें शारिरीक किंवा मानसिक सामर्थ्य कमी असेल त्याच्या मनोवृत्तीहि सामान्यतः कमी दर्जाच्याच असतील अशी कल्पना आपणास करतां येत नाहीं. आपणास अशीच कल्पना केली पाहिजे कीं अधिक समर्थाप्रमाणें कमी समर्थहि अत्यन्त सहानुभूतियुक्त आहे. असें जर आहे तर अ-

धिक समर्थापासून नेहमीं भिक्षा घेणारे जे कमी समर्थ त्यांच्या मनाची स्थिति कशी असली पाहिजे? आपणास असें गृहीत करावें लागतें कीं प्रत्येकाच्या मनांत इतरांकरितां नेहमीं फुकट मेहनत करावी असा मनोविकार असून शिवाय आपल्याकरितां इतरांनीं नेहमीं आपलें नुकसान करून घ्यावें असाहि मनोविकार आहे. म्हणजे, प्रत्येकाचें शील एकापक्षीं इतकें उदात्त असलें पाहिजे कीं, तेणेंकरून तो इतरांकरितां सारखा आत्मत्याग करीत रहावा, आणि दुसऱ्या पक्षीं इतकें अनुदात्त असलें पाहिजे कीं तेणेंकरून त्यानें इतरांस आपल्याकरितां नेहमीं स्वार्थत्याग करूं द्यावा. हे दोन विशेष परस्परविरुद्ध आहेत; आणि म्हणून त्यांमध्यें अंतर्भूत होणारी मनोघटना अशक्य अशी आहे.

मुलांवरची ममता ही गोष्ट ध्यानांत घेतली म्हणजे ही अशक्यता ज्यास्तच स्पष्ट होते. कुटुंबांतल्या कुटुंबांत आत्मत्याग करण्यास सहानुभूतीखेरीज संततिप्रेम हें एक प्रेरक कारण होत असतें, आणि त्यामुळें आपल्या मेहनतीचा बराच भाग संततीस देण्यास अडचण वाटत नाहीं इतकेंच नाहीं, तर उलट तसें करणें सुखकारक होतें. पण कुटुंबांतील माणसांसाठीं केलेला हा आत्मत्याग इतर माणसांसाठीं करावयाच्या आत्मत्यागाहून भिन्न आहे. म्हणून समाईक समाजिस्ट म्हणतात तसली सारखी साधन-वांटणी करण्यास माणसाची नैतिक स्वभावघटना अशा प्रकारची असली पाहिजे कीं कनिष्ठाच्या संततीस मदत करण्यासाठीं श्रेष्ठ आपल्या संततीच्या पोटास चिमटा घेण्यास तयार व्हावा. म्हणजे

त्यानें आपल्या शेजाऱ्यावरच आपल्या इतकें प्रेम केलें पाहिजे एवढेंच नाहीं, तर आपल्या शेजाऱ्याच्या मुलांवर आपल्या मुलांइतकेंच प्रेम केलें पाहिजे. म्हणजे आईबाप या नात्यानें त्याची जी उपजतबुद्धि ती नष्ट झाली पाहिजे, आणि सर्व मुलें त्यास सारखीं वाटलीं पाहिजेत.

समाईक समाजिष्ट ह्याची तोड अशी काढितात कीं, आमच्या पद्धतीप्रमाणें मुलांची आईबापांनीं काळजी न करतां सरकारानेंच करावयाची; म्हणजे, मुलांचें संगोपन करण्याची जी सृष्टीची पद्धति तिच्याऐवजीं तिच्याहून ज्यास्त चांगली पद्धति अमलांत आणावयाची. आतां अत्यन्त हलक्या जीवापासून तों अत्यन्त उच्च जीवापर्यंत सृष्टीची पद्धति अशी आहे कीं, जीं आईबापें मुलास जन्म देतात त्यांच्यावर त्यांची काळजी संपवावयाची; ही काळजी हलक्या प्राण्याचे ठिकाणीं अल्प व न लक्षांत येण्यासारखी अशी असते, पण पुढें ती हळू हळू ज्यास्त ज्यास्त ठळक होत जाते, आणि शेवटीं अत्युच्च प्राण्यांकडे जसजसें जावें तसतसे त्यांचे एतद्विषयक मनोविकार ज्यास्त ज्यास्त प्रबळ झालेले दिसून, ते आपलीं जीवितें आपल्या संततीच्या संगोपनार्थ ज्यास्त ज्यास्त खर्च करीत आहेत असें आढळून येतें. पण श्रम व फलप्राप्ति ह्यांमधील स्वाभाविक संबंध तोडण्यास जसे समाईक समाजिष्ट चाहतात तसेच आईबापांच्या उपजतबुद्धीनें होणाऱ्या कृती आणि संततीचें संगोपन ह्यामधीलहि स्वाभाविक संबंध ते तोडण्यासच चाहतात. ज्या दोन महानियमांपैकीं एकाच्याहि अभावीं

सेंद्रिय उत्क्रान्ति अशक्यच झाली असती ते दोन्ही नियम रद्द करावे असें यांच्या मनांत आहे.

१२२. आतां आपल्या सभोंवतीं जी वास्तविक मानवस्वभावघटना दृष्टीस पडते तिच्या दृष्टीनें पाहतां समाईक समाजपद्धति ज्यास्तच वेडेपणाची दिसते उदाहरणार्थ, जे हे समाईक समाज स्थापून एकमेकांच्या हिताहिताबद्दल इतकी काळजी वाहणार म्हणून समाईक समाजिस्ट आशा करितात त्यांच्या कृतींकडे तरी पहा.

पहिलें उदाहरण अमेरिकेचें घेऊं. अमेरिकेंत संयुक्त संस्थानांत कारागीर, खाणवाले, इत्यादि इतर कारागिरांशीं वगैरे लढाया करून त्यांस कमी मजुरीनें काम देत नाहींत. ते मालमत्तेची नासधूस करितात आणि ती जाळतात, विरोध्यांना आडमार्गांत पकडून ठार करितात, आणि जे त्यांना विरोध करूं पाहतील त्यांस विष घालूं पाहतात. न्यायाधीश पार्कर म्हणतो कीं, सरासरी रोजचा तीन माणसांस अशा रीतीनें मार खावा लागतो आणि गेल्या पांच वर्षांत संयुक्त संस्थानांत मनुष्यवधाची दररोजची संख्या बाराची तिसावर गेली आहे. दक्षिण संस्थानांतून तर असे हे मनुष्यवध भरकोर्टांत दे-खिल होतात. शिवाय, न्यूयार्कमधील पोलीस लांचखाऊ असून पैसे खाऊन अपराध्यांस सोडून देतात म्हणून प्रसिद्धि आहे. शिवाय जो नीतीकडे विशेष लक्ष न देतां धंद्यांत चांगली कमाई करील त्याची ' हुशार ' म्हणून ख्याति होते आणि असले हे आपलपोटे लोक परोपकारी बनतील म्हणून अपेक्षा करितात !

आतां सर्वांत ज्यास्त समाईक समाजिष्ट ज्यांत आ-

हेत अशा जर्मनीकडे पहा. तेथें विद्यार्थी तरवारींनीं खेळतांना एकमेकांच्या तोंडांवर वार करितात, आणि त्याबद्दल त्यांचा बादशहा त्यांची प्रशंसा करितो. द्वंद्वयुद्ध करणें कायद्यानें व धर्मानें निषिद्ध असून लष्करीखात्यांतें तें सर्वमान्य आहे; तें इतकें कीं, जो कोणी द्वंद्वयुद्धास उभा राहणार नाहीं त्यास सैन्यांतून हाकलून लावितात इतकेंच नव्हे तर एकाद्यानें एकाद्यावर एकादा आरोप आणिलेला असून तो कोर्टांत खोटा ठरला तर त्या खोटा आरोप आणणारास आरोपितानें द्वंद्वयुद्धास आव्हान केलेंच पाहिजे. अशा या देशांत लोक इतरांसाठीं आत्मत्याग करण्यास तयार होतील म्हणून समजतात.

आतां हिंदुस्थानांतील कांहीं डोंगरी लोक क्षमा करण्याचा दिमाख न करतां खरोखरच करितात; किंवा पापुअन लोकांतील नाईक गरीब लोक संकटांत पडले म्हणजे त्यांस स्वताच्या पैशानें मदत करितात; अशा लोकांत समाईक समाजपद्धति चालेल असें म्हटलें तर तें अगदींच वेडेपणाचें होणार नाहीं. पण जे लोक शेजाऱ्यावर आपल्या इतकीच प्रीति करावयास सांगणाऱ्या धर्माचे म्हणून म्हणतात, पण आपल्या लोकांस लुटतात व दुसऱ्यांस ठार करितात, त्या लोकांत ही पद्धति चालेल. अशी अपेक्षा करणें हें अगदीं वेडेपणाचें होय.

१२३. समाईक समाजपद्धतिवाले व त्यांचे विरोधी ह्यांच्यामध्यें जो सामान्यवादाचा प्रश्न आहे त्यास अगदीं अंतिम स्वरूप दिल्यास तो श्रमनियमनाच्या पद्धतीचा प्रश्न दिसतो. ह्या नियमनाचा गत प्रकरणांतून ऐतिहासिकदृष्ट्या विचार केलेला आहे; उदाहरणार्थ,

पितृनियमन, पितृशास्तृनियमन, ज्ञातिनियमन, जमात-नियमन, दासनियमन, आणि अर्धवटरीत्या किंवा पूर्ण-पणें स्वतंत्र अशा व्यवस्थांखालीं होणारें नियमन. आपण हलक्या दर्जाच्या समाजांकडून वरच्या दर्जाच्या समाजांकडे जसे जातों त्याप्रमाणें राजकीय, धार्मिक आणि सामाजिक नियमनांचें जबरीचें स्वरूप एकसमयावच्छेदेंकरून कमी होत जातें, हें प्रारंभींच सांगितलेलें जें सत्य त्याचें ह्या प्रकरणांतून विस्तारानें दृष्टान्तीकरण झालेलें आहे; तें इतकें कीं, हल्लींची जी कामकऱ्यांचें नियमन करण्याची पद्धति आहे तिच्यांत जबरीचा भाग अगदीं कमी झालेला आहे. हल्लीं कामकऱ्यावर परिस्थितीची जबरी जरी अगदीं निर्दयपणानें चालते, आणि त्यास जरी अगदीं कठीण अशा अटी कबूल कराव्या लागतात, तरी ह्या अटी मान्य करण्याची जबरी कोणी धनी त्याजवर करीत नाहीं.

पण श्रमनियमनाच्या जुन्या पद्धतींपासून उत्पन्न होणारीं दुःखें हल्लींच्या पिढीच्या अनुभवास येत नसल्यामुळें तीं ते विसरले आहेत; आणि नवीन पद्धतीपासून होणारीं दुःखें मात्र त्यांस फार झोंबतात; म्हणून त्यांस नवीच पद्धति सुरू करावीसें वाटतें; पण ती पद्धति म्हटली म्हणजे जुनीचेंच एक भावंड आहे. पूर्वींची जी जन्मतःसिद्ध स्थिति ती व्यक्तिरूप मालकांच्या अमदानींत जिवंत करण्याच्या ऐवजीं समाजरूप मालकाच्या अधिकारांत हे लोक जिवंत करूं पाहत आहेत. ह्यापुढें व्यक्तींची स्वतावर मालकी न राहतां, आणि त्यांच्या सामर्थ्यांचा त्यांस अत्यन्त फायदेशीर असा उपयोग

करावयास न मिळतां, त्यांच्यावर राष्ट्राची मालकी चालावयाची आहे, आणि राष्ट्रानें त्यांचें पोषण करून त्यांच्याकडून मेहनत करून घ्यावयाची आहे. हें सर्व करण्यास मोठें आणि संकीर्ण असें अधिकारी-मंडळ लागेल; म्हणजे, लहान समूहांचे नियामक, त्यांचे नियामक, अशी एक परंपरा उत्पन्न होणार, आणि त्या सर्वांवर एक बडा नियामक किंवा नियामक-मंडळ उत्पन्न होणार. आतां ह्या सगळ्या नियामकांचा पगार कामकऱ्यांनीं दिला पाहिजे हें उघडच आहे; पण त्याबद्दल लोकांची अशी कल्पना आहे कीं, हल्लींचे मालक आणि त्यांच्या हाताखालचे लोक जेवढा पैसा घेतात त्याहून ह्या पगाराची रक्कम नेहमीं कमी असेल, आणि ह्या लोकांच्या हुकमांपेक्षां ह्या अधिकाऱ्यांचे हुकूम ज्यास्त सह्य असतील.

पण वास्तविकरीत्या पाहतां अशा प्रकारची रचना ही अगदीं सैन्याच्या रचनेसारखी आहे. ही दिवाणी रेजिमेंटी व्यवस्था, आणि ती लष्करी रेजिमेंटी व्यवस्था. कारण दोहोंमध्यें अंकितपणा अगदीं सारखा आहे; एकांत औद्योगिक अंकितभाव आणि दुसऱ्यांत लष्करी अंकितभाव. दोन्ही ठिकाणीं एकच नियम लागू आहे; तो हा कीं, आपलें नेमिलेलें काम करा आणि आपली शिधोरी घ्या. लढवय्या घटनेप्रमाणेंच औद्योगिक घटनेमध्यें शिस्त रहाण्यासाठीं आणि काम चांगलें होण्यासाठीं आज्ञाधारकपणाची सारखीच जरूरी आहे; आणि तो कायम रहाण्याकरितां जरूर तितका कडकपणा दाखविलाच पाहिजे. लहान समाईक समाज न चालण्यास जी स्वार्थबुद्धि कारण होते ती हे निरनिराळ्या

पायऱ्यांवरील निरनिराळे नियामक अधिकारपूर्वक आणि जबरीनें नियंत्रित करीत असल्यामुळें आळस, निष्काळजी, तंटे, भांडणें, हीं बंद होऊन काम चांगलें होईल. पण ह्या नियामकांचें नियमन कोण करणार ह्या प्रश्नास समाधानकारक उत्तर मिळत नाहीं. ह्या मंडळाच्या हातीं सर्व जमीन, सर्व भांडवल, सर्व रस्ते, गाड्या व बोटी असल्यामुळें आणि फौज व पोलिस हींहि असल्यामुळें, आणि त्यांचीहि स्वार्थबुद्धि सामान्यतः कामकऱ्यांसारखीच असल्यामुळें ते कामकऱ्यांचें नुकसान करून आपला फायदा करून घेणार. आतां कोणी म्हणेल कीं, हे सर्व अधिकारी कामकऱ्यांनींच निवडलेले असल्यामुळें असें कसें होईल ? तर ह्यास असें उत्तर आहे कीं, मोठ्या अव्यवस्थित मंडळाला लहानशा व्यवस्थित मंडळापुढें कांहीं करतां येत नाहीं असा नेहमींचाच अनुभव आहे. अशा स्थितींत हे नवे अधिकारी-वर्ग उत्पन्न केलेल्या जिनसांचा ज्यास्त ज्यास्त भाग घेऊं लागतील, ते कामकऱ्यांपासून ज्यास्त ज्यास्त विभक्त होऊं लागतील, आणि ज्यास्त ज्यास्त मोठेपणा धारण करूं लागतील. अशा रीतीनें एक नवा सरदारवर्ग उत्पन्न होऊन कामकरीवर्गास त्यांच्यासाठीं खपावें लागेल; आणि हा सरदारवर्ग एकमतानें वागणारा असल्यामुळें पूर्वींच्या कोणत्याहि सरदारवर्गापेक्षां ज्यास्त अधिकार चालवूं लागेल.

आतां हें उघडच आहे कीं, समाईकसमाजिष्टांच्या ह्या भावी परिणामांपैकीं एकहि लक्षांत यावयाचा नाहीं. एकाद्या धर्माच्या वेड्या अभिमान्यास त्याच्या धर्मांतील

अत्यन्त ढोबळ व्यंग दाखविलें तरी, आणि तें तसें नाहीं असें दाखविण्याचें त्याच्यापाशीं साधन नसलें तरी, पुढें मागें तसें साधन प्राप्त होईल अशी जशी त्यास खात्री वाटते; किंवा, एखाद्या स्त्रीवर आसक्त झालेल्या माणसास तिचे दोष दाखविले तरी त्यांचा परिणाम तिच्याशीं लग्न करून एकत्र राहिल्यावर काय होईल हें तो जसा पहात बसत नाहीं; तद्वत् समाईक समाजिष्ट आपल्या पद्धतीवर जणूं काय आसक्त झालेला असल्यामुळें, तिच्या विरुद्ध टीकेकडे तो लक्ष देणार नाहीं, किंवा तिला महत्त्वहि देणार नाहीं. समाजघटनेचीं स्वरूपें माणसाच्या स्वभावघटनेवर अवलंबून असतात, आणि म्हणून त्यांच्या स्वभावांत सुधारणा होईल तशीच तीं रूपें सुधारत जातील ह्याबद्दल त्यास कितीहि उदाहरणें दिलीं तरी त्याची खात्री होणार नाहीं. आपस्वार्थी लोकांनीं अस्वार्थपर वागावें अशी कवाईत त्यांच्यावर करतां येईल, म्हणजे, चांगलेपणाशिवाय चांगलेपणाचे परिणाम उत्पन्न होतील, अशी आशा तो नेहमी करीत राहील. कारण अनुदात्त स्वभावांतून उदात्त कृती काढील असा एक सामाजिक किमया आहे. असा त्यास पूर्ण भरंवसा आहे.

प्रकरण तेविसावें

निकट भावी स्थिति

१२४. वास्तविकरीत्या पाहतां गेलीं दोन प्रकरणें उद्यमसंस्थांच्या इतिहासांत येत नाहींत; कारण त्यांतील एका प्रकरणांत केवळ प्रयोगावस्थेंत असलेल्या संस्थांचा विचार केलेला आहे, आणि दुसऱ्यांत केवळ संकल्पित संस्थांचा विचार केलेला आहे. पण **साहेब** म्हणतात, सहक्रिया आणि समाईक समाजस्थिति ह्यांची लोकांत इतकी चर्चा हल्लीं चालते कीं त्यांजकडे मुळींच दुर्लक्ष करणें योग्य दिसलें नाहीं.

प्रस्तुत प्रकरणांत, औद्योगिक उत्क्रमणाच्या ह्याच्या पेक्षांहि ज्यास्त बाहेरच्या कांहीं प्रश्नांचा, म्हणजे भविष्यत्कालीन कांहीं प्रश्नांचा विचार करणें योग्य दिसतें. गतस्थितींच्या इतिहासावरून भाविस्थिति काय होणार ह्याचें अनुमान जर आपणास करतां आलें नाहीं, तर समाजशास्त्राचें अध्ययन करणें निरुपयोगी होय—समाजशास्त्राच्या गतकालविषयक सामान्य सिद्धान्तांवरून, भाविकालविषयक आपल्या विचारांवर जर कांहीं प्रकाश पडला नाहीं, आणि आपण पुढें कसें वागावें ह्याबद्दल आपल्यास जर कांहीं दिशा लागली नाहीं, तर समाजशास्त्र म्हणून शास्त्रच नाहीं, असें कोणीं म्हटल्यास तें गैर होणार नाहीं. म्हणून, **साहेब** म्हणतात, पुढील भविष्यें वर्तवण्यास जरी मी खुशी नाहीं, तरी तसें करणें एका दृष्टीनें मला भागच आहे.

हल्लीं अस्तित्वांत असलेलीं कारणें इतकीं पुष्कळ आणि इतकीं घोंटाळ्याचीं आहेत, आणि नवीं कारणें उत्पन्न होण्याचा संभव इतका पुष्कळ आहे, कीं पुढच्या गोष्टींबद्दल तर्क करणें धोक्याचें आहे, आणि अत्यन्त सामान्य अशा सिद्धान्तापलीकडे जाणें निरुपयोगी आहे. शास्त्रीयज्ञानाच्या वृद्धीवरून जीवितविषयक कलांची वाढ होऊन समाजघटना जशी आधींच अनेक रीतींनीं पूर्वीहून भिन्न झालेली आहे, तशी ह्यापुढेंहि ती बदलून जाण्याचा संभव आहे. यथार्थज्ञानाची वृद्धि आणि प्रसार ह्यांच्या योगानें माणसांच्या विश्वाच्यां संबंधाच्या आणि विश्वांत सर्वत्र प्रादुर्भूत होणाऱ्या शक्तीच्या संबंधाच्या कल्पना हल्लीं बदलत असल्यामुळें धर्मसंस्थांच जो नियामक व्यापार तो ज्यास्त ज्यास्त बदलत गेला पाहिजे. ह्याबरोबरच धर्माशीं संबद्ध असलेली आणि कल्पित अशा दैविक आधारावर रचलेली जी नीतिसरणी तिचा लोकांच्या मनावरील प्रभाव कमी होत गेला पाहिजे, आणि त्या सरणीच्या ऐवजीं शास्त्राच्या पायावर रचलेली नीतिसरणी लोक स्वीकारीत तोंपर्यंत वर्तनबंधनें घातुक परिणाम व्हावे अशा रीतीनें कदाचित् सईल होण्याचा संभव आहे. माणसांच्या विश्वविषयक कल्पना जशा ज्यास्त संस्कृत होत चालल्या आहेत तशी त्यांची प्राचीन धर्मविषयक मतांकडेहि पीछेहाट झालेली दिसत आहे, आणि त्याबरोबरच धर्माधिकाऱ्यांचें त्यांच्यावरील वजन वाढत चाललें आहे. ह्या ज्या परस्परविरोधी सरण्या त्यांचे तात्कालिक परिणाम काय होतील हें सांगणें अशक्य आहे. इकडे माणसांच्या स्वभावांना

अनेक प्रकारचें शिक्षण लागत आहे, आणि त्यांच्यांत अनेक प्रकारचे फेरबदल होत आहेत. रानटी लढायांच्या युगांत ज्या हलक्या उपजतबुद्धी जोरांत होत्या त्या युद्धशीलता पुनः जिवंत झाल्यामुळें त्यांसहि पुनः जीव येत आहे; आणि त्याबरोबर लोककल्याणाकरितां आपल्या या युगांत जे अनेक उद्योग चालले आहेत तेणेंकरून उच्चतर मनोविकारांचें पोषण होत आहे. सारांश, हल्लीं एकप्रकारचा नैतिक झगडा चाललेला अरून त्याचा एकंदरींत परिणाम काय होईल ह्याचा अजमास करतां येत नाहीं.

ह्या एकंदर विवेचनावरून असें स्पष्ट होईल कीं, उद्यमसंस्थांची भावि स्थिति एकंदर समाजसंस्थांच्या भाविस्थितीवर अवलंबून राहणार आहे; आणि म्हणून समाजसंस्थांचें अनुमान केल्यानेंच उद्यमसंस्थांचें अनुमान आपणास करतां येणार आहे. म्हणून ह्या ठिकाणीं आपणांस पायाभूत सामाजिक संबंधांचा आणि त्यांवरून गर्भित होणाऱ्या मुख्य गोष्टींचा विचार केला पाहिजे.

१२५. माणूस जेव्हां पृथक् रहात असतो तेव्हां सभोंवतालची सृष्टि त्याला जें निबंधन करील त्याखेरीज इतर नियंत्रण त्याच्या कृतीवर कांहीं नसतें. जेव्हां तो इतरांसमवेत रहातो तेव्हां त्यांच्या सामीप्यामुळें त्याच्या कृतीवर आणखी कांहीं बंधनें उत्पन्न होतात. पहिल्या स्थितींत तो स्वताचा पूर्ण मालक असतो. दुसऱ्या स्थितींत ह्या ज्यास्त निर्बंधनामुळें त्याच्या इच्छा पूर्ण होण्यास जितका अडथळा येईल तितक्या मानानें तो स्वताचा मालक असण्याचा बंद होतो. त्याच्या

व्यक्तित्वाला आलेला जो हा अडथळा तो प्रथम निषेधरूप (अमुक अमुक करूं नको म्हणून सांगणारा) असला तरी पुढें लवकरच विधिरूप (अमुक अमुक कर म्हणून सांगणारा) होण्याचा संभव असतो. तो ज्या समूहाचा घटक असेल तो समूह जेव्हां दुसऱ्या तसल्या समूहांशीं लढाई करूं लागतो तेव्हां हें विधिरूप बंधन उत्पन्न होतें. अशा वेळीं त्याला आवडणार नाहींत अशा कृती समूह त्याला वरचेवर करावयास सांगतो; म्हणजे, तूं लढला नाहींस तर तुझी छीः थूः करूं, तुला मार देऊं, किंवा हांकलून टाकूं, अशी भीति घालून त्यास तो समूह लढावयास भाग पाडितो. समूहाचा हा धनीपणा हा वैरभाव ज्या मानानें कमज्यास्त असेल त्याप्रमाणें कमज्यास्त असतो. आणि सामाजिक उत्क्रमणाच्या प्रारंभीं जो प्रश्न उत्पन्न होतो व त्याच्या पुढील सर्व पायऱ्यांवर जो महत्त्वाचा असतो, तो हा कीं, प्रत्येकजण सर्वांच्या आधीन किती आहे आणि सर्वांपासून स्वतंत्र किती आहे ? म्हणजे, किती अंशांनीं तो स्वताचा मालक आहे आणि किती अंशांनीं त्याचे इतर मालक आहेत.

हा जो विरोध एथें तात्त्विकदृष्ट्या सांगितला तो इतका वेळ वरचेवर मूर्तस्वरूपानें सांगितला आहे. एका टोंकाला एस्कीमो लोकांकडे पहा; ते लोक 'समाज' शब्दाच्या पूर्ण अर्थीं समाज करून राहतात असें म्हणतां येत नाहीं, तर ते केवळ एकमेकांच्या सन्निध राहतात; आणि त्यांना लढाई म्हणजे काय हें ठाऊक देखील नसल्यामुळें त्यांना सहकृति करण्याची आणि आ-

पली व्यक्तिरूप इच्छा समाजाच्या इच्छेच्या अंकित ठेवण्याची जरूरी पडत नाहीं. अशींच या शास्त्राच्या पूर्व भागांतून थोड्याशा शांतिशील टोळ्यांचीं उदाहरणें दिलेलीं आहेत; त्यांनाहि बाह्य शत्रूंशीं झगडा करण्यासाठीं सहक्रिया करावी लागत नसून त्या एकमेकांशीं स्नेहभावानें वागतात; आणि व्यक्तिशः ते आपले पूर्ण मालक असून, कोणी थोडेंसें अतिक्रमण केल्यास जेव्हां कधींकाळीं वडिलधाऱ्या माणसांना तिकडे लक्ष पुरवावें लागतें तेव्हांच त्यांचें नियंत्रण होत असतें. दुसऱ्या टोंकाकडे पाहवें तों लढाईस वाहिलेले समाज आढळून येतात, आणि त्यांचे घटकांवर समाजाची पूर्ण मालकी असते. ह्याचें प्राचीनकाळचें उदाहरण स्पार्टनलोकांचें घ्या; ते व्यक्तिशः बऱ्याच दासांचे मालक असून सर्व समाजाची त्यांच्यावर मालकी असे; आणि सर्वांनीं जमा केलेल्या अन्नावर सर्वजण एकत्र रहात असून त्या सर्वांस लढण्यांत किंवा लढण्याची तयारी करण्यांत आपलीं आयुष्यें घालवावीं लागत असत. ह्याचें अर्वाचीनकाळचें उदाहरण डेहामन लोकांचें घ्या. त्यांचें सैन्य भव्य स्त्रियांचें बनलेलें असून त्यांच्या राजाच्या निजावयाच्या खोलीची जमीन जितनायकांच्या नरोट्यांची बनवलेली असते; आणि छपराला घालण्यास नरोट्या कमी आल्या तर तेवढ्यासाठींच तो लढाई करितो;आणि तो आपली सर्व प्रजा आणि त्यांची मालमत्ता ह्यांचा पूर्ण मालक असतो.

समाजाचा घटक आणि एकंदर समाज ह्यांच्या परस्परापेक्ष अधिकारांपासून उत्पन्न होणाऱ्या विशेषांइतके समाजघटनेचे दुसरे मूलभूत विशेष नाहींतः नेहमीं ल-

ढाया चालत असल्या म्हणजे फौजेच्या निरनिराळ्या दर्जाच्या लोकांमध्येंच अंकितपणा असावा लागतो असें नाहीं, तर सर्व समाजास फौजेचें अंकित व्हावें लागतें; कारण फौजेस खाद्याचा वगैरे पुरवठा व्हावयाचा तो समाजाकडूनच व्हावा लागतो. म्हणून समाजामध्यें फौजेसारखे निरनिराळ्या दर्जाचे लोक उत्पन्न होऊन ते अनुक्रमें वरवरच्या दर्जाच्या लोकांचे अंकित बनतात. उलटपक्षीं, लढाया कमी झाल्या तर हा अंकितपणा सैलावत जातो. आपल्या सामर्थ्याचा उपयोग आपल्या स्वताच्या फायद्यासाठीं करण्याची जी प्रत्येकाची इच्छा, जी युद्धशीलतेच्या जबरीला नेहमीं विरोध करीत असते, ती युद्धशीलता कमी होईल तशी सफल होऊं लागते. प्रत्येकजण आपल्या ह्या हक्काचें प्रतिपादन करूं लागला म्हणजे हळूहळू युद्धशीलतेचे कडक नियम सईल होऊं लागतात, आणि नागरिक आपला ज्यास्त ज्यास्त मालक बनूं लागतो.

सामाजिक घटनेच्या आणि कृतींच्या ह्या स्वरूपांना अनुरूप अशाच भावना व कल्पना त्या त्या वेळीं लोकांच्या बनलेल्या असतात. समाजांतील रचना स्थिर राहण्यास समाजांतील घटकांच्या स्वभावांशीं अनुरूप पाहिजेत. परिस्थितीमध्यें एकादा मुळापासून फरक होऊन समाजरचना किंवा घटकस्वभाव ह्यांच्यांत फरक झाल्यास तेणेंकरून घटकस्वभाव किंवा समाजरचना ह्यांमध्यें लवकरच अनुरूप फरक झाला पाहिजे. आणि हे फरक सामान्य मनोवृत्ती आणि मतें ह्यांमध्यें व्यक्त झाले पाहिजेत. एका टोंकास राजानिष्ठा हा सर्वांत

श्रेष्ठ सद्गुण 'च आज्ञाभंग 'हा महापराध समजला जातो. आणि दुसऱ्या टोंकास दासासारखें अंकीत रहाणें हें तिरस्करणीय मानिलें जातें, आणि स्वातंत्र्यसंरक्षण हें माणुसकीचें मुख्य लक्षण समजलें जातें. ह्या दोन सीमांच्या मध्यें परस्परविरुद्ध मनोभावांचीं अनंत विसंगत मिश्रणें बनलेलीं असतात.

म्हणून यापुढें होणाऱ्या फेरबदलांबद्दल आपले सिद्धान्त बरोबर रीतीनें निघण्यास आपण हें पाहिलें पाहिजे कीं, एकंदर हालचाल चालली आहे तिचा कल प्रत्येकाचे इतर मालक बनण्याकडे आहे, किंवा प्रत्येकानें आपला मालक बनण्याकडे आहे, आणि ततद्वच त्या त्या कलाला अनुकूल असे मनोभाव व विचार उत्पन्न होत आहेत किंवा नाहीं. यांपैकीं इतरांच्या मालकीचें स्वरूप काय आहे–म्हणजे, ही मालकी राजाची आहे किंवा सरदारवर्गाची आहे, किंवा लोकांच्या बहुमताची आहे, किंवा समाईकसमाजघटनेची आहे, हा प्रश्न वास्तविकरीत्या महत्त्वाचा नाहीं. तर महत्त्वाचा प्रश्न हा आहे कीं, त्यामुळें प्रत्येकास आपल्या शक्तींचा आपल्या फायद्याकडे विनियोग करण्यास अडथळा कितीं होतो, किंवा इतरांच्या फायद्यासाठीं उपयोग करणें भाग किती पडतें; मग हा अडथळा किंवा ही जबरी करणारी सत्ता कोणाचीहि असो. आणि आतां ज्या पुराव्याचा विचार आपण करणार आहों त्यावरून असें दिसून येतें कीं, इतरांची मालकी कबूल करण्याचा कल परिस्थितीप्रमाणें कमजास्त होत असतो;

मग ह्या इंतरांचें मूर्तस्वरूप राजकीय असो, सामाजिक असो किंवा औद्योगिक असो.

१२६. जर्मनीमध्यें १८७० सालापूर्वीचि फार व्यवस्थित स्वरूपास पावलेली अशी लष्करी पद्धति स्थापिलेली असून ती तो देश हल्लीं वाढवीत व सुधारीत आहे. तेथें वयाच्या विशिष्ट मर्यादांमधील प्रत्येक शारीरिकदृष्ट्या योग्य माणूस शिपाईगिरी शिकत असतो, करीत असतो, किंवा लागेल तेव्हां बोलवावयाचा म्हणून शिलकींत टाकिलेला असतो; आणि प्रजेवरील ही राष्ट्राची मालकी जे बाहेरदेशीं गेले असतील त्यांच्यावरहि तेथील विशाल फौजांच्या पोषणार्थ इतर धंद्यांत गुंतलेल्या लोकांवर ज्यास्त ज्यास्त कर लादले जात आआहेत; ह्याचा अर्थ असा होतो कीं, हे लोक ज्या मानानें हे कर देतात त्या मानानें त्यांच्यावर सरकाराची मालकी असते; कारण त्यांच्या शक्तीचा तेवढा उपयोग यांच्या फायद्यासाठीं न होतां सरकारच्या फायद्यासाठीं होत असतो. जर्मनीची घटना पूर्णपणें युद्धशील होत चालली आहे हें ह्यावरून दिसतें कीं, तेथील बादशाहाची सत्ता ज्यास्त ज्यास्त स्वेच्छाचारी बनत चालली आहे; आणि आपण काय करितों त्याबद्दल आपण लोकांस जबाबदार नसून केवळ आपल्या पूर्वजांस आहों असे उद्गार त्याच्या तोंडून निघूं लागले आहेत.

ह्याखेरीज, जर्मन माणूस घरांत किंवा बाहेर आपला उद्योगधंदा करण्याच्या कामींहि आपला पूर्ण मालक नसतो. मध्ययुगामध्यें त्याच्या उद्योगधंद्याचें जसें नियमन होत असे तसेंच हल्लींहि होत आहे. धंद्यास

विशिष्ट देणग्या देऊन उत्तेजन देण्याची पूर्वीची चाल अद्यापि सुरू आहे; आणि त्याबरोबरच साखरेच्या बाबतींत ती जितकी देशांत खपेल तेवढ्यावर कर आहे, आणि ती किती उत्पन्न करावी ह्याचीहि मर्यादा घालून दिलेली आहे. शिवाय, नुक्ताच हुंड्यांच्या देवघेवीचा व्यवहार मर्यादित करणारा कायदा आणि धान्याच्या सट्ट्यांना मनाई करणारा कायदा पास झालेला आहे. वृद्धवयांत पेन्शन देण्याबद्दलची जी तेथें पद्धति आहे तिच्यांत हा जबरीचा प्रसार ज्यास्तच दिसत आहे. शिवाय धंदेजमाती बनवल्याच पाहिजेत अशी जबरी करणारा कायदा नुक्ताच पसार झाला आहे; ही उघड उघडच पिछेहाट आहे. धनी आणि कामकरी ह्यांच्या संबंधाच्या ह्या व अन्य कायद्यांवरून लोक तितक्यापुरते सरकारचे प्राणी बनलेले आहेत. त्यांच्या घरगुती व्यवहाराच्या संबंधानेंहि असेंच झालेलें आहे. उदाहरणार्थ. १८७० सालापासून जर्मनींतील रहाणींत जे फरक झालेले आहेत त्यांबद्दल बोलतांना युबूल इव्हान्स असें सांगतो कीं, लोकांना बोलण्याची किंवा कृतीची फारशी स्वतंत्रता राहिलेली नाहीं; कारण पोलीस प्रत्येकाच्या ढुंगणामागें नेहमीं हजर असतें. पोलीस अर्धवट शाळापंतोजी व अर्धवट दाई असल्यामुळें पाळण्यापासून थडग्यापर्यंत माणसाच्या प्रत्येक कृतीवर देखरेख ठेवीत असतें; आणि ही देखरेख इतकी कडक असते कीं त्यापुढें माणसाचें सर्व स्वातंत्र्य नाहींसें होऊन तो केवळ बाहुलें बनतो. कोणाला जर जर्मनींत रहावयाचें असेल तर जर्मनींत प्रवेश करतांना परवान्याबरोबर

आपलें व्यक्तित्वहि त्यानें पोलीसाच्या हवालीं केलें पाहिजे. हा पुरावा बाहेरच्या माणसाचा नसून खुद्द एका जर्मन माणसाचाच व हुशार माणसाचा आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. ह्यासंबंधानें १८९३ सालीं खुद्द प्रिन्स बिस्मार्क असें म्हणाला कीं, गेल्या थोड्या वर्षांत अधिकाऱ्यांची सत्ता जी वाढत चालली आहे तिच्या वेटाळ्यांत राष्ट्राची जाणीव गुदमरून जाईल अशी मला भविष्यत् काळाबद्दल भीति वाटत आहे, आणि काळजी पडली आहे. चालू मनोभाव आणि विचार चालू समाजरचनेशीं अनुरूप असले पाहिजेत असें जेंवर एके ठिकाणीं म्हटलें आहे त्याचाच पडताळा एथें आपणास मिलत आहे. ह्याच गोष्टीस बिस्मार्कप्रमाणेंच ईव्हान्स यानेंहि उल्लेख केलेला असून तो असें म्हणतो कीं, पुष्कळ दिवसांच्या परिपाठानें अधिकाऱ्यांच्या कह्यांत राहणें हा जर्मनलोकांचा दुय्यम स्वभावच बनला आहे; कारण त्यांना दुसऱ्या एकाद्या व्यवस्थेची कल्पनाच नाहीं.

समाईक समाजपद्धति जर्मनींतच इतकी जोरांत कां आहे ह्याची ह्यावरून आपल्यास कल्पना होईल. त्या पद्धतीच्या कलहसीचे प्रपादक आणि ती प्रत्यक्ष अमलांत आणणारे ह्यांना आपल्या अनुयायांना तेथें बरेंच राजकीय महत्त्व कसें देतां आलें आहे हीहि गोष्ट त्यावरून आपल्या लक्षांत येईल. कारण समाईक समाजपद्धतीची अमदानी म्हणजे सरकारी अधिकारी मंडळाच्या अमदानीचेंच अन्यस्वरूप आहे. लष्करी रेजिमेंटी घटना, दिवाणी रेजिमेंटी घटना आणि औद्योगिक रेजिमेंटी घटना ह्या तत्त्वतः एकच आहेत; आणि ह्याचा

पुरावा असा मिळतो कीं, लष्करी शास्त्यांनीं एकप्रकारची समाजपद्धति आपणांस कबूल आहे म्हणून म्हटलें आहे; आणि शासितांनीं सर्व राष्ट्रास लष्करीशिक्षण द्या असें १८९१ सालीं एरफर्ट एथें समाईक समाजिष्टांची परिषद भरली होती तेथें म्हटलें होतें. तद्वतच लष्करी जमीनदारीची पद्धति जर्मनींत सर्वांच्या मागून रसातळास कशी गेली, आणि जर्मनलोकांस स्वतोंच्या मालकीची किती कमी संवय आहे, आणि इतरांच्या धनीपणाची किती ज्यास्त आहे, हें ध्यानांत आणिलें म्हणजे सरकारी समाईक समाजपद्धति त्यांस पसंत कां पडते हें आपल्या लक्षांत येणार आहे.

१२७. जर्मनी व फ्रान्स ह्या दोन देशांमध्यें लष्कर वाढविण्याच्या संबंधानें चढाओढ कशी चाललेली आहे हें वर्तमानपत्रांवरून आपल्या वरचेवर लक्षांत येतें. ह्या दोन्ही देशांतील सरकारें आपली बहुतेक शक्ति आपले दांत आणि नखें वाढविण्यांत खर्च करितात; आणि एकानें कांहीं वाढ केली कीं दुसरें तितकेंच वाढ करण्यास उद्युक्त होतें. फ्रान्समध्यें, जर्मनीचा १८७०च्या पराजयाबद्दल सूड घेण्याकरितां, धर्मखात्यांत शिरून क्षमेचें मत शिकविण्याऱ्या उमेदवारांवर देखील लष्करांत शिरून लष्करी शिक्षण घेण्याची ज्यास्त ज्यास्त सक्ती होत आहे. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं फौज आणि आरमार ह्यांमध्यें १८६९ सालीं जे ४७०००० लढवय्ये लोक होते ते १८९८ सालीं ६६६००० वर गेले. ह्यामध्यें ह्याच्या दुप्पट लढवय्ये लोक जे शिलकींत टाकिलेले आहेत त्यांची गणना के-

लेली नाहीं, कारण ते हल्लीं कांहीं तरी धनोत्पादक उद्योग करीत आहेत. हा मोठा अनुत्पादकवर्ग पोसण्यासाठीं सरकार कामकरी किंवा उत्पादकवर्गापासून त्यांच्या मिळकतीचा जरूर तो भाग घेतें, आणि तितक्यापुरतें तें त्यांचें मालक बनतें. ह्या युद्धशील घटनेबरोबर युद्धशील चळवळहि अर्थांतच चालू राहते. नुक्ताच तेथील परराष्ट्रीय प्रधान ट्यूनिस, टान्किन, मादागास्कार, कांगो वगैरे वसाहतींस उल्लेख करून असें म्हणाला कीं, आपल्या देशानें राजकीय दरवडे घालण्याच्या कामीं इतर राष्ट्रांशीं चढाओढ करणें जरूर आहे.

आतां ही युद्धशील घटना, चळवळ, आणि मनोभाव ह्यांसमवेत दिवाणी घटना कशा प्रकारची प्रचारांत आली आहे ती पहा. लष्करी जमीनदारीच्या आणि एकछत्री राजांच्या अमदानींत जें अधिकारीमंडळ बनलें होतें तें इतकें प्रबल झालें होतें कीं तें लढाईच्या संबंधानें लोकांचें मालक बनलेलें असून त्यांच्या उद्योगधंद्याच्या संबंधानेंहि मालक बनलेलें होतें; तें इतकें कीं कायद्याचीं बंधनें आणि हपीसरांचें ओझें ह्याखालीं सर्व उद्योगधंदे दडपले गेले होते. हें अधिकारीमंडळ बादशाही अमदानींत कायम राहिलें आणि हल्लींच्या लोकसत्ताक अमदानींतहि कायमच आहे; कायम आहे इतकेंच नव्हे तर वाढलें आहे. कारण गेल्या १५ वर्षांत दोन लाख नवे अधिकारी तेथें नेमले गेले आहेत असें पॉल लेरायबोलो म्हणतो. प्रत्येक माणूस कोठें रहातो आणि काय करितो हें पोलिसास माहीत असलें पाहिजे असें फ्रान्सांत समजतात, ह्यावरून तेथें सरकार लोकां-

ना कशा दृष्टीनें लेखितें हें लक्षांत येणार आहे. शिपाई किंवा खलाशी ह्यांची हजिरी घेतात तशांतीलच हा प्रकार आहे. असला हा ताबा अवश्यच वाढत जातो; आणि मग बायकांनीं बाळंतपणानंतर किती दिवसांनीं कामावर जावें, किंवा घरवाल्यानें घराचा पुढचा भाग कोणत्या धर्तीवर बांधावा, इत्यादि गोष्टी ठरविणारे कायदे उत्पन्न होतात. एकदां एक प्रधान अशी फुशारकी मारीत होता कीं, कोणत्याहि तासाला फ्रान्सांतील सर्व मुलें एकच धडा शिकत असतात; हें जें सर्वत्र एकसारखेपणा उत्पन्न करण्याचें वेड तें स्वातंत्र्यापेक्षां समतेची ज्यास्त आवड असल्याशिवाय उत्पन्न व्हावयाचें नाहीं. सर्वांवरच सारखी जबरी केल्यास तिला फारसा आक्षेप घेतां येत नाहीं; म्हणून रेजिमेंटी घटना कोणत्या ना कोणत्या स्वरूपीं तेथें नेहमीं दृष्टोत्पत्तीस येत असते. मोठ्या राज्यक्रान्तीच्या वेळीं जुने नियम मोडून नवे सरू केले व ते अगदीं बारीकसारीक गोष्टींच्याहि संबंधानें केले. आतां हें उघडच आहे कीं ज्या राष्ट्रांत ज्याच्या त्याच्या स्वतावरच्या मालकीची भावना इतकी अल्प आहे तेथें सरकारी कार्यकारी-मंडळें स्थापन होण्यास आळाबंदा पडत नाहीं; मग तीं मंडळें इतर लोकांशीं लढाई करण्यासाठीं बनवलेलीं असोत किंवा देशांतील कारभार पाहण्यासाठीं असोत. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं १८७० सालाच्या दुप्पट हल्लीं वर्षास सार्वजनिक खर्च होत आहे. हा खर्च भागण्यासाठीं फ्रान्सांत एकंदर होणाऱ्या वार्षिक उत्पन्नाचा तिसरा हिस्सा लोकांस द्यावा लागत आहे. सारांश, पूर्वीं शेतगुलामांना जमीनदारांकरितां

जसें वर्षांतून विशिष्ट दिवस खपावें लागत असे तसें हल्लीं सर्वच लोकांस सरकारासाठीं वर्षांतून ९० दिवस खपावें लागत आहे. म्हणून तेवढ्यापुरता प्रत्येक फ्रेंच माणूस राष्ट्राचा गुलाम बनला आहे; कारण त्यानें समाजाचें तितके दिवसांचें काम दिलें काय, किंवा पैसे दिले काय, सारखेंच.

ह्यावरून जर्मनीप्रमाणेंच फ्रान्सामध्यें समाईकसमाजपद्धति, म्हणजे, प्रत्येक नागरिकाला समाजानें पोसावें आणि त्यानें समाजासाठीं खपावें ही पद्धति—इतक्या पुष्कळ लोकांस पसंत पडली आहे, आणि ती तोंडानें किंवा हातानें अमलांत आणण्यासाठीं इतके लोक पुढें आले आहेत. कारण शिपाई व गृहस्थ ह्या दोन्ही नात्यांनीं फ्रेंचलोकांस अंकितपणाची संवय लागली असल्यामुळें त्यांची स्वभावघटना या पद्धतीस योग्य अशी बनलेली आहे. त्यांच्या राजकीय संस्थांकडे पाहतां ते स्वातंत्र्याचा उपभोग घेतात असें दिसतें; पण ज्यांस स्वातंत्र्य म्हणजे काय हें त्यांच्याहून ज्यास्त समजतें त्यांस ते किती नियंत्रण सहन करितात ह्याचें आश्चर्यच वाटतें. ही गोष्ट धंदेजमातीच्या परिषदेला इंग्लंदांतून पारीसमध्यें १८८३ सालीं जे कामकरी गेले होते त्यांच्या उद्गारांवरून स्पष्ट होते.

१२८. आतां इंग्लंदांतील स्थितीकडे पाहतां फ्रान्सांत व जर्मनींत दिसणाऱ्या स्थितीवरच तेणेंकरून प्रकाश पडतो; तेथें हा पुरावा उलट आणि सुलट दोन्ही प्रकारचा सांपडतो.

उलट पुराव्या हा कीं, तेथें लष्करी व दिवाणी

दोन्ही स्वरूपीं व्यक्तीवर इतरांची मालकी फ्रान्स व जर्मनी ह्या देशांतल्यापेक्षां कमी असल्यामुळें समाईक-समाजपद्धतीमध्यें गर्भित होणारी प्रत्येकावरील इतरांची मालकीहि कमी दिसून येते. तेथें लष्करी जमीनदारी त्या देशांच्या अगोदर नष्ट झाली आणि पुढें लष्कराची वाढहि तेथें त्या देशांइतकी झाली नाहीं. ह्यावरून लष्करांत राहिल्यानें जी जबरी माणसावर चालते ती इंग्रजांवर तितकी चालेलली नाहीं. धंद्याच्या संबंधानें आणि खासगी वर्तनाच्या संबंधानेंहि सरकारची तितकी हुकमत तेथें नाहीं. उद्योगधंद्यासंबंधानें तेथें नियंत्रण कमी आहे, आणि एका पिढीमागें पोलीसची देखरेख फारच कमी झाली होती. सारांश, इतर देशांपेक्षां तेथें स्वताच्या मालकीचें सरकारच्या मालकीनें अतिक्रमण कमी केलेलें आहे. तद्वतच, परवांपर्यंत, तेथें राबर्ट ओवेन खेरीज समाईक समाजपद्धतीचा दुसरा ठळकसा प्रतिपादक नव्हता; त्यामुळें बाहेरच्या इतकें तें मत इंग्लंदांत पसरलेलें नाहीं. आणि निवड करण्याची सत्ता हल्लीं जरी सामान्य लोकांच्या हातीं गेलेली आहे तरी उघड उघड समाईक समाजपद्धतिवाले असे सभासद त्यांनीं पार्लमेंटांत अद्यापि फारसे पाठविलेले नाहींत.

हा उलट पुराव्याचा पडताळा झाला; आतां सुलट पुराव्याचा पहा. तो हा कीं, फ्रान्स व जर्मनी ह्याप्रमाणें इंग्लंदांतहि फौजांची आणि लढायांची आलीकडे जेव्हां वाढ झाली तेव्हां समाजासहि तेथें युद्धशील स्वरूप आलें, आणि त्याबरोबर समाईकसमाजपद्धतिविषयक कल्पनांची तेथें वृद्धि होऊं लागली. फ्रान्स, जर्मनी

वैगरे देशांत आलीकडे जी फौजांची वाढ झाली आहे ती सुरू होण्याच्या पूर्वी आमची या बाबतींत असावी तशी मुळींच तयारी नाहीं म्हणून कांहीं इंग्रज वरचेवर ओरड करूं लागले; आणि तेव्हांपासून किल्ले, आरमारें, फौजा इत्यादिकांची वाढ व्हावयास लागून ही ओरड मधूंमधूं पुनः सुरू होते, आणि नंतर फौजांची वगैरे आणखी वाढ होते. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं गेल्या पन्नास-साठ वर्षांत खुष्कीवरील फौज आणि समुद्रावरील फौज ह्यांच्या संख्या दुपटीतिपटीनें किंवा त्याहूनहि अधिक वाढल्या आहेत. आतां ह्या मानें लष्करी व आरमारी खर्च वाढला आहे हें सांगावयास नको च. आज एक पिढीवर दिवाणी नोकरींतील हजारों लोक व्हालंटीर (बिनपगारी शिपाई) बनूं लागल्यामुळें लष्करी अमलाची त्यांस संवय होऊं लागली आहे, आणि त्यांच्या लढण्याच्या वासना जागृत होत आहेत; हेंच शिक्षण लहान मोठ्या शाळांतून ड्रिलच्या रूपानें देऊं लागले आहेत आणि ह्या गोष्टीस शांततेच्या धर्माच्या उपाध्यांची स्पष्ट संमति आहे. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं लष्करी व इतर पेशांचे लोकहि सर्वांस जबरीचें लष्करी शिक्षण दिलें पाहिजे असें म्हणूं लागले आहेत. बरें, ह्याबरोबरच इतरांच्या मुलखांचें अतिक्रमण वाढत चाललें आहे; आणि दुर्बळ लोकांचे ह्या किंवा त्या सबबीवर ज्यास्त ज्यास्त मुलूख बळकाविले जाऊं लागले आहेत.

इतका वेळ शिपाई या नात्यानें माणसावर जी सरकारची मालकी तिचा विचार केला. आतां त्याला जे

स्थानिक व सामान्य कर द्यावे लागतात आणि हुकूम व बंधनें मानावीं लागतात त्या रूपीं जी राष्ट्राची त्या-जवरील अप्रत्यक्ष मालकी ती कशी वाढत गेली आहे तें पाहूं. पहिली गोष्ट प्राथमिक शिक्षण सार्वजनिक अधि-कारी-मंडळाच्या हातीं गेलें आहे, आणि त्याचा खर्च भागण्यासाठीं कांहीं सामान्य व विशिष्ट कर लोकांवर ब-सविले आहेत. हल्लीं मुलाचे मुख्य मालक आईबाप न-सून सरकार झालें आहे, आणि त्यानें काय शिकायें व कसें रहावें हें तें ठरवूं लागलें आहे; आणि जीं आई-बापें ही सरकारची मालकी कबूल करणार नाहींत त्यांस शिक्षा होऊं लागली आहे. त्याचप्रमाणें खुद्द आईबा-पांनीं कसें रहावें ह्याविषयींचींहि बंधनें वाढत चाललीं आहेत. १८६० सालापासून १८८४ सालापर्यंत माण-सानें कसें वागावें हें ठरविणारे ५९ कायदे पसार झाले. तेव्हांपासून असल्या कायद्यांची संख्या ज्यास्तच वाढली आहे. जमीन, शेती, खाणी, आगगाड्या, कालवे, ता-रवें, कळाकुसरीचे जिन्नस, व्यापार, मद्यपान, इत्यादि-विषयक ४२ कायदे १८८४ ते १८९४ ह्या दहा वर्षांत पास झाले. ह्याबरोबरच करांचेंहि ओझें फार वाढत चा-ललें आहे. १८६७–६८ ते १८९१–९२ ह्या २४ वर्षांत एकंदर स्थानिक खर्च दुपटीहून ज्यास्त वाढला आहे, आणि एकंदर स्थानिक कर्ज तिपटीहून ज्यास्त वा-ढलें आहे. ह्याचा परिणाम चालू पिढी व भावी पिढ्या ह्या दोहोंवरचें ओझें वाढविणें हा झालेला आहे. ह्यावर कोणी असें म्हणेल कीं, सरकार जर माणसाच्या प्राप्ती-चा ज्यास्त ज्यास्त वांटा घेतें, तर त्याचें तें अनेक फा-

यदे फुकट करून देतें. तर ह्याला असें उत्तर आहे कीं. ह्यामध्यें मुद्याची गोष्ट कायमच रहाते; ती ही कीं, त्याचें ज्यास्त वित्त त्याच्यापासून घेण्यामध्यें त्याच्यावर जबरी होतेच, आणि तितक्यापुरती त्याच्यावर सरकारची मालकी उत्पन्न होतेच;आणि ती सारखी वाढत चालली आहे.

आतां ह्याबरोबर समाईक समाजपद्धतिविषयक कल्पनांची वाढ ह्याबरोबरच आणि ह्याला अनुरूप अशा रीतीनेंच कशी झाली आहे ती पहा. १८८० सालापूर्वी अशा प्रकारच्या मतांचे प्रसारक मध्यमवर्गामध्यें विसांहूनहि कमी होते, आणि कामकरी लोकांत त्याचे अनुवादक इकडे तिकडे थोडेसेच होते. पण हल्लीं हे लोक इतके पुष्कळ व प्रबळ झाले आहेत कीं त्यांनीं कित्येक धंदेजमाती आपल्याशा करून टाकिल्या आहेत, आणि धंदेपरिषदांच्या ठरावांतून त्यांचीं मतें झळकूं लागलीं आहेत. सरकारानें सर्व जमिनी आपल्या ताब्यांत घ्याव्या, किंवा लोकांनीं जमिनीचें भाडें देण्याचें बंद करण्यास सुरवात करावी, अशा ज्या सूचना होत आहेत त्यांचा अर्थ हल्लींची कराराची स्थिति जाऊन पूर्वीची जन्मतःसिद्धस्थितीची अवस्था उत्पन्न व्हावी अशी लोकांची इच्छा दिसते. कारण करारांत गर्भित होणारी जी स्वेच्छिक क्रिया ती नाहींशी झाल्यास जबरीची सहाक्रिया उत्पन्न झालीच पाहिजे. म्हणजे स्वताची मालकी पूर्णपणें नाहींशी होऊन इतरांची मालकी सर्वत्र उत्पन्न होणार.

१२९. एवंच, सर्वत्र, संस्था, चळवळी, मनोवृत्ती, आणि कल्पना ह्या सर्वांमध्यें एकच कल दिसून येतो; आणि हा कल दिवसेंदिवस वाढत चालला आहे. लोक

कायद्यानें अधिकाधिक फायदे करून द्यावे म्हणून इच्छा करीत आहेत, आणि कायदे करून लोकांची इच्छा तृप्त करावी म्हणून खटपट करीत आहेत. एवंच सर्वत्र व्यक्तीचें जीवित समाजाच्या जीवितांत लुप्त होऊन जात आहे. सारांश, व्यक्तीचें जीवित आंवळत चाललें आहे, आणि सरकारचें फुगत चाललें आहे.

पार्लमेंताचा सभासद आपल्या पक्षाची जबरी कबूल करीत असल्यामुळें लोकांवर कायद्यानें जबरी केल्यास त्यास वाईट वाटत नाहीं. त्यानें आपली स्वतावरची मालकी आपल्या पक्षाच्या पुढाऱ्याच्या किंवा आपणास निवडणारांच्या स्वाधीन केलेली असल्यामुळें तो सामान्य नागरिकाच्या स्वतावरच्या मालकीची फारशी किंमत मानीत नाहीं. त्याच्या निवडणारापैकीं कांहीं वजनदार लोक त्यास लोकांच्या स्वातंत्र्यांत हात घालूं सांगूं लागल्यास तेणेंकरून इतरांचें ज्यास्त नियंत्रण होईल किंवा त्यांचे ज्यास्त पैसे सरकारच्या तिजोरींत जातील हे विचार त्याच्या मनांत येत नाहींत. त्याला ही भीति पडते कीं, आपण ह्या निवडणारांचें न ऐकल्यास ते आपल्यास पुढच्या निवडणुकीच्या वेळीं निवडणार नाहींत. आपण आपल्या कृतीनें मागसांसभोंवतालच्या जाळ्याला आणखी एक धागा लावीत आहों ह्याबद्दल त्यास पर्वा वाटत नाहीं. तो केवळ प्रस्तुतच्या स्थितीकडे पाहतो, भावी स्थितीकडे कधीं पहात नाहीं. दररोज तो समाईक सामाजिक स्थितीकडे एकेक पाऊल टाकीत असतो, पण ती स्थिति त्यास अशा रीतीनें केव्हां तरी प्रत्यक्ष प्राप्त होईल हें तो लक्षांत घेत नाहीं. सारांश,

तो आपल्या पक्षाचा आणि निवडणारांचा बंदा असल्यामुळें प्रत्येक नागरिकास समाजाचा बंदा करण्यास मुळींच कचरत नाहीं.

प्रत्येक प्रकारचा व्यक्तींच्या इच्छेप्रमाणें चालणारा प्रत्येक खासगी उद्योग कमी करावयाचा, आणि त्याबद्दल सरकारच्या इच्छेप्रमाणें चालणारा सार्वजनिक उद्योग स्थापन करावयाचा, असें जें हें चाललें आहे त्याचा कल अशा उद्योगांनीं ज्यांना फायदा होतो त्यांचे अधिकार वाढविण्याकडे, आणि ज्यांचें नुकसान होतें त्यांचे अधिकार कमी करण्याकडे असतो. हल्लींच पार्लमेंत व म्युनिसिपालिट्या ह्यांचे सभासद निवडण्याचा हक्क ज्यांस कर द्यावे लागत नाहींत अशा लोकांच्या हातांत जात आहे, आणि त्याचा परिणाम प्रत्येक गोष्टींत त्यांनीं हात घालणें आणि उधळेपणानें खर्च करणें हा होत आहे; आणि अधिकार व ओझें ह्यांमधील ही फारकत जशी वाढत जाईल तसे हे परिणाम ज्यास्त ज्यास्त ठळक होत जातील. कायदे करणारांना असें वाटतेंसें दिसतें कीं, पुष्कळ लोक थोड्याजणांना जेव्हां असें म्हणूं लागतील कीं, "काय करावयाचें तें आम्ही ठरवूं, आणि त्याचा खर्च मात्र तुम्हीं दिला पाहिजे" तेव्हां सर्व व्यवहार सुरळीत चालूं लागेल. चौघेजण एके ठिकाणीं जमले म्हणजे जीं भाषणें सुरू होतात त्यांवरून सुशिक्षितलोकांना देखील असें वाटतेंसें दिसतें कीं, सरकाराच्या अधिकारालाहि सीमा नाहीं, आणि उत्पन्नालाहि नाहीं; आणि राजकीय विषयांवर बोलणारांच्या भाषणांवरून गांवढेकरास असें वाटूं लागतें कीं, स्वहितसा-

धु लोक अडथळा आणणार नाहींत तर सरकार आपल्यासाठीं पाहिजे तें करूं शकेल. अशा रीतीनें लोकांचा कल सहजच समाईक समाजपद्धतिवाल्यांच्या भाषणांनीं त्या पद्धतीकडे एकदम होतो; पण त्यांना हें कोणीं सांगत नाहीं कीं, तुम्हांला जे खाऊं घालतील ते तुम्हांस घाण्याला लावणारच.

१३०. ह्या सर्व कारणांचा मिळून स्वताच्या मालकीबद्दल समाजाची मालकी स्थापन होणें हा परिणाम झालाच पाहिजे. सहकारी उत्पादन ज्यास्त ज्यास्त होत गेल्यास ह्या प्रवाहास कदाचित् आळा पडेल. पण तसें होण्याची फारशी आशा दिसत नाहीं.

मालकीचें हें रूपान्तर कशा रीतीनें घडून येईल हें उघडच अनिश्चित आहे. तें एकदम घडून आणवावें अशी त्याच्या पुरस्कर्त्यांची इच्छा आहे, पण तसें होणें संभवनीय दिसत नाहीं. तें हळूहळूच होण्याचा जास्त संभव आहे. तें होण्यास सरकारचें नियंत्रण वाढत चाललें पाहिजे, आणि व्यक्तीच्या क्रियेला ज्यास्त ज्यास्त बंधन उत्पन्न झालें पाहिजे. मुख्य सरकार आणि स्थानिक सरकारें ह्यांचीं कामें जर वाढत गेलीं, वर्षानुवर्ष सार्वजनिक मंडळें ज्यास्त ज्यास्त गोष्टी करूं लागलीं आणि खासगी मंडळें किंवा व्यक्ती कमी करूं लागल्या, जर व्यक्तींचीं आणि कंपन्यांचीं कामें सरकार व म्युनिसिपालिट्या एका मागून एक आपल्या हातीं घेऊं लागल्या, तर हल्लींची स्वैच्छिक औद्योगिक घटना जाऊन तिच्या ऐवजीं जबरीची औद्योगिक घटना उत्पन्न होण्यास फारसा विलंब लागणार नाहीं. सरते-

शेवटीं हातानें काम करणारास व डोक्यानें काम करणारास सरकारी खातीं आणि सरकारी अधिकारी ह्यांखेरीज काम देणारा दुसरा कोणी सांपडत नाहींसा होईल. आणि अशा रीतीनें, कोणालाच स्वताला आवडेल तें करतां येऊं नये, आणि प्रत्येकाला इतर सांगतील तें करणें भाग पडावें, अशी स्थिति उत्पन्न होईल.

एवंच ज्यांची असलेली स्वतंत्रता भोगण्याची योग्यता नाहीं त्यांच्या हातून ती पूर्णपणें निघून जाईल. त्यांना कसोटीस लाविलें आहे, आणि ते हीणकस ठरले आहेत, कारण त्यांच्या ठिकाणीं स्वातंत्र्य कायम राखण्यास अवश्य अशी कल्पना नाहीं, किंवा भावनाहि नाहीं. स्वताचें क्रियास्वातंत्र्य पाहिजे तो आत्मत्याग करून राखण्यास जे तयार असतील आणि इतरांचें तसलें स्वातंत्र्य राखण्यास जे उत्सुक असतील, तेच स्वतंत्र संस्था कायमच्या राखूं शकतील. माणूस जसा स्वताचें अतिक्रमण करणारास प्रतिबंध करण्यास तयार असला पाहिजे, तसेंच इतरांचेंहि करूं न देण्यास तयार असला पाहिजे, मग ते इतर त्याच्या जातीचे असोत किंवा अन्य जातीचे असोत. ह्या शास्त्रावरील ह्यापूर्वीच्या अनेक ठिकाणीं दाखविल्याप्रमाणें जो समाज इतर समाजांवर जबरी करण्यास योग्य अशा तऱ्हेचा बनलेला असेल तो आपल्या घटकांवरहि जबरी करणारच. तो ज्या मानानें बाहेरच्या माणसांचे हक्क पायाखालीं तुडवील त्याच मानानें राष्ट्रांतील लोकांचेहि तुडविणार. जुलूम करणारा आणि करून घेणारा हे दोघे एकाच जातीचे माणूस असून त्यांची परिस्थि-

ति तेवढी भिन्न असते, हें सत्य इतिहासांत सर्वत्र दिसून येतें. जे प्राचीन इजिप्त राजे उपाध्ये सांगतील त्याप्रमाणें चोवीस तासांचे सर्व व्यवहार बिनचूक करीत असत त्यांजकडे पहा; गुलामांचा मालक आणि राष्ट्राचा गुलाम जो रोमन नागरिक त्याजकडे पहा; शेतगुलामांवर मालकी दाखविणारा आणि राजाची मालकी कबूल करणारा जो लष्करी जमीनदार त्याजकडे पहा; किंवा आपल्या मंडळाकडे आपल्याबद्दल करार करण्याचा हक्क देऊन जे तसें करणार नाहींत त्यांस त्रास देणारा आधुनिक जमातवाला कामकरी पहा; सर्वांच्या उदाहरणावरून हेंच स्पष्ट होतें कीं जे कोणी इतरांच्या व्यक्तित्वाकडे दुर्लक्ष करितात त्यांस कोणत्यातरी रूपानें आपल्या व्यक्तित्वावरहि पाणी सोडावें लागतेंच. अशा रीतीची ज्यांची स्वभावघटना आहे त्यांस स्वतंत्र संस्था कायम राखतां यावयाच्या नाहींत. त्यांना कोणत्यातरी जुलमी सरकारच्या अमलाखालीं राहिलेंच पाहिजे; मग त्या जुलमी सरकाराचें स्वरूप कितीहि बदलो.

हा सामान्य सिद्धान्त जसा विशिष्ट पुराव्यावरून खरा ठरतो, तसाच तो तालबंधाच्या नियमावरून देखील खरा ठरतो; कारण तो नियम इतका व्यापक आहे कीं, तो जसा इथर नामक सर्वव्यापी सूक्ष्मतम द्रव्याच्या अणूच्या जलद होणाऱ्या आंदोलनांस लागू आहे तसाच सूर्यमालेच्या युगांनीं होणाऱ्या आंदोलनांसहि लागू आहे. आदितत्त्वें ह्या ग्रंथांत दाखविलेंच आहे कीं परस्परविरोधी शक्तींपासून तालबद्धता उत्पन्न होते. म्हणून सामाजिक चमत्कारांत ती जशी तासातासाला व-

दलणाऱ्या हुंड्यांच्या भावांत दिसून येते तशी राजकीय पक्षांच्या क्रिया व प्रतिक्रिया ह्यांजमध्येंहि दिसून येते; आणि माणसांवरील बंधनें कधीं वाढत जावीं आणि कधीं कमी होत जावीं, अशा प्रकारचे जे फेरफार त्यांजमध्यें ती मोठ्याच व अत्यन्त सावकाशीच्याच प्रमाणावर दिसून येते. जबरीचें शासन यूरोपांतील इतर देशांत, व विशेषतः इंग्लंदांत कित्येक शतकें हळूहळू कमी होतां होतां शेवटीं गतशतकाच्या मध्यकालीं व्यक्तिस्वातंत्र्य जितकें पुढें गेलें तितकें राष्ट्रीं प्रथम स्थापन व्हावयास लागलीं तेव्हांपासून कधींच गेलें नव्हतें. त्या वेळीं मागसांस पाहिजे तिकडे जातां येत असे, पाहिजे तो उद्योग करतां येत असे, आणि पाहिजे त्याच्याशीं व्यापार करतां येत असे. पण ज्या हालचालीनें गतकालीन जुलमी कायदे इतके मोडून गेले ती हालचाल झपाट्यानें अशा कांहीं मर्यादेपर्यंत गेली कीं, तेथून आतां तिची पीछेहाट सुरू झाली आहे. जुन्या प्रकारचे नियम आणि हुकूम जाऊन त्याऐवजीं नव्या प्रकारचे नियम आणि हुकूम हळूहळू उत्पन्न होत आहेत. प्रबल अशा राजकीय वर्गाच्या शासनाऐवजीं अधिकारी वर्गाचें शासन लोक आपल्यासाठीं तयार करीत आहेत. हे वर्ग पहिल्या वर्गाइतकेच प्रबल होतील किंवा ज्यास्त प्रबल होतील. सारांश, प्रारंभींच्या गरीब व नम्र मिशनऱ्यांपासूनच उत्पन्न झालेले मध्ययुगीन ख्रिस्तीधर्माधिकारी जसे त्यांच्यापासून अगदीं भिन्न बनले, तसेच हे अधिकारीवर्ग हल्लीं समाईकसमाजपद्धतिवाल्यास वाटतात त्यांहून अगदीं भिन्न बनतील.

प्रकरण चोविसावें

समारोप

सामाजिक जीविताला हें जें स्वरूप येत आहे तें किती दिवस टिकेल, आणि तें कशा रीतीनें नष्ट होईल, हें सांगतां येत नाहीं. कदाचित् तें एके ठिकाणीं एका रीतीनें नष्ट होईल, आणि दुसऱ्या ठिकाणीं दुसऱ्या रीतीनें होईल. कांहीं ठिकाणीं नवीन बंधनें असह्य होऊन कदाचित् एकदम तुटतील, आणि त्यामुळें लष्करी जुलूम सुरू होईल. कांहीं ठिकाणीं, योग्यता आणि फलनिष्पत्ति ह्यांमधील ज्या योग्य संबंधानेंच राष्ट्राचा जोर कायम राहणें शक्य आहे तो नष्ट झाल्यामुळें राष्ट्र हळू हळू क्षीण होऊन शेवटीं नष्ट होईल आणि इतर कांहीं ठिकाणीं जे लोक दुबळ्यांना पोसून नपुंसक झालेले नाहींत ते अशा लोकांस जिंकून टाकितील, जसें प्राचीनकाळीं मूठभर स्प्यानिशलोकांनीं सर्व पेरूव्हियन लोकांस जिंकलें होतें.

पण जी उत्क्रमणपद्धति एकंदर भूतकालामध्यें चालू राहून जीवितास एवढ्या उच्चतेस आणून पोंचविती झाली आहे, ती एकंदर भविष्यत्कालीं तशीच सुरू राहिल्यास (आणि ती तशी सुरू राहील असा अंदाज करणें आपणास भागच आहे.) मानवी स्वभावघटना सामाजिक स्थितीशीं अनुरूप होण्यास रानटी लोक स्वसंरक्षणार्थ प्रथम एकत्र जमूं लागल्यापासून जी सुरवात झाली ती तशीच चालू राहील, आणि त्यामुळें ही अनुरूपता शे-

वर्टीं पूर्ण होऊन जाईल; मग मध्यन्तरीं प्रत्येक समाजांत आंदोलनरूप कितीहि रूपान्तरें होवोत, कितीहि राष्ट्रें मरोत किंवा जिवंत होवोत, आणि कितीहि जाती अन्य जातींकडून चेंगरल्या जावोत. पुष्कळांस ही कल्पना अगदीं असंभाव्य वाटेल. आपल्या सभोंवतीं जरी सर्वत्र व्यक्तीचें आणि जातीचें कल्याण होत जावें अशा प्रकारच्या हळूहळू बनणाऱ्या रचनांनीं आणि उपजत-बुद्धींनीं युक्त असे प्राणी आपणास सर्वत्र दिसतात, तरी मानवीप्राणीहि गतकालीं परिस्थितीशीं ज्यास्त ज्यास्त अनुरूप बनत गेलेले आहेत, आणि पुढेंहि जातील, हा गर्भित सिद्धान्त बहुतेक लोक लक्षांत घेत नाहींत. पण थोडेसे लोक असेहि आहेत कीं, ते इतर प्राण्यांच्या संबंधानें जें घडून आलें आहे तें सर्वांत उच्चतम प्राणी जो माणूस त्याच्या संबंधानेंहि घडून येईल असा अंदाज करणें युक्तीस सोडून नाहीं असें मानितात; म्हणजे ते असें मानितात कीं, योग्य प्रकारें चालणारा समाज बनविण्यास जे लोक अत्यन्त योग्य असतील ते पूर्वींप्रमाणें पुढेंहि काळाकाळानें डोकें वर काढितील, आणि कमी योग्य लोकांना एकीकडे सारून पसरत जातील, आणि असें होतां होतां शेवटीं पूर्णपणें योग्य असा मानवी नमुना उत्पन्न होईल.

पण अशा रीतीनें जी ही कल्पना डोळ्यांपुढें उभी राहते तिचें जरा मर्यादित स्वरूपानें आपण ग्रहण केलें पाहिजे. प्राचीनतम काळचीं दगडांच्या हत्यारांचा उपयोग करणारीं जीं माणसें त्यांचा विचार करण्यास आपल्यास कल्पनेनें जितकें मागें जावें लागतें, तितकेंच

जर आपण पुढें गेलों, तर आपल्यास पूर्णपणें उत्तम अशी स्थिति दिसते असें नाहीं, तर तारतम्यानें उत्तम अशी स्थिति दिसून येते. विश्वामध्यें जी सरणी चालू आहे ती परिस्थिति असेल त्याप्रमाणें प्रगति घडवून आणिते, आणि पछेहाटहि करिते. परिस्थितीमध्यें जे अनंत फेरबदल होत जातात त्यांस अनुसरून अनन्त रूपान्तरें होत असतां त्यांमध्यें थोडींशीं रूपान्तरें प्रगतिपर अशीं असतात; कारण त्याबरोबरच इतर देहांमध्यें असे कांहीं फेरबदल होत असतात कीं त्यांस घटनेंतील पुढच्या पायऱ्या असें म्हणतां येत नाहीं; उलट, कधीं कधीं मागच्याच पायऱ्या असें म्हणावें लागतें. उत्क्रान्ति म्हणजे सर्वत्र सुधारत जाण्याचा गूढ कल असा अर्थ होत नाहीं. उत्क्रमण चाललें असतां नीचतराकडून उच्चतराकडे सारखीच प्रगति होते असें नाहीं, तर केवळ कधींकधींच एकादा आकार असा उत्पन्न होतो कीं, जो ज्यास्त संकीर्ण परिस्थितीला ज्यास्त योग्य असल्यामुळें ज्यास्त काळपर्यंत ज्यास्त विविध जीविताचा उपयोग घेऊं शकतो. आणि हा उच्चतर आकार किंवा नमुना नीचतर नमुन्यांवर आपली कडी चालवून त्यांना मागें सारून पसरावयास लागला, म्हणजे ते नीचतर नमुने जीं वसतिस्थानें किंवा जीवनसरण्या ह्या उच्चतर नमुन्यानें बळकावलेल्या नसतील तेथें तगाव धरून रहातात, किंवा पूर्वीहून ज्यास्त हलक्या अशा प्रदेशांत किंवा जीवितसरण्यांत ढकलले जातात, व तेथें त्यांची पीछेहाट होऊं लागते.

ही जी गोष्ट जीवांना लागू आहे तीच समाजांनाहि

लागू असली पाहिजे. प्राचीनकालाप्रमाणें भविष्यत्कालींहि सामाजिक उत्क्रमणामुळें पायरीपायरीनें उच्चतर समाज जरी उत्पन्न झाले पाहिजेत, तरी पुष्कळ समाज हल-क्या स्थितींतच राहिले पाहिजेत. कोठें वाईट हवेंत रा-हण्यास योग्य बनलेल्या, तर कोठें नापीक प्रदेशांत रा-हण्यास योग्य बनलेल्या, आणि कोठें मोठाल्या लोक-वस्त्यांचें पोषण वाईट हवेमुळें किंवा वाईट जमिनीमुळें करण्यास अक्षम अशा प्रदेशांत रहाण्यास योग्य बन-लेल्या लोकांचे बहुतकरून सरल रचनांचे असे लहान-लहानच समाज पुढेंहि राहतील. शिवाय, उच्चतर जातीं-मध्यें भविष्यत्काळीं चढाओढी चालल्या असतां, उच्च-तम माणसांच्या खालच्या पायरीवरचे लोक बहुधा कमी इष्ट अशा प्रदेशांतून रहातील; आणि त्याबरोबरच उ-च्चतम लोक जे प्रदेश हवा व सुपीकपणा ह्या दृष्टीनें इष्ट आहेत ते व्यापून टाकितील. पण अशा रीतीनें ए-कंदर समाजसमूह विविधजातीयत्व वृद्धिंगत करून उ-त्क्रान्तिनियमाची पूर्णता करीत असतां, तद्वतच, प्रत्येक समाजांत परिस्थितिभेद आणि त्यावरून होणारा उद्यम-भेद ह्यांच्या योगानें वैसदृश्यें उत्पन्न होऊन आणखी विविधजातीयत्व उत्पन्न होत असतां उत्क्रमणाचें पहिलें स्वरूप जें संकलीभवन, जें आजपर्यंत ज्यास्त ज्यास्त मोठालीं राष्ट्रें बनण्यांतच दिसून आलेलें आहे, तें सरते-शेवटीं ह्याच्या वरच्याहि पायरीप्रत जाऊन पोहोंचेल, आणि ह्याच्याहून ज्यास्त फायदे करून देईल. प्रथम जेव्हां लहान लहान टोळ्या एकत्र होऊन मोठाल्या टो-ळ्या बनल्या तेव्हां मुख्य नाईक जशा पोट-टोळ्यांतील

लढाया बंद करूं लागला; जेव्हां लहान लहान लष्करी जमीनदारीच्या पद्धतीचीं सरकारें एका मुख्य राजाच्या कह्यांत गेलीं तेव्हां तो ह्या पोट-सरकारांमधील लढाया जशा बंद करूं लागला; तद्वतच, भविष्यत्काळीं, उच्चतम राष्ट्रांचें एक संयुक्त सरकार बनून व तें सगळ्यांवर अधिकार चालवूं लागून, आपल्यांतील पोटराष्ट्रांमधील युद्धें कदाचित बंद करून टाकील, आणि अशा रीतीनें ज्या असल्या राष्ट्रांच्या पुनःपुनः रानटी बनण्यानें सुधारणेचें सारखें नुकसान होत आहे तें रानटी बनणें बंद होऊन जाईल.

हें शांततारक्षक संयुक्तराष्ट्रमंडळ बनलें, म्हणजे स्वभावघटना आणि परिस्थिति-अंतर्गुण आणि बाह्य जरूरी—ह्यांजमधील जो समतोल मानवी उत्क्रमणाच्या शेवटच्या पायरीमध्यें अंतर्भूत होतो त्या समतोलाकडे खरी प्रगति सुरू होईल. सामाजिक स्थितीशीं मानवी स्वभाव अनुरूप बनण्याच्या कामीं सामाजिक तंट्यांनीं हल्लीं वरचेवर अडथळे येत असतात; तसे नंतर न आल्यामुळें तो व्यापार सारखा सुरू राहील; आणि सर्व मोठाले समाज इतर बाबतींत जरी भिन्न राहिले तरी समाजघटकाची स्वतावरची पूर्ण मालकी, आणि समाजाचा त्याच्यावर केवळ निष्क्रियप्रभाव ह्यांच्यापासून उत्पन्न होणारे जे महत्त्वाचे गुणविशेष त्यांच्या बाबतींत ते परस्परसदृश होतील. एकीकडे, अतिक्रमण करण्याच्या वासना सारख्या दबल्या गेल्यामुळें आणि लोककल्याणाची स्फूर्ति करून देणाऱ्या मनोवृत्तींना वळण मिळूं लागल्यामुळें, आणि दुसरीकडे, कमी कमी आ-

वश्यक होणारीं नियंत्रणें नाहींशीं होऊं लागल्यामुळें अशा स्वभावघटनेचा माणूस उत्पन्न होईल कीं तो आपल्या वासनांची पूर्ति करून घेत असतांच सामाजिक जरूरींची पूर्तता करूं लागेल. अगोदरच, परिस्थितीमुळें बाह्य कलहांपासून मुक्त असलेले लहान लहान मनुष्यसमूह सुधारलेल्या युरोपियनांहून इतक्या उच्चतर नैतिकस्वभावघटनेप्रत पोहोंचलेले दिसतात कीं, त्यांच्या चांगुलपणाचा इतिहास अगदीं कादंबरीसारखा वाटतो; म्हणून असा अंदाज करणें सयुक्तिक दिसतें कीं, हल्लीं देखील जी गोष्ट लहान प्रमाणावर बनून आलेली आहे, ती तसल्याच परिस्थितींत, शेवटीं, मोठ्या प्रमाणावर बनून येईल. **साहेब** म्हणतात, सरासरी पन्नास वर्षांपूर्वीं मीं असें म्हटलें होतें:—अखेरीस जो माणूस उत्पन्न होईल तो असा असेल कीं, त्याच्या खासगी गरजा आणि सार्वजनिक जरूरी ह्यांच्यांत पूर्ण मेळ असेल. तो अशा प्रकारचा माणूस असेल कीं तो स्वेच्छेनें आपल्या स्वभावाची पूर्तता करतांकरतांच सहजगत्या समाजघटक या नात्यानें जीं त्याचीं कर्तव्यें तीं करून जाईल; आणि इतर सर्वांनीं तसें करण्यानेंच अशा रीतीनें आपल्या स्वभावाची पूर्तता करण्याचें त्यास सामर्थ्य येईल. **साहेब** म्हणतात, पुष्कळ अध्ययनानें ह्या मतांत वर दर्शविल्यासारखे थोडेसे फेरबदल करण्याची जरी मला आवश्यकता वाटत आहे, तरी त्याच अध्ययनानें वरच्या सारख्या कांहीं लहान लहान समूहांचीं उदाहरणें माझ्या नजरेस आल्यामुळें, तें मत मागें घेण्याची मला जरूरी भासत नाहीं.

धंदेसंस्था

प्रकरण पहिलें
धंदेविषयक सामान्य विचार

१. धंदेसंस्था ह्या समाजामध्यें असणाऱ्या इतर संस्थांपासून भिन्न म्हणून ओळखतां याव्या असा त्यांजमध्यें काय व्यापक विशेष आहे हें सांगणें फार सोपें नाहीं. पण समाजांतील निरनिराळ्या संस्थासमूहांच्या व्यापारांचीं अन्तिम स्वरूपें काय आहेत ह्यांचा विचार केल्यानें एतद्विषयक बरीचशी यथार्थ कल्पना मनांत उत्पन्न होण्यास मदत होणार आहे.

समाज व समाजघटक यांच्या जीवितांना सर्वच प्रकारच्या संस्था सहाय्यभूत होत असतात. ह्यांपैकीं समाज ही इंद्रियघटना संज्ञाविहीन व समाजघटक हे संज्ञायुक्त असल्यामुळें पहिल्याच्या जीवितांचें रक्षण हा गौण उद्देश असून दुसऱ्यांच्या जीवितांचें रक्षण हा प्रधान उद्देश असतो; कारण पहिलें कार्य हें दुसऱ्याचें केवळ साधन असतें. संस्थांचा सर्वांत पहिला व महत्त्वाचा व्यापार राष्ट्राच्या किंवा टोळीच्या जीवितांचें शत्रूंपासून संरक्षण करणें हा असतो. हा उद्देश विशेष चांगल्या रीतीनें साध्य व्हावा एतदर्थ लवकरच जीवि-

ताचें कांहीं नियमन सुरू होतें. लढाई यशस्वी रीतीनें करतां येण्यास लढवय्ये एका नायकाच्या किंवा मुख्याच्या कह्यांत राहणें जरूर असल्यामुळें, व्यक्तिक्रियेचें नियंत्रण करणें जरूर पडतें. आणि सेनानीत्व यशस्वी झाल्यामुळें जेव्हां कायमची नायकी उत्पन्न होते तेव्हां हळूहळू असें आणखी जीवितनियमन उत्पन्न होतें कीं, तेणेंकरून लढाईच्या कामीं लोक जास्तच तयार होतात. अशा रीतीनें परशत्रूंपासून संरक्षण जास्त चांगलें होऊं लागल्यावर मागून नागरिकांचें एकमेकांपासून संरक्षण होऊं लागतें; आणि जे नियम यशस्वी नाईक घालून देतो त्यांस तो मेल्यावर त्याच्या भुतानें केलेल्या म्हणून समजल्या जाणाऱ्या आज्ञांनीं जास्तच जोर येतो. अशा रीतीनें जिवंत राजा व त्याचे मुनीम ह्यांच्या नियंत्रणाबरोबर मृत राजा व त्याचे मुनीम ह्यांचें नियंत्रण हळूहळू उत्पन्न होतें. जीविताचें संरक्षण व नियमन करण्यासाठीं योग्य त्या संस्था उत्पन्न होत असतां त्याबरोबरच जीवितसंधारणाच्या किंवा उपजीविकेचे पदार्थ उत्पन्न करण्याच्या संस्था उत्पन्न होऊं लागतात. प्रथमतः प्रत्येकजण जरी आपल्या स्वतःसाठीं अन्न, वस्त्र, आच्छादन (झोंपडें) संपादन करीत असतो, तरी पदार्थांच्या विनिमयाबरोबर देवघेव सुरू होऊन हळूहळू अशा कांहीं योजना उत्पन्न होतात कीं तेणेंकरून सर्वांच्याच पोषणाचें काम फारच सोपें होतें. पण अशा रीतीनें जीवितसंरक्षण, जीवितनियमन, आणि जीवितपोषण हीं झाल्यावर कोणता सामान्य व्यापार राहिला? जीवितवर्धन हा राहिला; आणि एकंदर धंद्यांचा उद्देश

हें साध्य करणें हा असतो. उदाहरणार्थ, वैद्य दुखणीं बरीं करून, निखळलेलीं हाडें बसवून, वेदना कमी करून व आयुर्मर्यादा वाढवून जीवितसंचय मोठा करितो. गाणीं तयार करणारे व तालसुरांत बसविणारे, आणि तीं गाणारे व वाद्यावर वाजविणारे मनोवृत्तींस उज्वलित करून जीवितसंचय वाढवितात. तद्वत् पौराणिक, नाटकीय, आणि वादनीय काव्यें रचणारे आणि नाटक्ये आपाप-ल्यापरी सानंद मनोवृत्ती उत्पन्न करून जीवितवृद्धि करीत असतात. इतिहासकार आणि वाङ्मयलेखक कांहीं अंशीं मार्ग दाखवून, पण बऱ्याच अंशांनीं त्यांनीं सां-गितलेल्या खऱ्या व काल्पनिक गोष्टींनीं रिझवून माण-सांच्या मनोवृत्ती उचंबळलेल्या करितात, आणि अशा रीतीनें जीवितवृद्धि करितात. वकील जरी प्रत्यक्षरीत्या जीवितवृद्धि करितो असें म्हणतां येत नाहीं, तरी लो-कांनीं केलेल्या अतिक्रमणांस विरोध करण्याच्या कामीं लोकांस मदत करून तो त्यांच्या पोषणास उत्तेजन देतो आणि तेणेंकरून जीवितवृद्धि करितो. शास्त्रज्ञ अनेक शास्त्रीय पद्धति आणि यंत्रयोजना संभवनीय करितो, आणि अनेक बौद्धिक प्रश्न उत्पन्न करून आणि त्यांज-वर प्रकाश पाडून लोकांचें तिकडे लक्ष वेधितो, आणि अशा रीतीनें जीवितवृद्धि करितो. शिक्षक माहिती क-रून देऊन आणि वळण लावून आपल्या शिष्यांस आपले धंदे चांगल्या रीतीनें करण्यास व पैसे मिळवि-ण्यास समर्थ करितो, आणि लिहिण्यावाचण्यापासून हो-णारीं जीं निरनिराळीं समाधानें त्यांचा मार्ग खुला क-रितो; आणि-ह्या दोन्ही रीतींनीं जीवितवृद्धि करितो.

तद्वतच चितारी, मूर्तिकार, शिल्पी, हे सर्व आपण उत्पन्न केलेल्या चिजांनीं सौंदर्यविषयक आनंदरूप मनोवृत्ति व संवेदना उत्पन्न करून जीवितवृद्धि करितात.

२. आतां, धंद्यांची उत्पत्ति कशा रीतीनें होते? उत्क्रांतिविषयक भाषेनें बोलावयाचें असल्यास, पूर्वीं अस्तित्वांत असलेल्या कोणत्या सामाजिकद्रव्यापासून विशिष्टीकरण पावून ते उत्पन्न होतात? सर्व समाजघटना सामान्यतः समस्वरूप अशा गोळ्यांपासून विशिष्टीकरणानें उत्पन्न होतात हें ह्या ग्रंथाच्या पूर्वीच्या भागांतून अनेक रीतींनीं उदाहृत झालेलें सामान्य सत्य ध्यानांत घेऊन, आपण पहिला प्रश्न असा केला पाहिजे कीं, ह्या गोळ्याच्या कोणत्या भागांत धंदेसंस्था मूळ उत्पन्न होतात?

ह्याला निश्चित असें उत्तर हें आहे कीं धंदेसंस्थांचे किंवा त्यांपैकीं कांहींचे मागमोस प्राथमिक राजकीय-धार्मिक संस्थेमध्यें उत्पन्न होतात; आणि त्या संस्थेचे राजकीय व धार्मिक असे विभाग जसजसे होत जातील तशीं धंदेसंस्थांचीं बीजें विशेषतः धार्मिकसंस्थेंत दिसूं लागतात, आणि अखेरीस तीं वाढतात. अगदीं प्रारंभींच्या सामाजिक समूहांत लढाईच्या समयीं हंगामी नायकी उत्पन्न होते आणि जेथें लढाई वारंवार होत असेल तेथें नायकी कायम होते, ह्या गोष्टी ध्यानांत आणतां-तद्वतच, लढाईंत सहक्रिया चांगली व्हावी एतदर्थ त्यास सर्वांनीं नमून वागणें आवश्यक असतें, आणि त्याची नायकी स्थापित झाली म्हणजे हा अंकितपणा लढाईव्यतिरिक्त वेळींहि दिसावयास लागून सामाजिक सहक्रियेस उत्तेजन देतो, ही गोष्ट ध्यानांत

आणतां–तद्भूतच, त्याच्या नेतृत्वाखालीं जेव्हां त्याची टोळी इतर टोळ्या जिंकिते, तेव्हां त्या त्याचें संतर्पण करूं लागतात, आणि त्याच्या टोळीचे लोक त्याची जास्त जास्त दाखाणणी करूं लागून त्याच्या आज्ञा जास्त पाळूं लागतात ही गोष्ट ध्यानांत आणतां--आणि सर्वत्र पिशाचकल्पना रूढ असल्यामुळें जिवंतपणच्या सामर्थ्यापेक्षां मेल्यावर तो जास्त समर्थ दाखवूं शकतो असें लोक समजतात ही गोष्ट ध्यानांत घेतां, जिवंतपणीं जसलीं संतर्पणें ते त्यांचीं करीत असतील त्याच जातींचीं तो मेल्यावरहि चालू ठेवून त्यांत भरहि कां घालितात ही गोष्ट आपल्या लक्षांत येते. प्राथमिक लोक परलोकींचें जीवित अगदीं इहलोकींच्या जिविता-सारखें असें समजत असतात. म्हणून जसें जिवंत नायकास खाद्य व पेय द्यावें लागत असे, तसें त्याच्या थडग्यापाशींहि खाद्य व पेय नेऊन ठेवितात. किंवा त्याजवर ओतित त. तो जिवंत असतां त्याच्यासाठीं प्राणी मारावे लागत असत म्हणून मेल्यावर त्याच्या थडग्यापाशीं प्राण्यांचे बळी ते देतात. तो जर जिवंतपणीं मोठ्या परिवारानें युक्त असा राजा असेल. तर त्याच्या व त्यांच्या पोषणासाठीं त्याच्या जिवंतपणीं जशी अनेक जनावरें मारावीं लागत असत, तशीं त्याच्या व त्यांच्या भुतांच्या पोषणासाठीं गुरें व बकरीं ह्यांचे शेंकडे च्या शेंकडे बळी देतात. जर तो नरमांसभक्षक असेल, तर त्याला जशीं जिवंतपणीं माणसें मारून खावयास देत असत तशीं मेल्यावरहि देतात. आणि त्यांचें रक्त त्याच्या थडग्यावर किंवा वेदीवर ओततात. ह्या

लोकीं त्याला नोकरांची जरूरी होती म्हणून परलोकीं-हि असेल असें समजून पुष्कळ वेळां त्यांस त्याला पुरते वेळीं किंवा मागाहून मारितात. त्याच्या बायकांस त्या-च्या प्रेतविधींचे वेळीं जेथं मारण्याची चाल नसेल तेथं त्यांच्या देवळंत मुरळ्या ठेवण्याची चाल उत्पन्न होते. जिवंतपणीं अंकितपणा दर्शविण्यासाठीं लोक जसे त्या-च्या वाड्यावर त्यास भेटण्यास जात असतात तसे आ-तां ते त्याच्या थडग्याला किंवा देवळाला यात्रा करा-वयास जाऊं लागतात; आणि त्याच्या तक्तापुढें ठेव-ण्याच्या नजराण्यास त्याच्या देवळांतील भेटींचें स्वरू-प येतें. साष्टांग प्रणिपात, गुडघे टेंकणें, वगैरे नमनप्र-कार, आणि डोकें वगैरे निरनिराळे शरीरभाग उघडे करण्याचे प्रकार, जे जिवंतपणीं त्याच्यापुढें होत असत ते आतां त्याच्या थडग्यानजीक किंवा समाधीचे ठि-काणीं त्याच्या पूजेचे वेळीं सुरू होतात. तो जिवंत असतां ज्या त्याच्या स्तुती होत असत त्या किंवा त्याच्याहून ज्यास्त स्तुती तो मेल्यावरहि होऊं लागतात. जें नाचणें प्रथम त्याच्यासमक्ष आनंदप्रदर्शक म्हणून आपोआप होऊन मागून विधिस्वरूप बनतें, तें त्याच्या प्रेतपूजे-च्या समयीं विधि म्हणूनच चालू राहतें. आणि नाच-ण्याबरोबरचें जें वादन त्याचेंहि असेंच होतें; वाद्य व कंठ दोन्हींतूनहि निघणारें गानवादन जसें नैसर्गिक शास्त्यापुढें होत असतें तसें निसर्गोत्तरशास्त्यापुढेंहि होऊं लागतें.

राजकीय निष्ठा आणि दैविक पूजा ह्या दोहोंलाहि सा-मान्य अशा ज्या ह्या कृति व त्या करणाऱ्या संस्था त्यांपैकीं कोणतीचेहि गुणविशेष जर धंदेविषयक कृती

व संस्था ह्यांशीं सदृश असतील, तर ह्या धंदेविषयक कृतींचीं व संस्थांचीं दुबार मुळें राजकीय धार्मिक अशा संस्थेमध्यें आहेत असें म्हटलें पाहिजे, हें उघडच आहे. तद्वत् हेंहि उघडच आहे कीं, ह्या दोन जुळ्या संस्थांच्या वाढणाऱ्या विभिन्नीभवनाबरोबर, धार्मिक संस्थेची वाढ ज्यास्त विस्तृत व भव्य होत गेली, तर ह्या धंदेविषयक कृती व संस्था तिच्यासंबंधानेंच विशेष वाढ पावतील.

२. राजकीय व धार्मिक दोन्ही प्रकारच्या सेवांमध्यें येणाऱ्या कांहीं कृती व संस्था वर दाखविलेल्या प्रकारच्या आहेत. दृश्य राजा व अदृश्य देवभूत राजा ह्यांच्या संतर्पणांपैकीं कांहीं जरी अर्थात् त्यांच्या जीवितपोषणासाठीं असतात, तरी इतर कांहीं जीवितवृद्धीसाठीं असलींच पाहिजेत; उदाहरणार्थ, स्तुत्या, गाणीं, इत्यादिकांनीं त्याच्या मनोवृत्ती तृप्त होत असल्या पाहिजेत व तेणेंकरून त्यांची जीवितवृद्धि झालीच पाहिजे. आतां हें उघडच आहे कीं, हीं स्तुतिपर संभाषणें, स्तोत्रें, नाटकें, आणि तशींच देवळांतील चित्रें व खोदीव कामें करणारे लोक, देवांचे जे कायमचे संतर्पक, म्हणजे उपाध्ये, त्यांच्यासंबंधानेंच उत्पन्न होतील.

ह्या गोष्टीमध्यें अंतर्भूत होणारे धंदे, आणि वकील, शिक्षक, इत्यादिकांचे त्यांत न येणारे धंदे, ह्यांची उत्पत्ति धार्मिक संस्थांमध्यें होते ह्याचें आणखी एक कारण असें आहे कीं, उपाध्येवर्गच प्रथम इतर वर्गांहून ज्ञान व बुद्धिसामर्थ्य ह्या बाबतींत ज्यास्त प्रसिद्ध असतो. उपाध्याची किंवा वैद्याची लुच्चेगिरी, चातुर्य, वस्तुस्वभावज्ञान इत्यादि गुणविशेषांमुळें त्याचें वजन इतर

लोकांवर सहज बसतें. आणि तें वजन कायम राख-ण्यासाठीं, ज्या उद्योगांस आपण धंदेविषयक म्हणून म्हणतों ते करण्यास समर्थ करणारें मानसिक वळण व सामर्थ्य संपादन करण्यासाठीं तो नेहमीं झटत असतो.

ही गोष्ट होण्यास दुसरं एक कारण असें होतें कीं. उपाध्येवर्गाला जीवितसाधन इतर वर्गांकडून प्राप्त होत असल्यामुळें त्यास ह्या गोष्टी साध्य करण्यास फु-रसत मिळत असते; आणि त्या फुरसतीचा. उपयोग इतर उद्योगांपेक्षां धंदेविषयक उद्योगांला जें बौद्धिक वळण व शिक्षण ज्यास्त जरूर आहे तें मिळाविण्याच्या कामीं तो वर्ग करीत असतो.

धंदेविषयक संस्थांचें स्वरूप आणि उगम ह्यांबद्दल-च्या ह्या सामान्य कल्पना आपणास आतां प्राप्त झाल्या असल्यामुळें, धंद्यांची ऐतिहासिक वृद्धि दाखविणाऱ्या ज्या गोष्टी त्यांचें महत्त्व लक्षांत घेण्याची आपली त-यारी झाली आहे; म्हणून पुढच्या प्रकरणापासून त्या उद्योगास लागूं.

प्रकरण दुसरें

वैद्य व शस्त्रवैद्य

प्रस्तुत शास्त्राच्या पूर्व भागाच्या दुसऱ्या प्रकरणांत ह्या सामान्य सत्यांचीं उदाहरणें दिलीं आहेत कीं, रा-नटी टोळ्यांतून उपाध्या व वैदू हे निरानिराळे म्हणून ओळखण्याची मारामार पडते. अशा ह्या टोळ्यांतून

ह्या दोघांचींहि कामें बहुधा एकच माणूस करीत असतो. ह्याबद्दल एथें आणखी कांहीं उदाहरणें देऊं.

हम्बोल्ट म्हणतो कीं, क्यारिबी लोकांत मारिरी हे उपाध्ये, जादूगार व वैद्य ह्या सर्वांचीं कामें करितात. तुपी लोकांत पेई हे तींच कामें करीत. आतां दक्षिण अमेरिकेंतून उत्तर अमेरिकेकडे जातां आपल्या असें नजरेस पडतें कीं, क्यारिअरलोकांस औषधींची व वनस्पतींची बहुतेक मुळींच माहिती नसते; त्यांचा उपाध्या किंवा जादूगार त्यांचा वैद्यहि असतो. आणि डाकोटा लोकांबद्दल स्कूलक्राफ्ट असें म्हणतो कीं, त्यांचा उपाध्या भविष्यवादी व वैद्य असतो. आपल्या एशियामध्यें असलाच संबंध दृष्टीस पडतो. दक्षिण हिंदुस्थानांत कुसंबा लोक बडगा लोकांमध्यें वैद्याचा धंदा करितात; आणि ते त्यांच्या विवाह व मृत्युसमयीं उपाध्येपणाहि करितात उत्तरेकडेहि असेंच आहे. मोंगोलियामध्यें देशी वैद्य फार आहेत; ते बहुतेक लामा किंवा उपाध्ये असतात. आफ्रिकेमध्येंहि असेंच आहे. उदाहरणार्थ, रीड असें सांगतो कीं, मध्यआफ्रिकेमध्यें वस्तुदेवपूजक वैद्य, उपाध्या, व जादूवाली शोधून काढणारा असतो.

हीं उदाहरणें, व प्रस्तुत शास्त्राच्या गत भागांत व पहिल्या भागांत दिलेलीं उदाहरणें ह्यांवरून असें दिसतें कीं, प्रारंभींच्या समाजांमध्यें ह्या दोन कामांचा ऐक्य सामान्यत सर्वत्र दिसत असतो.

५. ह्या संयोगाचें मूळ हें आहे कीं, प्राथमिक वैद्य आणि प्राथमिक उपाध्या दोघेहि कल्पित निसर्गोत्तर स

त्यांशीं व्यवहार करीत असतात; आणि ह्या दोघांच्या संबंधानें लोकांच्या मनामध्यें जो गोंधळ होतो त्याचें कारण ह्या कल्पित सत्त्वांच्या स्वभावाबद्दलची जी कल्पना ती होय; त्या कल्पनेप्रमाणें कांहीं भुतें नेहमींचींच दुष्ट म्हणून समजलीं जातात, आणि कांहीं जरी नेहमीं सुष्ट असलीं तरी रागावलीं म्हणजे संकटें उत्पन्न करितात असें समजत असतात.

दुष्ट भुतें मुख्यत्वेंकरून रोग उत्पन्न करितात अशी रानट्यांची समजूत असल्यामुळें त्यांच्याशीं व्यवहार करणारा जो वैद्य तो कांहीं अंशीं रोग्यांस स्वाभाविक उपचार करितो, पण मुख्यत्वेंकरून भूत काढण्याच्या ह्या किंवा त्या पद्धतीचा तो अवलंब करितो. उदाहरणार्थ, चिपिवाज लोकांबद्दल कीटिंग असें म्हणतो कीं, त्यांच्यांत रोग्यांची शुश्रूषा योग्य उपायांच्या योजनेपेक्षां योग्य मंत्रतंत्राच्या योजनेवर ज्यास्त अवलंबून असते. नूटकासौंड एथील लोकांमध्यें रोग हे आत्म्याची गैरहजिरी किंवा दुसरा कांहीं अनियमितपणा किंवा दुष्ट भुतांचा प्रभाव ह्यांपासून उत्पन्न होतात असें नेहमीं समजतात; म्हणून आत्म्यास परत बलाविणें किंवा भुतास संतर्पिणें ह्या गोष्टींकडे सर्व उपायांची योजना असते. तद्वतच उकानागन लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, आजार जोरावर आला किंवा कशामुळें तें समजत नाहींसें झालें, म्हणजे रोग्यास औषधोपचार करण्याचें अजीबाद सोडून देतात, आणि वैद्यला त्याजवर जादूटोणा करावयास सांगतात.

रोगांचें कारण निसर्गोत्तर असतें ह्या समजुतीवरून

आणखी कांहीं रूढी उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, क्यारेन्स लोकांविषयीं असें सांगतात कीं, त्यांच्यांत एकादा नागूस आजारी पडला म्हणजे कोणत्या भुतानें तो आजार उत्पन्न केला आहे, व त्यास प्रसन्न करण्यासाठीं काय बळी दिला पाहिजे हें वैद्य फी घेऊन सांगतो. ऑराकेनियन लोकांमध्यें वैद्य खरी किंवा खोटी समाधी लावून, भुतांशीं बोलणें लावल्याचें ढोंग करितो आणि समाधींतून उठल्यावर रोगाचें स्वरूप व स्थान हीं सांगतो, आणि त्यास औषध देतो, आणि त्याबरोबरच रोग झाला असेल तेथें हातवारे करितो. आणि रोगाचें बीज बाहेर काढून मोठ्या दिमाखानें दाखवितो. बाहेर काढतो तो कोळी, बेडूक वगैरे कांहींतरी प्राणी असतो, व तो त्यानें पूर्वी काळजीपूर्वक लपवून ठेविलेला असतो.

ताहितियन वैद्य हे नेहमीं उपाध्ये व मांत्रिक असून त्यांच्याबद्दल एलिस असें म्हणतो कीं, कोणी आजारी पडलें कीं त्यांस फी मिळत असे, व तिचा कांहीं भाग देवांचा म्हणून समजला जाई; व त्याचें कारण हें कीं, देवांनीं रोग आणिला असल्यामुळें त्यांस संतुष्ट करण्यास कांहीं तरी देणें ते आवश्यक समजत. त्यांच्याहून पुढें गेलेल्या लोकांतहि असल्या कल्पना दिसून येतात. उदाहरणार्थ, गिलमोर म्हणतो कीं, मोंगललोक औषध व प्रार्थना ह्यांची कचितच फारकत करितात, आणि साध्या वैद्यापेक्षां भटवैद्य चांगला म्हणून ह्यासाठीं समजतात कीं, तो एकीकडे जसा औषध देऊं शकतो तसा दुसरीकडे धार्मिकविधी करूं शकतो. ह्यापासून उपा-

ध्याच्या वैद्यगिरीची उत्पत्ति होते. रोग जेव्हां क्रुद्धदेवांनीं उत्पन्न केलेला नसेल तेव्हां तो शरीरांतील भुतांनीं उत्पन्न केला म्हणून समजतात, व त्यांस तें शरीर राहण्यास असह्य करून किंवा श्रेष्ठ भुतांस आव्हान करून, तीं ते काढून टाकितात.

पण पुष्कळ वेळां असें होतें कीं जादूटोणेवाला जरी कधीं कधीं वनस्पत्यादि औषधींचा उपयोग करीत असतो, तरी तो त्यांचे जे भौतिक किंवा रासायनिक गुण त्यांच्या दृष्टीनें करीत नाहीं, तर त्यांच्या ठिकाणीं पिशाचें वसतात ह्या समजुतीवर करितो. म्हणून त्याच्यापासून आधुनिक वैद्यची उत्पत्ति होते असें म्हणतां येत नाहीं.

सारांश, वैद्याची जी उत्पत्ति होते ती वास्तविक उपाध्यापासून, म्हणजे. देवांस संतोषविणाऱ्या उपाध्यापासून होते; व ही गोष्ट आपल्या लवकरच निदर्शनास येईल.

६. लहान व कांवळ्या समाजांचा वैद्य हा जसा विशेषक आहे, तसा वास्तविक उपाध्या हा संयुक्त समाज व स्थाईक राजकीय शासन ह्यांचा विशेषक आहे. गतभागाच्या तिसऱ्या ते पांचव्या प्रकरणांत असें दाखविलेंच आहे कीं. प्रारंभीं प्रत्येक कुटुंबांतील आईबापांच्या व इतरांच्या भुतांचें संतर्पण आप्तजन करीत असतात, व त्यावरून असें व्यक्त होतें कीं, प्रारंभीं उपाध्यायिक व्यापार कुटुंबामध्यें प्रसृत असतो; नंतर लवकरच हा व्यापार कुटुंबांतील सर्वांत वडील पुरुषाकडे जातो; पुढें जेव्हां नायकी स्थाईक व वंशपरंपरागत होते तेव्हां जिवंत नाईक मृत नायकाच्या भुताला बळी देऊं लागतो, आणि कधीं कधीं ते बळी तो लोकांच्या व-

तींनें देतो;" अशा रीतीनें हुद्देदार उपाध्यायाची उत्पत्ति होते. आणि जित टोळ्यांशीं संयोग होऊन समाज जसे मोठे होत जातील. आणि नायकाच्या सत्तेस राजकीय सत्तेचें स्वरूप येऊन. जित टोळ्यांवर ती जशी पसरेल आणि ह्या टोळ्यांवर पोटशास्त्र्यांची जशी स्थापना होत जाईल. व ते मूळचा धर्म तेथें जसा स्थापीत जातील तसा अशा प्रकारचा उपाध्येवर्ग उत्पन्न होतो कीं, त्यास स्वतंत्र ज्ञातीचें स्वरूप येतें, आणि ती ह्या जेत्यांच्या धर्माची संस्था होऊन, पूर्वी दाखविल्याप्रमाणें तिच्या-मध्यें विद्येची उत्पत्ति होते.

ह्या विद्येपासूनच औषधींच्या ज्ञानाची वृद्धि होते, व त्यांचा गुण दैविकरीत्या येतो असें समजण्याचें लोक हळूहळू सोडून देऊं लागतात. हें कसें होत जातें हें प्रारंभींच्या सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें दिसून येतें. उदाहरणार्थ, प्राचीन इजिप्शन लोकांविषयीं मॅस्पेरो असें म्हणतो कीं, "ह्या लोकांत दुखणें बरें करणारांचे कित्येक वर्ग बनलेले आहेत. कांहींची प्रवृति जादू करण्याकडे असते, आणि ते मंत्र, गंडे इत्यादिकांचाच उपयोग करितात. दुसरे कांहीं औषधींचा उपयोग चांगला म्हणून म्हणतात; म्हणून ते वनस्पती व धातू ह्यांच्या गुणधर्मांचें निरीक्षण करितात; आणि ते पदार्थ केव्हां आणावे व रोग्यास केव्हां द्यावे, हें ठरवितात. सर्वांत उत्तम वैद्य आहेत ते ह्या दोन पद्धतींपैकीं अमकीचाच उपयोग करूं म्हणून आपल्यास बांधून घेत नाहींत; तर ते रोगी पाहून औषधी उपचार आणि मंत्रतंत्र ह्या दोहोंचाहि उपयोग करितात. ते बहुधा उपाध्ये असतात.

पुढें तेथें वैद्यकी करणाऱ्या उपाध्यांचा इतर उपाध्यांपासून भिन्न वर्ग झालेला दृष्टीस पडतो. ''

बाबिलोनिया व आसीरिया एथें ह्या संबंधानें स्थिति काय होती ह्याबद्दल इतका स्पष्ट पुरावा सांपडत नाहीं. पण प्रोफेसर साइस म्हणतो कीं, त्या दोन देशांत वैद्य ही पुष्कळ दिवसांची संस्था होती. पुष्कळ लोक आजारी पडले म्हणजे मंत्रतंत्र करीत, व भुतांनीं आजार उत्पन्न केले म्हणून म्हणत, हें खरें आहे. पण सुशिक्षितांची संख्या वाढत असून ते मंत्रतंत्राकडे न जातां वैद्याकडेच औषधासाठीं जात.

हीब्रू लोकांमध्यें सहजच अशी स्थिति दृष्टीस पडते. त्यांच्यांत ईश्वराची प्रार्थना करणें, पापाबद्दल पश्चात्ताप करणें, मन शुद्ध करणें, वगैरे गोष्टी सांगितल्या असून वैद्याकडे जाण्यासहि सांगितलेलें आढळतें.

हिंदू व बुद्ध लोकांत वैद्यकाची उत्पत्ति देवांपासून झालेली आहे असें स्पष्टरीत्या सांगितलेलें आढळतें, आणि ग्रीक लोकांतहि तसाच पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, ग्रोट म्हणतो कीं, तेथील वैद्यकी करणारीं कुटुंबें आस्क्लेपियस नांवाचा जो त्यांचा वैद्यदेव त्याच्या देवळांजवळ रहात असून ते त्यास आपला प्रत्यक्ष पूर्वज म्हणून समजत. पुढें त्या धंद्याचें धार्मिक स्वरूप जाऊन त्यास व्यावहारिक स्वरूप आलेलें दृष्टीस पडतें. ग्रोट म्हणतो:—''उपाध्येवर्ग व वैद्यकीचा धंदा ह्यांच्या मधील संबंध नंतरच्या काळीं कमी कमी निकट झालेला दिसतो; आणि त्याबरोबरच औषधीवैद्य, शस्त्रवैद्य, इत्यादि त्या वर्गामध्यें पोटभेद झालेले आढळून येतात.''

रोमन लोकांत प्रारंभीं प्रारंभीं वैद्यवर्ग नव्हता तेव्हां आजार दैविक कारणांनीं उत्पन्न होतात म्हणून समजन्त अशाबद्दल संमिश्र पुरावा सांपडतो; आणि ते बरे करण्यास ते संतपर्णाचा उपयोग करीत असत. विशिष्ट रोग विशिष्ट देव उत्पन्न करितात किंवा बरे करितात ह्या समजुतीवर त्यांचीं संतर्पणें ते करीत; आणि म्हणून "फ्रेब्रिस" (तापाचा देव) "कार्न्स" वगैरे देवांस ते बळी देत. टैबर नदींतील बेटांत प्रथमपासूनच रोग बरे करणारा एक स्थानिक देव असून तेथें इस्कुलेपियस् देवाचेंहि भक्तमंडळ उत्पन्न झालें; आणि एकादा सांथीचा रोग उत्पन्न झाला म्हणजे लोक त्याचा धांवा करीत. ह्यावरून, उघडच, इतरत्रप्रमाणें रोम एथेंहि वैद्यकीचें उपाध्येगिरीशीं प्रथम साहचर्य होतें. पुढें रोमनें जिंकलेल्या लोकांमधील खरे किंवा मानीव हुशार वैद्य रोममध्यें वैद्यकी करूं लागले. ते तेथील श्रीमंतांच्या आश्रयानें प्रथम पुष्कळकाळपावेतों रहात असत; पुढें ते स्वतंत्र राहूं लागले. अशा रीतीनें तेथें तो धंदा परक्यांच्या हातीं गेला. इतिहासकार **मॉम्सेन** म्हणतो:—

"५३५ सालीं **आर्कागाथस** नांवाचा ग्रीक वैद्य रोममध्यें येऊन राहिला, आणि तेथें आपल्या शस्त्रप्रयोगांनीं इतक्या प्रसिद्धीस आला कीं त्याला सरकारतर्फे राहावयास घर दिलें, आणि रोमच्या नागरिकाची पदवी दिली. नंतर तेथून दुसरे पुष्कळ वैद्य तेथें रहावयास आले; आणि अशा रीतीनें हा अत्यन्त फायदेशीर धंदा पुष्कळकाळपावेतों केवळ परक्यांच्याच हातीं राहिला."

७. ख्रिस्ती धर्म पहिल्यापासून मूर्तिपूजक धर्माच्या

विरुद्ध असल्यामुळें, आपणांस असें वाटण्याचा संभव आहे कीं, तो धर्म प्रबल झाल्यावर उपाध्येगिरी आणि वैद्यकी यांचा संबंध तुटला असेल. पण मानवी मनोभाव व समज ह्यांचीं मुळें विशिष्ट धर्ममतांच्या मुळां हून ज्यास्त खोल गेलेलीं असतात, आणि म्हणून जुन्या धर्ममतांबद्दल नव्यांची वरवर स्थापना झाली तरी ते कायम राहून पुनः जीव धरण्याचा संभव असतो. म्हणून सर्वत्र ख्रिस्तीधर्माचीं स्वरूपें आणि मतें ह्यांत मूर्तिपूजक धर्माच्या रूढी व कल्पना ह्यांनीं फेरबदल झालेला आढळून येतो. अशा रीतीनें गोगांचा उद्भव दैविक आहे ही मूळ कल्पना ख्रिस्त्यांमध्येंहि जीव धरून राहिली, आणि म्हणून उपाध्येवर्गाची त्या कामीं जरूरी राहिली. प्रारंभींच्या ख्रिस्त्यांनीं बांधिलेल्या अनेक इस्पितळांबद्दल आपण असें वाचितों कीं. तीं बहुधा मठांच्या ताब्यांत असत: उदाहरणार्थ, आलेक्झांड्रिया पृथिल इस्पितळ सेंट (संत) इसिडोर ह्याच्या देखरेखीखालीं होतें, आणि कॉन्स्टँटिनोपल एथील इस्पितळ प्रथम सेंट झॉटिकस आणि मागाहून सेंट सॅम्सन ह्याच्या देखरेखीखालीं होतें सारांश, रोग व त्यांचे उपाय ह्यांबद्दलच्या ज्या मूर्तिपूजकांच्या कल्पना त्या ख्रिस्त्यांच्या वेळीं पुनः आपलें प्राबल्य स्थापिल्या झाल्या. उदाहरणार्थ, स्पॅनगेल म्हणतो कीं. सहाव्या शतकानंतर मठाधिपतीच वैद्यकीचा धंदा करीत असत. ते प्रार्थना, धर्मार्थ मेलेल्यांचे अवशेष, पवित्रजल, इत्यादिकांनीं रोग बरे करीत. ही गोष्ट मध्ययुगामध्येंहि सुरूच होती हें यावरून दिसतें कीं, उपाध्यांच्या योग्य कामांत त्या-

मुळें फार व्ययत्यय येऊं लागून बाराव्या व तेराव्या शतकांत त्यांनीं वैद्यकी सोडून द्यावी म्हणून हुकूम सुटलेले आढळून येतात. तथापि ती फ्रान्स व इतर देशांत. पुढें बरींच वर्षें चालू राहिल्याचें आढळून येतें; आणि पुढें पंधराव्या शतकांत वैद्यांना जेव्हां लग्नें करण्याची परवानगी दिली, तेव्हांच उपाध्यांची वैद्यगिरी कमी होऊं लागली.

खुद इंग्लंडमध्यें देखील हा संबंध दिसून येतो. उदाहरणार्थ, १४९६ मध्यें वैद्यगिरीचा धंदा कांहीं अंशीं उपाध्यांच्याच हातीं होता. आठव्या हेन्रीच्या वेळीं तो तसाच होता हें ह्यावरून दिसतें कीं, त्याच्या कारकीर्दीच्या तिसऱ्या वर्षीं असा कायदा पास झाला कीं लंदनच्या आसपास सात मैलांमध्यें लंदनच्या बिशपाच्या आणि इतरत्र त्या त्या कौंटींच्या बिशपाच्या परीक्षे व परवानगीविना कोणीं वैद्यकीचा धंदा करतां कामा नये. आणि १८५८ सालापर्यंत वैद्यकीच्या सनदा देण्याचा अधिकार क्यांटर्बरीच्या बिशपाकडे होता. सारांश, शरीराचे रोग बरे करणारा आणि आत्म्याचे रोग बरे करणारा ह्यांमध्यें विभिन्नीकरण होण्यास रानटी लोक सुधारत जातील तेव्हां जी सुरवात होते तें काम हळूहळूच पुरें होत जातें.

८. ह्यासंबंधानें समाज व रूढी पूर्वापार कशा चालत आल्या आहेत व अद्यापि कायम राहिल्या आहेत हें पाहावयाचें असल्यास ख्रिस्ती लोक कांहीं रोगांची उपपत्ति अद्यापि कशी लाबितात हें ध्यानांत आणावें; आणि ते कांहीं रोगांना उपचार काय करितात आणि

त्यांबद्दल त्यांच्या समजुती काय आहेत, हेंहि पाहवें.

उदाहरणार्थ, पुष्कळ लोकांचा असा समज आहे कीं, सांथीचे रोग देवाच्या रागामुळें उत्पन्न होत असतात; आणि कोणी एकाएकीं मेल्यास तो देवाच्या अवकृपेनें मेला म्हणून जो पंचलोक निकाल देतात त्यावरूनहि तीच गोष्ट व्यक्त होते. शिवाय हा समज कायम ठेवण्याचा कांहीं पाद्र्यांचा कृतसंकल्पच दिसतो. कारण कांहीं वर्षांपूर्वीं असें जेव्हां कोणीं सुचविलें कीं, इस्पितळांतील रोग्यांचे दोन वर्ग करावे; ज्यांच्याबद्दल प्रार्थना करावयाची अशांचा एक वर्ग, व इतरांचा एक वर्ग; तेव्हां तिजबद्दल त्यांस फार राग आला. सारांश, प्रार्थनेपासून रोग्यास गुण पडतो हा समज खरा असो वा खोटा असो. तो कायम ठेवण्याचा त्यांचा निश्चय होता.

तद्वतच अजून देखील फेंपरें हा रोग अंगांत भूत येऊन होतो असें समजतात; आणि अशा प्रकारचे रोग बरे करण्यासाठीं रोमन क्याथलिक लोकांत मंत्रतंत्र करितात. नव्या करारांत हा समज बरोबर आहे असा उल्लेख असल्यामुळें सगळेच भाविक ख्रिस्ती त्याजवर विश्वास ठेवितात; आणि ग्लाडस्टन सारख्या विद्वान् माणसानें देखील तो समज टाकून दिलेला नव्हता.

रोगविषयक प्राथमिक कल्पना अद्यापि कशी जिवंत राहिली आहे ह्याचें आणखी एक उदाहरण सांगण्यासारखें आहे. रोग उत्पन्न करणारें भूत अंगांतून हांकून लाविलें पाहिजे ह्या समजुतीचा प्रभाव रोग्याच्या शुश्रूषेमध्यें परवांपर्यंत दिसत होता; आणि अजून देखील औषधोपचाराबद्दलच्या पुष्कळांच्या कल्पनांत तो दिसून

येतो. प्राथमिक वैद्य रोग्याचें शरीर भुतांस राहण्यास असह्य करावें एतदर्थ त्याला भयंकर, दुःखदायक, किंवा ओकारी आणणारे उपचार करीत असे. तो त्याच्यापुढें उभा राहून भयंकर आवाज किंवा अंगविक्षेप करीत असे, किंवा असह्य जाळ करीत असे, किंवा न सोसवेल असे दुर्गंध उत्पन्न करी, किंवा त्यास अत्यन्त घाणेरडे पदार्थ गिळावयास लावी. अर्धवट सुधारलेल्या हीब्रू लोकांत देखील अशा प्रकारची कल्पना होती असें दिसतें. आणि औषध जितकें ज्यास्त किळसवाणें तितकें ज्यास्त गुणकारक ही कल्पना मध्ययुगीनच केवळ नव्हे तर आधुनिक लोकांत देखील होती ह्याबद्दल पुष्कळ पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, हत्तीची विष्टा, कांसवाचा डावा पाय, जमिनींतील मोराचें काळीज, उंदराच्या वाळक्या लेंड्या, इत्यादि ज्या विलक्षण औषधांचा मॉन्टेनच्या वेळचे डाक्टर उपयोग करीत त्यांची त्यानें टर केलेली आढळते; व्हिकारीच्या शारीरावरील पुस्तकांत "भोळ्या माणसाच्या लुच्चया पोराचें पांच चमचे मूत" ह्या औषधाला उल्लेख सांपडतो; आत्महत्या केलेल्याच्या नरवटींतून पाणी प्याल्यानें किंवा खुन्याचें रक्त प्याल्यानें फेंपरें जातें, माणसाच्या नरवटीवर वाढलेली शेवाळ वाळवून तिची तपकीर ओढिली तर डोकेंदुखी बरी होते. आणि फांशीच्या खांबाचीं सालें व फांसाची दोरी ह्यांच्यांत औषधीचे गुण आहेत, इत्यादि समज आढळून येतात. अशा प्रकारचे समज हल्लींहि अशिक्षित व अननुभविक ह्यांच्यांत आहेतच; ते इतके कीं, औषध गोडहि असूं शकेल ही गोष्ट त्यांस संभवनीयच वाटत नाहीं.

२. एकंदर उत्क्रान्तीप्रमाणें, सेंद्रियं उत्क्रान्तीप्रमाणें, आणि इतर प्रकारच्या सामाजिक उत्क्रमंणाप्रमाणें, ह्या उत्क्रमणामध्येंहि प्राथमिक विभिन्नीभवनांबरोबर दुय्यम विभिन्नीभवनें उत्पन्न होऊं लागतात. म्हणून धार्मिक संघटनेपासून वैद्यसंघटना भिन्न होत असतां, त्या संघटनेमध्येंहि पोटभेद उत्पन्न होतात.

औषधीवैद्य आणि शस्त्रवैद्य ह्यांच्यामधील भेद सर्वांत ज्यास्त ठळक असतो. ह्याला कारण काय झालें ह्याबद्दल घोंटाळा उत्पन्न होण्यास अनेक कारणें झालेलीं आहेत, आणि आलीकडे तर त्यांच्यांत ज्यास्त भेद न होतां संयोगच होत आहे. सामान्य रोगांची शुश्रूषा व औषधींचा उपयोग ह्या दोन गोष्टी ते दोघेहि करीत आले आहेत; आणि दोघांचींहि कामें करणारास सामान्यतः डाक्टर ही पदवी लाविताते. हल्लीं औषधोपचार व शस्त्रक्रिया ह्या दोन्ही शास्त्रांत पदवी मिळविण्याचा प्रघात सामान्य झालेला आहे, आणि अशा रीतीनें ह्या दोन पोटधंद्यांचा संयोग होत आहे. पण त्याबरोबरच हे दोन पोटधंदे इतर पोटधंद्यांपासून ज्यास्त ज्यास्त विभक्त होत आहेत; उदाहरणार्थ, औषधें तयार करून देणारे तीं लिहून देणारापासून भिन्न होत आहेत.

पण आपण अगदीं प्रारंभींच्या पायऱ्यांवर गेल्यास उत्क्रमणपद्धतीशीं हा भासमान विरोध नाहींसा होतो. औषधीवैद्य व शस्त्रवैद्य ह्यांच्यामधील भेद विभिन्नीभवनानें उत्पन्न झालेला नाहीं, तर तो प्रारंभींच स्थापन झालेला आहे. कारण दोघांचा उद्देश जरी शारीरिक रोग बरे करण्याचा असे तरी त्यांतला एकजण दैविक कार-

णांनीं उत्पन्न झालेले रोग बरे करितो, व दुसरा स्वाभाविक कारणांनीं उत्पन्न झालेले बरे करितो, अशी समजूत असे. म्हणजे त्यांतला एकजण भुतांनीं एकाद्यास पछाडून उत्पन्न केलेले रोग व दुसरा माणसें, जनावरें, जडपदार्थ ह्यांनीं केलेल्या जखमा बऱ्या करितो अशी समजूत असे. म्हणून प्रारंभींच्या सुधारलेल्या राष्ट्रांतून ह्या दोघांमध्यें कमज्यास्त स्पष्ट भेद दिसून येतो. उदाहरणार्थ, अरब लोकांत वैद्यक, शारीर, आणि औषधोपचार असे तीन स्पष्ट धंदे असत म्हणून म्हणतात; ख्रिस्तीशकापूर्वीं इजिप्शन लोकांतहि औषधीवैद्य व शस्त्रवैद्य ह्यांच्यांत भेद असे असें दिसतें. ग्रीक लोकांत हा विभाग नव्हता. त्यांच्यांत तिन्ही गोष्टी एकटाच करीत असे. यूरोपांत मध्ययुगांत उपाध्ये औषधांची यादी करून देत, व तीं तयार करण्याचें काम इतर लोक करीत, व शस्त्रक्रिया न्हावी करीत असें दिसतें.

ह्या मुख्य विभिन्नीकरणांबरोबर पोटविभिन्नीकरणें होत गेलेलीं दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ, प्राचीन हिंदुस्थानांत बधव कान व नाक ताळ्यावर आणण्याची विद्या हा शस्त्रक्रियेचा एक पोटभेद झालेला आढळून येतो. प्राचीन संस्कृत ग्रंथांतून १२७ निरनिराळ्या शस्त्रांस उल्लेख केलेला दृष्टीस पडतो; व एकंदर वैद्यकावर आणि त्याच्या निरनिराळ्या शाखांवर अनेक ग्रंथ आढळांत येतात. प्राचीन ईजिप्तमध्यें अशीच स्थिति असे. त्यासंबंधानें हिरोडोटस असें म्हणतो कीं, त्यांच्यांत प्रत्येक रोगांचा निराळा वैद्य असे; उदाहरणार्थ, डोळ्याचे वैद्य, डोक्याचे वैद्य, दांताचे वैद्य, पोटाचे वैद्य,

आणि सामान्य वैद्य, असा त्यांच्यांत पोटविभाग असे. ग्रीक लोकांत देखील पुढें नेत्रवैद्य, दंतवैद्य, असे भेद उत्पन्न झालेच; जरी प्रारंभीं नव्हते.

वैद्य लोकांत आधुनिक कालीं ज्यास्त ज्यास्त पोटभेद होत आहेत ही गोष्ट प्रसिद्धच आहे. छातीचे रोग, मेंदूचे रोग, पचनाचे रोग, त्वचेचे रोग हेच मुख्यत्वेंकरून बरे करणारे निरनिराळे वैद्य इंग्लंदांत आहेत, आणि त्या त्या रोगानें पीडितांचीं निरनिराळीं इस्पितळें आहेत. शस्त्रवैद्यांमध्यें असेच पोटभेद झालेले आहेत. नेत्रवैद्य, कर्णवैद्य, इत्यादि विशिष्ट वैद्यांखेरीज मूत्राशयावर शस्त्रक्रिया करणारे, गुदावर करणारे, गर्भाशयावर करणारे, आणि हाडें जागच्या जागीं बसविणारे, असे पोटभेद आढळतात.

९. अ. उत्क्रमणाच्या नेहमींच्या क्रमास अनुसरून ह्या विभिन्नीकरणांबरोबर घनीभवनें झालेलीं आहेत. रोग बरे करण्याचा धंदा करणारांचे संयोग बनण्याची प्रवृत्ति प्रारंभापासून दिसत आहे. त्या सगळ्यांना सारखेंच शिक्षण देण्याकरितां संस्था उत्पन्न झालेल्या आहेत; आणि त्या त्या वैद्यकाचे डाक्टरांच्या आणि सामान्यतः सर्व प्रकारच्या डाक्टरांच्या मंडळ्या बनलेल्या आहेत. आलेक्झांड्रियामध्यें सेरापिसच्या देवळांत इस्पितळ असून तेथें वैद्यक शिकणारांस अनुभव मिळावा म्हणून येऊं देत असत. रोममध्यें इस्क्युलेपियसच्या पूजेखेरीज त्याच्या देवळांतून ती (वैद्यक) विद्याहि शिकवीत असत. मध्ययुगामध्यें प्रारंभीं हल्लीं जसें कालेजांत शिक्षण मिळतें, तसें मठांतून मिळत असे. त्यानंतर इतालींत वैद्य

तयार करण्याच्याच संस्था उत्पन्न झाल्या; उदाहरणार्थ. सालेर्नो येथें नवव्या शतकांत वैद्यकीची शाळा स्थापन झाली. फ्रान्सांत तेराव्या शतकाच्या शेवटाच्या पूर्वी शस्त्रवैद्यांचें एक स्वतंत्र मंडळ स्थापन झालें होतें; आणि शिवाय त्यांनीं न्हाव्यांना आपल्या वर्गांतून काढून टाकिलें होतें, व त्यांना शस्त्रक्रियेची मनाई करून जखमा धुण्याबांधण्याचें तेवढें काम ठेविलें होतें.

इंग्लंदच्या न्हावीशस्त्रवैद्यांचें संयुक्तमंडळ चवथ्या एडवर्ड राजानें प्रथम बनविलें, आणि वैद्यमंडळ १५१८ त बनलें गेलें, आणि त्यांस वैद्यकी करण्याचे परवानें देण्याचा अधिकार मिळाला; जो अधिकार तोंपावेतों बिशपांकडे होता. पहिल्या चार्लस राजाच्या वेळीं असा कायदा पास झाला कीं, लंदनांत व आसपास सात मैलपर्यंत न्हावी व शस्त्रवैद्य ह्यांच्या मंडळाच्या परवान्याविना कोणी शस्त्रवैद्यकी करूं नये; आणि पुढें दुसऱ्या जार्जाच्या वेळीं ह्या मंडळांतून न्हाव्यांना काढून टाकिलें: अशा रीतीनें ह्या घनीभवनास ज्यास्त निश्चित स्वरूप आलें. तद्वतच, ह्या मंडळांकडून ज्यांची परीक्षा होते. अशा वैद्यकी शाळा जिकडे तिकडे स्थापन झाल्या आहेत, आणि घनीभवनाची ही आणखी एक पायरी होय. इस्पितळांतूनहि वैद्यकी शिकवीत असतात, व त्यांपैकीं कांहीं इस्पितळें कालेजांना जोडलेलीं आहेत. वैद्यकी-मासिकांमुळें आणखी एक प्रकारचें संकलीभवन झालेलें आहे; कारण तेणेंकरून वैद्यकी कालेजें, मंडळें, आणि एकंदर वैद्यसमूह, ह्यांच्यामध्यें दळणवळण चालू राहतें.

हें प्रकरण पुरें करण्यापूर्वी आणखी दोन गोष्टी सां-

गण्यासारख्या आहेत. एक गोष्ट ही कीं, शारीर व इंद्रियविज्ञान ह्या विषयांचे कांहीं प्रोफेसरांस आलीकडे जीवितशास्त्राचे प्रोफेसर नेमिलें आहे. म्हणजे मानवी जीविताच्या अभ्यासाची वृद्धि होऊन त्याला त्यांच्या ठिकाणीं एकंदर जीविताच्या अभ्यासाचें स्वरूप आलें आहे. आणि हें विशिष्टीकरण जरी प्रथमदर्शनीं वैद्यकीशीं असंबद्ध असें दिसतें तरी अखेरीस संबद्धच ठरतें; कारण सामान्य प्राणीजीविताविषयीच्या ज्ञानाची वृद्धि झाल्यानें मानवी जीविताविषयांच्याहि ज्ञानाची वृद्धि होते; आणि त्यामुळें वैद्यकीस मदत होते. दुसरी गोष्ट ही कीं, पास झालेल्या डाक्टरांचीं मंडळें जशीं बनत चाललीं आहेत तसा पास न झालेल्या वैद्यांबद्दलचा त्यांचा मत्सर वाढत चालला आहे. म्हणजे, धार्मिक उपाध्येवर्गाप्रमाणें वैद्यकीय उपाध्येवर्ग पाखंड्यांचा व बिनपदवीधरांचा छळ करूं लागला आहे. बिनपरवान्याचे वैद्य, आणि औषधें तयार करणारांचा वैद्यकी,ह्यांचाहि डाक्टरलोक आजपावेतों निषेध करीत आले आहेत, व सध्यांहि करीत आहेत. म्हणजे काय, तर, संकलीभूत धंदेमंडळाची इतरांपासून ज्यास्त ज्यास्त पृथक् होण्याची प्रवृत्ति सारखी सुरू आहे.

प्रकरण तिसरें

नर्तक व वादक

१०. "गानाचा उद्भव व कार्य" या नांवाच्या निबंधांत **स्पेन्सर** साहेबानीं असें दाखविलेंच आहे कीं, सा-

मान्यतः स्नायुविषयक हालचालींचें कारण सामान्यतः मनोवृत्ती हें असतें. ह्या हालचाली लहानसहान किंवा जोराच्या असोत, त्या सर्व शरीराच्या असोत किंवा कांहीं विशिष्ट अवयवांच्या असोत, आणि मनोवृत्ती सुखदायक असोत वा दुःखदायक असोत, इंद्रियसंवेदनारूप असोत वा मनाच्या उमाळ्याच्या रूपाच्या असोत, त्या हालचाली त्या मनोवृत्तींचीं फलें असतात; निदान ज्या हालचाली प्रतिक्रियारूप व आपोआप होणाऱ्या असतील त्या खेरीज करून बाकीच्या तरी तशा असतात. आणखी शिवाय त्या निबंधांत असें दाखविलें आहे कीं, अवयवांच्या ज्या जोराच्या हालचालींमुळें उड्या व हातवारे ह्यांची उत्पत्ति होते, आणि छातीच्या व गळ्याच्या स्नायूंच्या ज्या जोरदार आकुंचनामुळें ओरडणें व हंसणें ह्यांची उत्पत्ति होते, तीं सर्व मोठ्या आनंदाचीं स्वाभाविक दर्शक आहेत; किंवा तीं मोठ्या आनंदाची स्वाभाविक भाषा आहे असें म्हणतां येईल.

उल्लासी मुलें दुरून एकादा त्यांचे लडिवाळ करणारा आप्त त्यांनीं पाहिला म्हणजे त्याच्याकडे आनंदानें ओरडत व उड्या मारीत धांवून जातात. ह्या त्यांच्या कृतींत ज्या श्रवणविषयक व दर्शनविषयक आनंदाच्या प्रादुर्भावापासून गान व नर्तन ह्यांची उत्पत्ति होते त्याचीं मुळें सांपडतात. आतां आनंदित मुलांना त्यांचा लडीवाळ करणारा आप्त दिसण्याच्या ऐवजीं, विजयी नाईक किंवा राजा जर त्याच्या प्रजेच्या दृष्टीस पडला तर त्यांना आनंदाच्या उकळ्या येऊन तेहि ओरडूं व नाचूं लागतील; आणि हींच मानमरातब व राजनिष्ठा

ह्यांचीं चिन्हें बनतील, व त्यांस त्याच्याहून उच्च स्वरूप आल्यास पूजा म्हणून म्हणतां येईल. तद्वतच, आनंदाचीं हीं स्वाभाविक प्रदर्शनें प्रथम विजय वगैरे मिळवून येणारापुढें होत असून मागाहून राजनिष्ठेचीं प्रदर्शनें म्हणून सर्व सार्वजनिक प्रसंगीं तीं होऊं लागतील; आणि त्याबरोबरच पहिल्या अनियमित नाचण्या-बागडण्यास व ओरडण्यास नियमित व तालबद्ध अशा नाचांचें आणि गानांचें स्वरूप येऊं लागेल. तसेंच ह्या ओरडणारांत नाचणारांबागडणारांपैकीं जे त्या कामांत विशेष चतुराई दर्शवितील ते नेहमींचे नर्तक व गायक म्हणून बनतील आणि लवकरच त्यांस तो धंदा करणारांचें स्वरूप येईल. ह्या सर्व गोष्टी लक्षांत आणण्यास कल्पनाशक्तीस फारसा ताण देण्याची जरूर नाहीं.

ह्या उत्पत्तीचा पोषक असा होकारार्थी पुरावा देण्यापूर्वी असें सांगणें इष्ट दिसतें कीं, ज्या रानटीलोकांत कायमचे नाईक किंवा राजे नसतील त्यांच्यामध्यें ह्या-बद्दल नकारार्थी पुरावा सांपडतो; कारण अशा लोकांत धंदेविषयक कृतींचें बीज दिसत नाहीं. त्यांच्यांत कांहीं ओबडधोबड नाचणें आणि त्याच्याबरोबर बरेंचसें ओरडणें हीं दृष्टीस पडतात हें खरें आहे, पण तीं लढाई च पारध ह्यांचीं दर्शक असतात. प्रसिद्ध लढवय्याची स्तुति दर्शवितील अशा रीतीनें त्याच्या कृतींची नक्कल जरी अशा लोकांत कधीं कधीं होत असली, तरी विजेत्यासमोर आनंदाचे हातवारे करणें आणि यशोदर्शक गाणीं म्हणणें अशा रीतीच्या प्रशंसा ह्या पायरीवरच्या लोकांत सामान्यतः दिसून येत नाहींत; तर ह्याच्या पु-

ढच्या पायरीवरच्या लोकांत त्या दिसून येतात. उदाहरणार्थ, काफिर लोकांत लढाईचे नाच शिकणें हा शिक्षणाचा अत्यन्त महत्त्वाचा भाग समजतात; आणि पुरुष वरचेवर ते नाच नाचतांना दृष्टीस पडतात; आणि असें म्हणतात कीं, झुलू लोकांच्या बड्या नाचांतून लष्करी कवायतीसारख्या हालचाली दिसून येतात. न्यूझीलंदर लोकांच्या नाचांबद्दल टॉम्सन असेंच म्हणतो. सारांश, ह्या नाचांपासून धंदेरूप नाच, किंवा नाचाचा धंदा ह्याची उत्पत्ति होत नाहीं.

११. धंदेरूप नाचणें, गाणें, आणि वाद्यें वाजविणें ह्याची उत्पत्ति वर दर्शविलेल्या मार्गानें होते हें बैबलांतील एका प्रसिद्ध उताऱ्यावरून गर्भित होतें. तो असा कीं, इस्रलाइट लोकांचा सेनापति म्हणून डेव्हिड जेव्हां फिलिस्टाइन लोकांची कत्तल करून परत आला, तेव्हां इस्रलाइट लोकांच्या सर्व शहरांतून स्त्रिया त्यास व सॉल राजास भेटण्याकरितां पडघम व इतर वाद्यें घेऊन आनंदानें नाचत व गात आल्या, आणि सॉलनें हजारों व डेव्हिडनें लक्षावधी शत्रू मारिले आहेत असें नाचतां नाचतां गाण्यांत म्हणूं लागल्या. सारांश, ह्या ठिकाणीं अर्धवट निश्चित व तालबद्ध स्वरूप आलेलें नर्तन व वादनरूपी स्वागत राज्य करणारा जेता व त्याच्या हाताखालचा जेता ह्या दोघांचेंहि केलेलें दृष्टीस पडतें. दुसऱ्या एका प्रसंगीं हा विधि मुख्यत्वेंकरून धर्माचा म्हणून केलेला आढळून येतो. उदाहरणार्थ, जेव्हां मोझेसच्या धुरीणत्वानें इस्रलाईट लोक तांबडा समुद्र ओलांडून गेले, तेव्हां ईश्वरस्तवनास्तव मिरियमनें गाणें

म्हटलें आणि इतर वायका पडघम वाजवून नाचल्या.

हल्लीं अस्तित्वांत असलेल्या अर्धसुधारलेल्या समाजांत सुरू असलेल्या रूढींवरून असें अनुमान काढतां येतें कीं, विजय मिळवून येणाऱ्या वीराची जी आपखुशीनें प्रथम स्तुति होत असते, तीस मागाहून संतर्पणार्थ केलेल्या विधीचें स्वरूप येतें. त्याच्या पराक्रमांचीं वर्णनें आहेत अशीं गाणीं पुनःपुनः गाऊन आणि त्याला पाहून आनंद होतो असें दर्शविणारे नाच पुनःपुनः करून त्याला रिझविणें ही एक शहाणपणाची कलाच बनते. उदाहरणार्थ, मरुत्से लोकांबद्दल होलब असें म्हणतो कीं, त्यांच्यांतील सर्व वाजंत्र्यांना गाण्याचीहि कला यावी लागत असे, आणि वाजवतां वाजवतां मध्यें गावें लागत असे. त्याप्रमाणेंच **स्विनफर्थ** असें म्हणतो कीं, मुंझा राजाच्या दरबारीं धंदेवाले वाजंत्री, लावण्या म्हणणारे, आणि नाचणारे असून, त्यांचें मुख्य काम राजाचे पराक्रम गाऊन त्यास खुश करण्याचें असे. बर्टन असें सांगतो कीं, डेहामीमध्यें भाटांचें काम बायका व पुरुष दोन्ही करीत असून, स्त्रीभाट राजवाड्यांतच राहतात. अशा प्रकारचीं हीं सरकारी भाटांनीं केलेलीं स्तवनें मुख्य राजाचींच होतात असें नाहीं, तर त्याच्या हाताखालच्या शास्त्यांचींहि होतात. आशान्टीमध्यें स्वारी निघाली म्हणजे प्रत्येक सरदारामागून त्याचे भाट चाललेले असतात, आणि ते मोठ्यानें ओरडून आपल्या धन्याचीं बलदर्शक नांवें पुकारीत असतात. आणि गोल्डकोस्ट नामक किनाऱ्यावर प्रत्येक नायकाचा शिंग पुकारणारा असून त्याची स्वताची म्हणून एक गत

असते. तल्लत् पार्क असें सांगतो कीं, मान्डींगो लोकांत भाट असून ते नायकाची किंवा पैसे दिल्यास पाहिजे त्याची स्तुति करण्यास तयार असतात. भाटांच्या मूळ व्यापारामध्यें भिन्नता कशी उत्पन्न होते हें ह्या ठिकाणीं दिसून येतें. विंटरबॉटम ह्याबद्दलचें दुसरें एक उदाहरण असें देतो कीं, फूला लोकांत गवये नांवाचे कोणी लोक आहेत, ते प्राचीन भाटांप्रमाणें देशांतून फिरत जातात आणि पैसे देतील त्यांची कीर्ति गातात.

आफ्रिकेनजीक माडागास्कारमध्यें राजापाशीं स्त्रीगायकांची एक मोठी टोळी असते, आणि तो फिरतीवर निघाला तरी त्या त्याजबरोबर जातात. राफल्स म्हणतो कीं जाव्हा बेटांत तीन प्रकारच्या कलावंतिणी असतात.— १. राजा व राजपुत्र यांच्या वेश्या; ह्या सर्वांत कुशल असतात. २. सरदारांच्या वेश्या. ३. इतर वेश्या. ह्या उदाहरणांवरून असें दिसतें कीं, नर्तन व गानरूप कीर्तिप्रदर्शनें प्रथम प्रासंगिक आणि स्वैच्छिक असून मागाहून तीं नित्याचीं व विधिरूप होतात; व त्याबरोबरच तीं करणाराचा विशिष्ट वर्ग बनतो. ह्याखेरीज आणखी दोन फेरबदल झाले आहेत. एक हा कीं, प्रथम नर्तक व गायक एकच होते ते आतां भिन्नभिन्न झालेले आहेत; आणि दुसरा हा कीं, गायक नाहीं तरी नर्तक शास्त्याचें आनंदानें स्वागत करण्यासाठीं नाचण्याच्या ऐवजीं आपलें अंगचापल्य व अवयवसौष्ठव हीं दर्शविण्यासाठीं नाचावयास लागले आहेत. ह्रीन्नू लोकांत ही वाढ हीरॉडच्या वेळींच झाली होती, आणि सध्या देखील आपल्या देशांतील संस्थानांतून दिसून येते.

१२. दृश्य शास्त्यापुढें होणाऱ्या प्रशंसापर नर्तना-बरोबर व वादनाबरोबर अदृश्य शास्त्यापुढेंहि तीं होऊं लागतात हें हीब्रू लोकांच्या उदाहरणांत अगोदर दिसून आलेंच आहे. शिवाय, डेव्हिड तारणनौकेपुढें नाचला हें उदाहरण देण्यासारखें आहे. म्हणून इतर अर्धवट सुधारलेल्या लोकांत तसलीं उदाहरणें दृष्टीस पडल्यास आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. उदाहरणार्थ, भिल्ल लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, त्यांच्यांत डोंगरी देवांचे बडवे नांवाचे भगत असतात; ते देवांचीं गाणीं भाट म्हणूं लागले म्हणजे अंगांत वारें आणून जोराचे हातवारे करून नाचूं लागतात. आबिसिनियामध्यें नाचाचा असलाच उपयोग केलेला आढळून येतो. तेथें उपाध्यांचें काम प्रार्थना वाचण्याचें, गाण्याचें, आणि नाचण्याचें असतें, आणि हें नाचणें ते धार्मिक मिरवणुकींच्या प्रसंगीं करीत असतात. तेथील अर्धवट ख्रिस्त्यांनीं हें नाचणें पूर्वीच्या कोणत्या तरी धर्मांतून उचलिलें आहे हें दूरच्या एका उदाहरणावरून दिसून येतें. कारण प्यूब्लो लोकांच्या रूढींचें वर्णन करतांना लमिस म्हणतो कीं, कोलंबसाच्या पूर्वी जे धार्मिक नाच त्यांच्यांत प्रचारांत होते ते अद्यापि जिवंत आहेत; पण ते हल्ली ख्रिस्त्यांच्या उत्सवामध्यें होत असतात, आणि त्यांजपासून सवितृदेवाप्रमाणें ख्रिस्ती आपला देव संतुष्ट होतो म्हणून समजतातसें दिसतें.

पण दृश्यशास्त्यापुढें होणाऱ्या वादननर्तनास विभिन्नस्वरूप प्राप्त होऊन अदृश्य शास्त्यापुढें होणाऱ्या नर्तनवादनाची उत्पत्ति कशी होते. हें सुधारलेल्या जा-

तींच्या प्रारंभींच्या इतिहासामध्यें चांगलें दिसून येतें. हीब्रू इतिहासापैकीं कांहीं उहाहरणें वर दिलींच आहेत. शिवाय ख्रिस्ती धर्माच्या इतिहासांत तसलींच उदाहरणें सांपडतात. उदाहरणार्थ, बैबलांत वाद्यें वाजवून व नाचून देवाची स्तुति केल्याचे उल्लेख जागजागीं आढळून येतात.

पूजाप्रकार म्हणून हें नर्तन व वादन यांचें साहचर्य इजिप्तच्या इतिहासांत इतकें स्पष्टपणें दिसत नाहीं; याचें कारण तेथील सुधारणेच्या पहिल्या पायऱ्यांचा इतिहास उपलब्ध नाहीं हें असावें. तथापि हिरोडोटस असें म्हणतो कीं, बाकस देवाच्या उत्सवाचे वेळीं पिपेरीवाला सर्वांत पुढें जाई, आणि त्याच्यापासून त्या देवाचीं स्तोत्रें म्हणणारे नाचत जात. विल्किन्सन देखील असें म्हणतो कीं, तेथील धार्मिक वाजंत्री उपाध्येवर्गापैकीं असत, आणि ज्यू लोकांतील लेव्हाइटांप्रमाणें त्या कामावर त्यांची नेमणूक केलेली असे. गाणीं गाणें आणि टाळ्या वाजविणें हे पूजेचे प्रकार त्यांच्यांत असत म्हणून सांगितलेलें आढळतें. शिवाय त्यांच्या भिंतींवरील चित्रांवरून हीच गोष्ट व्यक्त होते. सारांश, त्यांच्यांत राजवाड्यांत जसा वादक असे तसा देवळांतहि असे. तथापि रॉलिन्सन असें म्हणतो कीं, त्यांच्यांत गानवादन बऱ्याच अंशानें सांसारिक बनलें होतें. म्हणजे त्याचा उपयोग मुख्यत्वेंकरून कर्मणुकीकडे होत असे. ज्या धार्मिक विधींमध्यें वादनाचा समावेश होई ते स्पष्टरीत्या धार्मिक स्वरूपाचे नसत.

ग्रीसमध्येंहि वादननर्तनाची उत्पत्ति अशाच क्रमानें

झालेली आहे. उदाहरणार्थ, घूल व कोनेर असें म्हणतात कीं, सर्व प्रकारचे नाच प्रारंभीं धार्मिक असत. तद्वतच ग्रोट असें म्हणतो कीं, गाणारें व नाचणारें असें एक मंडळ असणें हा ग्रीक लोकांत देवपूजेचा एक महत्त्वाचा भाग असे. प्रारंभीं तें सर्वच नागरिक मिळून सार्वजनिक रीत्या करीत असत; पण मागाहून तें मुख्य उत्सवाचे वेळीं मुद्दाम तेंच धंदा म्हणून शिकलेले लोक करूं लागले. त्याप्रमाणेंच डोनाल्डसन असें म्हणतो कीं, डोरियन संस्थांनांतून वादन व नर्तन हीं धार्मिक, राजकीय, आणि लष्करी संघटनेचा पाया असत. आतां ग्रीसमध्यें वादनकलेस सांसारिक स्वरूप लवकरच कसें येऊं लागलें हें त्यांच्यांतिल पिथियन, आलिंपियन, इत्यादि धार्मिक उत्सवांसंबंधानें ज्या दंतकथा त्यांजवरून दिसतें; कारण ह्या उत्सवांचे ठिकाणीं लवकरच चातुर्य व सामर्थ्य यांचे परीक्षेचे खेळ सुरू झाले. ह्या सगळ्यांत पिथियन उत्सवाचे वेळचे खेळ सर्वांत अगोदरचे असून त्यांजमध्यें मूळच्या उद्देशापासून फारच अल्पभिन्नता उत्पन्न झालेली आढळून येते. कारण तेथील सामने कवी व वादक यांच्यामध्येंच होत असत. परंतु सामन्यांत जे उत्तम ठरतील त्यांस बक्षिसें देत. यावरून प्रारंभींच्या गायकवादक-मंडळांमध्यें कांहींजण विशेष प्रवीण झाले होते असें दिसतें. यानंतर पुढें लवकरच निरनिराळीं वाद्यें वाजविणारांस निरनिराळीं बक्षिसें देऊं लागले. यावरून गाणारांपासून वाजवणारांचें विभिन्नीकरण कसें उत्पन्न झालें हें दिसून येतें. नंतर कांहीं काळानें गानवादन पूर्णपणें सांसारिक बनलें.

म्हणजे, देवांना मान देण्यासाठीं गानवादनाच्या जल-शांखेरीज, माणसांच्या करमणुकीखातरचं तें होऊं लागले. उदाहरणार्थ, माहाफी असें म्हणतो कीं, आथेन्स व थेंब हे दोन प्रकारचे जलसे अगदीं भिन्न असत.

रोमच्या इतिहासांत अशासारखाच घुरावा दृष्टीस पडतो. उदाहरणार्थ, मॉमसेन म्हणतो कीं, अत्यन्त प्राचीन धार्मिक रूढींमध्यें गाण्यापेक्षां नर्तन, व त्याच्या खालोखाल वादन यांचेंच फार महत्त्व असे. रोमन लोकांच्या विजयोत्सवाच्या प्रारंभीं निघणाऱ्या मोठ्या स्वारींत देवांच्या मूर्ती आणि शूर योद्धे यांच्यानंतर नाचणारे येत असत. एकंदर उपाध्येवर्गांत नर्तकच कदाचित् सर्वांत प्राचीन होते. त्याप्रमाणें घूल व कोनेर म्हणतात कीं, अगदीं प्राचीन काळापासून ग्रीसप्रमाणें रोममध्येंहि सार्वजनिक खेळांचा धार्मिक कृतींशीं संबंध असे. देवांची मर्जी प्रसन्न करण्यासाठीं असले खेळ करूं म्हणून ते नवस करीत, आणि मग ते नवस फेडण्यासाठीं ते खेळ करीत असत. तद्वतच मार्स किंवा संग्रामदेव याच्या एका प्रार्थनेस उद्देशून पासनेट असें म्हणतो कीं, प्रारंभींच्या स्तुतींत धार्मिक नाच व तदनुरूप गान ह्यांचें मिश्रण असे. ह्यावरून देवाच्या कृत्ती दर्शविणाऱ्या नाटकाची उत्पत्ति कशी झाली असेल हें स्पष्ट दिसतें. डेव्हिड व सॉल ह्यांचें विजय मिळवून आल्यावर जें स्वागत झालें त्याच्याशीं वरील वर्णनाचें साम्य दिसतें. म्हणजे, विजयी राजाच्या संबंधानें जें दरबारी व सामान्य लोक करितात तें वीरजन्य देवाच्या संबंधानें उपाध्ये व लोक करितात. शिवाय ग्रीसप्रमाणें-

च रोममध्येंहि धार्मिक वादनापासून शेवटीं सांसारिक वादनाची उत्पत्ति झाली. इंगे म्हणतो कीं, लोकसत्ताकाचे वेळीं आपण हुशार वाजंत्री आहों असें म्हणण्यास रोमन माणसास लज्जा वाटली असती; पण पुढें सीझरांची जेव्हां बादशाही सुरू झाली तेव्हां गानवादनांत नैपुण्य प्राप्त करून घेणें हा उदाराशिक्षणाचा एक भाग बनून गेला; आणि त्याबरोबरच भोजनास पाव्हणे बलाविले म्हणजे त्यांच्या कर्मणुकीसाठीं किंवा केवळ यजमानाच्याच कर्मणुकीसाठीं गाण्यास व वाजवण्यास गुलामांस शिकवूं लागले.

१३. हे जे प्रारंभींचे जुळे धंदे त्यांच्या उत्क्रमणाचा आणखी विचार करतां आपल्यास असें दिसतें कीं, ते विभक्त झाल्यावर त्यांपैकीं एक जरी बहुतेक पूर्णपणें सांसारिक बनला तरी दुसरा पुष्कळ काळपर्यंत धार्मिकच राहिला, आणि त्यास सांसारिक स्वरूपें मागाहूनच आलीं. आतां लवकरच नाच हा धार्मिक पूजेचा भाग म्हणून नाहींसा कसा झाला, आणि गान हा कायम कसा राहिला, हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. पहिलें कारण हें कीं, नाचणें हें शब्दविरहित असल्यामुळें, शब्दयुक्त वादनापासून जसे अनेक विचार व विकार व्यक्त करतां येतात तसे त्याच्या योगानें करतां येत नाहींत. त्याचा मूळ उपयोग प्रथम जिवंत शूर वीराच्या आणि मागाहून त्याच्या कल्पित भुताच्या समक्ष आनंदप्रदर्शन करण्याचा असे. मनोभाव उद्दीप्त झाला म्हणजे जो फाजील उत्साह उत्पन्न होतो तो त्याच्या योगानें व्यक्त होत असतो; पण पूज्यभावयुक्त भीति, न-

म्रता किंवा पश्चात्तापबुद्धि धार्मिकपूजेंत प्रगतिकालीं समाविष्ट होत असते ती त्यास प्रदर्शित करतां येत नाहीं.

म्हणून मध्ययुगामध्यें सहजच, नाचणें जरी धर्मपूजेंतून अजीबाद निघून गेलें नाहीं तरी तें बहुतेक बंदच पडलें. स्वारी काढणें एवढाच काय तो मूळ विधींतील भाग मग शिलक राहिला, आणि त्याचे दोनहि प्रकार चालू राहिले; म्हणजे देवांची स्वारी, आणि विजय मिळवून आलेल्या सेनापतीची स्वारी, ह्या दोन्ही अद्यापि कायम आहेत.

आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, नाच जसा सांसारिक होत गेला आहे तसें त्यास वऱ्याच अंशानें धंद्याचें स्वरूप प्राप्त झालें आहे. आणि आपल्याकडे लग्नाच्या वगैरे समारंभांतून आणि तिकडे नाटकांतून जे नाच होतात ते धंदा म्हणून तो शिकलेले लोकच करितात.

१४. असो. आतां हा मध्येंच निघालेला प्रश्न बाजूला ठेवून, यूरोपांतील अर्धवट सुधारलेल्या आणि ख्रिस्ती बनण्याच्या पूर्वीच्या राष्ट्रांतून काय पुरावा मिळतो तो पाहूं. गॉल लोकांबद्दल स्ट्राबो असें म्हणतोः—ह्या लोकांत बहुधा तीन प्रकारच्या माणसांना विशेष मान देतात. बार्ड (भाट) व्हेट आणि ड्रुईड. भाट लोक स्तोत्रें तयार करीत व गात; व्हेट लोक यज्ञ करीत, आणि सृष्टीचें निरीक्षण करीत आणि ड्रुइड तें करून शिवाय नीतिशास्त्राचें अध्ययन करीत. आतां हे भाटलोक सारंगी वाजवून आपल्या नायकांचे पराक्रम गात

असेंहि विधान आढळतें. ह्यांपासून पुढें ख्रिस्ती लोकांतील वाजवून नाचणारांची आणि हस्तकौशल्याचे खेळ करणारांची उत्पत्ति झाली असावी असें वाटतें; त्यांस स्कांडिनेव्हियन लोकांत "स्काल्ड" आणि सॅक्सन लोकांत "ग्लीमेन" असें म्हणत. शिवाय प्राचीन इंग्रज लोकांत नाईक लोक घरीं एकेक भाट बाळगीत, व त्याचें काम कधीं त्या नायकाचे आणि कधीं त्याच्या पूर्वजांचे पराक्रम गाण्याचें असे.

मूर्तिपूजकांचे देव, वीर आणि पूर्वज ह्यांची पूजा जशी कमी कमी होऊं लागली तसें कांहीं प्रकारचें गानवादन सांसारिक बनलें, आणि दुसरें नव्या (ख्रिस्ती) धर्माच्या संबंधानें वृद्धिंगत होत चाललें. उदाहरणार्थ, आंग्लो-साक्सन लोकांमध्यें गानवादनाचा अभ्यास जोरानें सुरू झाला. शेवटीं मठांतून गानवादनाच्या कायमच्या शाळा स्थापन झाल्या; त्यांतील मुख्य शाळा कयांटर्बरी-मध्यें स्थापन झाली. नार्मन लोकांमध्येंहि असेंच होतें. देवळांतील गानवादनाकडे ते फार लक्ष देत, आणि धर्मोपाध्ये आपल्या देवळांतील वाजवणारांसाठीं नवीं गाणीं रचीत. पुढें पंधराव्या शतकांत विश्वविद्यालयांतून देखील गानकलेचा अभ्यास सुरू होऊन त्या विद्येंत लोकप्रवीण व्याहि मिळवूं लागले, कारण त्यांस धर्मखात्यांत शिरण्यास संधि इतरांहून ज्यास्त मिळत असे.

पण ख्रिस्ती लोकांत वादन उपाध्येवर्गापासून उत्पन्न झालें, ह्यावद्दलचा सर्वांत उत्तम पुरावा म्हटला म्हणजे यूरोपांतील प्रारंभींच्या वादकांचीं चरित्रें हीं होत. कारण. त्यांकडे पाहतां ते सर्व धर्मोपदेशक होते असें दि-

सतें. उदाहरणार्थ, चवथ्या शतकांत सेंट आम्ब्रोस यानें देवाचीं स्तोत्रें कशीं म्हणावीं व गावीं हें ठरविलें. पुढें सेंट ग्रेगरीनें ५९० सालीं गाण्याचीं स्केलें किंवा सूर ठरविले. पुढें दहाव्या शतकांत ह्कबाल्डस नामें मठवाल्यानें द्विपाद कवितेबद्दल अनेकपाद कवितेस सुरवात केली. पुढें अकराव्या शतकांत गीडोडीरेझो नामक मठवाल्यानें ह्या बाबतींत आणखी सुधारणा केली. नंतर बाराव्या शतकापासून सांसारिक गानवादन धार्मिकापासून भिन्न होऊं लागलें; तथापि बरेच दिवस गानाचे विषय व सूर धार्मिकच असत, व तीं रचणारेहि धर्मोपाध्ये असत.

अशा रीतीनें धार्मिक कार्यासाठीं गानवादनाची प्रथम उत्पत्ति होऊन त्याजपासून पुढें त्याची वृद्धि झाली व त्यांत अनेक प्रकार उत्पन्न झाले हें जरी खरें आहे, तरी स्वतंत्र रीत्या साधें लौकिक गानवादन उत्पन्न झालें ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. अगदीं प्रारंभींच्या काळापासून संसारांतील अनेक गोष्टींनीं उत्तेजित झालेले जे मनाचे उमाळे त्यांचे योगानें आपोआप माणसांचे तोंडांतून गानरूपी उद्गार निघालेले आहेत. पण ही गोष्ट ध्यानांत घेतली म्हणून उच्चतर गानवादनाची उत्पत्ति पूजाविधि संकीर्ण होत गेला तशीच होत गेली, पुष्कळ काळपर्यंत त्याची रचना उपाध्येवर्गच करीत असे, आणि ह्या वर्गापासून किंवा त्याच्या अर्धवट गृहस्थ बनलेल्या घटकांपासून विभिन्नीकरणानें सरतेशेवटीं गानवादन रचणाऱ्या व करणाऱ्या धंदेवाल्यांची उत्पत्ति झाली, ह्या विधानास बाध येत नाहीं.

ह्याबरोबर आणखी एक विभिन्नीकरण झालेलें आहे

तें लक्षांत घेतलें पाहिजे, तें हें कीं, उपाध्यांनीं वृद्धगत केलेल्या गानकलेचा पगडा लोकांच्या साध्या सांसारिक गानावर बसून त्यापासून हल्लींच्या उच्चतर गानाची वृद्धि झाली आहे; आणि गानवादन रचणारे व तें करणारे लोक जरी क्वचित् प्रसंगीं एकच असतात, तरी बहुतकरून ते भिन्न भिन्न बनलेले आहेत.

१५. इतर उदाहरणांप्रमाणें ह्या उदाहरणांतहि विभिन्नीकरणाबरोबर संकलीभवनहि झालेलें आहे, आणि अशा रीतीनें उत्क्रमणाची सामान्य सरणी उदाहृत झालेली आहे. उदाहरणार्थ, गानवादनाच्या मंडळ्या, शाळा, आणि कॉलेजें ह्यांची उत्पत्ति होऊन त्याच्या परीक्षाहि झालेल्या आहेत, आणि त्यांचे वार्षिक वगैरे समारंभ होऊन त्यास अधिकाधिक निश्चित स्वरूप येत आहे.

शिवाय गानवादनाचीं साप्ताहिकें, मासिक पुस्तकें, वगैरेची स्थापना होऊन त्यांच्यातून संगीतें, जलसे, वगैरेवर टीकात्मक लेख येत असून तेणेंकरून गानवादनाची सुधारणा आणि ते धंदे करणारांची गुणदोषनिवड हींहि होत आहेत; आणि अशा रीतीनें त्यांत प्रावीण्य संपादन करणारांचा फायदा होत आहे.

प्रकरण चवथें

वक्ता आणि कवि, नट आणि नाटककार

१६. ज्या गोष्टी उत्क्रमण चाललें असतां निरनिराळ्या होतात त्या प्रारंभीं अर्थात् मिसळलेल्या असतात.

कारण उत्क्रान्तिमतांत ह्या उघड सत्यांचा सवावेश होतो. अगोदरच ही गोष्ट आपल्या लक्षांत आलेली आहे कीं, जेत्याचें जें आनंदाचें स्वागत प्रथम स्वेच्छेनें व ओबडधोबड रीत्या होत असतें, पण ज्यास मागाहून मोठ्या संकीर्ण अशा स्थापित व स्पष्ट विधीचें स्वरूप येतें, त्यामध्येंच अनेक कलांचें, व त्या जाणणारांचें, बीज असतें. म्हणून ज्या गानवादनाचें गतप्रकरणांत विवेचन केलें त्याच्या प्रारंभांबरोबरच वक्तृत्व, काव्य, नाट्य आणि नाटक ह्यांचे आरंभ जुळलेले होते; त्यांचें एथें जें निराळें विवेचन आपण करीत आहों तें केवळ सोईकरितां होय. ते सर्व उत्तान उमाळ्याचे प्रादुर्भाव असून प्रारंभीं त्यांचें प्रदर्शन मिश्र व गोंधळाचें असे. आणि त्यांस जें नियमित स्वरूप आलें, व निरनिराळ्या लोकांमध्यें विभक्तता प्राप्त झाली, ती मागाहूनच होय.

डेव्हिड व सॉल ह्यांचें अभिनंदन करण्याकरितां जेव्हां कांहींजणांनीं शाबासकीच्या आरोळ्या ठोकिल्या तेव्हां दुसऱ्या कांहींजणांनीं त्यांच्या पराक्रमाचें मोठ्यानें कथन केलें. असले जाहीरनामे प्रथम संक्षिप्त आणि साधे असून पुढें त्यांस दीर्घ व प्रशंसापर भाषणांचें स्वरूप येऊं लागतें; आणि अशा रीतीनें वक्त्याची उत्पत्ति होते. पुढें ह्या वक्त्यांमध्यें एकादा इतरांहून ज्यास्त सफाईनें व उमाळ्यानें बोलणारा उत्पन्न होतो, व त्याच्या संभाषणांत सुंदर शब्दयोजना आणि अलंकार यांची रेलचेल असून कधीं कधीं तें तालबद्ध असतें; आणि अशा रीतीनें कवीची उत्पत्ति होते. ह्या प्रशंसा जिवंत शास्त्यापुढें सामान्यतः साध्या असून देव-

भूतशास्त्याच्या देखत ज्यास्त संकीर्ण बनतात, आणि कधीं कधीं त्या करीत असतां वक्ता त्याच्या पराक्रमांची बतावणी करून दाखवितो. मुलांना मोठ्या माणसांच्या बोलण्याचालण्याची बतावणी करण्याची संवय सर्वत्रच असते, आणि म्हणून तीं एकाद्या वाचनांत किंवा ऐकिवांत आलेल्या माणसाचें सोंग घेऊन त्याची नक्कल करून दाखवीत असतात; त्याप्रमाणेंच हल्लींहून मनोवृत्तींवर जेव्हां दडपण कमी होतें तेव्हां ज्या वीराचें वर्णन लोक करीत असतील त्याच्या कृतींची प्रत्यक्ष बतावणी करून दाखविण्याची सहज प्रवृत्ति त्यांजमध्यें उत्पन्न होई. वक्ता किंवा कवि ही कृति करीत असतां आपलें भाषण किंवा काव्य बोलून दाखवी, अथवा दुसरा कोणी बोलून दाखवी. आणि पुढें ह्या कलेची वृद्धि होऊन ह्याच्याहून ज्यास्त संकीर्ण कृत्यांची बतावणी होऊं लागली तेव्हां त्यांतील मुख्य सोंगाड्यास इतरांस दिशा दाखवावी लागूं लागल्यामुळें, तो नाटककार किंवा नाटक रचणारा बनून गेला.

वक्ता, कवि, नट, आणि नाटककार ह्यांच्या मूळ उत्पत्तीच्या संबंधानें हें जें स्वल्प दिग्दर्शन केलें त्याबद्दल अनुधारलेल्या आणि प्रारंभीं सुधारलेल्या जातींमधील पुरावा आतां देऊं

१७. ज्या लोकांत गानकलेची फारशी वृद्धि झालेली नाहीं त्यांच्या चालरीतींकडे पाहतां त्यांच्यांत प्रशंसा करणाऱ्या अधिकाऱ्याचें अगदीं साधें, म्हणजे वक्त्याचें, स्वरूप दृष्टीस पडतें. उदाहरणार्थ, फीजीयन लोकांबद्दल आर्किन असें म्हणतो कीं. त्यांच्या प्रत्येक

टोळीचा एक वक्ता असतो, तो विधिप्रसंगीं संभाषणें करितो, आणि लढाईस जाण्याच्या पूर्वीं लोकांस चेव आणण्याच्या कामीं राजास व उपाध्यास मदत करितो. त्या वेळेस तो अर्थात् आपल्या राजाचे पूर्व पराक्रम आणि भावी पराक्रम यांचेंच वर्णन करीत असतो. न्यूक्या-लिडोनियन लोकांत असेंच आहे. त्यांच्यांत प्रत्येक गां-वाचे वक्ते असतात; ते सार्वजनिक समारंभांत आपलीं भाषणें सुरावर बोलून दाखवून बोलतां बोलतां इकडून तिकडे फिरत राहतात, आणि एका सोंट्यानें हातवारे करितात. एलिस म्हणतो कीं, ताहितियन लोकांमध्यें अशीच हकीकत दिसून येते. त्यांच्या संग्राम-वक्त्यां-बद्दल तो असें म्हणतो कीं, त्यांचें मुख्य काम शिपा-यांस त्यांच्या वाडवडिलांचे पराक्रम सांगून त्यांच्या टोळीची कीर्ति राखण्याबद्दल चेव आणणें हें असे.

नीग्रोलोकांस गानवादनकलेची बरीच अभिरुचि दि-सते. त्यांच्यांत प्रशंसापर संभाषणें संगीतांत होत अस-तात; व त्यामुळें त्यांत अर्थात् तालबद्धता उत्पन्न होते. उदाहरणार्थ, मरुत्सेलोक वाद्यें वाजवून राजाच्या प्र-शंसा ओरडून करितात असें जें आपण वाचितों त्या-चा अर्थ त्यांच्या वाद्याप्रमाणें त्यांच्या संभाषणालाहि तालबद्धता असली पाहिजे असा अर्थात् होतो. तद्वत-च, मॉन बेटामधील कटाववाल्यांचें काम राजाचें यश वर्णन करण्याचें असून त्यांस त्या प्रशंसा काव्यरूपानें कराव्या लागतात. डेहामीमधील राजाच्या भाटांना व राजकवींना असेंच करावें लागतें. आशांटीमध्यें आणि मॉण्डिगो लोकांमध्यें असेंच आहे. तथापि ह्या आफ्रि-

कन लोकांत भाटांनीं वगैरे केलेल्या राजांच्या स्तुत्या जरी आढळून येतात, तरी उपाध्यांनीं केलेल्या देवभूत शास्त्यांच्या स्तुत्या आढळून येत नाहींत. असें कां? ह्याचीं कारणें दोन असावींशीं वाटतात, व त्यांपैकीं एक मुख्य व दुसरें गौण आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या भागांत आपल्या नजरेस आलेंच आहे कीं, सामान्यतः नीग्रोलोकांमध्यें मरणोत्तर जीवितविषयक कल्पना ज्या कांहीं आहेत, त्या अगदीं अपक्क आहेत. त्यांच्यांत अशी कल्पना रूढ दिसते कीं मृताचा दुय्यम फार दिवस जिवंत राहत नाहीं; त्याच्याबद्दल स्वप्नें पडत नाहींशीं झालीं म्हणजे तो अखेरचा मेला म्हणून समजतात. म्हणून जेथें मृत माणूस अमर झाला आहे अशी समजूत उत्पन्न होते तेथल्याप्रमाणें त्याच्या भुताचें संतर्पण करणें हा धर्म बनत नाहीं. आणि आफ्रिकेंतील राज्यें टिकत नाहींत ह्याचें कारण कदाचित् हेंच असावें. कारण त्यांच्या संबंधानें असें म्हणतात कीं त्यांच्यांत मध्यें मध्यें एकादा मोठा नाईक उत्पन्न होतो, तो शेजारच्या टोळ्या जिंकून एकत्र करितो, आणि अशा रीतीनें राज्य बनवितो; पण एक-दोन पिढ्यांनीं तें राज्य पुनः मोडून जातें. मृतशास्त्याची कल्पित दैनिकशक्ति राज्याचें संकलीभवन होऊन तें कायम होण्यास किती सहाय्यभूत होते हें आपल्या नजरेस अगोदर आलेलेंच आहे. आणि म्हणूनच अमरदेवावरच्या विश्वासाची व अतएव त्याच्या पूजेची वाण हें आफ्रिकेंतील राज्यांच्या क्षणभंगुरत्वाचें मुख्य कारण बहुधा असावें.

१८. ज्या प्राचीन सुधारलेल्या समाजांतून जिवंत

शास्त्याच्या प्रशंसांबरोबर मृत व देवभूत शास्त्याच्या वन्याच प्रशंसा होत असत, त्या समाजांत दिसणाऱ्या वस्तुस्थितीशीं वरील कल्पना सुसंगत दिसते.

उदाहरणार्थ, ईजिप्त देशांत दोघांच्याहि प्रशंसा काव्यरूपानें केलेल्या नजरेस येतात. पहिल्या सेटीच्या स्तुतीच्या अगोदर असें लिहिलेलें आढळतें.— "उपाध्ये, मोठे माणूस, आणि दक्षिण व उत्तर ईजिप्तमधील प्रसिद्ध लोक तो कल्याणकर्ता देव रूथेन देशांतून परत आलेला असल्यामुळें त्याची स्तुति करण्यास जमले आहेत." त्यानंतर राजाची स्तुति करण्याकरितां आणि त्याचें यश गाण्याकरितां ते एक गाणें म्हणतात. त्याप्रमाणेंच दुसऱ्या राम्सिसची उपाध्या पेटॉर ह्याच्या कवनांत कीर्ति गाइलेली आहे. अठराव्या घराण्याच्या वेळीं हे दोन्ही व्यापार एकाच माणसाच्या ठिकाणीं संयुक्त झालेले आढळतातः उदाहरणार्थ, उपाध्यांपैकीं एकास तिसऱ्या थुटमीस राजाची कीर्ति आणि आमन देवाचा पराक्रम हीं गाण्याची एकाएकीं स्फूर्ति झाली, असा उल्लेख सांपडतो.

प्रारंभींच्या ग्रीकलोकांमध्यें ह्याबद्दल ज्यास्त चांगला व ज्यास्त विपुल पुरावा सांपडतो. तेथील प्रारंभींचा कवि देवाचा स्तोता असून उपाध्या असे. तेव्हांच्या ग्रीक लोकांबद्दल म्यूर म्हणतो कीं, त्यांच्यांतील कवि, वादक, उपाध्या, भविष्यवादी आणि ज्ञाता असे. माहाफी आपल्यास असें सांगतो कीं होमरच्या पूर्वींचे सर्व कवी अगदीं धार्मिक असत; आणि शिवाय तो असें म्हणतो कीं, होमरच्या वेळीं माणसांच्या लढाया, हिंग्याचीं

कामें, आणि मनोविकार, ह्यांचीं वर्णनें करूं लागलं होते. अशा रीतीनें अर्धवटरीत्या सांसारिक बनलेलें काव्य नंतर धार्मिककाव्यापासून आणखी विभिन्नीकरण पावलें. म्हणजे, धार्मिककाव्याप्रमाणें तें गाण्याच्या ऐवजीं नुसतें म्हणून दाखविण्याचें काव्य बनलें.

रोमन लोकांत काव्याची उत्पत्ति अशाच तऱ्हेवर झाली. ग्रिम म्हणतो, रोमन लोकांत काव्य व भविष्यकथन हीं इतकीं सदृश होतीं कीं, रोमन उपाध्या हा कवि व भविष्यवादी ह्या दोघांचाहि धंदा करीत असें. शिवाय तो असेंहि म्हणतो कीं, रोमनलोकांचा धर्म हा उपाध्यांनीं करावयाचे विधी असत, लोकांनीं करावयाचे नव्हे; आणि त्यांतील कविता म्हणजे केवळ कवितारूपी मंत्र असत. त्यांचे विशेष संकीर्ण धार्मिक विधि त्यांनीं जिंकिलेल्या देशांतून आणिलेले होते. उदाहरणार्थ, धार्मिक खेळ त्यांनीं इरुस्ट्रियामधून घेतले होते, आणि बाकीचे विधी ग्रीसमधून घेतले होते. पण रोमनलोक विजेते असल्यामुळें विजितांनीं आपल्या बरोबर आणिलेल्या कला, आणि विशेषतः काव्यकला, ते तुच्छ मानीत असत. ती कला माहीत असलेल्यांस त्याजबद्दल देवांचा परवाना नसल्यामुळें ते मान देत नसत, आणि म्हणून त्यांची कला अगदीं सांसारिक म्हणून समजतात. ह्यासंबंधानें मॉमसेन म्हणतो कीं कवि, नाटकी, आणि गाणीं तालसुरांत बसविणारा हे लोक पूर्वीप्रमाणेंच पैसे देऊन जे लोक कामास लावावयाचे त्यांच्या वर्गापैकींच ते समजत असत, त्यांस कोणी मान देत नसे, आणि पोलीसहि त्यांस त्रास देई. रो-

मन लोकांचा समाज अनेक समाज एकत्र मिळून बनलेला असल्यामुळें आणि त्यामध्यें रोमनलोकांनीं जिंत लोकांच्या कल्पना व रूढी उचललेल्या असल्यामुळें उपाध्यापासून कवि विभिन्नीकरण पावल्याचा ज्यास्त सुसंगत पुरावा मिळण्याचा संभव नाहीं.

१९. आतां दक्षिण यूरोपावरून दृष्टि काढून उत्तर यूरोपावर लाविली असतां स्वीडन व नॉर्वे ह्या देशांत प्राथमिक कवि आणि वैदू ह्यांमध्यें संबंध असल्याचा पुरावा सांपडतो. ज्या स्त्रियांना व पुरुषांना भविष्यवादी म्हणून नांव देऊन ज्यांच्या अंगीं पुढें काय होईल हें भुतांकडून वदविण्याचें सामर्थ्य आहे म्हणून समजत त्यांच्या संबंधानें म्यालेट असें म्हणतो कीं, ह्या वेड्या कामाकडे काव्याचाहि उपयोग ते करीत असत. म्हणजे भुतांची संगीत स्तुति करून ते त्यांस आळवीत असत. शिवाय हे कवी किंवा भाट राजाच्या दरबारीं आणि लहानसहान नायकांच्याहि पदरीं असत म्हणून सांगितलेलें आढळतें. ह्या स्कांडिनेव्हियन लोकांप्रमाणें केल्ट लोकांच्याहि पदरीं असलेच लोक असत, आणि त्यांचा धंदा ग्रीक लोकांतील उपाध्ये-कवींप्रमाणेंच असला पाहिजे. पण असें दिसतें कीं, ख्रिस्तीधर्म यूरोपांत सुरू झाल्यावर पूर्वीच्या मूर्तिपूजकांचा जो उपाध्ये-कवि जिवंत नाईक आणि देवभूत मृत नाईक ह्यांची स्तुति करीत असे तो देवभूत नाईकाची स्तुति करण्याचा हळूहळू बंद झाला, आणि जिवंत नायकाची तेवढी करीत राहिला; आणि त्याच्यापासून प्रस्तुतच्या राजकवीची उत्पत्ति झालेली आहे.

अशा रीतीनें दृश्य शास्त्याचा स्तुतिपाठक जसा एकीकडे दरबारी हुद्देदार बनला तसा दुसरीकडे अदृश्य शास्त्याचा स्तुतिपाठक त्याचा उपाध्या बनला; आणि त्या नात्यानें त्याची कधीं काव्यरूपानें आणि कधीं वक्तृत्वरूपानें स्तुति करूं लागला.

ह्या स्तुत्या उपाध्येलोक जशा पूर्वी तयार केलेल्या म्हणतात तशा ते नव्या गद्य व पद्यरूपी तयारहि करितात. ह्याचीं उदाहरणें सर्व ख्रिस्ती देशांत सांपडतात. इंग्लंदांतहि उपाध्यवर्गांपैकीं कवि असल्याचीं कित्येक उदाहरणें आहेत; आणि प्रथम प्रथम तर सगळे कवि उपाध्येच असत. तिसऱ्या एडवर्ड राजाच्या कारकीर्दीपर्यंत गृहस्थ कवीचें उदाहरण आढळत नाहीं. तेव्हांचा पहिला कवि मिनो हा होय; आणि त्यानंतर पहिला मोठा कवि चॉसर हा होय. तो देखील भट्ट होता म्हणून म्हणतात; पण तें कसेंहि असो, तो दरबारी कवि होता ह्यांत शंका नाहीं, आणि तो मुख्यत्वेंकरून सांसारिक काव्य रचीत असे. ह्यानंतर धार्मिक कवि व सांसारिक कवि ह्यांचें विभिन्नीकरण जास्त ज्यास्त ठळक होत चाललें तथापि एकच इसम उपाध्या असावा व सांसारिक कविहि असावा, ही गोष्ट ह्यापुढेंहि आढळून येईच. उदाहरणार्थ, लिडगेट हा भट, कवि आणि वक्ता होता; स्केल्टन हा उपाध्या व राजकवि होता; डनबार हा मठाधिपति व कवि होता; डग्लस हा बिशप असून सांसारिक कवि होता; आणि बार्क्ले हा उपाध्या व कवि होता. शिवाय हेंहि ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, प्रशंसापर स्तोत्रें रचणें हें ख्रिस्ती उपाध्याचें

एक ठरावीक कामच समजलें जातें. ह्या सर्व गोष्टींवरून असें स्पष्ट होतें कीं पूर्वीच्या मूर्तिपूजक समाजांप्रमाणेंच ख्रिस्ती समाजामध्येंहि देवाची पूजा व स्तुति करणारा जो उपाध्ये-कवि तोच पहिला कवि होय; आणि ज्या कवींस आपण ऐहिक किंवा सांसारिक म्हणून म्हणतों तो त्याच्यापासून विभिन्नीकरणानें हळूहळूच उत्पन्न झालेला आहे.

धार्मिक कवींपासून सांसारिक कवींचें विभिन्नीकरण ह्याप्रमाणें चाललें असतां सांसारिक कवींमध्येंहि पोटविभिन्नीकरणें होतच गेलीं आहेत; उदाहरणार्थ, मिल्टनप्रमाणें कांहीं मुख्यत्वेंकरून पौराणिक मोठाल्या पराक्रमांचे वर्णन करणारे कवी झालेले आहेत; कांहीं पोपकवीप्रमाणें मुख्यत्वें उपदेशक झालेले आहेत; कांहीं बटलर कवीप्रमाणें विनोदपर निपजले आहेत; कांहीं वर्डस्वर्थप्रमाणें वर्णनपर आहेत; आणि कांहीं हूडसारखे हास्योत्पादक निघाले आहेत.

२०. इतका वेळ वीर किंवा देव ह्यांची तालबद्ध किंवा संभाषणरूप प्रसंसा करणारे जे हुद्देदार स्तोते त्यांचा विचार केला. आतां जे स्तोते वीराच्या किं । देवाच्या कृतींची हुबेहुब नक्कल करून त्याची स्तुति करितात, त्यांचा विचार करूं. हे दोन प्रकारचे स्तोते जरी प्रारंभीं एकच होते तरी हे हळू हळू विभिन्नीकरण पावून आपापल्या परी विवृद्धि पावलेले आहेत.

प्रारंभीं तोंडानें केलेली प्रशंसा आणि अभिनयानें केलेली प्रशंसा हीं जुळलेलीं कशीं असतात ह्यांचीं उदाहरणें अस्तित्वांत असलेल्या रानट्यांमध्यें सांपडतात. पॉइंट न्यारो एथील एस्कीमो लोकांविषयीं आपण असें वा-

चितों कीं, त्यांच्यांतील अत्यंत महत्त्वाचे उत्साह बहुधा अर्धवट धार्मिक असून त्यांना नाटकाचें रूप बरेंच आलेलं आढळतें; कारण सर्व उत्सवांत गाणें, मृदंग वाजविणें आणि नाचणें हीं दृष्टीस पडतात. नाव्हाजोमधील इंदियन लोकांच्या इतिहासाकडे पाहतां ह्याबद्दल ज्यास्तच स्पष्ट व सविस्तर पुरावा सांपडतो. त्यांच्यांत निरनिराळ्या देवांचीं व त्यांच्या नोकरांचीं सोंगें घेऊन नाचतात, आणि त्यांच्या पौराणिक पराक्रमांचें नाटक करितात. पण हें नाटक अगदीं ठराविक रीतीनें होत असतें, व त्यांत कमज्यास्तपणा बिलकूल खपत नाहीं आणि त्याचा हेतु देवांस संतुष्ट करून त्याच्यांकडून कांहीं काम करून घ्यावें हा असतो.

आपल्यामध्यें नाटकाचा उद्गम धार्मिकच आहे हें उघडच आहे. ग्रीक लोकांच्या इतिहासावरून तीच गोष्ट व्यक्त होते. उदाहरणार्थ, स्पार्टामध्यें बळीच्या सभोंवतीं कांहींजण गाऊन नाचत असत, आणि दुसरे कांहीं त्या गाण्यांत सांगितलेल्या गोष्टींचा अभिनय करून दाखवीत असत. ग्रीक लोकांच्या नाटकाचें हें धार्मिक स्वरूप अखेरपर्यंत कायम राहिलें. उदाहरणार्थ, माहाफी म्हणतो कीं, प्राचीन ग्रीक माणूस जो नाटकगृहास जाई तो आपल्या देवास मान देण्यास व त्याची नोकरी करण्यास जाई. ग्रोटच्या लेखावरून असें उघड दिसतें कीं, त्यांच्यांतील धार्मिकविधीचें जें हें नाटकरूपी अंग तें त्याच्या इतर अंगांशीं मिश्रित झालेलें होतें. पुढें नाटक जसें समाजांतील इतर संस्थांपासून भिन्न होत गेलें, तसें नट व नाटककार व इतर लोक

ह्यांच्यामध्यें आणि नट व नाटककार ह्यां दोघांमध्यें विभिन्नीकरण वाढत चाललें. तरी नाटकाचें धार्मिक स्वरूप कायमच राहिलें होतें; पण पुढें आरिस्टॉफेनिसच्या आनंदपर्यवसायी नाटकांतून मात्र सांसारिक स्वरूप वाढत गेलेलें दृष्टीस पडूं लागलें.

कवीची रोममध्यें उत्पत्ति कशी झाली ह्याचा विचार करतांना असें सांगितलेंच आहे कीं, ह्या गोष्टी रोमनें जिंकलेल्या लोकांपासून घेतल्या होत्या. ह्या कारणावरून, आणि रोमन लोकांचें जीवित सर्वांशीं युद्धशील असल्यामुळें त्यांस अयुद्धशील गोष्टींचा तिरस्कार वाटे म्हणून त्यांच्यांत नाटककाराची वाढ नियमितरीतीनें झालेली आढळून येत नाहीं. तथापि त्यांच्यामध्येंहि वरच्यासारखाच पुरावा आढळून येतो. उदाहरणार्थ, डुरुई असें म्हणतो कीं, ख्रिस्ती शकापूर्वीं ३६४ सालीं, रोगाची सांथ आली असतां रोमन लोकांनीं इट्रुस्कन लोकांस काय करावयाचें म्हणून विचारिलें; तेव्हां त्यांनीं असें उत्तर दिलें कीं "तुम्ही जर देखाव्यांसहित खेळ करून देवांचा सन्मान कराल तर ते खुश होतील; आणि ह्या उत्तराबरोबरच त्यांनीं कांहीं नट रोमन लोकांकडे पाठवून दिले; त्यांनीं पांव्याच्या आवाजाबरोबर धार्मिक नाच केले, आणि मग ती साथ बंद झाली." शिवाय तो असें म्हणतो कीं, तरुण रोमनलोक इरुट्रियामधून आणिलेले नाच नाचावयास शिकूं लागले; आणि त्या नाचाबरोबर गाणीं गाऊं लागले, व हावभावहि करूं लागले; अशा रीतीनें रोमननाटकाची उत्पत्ति झाली. ग्रीसप्रमाणें रोममध्येंहि नाटक हें धार्मि-

क आहे ही कल्पना पुष्कळ काळपर्यंत अस्तित्वांत होती; आणि त्यांच्यांत हा विशेष होता कीं, ते गुलामांकडून पूर्वींच्या गोष्टींचे केवळ अभिनय न करितां त्या प्रत्यक्ष करवीत असत; उदाहरणार्थ, हर्क्युलिसनें चिताप्रवेश केला होता, तसा एका गुलामास त्याचें सोंग देऊन खराखुराच चिताप्रवेश करवीत; इ० इ०. आणि ह्यामुळें नाटक्यांची गणना गुलाम, रानटी लोक (रोमनव्यतिरिक्त इतर सर्व लोक) इत्यादिकांबरोबर करीत.

२० अ. मूर्तिपूजकांमध्यें नाटकाचा जो हा उद्गम दिसतो तसलाच मध्ययुगीन युरोपांत ख्रिस्तीलोकांमध्यें जो त्याचा पुनरुद्गम झाला तोहि दिसतो. प्राचीन ग्रीक व रोमन लोकांप्रमाणें मध्ययुगीन ख्रिस्त्यांमध्येंहि धार्मिक गोष्टींची उपाध्येवर्गांतील लोकांनीं बतावणी करून दाखवावी अशा रीतीनें नाटकाला प्रथम सुरवात झाली. हीं धार्मिक नाटकें देवळांतूनच होत असत. अशा रीतीनें ग्रीसप्रमाणें ख्रिती राष्ट्रांतहि धार्मिक नाटकाची उत्पत्ति झाली, व तीं नाटकें ख्रिस्ती उपाध्ये करीत असत. आणि येशू ख्रिस्त आणि संतमंडळ ह्यांच्या कृतींचीं बतावणी त्यांत करीत, आणि ख्रिस्त्यांमधील सांसारिक नाटकाची उत्पत्ति धार्मिक नाटकापासून झाली नसेल तर ती मूर्तिपूजकांच्या (ग्रीक व रोमन लोकांच्या) धार्मिक नाटकापासून झालेली आहे.

सांसारिक नाटकाच्या उत्पत्तीबरोबर त्याच्यांत पोटभेदहि उत्पन्न होत गेलेले आहेत. नट व नाटक रचणारा ह्यांचा विभक्तपणा जरी पूर्ण झालेला नाहीं, तरी पूर्वीहून ज्यास्त झालेला आहे; म्हणजे नाटकें रचणारे

नाटकांत सोंग क्वचितच घेतात. आणि शिवाय नाटककारांमध्यें शोकपर्यवसायी नाटकें रचणारे, आनंदपर्यवसायी नाटकें रचणारे, संगीतें रचणारे, फार्स रचणारे, असे भेद उत्पन्न झालेले आहेत.

२१. विभिन्नकिरण आणि संकलीभवन हे उत्क्रमणरूप सरणीचे भाग आहेत ह्या सामान्य नियमास ह्या ठिकाणीं अपवाद दिसत नाहीं. ग्रीसपासून प्रारंभ केल्यास कवींमध्यें देखील हा कल आपल्या दृष्टीस पडतो. कर्ड्यस म्हणतो कीं, इतर कलांप्रमाणें काव्यकलेचाहि पुष्कळजण एकत्र जमून अभ्यास करीत. आणि ह्या कविमंडळांचा देवळांशीं संबंध असे. आतां नटांचींहि मंडळेंच बनलेलीं आहेत हें सांगावयास नकोच; कारण तसें करणें त्यांस जरूरच होतें. उदाहरणार्थ, ग्रीक लोकांबद्दल माहाफी असें म्हणतो कीं. त्यांच्या शिलालेखांवरून त्यांच्यांत नाटकी मंडळें असून तीं सार्वजनिक उत्सवाचे वेळीं तेथें जाऊन मोठाल्या पगारावर नाटकें करून दाखवीत असत. शिवाय तो असें म्हणतो कीं, ह्या मंडळांत एक उपाध्या असून तो मंडळाचा मुख्य असे, आणि सोंगहि घेत असे; शिवाय एक खजिनदार असे, नवीन निरनिराळ्या प्रकारचीं नाटकें रचणारे असत, आणि शिवाय निरनिराळीं वाद्यें वाजविणारे व गाणीं गाणारे असत. अगोदरच दाखविलेल्या कारणांमुळें रोममधून फारसा पुरावा मिळत नाहीं; तथापि थोडासा मिळतो. बरें, ह्या संकलीभवनाचीं उदाहरणें आधुनिक कालामध्यें मिळत नाहींत असें नाहीं. इंग्लंदांत "नाटक्यांचा मदतनीसफंड" म्हणून

क आहे ही कल्पना पुष्कळ काळपर्यंत अस्तित्वांत होती; आणि त्यांच्यांत हा विशेष होता कीं, ते गुलामांकडून पूर्वीच्या गोष्टींचे केवळ अभिनय न करितां त्या प्रत्यक्ष करवीत असत; उदाहरणार्थ, हर्क्युलिसनें चिताप्रवेश केला होता, तसा एका गुलामास त्याचें सोंग देऊन खराखुराच चिताप्रवेश करवीत; इ० इ०. आणि ह्यामुळें नाटक्यांची गणना गुलाम, रानटी लोक (रोमनव्यतिरिक्त इतर सर्व लोक) इत्यादिकांबरोबर करीत.

२० अ. मूर्तिपूजकांमध्यें नाटकाचा जो हा उद्गम दिसतो तसलाच मध्ययुगीन युरोपांत ख्रिस्तीलोकांमध्यें जो त्याचा पुनरुद्गम झाला तोहि दिसतो. प्राचीन ग्रीक व रोमन लोकांप्रमाणें मध्ययुगीन ख्रिस्त्यांमध्येंहि धार्मिक गोष्टींची उपाध्येवर्गांतील लोकांनीं बतावणी करून दाखवावी अशा रीतीनें नाटकाला प्रथम सुरवात झाली. हीं धार्मिक नाटकें देवळांतूनच होत असत. अशा रीतीनें ग्रीसप्रमाणें ख्रिती राष्ट्रांतहि धार्मिक नाटकाची उत्पत्ति झाली, व तीं नाटकें ख्रिस्ती उपाध्ये करीत असत. आणि येशू ख्रिस्त आणि संतमंडळ ह्यांच्या कृतींचीं बतावणी त्यांत करीत, आणि ख्रिस्त्यांमधील सांसारिक नाटकाची उत्पत्ति धार्मिक नाटकापासून झाली नसेल तर ती मूर्तिपूजकांच्या (ग्रीक व रोमन लोकांच्या) धार्मिक नाटकापासून झालेली आहे.

सांसारिक नाटकाच्या उत्पत्तीबरोबर त्याच्यांत पोटभेदहि उत्पन्न होत गेलेले आहेत. नट व नाटक रचणारा ह्यांचा विभक्तपणा जरी पूर्ण झालेला नाहीं, तरी पूर्वीहून ज्यास्त झालेला आहे; म्हणजे नाटकें रचणारे

नाटकांत सोंग क्वचितच घेतात. आणि शिवाय नाटक-कारांमध्यें शोकपर्यवसायी नाटकें रचणारे, आनंदपर्य-वसायी नाटकें रचणारे, संगीतें रचणारे, फार्स रचणारे, असे भेद उत्पन्न झालेले आहेत.

२१. विभिन्नकिरण आणि संकलीभवन हे उत्क्रम-णरूप सरणीचे भाग आहेत ह्या सामान्य नियमास ह्या ठिकाणीं अपवाद दिसत नाहीं. ग्रीसपासून प्रारंभ के-ल्यास कवींमध्यें देखील हा कल आपल्या दृष्टीस प-डतो. कर्ड्यस म्हणतो कीं, इतर कलांप्रमाणें काव्यक-लेचाहि पुष्कळजण एकत्र जमून अभ्यास करीत. आणि ह्या कविमंडळांचा देवळांशीं संबंध असे. आतां नटां-चींहि मंडळेंच बनलेलीं आहेत हें सांगावयास नकोच; कारण तसें करणें त्यांस जरूरच होतें. उदाहरणार्थ, ग्रीक लोकांबद्दल माहाफी असें म्हणतो कीं. त्यांच्या शिलालेखांवरून त्यांच्यांत नाटकी मंडळें असून तीं सार्वजनिक उत्सवाचे वेळीं तेथें जाऊन मोठाल्या पगा-रावर नाटकें करून दाखवीत असत. शिवाय तो असें म्हणतो कीं, ह्या मंडळांत एक उपाध्या असून तो मंड-ळाचा मुख्य असे, आणि सोंगहि घेत असे; शिवाय एक खजिनदार असे, नवीन निरनिराळ्या प्रकारचीं ना-टकें रचणारे असत, आणि शिवाय निरनिराळीं वाद्यें वाजविणारे व गाणीं गाणारे असत. अगोदरच दाख-विलेल्या कारणांमुळें रोममधून फारसा पुरावा मिळत नाहीं; तथापि थोडासा मिळतो. बरें, ह्या संकलीभव-नाचीं उदाहरणें आधुनिक कालामध्यें मिळत नाहींत असें नाहीं. इंग्लंदांत "नाटक्यांचा मदतनीसफंड" म्हणून

निघालेला आहे ह्यावरून ह्याचें थोडेंसें दिग्दर्शन होतें. तद्वतच नाटकें करणारांपासून नाटकें लिहिणारांचे पैसे वसूल करण्याची एक संस्था तेथें आहे हेंहि ह्या संकल्पनाचेंच एक उदाहरण आहे. तद्वतच नाटककंपन्या व नाटकांत शिरूं इच्छिणारे लोक ह्यांना परस्परांबद्दल माहिती होण्यासाठीं वगैरे तेथें वर्तमानपत्रें आहेत हें एक त्याचेंच उदाहरण होय.

प्रकरण पांचवें

चरित्रकार, इतिहासकार, आणि साहित्यकार

२२. मनोभाव व विचार हीं कृती, ध्वनी आणि शब्द ह्यांच्या द्वारा व्यक्त करण्याच्या कित्येक कलांची मूल उत्पत्ति संमिश्र रीतीनें कशी झाली आहे हें गेल्या दोन प्रकरणांत आपल्या दृष्टीस पडलें आहे. आतां कांहीं अन्य कलांची उत्पत्ति त्याच रीतीनें कशी झालेली आहे हें एथें आपल्यास पाहणें आहे. प्राथमिक वक्ता, कवि व गाणाराच प्राथमिक चरित्रकार, इतिहासकार व साहित्यकार असे. ह्या सर्वांचा सामान्य विषय वीरांचीं कृत्यें हा असे; आणि त्या कृत्यांच्या वर्णनास हें किंवा तें स्वरूप येऊन कधीं त्याचें वक्तृत्वयुक्त भाषण बने, कधीं गाणें बने, कधीं काव्य बने, कधीं व्यक्तिचरित्र बने, कधीं राष्ट्रेतिहास बने, आणि कधीं माणसाच्या कृती व इतर गोष्टी ह्यांवरील ज्या टीकांस वाङ्मय किंवा साहित्य म्हणून म्हणतात तें बने.

हीं एकसमयावच्छेदेंकरून होणारी उत्पत्ति उदाहृत करणाऱ्या गोष्टींचा विचार करण्यास लागण्याच्यापूर्वीं, ही गोष्ट आपण लक्षांत घेऊं कीं, ह्या अनेक गोष्टींची उत्पत्ति होण्यास दुसरें एकादें मूल कारण असण्याचा संभव नाहीं; आणि दुसरी गोष्ट अशी ध्यानांत आणूं कीं हें मूल कारण मनुष्यस्वभावांत फार खोल गेलेलें आहे. कांहीं रानटी लोक छावणींत शेगोटी पेटवून शेकत बसले आहेत असें समजा, आणि ते तेथें काय बोलत असतील ह्याची कल्पना करा; तर आपल्यास असें दिसून येईल कीं, लढाई व शिकार ह्यांमध्यें त्यांनीं व इतरांनीं जे काय पराक्रम केले असतील त्यांखेरीज त्यांना बोलावयास इतर विषय असूं शकणार नाहीं. सभोंवतालची सृष्टि आणि तींत कधीं कधीं घडून येणारे विलक्षण चमत्कार जरी त्यांस बोलावयास व टीका करावयास असतात तरी त्यांचें त्यांच्याकडे जें लक्ष जातें तें त्यांच्या मनावर व जीवितावर त्यांचा जो कांहीं परिणाम घडत असेल तेवढ्यापुरतेंच बहुधा जातें. मानवी कृत्यें नेहमींच माणसाचें मन वेधीत असतात, आणि, उघडच, मानवीकृत्यांपैकीं जीं सामान्य कृत्यांपासून विशेष निराळीं असतील त्यांबद्दलचेंच विवेचन सर्वांत ज्यास्त होण्याचा संभव आहे; उदाहरणार्थ, शूर माणसानें मिळविलेले जय, बळकान माणसाचीं शक्तीचीं कामें, धूर्त माणसाचीं कावेबाजपणाचीं कृत्यें. म्हणून प्रारंभींच्या पाय-ऱ्यांवर, इतर मनोवेधक गोष्टींची वाण असल्यामुळेंच, रोजच्या लढाईंत किंवा शिकारींत जें कांहीं कोणीं साध्य केलें असेल त्यावर बोलणें झालें म्हणजे सहजच त्यांच्या

नायकाचे पराक्रम, सामान्य कृती, आणि जोराचीं भाषणें, ह्यांसंबंधानें वरचेवर रानटी लोकांत गोष्टी निघतात. हळू हळू त्याच्या पराक्रमांच्या वर्णनास व प्रशंसेस त्याच्या कारकीर्दींतील एकंदर कृत्यांच्या कम-ज्यास्त व्यवस्थित अशा कथेचें, म्हणजे बीजरूप येऊं लागतें. आतां अशा प्रकारचें साधें चरित्र प्रथमच सहज कां उत्पन्न होतें ह्याचें दुसरें एक कारण असें आहे कीं, अशा प्रकारचें कथन करणें हें तें करणारास आणि ऐकणारास, दोघांसहि अत्यंत सोपें जातें. एकाद्याच्या कृती, त्याच्यावर आलेलीं संकटें, आणि त्यांतून त्यानें केलेला आपला बचाव, ह्यांचें वर्णन करण्यास फारच अल्प बुद्धि पुरे होते, आणि तें वर्णन सवाशीं किंवा कांहीं अंशीं अगदीं अल्प बुद्धीच्याहि माणसास कळूं शकतें. प्रत्येक मुलाच्या उदाहरणावरून ही गोष्ट सिद्ध होते. गोष्ट सांगा म्हणून मुलें वरचेवर पाठीस लागत असतात, ह्यावरून साहसीकृत्यांच्या हकीकती ऐकण्याची आवड त्यांस मुळापासूनच असते हें जसें स्पष्ट होतें, तसेंच असलीं कृत्यें ध्यानांत घेण्यास मनास फारसे श्रम पडत नाहींत हेहि स्पष्ट होतें. आणि गांवांतील गपिष्ट म्हातारी, अलपबुद्धीची असली तरी, गांवचा खोत किंवा जमीनदार आणि त्याचें कुटुंब ह्याबद्दलच्या गोष्टी एकसारख्या कशा सांगत असते ही गोष्ट लक्षांत आणिली म्हणजे केवळ कथनरूप (गुणदोषविवेचनरूप नव्हे) चरित्र तयार करण्यास विचारशक्ति फारशी कशी लागत नाहीं, आणि म्हणून चरित्रें लवकरच कशीं उत्पन्न होतात, ही गोष्ट लक्षांत येते.

आतां वर सांगितल्याप्रमाणें सुसंबद्ध प्रकारचें चरित्र ज्यांच्यांत कायमचे राजे व नाईक उत्क्रान्त झाले आहेत अशा समाजांत उत्पन्न होत असल्यामुळें तें त्या राजांच्या किंवा नायकांच्या कारकीर्दींत ज्या विशेष गोष्टी झाल्या असतील आणि ज्यांचें उपाध्ये-कवी वर्णन करीत असतात असल्या गोष्टींच्या हकीकतीवरून हळू हळू सुधारत जातें. ही सुधारणा हळू हळू कशी होत जाते ह्याबद्दलचा थोडासा पुरावा आतां देऊं.

२३. इतिहास लिहन ठेवावयास लागण्याच्या पूर्वी ह्या गोष्टीच्या पहिल्या पहिल्या पायऱ्या क्रमिल्या जात असल्यामुळें, त्याबद्दलचा पुरावा हल्लीं अस्तित्वांत असलेल्या व थोडीशी जागृति पावलेल्या कांहीं रानटी जातींमध्येंच दृष्टीस पडतो. उदाहरणार्थ, मालकम म्हणतो कीं, भाट हा भिल्ल लोकांचा कवि व इतिहासकार असतो. तो असेंहि सांगतो कीं ह्या भिल्लांच्या कांहीं जमिनी रजपुतांनीं घेतल्या व ह्या भाट लोकांस ते आपल्या मुलखांत घेऊन गेले; तेथून ते दक्षिणेंत भिल्ल लोकांकडे वर्ष दोन वर्षांनीं जातात, व त्यांच्या कुटुंबांतून ज्या कांहीं विशेष गोष्टी घडून आल्या असतील व विशेषतः लग्नसंबंध जडले असतील त्यांजबद्दल बोंब करितात, आणि त्यांच्या वाडवडिलांचे पराक्रम गाऊन दाखवितात. गोंड लोकांबद्दल हिस्लापसाहेब म्हणतो कीं, पाडाल किंवा पाठाडी नांवाचे लोक त्यांस धर्माबद्दल सल्ला देत असून त्यांच्या वाडवडिलांचीं नांवें व पराक्रम हीं त्यांस गाऊन दाखवीत असतात. ह्या उदाहरणावरून असें दिसून येतें कीं, उपाध्या हा इतिहास व चरित्र-

कार ह्याचें काम प्रथम करीत असता. त्याच्या वर्णनांत माणसांच्या आयुःक्रमांतील मुख्य मुख्य गोष्टींचें कथन गोंवलेलें असतें, आणि टोळीनें केलेले पराक्रमहि गोंविलेले असतात; सारांश, तो एक बीजरूप इतिहासच बनतो.

आफ्रिकेमध्यें जिवंत शास्त्याला दाखविल्या जाणाऱ्या राजनिष्ठेवरून मृत शास्त्याच्या पूजेची उत्पत्ति झालेली नसल्यामुळें, ह्या वाढीची पहिली पायरी तेवढीच त्यांच्यांत दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, झुलू लोकांच्या राजाच्या पदरीं असे कांहीं लोक असतात कीं, ते नाचाच्या वेळीं स्तुतिपाठक-भालदारांचें काम करितात, आणि संधि साधेल तेव्हां आपल्या राजाच्या कृति व पराक्रम ह्यांचें सारखें वर्णन करीत सुटतात. डेहामीमध्यें देखील मानकरी व इतिहासकार ह्यांचा संयोग झालेला दृष्टीस पडतो. त्या राज्यांत बायकांचें माहात्म्य इतकें मोठें असल्यामुळें त्यांच्यांत स्त्रिया राजकवी आहेत आणि ह्या राजकवयित्र्या राज्याचा इतिहास लिहून ठेवितात; आणि त्यांचा हा हुद्दा वंशपरंपरा चालत असून फार फायदेशीर आहे.

प्रसिद्ध माणसाच्या स्मशानविधीचे समयीं चरित्र व इतिहास ह्यांचीं संयुक्त बीजें कशीं दिसूं लागतात ह्याबद्दलचें उदाहरण आबिसिनियामध्यें दृष्टीस पडतें. "मोठ्या लोकांच्या स्मशानविधीचे वेळीं गाण्याचा धंदा करणाऱ्या स्त्रिया बहुतकरून हजर असतात. त्या वेळीं रडणारा प्रत्येक माणूस पाळीपाळीनें मृताच्या स्तुतीनें भरलेल्या कविता करून म्हणूं लागतो. त्या धंदेवाल्या नायकिणी मृताचे पूर्वज, त्याच्या कृती, त्याचे

गुण, आणि त्याची मालमत्ता, इत्यादिकांची बारीक हकीकत गाऊन दाखवितात. '' मृत माणूस जेव्हां विजेता राजा असेल तेव्हां धंदेवाल्या गायकांनीं प्रेतविधीचे वेळीं केलेली जी ही प्रशंसा ती त्याला देव बनविण्याच्या कामांतील पहिली पायरी असते; आणि तिच्या योगानें त्याची जी पूजा सुरू होते तिच्यांत त्याच्या कारकीर्दीची हकीकत येत असून तें त्याचें चरित्र बनतें, आणि त्याच्या कृत्यांची हकीकत येत असून तो त्या टोळीच्या प्राथमिक इतिहासाचा पाया बनतो.

प्राचीन अमेरिकन सुधारणांच्या वर्णनांकडे पाहतां असल्याच मतलबाच्या गोष्टी त्यांच्यांत दिसून येतात. उदाहरणार्थ, आझटेक लोकांबद्दल हें ब्यांक्रॉफ्टचें वर्णन पहा.—'' ऐतिहासिक बखरी आणि धार्मिक गूढें इत्यादि जे उच्चतर वर्गाचे लेख ते तयार करण्याचें व सुरक्षित ठेवण्याचें काम त्यांच्यांत अगदीं वरिष्ठ दर्जाच्या उपाध्यांकडे असे ''. दुसरीकडे असा लेख सांपडतोः—'' ह्या सभेंत देवाचा ग्रंथ तयार केला. त्या ग्रंथांत महाप्रलयापासूनचा नाहुआ लोकांचा सर्व इतिहास गोंवलेला होता; आणि शिवाय धर्मविधी, सरकारी व्यवस्था कायदे आणि सामाजिक चाली, आणि शेतकीची कला व शास्त्रें ह्यांबद्दलचें त्यांचें सर्व ज्ञान, हींहि गोंवलेलीं होतीं ''. ऐहिक चाली व ज्ञान ह्यांबरोबर, इतर धर्मग्रंथांप्रमाणें ह्या ग्रंथांतहि धर्म, इतिहास व चरित्र ह्यांची खिचडी कशी झालेली होती ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

२४. प्रारंभीं सुधारलेल्या समाजांनीं असलेच पुरावे

ठेवून दिलें आहेत. हीब्रू धर्मग्रंथाचें चारित्ररूप व इतिहासरूप स्वरूप स्पष्ट आहे. इतर धर्मग्रंथांप्रमाणें ह्या ग्रंथांतहि राष्ट्राच्या देवाच्या कारकीर्दींतील गोष्टींचें वर्णन प्रथम केलेलें आढळतें; म्हणजे, देवानें आठवड्याच्या निरनिराळ्या वारीं निरनिराळ्या वस्तू कशा उत्पन्न केल्या, आणि सातव्या वारीं विसावा कसा घेतला, ह्या गोष्टी त्यांत सांगितलेल्या आढळतात. त्यानंतरच्या भागांत त्याच्या, आडामच्या, व आब्राहाम्, ऐझाक, जेकब वगैरे पेट्रिआर्क लोकांच्या कृतींचीं वर्णनें आढळतात. हीं चरित्रें झालीं. पुढें जेव्हां त्यांची भटकण्याची स्थिति जाऊन स्थाइक स्थिति उत्पन्न झाली, तेव्हां त्यांच्यांत इतिहासाची उत्पत्ति होऊं लागली, व प्रथम प्रथम तो उपाध्येच लिहून ठेवीत असत असें दिसतें.

ईजिप्तमधील शिलालेखांकडे पाहतां असाच पुरावा दृष्टीस पडतो. त्यांच्या थडग्यांच्या मागच्या खोलींत मृताच्या कारकीर्दींतील मुख्य गोष्टींचें वर्णन कोरून ठेवलेलें आढळतें. राजे वगैरे लोकांच्या थडग्यामध्यें ही गोष्ट विशेषच प्रमाणावर सहजच आढळे. आपण असें वाचितों कीं, इजिप्शन लोकांतील राजदेवाच्या देवळांतून उपाध्ये त्यांचे विस्तृत इतिहास लिहून ठेवीत असत. त्यामध्यें त्यांची शारीरिक शक्ति, स्वभाव व पराक्रम ह्यांचीं कालानुक्रमें वर्णनें आढळतात. शिवाय हे इतिहास बहुधा काव्यरूपी असत. एवंच, ईजिप्तमध्यें उपाध्ये हेच चारित्रकार व इतिहासकार ह्या दोघांचींहि कामें करीत हें स्पष्ट दिसतें.

ग्रीक लोकांमध्यें धर्म, चरित्रें, आणि इतिहास ह्यां-

मध्यें संबंध असे, हें गतप्रकरणांतून अप्रत्यक्षरीत्या दिसून आलेंच आहे. देवाच्या पराक्रमांचें वर्णन कधीं पदांच्या रूपानें आणि कधीं श्लोकांच्या रूपानें त्यांच्यांत जें करीत त्यामध्येंच चरित्र व इतिहास या दोघांचा समावेश होत असे. तथापि त्यासंबंधानें आणखी थोडा विशिष्ट पुरावा देऊं. उदाहरणार्थ, त्यासंबंधानें एके ठिकाणीं असें म्हटलेलें आढळतें:—"ग्रीकलोकांचीं कुटुंबें आणि राष्ट्रें ह्यांचा इतिहास धर्मदृष्ट्या उपदेशपर व हितकारक अशा रीतीनें लिहिलेला असे". होमरचें "इलियड" हें कांहीं अंशीं इतिहासरूप व कांहीं अंशीं चरित्ररूप असें आहे. "ऑडिसी" हा ग्रंथ तर सर्वांशींच चरित्ररूप आहे. पण हीं वीरपुरुषवर्णन-काव्यें जरी प्राधान्येंकरून सांसारिकच आहेत तरी त्यांचें धार्मिक स्वरूप अजीबाद निघून गेलेलें नाहीं; कारण त्यांच्यांत माणसांच्या वतीनें देव प्रत्यक्ष भांडत आहेत अशीं वर्णनें आढळतात.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें रोमन समाजाची घटना फार विविधजातीय असल्यामुळें त्याचें उत्क्रमण अगदीं शिस्तवार रीतीनें झालेलें नाहीं. तथापि उपाध्या व इतिहास ह्यांच्यामध्यें तेथेंहि कांहीं संबंध दृष्टीस पडतोच. उदाहरणार्थ, डुरुई असें म्हणतो कीं उपाध्यांचें काम घडलेल्या गोष्टींचें स्मरण कायम ठेवणें हें असे. प्रत्येक वर्षीं मुख्य उपाध्या एका पांढऱ्या शिळेवर त्या वर्षांत राष्ट्रांत घडलेल्या सर्व गोष्टींचा दिवसवार इतिहास लिहून ठेवीत असे; त्यांत प्रारंभीं कान्सल व इतर सर्व म्याजिस्ट्रेट ह्यांचीं नांवें घातलेलीं असत. तद्वतच रोम्यूलस ह्यास ते लोक

आपला सर्वांत मोठा देव समजून त्याला त्यांनीं देऊळ बांधून दिलें होतें, व त्याला बळी अर्पण करण्याकरितां एका उपाध्याची योजना केली होती, असें म्हणतात. ही गोष्ट जर खरी असेल तर त्याच्या पराक्रमांची जी हकीकत ती जरी मुख्यत्वेंकरून दंतकथारूप असली तरी तिच्यांत सत्याचा अंश कांहीं तरी असलाच पाहिजे; आणि तितक्यापुरतें त्याच्या उपाध्यांनीं केलेल्या त्याच्या स्तुतीस चरित्रेतिहासरूप स्वरूप आलें असलें पाहिजे.

ह्यासंबंधानें हीहि गोष्ट एथें सांगण्यासारखी आहे कीं, रोमन लोकांतील अगदीं पहिला इतिहासकार जो ईनियस तो पौराणिक कविहि होता; आणि त्यानें आपला इतिहास पद्यरूपानेंच लिहिलेला आहे.

२५. आतां यूरोपांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाल्यानंतरच्या काळाकडे पाहतां, पुष्कळ काळपर्यंत यूरोपांतील वाङ्मय म्हटलें म्हणजे चरित्र व इतिहास ह्यांची ज्यामध्यें भेसळ झालेली आहे अशा कथांचें किंवा बखरींचेंच बनलेलें असे. चवथ्या ते आठव्या शतकापर्यंत सांसारिक वाङ्मय मुळींच नव्हतें; होतें तें सर्व धार्मिक वाङ्मय असे. उपाध्ये तेवढे वाचन व लेखन करीत असत; व तें अर्थात् धार्मिक विषयांवर करीत. तद्वतच नवव्या व दहाव्या शतकांत ५७ ग्रंथकार होते म्हणून जें गीझो सांगतो त्यांजपैकीं चारच काय ते गृहस्थ होते; बाकीचे सर्व भिक्षुक; व तेहि अर्थात् वरच्यासारखाच उद्योग करीत असले पाहिजेत.

तथापि आठव्या शतकानंतर ख्रिस्ती धर्माच्या दंतकथांशिवाय इतर प्रकारचे इतिहास किंवा चरित्रें कांहीं

उपाध्ये लिहूं लागले असें दिसतें. इंग्लंदांत बखरी व इतिहास बहुतकरून मठांतून तयार होत असत. उदाहरणार्थ, **बीड** हा मठाधिपति व इतिहासकार होता; **साइनवुल्फ** हा तसाच होता; **गिल्डास** हा मठवाला व बखरी लिहिणारा होता; आणि **आसर** बिशप व चरित्रकार होता. आंग्लोसाक्सन लोकांची बखर नवव्या ते बाराव्या शतकापर्यंत मठवाल्यांनीं लिहिलेली असून तिच्यांत वर्षानुवर्ष हकीकत दिलेली आहे. नार्मनलोकांनीं इंग्लंद जिंकल्यानंतर देखील मुख्य लेखक उपाध्येच असत. मात्र पुढें पुढें गृहस्थ ग्रंथकार हळूहळू दिसूं लागले.

आतां या मध्यकालीन युगांत धर्माधिकाऱ्यांखेरीज फारसे कोणी शिकत नसल्यामुळें चरित्रें व इतिहास लिहिणारे बहुधा तेच असत हें प्रत्यक्ष पुराव्याखेरीज केवळ अनुमानानेंहि ताडतां येण्यासारखें आहे.

२६. आतां कादंबऱ्या ह्या चरित्रापासूनच उत्पन्न झालेल्या आहेत ह्याबद्दल पुरावाच द्यावयास नको. चरित्रकार अगदीं घडलेल्या असतील तशाच गोष्टी सांगणारा असल्यास निराळें (आणि तसे चरित्रकार हल्लींहि जर दिसत नाहींत, तर प्रारंभीं असणें फारच असंभाव्य); नाहीं तर त्याच्या वस्तुस्थितिवर्णनांत कल्पनेची भेसळ कमज्यास्त झालेली असावयाचीच. प्रारंभींच्या काळाच्या ज्या कलांमुळें नायकांबद्दलच्या गोष्टींस त्यांचेच देव बनून पौराणिक कथांचें स्वरूप आलें, त्याच कलांमुळें सामान्य माणसांच्या चरित्रांत अतिशयोक्तींची भेसळ होऊं लागली. ग्रीकलोकांमध्यें त्यांचे कवी व तत्त्ववेत्ते यांच्या जन्मस्थानाच्या संबंधानें असलेल्या

वादांचें स्मरण केल्यास पूर्वी लोकांचीं विधानें किती निष्काळजीपणानें केलेलीं असत, आणि वास्तविकास कालपनिकाच्या भेसळीनें किती भलतेंच स्वरूप आलेलें असे हें व्यक्त होतें. एकादी चमत्कारिक गोष्ट सांगावयाची असली म्हणजे थोडी-फार अतिशयोक्ति करण्याचा मोह फारच थोड्या लोकांस टाळतां येतो; अशी स्थिति जर हल्लीं देखील दृष्टीस पडते तर प्रारंभीं किती तरी असली पाहिजे.

आतां हें उघडच आहे कीं, एकाद्या साहसी किंवा पराक्रमी कृत्याची हकीकत तिखटमीठ लावून जो ज्यास्त मनोहर करील तो श्रोत्यांना सर्वांत ज्यास्त आवडत असे; आणि ह्यामुळें त्यास अतिशयोक्ति ज्यास्त ज्यास्त करण्याचा मोह होई, आणि अशा रीतीनें हळू हळूं तो कादंबरीकार बने. मुलें देखील प्रथम एकादी गोष्ट ऐकून ती खरी आहे किंवा खोटी आहे म्हणून विचारीत असतात, पण पुढें विचारीत नाहींशीं होतात; आणि पुढें आपल्या सोबत्यांचें रंजन करण्यासाठीं तसल्या गोष्टी स्वताच सांगूं लागतात. असुधारलेल्या किंवा अर्धवट सुधारलेल्या लोकांत ही प्रवृत्ति अशाच रीतीनें उत्पन्न होते. म्हणून आपल्या इकडच्या पौर्वात्य देशांत गोष्टी सांगणारांचा, म्हणजे तोंडी कादंबऱ्या रचणारांचा, एक स्वतंत्र वर्गच बनलेला दिसतो. आणि अशा रीतीनें कादंबरी ही चरित्रापासून किती हळू हळू भिन्न होत जाते हें ह्या गोष्टीवरून दिसतें कीं, ह्या गोष्टी प्रारंभीं सांगणारास जरी खऱ्या वाटत नसल्या तरी ऐकणारास वाटत असतात. उदाहरणार्थ, आरबी

भाषेंतील सुरस गोष्टींबद्दल बेली सेंट जॉन साहेब असें सांगतो कीं, मी एका पौर्वात्य कुटुंबास त्या वाचून दाखवीत असतां त्या खऱ्या समजावयाच्या नाहींत असें सांगितलें असतांहि ते असें प्रतिपादूं लागले कीं उगाच कोणी खोटें लिहीत बसेल कीं काय ? सारांश, कादंबरी अस्तित्वांत आल्यावरहि ती चरित्रांमध्येंच लेखिली जाते; म्हणजे सुधारलेल्या लोकांप्रमाणें ती चरित्रापासून भिन्न म्हणन समजत नाहींत.

सुधारलेल्या राष्ट्रांच्या प्रारंभींच्या इतिहासावरून असें दिसतें कीं, काल्पनिक चरित्रांच्या उत्पत्तींत उपाध्येवर्गाचें कांहीं अंग असे. उदाहरणार्थ, इंग्लंदांत स्टीफन राजाच्या कारकीर्दींत वेस हा उपाध्या असून कल्पित गोष्टी लिहिणाराहि असे; तद्वतच वाल्टर म्याप हा आर्चडीकन (बडा उपाध्या) असून धार्मिक व सांसारिक कादंबऱ्या लिहीत असे. त्यानंतरच्या कादंबऱ्यांच्या कर्त्यांचीं नांवें खात्रीनें कळत नाहींत; तथापि पुढें त्या सांसारिकच बनल्या असें मात्र दिसून येतें.

ह्याबरोबरच ह्यापासून निघालेले वाङ्मयप्रकार दिसावयास लागले होते; तथापि त्या सर्वांमध्यें चरित्ररूपी अंग कांहीं तरी दिसेच. उदाहरणार्थ, नार्मन लोकांनीं इंग्लंद जिंकल्यानंतर सीवुल्फ हा मठवाला बनून आपल्या प्रवासाचें वर्णन लिहिता झाला; म्हणजे त्याच्या लिहिण्यास भूगोल व आत्मचरित्र ह्या दोहोंचेंहि स्वरूप आलें. नंतर पहिल्या रिचर्डाच्या कारकीर्दींत नायजेल वायरिकर हा मठवाला असून त्यानें मठवाल्यांवरच एक थट्टारूप लेख लिहिला होता; व म्याप

ह्यानेंहि असेंच केलें होतें. त्याच राजाच्या कारकीर्दींत व्हिन्सालफ नांवाचा धर्माधिकारी काव्याचें गुणदोषविवेचन करीत असे. तिसऱ्या हेन्रीच्या कारकीर्दींत मॅथ्यू-पारिस मठवाला राजा व पोप ह्या दोघांनाहि शिव्या देऊन चारित्रिक गोष्टींस थट्टेच्या लेखाचें स्वरूप देता झाला. पुढच्या राजांच्या कारकीर्दींतून विक्लिफ, जॉन ट्रेव्हिसा, हे इतर प्रकारचे लेख लिहीत असून शिवाय भाषान्तरेंहि करीत असत; आणि ब्रोमिआर्ड, लडगेट इत्यादि लेखक कायदा, नीति, धर्मशास्त्र, आणि अलंकारशास्त्र, ह्याच्यावर लिहिते झाले. ह्याच्याहून ज्यास्त पुरावा देण्याची जरूरी नाहीं; कारण एवढ्यावरून स्पष्ट दिसतें कीं, प्रारंभीं उपाध्याच लेखक म्हणून पुढें आला.

उघडच, चरित्रें, इतिहास, व इतर वाङ्मय हीं जसजशीं सांसारिक बनत चाललीं आहेत, तसतसे ग्रंथकारांचे ज्यास्त ज्यास्त भिन्न वर्ग बनत चालले आहेत. इतिहास हल्लीं प्राधान्येंकरून चरित्रमय असून त्याच्यांत पोटविभाग झालेले आहेत. उदाहरणार्थ, कांहीं इतिहास तात्त्विकदृष्ट्या लिहिलेले आहेत, म्हणजे त्यांचा उद्देश राष्ट्राची वाढ कशी होत जाते हें दाखविण्याचा आहे. उदाहरणार्थ, ग्रीनचा इंग्लंदचा इतिहास. कांहीं कोत्या दृष्टीनें लिहिलेले आहेत; म्हणजे ते लिहिणारांना मोठ्या माणसांचीं कृत्यें हांच इतिहास असें वाटतें; उदाहरणार्थ, कार्लाइलचा फेडरिक बादशहाचा इतिहास. चरित्राचेहि त्याचप्रमाणें आत्मचरित्र व इतर चरित्र असे दोन पोटविभाग असून शिवाय केवळ कथारूपचरित्र आणि स्वभावविवरणरूप चरित्र

असे भेद झालेले आहेत. आणि ह्याशिवाय वर्णनात्मक, भावनात्मक, थट्टात्मक असे कादंबऱ्यांचे अनेक पोटविभाग झालेले असून उपदेशात्मक, विनोदात्मक, परीक्षणात्मक असे निबंधांचेहि पोटविभाग झालेले आहेत.

२७. ह्या सामान्य विभक्तीकरणांबरोबर जे विशेष संयोग बनलेले आहेत त्यांजबद्दल विशेष सांगण्यासारखें कांहीं एक नाहीं. एकंदर लेखकवर्गाकडे पाहतां यांच्या सभा किंवा मंडळें नुक्तींच बनूं लागलीं आहेत. ह्याचीं कारणें समजण्यास फारसा िचार करावयास नको.

पुस्तकें लिहिण्याचा उद्योग मुख्यत्वेंकरून मठांतून किंवा दुसरीं उत्पन्नें आहेत अशा भटांकडून प्रारंभीं होत असल्यामुळें त्या वेळीं तो पोटाचा धंदा बनलेला नव्हता. छापण्याची कला निघाल्यानंतर पुष्कळ काळपर्यंत ग्रंथलेखन हा पोटाचा धंदा बनावा इतका ग्रंथाचा खप होत नसे; आणि पुढें जेव्हां लोक पोटासाठींच लिहूं लागले तेव्हां त्यांस उदरनिर्वाहास पुरतील इतके पैसे मिळण्याची मारामार पडे. त्या वेळेस ग्रंथकारांस कांहीं बिदागी मिळाली तर ती श्रीमंतांपासूनच मिळे. सारांश, प्रारंभीं भाटाची जी स्थिति असे तीच पुष्कळ काळपर्यंत ग्रंथकाराची असे. तो राजाच्या किंवा एकाद्या बड्या सरदाराच्या आश्रयावर अवलंबून असे, आणि त्याला आपल्या धन्यावर पद्य नाहींत तर गद्य तरी पूर्ण प्रशंसापर लेख लिहावे लागत. ह्या दास्यत्वापासून त्याची मुक्तता आलीकडेच झालेली आहे; आणि ग्रंथ विकत घेणारांचा वर्ग वाढल्यामुळें आलीकडेच बऱ्याच ग्रंथकारांना बरेचसे पैसे मिळूं लागले आहेत. म्हणून त्यांचीं

मंडळें बनावीं इतकी लेखकांची संख्या परवांपर्यंत झालेलीच नव्हती.

फ्रान्सदेशांत " अकाडेमी " नांवाची ग्रंथकारांची सभा आज पुष्कळ वर्षें अस्तित्वांत असून इंग्लंदांतहि अलीकडे तसे यत्न झालेले आहेत. पन्नास-साठ वर्षांपूर्वी वाङ्मय व कलामंडळ स्थापन करण्याची खटपट तिकडे झाली होती; पण ती सफळ झाली नाहीं. पण आलीकडे ग्रंथकारांची सभा स्थापन झालेली असून त्यांच्या हिताहिताची चर्चा करणारें एक स्वतंत्र मासिकहि निघालेलें आहे; आणि त्याशिवाय तिकडे ग्रंथपरीक्षण करणारीं कित्येक साप्ताहिकें वगैरे असून तीं ग्रंथकार व लोक ह्यांची परस्परांशीं ओळख करून देण्यास कारणीभूत होत असतात.

प्रकरण सहावें

शास्त्रकार आणि तत्त्वज्ञ

२८. आतांपर्यंत ज्या धंद्यांचें विवेचन केलें त्यांजमध्यें आणि उपाध्येवर्गामध्यें असणारे संबंध जर स्पष्ट आहेत, तर तो वर्ग आणि ज्या धंद्यांचा उद्देश माणसाची ज्ञानवृद्धि हा आहे त्यांमध्यें असलेला संबंध ज्यास्तच आहे. उपाध्येवर्गाची ही संतति जरी त्याशीं हल्लीं विरोध करिते तरी तिचें प्रारंभीं त्यानेंच पोषण केलेलें आहे.

आपल्या नजरेस हें अगोदर आलेंच आहे कीं, वैदू नेहमीं सभोंवतालच्या लोकांवरील आपला प्रभाव कायम

ठेवण्याची व वाढविण्याची खटपट करीत असल्यामुळें तो आपल्या यत्नास मदत करील अशा प्रकारचें सृष्टि-चमत्काराचें ज्ञान मिळवावें अशी त्यास सहजच उ-त्कंठा असते.

शिवाय ज्या निसर्गोत्तर सत्त्वांवर त्याचा विश्वास असेल त्यांना संतुष्ट करण्याची त्याची खटपट चालले-ली असल्यामुळें त्यास सहजच त्यांचे स्वभाव व कृती काय असतील बरें असा विचार करावासा वाटतो. म्ह-णून तों आकाश व पृथ्वी ह्यांचे ठिकाणीं ज्या विशेष चमत्कारिक गोष्टी दिसतील त्यांच्या कारणांबद्दल कल्पना लढवूं लागतो. आणि हीं कारणें त्यास पौरुष वाटोत वा अपौरुष वाटोत, त्याच्या विचाराचा जो विषय असतो तो मागाहून ज्यास तत्त्वज्ञानविषयक म्हणून नांव मि-ळतें तो असतो; म्हणजे, जें आपल्यास ज्ञात होतें तें आणि जें त्याच्या पलीकडे असेल तें, ह्या दोहोंमधील संबंध हा त्याच्या विचाराचा विषय असतो.

प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें वैद्य हा त्याच्या ज्यास्त विस्तृत माहितीमुळें आणि ज्यास्त खोल अंतर्दृष्टीमुळें सभोंवतालच्या लोकांपासून भिन्न दिसण्याचें आणखी एक कारण असें दिसतें कीं, त्यांच्या मानानें त्यास फु-रसत ज्यास्त असते. प्रारंभापासून तो दुसऱ्यांच्यां म-दतीवर रहात असतो; आणि म्हणून ज्या अवलोकनां-पासून आणि विचारणांपासून शास्त्राची उत्पत्ति होते त्यां-जकडे सारखें लक्ष पोंचविण्यास तो ज्यास्त समर्थ असतो.

२९. औषधीवनस्पती आणि प्राण्यांपासून उत्पन्न होणारे कांहीं विशिष्ट पदार्थ ह्यांबद्दलचें कांहीं ज्ञान,

आणि कदाचित् खनिजपदार्थांबद्दल अल्पसें ज्ञान, शिवाय हवेच्या चिन्हांचें इतपत ज्ञान कीं त्यावरून उन्ह केव्हां पडेल व पाऊस केव्हां पडेल हें अगोदर सांगतां यावें (आणि म्हणून ते ते चमत्कार उत्पन्न करितातसें वाटावें)—ह्या पलीकडे रानट्यांच्या वैदूंमध्यें किंवा अर्धवट उपाध्यांमध्यें ज्यास्त शास्त्रज्ञान बहुधा नसतें. पुढें जेव्हां जीवित स्थाईक होऊन शोध करण्यास आणि संपादित ज्ञान इतरांमध्यें पसरण्यास सुलभता प्राप्त होते, तेव्हांच शास्त्रज्ञाचें कांहीं तरी स्वरूप उपाध्यांस येतें. म्हणून अशा स्थितींतील समाजांचा आपण आतां विचार करूं.

प्रथम आपल्याच देशाचा प्राचीन इतिहास पाहतां शास्त्र हा प्रारंभीं धर्माचा एक भाग असे ह्याबद्दल पुरावा सांपडतो. ज्योतिःशास्त्र व वैद्यक ह्या दोघांनाहि प्रथम धर्मविषयक क्रियांवरून उत्तेजन आलें. उदाहरणार्थ, यज्ञ करण्याचा बरोबर वेळ ठरविण्यासाठीं प्रथम लोक ज्योतिर्विषयक निरीक्षणें करूं लागले. म्हणून उपाध्ये प्रत्येक रात्रीं चंद्र केव्हां उगवतो हें पाहूं लागले,. आणि दिवसा सूर्य उत्तरेकडे व दक्षिणेकडे अनुक्रमें कसा उगवत जातो हें पाहूं लागले. यज्ञाच्या वेळीं मंत्राच्या उच्चारांत एकहि अक्षरावरील स्वर चुकल्यास देव रागावतील म्हणून स्वरविषयक नियम ते शोधून काढूं लागले; आणि वेदाचा बरोबर अर्थ कळावा म्हणून निरुक्त व व्याकरण हीं शास्त्रें त्यांनीं अस्तित्वांत आणिलीं. स्थंडिलांची रचना बरोबर करतां यावी म्हणून भूमितिशास्त्राची वाढ त्यांनीं केली.

पुढें हा शास्त्रज्ञवर्ग उपाध्येवर्गापासून भिन्न होऊं लागला. उदाहरणार्थ, ज्योतिष्याचा धंदा करणारांस नक्षत्रदर्शक व गणक अशीं नांवें पडलीं. त्याप्रमाणेंच तत्त्वज्ञान हें प्रारंभीं उपाध्येवर्गाच्या एकंदर ज्ञानाचा भाग असून मागाहून स्वतंत्र झालें; आणि जीं गूढें ग्रीक व रोमन तत्त्ववेत्त्यांस किंवा ख्रिस्ती भिक्षुकांस अथवा आधुनिक शास्त्रज्ञांस अद्यापि सुटलेलीं नाहींत त्यांचें विवरण त्यांनीं तेव्हांच करून टाकिलें. त्यापासून पुढें केवळ युक्तिवादीहि उत्पन्न झाले, आणि नास्तिक व पाखंडी असे दोन्ही प्रकारचे पंथ उत्पन्न झाले.

बाबिलोनियन लोकांमध्येंहि एकंदर ज्योतिर्विषयक ज्ञानाचा हेतु धार्मिक विधींचे वेळ ठरविणें, मांत्रिक दोरे तयार करणें, आणि पुढचीं भविष्यें करणें हा असे. उदाहरणार्थ, मावरि, लारिन्सन व लेयार्ड असें म्हणतात कीं, यूरुक राजाच्या वेळीं ज्योतिःशास्त्राचा अभ्यास करीत असत व त्याचा धर्माशीं संबंध असे. आसिरियन लोकांच्या उपाध्यांना प्रारंभापासून ताऱ्यांकडे पाहून तारीख ठरवितां येत असे. खाल्डिअन लोक चंद्रग्रहणें केव्हां केव्हां होतील हें आधीं गणितानें काढूं शकत असत; यावरून त्यांचें अवलोकन किती सूक्ष्म व दीर्घ असलें पाहिजे हें स्पष्ट दिसतें. तद्वतच त्यांच्यांत निरुक्तशास्त्राचा अभ्यास बराच असे असें दिसतें. कारण त्यांचे त्या शास्त्रावरील ग्रंथ फार मेहनतीनें व काळजीपूर्वक लिहिलेले दिसतात. ते इतिहास व भूगोल या विषयांना फार महत्त्व देत; आणि पुराणांकडेहि त्यांचें लक्ष असे.

मास्पेरो म्हणतो कीं, ईजिप्तमध्यें शास्त्रविषयक बहु-

तेक ग्रंथ पवित्र असून ते देवांनीं रचिले व प्रसिद्ध केले असें समजत. आसिरियन लोकांचा ज्योतिःशास्त्राच्या संबंधानें असा समज नसे. ते ग्रंथ विद्वानांनीं लिहिले, व त्या विद्वानांना तें ज्ञान आकाशाच्या निरीक्षणापासून प्राप्त झालें, म्हणून ते समजत. इजिप्शन लोकांच्या उपाध्येवर्गाबद्दल सर जॉर्ज ल्युइस असें म्हणतो कीं, त्यांना अंगमेहनत करावी लागत नसल्यामुळें त्यांस शास्त्रीय अध्ययन व विचार करण्यास फुरसत असे; म्हणून ते प्राचीन काळापासून ताऱ्यांचे वेध घेऊन त्यांची नोंद करून ठेवीत, आणि ज्योतिःशास्त्राबरोबर भूमितिचाहि अभ्यास करीत. शिवाय ते सृष्टींत ज्या विशेष चमत्कारिक गोष्टी घडतील त्यांचीहि नोंद ठेवीत म्हणून म्हणतात. या लोकांबद्दल डायाडोरस असेंच वर्णन करितो. त्यांच्यांत धर्म व शास्त्र यांमध्यें किती निकट संबंध असे हें यावरून दिसतें कीं, त्यांच्या प्रत्येक देवळांत एक ज्योतिषी असे, त्याचें काम ताऱ्यांचे वेध घेणें हें असे. पण बन्सेन म्हणतो कीं, त्यांच्यांत पद्धतवार अशा तत्त्वज्ञानाची उत्पत्ति कधींच झाली नाहीं. हें त्याचें विधान फार महत्त्वाचें आहे. कारण ह्या लोकांवर राजकीय शासन जसें जुलमी असे, तसें विद्या व विचारविषयकहि असे. त्यांची सर्व भिस्त बाबावाक्यावर असे. प्रत्येकानें विचारपूर्वक कोणतेंहि मत ठरविण्याचा व आपल्या मताबद्दल कारणें देण्याचा जो अचार प्रथम दृष्टीस पडतो तो अर्धवट स्वतंत्र अशा लोकांतच होय.

ग्रीस देशांत अनेक स्वतंत्र राष्ट्रें असून त्यांचीं बहुधा भांडणें असत, आणि त्यांचे धर्म परस्परसदृश अ-

सले तरी एकच नव्हते, ह्यामुळें त्यांच्यांत उपाध्येवर्गाचें शासन कधीं उत्पन्न झालें नाहीं असें दिसतें; आणि त्यांच्यांत त्या वर्गापासून कांहीं धंद्यांची उत्पत्ति झाली नाहींसें दिसतें. कांहींअंशीं ह्या कारणावरून, पण मुख्यत्वेंकरून ईजिप्त व आसिरिया या देशांत ग्रीक लोक सुधारण्यापूर्वी शास्त्राची प्रगति झाली होती ह्या कारणावरून ग्रीसमध्यें जराशीं वृद्धिंगत झालेलींच शास्त्रें बाहेरून आणिलीं. ही गोष्ट थेल्स, पायथागोरास, डिमॉक्रिटस, सोलन, प्लेटो इत्यादि ग्रीक लोक ईजिप्त देशांत ही विद्या तेथील उपाध्यांपासून शिकावयास गेले होते, ह्यावरून स्पष्ट होते. एवंच, ग्रीकलोकांत शास्त्राची वाढ उपाध्येवर्गाकडून फारशी झालेली दिसत नाहीं. त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या संबंधानेंहि असेंच दिसतें; म्हणजे तेंहि त्यांनीं बाहेरूनच प्रथम आणिलेलें दिसतें.

उत्क्रमणाच्या योग्य क्रमाला ग्रीसपेक्षां रोममध्यें ज्यास्तच व्यत्यय आलेला असल्यामुळें शास्त्र व तत्त्वज्ञान ह्यांची सारखी वंशावळ त्या राष्ट्रांत असण्याचा संभव त्याच्याहूनहि कमी होता. म्हणून शास्त्र व तत्त्वज्ञान त्या लोकांनीं ग्रीकलोकांपासून उचललेलें दिसतें.

३०. रोमच्या साम्राज्याची च्युति झाल्यानंतर जो अज्ञानरूपी अंधःकाराचा काळ गेला तेव्हां शास्त्र म्हणून ज्यास म्हणतात असें कांहींच नव्हतें. पण पुढें समाजाची पुनः संघटना झाल्यावर शास्त्राची प्रगति जेव्हां पुनः सुरू झाली, तेव्हां ती सुशिक्षितांमध्येंच, म्हणजे, उपाध्यांमध्यें सुरू झाली. त्या प्रगतीस बहुतेकांशीं मठवाल्यांमध्यें सुरवात झाली. उदाहरणार्थ, "म-

ध्ययुगांतील शास्त्र व वाङ्मय" या आपल्या ग्रंथांत लॅक्काय असें म्हणतो कीं, शार्लेमेन बादशहाच्या मृत्यू-च्या वेळीं, शास्त्रें त्याच्या दरबारांतून निघून पुनः म-ठांच्या एकान्तांत प्रवेश करतीं झालीं असें दिसतें. मग सेन्ट बेनिडिक्ट नांवाच्या पंथाच्या मठवाल्यांनीं शा-स्त्रांचा जणूं काय मक्ताच घेतला आहे असें दिसूं लागलें; आणि इताली, फ्रान्स, स्वित्सर्लंद, इंग्लंद इत्यादि देशांतील जे त्यांचे मठ तेथें शास्त्राचें अध्ययन काळजी-पूर्वक करूं लागले. ह्यासंबंधानें एक महत्त्वाचें साहश्य लक्षांत घेण्यासारखें आहे. आसीरिया, ईजिप्त वगैरे दे-शांतून शास्त्राचा ओनामा जो घातला गेला तो धर्मा-प्रीत्यर्थ गेला. कारण, देवांना राग येऊं नये एतदर्थ धार्मिक यज्ञांचे वेळ बरोबर ठरविणें हा त्यांचा उद्देश होता. आणि चमत्कार असा कीं, ख्रिस्ती लोकांमध्येंहि शास्त्राचा जो प्रथम उपयोग केला तो ईस्टर सणाची तारीख ठरविण्यासाठींच केला.

आतां यूरोपांत प्रारंभीं शास्त्र व तत्त्वज्ञान ह्यांचा मक्ता उपाध्येवर्गानेंच कसा घेतला होता तें पाहूं. शा-र्लेमेनच्या वेळीं जेव्हां बौद्धिक जीवितास थोडीशी सुर-वात झाली, तेव्हां ती त्याच्या साम्राज्यांत मठांतून शाळा स्थापण्याच्या रूपानें झाली. ह्या शाळांवर उपा-ध्यांचा ताबा असून पुढें लवकरच तेथें शास्त्र व तत्त्व-ज्ञान यांचा अभ्यास सुरू झाला; आणि तीं अर्थात् धर्ममताशीं विसंगत होणार नाहींत अशा रीतीचींच असत, म्हणजे काय, तर, त्यांचा धर्मापासून भेद फा-रच अल्प असे. म्हणून आबेलार्ड, आल्बर्ट सम्यामस,

टॉमस एक्वायनास, वगैरे तत्त्वज्ञ धर्मोपाध्ये होते. आणि ते जे धर्माधिकाऱ्यांपासून भिन्न झाले ते हळूहळूच झाले.

इंग्लंदामध्यें उपाध्याच तत्त्वज्ञ व शास्त्रज्ञ असे असें स्पष्ट दिसतें. उदाहरणार्थ, साक्सन उपाध्यांचें वर्णन करीत असतां केम्बल म्हणतो:—" उपाध्येलोक कला व विद्या ह्यांत प्रवीण आहेत अशी त्यांची ख्याति असे. काल व ऋतु यांचे विभाग योग्यरीतीनें करतां येण्यासाठीं इंग्लंदांत जीं गणितें केलीं तीं त्यांनींच होय ". ह्याचें पहिलें उदाहरण बीड हा मठवाला होय; त्यानें इतर प्रकारचे ग्रंथ लिहून शिवाय "वस्तूंचा स्वभाव" म्हणून एक ग्रंथ लिहिला; व त्यांत त्यानें त्याच्या काळीं उपलब्ध असलेलें सर्व शास्त्रीय ज्ञान एके ठिकाणीं जमविलें होतें. त्याच्या नंतरचा लेखक म्हटला म्हणजे डिक्किल हा होय; तोहि आयरिश मठवाला असून भूगोलविषयक ग्रंथकर्ता होता. त्याच्या नंतरचा म्हटला म्हणजे आर्चबिशप डन्स्टन. त्याला उदारशिक्षणविषयक बहुतेक कलांची माहिती असून, धातु शुद्ध करणें व त्यांस ताव देणें ह्या गोष्टींची विशेष माहिती होती; ह्या कलांचें ज्ञान त्या वेळीं लोकांस फार अल्प असल्यामुळें प्रथम लोक त्यास जादूगार म्हणूं लागले, व मागाहून संत म्हणूं लागले. जॉनच्या राज्यांत ग्रॉसेटेस्ट नांवाचा शास्त्रीय लेखक असून त्याच्या मागून रोजर बेकन नांवाचा फ्रान्सिस्कन मठवाला हा प्रसिद्ध शास्त्रज्ञ झाला हें प्रसिद्धच आहे. पंधराव्या शतकांत उपाध्येवर्गांतील शास्त्रज्ञांमध्यें जॉन लिडगेट हा प्रसिद्धीस आला, त्याची विशेष प्रसिद्धि कवि म्हणून आहे.

शास्त्रांचें शास्त्र जें तत्त्वज्ञान त्याच्याकडे पाहतांहि हीच गोष्ट दिसून येते. प्राचीन इंग्लिश लोकांमध्यें स्कोटस एरिजेना नांवाचा तत्त्वज्ञ उपाध्या असून त्याचें तत्त्वज्ञान मुख्यत्वेंकरून धार्मिक असे. त्याच्या नंतर पुष्कळ वर्षांनीं हंटिंग्डनचा उपाध्या हेन्री हा नीतिशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्धीस आला. नंतर लवकरच सालसबरिचा बिशप जॉन हा नीतिविषयावर ग्रंथ लिहिणारा असून शिवाय प्राचीन तत्त्वज्ञानावर ग्रंथ लिहिणारा म्हणून विशेष प्रसिद्ध होता. ग्रॉसेटेस्ट व रोजर बेकन भौतिक तत्त्वज्ञानी असून शिवाय मानसिक तत्त्वज्ञानीहि होते.

या सर्व उदाहरणांवरून असें स्पष्ट दिसतें कीं, एशियाप्रमाणें यूरोपामध्येंहि शास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ हा मुळांत उपाध्येवर्गापैकींच असे. लष्करी जमीनदारीच्या अमदानींत व तत्पूर्वी लढाई व पारध हेच धंदे शास्त्र्यावर्गास सन्माननीय वाटत असत ही गोष्ट ध्यानांत आणतां ते विद्येची हेटाळणी करीत ह्याबद्दल पुरावे देत बसावयास नको. त्यांस वाचतां किंवा लिहितां येत नसल्यामुळें असें वाटे कीं, हे धंदे हलक्या लोकांच्या मुलांनीं करावे. आणि सामान्यजनाची त्या वेळीं शिक्षणाशीं ओळखच नसल्यामुळें, इतर प्रकारच्या विद्येप्रमाणें शास्त्र व तत्त्वज्ञानाविषयक विद्याहि भिक्षुकच जोपासीत हें उघड होतें.

३१. आतां शास्त्रज्ञ–तत्त्वज्ञ वर्गाचें उपाध्येवर्गापासून विभिन्नीकरण ज्या पायऱ्यांनीं झालेलें आहे त्यांचा मागमोस लावीत बसण्याची एथें आवश्यकता नाहीं.

हें जें रूपान्तर घडून आलें त्याचे मुख्य मुख्य विशेष आणि सद्यःस्थिति ह्यांचा विचार एथें केला तरी बस्स आहे.

ह्या संबंधानें पहिली ठळक गोष्ट ध्यानांत ध्यावयाची म्हटली म्हणजे ही कीं, बाबावाक्याच्या आधारावर न रचतां विचारावर रचलेली जी मतरूपी एकंदर इमारत आहे तिचे मूर्त आणि अमूर्त असे दोन भाग पडलेले आहेत; आणि त्यामुळें तिच्या जोपासकांचेहि दोन भिन्न वर्ग झालेले आहेत. शास्त्रज्ञ आणि तत्त्वज्ञ हा वर्गभेद प्राचीन एशियास्थ लोकांत स्पष्ट नसे. ग्रीक लोकांत थेल्सपासून पुढें जो कोणी भौतिक गोष्टींचें निरीक्षण करून त्यांवर आपल्या सामान्य कल्पना बसवील त्यास तत्त्वज्ञ समजत. आरिस्टॉटलच्या उदाहरणांत देखील शास्त्रीय विवेचक आणि तत्त्वविवेचक एकच माणूस असे ही गोष्ट दिसून येते. तद्वतच यूरोपांत न्यूटनच्या वेळापर्यंत भौतिकशास्त्रास "सृष्टविषयक तत्त्वज्ञान" Natural Philosophy असें नांव असे. ह्यावरूनच ह्या दोहोंमध्यें स्पष्ट भेद झालेला नव्हता हें स्पष्ट दिसतें. पण हल्लीं हा भेद बराच स्पष्ट झालेला आहे, जर्मनीमध्यें तर विशेषच झालेला आहे, आणि इंग्लंदांत बराच झालेला आहे. हल्लीं तत्वज्ञ शास्त्रीय शोध करीत नाहीं, आणि शास्त्रीय सत्याचें ज्ञान त्यास बहुधा यथातथाच असतें. उलट, शास्त्रज्ञ, मग तो कोणत्याहि वर्गापैकीं असो, तत्वज्ञानविषयक विचार बहुधा फारसा करीत नाहीं; आणि निरनिराळ्या तत्त्वज्ञ वर्गांचीं विशिष्ट मतें काय आहेत ह्याची त्यास माहिती नसते. शास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ लोक एकमेकांबद्दल जो कधीं कधीं

तिरस्कार व्यक्त करीत असतात त्यावरूनहि ते परस्परांपासून किती भिन्न झालेले आहेत हें स्पष्ट दिसतें.

ह्याबरोबरच सैद्धियशास्त्रव्यासंगी व निरिंद्रियशास्त्रव्यासंगी असा शास्त्रज्ञवर्गामध्येंहि भेद उत्पन्न होत गेलेला आहे. हल्लीं जे लोक गणित, सृष्टपदार्थविज्ञान व रसायन इत्यादि शास्त्रांचा व्यासंग करितात त्यांस बहुधा जीवशास्त्राचें ज्ञान नसतें; उलट जे लोक जीवितविषयक चमत्कारांचा ह्या किंवा त्या दृष्टीनें विचार करण्यांत गुंतलेले असतील त्यांस यथार्थ शास्त्रांतील सत्यांची फारशी कळकळ नसते. सजीव आणि निर्जीव वस्तूंमध्यें ठळक भेद आहे, आणि म्हणून त्या दोहोंच्या व्यासंग्यांमध्यें ठळक भेद उत्पन्न झालेला आहे.

अशा प्रकारचें आणखी एक रूपान्तर चाललेलें आहे. ह्या प्रत्येक वर्गामध्यें विभिन्नीकरणें व पोट-विभिन्नीकरणें होत आहेत जीवशास्त्रज्ञांमध्यें वनस्पतिशास्त्रज्ञ आणि प्राणिशास्त्रज्ञ असा मुख्य भेद झालेला आहे, आणि त्या प्रत्यक वर्गांत पोटवर्ग उत्पन्न झालेले आहेत. उदाहरणार्थ, उपजातींचें वर्गीकरण करणारे, वनस्पतींच्या आकारांचें निरीक्षण करणारे, आणि त्यांच्या इंद्रियांचा विचार करणारे, असे वनस्पतिशास्त्रज्ञांत पोटभेद झालेले आहेत; आणि प्राणिशास्त्रज्ञांमध्यें वर्गीकरण करणारे, शारीरव्यासंगी आणि इंद्रियविज्ञानव्यासंगी असे पोटवर्ग उत्पन्न झाले आहेत. ह्याच्याहूनहि जास्त मर्यादित अशीं विशिष्टीकरणें झालेलीं आहींत असें नाहीं. उदाहरणार्थ, वनस्पतिशास्त्रज्ञांमध्यें कांहीं असे आहेत कीं ते ह्या किंवा त्या कोणत्या तरी

एकच वनस्पतिप्रकाराचा विचार करीत असतात, तद्वतच इंद्रियविज्ञान्यांमध्यें कांहींजण इंद्रियांच्या कोणत्यातरी एकाच व्यापाराचें निरीक्षण करीत असतात; तद्वतच प्राणिशास्त्रज्ञांमध्यें कीटकशास्त्रज्ञ, पक्षिशास्त्रज्ञ इत्यादि पोटवर्ग झालेले असून त्यांच्यांतहि आणखी पोटभेद झालेले आहेत.

ह्या लहान मोठ्या विभिन्नीकरणांच्या संबंधानें आणखी एवढेंच सांगणें जरूर दिसतें कीं, एकंदर शास्त्राच्या व्यासंगास जरी कोणी धंदा म्हणून म्हणत नाहीं (कारण तो फारच विस्तृत व विविधस्वरूप आहे), तरी त्याच्या ह्या किंवा त्या भागाच्या व्यासंगास तसें म्हणतात. कारण शास्त्राच्या अनेक भागांचे व पोटभागांचे जे व्यासंगी त्यांस ' प्रोफेसर ' असें इंग्रजींत म्हणतात, व हा शब्द प्रोफेशन [धंदा] ह्या शब्दाशीं च संबद्ध आहे. आणि म्हणून उदरनिर्वाहासाठीं कोणत्याहि शास्त्रशाखेचा केलेला जो व्यासंग तो ' धंदा ' म्हणूनच समजला पाहिजे.

३२. भिन्न भिन्न व्यक्तींच्या ह्या विभिन्नीकरणांवरोवर परस्परसदृश व्यक्तींचीं जीं संयोगकरणें चाललेलीं आहेत तींहि तितकींच ठळक आहेत. शास्त्राच्या निरनिराळ्या शाखांमध्यें गुंतलेल्यांप्रमाणें एकंदर शास्त्रामध्यें गुंतलेले जे लोक त्यांचा सर्वत्र कल आपापसात संयोग करणें व इतरांपासून पृथक् होणें इकडे आहे.

यूरोपांत प्रत्येक देशांत शास्त्रीयपरिषद् आहे, आणि कांहीं देशांत तर अनेक परिषदा आहेत; इंग्लंदांत रॉयल सोसैटी नामक सर्व शास्त्रज्ञांची एक सभा असून

शिवाय दरवर्षीं निरनिराळ्या ठिकाणीं भरणारी ब्रिटिश आसोशिएशन नामक एक सभा आहे.

ह्या सर्व शास्त्रज्ञांच्या साधारण सभांखेरीज इंग्लंदांत निरनिराळ्या शास्त्रशाखांच्या सभा आहेत, उदाहरणार्थ, गणितविषयक सभा, भौतिकविषयक सभा, रसायनोविषयक सभा, ज्योतिःशास्त्रविषयक सभा, भूगर्भशास्त्रविषयक आणि इंद्रियविज्ञानविषयक सभा; तद्वतच जीवशास्त्राच्या निरनिराळ्या पोटशाखचा विचार करणाऱ्या सभा तेथें आहेत; उदाहरणार्थ, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, मानवशास्त्र, आणि कीटकशास्त्र ह्यांचा विचार करणाऱ्या सभा तेथें आहेत. ह्या सर्व सभा रॉयल सोसैटीचीं मुलें असून कांहीं अंशीं त्या तिच्या मदतनीस आहेत. ह्या लंदनांतील सभांखेरीज इतर शहरींहि तेथं स्थानिक सभा आहेत, व त्यांचा उद्देश एकंदर शास्त्राचें किंवा एकाद्या शास्त्रशाखेचें परिशीलन करण्याचा आहे.

एवढ्यानेंच झालें नाहीं. शास्त्रीयजगाचें सामान्य व विशिष्ट संकलन एकसारख्या प्रसिद्ध होत जाणाऱ्या शास्त्रीय मासिकांनीं वगैरे ज्यास्त ज्यास्त निकट होत आहे, व त्याच्या भागांचें सहकार्य वाढत चाललेलें आहे; ह्या पत्रांपैकीं कांहीं साप्ताहिक असून कांहीं मासिक व कांहीं त्रैमासिक आहेत; पैकीं कांहींचा उद्देश सामान्य शास्त्राविवेचन असून, कांहींचा विशेष शास्त्रविवेचन हा आहे. अशा रीतीनें निरनिराळ्या चमत्कारांचें अवलोकन व निरीक्षण करून त्यांचें इतरांशीं तादात्म्य करून दे-

ण्याचें जें मोठें काम कोणत्याहि एकाच सभेस किंवा पत्रास झालें नसतें तें ह्या सर्व सभा व पत्रें मिळून करीत आहेत.

प्रकरण सातवें
न्यायाधीश आणि वकील

२३. "राजकीय संस्था" ह्या प्रस्तुत शास्त्राच्या पूर्वीच्या भागामध्यें असें दाखविलें होतें कीं, प्रारंभीच्या समाजामध्यें जें वर्तननियमन प्रथम रूढीनें, आणि मागाहून रूढीच्या ज्या खडतर स्वरूपास कायदा म्हणतात त्यानें, होत असतें त्याची मूळ उत्पत्ति पूर्वजांची जी व्यक्त झालेली किंवा गर्भित इच्छा तिजपासून झालेली असते; ही इच्छा मुख्यत्वें अप्रसिद्ध मृतांची असते, आणि गौणत्वें प्रसिद्ध मृतांची असते. मृत आत्म्यांच्या इच्छांस मान देण्याच्या बुद्धीचा सुधारलेल्या लोकांच्या कृतीवर देखील जर बराच परिणाम घडत असतो, तर रानटी व अर्धवट सुधारलेल्या लोकांच्या कृतीवर ज्यास्तच घडत असतो; कारण ह्या लोकांस असें वाटत असतें कीं मृतांचे आत्मे नेहमीं आपल्या सन्निध असतात, किंवा कधीं कधीं आपल्या सन्निध येतात, आणि त्यांस क्रुद्ध केलें असतां ते आपल्यावर रोग किंवा दुर्दैव आणून आपल्यास शिक्षा करितील. सामाजिक वाढ चालली असतां जेव्हां विलक्षण सामर्थ्यवान् असे नाईक किंवा विजेते राजे उत्पन्न होतात, तेव्हां त्यांचे हुकूम जे मोडतील त्यांचा त्यांचीं भुतें भयंकर सूड घेतील अशी समजूत उत्पन्न होऊन ति-

च्या योगानें त्या लोकांच्या वर्तनाचें वरच्याहून ज्यास्त नियमन होतें. अशा रीतीनें एकंदर पूर्वजांपासून वंश-परंपरेनें आलेल्या रूढींनीं होणारें व सामान्यतः जिवंत शास्त्यानें अमलांत आणिलेलें जें वर्तननियमन त्यामध्यें मृतशास्त्यानें केलेल्या ज्या आज्ञा त्यांनीं होणाऱ्या नियमनाची भर पडते.

म्हणून प्रारंभींची जी कायदेविषयक कल्पना तिची उत्पत्ति होते, जी कल्पना पुष्कळ काळपर्यंत हळू हळू ज्यास्त ज्यास्त फेरबदल होत चालू राहते, आणि जे लोक अद्यापि "बरोबर म्हणजे आज्ञापित" असें समजतात त्यांच्यामध्यें अद्यापि कायम दिसते (एथें आज्ञापित म्हणजे प्रथम देवानें सांगितलेलें, आणि मागाहून देवानें नेमिलेल्या किंवा पसंत केलेल्या राजांनीं सांगितलेलें, असें समजावयाचें). कारण, हें मत धारण करणारे जे धार्मिक लोक त्यांचें मामान्यतः असें मत असतें कीं सामान्यतः सरकारें म्हणून जीं आहेत तीं देवाच्या परवानगीनें अस्तित्वांत येत असतात, आणि म्हणून त्यांचे हुकुमांस दैविक आधार असतो. सरकाराच्या आज्ञा पाळणें हें सर्वांसच फायद्याचें आहे असा जो त्या हुकमांस मागाहून उपयुक्ततारूप आधार सांपडतो, तो विचारी माणसांच्या मनांत अर्थात् हळूहळूच उत्पन्न होत असतो, आणि तो उत्पन्न होई तोंपावेतों कायद्यांस ते दैविक आहेत एवढाच काय तो आधार असतो.

ह्यावरून, तर मग, असें सिद्ध होतें कीं, प्राथमिक कायदा कांहीं अंशीं एकंदर पूर्वजांच्या आणि कांहीं

अंशीं प्रसिद्ध पूर्वजाच्या किंवा मृतशास्त्याच्या वंशपरंपरागत हुकमांचा बनलेला असल्यामुळें तो जे लोक शास्त्याच्या सन्निध असतील त्यांच्याकडून निघत असतो; ते लोक प्रथम त्याचे नोकर म्हणून त्यानें केलेल्या आज्ञा लोकांस कळवीत असतात, आणि मागाहून त्याच्या भुताचा जेव्हां देव बनतो तेव्हां त्याचे पुजारी म्हणून बनून कळवीत असतात. सहजच हे पुजारी पिढ्यानुपिढ्या त्याची पूजा करीत असल्यामुळें त्याची इच्छा काय आहे हें सांगणारे ते बनतात. यावरून अर्थात् अवश्यमेव असें निष्पन्न होतें कीं कायदा काय आहे हें इतरांहून उपाध्यांसच ज्यास्त कळतें, आणि म्हणून कोणीं कायदा मोडिल्यास तो प्रश्न त्यांच्याचकडे निकालाकरितां नेला पाहिजे अशी समजूत उत्पन्न होते. सारांश, उपाध्ये हेच पहिले न्यायाधीश बनतात.

३४. लहान लहान रानटी समाजांतून न्यायदानपद्धती उत्पन्न झालेल्या नाहींत, आणि म्हणून त्यांच्यामध्यें ह्याबद्दल फारसा पुरावा मिळत नाहीं. तथापि आपल्या वाचनांत असें येतें कीं, ग्वायनामधील इंदियन लोकांत पी- इ- मेन हे उपाध्ये, जादूगार, वैद्य, आणि न्यायाधीशहि असतात. कालमकलोक त्यांच्यापेक्षां पुढें गेलेले असून त्यांजबद्दल पेलास असें सांगतो कीं, त्यांच्यांतील जें अत्यन्त उच्च न्यायाधीशमंडळ त्याजमध्यें कांहीं उपाध्ये असत, आणि उपाध्येवर्गांतील एकजण मुख्य न्यायाधीश असे.

आफ्रिकेंतील अर्धवट सुधारलेल्या नीग्रो लोकांच्या जातींमध्यें एक मोठा देव किंवा अनेक देव यांचे पंथ

उत्पन्न व्हावे इतकी धार्मिक वाढ झालेली बहुधा दिसत नाहीं, तरी दैविक सत्त्वांच्या (जीं प्रारंभीं प्रसिद्ध मृतांचीं भुतें असतात) इच्छांप्रमाणें आपलें वर्तन ठेविलें पाहिजे अशा समजुतीचा सुगावा त्यांच्यांत लागतो; आणि ह्या समजुतीमुळें ह्या भुतांचे जे संतर्पक ते भविष्यवादी बनतात. एवंच लॅण्डर आपणास सांगतो कीं बाडाग्रीमध्यें देवांचे पुजारी हेच लोकांचे न्यायाधीश असतात. कॉबेडीमध्यें हे पुजारी लोकांच्या प्रश्नांचीं उत्तरें कशीं देतात आणि एकादा बिकट प्रश्न असल्यास देवास कौल कसा लावितात ह्याचें वर्णन क्यामेराननें चांगलें केलें आहे.

३५. ह्यासंबंधानें प्राचीन ऐतिहासिक पुरावा हीब्रू लोकांच्या ग्रंथांतून सांपडतो. उदाहरणार्थ, कायदा आणि देवाची इच्छा ह्याबद्दलच्या कल्पना त्यांच्यांत एकच होत्या हें बैबलावरून स्पष्ट दिसून येतें. ईश्वराच्या दहा आज्ञा सीनै पर्वतावरून आणिल्या ह्यावरून, आणि वर्तनाचे बारीक सारीक नियम लेव्हिटिकस ह्या बैबलाच्या भागांत दिलेले आहेत, ह्यावरून ही गोष्ट दिसून येते; कारण त्या भागांत जेवणाखाणाचे, शेतकी करण्याबद्दलचे, आणि व्यापाराबद्दलहि नियम दिलेले असून ते देवानें ठरविलेले आहेत असें सांगितलेले आढळतें. ड्यूटरॉनोमी नामक भागांतील पुढील आशयाच्या उताऱ्यावरून कायद्याबद्दल आणि उपाध्येवर्गाच्या कर्तव्याबद्दल सामान्य कल्पना त्या वेळीं काय होती हें चांगलें दिसून येतें:—"एकादा खटला न्याय करण्यास फार कठीण असा तुजपुढें आल्यास देवाचे उ-

पाध्ये जे लेव्हाइट त्यांजकडे जावें, आणि त्यांच्यांतील जो माणूस त्या वेळीं न्यायाधीशाचें काम करीत असेल त्यास विचारावें; म्हणजे तो तुला न्याय काय तो सांगेल त्याप्रमाणें त्वां वागावें ".

ईजिप्तमध्येंहि याबद्दल पुरावा सांपडतो हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल. ते बन्सेन. ब्रुथ, व अर्मन यांच्या ग्रंथांवरून घेतले आहेत. मेन्टु होटेप नवाव्या बाराव्या घराण्यांतील एक उपाध्या व अधिकारी होता. तो आपल्या थडग्यावर फुशारकीनें असें लिहून ठेवितो कीं " मी कायद्यांत प्रवीण होतों, व कायदे करीत असें". "मुख्य न्यायाधीश नेहमीं उच्चतम पदवीचा असे; तो खुद्द राजाचाच मुलगा नसल्यास, मोठ्या देवांपैकीं एकाचा मुख्य उपाध्या, म्हणजे राजघराण्यांतीलच असे". "वरच्या पदवीचे सर्व न्यायाधीश, सत्यदेवी जी माआत तिचे पुजारी असत,आणि मुख्य न्यायाधीश त्या देवीची एक लहान प्रतिमा अधिकारचिन्ह म्हणून गळ्यांत लटकवीत असे". पुढें दुसऱ्या रामसिसच्या कारकीर्दीत, भट्टांच्या ऐवजीं एका कोर्टात गृहस्थांचाच भरणा ज्यास्त होता असें सांगितलेलं आढळतें. आणि त्यावरून धार्मिक व ऐहिक न्यायदान ह्यांचें विभिन्नीकरण होण्यास सुरवात कशी झाली हें दिसून येतें.

ग्रीक लोकांचीं संस्थानें पूर्णपणें संयुक्त झालीं नसल्यामुळें, त्यांचा उपाध्येवर्ग शास्ता बनला नाहीं ही गोष्ट अगोदरच सांगितलेली आहे. त्यासंबंधानें थरवाल हा इतिहासकार म्हणतो:—" ग्रीक लोकाचे उपाध्यांनीं आपलें व्यवस्थित मंडल कधीं बनाविलें नाहीं; एकेका

संस्थानांतले उपाध्ये देखील एकत्र गोंविलेले 'नसत.'' म्हणून त्यांच्यांत किरयेक धंद्यांची उत्पत्ति नेहमींच्या पद्धतीनें झालेली तितकी स्पष्टपणें दिसत नाहीं. तथापि उपाध्यांचें काम आणि न्यायाधीशाचें काम ह्यांजमधील संबंध त्यांच्यांत पक्करूपानें न दिसला तरी बीजरूपानें दिसून येतो. हीब्रूलोकांप्रमाणेंच ग्रीकलोकांमध्येंहि संशय आल्यास देवास जाऊन विचारण्याची चाल असे, व देवाचें उत्तर पुजारी किंवा पुजारीणच देत असे. शिवाय ग्रीक लोकांच्या कायद्यांस "थेमिस" ह्या देवतेच्या नांवावरून 'थेमिस्टिस' असें म्हणत, ह्यावरून देखील तीच गोष्ट व्यक्त होते. कायद्यांच्या बाडांची उत्पत्ति दैविक आहे असें ते लोक समजत हें लैकर्गसच्या कायदेबाडावरून दिसून येते. कारण हेस म्हणतो कीं त्याच्या कायद्यांचा उगम धार्मिक होता. तथापि उपाध्ये-वकील ह्या वर्गाची तेथें उत्पत्ति न होण्यास वर्गाल कारणाखेरीज ग्रीक लोकांचा विशिष्ट स्वभाव हेंहि कारण झालें असावें. म्हणजे ते स्वतंत्र स्वभावाचे असल्यामुळें त्यांनीं दिवाणी कामांत धार्मिक नियंत्रण उत्पन्न होऊं दिलें नसेल.

प्रारंभींच्या रोमन लोकांमध्यें उपाध्ये व वकील ह्यांचे व्यापार कसे संमिश्र झालेले होते हें डुरुईच्या ग्रंथांतील पुढील दोन उताऱ्यांवरून स्पष्ट दिसून येतें. "पॉन्शियन (सरदार) लोकांकडे उपाध्ये व शकुनी ह्यांचें काम असे. ते उपाध्ये, भविष्यवादी आणि न्यायाधीश असत, आणि ते आपलें ज्ञान फार गूढ ठेवीत". "कायद्याच्या विधींना प्रारंभींचे रोमन लोक गुलामा-

सारखे चिकटून असत ह्याचें कारण त्यांस कांहीं धार्मिक वाटत, आणि एकंदर विधी करण्यामध्यें थोडांहि चूक झाल्यास देव रागावतील असें ते समजत, हें होय". त्यांच्यांत कायद्याचे विधी जे बनलेले होते ते प्रारंभीं देवपूजाविषयक जे विधी त्यांवरून बहुधा उत्पन्न झाले असावे. कारण त्यांच्यांतील न्यायाधीश भट ठरवितील त्या दिवशीं न्याय करण्यास बसत असून फिर्यादी करावयाच्या त्या विशिष्ट मंत्र म्हणून, अंगविक्षेप करून, आणि कृती करून, कराव्या लागत. ह्याबद्दल मासेन व हंटर ह्यांच्या ग्रंथांत पुरावा सांपडतो.

पण अशा रीतीनें ग्रास, ईजिप्त, पालेस्टाईन, रोम इत्यादि देशांमध्यें न्यायाधीशाची उत्पत्ति जरी भटापासून झालेली आढळून येते, तरी वकिलाची उत्पत्ति तशा रीतीनें झालेली दिसत नाहीं; तर उलट, असा पुरावा सांपडतो कीं, इतर लोकांप्रमाणें ह्या लोकांमध्येंहि वकिलाची उत्पत्ति गृहस्थवर्गामधून झालेली आहे. उदाहरणार्थ, मार्सडे म्हणतो कीं, सुमात्रामध्यें वादी व प्रतिवादी आपला खटला बहुधा स्वताच चालवीत असतात, पण जरूर लागल्यास त्यांना वकील करण्याची परवानगी असते; तो वकील पाहिजे तो माणूस असूं शकतो; व त्यास काय द्यावयाचें हें ठरलेलें नसतें: तथापि त्यानें खटला जिंकल्यास त्यास बहुधा कांहीं तरी देतात. तद्वतच पार्किन्स म्हणतो कीं आबिसिनियन लोकांमध्यें एकप्रकारचे वकील दिसून येतात; ते सामान्य गृहस्थ असून बोलण्यांत मात्र हुशार असतात; खटला महत्त्वाचा असला म्हणजे वादीप्रतिवादी त्यांना

तो चालविण्यास बलावितात, पण नेइमींच बलावितात असें नाहीं. आतां प्रारंभीं वादी-प्रतिवादी जेव्हां आपापला खटला स्वताच चालवीत असत तेव्हां कधीं कधीं त्यांपैकींच एकाद्यानें आपला खटला चालविण्यास आपल्या एकाद्या स्नेह्यास सांगावें असें सहजच घडून येत असेल; आणि ज्याची असें करण्यांत हुशार म्हणून प्रसिद्धि होईल त्यास दुसरे लोक आपले खटले चालविण्यास बलावूं लागले असतील, आणि त्याबद्दल त्यास दिलेल्या दक्षिणेस फीचें स्वरूप आलें असेल. रोमन लोकांमध्यें अशीच स्थिति होती. कायद्याच्या बारा कलमांचें ज्ञान सर्वांत पसरल्यानंतर आणि कायद्याचे विधी काय आहेत हें आपियस क्लाडियस याच्या एका सेक्रेटरीनें प्रसिद्ध केल्यानंतर त्यांच्यांत कायद्यांत निष्णात असा एक वर्ग उत्पन्न झाला, व तो लोकांस कायद्याचा सल्ला देऊं लागला; नंतर त्यांच्यांत अलीकडच्या बारिस्टारांसारखाहि वर्ग उत्पन्न झाला, व त्यांस खटला समजावून देणारे हलक्या दर्जाचे वकील उत्पन्न झाले.

३६. रोमन लोकांच्या अमदानीनंतर उत्तर यूरोपांत बाहेरच्या सुधारणा व बाहेरचे धर्म आल्यामुळें धर्म व कायदा ह्यांतील संबंध व ते अमलांत आणणारांचे संबंध ह्यांत घोंटाळा उत्पन्न झाला. तरी तेथेंहि वरील सिद्धान्तास बळकटी आणणाराच पुरावा सर्वत्र सांपडतो.

आतां तेथें ख्रिस्ती धर्माची स्थापना होण्यापूर्वीच्या काळाकडे पाहतां नॉर्स लोकांबद्दल डेसेंट असें म्हणतो कीं, "त्यांच्यांत उपाध्या हाच धार्मिक अधिकाराप्रमाणें दिवाणी अधिकारहि चालवीत असे. खटले नि-

घाले म्हणजे न्यायाधीश नेमणें व त्याच्या कामावर नजर ठेवणें हें काम त्याचेंच असे ". पण वकिलांच्या संबंधानें तो असें म्हणतो कीं, वकीललोक खासगी गृहस्थ असून त्यांस सरकारी अधिकार मुळींच नसे; तर ते केवळ कायदेपंडित असून लोक त्यांचा सल्ला जरूर पडेल तेव्हां घेत. गॉम नांवाचा एक ह्या काळावर लिहिणारा इतिहासकार वरच्यासारखींच विधानें करितो, आणखी असें म्हणतो कीं, ह्या प्राचीन लोकांचें जें देऊळ तेंच लोकांचें एकत्र जमण्याचें ठिकाण व न्यायाचें कोर्ट असे. ह्या त्याच्या शेवटच्या म्हणण्यासंबंधानें ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे कीं प्राचीन काळीं लोक जमले म्हणजे उदम्यांस तेथें व्यापार करण्यास संधि सांपडे, तद्वतच लोकांस तेथें आपल्या तंट्यांचा निकाल करून घेण्यासहि ठीक पडे; आणि न्याय करावयाचे ते देवास विचारून करावयाचे ही जी प्राचीन कल्पना तिला ही गोष्ट अनुसरूनच होती; व त्या कल्पनेचा पुरावा साक्षीदारांनीं वगैरे शपथ घेण्यांत जसा गर्भितरीत्या दिसून येई, तसा दिव्य करण्यांत स्पष्टरीत्या दिसून येई.

पुढें ख्रिस्ती धर्मानें जेव्हां तेथें पूर्वीच्या धर्माचा पाडाव करून आपली स्थापना करून घेतली, तेव्हां तेथील पूर्वीचा कायदाहि (ज्यास सामान्य कायदा म्हणून म्हणत) रद्द करून धर्माधिकारी आपला कायदा म्हणजे धार्मिक कायदा आणि रोमन लोकांपासून उचलेला दिवाणी कायदा, ह्यांचा अंमल हळू हळू वसवूं लागले. इंग्लंदांत प्रारंभीं गृहस्थांमधील व भिक्षुकांमधील

बडे गृहस्थ स्थानिक कोर्टांचें काम एकत्र चालवीत असत, आणि नव्या व जुन्या धर्मांतून घेतलेले कायदे अमलांत आणीत. त्या वेळचे उपाध्ये इतर सर्व विद्यांप्रमाणें कायद्याच्याहि विद्येमध्यें निष्णात असल्या ळें त्यांसच न्यायाधीश करीत, आणि कोर्टांतील खालच्या दर्जाचे कामगार खालच्या दर्जाच्या भटांपैकीं नेमीत; म्हणून त्यांस अद्यापि क्लार्क (हल्लींचा अर्थ " कारकून" मूळचा अर्थ " भट ") म्हणून म्हणतात. पुढें जेव्हां पोपाची सत्ता वाढत चाललो तेव्हां एक फरक उत्पन्न झाला तो हा कीं, धर्माधिकारी व त्यांचे कज्जे ह्यांची चवकशी धर्माधिकाऱ्यांच्याच कोर्टांनीं करावी. पुढें नार्मन विजयानंतर ही सत्ता इतकी वाढली कीं धार्मिक कोर्टें दिवाणी कोर्टांपासून अजीबाद पृथक् झालीं. ह्या वेळीं पोप हा देवाचा सर्वांत मोठा पुजारी समजला जात असून देव त्याच्या द्वारा बोलतो अशी समजूत असल्यामुळें कायद्यांच्या संबंधानें प्राचीन लोकांसारखीच खिस्त्यांची समजूत बनत चालली; म्हणजे कायदे हे देवाचे हुकूम असून त्यांचा अर्थ करण्यास उपाध्यांस देवानेंच नेमिलेलें आहे. ह्या समजुतीचा फायदा घेऊन धार्मिककोर्टें दिवाणी खटल्यांचाहि निकाल करण्याचा अधिकार बळकावूं लागलीं; व जो कोणी त्यांस विरोध करील त्यांस बहिष्कार घालूं लागलीं.

अशा रीतीनें धर्माधिकारी केवळ न्यायाधीश व कायद्यांचा अर्थ करणारेच बनले असें नाहीं, तर ते त्यापेक्षां कमी दर्जाच्याहि कायदेविषयक गोष्टी करूं लागले. उदाहरणार्थ, स्टोलझेल म्हणतो कीं, जर्मनींत दस्तऐ-

वज नोंदण्याचा अधिकार धर्माधिकाऱ्यांकडे पुष्कळ काळपर्यंत होता. फूरनियर म्हणतो कीं, फ्रान्सांत उपाध्ये अटर्नींचा किंवा खटले गोळा करून ब्यारिस्टरांकडे नेण्याचा धंदा करीत असत; आणि सेंट पलाये म्हणतो कीं कांहीं प्रकारच्या खटल्यांत ते ब्यारिस्टराचेंहि काम करीत. इंग्लंदांत जेव्हां धर्माधिकाऱ्यांस दिवाणी कोर्टांतून वकिली करण्याची पोपानें मनाई केली तेव्हां ते कधीं कधीं वेष बदलून तेथें वकिली करीत असें दिसतें.

३७. आतां कायदेवाला वर्ग इंग्लंदांत कोणत्या क्रमानें पूर्णरीत्या गार्हस्थिक (गृहस्थघटित) बनला हें एथें पाहत बसण्याचें आपणास प्रयोजन नाहीं. त्यासंबंधानें हल्लींची स्थिति काय आहे तेवढें पाहिलें म्हणजे पुरे.

न्यायाधीशलोकांमध्यें धर्माधिकाऱ्यांचे विशेष दिसावयाचे बंद होऊन इतका काळ लोटला आहे कीं, ते एका काळीं धर्मोपाध्येच असत हें विधान सामान्यजनास मोठें विलक्षण वाटतें. पूर्वस्थितीचा हल्लीं इंग्लंदांत कांहींहि लेश दिसत असेल तर तो ह्या गोष्टीमध्यें दिसतो कीं, डाक्टर आव्ह् सिव्हिल लॉ (दिवाणी कायद्याचा पंडित) ही पदवी देण्याचा अधिकार तेथें अद्यापि क्यांटर्बरीच्या आर्चबिशपाकडेच आहे. पण पन्नास वर्षांपूर्वी वारसदारी व विवाह एतद्विषयक खटले चालविण्याचा अधिकार तिकडे धार्मिक कोर्टांकडे होता ही गोष्ट लक्षांत घेतां धार्मिक व न्यायविषयक अधिकारांची विभागणी तिकडे आलीकडेच पूर्णपणें झालेली आहे ही गोष्ट लक्षांत येते.

नेहमींच्या क्रमास अनुसरून कायदेविषयक धंदा

धार्मिक धंद्यापासून जसा विभिन्नीकरण पावत गेलेला आहे, तशीं त्या धंद्यामध्येंहि पोटविभिन्नीकरणें होत गेलेलीं आहेत. प्रारंभीं कोर्टांत न्यायाधीश व वादी-प्रतिवादी ह्यांखेरीज केव्हां केव्हां वकील तेवढा दिसे; तो पुढें लवकरच कायमचा बनून वादीप्रमाणें प्रतिवादीलाहि मदत करूं लागला. हळूहळू ह्या वकीलमंडळामध्यें अनेक पोटभेद उत्पन्न झालेले आहेत.

मुख्य भेद कोर्टामध्यें प्रत्यक्षरीत्या खटले चालविणारे, व अप्रत्यक्षरीत्या चालविणारे, म्हणजे, खटले तयार करणारे, पुरावा जमविणारे, साक्षीदारांस बलाविणारे, इ० इ० ह्यांमध्यें झालेला आहे. प्रत्यक्ष खटला चालविणारांमध्यें कोर्टांतून खटले चालविणारे व चेंबर्समधून खटले चालविणारे असे दोन मुख्य विभाग झालेले आहेत; आणि शिवाय निरनिराळ्या कोर्टांतून खटले चालविणारांचीं मंडळें असे पोटभेद झालेले आहेत. किंग्स कौन्सिल किंवा बडे ब्यारिस्टर, आणि सामान्य किंवा छोटे ब्यारिस्टर असा एक सर्व कोर्टांतून विभाग आहेच. शिवाय प्रारंभीं मदतनीस-वकिलांमध्यें अटर्नी व सॉलिसिटर असा एक भेद असे, पण तो हल्लीं नष्ट झाला आहे. शिवाय, वादग्रस्त खटले चालविणारे, आणि अवादग्रस्त खटले चालविणारे, खटले स्वतः अंगावर घेऊन इतरांसाठीं चालविणारे, पार्लमेंतापुढें वकिली करणारे, असे अन्य भेद वकीलमंडळामध्यें आहेतच.

३८. इतर धंद्यांप्रमाणें ह्याहि धंद्याच्या संबंधानें हळूहळू संकलन होत गेलेलें आहे; तें कसें तें आतां पाहूं.

कायदेचाला वर्ग उपाध्येवर्गापासून भिन्न झाल्यानंतर लवकरच त्या वर्गांतील घटकामध्यें एकप्रकारचा संयोग उत्पन्न झाला. इंग्लंदांत जेव्हां न्यायखात्यांतिल राजाचे प्रतिनिधी न्यायदान करीत गांवोगांव फिरण्यांचें सोडून स्थाईक झाले, आणि वेस्टामिन्स्टर एथें कायमचीं न्यायकोर्टें स्थापन झालीं, तेव्हां जे ब्यारिस्टरलोक पूर्वीं इंग्लंदांत चोंहोंकडे पसरलेले होते ते लंदनांत एकत्र गोळा होऊं लागले, व तेथें त्यांचें एकप्रकारचें मंडळ बनलें. म्हणून ज्यांस कोर्टांच्या 'इन्स' (मंडळ्या) म्हणतात त्या उत्पन्न झाल्या, व तेथें कायद्याच्या विषयावर व्याख्यानें व्हावयास लागून अखेरीस ब्यारिस्टरीच्या पदव्याहि देऊं लागले; ह्या पदव्या पूर्वीं कांहीं दिवस तेथें हजिरी भरल्यानेंच मिळत असत, व त्यासंबंधानें परीक्षा नुक्तयाच घेऊं लागले आहेत. ह्या मंडळांमध्यें व्यवस्थापक, ब्यारिस्टर व विद्यार्थी असे पोटभेद आहेत. हीं मंडळें पहिल्या एडवर्ड राजाच्या अगोदरपासून बनूं लागलीं; आणि त्यांपैकीं कांहीं जरी हल्लीं नष्ट झालेलीं आहेत, तरी इतर चांगल्या भरभराटींत आहेत.

हें ब्यारिस्टर किंवा वरच्या दर्जाचे वकील ह्यांजविषयीं झालें; पण खालच्या दर्जाच्या वकिलांचेंहि असेंच संकलन होत गेलेलें आहे. उदाहरणार्थ, चवथ्या हेन्रीच्या कारकीर्दींत असा कायदा केला कीं सगळ्या अटर्नीलोकांची न्यायाधीशांनीं परीक्षा घ्यावी, आणि त्या परीक्षेच्या निकालाप्रमाणें त्यांचीं नांवें यादींत नों-

दावीं; ते सुविनीत असावे, व त्यांची लोकांत अब्रूहि चांगली असावी.

त्यानंतर वकिलांचीं आणखीहि मंडळें बनलेलीं आहेत. उदाहरणार्थ, धंदा करणाऱ्या ब्यारिस्टरांची एक "बारकमिटी" म्हणून सभा आहे; आणि निरनिराळ्या फिरत्या जज्जांपुढें कामें चालविणाऱ्या ब्यारिस्टरांचींहि अर्धवट मंडळें आहेतच. शिवाय, सॉलिसिटरलोकांची लंदनांत एक सोसायटी असून प्रांतांतून तसल्या मंडळ्या आहेत.

आतां इतर धंद्यांप्रमाणें ह्या धंद्यांतहि संकलनवृद्धीबरोबर निश्चितपणाचीहि वृद्धि होत गेलेली आहे. ब्यारिस्टरलोक उत्पन्न झाल्यावर लवकरच ते व्यापारीवर्गापासून कांहीं नियम करून, पृथक् झाले; आणि आलीकडे जे योग्य रीतीनें शिकलेले नसतील त्यांस आपल्या मंडळाबाहेर ठेवून त्यांनीं आपलें मंडळ ज्यास्त मर्यादित व स्पष्ट केलेलें आहे. सॉलिसिटरलोकांनींहि असेंच केलेलें आहे. आणि आपल्या मंडळांत कोणास कसें घ्यावयाचें, व जे घेतले जातील त्यांनीं वर्तन व व्यवहार कसा करावयाचा, हें ठरवून, आणि जे ते नियम मोडतील त्यांच्नीं नांवें आपल्या यादींतून काढून टाकून आपल्या मंडळाच्या मर्यादा निश्चित करून टाकिल्या आहेत.

आणि हीं लहान-मोठीं मंडळें एकत्र राखण्याच्या कामीं मदतनीस म्हणून कायद्याचीं विशिष्टकालिक अनेक पत्रें निघालेलीं आहेत. त्यांपैकीं पुष्कळ साप्ताहिक आहेत, आणि अलीकडे एक त्रैमासिकहि निघूं लागलें आहे.

प्रकरण आठवें

शिक्षक

३९. शिकविणें म्हटलें कीं ज्या गोष्टी शिकवावयाच्या त्यांचें ज्ञान असणें हें त्यामध्यें अंतर्भूत होतंच; आणि ज्या अर्थीं अनेक कारणांवरून उपाध्या हाच ज्ञान बाळगून असणारा म्हणून प्रसिद्धीस आलेला असतो, त्या अर्थीं त्याच्यापासूनच विशेषतः तें प्राप्त होण्यासारखें असतें. शिवाय, उदरभरणार्थ उद्योग करण्याची त्यास अवश्यकता नसल्यामुळें ज्ञान करून देणें आणि सक्तीनें वळण लावणें ह्या गोष्टी करण्यास त्यास इतरांपेक्षां अधिक फुरसत सांपडते.

प्रारंभीं उपाध्या तोच शिक्षक बनण्यास ह्याच्याहून खोल असें एक कारण होतें तें ध्यानांत आणण्यासारखें आहे. जरी लहानपणीं प्रत्येक मूल ज्यास ज्ञान ही संज्ञा यथार्थरीत्या लागते व ज्याचा व्यवहरांत उपयोग होतो तें बरेंच अनेक मिश्र मार्गांनीं मिळवीत असतें, तरी आणखी एक प्रकारचें ज्ञान, किंवा कल्पित ज्ञान, असें आहे कीं तें विशेष मोलाचें समजत असून रोजच्या अनुभवरूपी अनियमित द्वारा तें त्यास प्राप्त होऊं शकत नाहीं. रानटी टोळ्यांतून आणि प्रारंभीं सुधारलेल्या लोकांतून असा साधारण समज असतो कीं भुतें हीं सर्वत्र वास करीत असून तीं नेहमीं माणसाचें बरें-वाईट करीत असतात; म्हणून त्यांची मर्जी सुप्रसन्न होईल व त्यांस राग येणार नाहीं, अशा रीतीनें आपलें वर्तन कसें ठेवावें हें ज्ञान ते सर्वांत ज्यास्त

महत्त्वाचें समजत असतात. आतां ह्या दैविक सत्त्वाचें सर्वांत ज्यास्त ज्ञान भटांस असल्यामुळें तें अर्थात् त्या-च्यापासून संपादावयाचें असतें; आणि म्हणून शिक्षक म्हणजे धार्मिक गोष्टींचें शिक्षण देणारा अशी सहजच प्रारंभीं समजूत बनते.

आतां हें उघडच आहे कीं अशा रीतीनें प्रथम जें ज्ञान संक्रान्त होतें तें वडील उपाध्यांकडून धाकट्या उपाध्यांप्रत संक्रान्त होतें, किंवा असें म्हणणें कदा-चित् ज्यास्त बरोबर होईल कीं तें उपाध्ये असलेल्यां-कडून उपाध्ये होणाऱ्यांप्रत संक्रान्त होत असतें. पु-ष्कळ काळपर्यंत एवढेंच शिक्षण अस्तित्वांत असतें. उ-त्क्रमण होत जाईल तशीच, आणि सुशिक्षित असा गृ-हस्थ वर्ग उत्पन्न होईल तशीच हल्लीं आपण पाहतों तसल्या शिक्षकाची उत्पत्ति होते.

४०. अवश्यच, सर्व प्रकारच्या उत्क्रमण पावणा-ऱ्या समूहाच्या प्रारंभींच्या पायऱ्यांवर संघटनेच्या रेषा अनिश्चित असतात. असुधारलेल्यांच्या समूहांमध्यें शि-क्षकाचा धंदा स्पष्टरीत्या इतरांपासून भिन्न झालेला दिसेल अशी अपेक्षाच करतां येत नाहीं. तथापि अ-गदीं प्रारंभीं जें शिक्षण म्हणून बनतें तें गुह्य व पवित्र अशा गोष्टींची दीक्षा देणें ह्या रूपाचेंच असतें; आणि ह्या गुह्य गोष्टी जाणणारे ते त्या वेळचे शिक्षक असतात. उदाहरणार्थ, आरावाक लोकांच्या संबंधानें बर्नाव असें म्हणतो कीं त्यांच्यांत जादूगार आपला मुलगा वीस व-र्षांचा होतो न होतो तोंच आपली विद्या त्यास शि-कवितो; आणि ती अगदीं गुप्त ठेवण्याबद्दल त्यास

ताकीद देतो. आणि हा नवीन दीक्षा घेणारा गुरूच्या वंशांतला असो वा नसो, अशी ही ताकीद अशा ह्या दैविक शिक्षणाच्या संबंधानें नेहमींच देत असतात, आणि अशा रीतीनें पाहिजे त्याचा ज्यांच्यांत प्रवेश नाहीं अशा प्रकारचे उपाध्येवर्ग व पंथ उत्पन्न होतात.

परंतु रानट्यांच्या समूहामध्यें हें धार्मिक शिक्षण किंवा त्याचा कांहीं भाग योग्य वय झालें म्हणजे समूहांतील सर्वच तरुणांना देण्याचा प्रघात आढळून येतो. उदाहरणार्थ, आस्ट्रेलियनलोकांमध्यें सर्वत्र तरुणास दीक्षा देण्याचा विधी आढळून येतो; तो विधी करतांना त्या तरुणाची कोठें एकप्रकारची सुंता करितात, किंवा कोठें त्याचा दांत पाडितात, आणि अशा रीतीनें त्या तरुणास देवास वाहतात. असल्या प्रसंगीं वैदू हे तो विधी करणारे व दीक्षा देणारे असतात.

असुधारलेल्यांपैकीं जे ज्यास्त पुढें गेलेले असतील आणि ज्यांच्यांतील वैदूंना कांहीं अंशीं उपाध्यांचें स्वरूप आलेलें असेल, त्यांच्यामध्यें ह्या गोष्टीबद्दल ज्यास्त चांगला पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, टॉमसन म्हणतो कीं न्यूझीलंदर लोकांमध्यें उपाध्यांचें एक काम लोकांचीं गीतें व दंतकथा ह्यांची मुलांस माहिती करून देण्याचें, म्हणजे, त्या टोळीची जी पवित्र विद्या ती शिकविण्याचें, असतें. तद्वतच, आफ्रिकेमध्यें जेथें सामाजिक घटना ज्यास्त पक्व झालेली आहे तेथें उपाध्यायिक शिक्षणाला वरच्याहूनहि ज्यास्त निश्चित स्वरूप आलेलें आपल्या दृष्टीस पडतें. बास्टियन आपणास असें सांगतो कीं, कांगोमध्यें प्रतिमापूजक

प्रत्येक वर्षीं वयांत आलेले मुलगे गोळा करितो, आणि त्यांस रानांत नेतो; तेथें ते सहा महिने पर्यंत त्याच्या देखरेखीखालीं वस्ती करून एकत्र राहतात; ह्याठिकाणीं त्यांची सुंता होते. आबिसिनीया व मादागास्कार येथें शिक्षकाचें काम एक भिक्षुक व एक गृहस्थ मिळून करितातसें आढळतें; ही अर्थात् त्यांच्यांत होणाऱ्या विभिन्नीकरणाची एक पायरी होय.

४१. जे लोक सुधारणेच्या ह्याच्याहून वरच्या पायरीवर गेलेले आहेत त्यांच्या ठिकाणीं ह्यासंबंधानें जो कांहीं थोडाबहुत पुरावा सांपडतो तो आतां देऊं. मेक्सिकन लोकांबद्दल लिहितांना टार्किमाडा असें ह्मणतो कीं, त्यांच्यांत सगळें शिक्षण देवळांसंबंधी असे. तेथं पुष्कळच मुलें त्यांच्या चवथ्या वर्षापासून लग्न होईतोंपावेतों तेथें पाठवीत असत. क्राव्हिगेरो असेंच सांगतो. युकाटनमधील उपाध्यांच्या संबंधानें लाण्डाच्या ग्रंथांत आपण असें वाचितों कीं ते इतर उपाध्यांचे मुलगे आणि सरदारांचे धाकटे मुलगे यांस शिक्षण देत असत; त्या मुलांचा कल उपाध्येगिरीकडे दिसला तर लहानपणापासून त्यांस त्यांच्या स्वाधीन करीत असत. त्यांना ते वर्षें, महिने, दिवस, विधी ह्याबद्दलचीं गणितें करण्यास, आणि पवित्र दीक्षा देण्यास शिकवीत असत.

जपानी लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं टोकुगावा ह्या राजघराण्याची स्थापना होण्याच्या पूर्वी त्यांच्यांत व्यावहारिक शिक्षकाचा धंदा बहुतेक नव्हताच म्हटला तरी चालेल. जपानमध्यें सर्वत्र प्राथमिक शिक्षणाचा जो प्रसार केला तो तेथील उपाध्येवर्गानेंच

केला. ब्रह्मदेशासंबंधानें साइम्स आपल्या ग्रंथांत लिहितो कीं, ब्रह्मी लोकांचे मठ हेच त्यांच्या शाळा होत, तेथें मुलांस लिहिणेंवाचणें शिकवून नैतिक व धार्मिक शिक्षणहि देतात. मुलगा आठ किंवा नऊ वर्षांचा झाला कीं तेथें जावयाचाच; मग तो कोळ्याचा असो, किंवा सरदाराचा असो. क्याथलिक पाद्री संगरमानो ह्याच संबंधानें असें सांगतो कीं, ह्या शिक्षणाचा उद्देश उपाध्ये तयार करण्याचा असतो, कारण तें चाललें असतां प्रत्येक विद्यार्थी उपाध्याचा पोषाक करीत असतो. मुसलमानलोकांमध्यें ह्याबद्दल पुरावा सांपडतो. कायरोमधील युनिव्हर्सिटी एका मशिदींत आहे.

४२. आपल्या देशांत प्राचीन काळीं सर्व शिक्षण धार्मिक असे व तें गुरूच्या घरीं होत असे हें प्रसिद्धच आहे. इराणांतहि असेंच असे. तेथें धंदेशिक्षणाबरोबरच धार्मिक शिक्षणहि चालत असे, व तें उपाध्यांकडेच होत असे. बाबिलोनिया, आसीरिया ह्यांच्या संबंधानें प्रोफेसर साइस असें म्हणतो कीं त्यांचीं पुस्तकालयें देवळांतून असत, व शाळाहि तेथेंच असत. ईजिप्तमधील शिक्षणविषयक संस्थांबद्दल बुश, अर्मन व डंकर असेंच म्हणतात:—" तेथें मोठमोठ्या शहरांतून शाळा स्थापिलेल्या असत, आणि तेथील उपाध्ये धार्मिक व व्यावहारिक दोन्ही प्रकारचें शिक्षण देत. थीबीस, मेम्फिस, हेलिपोलिस ह्या ठिकाणच्या देवळांतून त्यांचीं प्रसिद्ध धार्मिक कालेजें होतीं. "

ग्रीसमध्यें उपाध्यांच्या शास्त्या मंडळाचा अभाव असल्यामुळें तेथें जसे इतर धंदे उपाध्येवर्गापासून उत्पन्न

झाले नाहींत, तसा हाहि धंदा उत्पन्न झाला नाहीं. देवळें व त्यांच्या सभोंवतालच्या जागा ह्या ठिकाणीं कोणत्या तरी प्रकारचें विशिष्ट शिक्षण चाले, व त्याचा बहुधा धार्मिकविधींशीं संबंध असे, हें खरें आहे. पणं ह्या उपाध्यांनीं दिलेल्या शिक्षणाला गृहस्थांच्या मुलांचा ज्यांत समावेश होईल अशा व्यापक शिक्षणपद्धतीचें स्वरूप तेथें आलें नाहीं. तेथें प्रथम लष्करी व तालमी-च्या शिक्षणाकडे फार भर असे, व त्यांच्या शाळांना ' तालमी ' असेंच नांव असे; पुढें हें शिक्षण मागें प-डून बौद्धिक शिक्षण पुढें आलें; तरी ते भटांच्या हा-तांत न जातां, व्यावहारिक शिक्षकांच्याच हातीं गेलें; आणि तत्त्वज्ञांच्या शाळा " तालमीं " च्या शेजारीं स्थापन झाल्या.

रोममध्यें तर बाह्य तत्त्वें व प्रभाव हीं अगांतुकी क-रून आल्यामुळें शिक्षकाची जी इतरत्र दिसणारी उत्पत्ति-पद्धति तींत वरच्याहून ज्यास्त घोंटाळा झाला. जेथें जेथें युद्धशीलता विशेष जोरांत असेल तेथें मानसिक शिक्ष. णाची किंमत अल्प असल्यामुळें त्याची तरतूद केलेली नसते. उदाहरणार्थ, जपानांत पुष्कळ काळपर्यंत बौ-द्धिक शिक्षण घेणें हें तेथल्या लढवय्यांस आपल्या इभ्र-तीस न शोभणारेंसें वाटे. रोममध्येंहि तशींच कल्पना होती; म्हणून तेथें प्राथमिक शिक्षण गुलाम, मुक्त केले-ले गुलाम, परदेशीय, इत्यादिकांच्या, किंवा मुख्यत्वें-करून ग्रीक व अर्धेमुर्धे ग्रीक ह्या लोकांच्या हातीं असे. हें कसें झालें हें समजावयास पुढील तीन गोष्टी ध्या-नांत आणिल्या पाहिजेत. एक ही कीं स्वाभाविक-

रीत्या शिक्षंकाची उत्पत्ति उपाध्यापासून होण्यास, प्रारंभी उपाध्या तेवढाच विशेष शिकलेला असतो हें कारण होत असतें. दुसरी ही कीं रोमन उपाध्ये असे विशेष शिकलेले नव्हते, कारण त्यांनीं जिंकलेले जे ग्रीक लोक ते जास्त शिकलेले होते; आणि तिसरी ही कीं, जित लोकांचे जे विशेष गुण त्यांचा जेते लोक सहजच तिरस्कार करीत असतात.

४३. आतां उत्तर यूरोपांतील ख्रिस्ती धर्माच्या स्थापनेच्या पूर्वीचे लोक आणि नंतरचे लोक ह्यांजकडे पाहतां प्रथम उपाध्या व शिक्षक एक कसे असतात व शेवटीं भिन्न कसे होतात, ह्या दोन्ही गोष्टी त्यांच्यांमध्यें दिसून येतात. उदाहरणार्थ, ख्रिस्तीधर्माच्या पूर्वीच्या धर्माचे उपाध्ये जे ड्रूइड लोक त्यांजबद्दल सीझर असें म्हणतो कीं, त्यांच्याकडे पुष्कळ तरुण शिकावयास येतात; ते उपाध्ये अमर देवांचे गुण व सामर्थ्यें याबद्दल पुष्कळ चर्चा करितात, आणि त्या संबंधाचीं मतें त्या तरुणास शिकवितात.

पुढें ख्रिस्तीधर्म सुरू झाल्यावर बहुतेक विद्या नष्टच झाली, पण जी कांहीं राहिली होती, ती धार्मिक संस्थांतंच दिसत होती, व तिला जी पुनः वाढ लागली ती तेथेंच लागली. उदाहरणार्थ, हालाम असें म्हणतो कीं, प्रथम शाळा स्थापन करण्याचें यश सहाव्या शतकांतील कांहीं बिशप व आबट (मठवाले) ह्यांच्याकडे आहे. रानटी विजेत्यांनीं रोमन बादशाहांनीं स्थापिलेल्या शाळांचें जें निर्मूलन केलेलें होतें त्यांची जागा ह्या शाळांनीं भ-

रून काढिली. शार्लमेन बादशाहानें देवळांतून व मठांतून ज्या शाळांची नवी स्थापना किंवा पुनर्जीविति केली, त्यांच्यामुळें जी थोडीशी विद्या शिलक होती ती कायम राहिली. सहाव्या शतकांत ख्रिस्तीधर्मसंस्थेची स्थिति कशी होती ह्याचें वर्णन करतांना मोशीम असें सांगतो कीं, देवळांतील शाळांतून भटशिक्षक मुलांस सात उदारशिक्षणविषयक कलांचें शिक्षण देत असे, व त्याचा उद्देश पवित्र ग्रंथांचें अध्ययन करण्याची तेणेंकरून त्यांची तयारी व्हावी हा असे; तद्वतच मठांतून मुख्य मठाधिपति किंवा इतर मठवाले तेथें जीं मुलें त्या मार्गाला लागण्यासाठीं आलेलीं असतील त्यांस वाङ्मयविषयक शिक्षण देत असत. ह्या पुराव्यावरून प्रारंभीं, भटांनीं वा गृहस्थांनीं दिलेल्या शिक्षणाचा संबंध प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या धार्मिक संतर्पणाशीं असतो, ही गोष्ट सिद्ध होते; म्हणजे, त्याचा उद्देश मुलांना पवित्र ग्रंथांची गोडी लागावी, व देवाचा कायदा समजावा, हा असतो.

पुढच्या शतकांतून ज्या लढाया व सामाजिक अव्यवस्था उत्पन्न झाल्या, तेणेंकरून ह्या धार्मिक शिक्षणसंस्थांना क्षय लागला, व पोपांनीं आणि बिशपांनीं त्यांस जोर आणण्यासाठीं वेळोवेळीं ज्या खटपटी केल्या त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तथापि पुढें जेव्हां गृहस्थ शिक्षक निघूं लागले तेव्हां साहजिकच उपाध्येलोक त्यांस विरोध करूं लागले; कारण मुलांचें शिक्षण इतरांच्या हातीं असावें हें भटवर्गास कधींच आवडत नाहीं.

४४. इंग्लंदांतहि अशाच प्रकारचा पुरावा दृष्टीस

पडतो. प्राचीन काळीं तेथेंहि देवळांतून शाळा भरत असत, व त्यांतील शिक्षक धर्माधिकारी असून ते नैतिक व बौद्धिक शिक्षण मुलांस देत. नार्मन लोकांनीं तो देश जिंकल्यानंतरहि तेथें अशीच स्थिति होती. उदाहरणार्थ, पीअर्सन व टर्नर असें म्हणतात कीं, देशांत जे सर्वत्र उपाध्ये पसरलेले होते त्यांस शिक्षणाची वृद्धि करणें ही गोष्ट फायद्याची असे; कारण तेणेंकरून त्यांच्या अल्प उत्पन्नांत कांहीं भर पडे ह्या शिक्षकांपैकीं साक्सन लोकांच्या वेळचे अतिप्रसिद्ध शिक्षक म्हटले म्हणजे बीड, आलक्विन इरीजिना व डन्स्टन हे होत, आणि नार्मन-लोकांच्या वेळचे आथेलार्ड, साल्सबरीचा जॉन, लेकाम, रोजर व डनस्कोटस हे होत.

पण इतर देशांप्रमाणें त्या देशांतहि शिक्षण अनेक तऱ्हांनीं ग्रार्हस्थिक बनूं लागलें. पंधराव्या शतकाच्या प्रारंभीं प्रारंभीं गृहस्थ लोक शाळा स्थापण्यासाठीं मृत्युपत्रानें रकमा ठेवूं लागले. उदाहरणार्थ, सोळाव्या शतकाच्या पहिल्या भागाच्या संबंधानें लिहितांना बार्टन असें म्हणतो कीं, मुलांना मठांतून शिकविण्याची पद्धति मोडत चालल्यामुळें ह्या काळीं वीस नव्या 'व्याकरण शाळा' स्थापन झाल्या. ह्याबरोबरच तेथील युनिव्हर्सिट्यांचेंहि स्वरूप हळू हळू बदलूं लागलें. प्रारंभीं युनिव्हर्सिट्या म्हणजे नामांकित धार्मिक शिक्षकांसभोंवतीं जमलेले धर्मविषयक शिक्षण घेणारांचे संघ असत; म्हणून पुष्कळ काळपर्यंत तेथें धार्मिक शिक्षण तेवढेंच मिळे. पर्वीपर्यंत ह्या युनिव्हर्सिट्यांतून शिक्षण व पदव्या मिळविण्यास विद्यार्थ्यांस तेथें कायद्यानें स्थापिलेल्या धर्मा-

चा अनुयायी असावें लागे. पण हळू हळू धर्माशीं संबंध नाहीं असें विषय तेथें शिकवूं लागल्यामुळें व विद्यार्थी अमुकच धर्माचा असला पाहिजे इत्यादि अटी कमी झाल्यामुळें शिक्षणाचें जें धार्मिक स्वरूप तें बदलत गेलें आहे. म्हणून आतां तेथें पुष्कळ विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उद्देश धर्मखात्यांत शिरण्याचा मुळींच नसतो; सारांश, तेथील शिक्षणास पुष्कळ अंशीं गार्हस्थिक स्वरूप आलेलें आहे.

इकडे कालेजांच्या खालच्या दर्जांच्या शाळांची संख्या वाढत जाऊन त्यांतील बऱ्याच जरी गृहस्थशिक्षकांच्या हातीं गेलेल्या आहेत, तरी बऱ्याच मठांच्याच देखरेखीखालीं आहेत. ज्यांस 'सार्वजनिक' शाळा म्हणून म्हणतात त्यांजवर नजर ठेवणारे सामान्यतः उपाध्ये आहेत; आणि त्यांतील बहुतेक शिक्षक धर्मखात्यांत शिरलेले आहेत, किंवा शिरण्याची तयारी करणारे आहेत. शिवाय ज्या खासगी शाळांतून श्रीमान् लोक आपले मुलगे पाठवितात, त्याहि चालविणारे उपाध्येलोकच आहेत. शिवाय पुष्कळ भिक्षुकलोक खासगी शिकवण्या शिकवितात. एवंच शिक्षकवर्गाचें उपाध्येवर्गापासून विभिन्नीकरण अद्यापिहि पुरें झालेलें नाहीं.

इतकेंच नव्हे तर आजमित्तीस (जून १८९५) उपाध्यांचा शिक्षण बऱ्याच अंशीं गार्हस्थिक बनल्यामुळें जो ताबा उडालेला आहे तो पुनः स्थापण्यासाठीं ते खटपट करीत आहेत. सार्वजनिक शिक्षणाची तेथें जेव्हां पंचवीस वर्षांपूर्वी स्थापना झाली तेव्हां तें पूर्णपणें व्यावहारिक बनलें नव्हतें; कारण सार्वजनिक शाळांतून

बैबलांतील धडे शिकवीतच असत; आणि आतां उपाध्येवर्गाची अशी खटपट चाललेली आहे कीं बैलंलाखेरीज इंग्लंदांत कायद्यानें स्थापित धर्माचीं कांहीं विशिष्ट मतें त्या शाळांतून शिकवावीं, आणि अशा रीतीनें बोर्डाच्या शाळांतील शिक्षक कांहीं अंशीं धार्मिक शिक्षक बनवावे. इतकेंच नव्हे, तर अशी खटपट त्यांच्याकडून चालली आहे कीं स्थापित धर्मसंस्थेच्या शाळांतून स्थापित धर्म शिकविण्यासाठीं सार्वजानिक पैशांतून मदत मिळावी. म्हणजे, त्यांच्या म्हणण्याचा अर्थ असा आहे कीं, आमच्या शाळांवर सरकारानें कोणत्याहि प्रकारचा ताबा न ठेवतां आम्हास मदत तेवढी करावी. आणि हें त्यांचें करणें, **साहेब** म्हणतात, उपाध्येवर्गाच्या सर्वत्र दिसणाऱ्या धाष्टर्यास अनुसरूनच आहे.

४५. आतां इतरत्र ज्याप्रमाणें विभिन्नीकरणाबरोबर संकलन आणि भिन्नसमुच्चयीभवन हीं दृष्टीस पडलीं तशीं तीं ह्या ठिकाणींहि दृष्टीस पडतात; जरी उपाध्येवर्गापासून शिक्षकवर्ग अलीकडेच पृथक् झालेला असल्यामुळें, हा फरक तितका ठळक बनलेला आढळून येत नाहीं.

शिक्षकवर्ग संकलित होऊन इतर वर्गांपासून पृथक्-व्हावा ही गोष्ट प्रथम धार्मिक शिक्षकांमध्यें दिसून आली. उदाहरणार्थ, पारीस युनिव्हर्सिटीमध्यें अर्धवट शिकलेले लोक, ज्यांस धर्माचे मूलतत्त्वांचें देखील ज्ञान नसे, असे लोक सार्वजानिक शिक्षक बनूं लागले. ह्याचा परिणाम असा झाला कीं, त्यांच्याहून जे जास्त प्रतिष्ठित धार्मिक शिक्षक ते एकत्र झाले, आणि त्यांनीं

एक आपलें व्यवस्थित मंडळ बनविलें; आणि तें वजनदार असल्यामुळें त्यांनीं असा नियम अमलांत आणिला कीं त्यांच्या पसंती व परवानगीशिवाय शिक्षकाचा धंदा कोणीं करूं नये. ह्याचा परिणाम अर्थात् शिक्षकीचा धंदा करूं इच्छिणाऱ्या उमेदवारांची परीक्षा घेणें, व त्यांस विधिपूर्वक लायकीच्या पदव्या देणें, अशा प्रकारचा झाला. इंग्लंदच्या युनिव्हर्सिट्यांतून असेंच झालें आहे. म्हणजे, तेथेंहि प्रथम स्थापित ख्रिस्तीधर्ममतांचें ज्ञान, आणि नंतर ख्रिस्ती शिक्षकानें ज्या गोष्टी जाणणें योग्य समजलें जातें त्यांचें ज्ञान, आणि नंतर ह्या ज्ञानामध्यें परीक्षा, ह्यांच्या योगानें लायक शिक्षकांचा एक गोळा बनविणें, आणि नालायकांस त्यांत प्रवेश करूं न देणें ह्या गोष्टी साध्य झाल्या आहेत, आणि अशा रीतीनें सुसंबद्ध व मर्यादित असा समूह बनला आहे. स्थापित धर्मापासून भिन्न असलेल्या पंथांमधून शिक्षकांच्या लायकीवर जरी इतका जोर दिलेला नाहीं, तरी त्यांच्यामध्यें शिक्षकांस आवश्यक ज्ञान व उपाध्येवर्गाकडून सर्टिफिकिटें मिळण्याच्या संस्था स्थापन झालेल्या आहेत.

व्यावहारिक शिक्षकांचे संयोग आलीकडेच होऊं लागले आहेत. शिक्षकांना तयार करून व परीक्षा घेऊन सर्टिफिकेटें देणाऱ्या निरनिराळ्या कालेजांव्यतिरिक्त शिक्षकांचीं कांहीं मंडळेंहि बनलेलीं आहेत. उदाहरणार्थ, मुख्य मास्तरांच्या सभा, मुख्य मास्तरणींच्या सभा, असिस्टण मास्तरांच्या सभा, शिक्षकांच्या राष्ट्रीय सभा, इ० इ०.

तद्वतच शाळामास्तर, त्यांचे असिस्टण, कालेजें, आणि वर सांगितलेल्या निरनिराळ्या मंडळ्या ह्या सर्वांची सामान्य संघटना संभाळण्याच्या साधनांच्या संबंधानें झालेलें आहे. म्हणजे, इतर धंदेवाल्या वर्गांप्रमाणें ह्या वर्गांचींहि सामान्य व विशेष साप्ताहिक व मासिकें अशीं पत्रें आहेत आणि त्यांचा उपयोग त्या वर्गाच्या हिताकडे लक्ष देणें, त्याच्या घटकांमध्यें दळणवळण सुरू ठेवणें आणि त्यांच्या संकलनास हातभार लावणें इत्यादि गोष्टींकडे होत आहे.

प्रकरण नववें
शिल्पशास्त्रज्ञ

४६. ज्या प्रकारच्या इमारतीस शिल्पकलेनें बांधलेली इमारत किंवा शिल्प असें मोठें नांव देतात तशा प्रकारची इमारतरचना किंवा बांधणी समाजवृद्धीच्या प्रारंभींच्या पायऱ्यांवर असूं शकणार नाहीं. अशा प्रकारची इमारत तयार करण्यापूर्वी यांत्रिक कलांची वृद्धि इतकी झालेली असली पाहिजे कीं तितकी हलक्या दर्जाचे रानटी लोक किंवा अल्प सुधारलेले लोक ह्यांच्यामध्यें दृष्टीस पडत नाहीं.

आतां हें खरें आहे कीं जमिनीवर कांहीं तरी व्यवस्थेनें मांडिलेल्या अशा ओबडधोबड दगडांच्या इमारती आणि तद्वतच ओबडधोबड दगडांच्या जमिनीच्या पोटांत बांधलेल्या इमारती, ज्यांचा इतिहास उपलब्ध आहे अशा लोकांनीं रचलेल्या अद्यापि आढळून

येतात, व त्यांत शिल्पशास्त्राचें बीज दृग्गोचर होतें. पण ह्या इमारतींचा समावेश जर आपण शिल्प शब्दांत केला तर आपण त्याबरोबर हेंहि लक्षांत आणावें कीं, ह्या इमारतींचा उपयोग मृतांचीं शवें राखून ठेवण्यासाठीं, किंवा देवभूत मृताच्या सन्मानार्थ केल्या जाणाऱ्या विधींना साहाय्य म्हणून, करीत असत. ह्यांपैकीं कोणताहि उपयोग केला तरी तो प्राथमिक वैदू किंवा उपाध्ये ह्यांच्या कल्पनांना अनुसरूनच असे. सारांश, ह्या प्राथमिक शिल्प्यांना कोणी तरी मार्गदर्शक असलाच पाहिजे; आणि तो विशेष हुशार असा त्या वेळचा माणूस असून, ज्या मृतांचा सन्मान करावयाचा त्यांच्याशीं दळणवळण ठेवणारा म्हणून समजला जाणारा, असाहि तो असला पाहिजे.

पण आतां ह्या संदिग्ध पुराव्याबद्दल एथें जास्त कांहींच न बोलतां, ज्या अर्धवट सुधारलेल्या व सुधारलेल्या लोकांनीं कृती व लेख मागें ठेविलेले आहेत, अशा लोकांमध्यें ह्याबद्दल जो पुरावा सांपडतो तिकडे आपण वळूं.

१७. त्या पुराव्याकडे वळतां प्रथम अशी एक स्थूल गोष्ट आपल्या नजरेस येते कीं अगदीं प्राचीन असें जें शिल्पकाम आपल्यास आढळून येतें त्याची उत्पत्ति पूर्वजपूजेपासून आहे. त्याचीं पहिलीं पहिलीं स्वरूपें थडग्यांच्या किंवा देवळांच्या ठिकाणीं दिसून येतात, आणि थडगीं व देवळें हीं एकाच वस्तूचीं कमी पक्व व जास्त पक्व अशीं रूपें आहेत ही गोष्ट आपल्या नजरेस अगोदरच आलेली आहे. एवंच हीं दोन्ही साध्य

किंवा संमिश्र अशा पूजेचीं स्थानें असल्यामुळें दोन्हीं-वर उपाध्येवर्गाचा ताबा असे; आणि त्यावरून असें अनुमान काढावयाचें कीं पहिले शिल्पी उपाध्ये हे होत.

ह्याचा पहिला दाखला आपल्यामध्यें प्राचीनकालीं शिल्पशास्त्र हें एक पवित्रशास्त्र समजत असत हा देतां येण्यासारखा आहे. लंकेमध्यें देखील शिल्प आणि धर्म व त्याचे उपाध्ये ह्यांमध्यें संबंध असलेला दिसून येतो. पुष्कळ लोक गुहेचा उपयोग प्राथमिक थढगें-देऊळ ह्या रूपानें करीत असत; आणि त्यामुळें पुष्कळ ठिकाणीं ह्या गुहांस मोठें विस्तीर्ण स्वरूप आलेलें दृष्टीस पडतें. आपल्याकडचीं निरनिराळ्या ठिकाणचीं लेणीं हीं त्याचीं उत्तम उदाहरणें होत. तीं बौद्धांच्या वेळीं त्यांच्या राजांनीं उपाध्यांच्या सांगणीप्रमाणें केलेलीं आहेतसें दिसतें. शिवाय असल्या इमारती धार्मिक कारणाकरितां उभारीत आणि म्हणून त्या पवित्र मानीत हें यावरून व्यक्त होतें कीं, उपाध्येलोक लोकांस आपलीं राहण्याचीं घरें दगडाचीं न बांधतां उन्हानें भाजलेल्या मातीचींच बांधावयास सांगत असत.

आतां दगड महाग असत म्हणून असो, किंवा पवित्रस्थळाखेरीज इतरत्र दगडाचा उपयोग करण्याची मनाई असे म्हणून असो, किंवा ह्या दोन्ही कारणांमुळें असो, शिल्पाची सुरवात धर्माच्या संबंधानें झाली, आणि म्हणून ती उपाध्येवर्गाच्या देखरेखीखालीं झाली. बाबिलोनियामध्यें देऊळ व राजवाडा हीं एकच असून त्यांस सुरवात मोठ्या विधिपूर्वक होत असे ही गोष्ट लक्षांत घेतां, आणि शिल्प हें शास्त्र असल्या-

मुळें त्याचें ज्ञान प्रथम इतर शास्त्रांच्या ज्ञानाप्रमाणें उपाध्यांसच असलें पाहिजे ही गोष्ट ध्यानांत आणतां, तेच पहिले शिल्पी असले पाहिजेत ह्या अनुमानास जोर येतो.

ह्याबद्दल इजिप्शनलोकांच्या प्राचीन लेखांतून बराचसा पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, डंकर म्हणतोः- इजिप्शन लोकांनीं कलांमध्यें जें एवढें प्रावीण्य संपादन केलें त्यांत उपाध्यांचें अंग फार होतें. देवळांच्या इमारती आणि राजांचीं थडगीं त्यांनीं तयार केलेल्या नकाशाबरहुकूम होत; कारण ह्या गोष्टी अगदीं धार्मिक असल्यामुळें त्यांच्या गणिताचा व मापांचा त्यांत निकट संबंध येई. ह्याबद्दल आणखीहि पुरावा तेथें सांपडतो. उदाहरणार्थ, मेंदुहोटेप ह्याच्यासंबंधानें असा लेख आढळतो कीं, राजाचा मुख्य शिल्पी ह्या नात्यानें त्यानें देवांच्या पूजेस उत्तेजन दिलें आणि लोकांस उत्तम शिक्षण देववेल तेवढें दिलें. बेकेखान्सु आपल्या पुतळ्यावर असें कोरून ठेवितोः—आमन शहरांतील मी मोठा शिल्पी असें; मी कलाभिज्ञ असून तेथील पहिला भविष्यवादी होतों; मी उपाध्याचें काम बारा वर्षें केलें. रॉलिन्सन म्हणतो कीं, तेथें कलांवर धर्माधिकाऱ्यांची देखरेख असे हें बहुतेक निश्चित दिसतें.

आतां ग्रीक वाङ्मयांतून मिळणाऱ्या पुराव्याकडे पाहतां प्रथम इलियडमध्यें ह्याबद्दल पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, क्रायसिस उपाध्या सूड घेण्यासाठीं अपालो देवाची प्रार्थना करीत असतां म्हणतो, " स्मिन्थियस देवा, आवडेल अशा प्रकारचे देऊळ जर मीं बांधिलें असेल व बैल व बकरे ह्यांचें मांस अर्पिलें असेल, तर

माझी इच्छा पुरी कर''. ह्यावरून बळी देण्याचें व देवळें बांधण्याचें, अशीं दोन्ही कामें उपाध्याच्या ठिकाणीं एकवटलीं असत, व म्हणून दोन्ही उपाध्यायिक असत, असें दिसतें. खुद्द अपालोला देखील देवशिल्पी असें म्हटलेलें आढळतें म्हणून कश्यप सांगतो तेंहि या कल्पनेस पुष्टिकारकच आहे. पण पूर्वी सांगितल्याप्रमाणें ग्रीस देशांत उपाध्येलोकांमध्यें व्यवस्थित संघटना उत्पन्न न झाल्यामुळें इतर धंद्यांप्रमाणें ह्याहि धद्याची उत्पत्ति व वृद्धि स्पष्टपणें त्याच्यापासून झालेली तथें दिसून येत नाहीं.

रोममध्यें ज्ञान व कौशल्य हीं दोन्ही बाहेरून आलेलीं असल्यामुळें धंद्यांच्या उत्पत्तींत बराच घोंटाळा उत्पन्न झाला हें आपल्या नजरेस अगोदर आलेंच आहे. त्यामध्यें इट्रुस्कनलोकांपासून ह्या गोष्टी बऱ्याच अंशानें आल्या, आणि त्यांच्यापासून ज्या धार्मिक कला प्राप्त झाल्या त्यांपैकीं शिल्प हें एक होतें इट्रुई लिहितो कीं, शिल्पी देखील इट्रूरियामधूनच आले, व त्यांनीं पहिलीं देवळें बांधिलीं; कांहीं प्रकारचे विधि करतांना जी पांवरी वाजवावी लागते ती वाजविणारहि तेथूनच आले. पुढें तेथें मुख्य उपाध्या व मुख्य शिल्पी एकच होऊन गेले, व त्यास सर्वांत मोठा उपाध्याय अशा अर्थाची पदवी प्राप्त झाली. तिजवरून ह्या दोन गोष्टींमधील संबंध जसा दिसून येतो, तसें त्याचें कारणहि दिसून येतें. तें हें कीं, विद्या व सामर्थ्य हीं प्रथम उपाध्यांपाशींच असत. प्राथमिक लोकांमध्यें विशेष कौशल्याचा दैविक सामर्थ्याशीं सहजच संबंध जोडून देत असतात.

उदाहरणार्थ, कांहीं आफ्रिकन टोळ्यांमध्यें लोहारास देखील जादूगार म्हणून समजतात. म्हणून ज्या रोमन माणसानें कमानीची युक्ति काढिली, किंवा विशेष शिताफीनें ती रचिली, त्यास देवाची प्रेरणा आहे असें बाकीच्यांस सहजच वाटलें असेल. कारण आतां जरी कमानीच्या रचनेंत कोणांस कांहीं आश्चर्यकारक वाटत नाहीं तरी प्रथम ती लोकांस गूढच वाटली असली पाहिजे. उपाध्या व पूल बांधणारा ह्यांचा जो त्यांजमध्यें संयोग दृष्टीस पडे त्याचें हें एक संभाव्य कारण, किंवा निदान मदतनीस कारण, असलें पाहिजे.

४८. रोमन पादशाहीच्या च्युतीनंतर ज्या सामाजिक दुर्व्यवस्थेमुळें तेथें मानसिक चळवळी व त्यांनीं उत्पन्न केलेल्या चिंता ह्यांना धक्का बसला त्याच कारणांनीं त्यांच्या शिल्पासहि बसला. पुढें जेव्हां त्यांचें पुनरुज्जीवन झालें तेव्हां तें उपाध्येवर्गाच्या देखरेखीखालीं कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या धार्मिक इमारतीं उभारण्याच्याय रूपानें झालें. उदाहरणार्थ, शार्लमेनच्या अमदानीनंतर उभारलेल्या कांहीं बेनिडिक्टाईन पंथाच्या मठांच्या संबंधानें लँकाय असें म्हणतो कीं, यूरोपांत सर्वत्र ज्या हुशार शिल्प्यांनीं व धार्मिक इंजिनियरांनीं इतक्या अत्यन्त सुंदर इमारती बांधिल्या ते तेथें बनले गेले. फ्रान्सच्या संबंधानें बोलतांना, दहाव्या शतकापर्यंत तेथें फारसे शिल्पी दिसत नव्हते असें सांगून पुढें तेथें प्रसिद्धीस आलेल्या अनेक उपाध्ये शिल्प्यांचीं तो नांवें सांगतो. हा व्यापारसंयोग (उपाध्येपण व शिल्प यांचा संयोग) पुढें पुष्कळ

काळपर्यंत राहिला. उदाहरणार्थ, व्हायोलेट लिडक असें म्हणतो कीं अकराव्या व बाराव्या शतकांत पश्चिम यूरोपास बहुतेक शिल्प्यांचा पुरवठा मठाकडून, व विशेषतः वलूनी एथील मठाकडून होत असे, व ते केवळ धार्मिक इमारती तेवढ्याच बांधीत असें नाहीं, तर दिवाणीहि व कदाचित लष्करीहि बांधीत.

त्यानंतर शिल्पी व उपाध्या ह्यांचें विभिन्नीकरण होऊं लागलें असें दिसतें; कारण वरील ग्रंथकार, तेराव्या शतकांत शिल्पी हा गृहस्थ व स्वतंत्र बाण्याचा झालेला दृष्टीस पडतो असे सांगून शिवाय असें म्हणतो कीं, ह्या शतकाच्या प्रारंभीं एमियेन्स एथील बिशपानें राबर्ट लिलुझाडिर्किस नामक एका गृहस्थ-शिल्प्यास एक क्याथीड्रल (मोठें देऊळ) बांधण्यास सांगितलेलें आढळून येतें. हें संक्रमण कसें झालें ह्याचें एक विलक्षण उदाहरण पुढील उताऱ्यामध्यें दिसून येतें:—"राफेल आपल्या एक पत्रांत असें म्हणतो कीं, रोममधील सेंट पीटरचें देऊळ बांधण्याच्या कामीं मला मदतनीस म्हणून एका मठवाल्यास पोपानें (दहावा लीओ यानें) नेमिलें होतें, व तो ह्या कामांत अनुभविक असल्यामुळें त्यांतील कांहीं इंगितें त्याच्यापासून मला कळतील अशी मला आशा आहे ".

आतां ह्यासंबंधानें इंग्लंदकडे पाहतां " इंग्लंदांतील साक्सन लोक " ह्या आपल्या ग्रंथांत मठवाल्यांच्या संबंधानें केंबल असें म्हणतो कीं, चित्रकला, खोदण्याची कला व शिल्पकला ह्या त्यांच्या द्वारा लोकांस परिचित झाल्या, व ह्या सुधारणाऱ्या कलांचीं उत्तम उदा-

हरणें त्यांचीं देवळें व मठ ह्यामध्येंच दिसत असत. इ-क्किस्टन म्हणतो तें ह्याच्याशीं जुळतेंच आहे. नामनं-लोकांच्या इमारती आणि त्यांचे नकाशे करणारे ह्यां संबंधानें बोलतांना तो असें म्हणतो कीं ह्या कामामध्यें बिशप व इतर अधिकारी हे सर्वांत पुढाकार घेत, आणिं त्यांच्या पैशाचा जसा या कामीं सदुपयोग होई तसा त्यांच्या कौशल्याचाहि होई उपाध्येशिल्प्यापासून गृह-स्थशिल्प्यामध्यें संक्रमण कसें झालें हें एथें दिसून येत नाहीं; पण असा संभव दिसतो कीं सरतशेवटीं उपा-ध्याशिल्पी इमारतीची रचना सामान्यतः कोणत्या प-द्धतीवर करावयाची हें ठरवूं लागला असेल, आणि त्या-प्रमाणें इमारत बांधण्याचें काम मुख्य बांधणाराकडे संपवूं लागला असेल; आणि ह्या मुख्य बांधणापासूनच धंदेवाल्या शिल्प्याची उत्पत्ति परंपरेनें झालेली आहे.

४९. अलीकडे शिल्प्याच्या धंद्यामध्यें एकत्र जमणें व संकलन पावणें जें झालेलें आहे त्यास उल्लेख मुख्य-त्वेंकरून रीतसर म्हणूनच करणें आहे. त्यासंबंधानें एवढेंच सांगणें जरूर दिसतें कीं प्रारंभीं प्रारंभीं हल्लीं-च्या मानानें शिल्पविशिष्ट इमारती फारच थोड्या होत असल्यामुळें शिल्प्यांचीही संख्याहि अल्पच होती, आणि त्यामुळें त्यांचें इतरांपासून पृथक्करण होऊन एकमेकां-शीं साहचर्य बनण्यास फारसा अवकाश नव्हता. पण अलीकडे इंग्लंदांत " शिल्प्यांची संस्था " म्हणून एक मंडळी स्थापन झाली आहे, आणि लायकीच्या परीक्षा उत्पन्न करून, ती आपल्यास जास्त जास्त निश्चित-स्वरूप करून घेत आहे.

त्याबरोबरच त्या कलेची वृद्धि करण्याकरितां, व तिचा व्यासंग करणाऱ्याच्या हिताकडे नजर पुरविण्याकरितां, कांहीं विशिष्ट कालानें निघणारीं विशिष्ट पत्रें उत्पन्न झालीं आहेत.

प्रकरण दहावें
मूर्तिकार

५०. शिल्पकला, मूर्तिकला आणि चित्रकला ह्यांचें साहचर्य इतकें निकट आहे कीं, त्यांच्या उत्पत्तीचें एकमेकांपासून अगदीं स्वतंत्र असें वर्णन करणें सुलभ नाहीं; आणि प्रारंभींप्रारंभींच्या सुधारणांच्या अवशेषांमध्यें त्यांच्यांत जे संबंध दृष्टीस पडतात तेवढ्यांवरून जो त्यांच्यासंबंधानें विचार करील त्याची चुकी होण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ रॉलिन्सन म्हणतो कीं, इजिप्तमध्यें खोदण्याची कला बहुतेक शिल्पविषयकच असे, व तिचा उद्देश मुख्यत्वेंकरून इमारतींना सौंदर्य आणण्याचा असे; देवांच्या मूर्ती त्यांच्यासाठीं केलेल्या देवळांतून ठेवण्यासाठींच असत; व्यक्तींचे पुतळे देखील थडग्यांना शोभा आणण्यासाठींच तयार करीत. ह्या त्याच्या म्हणण्याचा भावार्थ असा दिसतो कीं, ऐतिहासिक कालीं ईजिप्तमध्यें जशी खोदण्याची कला शिल्पकलेची अंगभूत होती, तशी प्राचीन किंवा पूर्वीच्या कालींहि होती; पण ही चूक आहे. कारण असें म्हणण्यास पुष्कळ आधार सांपडतो कीं, सर्वत्र लांकडांत कोरणें ह्या स्वरूपाची खोदण्याची कला शिल्प-

कलेच्या पूर्वी अस्तित्वांत आली, आणि थडगें व देऊळ हीं मूर्तीच्या मागून आलीं.

ह्या ग्रंथाच्या आधींच्या एका खंडांत अनेक लोकांमधील असा अनेक प्रकारचा पुरावा दिला होता कीं, मूलस्वरूपीं मूर्ति ही मृतमाणसाची प्रतिमा असे व त्या प्रतिमेंत त्याचें भूत नेहमीं किंवा कधीं कधीं वास करितें अशी कल्पना असे; त्यास हवी देत, त्याची प्रार्थना करीत, व त्यास संतोषकारक असे विधी करीत. मूळच्या वस्तूंच गुणधर्म आणि तिच्या प्रतिमेमध्यें असतात म्हणून समजले जाणारे तसलेच गुणधर्म ह्या दोहोंच्या संबंधानें रानट्यांच्या अविवेचक मनामध्यें उत्पन्न होणारा घोंटाळा पुष्कळ काळ कायम राहिला. उदाहरणार्थ, हा घोंटाळ्याचा समज इजिप्शनलोकांमध्यें होता हें यावरून दिसतें कीं त थडग्याच्या एका भागांत मृताची एक लांकडी आकृति तयार करून ठेवीत; अशासाठीं कीं त्याचें पेंढा भरून ठेवलेलें शव नष्ट झाल्यास त्याचा आत्मा जेव्हां परत येईल तेव्हां त्यास वसतिस्थान सांपडावें. थोडक्या शतकांमध्येंच इंग्लिश व यूरोपस्थ इतर लोक यांच्यामध्यें अशी विलक्षण चाल होती कीं, राजे व राजपुत्र ह्यांच्या प्रतिमांना भपकेदार पोषाक घालून मरणानंतर कांहीं काळपर्यंत नियमानें अन्नपाणी त्यांच्यापुढें नेऊन ठेवावयाचें; आणि यांपैकीं कांहीं मूर्ति अद्यापि वेस्टमिन्स्टर आबेमध्यें जपून ठेविलेल्या आहेत यावरून आपणास एथें एवढीच गोष्ट लक्षांत घ्यावयाची कीं, मृत माणसाची कोरलेली किंवा बनवलेली प्रतिमा करण्याची चाल, प्राथमिक धर्माच्या इतर

मूल अंगांबरोबर सुधारणेच्या अगदीं खालच्या पायरी-वर सुरू होते, आणि अशा रीतीनें खोदण्याच्या कलेची उत्पत्ति पिशाचपूजेपासून होत असून. मूर्तिकार हा प्राथमिक स्वरूपीं ह्या पूजेचा एक कर्ता किंवा साधक असतो.

थडगें व देऊळ यांची उत्पत्ति पुरण्याच्या ठिकाणाला जी छाया करितात तिजपासून झालेली आहे; ही छाया प्रथम ओबडधोबड व तितक्यापुरतीच असते, पण मागाहून ती सुधारलेली व कायमची बनते; इकडे मूर्ति ही देवळाची मूलभूमिका असून, थडग्यावर जी प्रारंभीं ओबडधोबड प्रतिमा ठेवितात तिचा तो मेहनतीनें तयार केलेला व सुबक असा आकार असतो. यावरून गर्भितार्थ निघतो तो हा कीं देवळाप्रमाणेंच मूर्तीच्या संबंधानेंहि, रानटी लोकांमध्यें असतो त्याप्रमाणें जेथें उपाध्याच त्याचा कर्ता नसेल तेथें तो त्या कर्त्याचा निदान मार्गदर्शक तरी असतो; म्हणजे, मूर्तिकार त्याच्या सांगण्याबरहुकूम मूर्ति बनवीत असतो.

५१. ह्या आमच्या म्हणण्याच्या पुष्टीकरणार्थ जो पुरावा आम्ही देणार आहों त्यामध्यें हल्लींच्या रानटी जातींमध्यें जो अल्पस्वरूप पुरावा मिळतो तो प्रथम देऊं.

गोल्डकोस्टवरील नीग्रोंच्या संबंधानें बॉस्मन असें सांगतो कीं, सामान्यतः ते माणूस पुरलेल्या जाग्यावर एक लहानशी झोंपडी बांधितात, आणि कांहीं ठिकाणीं त्या जाग्यावर ते कांहीं मातीच्या प्रतिमा ठेवितात. कोस्टनीग्रोंबद्दल लिहितांना बेस्टियन असें सांगतो कीं, मृत नाईक व त्यांचीं कुटुंबें ह्यांच्या मातीच्या आकृती गांवांतील झाडाखालीं ते जवळ जवळ मांडून ठेवितात. ह्या

फलेच्या पूर्वी अस्तित्वांत आली, आणि थडगें व देऊळ हीं मूर्तीच्या मागून आलीं.

ह्या ग्रंथाच्या आधींच्या एका खंडांत अनेक लोकांमधील असा अनेक प्रकारचा पुरावा दिला होता कीं, मूलस्वरूपीं मूर्ति ही मृतमाणसाची प्रतिमा असे व त्या प्रतिमेंत त्याचें भूत नेहमीं किंवा कधीं कधीं वास करितें अशी कल्पना असे; त्यास हवी देत, त्याची प्रार्थना करीत, व त्यास संतोषकारक असे विधी करीत. मूळच्या वस्तूंच गुणधर्म आणि तिच्या प्रतिमेमध्यें असतात म्हणून समजले जाणारे तसलेच गुणधर्म ह्या दोहोंच्या संबंधानें रानट्यांच्या अविवेचक मनामध्यें उत्पन्न होणारा घोंटाळा पुष्कळ काळ कायम राहिला. उदाहरणार्थ, हा घोंटाळ्याचा समज इजिप्शनलोकांमध्यें होता हें यावरून दिसतें कीं त थडग्याच्या एका भागांत मृताची एक लांकडी आकृति तयार करून ठेवीत; अशासाठीं कीं त्याचें पेंढा भरून ठेवलेलें शव नष्ट झाल्यास त्याचा आत्मा जेव्हां परत येईल तेव्हां त्यास वसतिस्थान सांपडावें. थोडक्या शतकांमध्येंच इंग्लिश व यूरोपस्थ इतर लोक यांच्यामध्यें अशी विलक्षण चाल होती कीं, राजे व राजपुत्र ह्यांच्या प्रतिमांना भपकेदार पोषाक घालून मरणानंतर कांहीं काळपर्यंत नियमानें अन्नपाणी त्यांच्यापुढें नेऊन ठेवावयाचें; आणि यांपैकीं कांहीं मूर्ति अद्यापि वेस्टमिन्स्टर आबेमध्यें जपून ठेविलेल्या आहेत यावरून आपणास एथें एवढीच गोष्ट लक्षांत घ्यावयाची कीं, मृत माणसाची कोरलेली किंवा बनवलेली प्रतिमा करण्याची चाल, प्राथमिक धर्माच्या इतर

मूल अंगांबरोबर सुधारणेच्या अगदीं खालच्या पायरी-वर सुरू होते, आणि अशा रीतीनें खोदण्याच्या कलेची उत्पत्ति पिशाचपूजेपासून होत असून. मूर्तिकार हा प्राथमिक स्वरूपीं ह्या पूजेचा एक कर्ता किंवा साधक असतो.

थडगें व देऊळ यांची उत्पत्ति पुरण्याच्या ठिकाणाला जी छाया करितात तिजपासून झालेली आहे; ही छाया प्रथम ओबडधोबड व तितक्यापुरतीच असते, पण मागाहून ती सुधारलेली व कायमची बनते; इकडे मूर्ति ही देवळाची मूलभूमिका असून, थडग्यावर जी प्रारंभीं ओबडधोबड प्रतिमा ठेवितात तिचा तो मेहनतीनें तयार केलेला व सुबक असा आकार असतो. यावरून गर्भितार्थ निघतो तो हा कीं देवळाप्रमाणेंच मूर्तीच्या संबंधानेंहि, रानटी लोकांमध्यें असतो त्याप्रमाणें जेथें उपाध्याच त्याचा कर्ता नसेल तेथें तो त्या कर्त्याचा निदान मार्गदर्शक तरी असतो; म्हणजे, मूर्तिकार त्याच्या सांगण्याबरहुकूम मूर्ति बनवीत असतो.

५१. ह्या आमच्या म्हणण्याच्या पुष्टीकरणार्थ जो पुरावा आम्ही देणार आहों त्यामध्यें हल्लींच्या रानटी जातींमध्यें जो अल्पस्वरूप पुरावा मिळतो तो प्रथम देऊं.

गोल्डकोस्टवरील नीग्रोंच्या संबंधानें बॉस्मन असें सांगतो कीं, सामान्यतः ते माणूस पुरलेल्या जाग्यावर एक लहानशी झोंपडी बांधितात, आणि कांहीं ठिकाणीं त्या जाग्यावर ते कांहीं मातीच्या प्रतिमा ठेवितात. कोस्टनीग्रोंबद्दल लिहितांना वेस्टियन असें सांगतो कीं, मृत जाईक व त्यांचीं कुटुंबें ह्यांच्या मातीच्या आकृती गांवांतील झाडाखालीं ते जवळ जवळ मांडून ठेवितात. ह्या

आकृती कोण तयार करितो आबद्दल तो कांहीं सांगत नाहीं, पण त्या उपाध्ये करितात म्हणून अन्यत्र सांगितलेलें आढळतें. उदाहरणार्थ, टकी असें म्हणतो कीं, कांगो नदीवरील एका खडकांत कांहीं मूर्ती बनवलेल्या असून त्या नॉकी म्हणून एका विद्वान् उपाध्यानें तयार केल्या होत्या, व जो त्यास पैसे देईल त्यास ती कला तो शिकवीत असे.

पालिनश्यन जातींमध्यें यासंबंधानें कांहीं पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, सांडविचबेटवाल्यांबद्दल कूक असें म्हणतो कीं त्यांच्या स्मशानभूमींतून त्यांच्या देवांच्या पुष्कळ लांकडी मूर्ती असून त्यांपैकीं कांहीं झोंपड्यांतून व कांहीं उघड्या असत; आणि एलिस असें सांगतो कीं त्यांच्यांत प्रत्येक प्रसिद्ध भुताची एकेक मूर्ति असे. हीं प्रसिद्ध भुतें म्हणजे प्रारंभीं मृत नायकांचीं असत हें न्यूझीलंदर नामक जी ह्यांच्यांशींच संबद्ध जात तिच्या हकीकतीवरून दिसतें. टॉम्सन म्हणतो कीं ह्या लोकांमध्यें नायकांचीं प्रेतें कधीं कधीं ते मरतील त्या घरांत पुरीत असून तेथें त्यांचे आप्त कित्येक आठवडेपर्यंत रडत बसत; आणि तेथें त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या वीस ते चाळीस फूट उंचीच्या ओबडधोबड मूर्ती उभारीत. आतां ह्या मृतांच्या मूर्ती कोण तयार करी हें जरी एथें सांगितलेलें नाहीं, तरी टाम्सनच्या म्हणण्याप्रमाणें तेथील कारागिरांमध्यें उपाध्ये हे ज्या अर्थीं सर्वांत विशेष कुशल असत त्या-अर्थीं नायकांच्या मूर्ती तरी तेच तयार करीत असतील असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

कालमक्क व मोंगोल ह्या लोकांत असल्या घरगुती मूर्ती असून त्यांच्यासंबंधानें पालास असें सांगतो कीं, त्यांच्यांत ह्या मूर्ती मातीच्या किंवा तांब्याच्या करीत असून त्या उपाध्ये करीत व रंगवीत असतात.

एलिस म्हणतो कीं मालागासी लोकांमधील मूर्ति-पूजा अलीकडेच उत्पन्न झालेली असून घरगुती देवांच्या पूजेमागून बऱ्याच काळानें उत्पन्न झालेली आहे; पण ह्या मूर्ती कोण करीत हें तो सांगत नाहीं.

५२. आतां प्रथम उपाध्या हा मूर्ती स्वतः कोरीत असून मागाहून तो त्या कोरणारांचा केवळ व्यवस्थापक कसा बनतो हें समजून घ्यावयाचें असल्यास तसलाच संबंध हल्लीं मुख्य कारागीर व त्याच्या हाताखालीं काम करणारे यांजमध्यें कसा उत्पन्न झालेला आहे तें पाहवें. हल्लीं मुख्य मूर्तिकार मूर्ती तयार करण्याचें सगळें काम स्वतः करीत नसून त्याची ठोकळ कल्पना आपल्या हाताखालच्या कारागिरास करून देतो; तो त्याचा पुनःपुनः सल्ला घेऊन एक मातीचा नमुना तयार करितो; आणि नंतर त्यावरून संगमरवरी दगडाचा पुतळा खोदितो, व तो घडतांनाहि तसेंच करितो. प्रारंभीं उपाध्ये जें मूर्तीकाराचें काम करीत तें ते सामान्यतः अशाच धर्तीवर करीत असले पाहिजेत. उदाहरणार्थ, सिंघालीज लोकांबद्दल लिहितांना टेनेन्ट असें सांगतो कीं, ईजिप्तमधील उपाध्याप्रमाणें सीलोनमधील उपाध्ये त्यांच्या धर्मगुरूची मूर्ति कशी तयार करावयाची याबद्दल ठराविक पद्धतीप्रमाणें मूर्तिकारांस दिशा दाखवून देत, व धार्मिक विषयाच्या संबंधानें माणसा-

च्या आकृती तयार करावयाच्या तरी तसेंच करीत. ईजिप्तकडे पाहतां असा पुरावा सांपडतो कीं त्यांच्यांत देवतांचें पुतळे कसे करावयाचे हें पूर्वीच्या दंतकथांबरहुकूम उपाध्ये ठरवीत असत इतकेंच नाहीं, तर क्वचीं कधीं तेच स्वतः त्या मूर्ती बनवीत. उदाहरणार्थ, बाराव्या घराण्यांतील एक उपाध्या मेन्टुहोटेप याच्याबद्दल असें सांगतात कीं तो कारागिरीच्या कामांत फार कुशल असून तो स्वहस्तें आपण केलेल्या नमुन्याबरहुकूम मूर्ती तयार करीत असे. तो आपल्या थडग्यावर लिहितोः—देवळ बांधण्याच्या कामाची व्यवस्था केली ती मीं केली.

ग्रीक लोकांच्या इतिहासावरून जो कांहीं यासंबंधानें पुरावा मिळतो तो जरी विपुल नाहीं, तरी मुद्देसूद आहे. उदाहरणार्थ, क्झर्यस असें म्हणतो कीं ग्रीसमध्यें अगदीं प्रारंभींचे मूर्तिकार धर्माधिकारीवर्गापैकीं असत. दुसऱ्या एका ठिकाणीं तो असें म्हणतोः—खोदीव कामाच्या संबंधानें सर्व गोष्टी उपाध्यांच्या हुकमांप्रमाणें होत असत. मूर्तिकार हे धर्माच्या तैनातीतील लोक आहेत असें समजत. माहाफी म्हणतो कीं डेल्फाई एथील भविष्य सांगणाऱ्या देवाचीं देवळें तयार करण्याच्या कामीं ग्रीसदेशांतील उत्तम उत्तम मूर्तिकार, चित्रकार, व शिल्पकार ह्यांनीं आपलें कौशल्य खर्च केलें होतें.

पण अशा रीतीनें धर्मविषयक मूर्ति तयार करण्याच्या कामीं ग्रीक मूर्तिकार पूर्वीच्या दंतकथांस सोडून त्या तयार करणें म्हणजे जरी पाप समजत तरी इतर

प्रकारच्या मूर्ति तयार करण्याच्या कामीं ते आपल्या कल्पनाशक्तीस भराऱ्या मारण्यास वरीच मोकळीक देत मूर्तिशास्त्र जें गार्हस्थिक बनलें तें बहुधा अस-ल्याच संक्रमणानें बनलें असावें. उपाध्यांच्या हुकुमा-बरहुकूम पुतळे व मूर्ति कोरणारांस केवळ वरच्या द-र्जाचे हुषार कामकरी म्हणून समजत; त्यांस कुशल कारागीर म्हणून समजत नसत. पण ते जेव्हां उपा-ध्यांच्या देखरेखीविना स्वतंत्ररीत्या तसलीं कामें करीत तेव्हां त्यांस त्यांच्या कारागिरी-कौशल्याबद्दल शाबास-की मिळे, आणि ते प्रसिद्धीस येऊन त्यांचे कारखाने पहावयास राजे देखील येत.

इतरत्र इतर धंद्यांची उत्पत्ति जशा पद्धतीवर झाली तशा पद्धतीवर रोममध्यें कां झाली नाहीं ह्याची जीं अन्यत्र कारणें दाखविलीं आहेत, त्यांत ह्या धंद्याच्या संबंधानें तसें होण्यास आणखी एक कारण झालें; तें असें कीं रोमन लोकांत प्रारंभीं देवांच्या मूर्ती किंवा देवळें नसत. शिवाय लष्करी धंद्याव्यतिरिक्त प्रत्येक धंद्याबद्दल रोमन लोकांस जो तिरस्कार वाटे त्यामुळें, आणि कला व कारागीर हे रोममध्यें बाहेरून आलेले असल्यामुळें, बादशाही अमदानींत तेथें चित्रकला व मूर्तिकला ह्यांचे व्यासंगी बहुधा बंदेगुलाम किंवा मुक्त-गुलाम हे असत.

५२. प्रारंभींच्या यूरोपांतील ख्रिस्ती धर्मस्थापनेच्या काळचे जे कांहीं लेख उपलब्ध आहेत त्यांवरून त्या-वेळीं या कलांची वृद्धि किती अल्प झालेली होती हें दिसतें. वरचेवर लोक असें म्हणतांना आढळतात कीं अर्वाचीन कालीं देखील निरनिराळ्या मानसिक साम-

थ्यांचें विशिष्टीकरण हल्लींच्या मानानें फारच अल्प झालेलें होतें. उदाहरणार्थ, लिआमार्डोडा व्हिन्सि हा शास्त्रज्ञ असून कलाभिज्ञहि होता मायकेल एँजलो हा कवि, शिल्पी, मूर्तिकार व चितारी होता. ही गोष्ट याच्यापूर्वीच्या कालीं याहूनहि सामान्य असे. उदाहरणार्थ, एमेरिक डेव्हिड म्हणतो, एकच माणसें सोनार, शिल्पी, चितारी, मूर्तिकार, आणि कधीं कधीं कवी आणि लहान. मोठे उपाध्येहि असत. ग्यालोफ्रान्क (आधुनिक फ्रेंच) लोकांबद्दल चाल्मेल व इतर ग्रंथकार असें म्हणतात कीं त्यांच्यांत मुख्यकला म्हटली म्हणजे सोन्याचें काम करण्याची असे, व तें शिकण्याच्या मोठ्या शाळा म्हटल्या म्हणजे कांहीं मठ असत; आणि त्यांतील मोठे कारागीर म्हटले म्हणजे मठवाले असत, व ते धर्मकृत्यांत लागणारीं भांडीं, पोषाक व इतर शृंगार, स्मारकस्तंभ वगैरे तयार करीत. ह्यांतील शेवटच्या विधानावरून स्मारकाच्या दगडावर मूर्ती खोदणें हा उद्योग उपाध्येवर्गाचा होता हें दिसतें. एमेरिक डेव्हिड म्हणतो कीं दहाव्या शतकांत मान्स्टीर—एनडेई एथील मठाधिपति ह्यूग्स हा चितारी व मूर्तिकार होता; ह्यांत्याच्या म्हणण्यावरून वरीलच गोष्ट व्यक्त होते. उपाध्येवर्ग संकीर्ण-कौशल्याचीं कामें करी हें लाक्रॉय व सीरी ह्यांच्या पुढील विधानावरून दिसून येतें. ते म्हणतात, अकराव्या शतकाच्या प्रारंभीं ओडोराम नांवाचा एक मठाधिपति सोनें, रुपें व माणकें ह्यांचे ख्रिस्तास सुळीं दिल्याचे देखावे व देवांचीं घरें बनवीत असे. बाराव्या शतकामध्यें थिओफिलस नांवाचा मठा-

धिपति हस्तलेख रंगविणारा, निरनिराळ्या रंगाची कांच करणारा, व सोन्यारुप्याचा मुलामा देणारा असे.

प्रारंभीं प्रारंभीं ह्यासंबधानें इंग्लंदांत स्थिति कशी काय होती ह्याबद्दल पुरावा सांपडत नाहीं. जो सांपडतो तो खोदण्याची कला धर्माधिकारी नाहींत अशा लोकांच्या हाती गेल्यानंतरच्या काळचा सांपडतो. हे लोक पूर्वीं ह्या कामीं उपाध्याचे केवळ हस्तक असल्यामुळें त्यांच्या कामास पुष्कळ काळपर्यंत केवळ हुशार कामकऱ्याचें काम म्हणूनच समजत असत. उदाहरणार्थ, एके ठिकाणीं असें विधान आढळतें कीं, पहिल्या चार्लस राजाच्या कारकीर्दीच्या अगोदर मूर्तिकारास 'कुशल कारागीर' ही पदवी क्वचितच लाविलेली आढळते; त्या वेळीं सर्वांत प्रसिद्ध मूर्तिकार निकोलस स्टोन हा असे; तो राजाचा मुख्य गंवडी होता. प्रारंभीं सेंट डन्स्टन वगैरे मठाधिपति खिडक्यांवर पानें कोरणें, पडदे खोदणें, वगैरे बारीकसारीक कामें देवळांवरून करीत असत; आणि असेंहि म्हणतात कीं कधीं कधीं ते एकमेकांचेहि वेडेवाकडे मुखवटे थट्टेनें कोरीत.

५४. मूर्तिकलेची वृद्धि अलीकडे कशी कशी झाली आहे ह्याचा पत्ता लावणें कठीण पडतें. पण ग्रीसमध्यें जशी त्या कलेची वाढ झाली तसल्याच नमुन्यावर अलीकडेहि झालेली आहे असें दिसतें. संगमरवरी दगडांत खोदीव काम करणाराचा धंदा गार्हस्थिक बनत असतां प्रथम प्रथम तो एक वरच्या दर्जाचा कामकरी म्हणूनच समजला जात असे; आणि पुढें त्याच्या कौशल्याचा उपयोग जेव्हां धार्मिक-व्यतिरिक्त बाबतींत होऊं लागला तेव्हांच

तो स्वतंत्र होऊन कुशल कारागीर या नांवानें प्रसिद्धीस येऊं लागला. आणि तो जसजसा धर्मेतर विषयांकडे ज्यास्त ज्यास्त लक्ष देऊं लागला आहे तशीच त्याची योग्यता वाढत चालली आहे.

तथापि 'पूर्वजपूजेची अंगभूत' हें जें मूर्तिकलेचें प्राथमिक स्वरूप तें बऱ्याच अंशानें त्या कलेच्या ठिकाणीं अद्यापि कायम आहे, हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. रानटी व अर्धवट सुधारलेल्या समाजांतून मृतमाणसाच्या थडग्यावर ठेविलेली लांकडाची कारीव मूर्ति आणि ख्रिस्ती देवळांतील खोदिलेली संगमरवरी दगडाची मूर्ति, ह्या दोहोंचाहि अर्थ बहुतेक एकच आहे. कारण दोन्ही ठिकाणीं मूर्ति घडवून घेणें आणि तिच्यापुढें विशिष्ट वर्तन करणें ह्या दोहोंना प्रेरक मनोभावना एकच आहे, आणि ती कमज्यास्त पूज्यबुद्धि किंवा सन्मानबुद्धि हीच होय. शिवाय ही मनोभावना व्यक्त करण्याकरितां मूर्तिकलेचा उपयोग देवळांतूनच करितात असें नाहीं, तर घरांतूनहि करितात. उदाहरणार्थ, एकाद्या प्रसिद्ध पूर्वजाचा पुतळा त्याच्या वंशजांनीं घरांत संभाळून ठेवावयाचा याचा अर्थ त्याची योग्यता आपण जाणतींसें दाखविणें हा होय, आणि म्हणून ती एकप्रकारची विभूतिपूजाच होय.

म्हणून देवळांतून किंवा घरांतून किंवा उघड्या जागीं मृत माणसाची प्रतिमा करण्यासाठीं ज्या मूर्तिकलेचा उपयोग केलेला असेल तेवढीच पूर्णपणें सांसारिक किंवा गार्हस्थिक म्हणून मानतां येईल. जो मूर्ति-

कार आपले विषय प्राचीन दंतकथा, किंवा इतिहास, किंवा सभोंवतालची जीवसृष्टि ह्यांतूनच केवळ निवडील त्याच मूर्तिकाराचें मूळचें उपाध्यायिक स्वरूप पूर्णपणें गेलें म्हणून समजावें.

ही जी विभिन्नीकरणाची पूर्ण झालेली सरणी तिच्याशीं संकलनसरणीच्या संबंधानें जोडण्यास एथें कांहींच दिसत नाहीं. अगदीं स्वतंत्र अशीं मंडळें बनविण्याइतकी मूर्तिकारांची संख्या अद्यापि मोठी झालेली नाहीं. म्हणून त्यांच्यामध्यें जो कांहीं थोडा-फार संयोग उत्पन्न झालेला आहे त्याचा विचार पुढच्या प्रकरणांत चित्र्यांच्या संयोगांच्या विचाराबरोबर करूं.

प्रकरण अकरावें

चित्रकार (चितारी)

५५. चित्ररूपानें वस्तूंचें व जीवांचें निदर्शन करण्याच्या कलेचीं अगदीं ओबडधोबड स्वरूपें सुधारणेच्या अगोदरपासून अस्तित्वांत आहेत इतकेंच नाहीं, तर त्यांचा मागोमास इतिहासकालाच्या पूर्वतरकालीन माणसांमध्येंहि लागतो. डोरडोन एथें व इतरत्र हाडांवर रेषा कोरून प्राण्यांचीं काढिलेलीं चित्रें जीं सांपडलीं आहेत त्यांवरून हें सिद्ध होतें. आणि गुहांतून इकडे तिकडे भिंतीवर रंगविलेलीं चित्रें जीं सांपडतात त्यांवरून हल्लीं अस्तित्वांत असलेल्या रानटीलोकांमध्यें किंवा त्यांच्या पूर्वजांमध्यें रेषा व रंग यांचे योगानें वस्तुनिदर्शन करण्याचें कांहीं सामर्थ्य असे, हें स्पष्ट होतें.

पण आतां ह्या सुधारणेच्या पूर्वीच्या काळच्या गोष्टी सोडून देऊन, चित्रकलेचीं जीं बीजें असुधारलेल्यांकडून प्रारंभीं सुधारलेल्यांकडे संक्रान्त होऊन आलीं त्यांजकडे नजर पुरविली, तर मूर्तिकला व चित्रकला ह्या समकालीन होत असें दिसतें. कारण शरीराम ज्या रंगफांसणीनें रानटी लोक आपल्याविषयीं इतरांच्या मनांत भीति किंवा प्रीति उत्पन्न करितात तें रंग फासणें चित्रकलाविषयक नव्हे, म्हणून एकीकडे ठेवून जर विचार केला, तर असें आढळून येतें कीं, मृत माणसाच्या थडग्यावर ठेवण्याकरितां त्याची प्रतिमा तयार करतांना रंगाचा उपयोग प्रथम झाला; त्याचा उद्देश ती प्रतिमा ओबडधोबड रीतीनें तरी मूळ माणसासारखी दिसावी हा असे. देवभूत नाईक व राजे ह्यांच्या रंगीत आकृतींच्या, म्हणजे वीर व देव ह्यांच्या रंगीत मूर्तींच्या किंवा पुतळ्यांच्या, उत्क्रमणाची ही पहिली पायरी होय.

हें सत्य ह्याच्यापेक्षांहि चांगल्या रीतीनें ध्यानांत येण्यास ही गोष्ट लक्षांत घ्यावी कीं चित्रकलेचें मूर्तिकलेपासून हल्लीं जें पूर्ण विभिन्नीकरण दृष्टीस पडतें तें प्रारंभींच्या लोकांमध्यें नव्हतें. प्राचीनकालीं सर्वच पुतळे रंगवीत असत; कारण त्यांचा उद्देश ज्याचें स्मारक करावयाचें त्याच्या सारखी होईल तेवढी मूर्ति बनवावयाची हा असे.

५६. न्यूझीलंदमधील नायकांच्या, मुळाशीं होईल तितक्या सदृश दिसाव्या म्हणून गोंदिलेल्या ज्या मूर्तींना अगोदरच उल्लेख केलेला आहे, त्यावरून पृष्ठभागावर रेषा व रंग ह्यांचे योगानें मृत माणसांचीं नि-

दर्शनें पुरीं करण्याचे जे प्राथमिक लोकांचे यत्न ते उदाहृत होतात; आणि इंग्लंदांतील वगैरे पदार्थसंग्रहालयांतून केवळ रंगविलल्याच नव्हत तर कृत्रिम डोळे व दांत लाविलेल्या ज्या आकृती ठेविलेल्या दृष्टीस पडतात त्यांवरून प्रारंभीं ह्या दोन कलांचा संयोग कसा झालेला असे हें व्यक्त होतें.

उपाध्येलोक ह्या मूर्ती कोरीत व रंगवीतहि ह्याबद्दल प्रवाश्यांकडून फारसा पुरावा मिळत नाहीं. अपाची लोकांविषयीं बोर्क लिहितो कीं, त्यांच्यांत सर्व प्रकारचे ताईत, दोरे, मूर्ती, टोप्या व इतर पवित्र सामान वैदूंनीं करणें किंवा निदान मंतरणें जरूर असे. पण मूर्ती रंगाविण्याचें काम उपाध्ये करीत ह्याबद्दल जरी अर्धवटच पुरावा मिळतो तरी धर्मविषयक अन्यप्रकारचीं निदर्शनें तेच तयार करीत ह्याबद्दल स्पष्ट पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, वाळूंत काढिलेल्या चित्रांच्या संबंधानें कशिंग म्हणतो कीं, झूनी लोकांबरोबर मी प्रथम वस्तीस राहिलों असतां ही कला जेव्हां टोळीचे उपाध्ये जादूगार ह्यांच्यामध्यें पाहिली तेव्हां मीं तिला सुके किंवा पुडीचे रंग देण्याची कला असें नांव दिलें. ते जीं चित्रें काढितात तीं ज्या देवांचीं किंवा देव-प्राण्यांचीं म्हणून काढिलेलीं असतील ते उपाध्यांनीं मंत्र म्हटले म्हणजे त्यांजवर गुप्तरीत्या आपलें प्रतिबिंब पाडतात किंवा त्यांत आपला श्वास घालितात असें ते लोक समजतात. ह्याप्रमाणें ते कधीं कधीं वाळूंत रेघा काढून आपल्या प्राणिरूपी देवांच्या, वीरांच्या, आणि पवित्र डोंगरांच्याहि मोठाल्या ज्या आकृती बनवितात, त्यांच्यावरहि सुका रंग लाविलात,

आणि नंतर तो रंग। औषधासाठीं किंवा दुसऱ्या कांहीं धार्मिक विधीसाठीं काढून घेतात.

पण ह्याबद्दलचा अत्यन्त स्पष्ट पुरावा नाव्हाजो इंदियन ह्या लोकांमध्यें मिळतो. त्या लोकांमध्यें " पवताचा मंत्र " म्हणून एक विधि आहे त्याचें वर्णन करतांना डॉक्टर वाशिंग्टन माथ्यूस म्हणतो:—जे लोक मंत्र म्हणणाराच्या देखेरखीखालीं प्रत्यक्ष रंग देण्याचें काम करितात, त्यांस धर्माची दीक्षा दिलेली असते, पण ते कुशल वैदू असलेच पाहिजेत असें नाहीं; तें चित्रें काढितात तीं अगदीं ठराविक पद्धतीनें काढितात; मंत्र म्हणणारा त्याचें कोठें चुकेल तें सारखें दाखवीत असतो, व स्वतःहि दुरुस्त करितो; कांहीं बाबतींत चितारयास आपल्या कल्पनेस स्वैर संचार करूं देण्याची परवानगी असते; उदाहरणार्थ, देवाच्या कमरेला जी वेलबुट्टीदार पिशवी लटकाविलेली दाखविलेली असते, ती पाहिजे तितकी भपकेदार करण्याची त्यास मुभा असते; पण त्या आकृतींचे कांहीं भाग हात व विती घालून मोजीत असतात, आणि त्यामध्यें एक देखील रेषा इकडची तिकडे झालेली चालत नाहीं.

हा उताऱ्यावरून निःसंशय असें ठरतें कीं, चित्रकलेचा तिच्या प्रारंभींच्या पायऱ्यांवर धार्मिक कामांतच उपयोग करीत असत, आणि जेथें उपाध्याच स्वतः तिचा प्रयोग करीत नसेल तेथें तो प्रयोग करणारांवर देखेरख तरी ठेवीत असे.

५७. आतां प्रारंभींच्या ऐतिहासिक लोकांच्या अ-

वशेषांकडे व लेखांकडे पाहतां असल्याच अर्थाच्या गोष्टी कशॉ नजरेस येतात हें पाहूं.

पूर्वी दाखविल्याप्रमाणें प्रत्यक्ष मृत माणसाची पूजा करणें आणि त्याच्या प्रतिमेची पूजा करणें ह्यांमध्यें अभेरिकेंत विलक्षण संक्रमणें होऊन गेलीं; त्या संक्रमणकालीं त्याचे शरीराचे कांहीं प्रत्यक्ष भाग घेऊन व त्यांस कांहीं कृत्रिम भाग जोडून त्याची आकृति बनवीत असत. नाईल नदीच्या कांठीं आणखी कांहीं संक्रमणें दृष्टीस पडत. उदाहरणार्थ, मॅक्रोब्रियन इथिओपियन लोकांबद्दल बोलतांना हिरोडोटस अशी विलक्षण गोष्ट सांगतो कीं, त्यांनीं मृताचें शरीर इजिप्शन लोकांच्या किंवा कांहीं अन्य तऱ्हेनें सुकविलें म्हणजे ते जिप्सम नांवाच्या क्षाराचा त्याजवर गिलावा करितात, आणि नंतर तें रंगवितात, आणि अशा रीतीनें त्यास जिवंत शरीराचें होईल तेवढें रूप देतात; नंतर ते त्याच्या भोंवतीं काचेचा पोकळ स्तंभ उभारितात. ह्या गिलावा केलेल्या, रंगविलेल्या, आणि मखरांत घातलेल्या प्रेतास ते बळी समर्पीत. ह्या व इजिप्शन लोकांच्या रूढींत एवढाच फरक असे कीं इजिप्शन लोकांतील मम्या किंवा सुकवलेलीं प्रेतें अपारदर्शक मखरांत ठेवीत, आणि म्हणून ती पेटी बाहेरून तेवढी रंगवीत आतां ह्या प्रेतांची—मग तीं खासगी माणसांची असोत वा लहान मोठ्या शास्त्यांची असोत—जी पूजा करीत ती ज्या अर्थीं धर्म म्हणून करीत, त्या अर्थीं चित्रकला ही त्या वेळीं धार्मिक कलाच होती.

इजिप्शन लोकांमध्यें ज्या रंगविलेल्या भिंती दिस-

तात त्यांवर मुख्य चित्रें पूजा करण्याचीं आणि मारण्याचीं दिसतात; ह्यांत दुसऱ्या प्रकारचीं चित्रें म्हणजे पहिल्या प्रकारचेंच एक निराळें रूप असे. कारण जयांकित लढाईचीं चित्रें हीं ज्या सेनापतींनीं जय मिळविले असतील त्यांच्या सन्मानार्थ व स्मरणार्थ, किंवा ज्या देवांच्या सहाय्यानें त्यांनीं ते जय मिळविले असतील त्यांचे उतराई होण्यासाठीं, किंवा ह्या दोन्ही उद्देशांनीं काढीत असत. प्रारंभींच्या समाजांमध्यें शत्रूचा बळी देणें म्हणजे धार्मिक विधी समजत. म्हणून ह्या चित्रांचा उद्देश धार्मिक असे.

प्राचीन ईजिप्तमध्यें उपाध्याच प्राथमिक मूर्तिकार असे हें आपल्या अगोदर नजरेस आलेलेंच आहे; आणि चित्रकलेचें मूर्तिकलेशीं इतकें निकट साहचर्य असे कीं, तो स्वतः किंवा गुमास्त्याच्या द्वारा चित्रकारहि असे असें दिसतें. कारण चित्रें काढणें तीं अगदीं पूर्व दंतकथांस अनुसरून काढणें आवश्यक समजत असल्यामुळें, आणि ह्या दंतकथा उपाध्यासच माहीत असल्यामुळें तो जरी स्वतः तीं चित्रें काढीत नसला तरी तीं काढणारावर त्याची नजर असे ही गोष्ट उघड आहे. उदाहरणार्थ, अर्मन म्हणतो कीं, जुन्या बादशाहीच्या अमदानींत मेम्फिसचा महोपाध्याय हा सर्व कलाभिज्ञांचा मुख्य म्हणून समजला जात असे, फार तर काय, पण त्यास ' कुशल कारागिरांचा मुख्य अग्रणी ' अशी पदवीच असे, व तो अधिकार तो खरोखर चालवीहि. तो असेंहि सांगतो कीं थीबन लोकांचा देव आमन ह्याचे स्वताचे चित्रकार व मूर्तिकार असत; आणि त्या दोघांवरहि

दुसऱ्या भविष्यवाद्याची देखरेख असे. वर सांगितलेल्या इंडियन लोकांप्रमाणें ह्या चित्रकारांस कांहीं दीक्षा देत असतील, व अशा रीतीनें ते अर्धेमुर्धे उपाध्ये बनलेले असतील.

रंगकलेचा हा जो धार्मिक गोष्टींसाठीं उपयोग त्यासंबंधानें एका अस्तित्वांत असलेल्या धर्माचें उदाहरण आतां देऊं. सिलोनमधील बौद्ध लोकांबद्दल टेनेन्ट म्हणतो कीं, बुद्धाच्या प्रतिमा करण्यांत चित्रकार व मूर्तिकार ह्यांचे श्रम खर्ची पडत असतात; त्या प्रतिमा जिवंत दिसाव्या अशा रीतीनें रंगावितात. आणि डोळ्यांस रंग देणें हा त्यांच्यांत मोठा धार्मिक विधी समजतात, व त्यासंबंधानें उत्साह करितात.

मूर्तिकलेपासून किंवा रंगीत मूर्तिकलेपासून चित्रकलेकडे संक्रमण कसें झालें हें इजिप्तमधील चित्रित भिंतींवरून चांगलें व्यक्त होतें. कारण जीं चित्रें मूर्तीसारखीं फारच असत तीं भिंतींच्या सामान्य पृष्ठभागास चित्रापुरता उठाव देऊन काढीत असत. जीं चित्रें मूर्तींसारखीं अल्पप्रमाणावर असत त्यांचे पृष्ठभाग उचललेले नसत, पण त्यांच्या मर्यादारेषा खोदून पृष्ठभाग बहिर्गोल केलेले असत. आणि तिसऱ्या व शेवटच्या प्रकारांत ह्या दोन्ही गोष्टींचा अभाव असल्यामुळें तीं वास्तविक रंगीत चित्रें असत.

ग्रीक लोक देखील लहान-मोठ्या पूजार्ह पुरुषांचीं सुबक निदर्शनें करण्याच्या कामीं वर्णकलेचा उपयोग करीत; मग त्या देवळांतील मूर्ती असोत, किंवा मृत आप्तांच्या थडग्यांवरील उठावानें काढिलेल्या त्यांच्या

आकृती असोत. देवळें भूषविण्यांतहि त्या कलेचा उपयोग तेथें होत असे.

आतां ग्रीस देशांत व्यवस्थित उपाध्येवर्ग उत्पन्न न झाल्यामुळें ह्या कलेचें ह्याच्या पुढचें उत्क्रमण तेथें कसें झालें हें स्पष्टपणें दिसत नाहीं. त्यासंबंधानें आपल्यास इतकेंच म्हणतां येतें कीं, त्या कलेस गार्हस्थिक स्वरूप आलें तें पुढेंपुढेंच आलें.

५८. यूरोपांत ख्रिस्ती धर्माचा उदय झाल्यावर चित्रकला व चित्रकार ह्यांच्या इतिहासाच्या ज्या पहिल्या पहिल्या पायऱ्या त्या त्यांजवर पूर्वी तेथें असलेली जी चित्रकला तिचा प्रभाव पडल्यामुळें स्पष्टपणें दिसत नाहींत. पण पुढें जेव्हां रानटी लोकांनीं यूरोपावर हल्ले केल्यावर ही मूळची कला पूर्णपणें नष्ट झाली, तेव्हां वास्तविक ख्रिस्ती चित्रकला पुढें आली, व ती सर्वथा धर्मविषयक असल्यामुळें तिचे व्यासंगीहि सर्वथा धर्माधिकारीच असत.

ह्यापुढें उपाध्या व चित्रकार ह्यांच्यामध्यें काय संबंध असत ह्याचें एक उदाहरण नवव्या शतकांत दृष्टीस पडतें. तें हें:—"बल्गेरियन लोकांचा पहिला ख्रिस्ती राजा बोगारिस ह्यानें मायकेल बादशहापाशीं आपला महाल सुशोभित करण्यासाठीं एक चितारी मागितला; तेव्हां बादशहानें मेथोडियस नांवाच्या मठवाल्यास त्याच्याकडे पाठविलें." ईस्टलेक आपल्या इतिहासावरील ग्रंथांत असाच उल्लेख करितो. तो म्हणतो की, तेराव्या किंवा चवदाव्या शतकापर्यंत चित्रकला मठवाल्यांच्या देखरेखीपासून स्वतंत्र झाली नाहीं; तोंपा-

वेतों देवळांच्या संबंधानें सर्व चित्रकाम मठवाले रेखीत असत इतकेंच नाहीं, तर प्रत्यक्ष करीतहि असत.

ह्या चित्रकलेच्या अभ्यासाबरोबरच रंग तयार करण्याची जी मदतनीस कला तिचेंहि ज्ञान प्रथम मठवाल्यांपाशींच असे. उदाहरणार्थ, ईस्टलेक म्हणतो कीं, सेनिनाई एकप्रकारचा रंग तयार करण्याच्या पद्धतीसंबंधानें बोलतांना सांगतो कीं, तो कसा तयार करावयाचा हें जोग्यांस माहीत असे. त्याच्याच ग्रंथांतील पुढच्या एका उताऱ्यावरून ही कला गार्हस्थिक बनण्याच्या क्रमांतील पहिली पायरी दिसून येतेः—" रंग व इतर जिन्नस जेव्हां जोग्यांकडून मिळणार नाहींत तेव्हां ते औषधिविक्याकडून मिळत असत ". ह्याच्या पुढच्या पायऱ्या लाबोर्डेच्या पुढील बिधानांत दिसून येतात. तो म्हणतो कीं, तेराव्या शतकांतील चकचकीत रंग देणारे बहुतेक जोगी असत, पण चवदाव्या व पंधराव्या शतकांत गृहस्थलोक त्या धंद्यांत पडूं लागले. लहान आकारावर आणि तेलाच्या रंगाचीं चित्रें काढणारे ह्यापुढें कोण कोण गृहस्थ निपजले त्यांचीं नावें दिलेलीं आढळतात. ते सांसारिक चित्रें काढून कधीं कधीं धार्मिकहि काढीत असत.

इजिप्शान व ग्रीक लोकांत धार्मिक विषयांचीं चित्रें काढण्याची तऱ्हा जशी अगदीं ठराविक असे, तशी ख्रिस्ती लोकांतहि असे. धार्मिक चित्रांवरील ही देखरेख अगदीं अठराव्या शतकापर्यंत सुरू होती. ग्रीस देशांत तर ती १८३९ सालींहि सुरू होती असें डायडून सांगतो.

५९. आतां गार्हस्थिक चित्रकार उत्पन्न होण्याच्या पुढच्या पुढच्या पायऱ्यांच्या संबंधानें पाहतां इतकें सांगणें पुरे दिसतें कीं, सिमाबू ह्या चित्रकाराच्या वेळापासून चित्रकलेमध्यें धार्मिकापेक्षां गार्हस्थिक अंगाचें प्राबल्य दिसूं लागलें. ह्यापुढें उपाध्ये-चित्रकारांची संख्या कमी होत चालली. तथापि कांहीं काळपर्यंत हे गृहस्थ-चित्रकार उपाध्ये-चित्रकारांचे मदतनीस असून, पुष्कळ वेळां धार्मिक विषयावरच चित्रें काढण्यांत गुंतलेले असावे.

गृहस्थ-चित्रकाराचें उपाध्ये-चित्रकारापासून ह्याप्रमाणें विभिन्नीकरण चाललें असतां गृहस्थ-चित्रकारांमध्येंहि विभिन्नीकरण सुरू झालें आणि ह्या गोष्टीस सुरवात एकदम न होतां हळूहळूच झाली. माणसाची म्हणून तसबीर प्रथम काढूं लागले ती धार्मिक विषयावर काढिलेलें चित्र जो देवळास अर्पण करील त्याची काढूं लागले. व ती त्याची तसबीर त्या चित्राच्या एका कोंपऱ्यांत 'गुडघे टेंकून हात जोडलेले' अशा धर्तीची काढूं लागले.

ह्या कलेच्या दुसऱ्या एका स्वरूपासंबंधानें साधारणपणें असेंच झालें. भूमिप्रदेश-निदर्शनास जी सुरवात झाली ती पवित्र पुरुष व वस्तू ह्यांच्या निदर्शनास शोभा देणारा लहानसा पृष्ठभाग किंवा 'मागचा देखावा' या रूपानें झाली. हळूहळू ह्या पृष्ठभागास ज्यास्त ज्यास्त महत्त्व येत चाललें, तथापि पुष्कळ काळपर्यंत मुख्य चित्राच्या मानानें तो गौणच गणिला जात असे. पुढें जेव्हां भूमिप्रदेशप्रदर्शन ही चित्रकलेची एक स्वतंत्र शाखा म्हणून स्थापन झाली तेव्हां देखील बराच

काळपर्यंत भूप्रदेशदेखाव्यांत कांहीं तरी प्राण्यांच्या आकृती दाखविण्याची वहिवाट असे, व अद्यापहि बहुतेक सर्वत्र आहेच. माणसें किंवा इतर प्राणी ह्यांनीं विरहित असें केवळ भूमिप्रदेशप्रदर्शन अगदीं अलीकडेच दृष्टोत्पत्तीस येऊं लागलें आहे.

आतां चित्रकलेच्या ह्या व इतर शाखांच्या संबंधानें चित्रकारांचे अगदीं निश्चित नाहीं तरी बरेचसे स्पष्ट वर्ग व पोटवर्ग झालेले आहेत; ह्यांपैकीं कांहीं वर्ग विषयपरत्वें आणि कांहीं वस्तुपरत्वें किंवा सामग्रीपरत्वें झालेले आहेत.

६०. आतां इतर धंद्यांच्या संबंधानें, एकच धंदा करणारे इतरांपासून पृथक् व आपापसांत संयुक्त व्हावे, असें जसें झालेलें आहे तसेंच ह्या धंद्याच्या संबंधानेंहि झालेलें आहे.

तेरा ते पंधरा ह्या शतकांत धार्मिक सुशोभनासाठीं उपाध्याचे हस्तक म्हणून लाविलेल्या कारागिरांचा जेव्हां एक वर्ग बनला, तेव्हां त्यांचे गिल्डांसारखे कांहीं समूह बनले. चवदाव्या शतकांत इटालीमध्यें चित्रकारांचा एक 'बंधुसमाज' उत्पन्न झाला; त्यांचा पुरस्कर्ता सेंट ल्यूक हा संत असून त्यांचा उद्देश एकमेकांस शिक्षण व मदत देणें, आणि एकमेकांच्या हिताचें संरक्षण करणें हा असे.

आलीकडे ही संकलनप्रवृत्ति तिकडे स्पष्टरीत्याच वाढत चालेलली आहे. त्यासंबंधानें एथें इतकेंच सांगणें जरूर दिसतें कीं चित्रकारांच्या मुख्य सभा जशा बनत गेल्या आहेत तशाच पोटसभाहि बनत गेल्या आहेत; आणि कलाविषयक विशेष वर्तमानपत्रेंहि नि-

घत असून तीं कलाशिक्षण आणि कलाकारांचें हितसंवर्धन ह्या गोष्टी करीत आहेत.

प्रकरण बारावें
धंद्यांचें उत्क्रमण

६१. " आपणांस तरुण खांद्यांवर वृद्ध डोकीं ठेवतां येत नाहींत " अशा अर्थाची इंग्रजींत एक म्हण आहे. ती आलंकारिकरीत्या अन्य सत्यांबरोबर असें एक सत्य व्यक्त करिते कीं, लहानपणी अल्प ज्ञान आणि अशिक्षित विचार व (मनो) विकार ह्यामुळें जे समज उत्पन्न होतात ते जाऊन त्यांच्या जागीं अधिक विस्तृत ज्ञान आणि ज्यास्त समतोल मानसिक शक्ती ह्यांनीं उत्पन्न होणारे समज स्थापन होण्यास वयास बरींच वर्षें व्हावीं लागतात. आणि मानसिक वाढ व वठण ह्यांचीं फलें योग्य वयाच्या अगोदर उत्पन्न करणें जसें बहुधा असाध्य असतें, तद्वतच, पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर ज्या दृढ समजुती उत्पन्न झालेल्या असतात, त्यांच्याबद्दल जो संशय, आपणास अद्यापि पुष्कळ शिकावयाचें आहे हें ध्यानांत आल्यानें उत्पन्न व्हावयाचा, तो अगोदरच उत्पन्न करणें बहुधा अशक्य असतें.

हें सामान्य विधान जरी अगदीं परिचित सारांशाचें असें आहे तरी पुष्कळ काळच्या व स्थळच्या लोकांचे निरीक्षणानें समाजसंघटनाविषयक प्रचलित कल्पनांत जो खोल फरबदल उत्पन्न होतो त्यांच्या संबंधानें तें एथें

केलेलें आहे; ह्या कल्पना केवळ तरुणांच्याच असतात असें नाहीं, तर बहुतेक वृद्धांच्याहि असतात. कारण विचार्यविषयाच्या संबंधानें त्यांच्यांतील बहुतेक तरुणच असतात. धिमेपणानें चवकशी केल्यास आणि शांत डोक्यानें विचार केल्यास असें स्पष्टपणें दिसून येतें कीं ज्या कांहीं संस्था आपणास अगदीं गैर अशा वाटतात, त्या एके काळीं अत्यंत आवश्यक असत;आणि समाजांची सर्वत्र जी वाढ झालेली आहे ती अशा सामाजिक व राजकीय साधनांनीं झालेली आहे कीं तीं साधनें आपल्या उच्चतर मनोवृत्तीस निषिद्धशीं वाटतात, व ज्यास्त पक्क अशा सामाजिक ध्येयाशीं विसंगतशीं वाटतात.

ज्यास स्वेच्छाचारी शासनाचा फार तिटकारा आहे तो आपखुषीनें ही गोष्ट लक्षांत आणीत नाहीं कीं, असल्या शासनाव्यतिरिक्त समाजाच्या उत्क्रमणास प्रारंभ होऊं शकला नसता; आणि ज्या उदाध्यायिक शासनाचा विचार असह्य होतो त्यास, प्रारंभीं तें शासन आवश्यक असतें ही गोष्ट लक्षांत घेण्यास मोठें संकट वाटतें. पण पुराव्याचा सूक्ष्म विचार करतां हे सामान्य सिद्धान्त खरे ठरतात इतकेंच नाहीं, तर त्यावरून हेंहि उघड होतें कीं, ज्या मनुष्यसमूहामधून व्यवस्थित समाजांचा अंकुर फुटतो त्यांनीं ज्या स्वरूपांत एका व्यक्तीचें प्राबल्य असतें असें स्वरूप धारण केलेंच पाहिजे; कारण तो एक माणूस त्या समाजामधील जसा काय मुख्य गड्डाच असून वाढीच्या पुढच्या सर्व पायऱ्यांचा जणूं काय तो मध्यबिंदूच असतो. जरी जसजशी समाजाची प्रगति होत जाईल, आणि मुख्यत्वेंकरून

युद्धशील नमुन्याच्या ऐवजीं उद्यमशील नमुन्याची स्थापना होत जाईल, तसतसें एक केंद्रीभूत आणि जुलमी असें शासन कमी कमी आवश्यक होऊं लागतें, आणि समाजोत्क्रमणांत त्याचें महत्त्व कमी कमी होऊं लागतें, तरी पुराव्यावरून आपणास ही गोष्ट कबूल करणें भाग पडतें कीं, प्रथम तें अत्यन्त आवश्यक होतें, किंबहुना त्याच्याशिवाय चाललेंच नसतें.

हा व्यापक सिद्धान्त पूर्वी जसा राजकीय व धार्मिक संस्थांच्या संबंधानें अनेक तऱ्हांनीं आपणास खरा म्हणून दिसून आला तसा तो धंदेसंस्थांच्या संबंधानेंहि खरा म्हणून दिसून येतो. गतप्रकरणांतून हें आपल्यास दिसून आलेंच आहे कीं, जी कार्यकर संस्था प्रथम राजकीय असून मागाहून मृतशास्ता देवभूत होईल तशी राजकीय-धार्मिक बनते त्या संस्थेमधून विभिन्नीकरणानें सर्व धंद्यांची उत्पत्ति होते. आणि त्या संस्थेचें जें धार्मिक अंग त्यापासून त्या धंदेसंस्थांची वाढ होते. इजिप्तमध्यें लेख व अवशेष ह्या दोन्हींवरून सामाजिक उत्क्रमणाच्या पहिल्या पहिल्या पायऱ्या फार चांगल्या रीतीनें दिसत असून असेंहि निदर्शनास येतें कीं, धंदेविषयक व्यापारासहित एकंदर सर्व शासनविषयक व्यापार राजा आणि त्याच्या सभोंवतालचे लोक ह्यांजमध्यें मिश्रित झालेले होते. उदाहरणार्थ, टीळ म्हणतो कीं, प्रारंभीं उपाध्या व राजा ह्यांजमध्यें विरोध उत्पन्न होणें तेथें बहुतेक शक्यच नसे, कारण स्वतः राजेच, त्यांचे पुत्र किंवा त्यांचे मुख्य अधिकारी हे मुख्य उपाध्याय असत, आणि उपाध्यायिक्क अधिकार

इतर अधिकारांपासून पृथक् किंवा त्यांशीं विसंगत असे झालेले नव्हते. आणखी तो म्हणतोः—" उपाध्यायिक व्यापार हे सरकारी व्यापार असत, आणि त्यांजमध्यें व सेनापति, प्रांताचा सुभेदार, शिल्पी किंवा कोठारळा ह्यांच्या व्यापारांमध्यें मुळींच फरक नसे. वस्तुतः दोन्ही प्रकारच्या हुद्यांवर एकच पुरुष असत." शिवाय ब्रुश सांगतो कीं कारोचे शिल्पी बहुतेक राजाचे मुलगे व नातू ह्यांजपैकीं असत, आणि त्यावरून असें स्पष्ट होतें कीं, शास्त्या मंडळामध्यें राजकीय, उपाध्यायिक, व धंदेविषयक व्यापार एकीकृत झालेले होते.

६२. सामाजिक उत्क्रमणाची सरणी ह्या संस्थांमध्यें जितकी स्पष्टपणें दिसून येते तितकी दुसऱ्या कोणत्याच संस्थांमध्यें दिसत नाहीं. ज्या अंकुरांपासून धंदेसंस्थांची उत्पत्ति होते त्या प्रथम नियामक संस्थांचा एक भाग असून, त्यांचें जसें त्या संस्थांपासून विभिन्नीकरण होत जाईल तसें एकमेकांपासूनहि होत जातें; आणि पोटविभाग वाढल्यामुळें त्या जशा विविधस्वरूप होत जातील तशा त्या आपापसांत ज्यास्त सुसंबद्ध आणि इतरांपासून ज्यास्त स्पष्टपणें पृथक् होत जातात. व्यक्तिरूप इंद्रियजालाचे निरानिराळे भागांस ज्या सरणीनें त्यांची मूळची सरळ स्थिति जाऊन अखेरची संमिश्र स्थिति प्राप्त होते, ती सरणी ह्या ठिकाणीं तंतोतंत दिसून येते.

प्रारंभीं, ज्यास स्वतः भुतांवर आपलें सामर्थ्य चालतें असें वाटत असे, व इतरांसहि वाटत असे, असा जो गूढ गोष्टी करणारा माणूस किंवा वैदू तो रोग उत्पन्न करणाऱ्या भुतांस हांकलून लावण्याकरितां जब-

रीच्या उपायांची योजना करीत असल्यामुळें, डाक्टराचें काम बजावीत असे; आणि जेव्हां त्याच्या योजना प्रथम दैवीकरीत्या उपयोगीं पडतात असें समजत असून मागून स्वाभाविकरीत्या गुणकारक होतात म्हणून समजूं लागले; तेव्हां अखेरीस त्याचें उपाध्यायिक स्वरूप अगदीं निघून गेलें; आणि त्यापासून होणारा वैद्यवर्ग प्रारंभीं समस्वरूप असून मागाहून जसजसे त्याचे स्पष्ट असे पोटवर्ग पडत गेले तसतसें त्यास निश्चितस्वरूपहि प्राप्त होत गेलें.

वैदूंच्या मागून (कारण त्यांच्यांत जास्त पक्क समूह दिसत असत.) ते धंदेवाले उत्पन्न झाले, जे कधीं जिवंत शास्त्यासमोर आणि कधीं कधीं मृतशास्ता हजर आहे असें कल्पून त्याच्या समोर, आनंदप्रदर्शन करीत असत; ते प्रथम एकसमयावच्छेदेंकरून गाणारे व नाचणारेहि असत; पण पुढें ते इतर लोकांपासून जसे विभिन्न होत गेले, तसे एकमेकांपासून पृथक् होत चालले. म्हणून कालेंकरून त्यांच्यांत दोन प्रकारचे धंदेवाले उत्पन्न झाले; आणि त्यांनीं धंदा म्हणून केलेल्या राजकीय व धार्मिक प्रशंसांचा आवांका वाढत जाऊन त्यांचे प्रकारहि विगुणित होत चालले. आणि मग असल्याच पायऱ्यांनीं गाणारे व वाजवणारे परस्परांपासून भिन्न होऊन, अखेरीस वाद्यांवर गाणीं बसविणारे व बनविणारेहि त्यांपासून भिन्न झाले; आणि ह्या तीन वर्गांमध्यें आणखी पोटवर्ग उत्पन्न झाले.

कधीं जिवंत राजाचीं व कधीं मृत राजाचीं केलेलीं जीं हीं संतर्पणें त्यांस जशीं नर्तन व गानवादन ह्यांचीं रूपें आलीं, तशीं स्तुत्यांचींहि आलीं; ह्या प्रशंसा प्रा-

रीच्या उपायांची योजना करीत असल्यामुळें, डाक्टराचें काम बजावीत असे; आणि जेव्हां त्याच्या योजना प्रथम दैवीकरीत्या उपयोगीं पडतात असें समजत असून मागून स्वाभाविकरीत्या गुणकारक होतात म्हणून समजूं लागले; तेव्हां अखेरीस त्याचें उपाध्यायिक स्वरूप अगदीं निघून गेलें; आणि त्यापासून होणारा वैद्यवर्ग प्रारंभीं समस्वरूप असून मागाहून जसजसे त्याचे स्पष्ट असे पोटवर्ग पडत गेले तसतसें त्यास निश्चितस्वरूपहि प्राप्त होत गेलें.

वैदूंच्या मागून (कारण त्यांच्यांत जास्त पक्क समूह दिसत असत.) ते धंदेवाले उत्पन्न झाले, जे कधीं जिवंत शास्त्यासमोर आणि कधीं कधीं मृतशास्ता हजर आहे असें कल्पून त्याच्या समोर, आनंदप्रदर्शन करीत असत; ते प्रथम एकसमयावच्छेदेंकरून गाणारे व नाचणारेहि असत; पण पुढें ते इतर लोकांपासून जसे विभिन्न होत गेले, तसे एकमेकांपासून पृथक् होत चालले. म्हणून कालेंकरून त्यांच्यांत दोन प्रकारचे धंदेवाले उत्पन्न झाले; आणि त्यांनीं धंदा म्हणून केलेल्या राजकीय व धार्मिक प्रशंसांचा आवांका वाढत जाऊन त्यांचे प्रकारहि विगुणित होत चालले. आणि मग असल्याच पायऱ्यांनीं गाणारे व वाजवणारे परस्परांपासून भिन्न होऊन, अखेरीस वाद्यांवर गाणीं बसविणारे व बनविणारेहि त्यांपासून भिन्न झाले; आणि ह्या तीन वर्गांमध्यें आणखी पोटवर्ग उत्पन्न झाले.

कधीं जिवंत राजाचीं व कधीं मृत राजाचीं केलेलीं जीं हीं संतर्पणें त्यांस जशीं नर्तन व गानवादन ह्यांचीं रूपें आलीं, तशीं स्तुत्यांचींहि आलीं; ह्या प्रशंसा प्रा-

रंगीं तात्कालिक व अनियमित असून मागाहून विचार-पूर्वक आणि नियमित अशा बनल्या. म्हणून प्रथम वक्त्याच्या गद्य भाषणाची उत्पत्ति झाली, व त्यास मनोवृत्तींच्या उच्चतर उत्क्षोभांत उपाध्ये-कवींच्या पद्य भाषणाचें स्वरूप आलें; व ह्या कविताच पुढें ठराविक स्तोत्ररूपी बनल्या. याबरोबरच, वीराच्या कृतींच्या कधीं एकानें व कधीं अनेकांनीं केलेल्या ओबडधोबड नकलांना नाटकीय प्रदर्शनांचें स्वरूप आलें; आणि तीं हळूहळू ज्यास्त ज्यास्त श्रमविरचित बनून त्यांचें नियमन एक मुख्य नट करूं लागला, व ह्या मुख्य नटापासूनच पुढें नाटक रचणाराची उत्पत्ति झाली. आणि हीं जीं एकंदर पूजाविषयक बीजें त्यांजपासून अखेरीस कवी, नट, नाटककार,आणि ह्या सर्वांचे पोटविभाग,ह्यांची उत्पत्ति झाली.

वीरदेवाच्या अशा रीतीनें पाठ म्हटलेल्या किंवा गाइलेल्या व नाटकरूपानें दाखविलेल्या, ज्या ह्या कृती त्यांना त्याच्या बारीक-सारीक कृतींची जोड मिळूं लागली, व अशा रीतीनें तीं त्यांचीं चरित्रें बनूं लागलीं; आणि अशा रीतीनें उपाध्ये-कवीपासून चरित्रकाराची उत्पत्ति झाली, व तो गृहस्थलोकांचीं चरित्रें रचूं लागल्यामुळें चरित्रेंहि सांसारिक बनलीं. देवभूत नायकाच्या किंवा राजाच्या गोष्टींत त्याच्या बरोबरच्या लोकांच्या गोष्टींची, आणि त्यांनीं केलेल्या कृत्यांच्या हकीकतींची भर पडून पहिले इतिहास बनले. आणि विशेष व्यक्ती व व्यक्तिसमूह ह्यांच्या ह्या कांहीं अंशीं खऱ्या, पण अतिशयोक्तीनें काल्पनिक बनणाऱ्या ज्या हकीकती त्यांपासून अगदीं काल्पनिक हकीकतींची किंवा

कादंबऱ्यांची उत्पत्ति झाली; पण त्यांजमध्यें चरित्र व इतिहास यांचें स्वरूप कायम राहिलें, व तें अद्यापि कायमच आहे. शिवाय या व्यक्तिविषयक वाङ्मयांतून पसरलेल्या ज्या टीका व विचार त्यांपासून अव्यक्तिविषयक असें वाङ्मय हळूहळू निघालें; पण ह्या सर्वांच्या अगदीं मुळीं उपाध्येकवीच्या प्रशंसा आहेत हें विसरतां कामा नये.

रानट्यांचे वैद्य आणि प्रारंभीं सुधारलेल्या लोकांचे उपाध्ये ह्यांना आपलें वजन वाढविण्याची सहजच इच्छा असल्यामुळें, त्यांस स्वाभाविक कृती आणि वस्तूंचे धर्म ह्यांचें ज्ञान मिळविण्याची स्फूर्ति नेहमीं होत असे; आणि त्यांचें दैविक सत्त्वांशीं दळणवळण आहे अशी समजूत असल्यामुळें त्यांस हें ज्ञान त्या सत्त्वांपासून मिळतें अशीं लोकांची कल्पना असे. अशा रीतीनें, अर्थात्, उपाध्या प्राथमिक शास्त्रज्ञ बनला; आणि त्याच्या विशेष अनुभवांवरून वस्तूंचीं कारणें काय असावीं ह्यांबद्दल तर्क करण्याची त्यास स्फूर्ति झाल्यामुळें तो तत्त्ववेत्ताहि बनला; पण त्याचें शास्त्रज्ञान व त्याचें तत्त्वज्ञान यांचा व्यासंग तो धर्मासाठींच करीत असे.

तो विशेष शिकलेला असल्यामुळें, आणि देवांचा तो गुमास्ता असून त्यांच्याशीं त्याचें दळणवळण आहे अशी समजूत असल्यामुळें, तंटा पडल्यास त्याचा शब्द लोक प्रमाण समजत असत, आणि इतिहासकार ह्या नात्यानें गतव्यवहार व प्राचीन काळापासून चालू असलेल्या रूढी किंवा कायदे ह्यांसंबंधानेंहि तो प्रमाणभूत असल्यामुळें, तो ह्या दृष्टींनीं न्यायाधीश बनला. शिवाय कायद्याच्या अम्मलबजावणीच्या वाढीबरोबर वकील

आला; आणि त्याचा उगम बहुधा जरी गार्हस्थिक असे तरी कधीं कधीं उपाध्यायिकहि असे.

टोळी किंवा समाज यांतील विद्वान् माणूस म्हणून आणि विशेषतः सर्वांत जास्त मोलवान समजलें जाणारें जें अदृष्ट वस्तूंचें ज्ञान तें बाळगणारा म्हणून, उपाध्या अवश्यच पहिला शिक्षक बनला. प्रथम केवळ आपल्या वर्गातीलच नूतन विद्यार्थ्यांना, पण मागाहून सुशिक्षित वर्गांना भुतें व देव झांजबद्दलचीं पूर्वापार विधानें तो संक्रांत करीत असून, तो पुढें लवकरच दैविक गोष्टींच्या ज्ञानाव्यतिरिक्त स्वाभाविक गोष्टींचेंहि ज्ञान देऊं लागला; आणि अशा रीतीनें तो पहिला व्यावहारिक शिक्षक बनल्यामुळें, त्याचें त्या शिक्षणांत अद्यापिहि पुष्कळ अंग आहे.

हवी देणें हें ज्या अर्थीं पहिलें उपाध्यायिक कृत्य होतें, आणि त्यावरून बळी देण्यासाठीं स्थंडिल बांधणें हेंहि उपाध्यायिकच कृत्य असलें पाहिजे असें ज्या-अर्थीं गर्भित होतें, त्या अर्थीं असें सिद्ध होतें कीं स्थंडिलावर सावली करणें (जी सावली पक्वस्वरूपीं देऊळ बनली) हेंहि उपाध्यायिकच कृत्य होतें. पुढें जेव्हां उपाध्या देऊळ स्वतःच बांधण्याच्या ऐवजीं कामकऱ्यांकडून बांधवूं लागला, तेव्हां त्याचा नकाशा तोच करी; आणि जेव्हां तो प्रत्यक्ष नकाशाहि करीत नाहींसा झाला, तेव्हां जो मुख्य बांधणारा किंवा शिल्पी असेल त्यास इमारतीचें मामान्य धोरण देऊं लागला. शिवाय कांहीं कांहीं ठिकाणीं देऊळ व वाडा देवभूत शास्त्याचें आणि जिवंत शास्त्याचेंहि वसतिस्थान असल्यामुळें (हल्लीं देखील राजवाड्यांतून लहानसें देऊ-

ळ असतेंच), आणि ह्याच इमारतींत सुधारलेलें शिल्प प्रथम दिसूं लागल्यामुळें, त्यापासून अखेरीस धार्मिकेतर शिल्पाची उत्पत्ति झाली.

माणसाची ओबडधोबड कोरलेली किंवा घडलेली मूर्ति त्याच्या थडग्यावर ठेवण्यापासून देवळांत बसलेल्या देवाच्या खोदीव प्रदर्शनाची उत्पत्ति झाली. प्रारंभीं तें उपाध्यायिक कौशल्यानें उत्पन्न होत असून प्रारंभीं सुधारलेल्या लोकांमध्यें तें तेच तयार करीत; आणि नंतर जेव्हां तें कारागीर बनवूं लागले तेव्हां उपाध्याच्या सांगीप्रमाणें बनवूं लागले. नंतर लवकरच देवरूप व अर्धवट-देवरूप पुरुषांव्यतिरिक्त इतरांच्याहि प्रदर्शनार्थ खोदण्याच्या कलेचा उपयोग होऊं लागल्यामुळें अखेरीस तीस सांसारिक स्वरूप आलें.

वर्णकलेच्या संबंधानें असेंच झालें. प्रथम त्या कलेचा उपयोग सन्मानित किंवा पूजित पुरुषाचें कोरीव प्रदर्शन पूर्ण करण्याच्या कामीं होत असल्यामुळें, आणि कांहीं टोळ्यांमध्यें टोळीच्या मुख्याच्या कृतींचें प्रदर्शन करण्याच्या कामीं उपाध्याय व त्याचे मदतनीस त्याचा उपयोग करीत असल्यामुळें ती पुष्कळकाळपर्यंत धर्माची अंकित राहिली, व ते तिचा उपयोग पुतळे रंगाविणें, किंवा देवळें सुशोभित करणें, किंवा स्थंडिलावर मृतपुरुषाच्या तसबिरा काढणें ह्या कामीं करीत असत; आणि पुढें ती कला स्वतंत्र बनल्यावर देखील पुंष्कळ काळपर्यंत तिचा उपयोग पवित्र देखावे बनविण्याच्याच कामीं बहुतेक होत असे. शेवटीं जेव्हां ती सांसारिक बनली तेव्हां तिच्यांत अनेक प्रकार उत्पन्न

झाले, आणि चित्रकारांचेहि अनेक पोटविभाग बनले.

अशा रीतीनें धंदेसंस्थांच्या उत्क्रमणसरणींत सर्वत्र एकच प्रकारचे विशेष दिसून येतात. तिबेटमध्यें ज्या पाय्ऱ्या अद्यापि दिसतात म्हणून हक्क सांगतो (जेथें लामा हा केवळ उपाध्या नसून तो चित्रकार, कवि, मूर्तिकार, शिल्पी, आणि वैद्यहि असतो) तशा पाय्ऱ्यांवर एकाच व्यक्तीमध्यें किंवा समूहामध्यें अशा प्रकारचीं बीजसामर्थ्यें दिसत असतात कीं त्यांपासून ज्यांस आंपण धंदेवाले म्हणून म्हणतों तीं विशिष्ट-मंडळें उत्पन्न होतात. एका प्राथमिक वर्गापासून ज्यास्त ज्यास्त विभिन्नीकरणांनीं अनेक वर्ग उत्पन्न होत असतां त्या प्रत्येक वर्गाला तसलेच फांटे फुटत असतात; म्हणजे त्याच्यामध्यें पोटवर्ग, आणि पोटपोटवर्गहि उत्पन्न होत जाऊन ते हळूहळू ज्यास्त स्पष्ट होत जातात; म्हणजे काय, तर, सर्वत्र अनिश्चितसमस्वरूपाकडून निश्चित-विविधस्वरूपाकडे प्रगति होत असते.

६२. लोक ज्या धार्मिक व राजकीय पंथांमध्यें वाढलेले असतील त्यालाच ते बहुतेक अगदीं चिकटून राहतात ही गोष्ट डोळ्यांपुढें असतां, आणि ते पंथ त्यांना कशाहि रीतीनें प्राप्त झाले असले तरी त्यांच्या संबंधानें लवकरच असे कांहीं दृढ ग्रह बनतात कीं त्यांच्याविरुद्ध पुराव्याकडे ते ढुंकूनहि पहात नाहींसे होतात, ही दुसरी गोष्ट डोळ्यांपुढें असतां, अशी आशाच करतां येत नाहीं कीं, आतांपर्यंत दिलेल्या व त्याच्या अगोदर दिलेल्या उदाहरणांवरून समाज ही कृत्रिम चीज नसून स्वाभाविक वाढ आहे, व तिचें उत्क्रमण कांहीं विशिष्ट

नियमांप्रमाणेंच होत असतें, ह्या गोष्टी ते ध्यानांत घेतील.

राष्ट्रांना त्यांच्या सजीव घटना कृत्रिम योजनांनीं प्राप्त न होतां स्वाभाविक सरण्यांनीं प्राप्त होत असतात हें सत्य मुख्य प्रधानांपासून तों नांगऱ्यांपर्यंत एक मा-हीत नाहीं, किंवा ते तिकडे लक्ष पुरवीत नाहींत. सामाजिक घटना अमुक अमुक रीतीनें देवानें बनविल्या आहेत असा जरी त्यांचा समज नसला तरी असा आहे कीं त्या तशा राजांनीं बनविल्या आहेत किंवा पार्लमेंतांनीं बनविल्या आहेत. शास्त्यांच्या ध्यानांत नसलेल्या लहान लहान फेरबदलांच्या संचयांनीं त्या उत्पन्न झालेल्या आहेत हें जें स्पष्ट गूढ तें आलीकडेच थोड्याशा लोकांच्या लक्षांत आलेलें आहे, आणि पुष्कळांच्या—मग ते सुशिक्षित असोत वा अशिक्षित असोत—लक्षांत अद्यापि आलेलें नाहीं. जमिनी रान तोडून खुल्या करून, कुंपून, त्यांतील फाजील पाणी काढून लावून, आणि त्यांत लागवडीच्या साधनांची योजना करून लोकांनीं, कायद्याची वाट न पाहतां, स्वताच्या फायद्यासाठीं धान्योत्पादक जरी बनविल्या आहेत—लोकांच्या स्वतःच्या गरजा भागविण्याच्या वासनांवरून खेडीं, लहान शहरें व मोठीं शहरें न समजतां जरी उत्पन्न झालेलीं आहेत—जरी (तिकडे) कालवे, आगगाड्या, तारा, आणि दळणवळणाचीं व वस्तू सर्वत्र पसरून देण्याचीं इतर साधनें लोकांच्या स्वैच्छिक सहक्रियेवरून अस्तित्वांत आलेलीं आहेत, तरी ज्या स्वाभाविक शक्तींनीं हें सर्व घडवून आणिलें आहे त्यांचें राजकीय विवेचनांत कांहींच महत्त्व नाहीं असें समजून तिकडे लोक

दुर्लक्ष करतात. साहेब म्हणतात, या देशांतील व बाहेर देशांतील लोकांच्या गरजा भागविणाऱ्या आमच्या गिरण्या व इतर कारखाने, व त्यांतील अनेक यंत्रें, तद्वतच ज्या अनेक जहाजांतून व आगबोटींतून कारागिरीनें उत्पन्न केलेल्या वस्तू बाहेरदेशीं जातात व बाहेरदेशच्या आमच्या देशीं येतात, त्या सर्वांची उत्पत्ति कृत्रिमरीत्या न होतां स्वाभाविक रीत्या झालेली आहे. ज्या रूपान्तरानें हजारों वर्षांमध्यें माणसांचे धंदे इतके विशिष्ट बनले आहेत कीं प्रत्येकजण आपल्या देशबांधवांच्या गरजांचा लहानसा भाग पुरवीत असून दुसरे शेंकडोंजण त्याच्या गरजा पुरवूं लागले आहेत, तो धंदेविभाग न कळतां, व कोणी पूर्वी न ठरवतां, उत्पन्न झालेला आहे. ज्या ज्ञानाची वाढ होऊन शास्त्र बनलें आहे, व जें शास्त्र इतकें विस्तृत झालें आहे कीं त्याचा एकदशांशहि कोणाला आकळतां येत नाहीं, व ज्याच्या धोरणानें सर्व चिजा हल्लीं उत्पन्न होत आहेत, तें ज्ञान ज्या व्यक्तींच्या मेहनतीनें उत्पन्न झालेलें आहे त्या व्यक्तींना सरकारचें प्रोत्साहन नव्हतें, तर त्यांच्या मनाच्या कलाचेंच होतें. ज्या ह्यांच्याहून विस्तृत संचयास वाङ्मय म्हणून म्हणतात, व ज्याच्या योगानें आपल्या सर्वांच्या आयुष्याचा एवढा मोठा भाग सुखानें जातो, त्याचीहि निर्मिति अशाच रीतीनें झालेली आहे. तेव्हांच्या तेव्हांचें जें वाङ्मय (वर्तमानपत्ररूपी) त्याचीहि स्थिति अशीच आहे. माणसांच्या मनाच्या ज्या विशेष जरूरीच्या गरजा त्या भागविणारीं जीं सर्वगामी वर्तमानपत्रें त्यांची उत्पत्ति

अनेक नागरिक आपल्या खासगी फायद्यासाठीं जे उद्योग करितात त्यांपासूम झालेली आहे. आणि यांची पूर्ति करणाऱ्या ज्या असंख्य कंपन्या, सभा, मंडळ्या, कळप वगैरे आहेत, व ज्यांचा उद्देश धाडसाचे उद्योग, औदार्याचीं कामें, शिक्षण, कला, लोकरंजन वगैरे करण्याचा आहे, तद्वतच वर्षास लाखो रुपये वर्गण्या व देणग्या मिळविणाऱ्या संस्था, या सर्वांची उत्पत्ति लोकांच्या स्वैच्छिक सहकार्यानें झालेली आहे. आणि असें असूनहि प्रधान व पार्लमेंतें ह्यांच्या कृतींचा विचार करून करून बहुतेक सर्व लोक इतके मोहून गेले आहेत कीं, सरकारच्या मदतीखेरीज, इतकेंच नव्हे तर, खरोखर, सरकारच्या अडथळ्यांस न जुमानतां, ही जी अद्भुत संघटना आज हजारों वर्षें वाढत आहे ती त्यांस दिसत नाहीं. 'सरकारी अडथळ्यास न जुमानतां' असें म्हणण्याचें कारण हें कीं, शेतकी, कलाकौशल्य, व्यापार, पेढीचा धंदा, वर्तमानपत्रांचा धंदा, इत्यादिकांचें, साहेब म्हणतात, कायद्यांनीं अत्यन्त नुकसान केलें आहे; व तें नुकसान सामाजिक शक्तींनींच भरून काढून त्यांची योग्य वाढ त्यांस पुनः लावून दिली आहे. सामाजिक इंद्रियजालाच्या जीविताबद्दल लोक इतके अजाण आहेत कीं जरी त्याच्या घटकांच्या उदरनिर्वाहार्थ ज्या खटपटीमुळें त्यांच्या दारांत प्रति घटकेस खाण्याचे पदार्थ पडत आहेत—जरी सकाळच्या स्नानाचें पाणी, रात्रीचा खोलींतील उजेड, चुलींतील विस्तव, शहरास नेणारी गाडी, त्यांचा धंदा, वर्तमानपत्राचा संध्याकाळचा जादा अंक, रात्रीचें नाटक, व प-

रत यावयास तांगा, हीं सर्व ह्या सुघटित समाजाच्या स्वैच्छिक श्रमांनीं चाललेलीं आहेत, तरी हें त्यांना दिसत नाहीं. जरी समाजाच्या जिवंत चळवळींनीं भांडवलाची जेथें सर्वांत जास्त जरूरी असेल तेथें तें जात असतें, मालाचा पुरवठा सर्वत्र समतोल होऊन किंमती सर्वत्र सारख्या होत असतात, आणि हें सर्व जरी सरकारी देखरेखीविना होतें, तरी हे सर्व व्यापार कोणीं अगोदर आंखिल्याविना सामाजिक रीत्या उगम पावत असतात ह्या सत्याची त्यांस आठवण नसल्यामुळें, स्वाभाविक कार्यकरांच्या द्वारा समाजसुधारणा होईल हें त्यांस खरें वाटत नाहीं. आणि म्हणून जेव्हां एकादी अहिताची गोष्ट सुधारावयाची आहे किंवा हिताची साधावयाची आहे असें त्यांच्या नजरेस येतें, तेव्हां ते त्याचें साधन कायद्याची जबरी हेंच होय असें समजून ' कायदा करा ' म्हणून ओरड करूं लागतात.

एवढ्यानेंच नाहीं झालें; तर याहूनहि विलक्षण गोष्टी दिसून येतात. समाजाची ही जी हितसंवर्धक वाढ झालेली आहे तिकडे कायदे करा म्हणणारे जर दुर्लक्ष करितात तर त्या वाढीचे जे नियम त्यांच्याकडे ज्यास्तच दुर्लक्ष करितात; म्हणजे, ज्या फेरबदलांनीं समाजांस त्यांची नीचतर स्थिति जाऊन उच्चतर स्थिति प्राप्त होत जाते त्या फेरबदलांचा कांहीं स्वाभाविक क्रम आहे हें ते मुळींच लक्षांत घेत नाहींत. राजकीय व धार्मिक संस्थांच्या उत्पत्तींत व इतर सर्वत्र जी उत्क्रमणसरणी उदाहृत होते तसलीच उत्क्रमणसरणी धंदेसंस्थांच्या उभारणींतहि उदाहृत होते ही गोष्ट जरी आतां आप-

ह्या नजरेस आली त्याप्रमाणें खरी आहे, आणि एकाद्यानें कांहीं नवा कायदा सुचविल्यास तो ह्या उत्क्रमणाच्या मर्यादेंत आहे किंवा नाहीं, आणि स्वाभाविक वस्तुक्रमाच्या विरुद्ध गेल्यानें काय परिणाम होतील, हें पाहणें जरी सयुक्तिक आहे, तरी असा प्रश्न कधीं कोणी करीत नाहीं इतकेंच नव्हे, तर तसा प्रश्न कोणीं एकाद्या लोकसभेंत केल्यास लोक त्याची हंसून टर उडवितील, आणि कामन्स-सभेंत त्यास स्वप्नसृष्टींत वास करणारा म्हणून नांवें ठेवितील; कारण अशिक्षित मंडळ असो किंवा सुशिक्षित असो, कोणत्याहि गोष्टीचे तात्कालिक सुपरिणाम वा कुपरिणाम काय एवढेंच पाहणें शहाणपणाचें होय असें त्यास वाटत असतें.

आणि एका निराळ्या नमुन्याचें मन आणि निराळ्या नमुन्याचें शिक्षण उत्पन्न झाल्याविना ही लोकवृत्ति कोणत्याहि कोटिक्रमानें किंवा कितीहि पुराव्यानें बदलावयाची नाहीं. तोंपावेतों कायदे करणारे असाच आपल्या शक्तीचा व्यय कांहीं धातुक गोष्टी नाहींशा करण्यांत व ज्यास्त उत्पन्न करण्यांत–म्हणजे, घडविण्यांत, पुनः घडविण्यांत आणि पुनःघडविण्यांत–म्हणजे, कायदे बनविण्यांत, ते सुधारण्यांत, आणि पुनः सुधारण्यांत करीत राहतील; इकडे सामाजिक योजना करण्यांत गुंतलेले असेंच समजत राहतील कीं समाज कापून काल्पनिक उत्तम नमुन्याप्रमाणें पुनः जोडिला कीं त्याचे भाग एकमेकांशीं नीट जुळतील, आणि त्याचे व्यापार आपल्या कल्पनेबरहुकूम होऊं लागतील !

परिशिष्ट

स्पेन्सरसाहेबांच्या कल्पनांची वाढ (उत्तरार्ध)

आणि इतकेंच झाल्यावर संघटनामक तत्त्वमीमांसेस ह्यांनीं प्रत्यक्ष सुरवात केली. ज्या कल्पना बऱ्याच अंशांनीं आतां निश्चित व सुसंबद्ध झालेल्या होत्या त्यांचें " आदितत्त्वें " या ग्रंथांत विवेचन करीत असतां त्या अगदींच निश्चित बनावयाच्या होत्या.

या मीमांसेचा जो नकाशा यांनीं प्रथम रेखाटिला होता त्यावरून असें दिसतें कीं अध्यात्म धार्मिक विषयासंबंधानें आपलीं मतें काय आहेत हें असल्या मीमांसेच्या प्रारंभीं सांगितलें पाहिजे असें यांस पहिल्यापासूनच वाटत होतें. आपल्या मीमांसेंत सर्व वस्तूंची उपपत्ति जर द्रव्य आणि गति ह्यांच्या पुनर्विभजनाच्या रूपानें आपल्यास लावावयाची आहे तर असल्या उपपत्तीवरून आपण केवळ वस्तुवादी आहों असा जो आपल्यावर आरोप येण्याचा संभव आहे तो अगोदर टाळिला पाहिजे. अशा उपपत्तीबरोबर ही गोष्ट आपण कबूल केली पाहिजे किंवा कदाचित् ठांसून सांगितली पाहिजे कीं, द्रव्य आणि गति एतद्विषयक ज्या आपल्या कल्पना आहेत त्या जें कांहीं सर्व ज्ञानाच्या पलीकडे आहे त्याचीं केवळ दर्शक चिन्हें आहेत; आणि म्हणून विश्वांत जे फेरबदल दृष्टीस पडतात त्यांच्या क्रमाचें स्पष्टीकरण करण्याचा कोणीं कसलाहि

प्रयत्न केला, तरी त्या फेरबदलांचें अंतःस्वरूप आणि उगम हीं अस्पष्टीकृत राहणारच.

म्हणून " आदितत्त्वांचा " पहिला भाग जो " ज्ञेयमीमांसा " तो ह्यांनीं तयार केला आणि लिहिला. पण ह्यापासून लोकांमध्यें ह्यांच्या मीमांसेच्या-संबंधानें एक विलक्षण गैरसमज उत्पन्न झाला. लोकांचा ह्यांच्या अध्यात्मविषयक मतांच्या संबंधानें गैरसमज होऊं नये म्हणून त्यांनीं आपल्या मीमांसेला प्रस्तावनारूपी जो हा भाग जोडिला तो ज्यां थोड्या लोकांचें त्या ग्रंथाकडे लक्ष गेलें त्यांना मुख्य भागच वाटला. म्हणजे, एकादी इमारत पहावयास म्हणून एकाद्यानें जावें आणि त्याचा दिंडीदरवाजा पाहूनच मागें फिरावें तशी या लोकांची स्थिति झाली. त्यांना वाटलें कीं सर्वत्र रूपान्तर चाललेलें असून तें सर्वत्र एकाच नियमांस अनुसरून होत आहे हें जें ह्या ग्रंथांत प्रतिपादिलेलें व्यापक मत त्याच्यावर टीका करण्याची जरूरच नाहीं; आणि असें समजून तिकडे त्यांनीं बहुधा दुर्लक्ष केलें; आणि ज्या थोड्यांचें तिकडे लक्ष गेलें त्यांची अशी कल्पना झाली कीं डार्विनचें जें नैसर्गिक निवडीचें मत त्यावरून तें निष्पन्न होतें ! सारांश, मट्ठ डोक्याच्या लोकसमाजाचा ह्यासंबंधानें असा विचार झालेला दिसला कीं दोन्ही ग्रंथ ज्या अर्थीं उत्क्रान्तिविषयक आहेत त्या अर्थीं अर्थात् त्यांपैकीं मागून प्रसिद्ध झालेला ग्रंथ पहिल्यानें प्रसिद्ध झालेल्याची " सुधारून वाढविलेली " आवृत्ति असलीच पाहिजे !

" ज्ञेयमीमांसा " हा जो " आदितत्त्वांचा " दुस-

रा भाग तो त्याचा मुख्य भाग असून त्यांत वर दर्शविल्याप्रमाणें अगोदर सांगितलेल्या कल्पनांचें सविस्तर विवेचन केलेलें आहे. पण त्यांत आणखी तीन फार महत्त्वाच्या कल्पनांचा विस्तार केलेला आहे. त्यांपैकीं एक विभिन्नवर्गीभवनाच्या सरणीच्या संबंधाची होय; ही सरणी जरी अप्रत्यक्ष रीत्या कांहीं निबंधांतून गर्भित झालेली होती तरी उत्क्रमणाचा तो एक आवश्यक भाग आहे अशा दृष्टीनें ती सिद्ध केलेली नव्हती. दुसरी कल्पना समतोलनाच्या संबंधाची होय. साहेब म्हणतात, ' प्रगति ' विषयक निबंधांत सार्वत्रिक रूपान्तराची जी सरणी प्रतिपादिली आहे त्यासंबंधानें हक्स्लेच्या घरीं एके दिवशीं तिसऱ्या प्रहरीं संभाषण चाललें असतां टिंडालनें असें मला विचारल्याचें अर्धवट स्मरतें कीं, ह्या सगळ्याचा शेवट काय होतो ? किंवा अशाच अर्थाचा दुसरा कांहीं प्रश्न त्यानें मला केला. त्याचें मीं उत्तर लागलेंच दिलें किंवा मागाहून विचार करून दिलें तें मला आठवत नाहीं; पण मला असें वाटतें कीं हा जो एकसारखा फेरबदल होऊन नेहमीं पूर्वीहून ज्यास्त विजातीय व ज्यास्त निश्चित स्थिति प्राप्त होते तिजपासून पुढें काय निष्पन्न होतें ह्याचा विचार ह्याच्यापूर्वी मीं केलेला नव्हता. पण असा प्रश्न करण्याबरोबर त्याचें उत्तर काय द्यावयाचें तें जणूं काय ठरलेलेंच होतें; आणि अशा रीतीनें समतोलन हें प्रकरण लिहिलें गेलें. पुढें अशाच धर्तीवर विचार करतां असा प्रश्न उत्पन्न झाला कीं समतोलनानंतर काय होतें ? आणि त्यास ' क्षय ' किंवा ' अप-

क्रान्ति ' हें उत्तर मिळालें, आणि त्यावरून तें प्रकरण लिहिलें गेलें. अपक्रान्ति ही उत्क्रान्तीची पूरकच आहे आणि म्हणून तीहि तशीच सार्वत्रिक आहे, ही गोष्ट यांच्या एकदम लक्षांत आली.

साहेब म्हणतातः—" आदितत्त्वांच्या " या भागाच्या निरनिराळ्या प्रकरणांमध्यें जें निरूपण म्यां केलेलें आहे तें प्रथमदर्शनीं दिसतें त्याहून अधिक सुलभ रीतीनें मला करतां आलेलें आहे. प्रत्येक प्रकरणांत काय सिद्ध करून दाखवावयाचें हें एकदां लक्षांत आल्यावर तें निरनिराळ्या चमत्कारसमूहांच्या संबंधानें सिद्ध करून दाखविण्यास मला फारसा त्रास पडला नाहीं. सामान्य सिद्धान्त ध्यानांत ठेवून एकीकडून दुसरीकडे, आणि एका चमत्कारवर्गाकडून दुसऱ्याकडे मी जसा वळें, तसे त्या सिद्धान्तास दृष्टान्त मला सर्वत्र आढळून येत.

१०. " जीवशास्त्राचीं तत्त्वें " ह्या ग्रंथाच्या पहिल्याच प्याऱ्यांत, विशिष्ट विषयाचा विचार व्यापकदृष्टीनें केल्याचा परिणाम काय होतो, तें दृष्टीस पडतें. त्यांत सेंद्रियद्रव्याचें जें विशिष्ट लक्षण यांनीं केलें आहे तें उघडच आदितत्त्वांतील मतावरून निश्चित झालेलें आहे. कारण त्यांत असें दाखविलेलें आहे कीं, सेंद्रियद्रव्याच्या घटकांत दोन ठळक विरोध दिसून येतात; एक हा कीं, त्यांतील कार्बन् हें द्रव्य अत्यंत स्थिर असून, हैद्रोजन हें द्रव्य फार अस्थिर आहे; दुसरा हा कीं, ऑक्सिजन हें द्रव्य अत्यंत चलाख असून नैत्रोजन फारच मंद आहे. म्हणजे काय, तर,

सेंद्रियद्रव्याचे घटक विशेषेंकरून विजातीय आहेत, आणि ही त्यांची विजातीयता वांढण्यास त्यांच्मांत फॉस्फरस व गंधक ह्यांची भर पडली आहे. जीवितांत अंतर्भूत होणारे जे सहज व सतत फेरबदल ते होण्यास सेंद्रिय द्रव्य योग्य बनण्यास जी अस्थिरता त्याचे अंगीं पाहिजे ती या घटनेमुळें त्यास प्राप्त झालेली आहे असें तेथें म्हटलेलें आहे; आणि शिवाय असें म्हटलेलें आहे कीं, सेंद्रिय द्रव्याचे तीन घटक वायुरूप असल्यामुळें त्यांपैकीं प्रत्येकांत त्याच्या संयुक्तस्थितींत अणुविषयक गतीचे मोठाले संचय समाविष्ट झालेले असतात म्हणूनच त्या द्रव्यांत इतक्या दृश्य चळवळी होऊं शकतात. आतां हें उघडच आहे कीं, "आदितत्त्वां" मध्यें निरूपिलेल्या व्यापक सत्यांच्या अभावीं सेंद्रिय द्रव्याकडे अशा दृष्टीनें ह्यांना खचीत पाहतां आलें नसतें. तसेंच ह्याच प्रकरणाच्या शेवटीं, निरनिराळ्या शास्त्रांच्या कल्पना एकत्र आणिल्यापासून काय फायदा होतो, ह्याचें उदाहरण दृष्टीस पडतें. कांहीं लोक असें म्हणत असतात कीं, कित्येक शास्त्रांच्या सामान्य ज्ञानापेक्षां एकाच शास्त्राचें पूर्ण ज्ञान शिक्षणदृष्ट्या फार चांगलें. पण प्रत्येक शास्त्रांत प्रगति जी व्हावयाची ती इतर शास्त्रांपासून प्राप्त होणाऱ्या ज्या कल्पना त्यांजवर अवलंबून असते. द्रव्यांचे दोन प्रकार आहेत, क्रिस्टलाइड, व कॉलाइड, म्हणजे ज्यांचे द्रव पापुद्र्यांतून गळतात तीं, व ज्यांचे गळत नाहींत तीं, असा जो प्रो० ग्रेहाम यानें महत्त्वाचा शोध लाविला, त्यावरून रसायनशास्त्राच्या प्रगतीस त्या शास्त्राच्या पलकिडे जाणें कसें आवश्यक

आहे हें स्पष्ट दिसतें. ह्या दोन प्रकारच्या द्रव्यांमध्यें तो जे विरोध दाखवितो, उदाहरणार्थ पहिल्याच्या अस्थैर्यामध्यें व दुसऱ्याच्या स्थैर्यामध्यें, आणि त्यापासून उत्पन्न होणाऱ्या पहिल्याच्या चापल्यामध्यें व दुसऱ्याच्या मांद्यामध्यें त्यांचें फारच महत्त्व आहे, आणि तें विशेषतः जीवशास्त्राच्या संबंधानें आहे. पण त्याला त्याशीं संबद्ध अशा कल्पना अवगत नसल्यामुळें, त्यावरून त्यानें जो उपसिद्धान्त काढावयाचा तो काढिला नाहीं. जीवविषयक फेरबदलांकडे त्यानें इंद्रियंविज्ञानदृष्ट्या पाहिलें असतें, आणि नाश पावलेले शरीराचे घटक सारखे पुनः उत्पन्न करावयाचे असतात आणि नष्ट द्रव्यें शरीरांतून सारखीं बाहेर काढून लावावयाचीं असतात ह्या गोष्टी त्यानें ध्यानांत घेतल्या असत्या, तर त्याच्या ही गोष्ट लक्षांत आली असती कीं, शरीरघटक कॉलाइडघटित आहेत, आणि नष्ट द्रव्यें क्रिस्टलाइडघटित आहेत म्हणूनच जीवविषयक व्यापार चालणें शक्य झालेलें आहे. मोठाल्या कॉलाइडच्या अणूंची विशिष्ट चलनशक्ति अल्प आहे, आणि क्रिस्टलाइडच्या लहान अणूंची ती शक्ति फार आहे, म्हणूनच ह्या दुसऱ्या द्रव्याचे अणू पहिल्यांतून जलदरीतीनें बाहेर पडून ज्या नळ्यांतून ते शरीराबाहेर जावयाचे त्यांत प्रवेश करीत असतात.

नंतरच्या प्रकरणांत ज्या उपपत्त्या लाविलेल्या आहेत त्यांसंबंधानें इतकेंच सांगणें पुरे आहे कीं त्यांचा मुख्य हेतु जीवविषयक व्यापारांचा अर्थ गूढगति आंत घेणें आणि दृश्यगति बाहेर टाकणें-म्हणजे अन्नाची

अणुविषयक गति आंत घेणें, आणि स्नायूंतून नष्ट द्रव्यांची यांत्रिकगति बाहेर टाकणें, ह्या व्यापारांच्या द्वारा लावण्याचा आहे. आणि हें करीत असतांना नैट्रोजन शरीरांत कायकाम करितो तें त्यांच्या लक्षांत आलें. त्याचें इतर मूलद्रव्यांशीं रासायनिक प्रेम फार अल्प असल्यामुळें, तो त्यांच्यापासून सहजरीत्या वियुक्त होतो, आणि त्यामुळें अणुविषयक घडामोडी आणि जीवविषयक चलनवलनें ह्यांस तो कारण होतो. सेंद्रिय व निरिंद्रिय अनेक नैट्रोजनयुक्त पदार्थ मोठाल्या घडामोडी—उदाहरणार्थ वार उडविणें, द्रव-द्रव्यें खिदखिदविणें, इत्यादि गोष्टी-उत्पन्न करण्याच्या कामीं कसे उपयोगास आणितात, ह्या गोष्टीची आठवण होऊन ही उपपत्ति त्यांनीं लाविली होती.

"जीवशास्त्राचे अनुभवजन्य सिद्धान्त" हा जो त्या शास्त्राचा दुसरा भाग त्यामध्यें अर्थात् जीं सामान्य सत्यें हा ग्रंथ लिहिला तेव्हां सर्वसंमत होतीं त्यांचें स्पष्टीकरण केलेलें होतें. त्यांचें उत्क्रांतीच्या सामान्य तत्त्वांशीं सूत जुळवून देण्याचा त्यामध्यें जो प्रयत्न यांनीं केला त्यामुळें त्यांस सहजच पूर्वीहून जास्त सुसंबद्ध असें स्वरूप आलें. त्याच्या प्रत्येक प्रकरणांत निरूपलेल्या सत्याचे आदितत्त्वांशीं काय संबंध आहेत ते यांनीं दाखविलेले आहेत. तथापि तद्विषयक गोष्टींचें निरीक्षण पद्धतशीर रीतीनें केल्यानें जीं अनुमानें प्राप्त झालीं त्यांपैकीं कांहीं विशिष्ट अनुमानें एथें सांगूं. प्रत्येक ठिकाणीं प्रश्न असा उत्पन्न होई कीं, ह्या विषयांत भौतिक गोष्टी कोणत्या अंतर्भूत झाल्या आहेत ?

ह्याचा परिणाम असा झाला कीं हा प्रश्न विचारला असतां जे खरे खोटे निर्णय प्राप्त झाले नसते ते प्राप्त झाले.

ह्यांचें चांगलें उदाहरण 'वाढ' ह्या प्रकरणांत दिसून येतें, आणि विशिष्ट शास्त्रांच्या सत्यांची उपपत्ति लावण्यास त्याहून जास्त व्यापक शास्त्रांतील सत्यांचें सहाय्य कसें घ्यावें लागतें हेंहि त्यावरून चांगलें दिसून येतें. वनस्पतिरूप आणि प्राणिरूप निरनिराळ्या शरीरवर्गांमध्यें वाढीचीं जीं मानें व ज्या मर्यादा दिसून येतात त्यांचें स्पष्टीकरण जो त्यांजकडे जीवशास्त्रदृष्ट्याच पाहील त्यास व्हावयाचें नाहीं. तें करण्यास गणित आणि सृष्टिविज्ञान ह्या दोन शास्त्रांची मदत घ्यावी लागते; म्हणजे, गोळे आणि त्यांचे पृष्ठभाग ह्यांजमधील कांहीं संबंध, विशिष्ट आकार आणि विशिष्ट ताण ह्यांच्यामधील कांहीं संबंध, आणि कार्यशक्तीची जनिति व ती शक्ति खर्च करण्याच्या भागांचा चिवटपणा ह्यांमधील कांहीं संबंध, इतक्या गोष्टी ध्यानांत घ्याव्या लागतात. शास्त्रीय शोध कोठें काय चालले आहेत ह्याबद्दल चौकसपणा एकाद्याचे अंगीं असला म्हणजे विशिष्ट शास्त्रांतील कांहीं कोडीं उलगडण्यास दूरच्या एकाद्या विषयाची देखील त्यास कशी मदत होते ह्याचें आणखीहि एक उदाहरण देण्यासारखें आहे.

प्रस्तुत ग्रंथाची पहिली आवृत्ति १८६४ सालीं निघाली आणि दुसरी १८९८ सालीं निघाली; त्याच्या दरम्यान, पाण्यांतून चालणाऱ्या जहाजास पाण्याचा विरोध किती होतो हें ठरविण्यासाठीं फ्रुड साहेबानें केलेल्या प्रयोगांची हकीकत यांच्या वाचनांत आली. ह्या

प्रयोगांचा आश्चर्यकारक परिणाम असा झाला कीं, मुख्य विरोध जहाजास पुढें पुढें जात असतां जें एकसारखें पाणी एकीकडे करावें लागत असतें त्यापासून उत्पन्न होत नाहीं, तर जहाजाच्या कातडीची किंवा बाह्य अंगाची जी घसट तिजपासून उत्पन्न होतो, असें ठरलें. म्हणून ' वाढ ' ह्या प्रकरणाचें पुनःशोधन करतांना एक महत्त्वाचा उपसिद्धांत ह्यांनीं त्यांत समाविष्ट केला. कारण ह्यावरून ह्यांच्या लक्षांत असें स्पष्ट आलें कीं जलचर प्राणी जसा वाढत जाईल तसा त्याचा पाण्यांत पोहण्याचा वेग वाढत जातो. कारण त्याचा आकार वाढेल त्या मानानें त्याची जी शक्ति वाढते तिच्यांत पाण्याच्या विरोधाचा त्या मानानें तितका कमीपणा उत्पन्न होत नाहीं. कारण शक्तीच्या वाढीच्या मानानें कातडीच्या घसटीची वाढ कमी प्रमाणावर होते. म्हणून मोठाले जलचर प्राणी अस्तित्वांत येऊं शकतात. शक्ति आणि प्रतिरोध ह्यांमध्यें असा जर हा संबंध नसता तर मोठी वाढ होण्यास जास्त भक्ष्य जें पंकडलें पाहिजे तें एरवीं त्या प्राण्यास पकडतां आलें नसतें.

" अनुरूप बनणें " ह्या प्रकरणांतहि एक शास्त्र दुसऱ्या शास्त्रांतील प्रश्न सोडविण्यास कसें मदत करितें ह्याचें उदाहरण दिसून येतें. ज्या फेरबदलांपारांमुळें सेंद्रिय रचना एकमेकींना योग्य बनतात ते व्यापार तसलेच सामाजिक व्यापार ध्यानांत आणिल्यानें अगदीं सुबोध होतात.

जनिति, वंशपरंपरा, आणि बदल, ह्या प्रकरणांतील प्रधान कल्पना ही पृथक्करणरूप विचारसरणीचें उदाहरण

आहे, आणि तें अपवादात्मक आहे; कारण ह्यांची नेहमींची सरणी संघटनात्मक पद्धतीनें जे सिद्धान्त निघतील त्यांचा पृथक्करण-पद्धतीनें ताळा पहावयाचा अशा प्रकारची असे. ह्या प्रकरणांतील कोटिक्रम असा आहे कीं शरीराचे जे विशेष गुणधर्म आहेत ते त्यांस त्याच्या घटक अशा ज्या सूक्ष्म पिशव्या त्यांजपासून किंवा त्यांचीं मूलभूत जीं प्रोटिन द्रव्यें त्यांजपासून प्राप्त होण्यासारखे नाहींत, कारण हीं द्रव्यें सर्वच प्रकारच्या जीवशरीरामध्यें दृष्टीस पडतात. म्हणून हे विशेष गुणधर्म प्रत्येक प्रकारच्या जीवाला देणारें आणखी कांहीं विशिष्ट द्रव्य आहे असें म्हणावें लागतें, आणि त्यास विशेष घटकद्रव्य असें म्हणतां येईल.

जीवशास्त्राच्या तिसऱ्या भागांतील पहिली महत्त्वाची कल्पना सांगण्यासारखी ही कीं, एकच हेतु साध्य करण्याकरितां ज्यांच्या ठिकाणीं अनेक इंद्रियें सहाक्रिया करीत असतात असे सांमिश्र प्राणी उत्पन्न होऊं लागले म्हणजे सृष्टीची निवड ही सरणी विशिष्ट आनुरूप्यें उत्पन्न करण्यास असमर्थ होते. ह्याचें उदाहरण आयर्लंदांतील मोठ्या शिंगांच्या सांबराचें दिलें आहे, आणि असा कोटिक्रम केला आहे कीं एवढालीं शिंगें हालवण्यास ज्या अनेक स्नायूंची आणि हाडांची जरूरी लागते तीं या शिंगांच्या वाढीबरोबरच योग्य बनल्याविना असल्या शिंगांचा त्या प्राण्यास संरक्षणाच्या किंवा परातिक्रमणाच्या कामीं उपयोग व्हावयाचा नाहीं. तद्वतच सहाक्रिया करणाऱ्या निरनिराळ्या भागांमध्यें योग्य बदल एकसमयावच्छेदकरून उत्पन्न

होतात अशीहि गोष्ट गृहीत करतां येत नाहीं; आणि अशा प्रकारचे बदल एकसमयावच्छेदेंकरून उत्पन्न झाल्याविना नुसत्या शिंगांची वाढ अपायकारक झाली पाहिजे. ह्यानंतरची महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणंजे अनुरूपीभवन आणि नैसर्गिक निवड हीं जीं सेंद्रिय उत्क्रमणांचीं दोन मुख्य उत्पादक त्यांची उपपत्ति भौतिक शास्त्रांतील शब्दांनीं लावणें ही होय. आतां अनुरूपीभवन ही सरणी भौतिकशास्त्रास माहीत नाहीं; आणि नैसर्गिक निवड ही कल्पसीहि त्या शास्त्रास तितकीच अपरिचित आहे. तेव्हां प्रश्न असा उभा राहिला कीं सार्वत्रिक उत्क्रमणशक्तींचा जो सार्वत्रिक व्यापार गृहीत करून चालतें त्याच्याच योगानें अनुरूपीभवन आणि नैसर्गिक निवड हीं उत्पन्न होतात अशी कल्पना कशी करावयाची ? प्रथम अशी उपपत्ति लावतां येणें यांस दुरापास्तच वाटलें; पण जीवाचें जीवित हा एक व्यापारसमुच्चय असून त्या व्यापारांचा बाह्यक्रियांस अनुसरून चल समतोल बनत असतो, अशा दृष्टीनें जेव्हां जीविताकडे हे पाहूं लागले तेव्हां वरील गूढाची उपपत्ति यांस सुचली. चल समतोल संभाळून धरणें आणि ते मोडणें ह्या व्यापाराबरोबर हे सर्व चमत्कार घडून येत असतात असें जेव्हां यांच्या ध्यानांत आलें तेव्हां त्यांची योग्य घडी बसली. हा विचार करीत असतांच " योग्यतमांचा टिकाव " ही शब्दयोजना यांस सुचली; आणि ती अगदीं साहजिकच होती. एवंच ह्या ठिकाणींहि सा-

मान्य सत्यांचा उपयोग विशिष्ट सत्यांची उपपत्ति लावण्याच्या कामीं झाला.

'जीवशास्त्राचा' पहिला खंड पुरा होण्याच्या अगोदर दुसऱ्या एका विषयाकडे यांचें लक्ष गेलें; आणि त्यापासून कांहीं महत्त्वाचे परिणाम घडून आले. काम्टेनें केलेलें शास्त्राचें वर्गीकरण "शास्त्रांची जनिति" ह्या निबंधांत ह्यांनीं खोडून टाकिल्यानंतर, तें वर्गीकरण योग्य रीतीनें करण्यांचा यांनीं कित्येक वेळां प्रयत्न करून पाहिला होता, पण तो त्यांस साधला नव्हता. तो आतांच, म्हणजे १८६४ च्या आरंभीं, यांस साधला. कारण या वेळीं यांच्या ही गोष्ट लक्षांत आली कीं असल्या वर्गीकरणाचा मुख्य पाया म्हटला म्हणजे अमूर्त, अमूर्तमूर्त, आणि मूर्त असा शास्त्रांचा विभाग करणें होय. म्हणून यांनीं जीवशास्त्राचें लेखन कांहीं वेळ बंद ठेवून ह्या विषयावर एक सविस्तर निबंध लिहिला. तो लिहीत असतां आणखी एक महत्त्वाची गोष्ट यांस सुचली. मूर्तशास्त्रांची बरोबर मांडणी करण्याचा यत्न करीत असतां, आणि ज्योतिःशास्त्र, भूगर्भशास्त्र, जीवशास्त्र, इत्यादि शास्त्रांमध्यें जीं सत्यें दिसून येत असतात त्या सर्वांच्या अगोदरचें असें अत्यन्त व्यापक सत्य कोणतें असलें पाहिजे असा प्रश्न यांनीं आपल्यास केला असतां, यांच्या असें लक्षांत आलें कीं तें सत्य सर्व मूर्त वस्तूंच्या ठिकाणीं दिसून येणारें जें द्रव्य व गति यांचें अखंड पुनर्विभजन तत्संबंधी असलें पाहिजे. तें सत्य हें कीं, द्रव्याचें संकलन आणि समाविष्ट गतीचें उत्सर्जन

हे दोन व्यापार एकसमयावच्छेदंकरून होत असतात; आणि याच्या उलट समकालिक व्यापार म्हटले म्हणजे समाविष्ट गतीचें विवर्धन आणि द्रव्याची फांकाफांकी; पहिल्या व्यापारांपासून उत्क्रमण होतें, आणि दुसऱ्यांपासून अपक्रमण होतें. ह्यावरून यांच्या ही गोष्ट एकदम लक्षांत आली कीं, "आदितत्त्वें" या ग्रंथांत उत्क्रान्तीच्या सरणीचें विवेचन करीत असतां आपण चुकीचा क्रम स्वीकारिला आहे; कारण त्यांत यानीं असें निरूपिलें होतें कीं, विविध जातीयत्वाची वाढ ही उत्क्रान्तीची मुख्य किंवा मूल सरणी आहे, आणि संकलीभवन ही गौण किंवा द्वय्यम सरणी आहे. म्हणून यानीं लगेच असें ठरविलें कीं, जीवशास्त्रावरील ग्रंथ पुरा झाल्याबरोबर " आदितत्त्वें " या ग्रंथाची पुनः योग्य मांडणी करावयाची. **साहेब** म्हणतात, या ठिकाणींहि **काम्टे**च्या ग्रंथांपासून मला अप्रत्यक्ष फायदा झाला तो असाः—शास्त्रांच्या वाढीबद्दलचीं जीं त्याचीं मतें तीं जर मीं माहीत करून घेतलीं नसतीं; त्यावरून त्यानें केलेलें शास्त्रवर्गीकरण जर मीं त्याज्य ठरविलें नसतें; त्यावरून जर योग्य वर्गीकरण करण्याची खटपट मीं केली नसती; तर वरील कल्पना मला बहुधा सुचली नसती; आणि मग " आदितत्त्वें " या ग्रंथांत प्रतिपादिलेलें मत त्यास प्रथम दिलेल्या अपुऱ्या स्वरूपींच बहुधा राहिलें असतें.

याच सुमारास यानीं " सूर्याची घटना " या विषयावर एक निबंध लिहिला, आणि दुसरा " विद्युत् म्हणजे काय ? " या विषयावर लिहिला.

११. हें विषयान्तर झालें. आतां मूल विषयाकडे वळतां जीवशास्त्राच्या दुसऱ्या खंडामध्यें सामान्याच्या योगानें विशिष्टाचे उपपादन ठळक रीतीनें केलेलें दृष्टीस पडतें; कारण त्या खंडांत एकंदर जीवविषयक चमत्कारांचें उत्क्रान्तीच्या शब्दांनीं स्पष्टीकरण केलेलें आहे.

उदाहरणार्थ, 'जीवाकारवृद्धि' ह्या भागास वनस्पती व प्राणी ह्यांमध्यें जे चमत्कार दिसतात ते मुख्यत्वेंकरून संकलनविषयक चमत्कार आहेत असें धरून प्रारंभ केलेला आहे. उदाहरणार्थ, वनस्पतींची व जीवांची वाढ प्रथम सरलसमूहांच्या (म्हणजे सूक्ष्म पिशव्यांच्या) समुच्चयीकरणानें होत असते; शिवाय असल्या या समुच्चयांचे संयोग बनून आणखी वाढ होत असते; आणि शिवाय या संयोगांचे आणखी संयुक्त-संयोग बनून वाढ होत असते, असें दाखविलें आहे. वनस्पतिकोटीचे जे दोन अत्यंत मोठे विभाग त्यांच्या उत्पत्तीचा विचार ह्या दृष्टीनें केला आहे. ही उपपत्ति लावीत असतां एकदल आणि द्विदल यांच्या उत्पत्तीबद्दल क्लृप्ति लढविणें यांस भागच पडलें. कारण दुसऱ्या प्रकारच्या वनस्पतिसमुच्चयांच्या संकलनानें उत्पन्न झालेल्या तिसऱ्या प्रकारच्या वनस्पतिसमूहांचा उगम शोधून काढीत असतां असा प्रश्न उत्पन्न झाला कीं, वनस्पतिघटनेचे हे जे दोन भिन्न नमुने ते संकलनाच्या कोणत्या दोन सरण्यांनीं उत्पन्न झाले ? ह्याची जी ह्यानीं उपपत्ति लाविली तिजवरून असें गर्भित होतें कीं, वनस्पतीचा मधला दांडा हें मूल इंद्रिय नसून दल किंवा पर्णविषयक इंद्रिय हें मुख्य आहे.

एथें ही एक सांगण्यासारखी गोष्ट आहे कीं, बहुतेक गोष्टींच्या संबंधानें ह्यांच्या विवेचनाला लागणारी सामग्री जीवशास्त्रावरील पूर्वतर ग्रंथांत जरी यांस उपलब्ध होती, तरी कांहीं गोष्टींच्या संबंधानें नव्हती. पुष्कळ वर्षेपर्यंत यानीं केलेल्या निरीक्षणांवरून यांस असा विपुल पुरावा मिळाला होता कीं, अतिशय पोषण झालें असतां वनस्पतीचें मधलें कांडें पर्णरूपी इंद्रियांपासून उत्पन्न होऊं शकतें. असो. प्राण्यांच्या आकारविषयक वृद्धीचा विचार यानीं वरच्याच पद्धतीनें केला. उदाहरणार्थ, सूक्ष्म पिशव्या, पिशव्यांचे समुच्चय, आणि या समुच्चयांचे संयोग, ह्या उच्चतर उच्चतर प्राण्यांच्या उत्पत्तीच्या पायऱ्या आहेत अ यानीं दाखविलें. उदाहरणार्थ, " प्रोटोझोआ " किंवा सरलतम जंतू हे पहिल्या पायरीचीं उदाहरणें होत; स्पंजांतील जंतू हे दुसऱ्या पायरीवरील होत; आणि संयुक्त ' सीलेंट्रेटा ' किंवा ज्यास पोटाची नळी एवढेंच एक इंद्रिय आहे, ते तिसऱ्या पायरीवरील होत. हें विवेचन करीत असतां असा प्रश्न उद्भवला कीं, समूहांचें हें संयोगीभवन प्राणिकोटींत कोठवर चालतें ? त्यासंबंधानें असा निर्णय ठरला कीं, मणक्याचे प्राणी हे दुसऱ्या वर्गांतील समुच्चय आहेत; आणि कड्यांचे प्राणी हे तिसऱ्या वर्गांतील आहेत; कारण प्रत्येक कडें हें पूर्वीं एक स्वतंत्र प्राणीच असे. या म्हणण्यास अनुकूल व प्रतिकूल अशीं पुष्कळ कारणें आहेत; पण तें बरोबर असो वा चुकीचें असो, इंद्रियविषयक प्रगति ही एक संकलनाचा सरणी आहे असें मानण्यापासून तें उघडच निष्पन्न होतें.

" आदितत्त्वें " या ग्रंथांत निरूपिलेल्या उत्क्रमण-विषयक सामान्य क्रमास अनुसरून ह्यापुढें रचनाविषयक भेदांचा विचार आला; कारण संकलनाची वृद्धि जशी होत जाते तशी विविधजातीयत्वाचीहि होत जाते. आणि ह्या ठिकाणीं, १८५१ सालीं प्रथम काढिलेली, आणि नंतर ' इंद्रियसमता ' ह्या निबंधांत निरूपिलेली, क्लृप्ति नव्या नव्या दिशांनीं लावून दाखविण्याचा प्रसंग आला. तदनुरूप इंद्रियजालाचे निरनिराळे भाग ज्या मानानें निरनिराळ्या परिस्थितींत पडतील त्या मानानें भिन्नाभिन्नस्वरूप होतात हा जो सामान्य सिद्धान्त त्याचें दृष्टान्तीकरण ह्यानीं सर्वत्र करून दाखविलें; प्रथम वनस्पतींच्या एकंदर आकारांत, नंतर फांद्यांच्या आकारांत, नंतर फुलांच्या आकारांत, आणि अखेरीस वनस्पतिघटक सूक्ष्म पिशव्यांच्या आकारांत. त्यानंतर फुलांच्या आकारांचीहि अशीच ह्यानीं उपपत्ति लाविली; म्हणजे प्रथम प्राण्यांच्या सगळ्या देहाची, आणि नंतर त्यांच्या ज्यास्त ज्यास्त लहान भागांची. ह्या स्पष्टीकरणांत १८५८ सालीं दर्शविलेली मणक्याच्या प्राण्यांच्या सांगाड्याच्या रचनेची क्लृप्ति ह्यानीं मिसळून दिली; ती क्लृप्ति ही कीं, पाठीच्या कण्याचें जे निरनिराळे भाग आहेत ते, प्रारंभींच्या अविभागलेल्या कण्यास बाजूकडे आंदोलनें प्राप्त होऊन ज्या त्याजवर क्रिया व प्रतिक्रिया होत, त्यांपासून उत्पन्न झालेले आहेत.

१२. ' इंद्रियविषयक वृद्धि ' ह्या पुढच्या भागांतहि एकंदर सामान्य व विशिष्ट उपपत्ति उत्क्रांतिविषय-

क सामान्य नियमाच्या धोरणानें केलेली दिसून येते; आणि तोंपावेतों जीवनप्रकारवृद्धीप्रमाणें इंद्रियप्रकारवृद्धीचा ह्या दृष्टीनें कोणीं विचार केलेला नसल्यामुळें ज्यास्तच ठळक रीतीनें दिसून येते. तोंपावेतों इंद्रियविज्ञानशास्त्राचा इंद्रियाचे एकेरे व संयुक्त व्यापार ह्यांच्याशींच केवळ संबंध आहे असें समजत असत, आणि ह्या व्यापारांच्या उत्पत्तीशीं त्या शास्त्राचा संबंध येतो असें बहुतेक मुळींच समजत नसत. एवंच ह्यांना ह्या दिशेनें नवीनच उद्योग करावयाचा होता, आणि तो अर्थात् ह्यानीं "आदितत्त्वें" ह्या ग्रंथांत निरूपलेल्या कल्पनांच्याच धोरणानें केला. सामान्य प्रश्न असा होता कीं, रचनेच्या विविधजातीयत्वाबरोबर व्यापाराच्या विविधजातीयत्वाची वाढ कशी झालेली आहे? आणि ह्यास सामान्य उत्तर असें दिलेलें होतें कीं, ह्या सर्व गोष्टी आघात करणाऱ्या शक्तींच्या योगानेंच घडून आलेल्या आहेत.

उत्क्रांतिविषयक कल्पनेमुळें ह्या ठिकाणीं आणखी कांहीं नवे प्रश्न उत्पन्न झाले, आणि ते उत्पन्न झाले तशींच त्यांचीं उत्तरेंहि सुचलीं. उदाहरणार्थ, ह्यानीं असें दाखविलें कीं, प्रत्येक शरीरभाग व तो ज्या विशिष्ट परिस्थितींत असेल ती परिस्थिति ह्यांमधील दळणवळण हें इंद्रियविषयक वृद्धीचें कारण आहे. जीवशास्त्राच्या ह्या भागाच्या एकामागून एक येणाऱ्या प्रकरणांत ह्यानीं असें सिद्ध करून दाखविलें कीं इंद्रियविषयक विभिन्नीकरणांवरून ज्यास्त समस्वरूपास कमी-समस्वरूप अवश्यमेव कसें येत जातें हेंच दिसतें. शि-

वाय तेथें असें प्रतिपादन केलें होतें कीं, इंद्रियविषयक वृद्धीस पहिल्यापासून परिणामांच्या बहुलीभवनाची मदत झालेली आहे; कारण विभिन्नीकरण पावलेले भाग एकमेकांवर ज्यास्त ज्यास्त संमिश्र क्रिया व प्रतिक्रिया करूं लागतात. नंतर असा प्रश्न उभा राहिला कीं, इंद्रियविषयक श्रमविभागाबरोबर निरनिराळ्या भागांचें परस्परावलंबन जें अवश्यमेव उत्पन्न होतें तें कसें उत्पन्न होतें ? सारांश, इंद्रियविषयक विभिन्नीकरणाबरोबर इंद्रियविषयक संकलीभवन होत असतें; आणि म्हणून प्रश्न असा होता कीं, ह्या विभिन्नीकरणाबरोबर हें संकलनहि वृद्धिंगत करण्यास काय कारण होतें ? हा प्रश्न सोडवतांना ह्यानीं पुनः व्यक्तिशरीर आणि समाजशरीर ह्यांमधील सादृश्याची मदत घेतली. शेवटीं, सेंद्रिय उत्क्रमण उच्चतर होत जाईल त्या मानानें इंद्रियविषयक समतोलन जें ज्यास्त ज्यास्त पूर्णपणें स्थापन होतें तद्विषयक चमत्कारांचा ह्यानीं विचार केला.

प्रस्तुत ग्रंथांतील सामान्य विवेचनाच्या मुख्य मुख्य मुद्यांचें दिग्दर्शन एथें करण्याचा उद्देश एवढाच आहे कीं, इंद्रियविषयक वृद्धीच्या संबंधाच्या गोष्टींची सामान्य उत्क्रमणाच्या शब्दांनीं उपपत्ति लावणें ह्यांस भाग पडल्यांमुळें ह्यांच्या कल्पनांची वाढ कशी होत गेली हें लक्षांत यावें. ह्या ठिकाणींहि सामान्य सत्यें विशिष्ट सत्यांचा उलगडा करण्याच्या कामीं ह्यांस साहाय्यभूत झालीं, आणि त्यांची(विशिष्ट सत्यांची) नीट घडी बसली.

हा भाग तयार करीत असतां एक प्रश्न उभा राहिला त्यासंबंधानें एथें कांहीं सांगितलें पाहिजे. वनस्पतींमध्यें

रसाभिसरणाची उत्पत्ति कशी होते ह्या प्रश्नाचें ह्या ग्रंथांत ह्यांस विवेचन करावयाचें होतें, आणि त्यासंबंधाची फारशी माहिती उपलब्ध नव्हती. तेव्हां त्या विषयाचें एक वरवर विवेचन करावें, किंवा त्याची पुरती चव-कशी स्वतः लावावी, असा यांना दोन प्रकारचा मार्ग खुला होता. पैकीं यानीं दुसऱ्याचा स्वीकार केला. भागांचें विभिन्नकिरण त्यांवर आघात करणाऱ्या शक्तींच्या भेदामुळें उत्पन्न होतें ही जी मुख्य कल्पना तीस अनुसरून ह्यानीं असें अनुमान केलें कीं, कांहीं दिशांनीं दाबाच्या अल्पस्वल्पभेदामुळें हे प्रवाह (रसप्रवाह) प्रथम सुरू होऊन मागाहून ते स्वताच आपल्याला हळूहळू वहनमार्ग तयार करीत असतील, आणि अशा रीतीनें विभिन्नीभूत रचना उत्पन्न होण्याचा मार्ग खुला होत असेल. त्यावेळीं एतद्विषयक प्रचलित मत असें होतें कीं, रसाभिसरण लांकडांतून होत असतें; पण हें मत धारण करणारांनीं ह्या प्रश्नाचा विचार केला नव्हता कीं, ज्या वनस्पतींमध्यें लांकडी गाभाच मुळीं नसतो, किंवा ज्या कोंवळ्या वनस्पतींत तो अद्यापि उत्पन्न झाला नसतो, त्यांत हें अभिसरण कसें होतें ? ह्यासंबंधानें प्रत्यक्ष निरीक्षण करून पाहतां असें दिसून येतें कीं अशा वनस्पतींत नागमोडीसारख्या किंवा कड्यांकड्यांसारख्या वाहिन्यांतून हें अभिसरण होत असतें, आणि लांकडी गाभा उत्पन्न होत जाईल तशा ह्या वाहिन्या ह्या कार्मीं निरुपयोगी होत जातात. हें निरीक्षण करीत असतां दुसरा एक शोध असा लागला कीं, कांहीं पानांत व मुळांत रस ओढून घेणारीं

इंद्रियें असतात; हीं इंद्रियें आजपर्यंत कोणाच्या नजरेस न येण्याचें कारण असें झालें होतें कीं, पानांचे खंड त्यांनीं योग्य रीतीनें केलेले नव्हते. प्रयोगरूपी ही चवकशी ह्यांना भाग पडलें म्हणूनच यानीं केली होती, आणि हे म्हणतात, अशा प्रकारची चवकशी दुसऱ्या एकाद्या गोष्टीच्या संबंधानें केल्याचें मला स्मरत नाहीं.

"(जीव) संख्याविवर्धनाचे नियम" हा जो जीवशास्त्राचा शेवटचा भाग त्याच्याविषयीं एथें फारसें सांगण्याचें कारण नाहीं. त्या विषयावर १८५२ सालीं ह्यानीं जो निबंध लिहिला होता त्यांत त्याचें वरेंच सविस्तर विवेचन केलें होतें. त्याचीच सुधारणा करून ह्यानीं हा सहावा भाग तयार केला होता.

१३. **साहेब** म्हणतातः—लहान कारणांपासून मोठालीं कार्यें कशीं घडून येतात हें पाहून मला वरचेवर आश्चर्य वाटतें. माझ्या तत्त्वमीमांसासरणीचा आणि त्याच्या प्रत्येक भागाचा प्रथम नकाशा रेखाटीत असतां मला असें सुचलें कीं उत्क्रान्तिमतास अनुसरून त्या त्या शास्त्राच्या तर्कमूलक उपपत्त्या लावण्यापूर्वी केवळ अनुभवमूलक अनुमानानें जीं सत्यें प्राप्त झालीं असतील किंवा होण्यासारखीं असतील त्यांचें निरूपण करणें जरूर आहे. आणि नंतर मला असें सुचलें कीं, ह्या अनुभवमूलक अनुमानांचें कथन करण्यापूर्वी प्रत्येक अनुमानाच्या संबंधानें आधारस्तंभ दाखविले पाहिजेत. पुढील ग्रंथाची जी मीं रचना केली ती वऱ्याच अंशीं ह्याच कल्पनेच्या आधारावर केली. म्हणून प्रत्येक शास्त्राच्या पहिल्या व दुसऱ्या भागांत आधारस्तंभ आणि

अनुमानें ह्यांचें निरूपण केलेलें आहे, आणि पुढील भागांत उत्क्रान्तिदृष्ट्या लाविलेल्या उपपत्तींची इमारत या पायावर रचलेली आहे.

ही जी पद्धति ह्यानीं स्वीकारिली तिचा परिणाम असा झाला कीं ज्या कांहीं प्रचलित व कांहीं नवीन अशा सत्यांकडे ह्यांचें एरवीं लक्ष गेलें नसतें तिकडे यामुळें गेलें. विशेषेंकरून मानसशास्त्रावरील ह्यांच्या अगोदर लिहिलेल्या ग्रंथास जें विस्तीर्ण स्वरूप आलें तें ह्यामुळेंच आलें. कारण त्या शास्त्रासंबंधानें ह्यानीं आतां आपल्यास असा प्रश्न केला कीं त्याचे आधारस्तंभ काय आहेत? अनुभवजन्यसिद्धान्त काय आहेत? आणि ह्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याच्या कामीं लागल्यापासून कांहीं महत्त्वाचे परिणाम घडून आले.

मानसशास्त्राचे आधारस्तंभ जीवशास्त्रानें पुरवावयाचे होते. जीवशास्त्राच्या दृष्टीनें ह्या प्रश्नाकडे पाहण्यास सुरवात करून ज्ञानतंतुजाल हें गतीचें उत्पादक आहे असें मानणें, आणि गतीचा संचय व विविधजातीयत्व ह्यांच्या संबंधानें त्याच्या वाढीचा पत्ता लावणें, जरूर होतें. तद्वतच, सर्व प्रकारच्या ज्ञानतंतुजालांस जीं रचनाविषयक सत्यें लागू पडतात त्यांस सूत्ररूप देणें जरूर होतें. म्हणून ज्यांच्यांत एक अंतर्वाहक ज्ञानतंतु आहे, एक मधली गांठ आहे, आणि एक बाह्यवाहक तंतु आहे, अशा अगदीं साध्या रचनेपासून सुरवात करून ह्यानीं असें प्रतिपादन केलें कीं, ज्ञानतंतुजाल जें बनलेलें असतें तें अशा ह्या एकेक गुच्छाचें बनलेलें असतें; आणि तें जसें ज्यास्त ज्यास्त पक्व असेल,

तसा ह्या साध्यां गुच्छांतून एकेक ज्ञानतंतु उच्चतर व कमीं साध्या किंवा ज्यास्त संमिश्र गुच्छाप्रत जाऊन त्यास जोडलेला असतो. सारांश, ह्यांच्या म्हणण्याचा भाव असा होता कीं अत्यन्त निरनिराळ्या प्रकारचीं जीं ज्ञानतंतुजालें बनतात तीं हे साधे गुच्छ संयुक्त व पुनःसंयुक्त होऊन बनत असतात.

ह्या शास्त्राचा हा एक आधारस्तंभ झाला. आतां इतर आधारस्तंभांचा एथें उल्लेख न करतां अनुभवजन्य-सिद्धान्तांकडे एकदम निघून गेल्यास पहिला सिद्धान्त जो सांगावयाचा तो मनाच्या घटकद्रव्याविषयीं होय. ह्या द्रव्याच्या आन्तिम स्वरूपाबद्दल आपणांस कांहींच समजणें शक्य नाहीं असें दाखविल्यानंतर ह्यानीं असें प्रतिपादिलें कीं त्याच्या जवळच्या स्वरूपाबद्दल आपल्यास कांहीं तरी समजण्यासारखें आहे. ध्वनीच्या इंद्रियाघाताचें जें आपलें ज्ञान, जें जलद पुनःपुनः बसणाऱ्या ज्ञानतंतुविषयक ठोक्यांचें बनलेलें असतें, तेथून सुरवात करून, त्यावरून अशी कल्पना पुढें आणिली कीं सर्व प्रकारचे इंद्रियाघात, आणि गर्भितरीत्या सर्व प्रकारचे उच्चतर मनोविकार, ज्यांचीं आन्तिम स्वरूपें एकच आहेत अशा सूक्ष्म ज्ञानतंतुविषयक ठोक्यांचें अनेक विविध रीतींनीं संयोगीभवन व पुनःसंयोगीभवन होऊन बनलेले असतात. एवंच कदाचित् मनाचें कांहीं अन्तिम मूल घटक आहे, आणि तें द्रव्याच्या कांहीं आन्तिम मूल--घटकाप्रमाणें ज्यास्त ज्यास्त संमिश्रसमूह व समूहसंयोग बनवून अनेक प्रकारच्या ज्ञानवत्ता उत्पन्न करण्यास समर्थ आहे; जसें द्र-

व्याचें कल्पिलेलें आन्तिम मूलघटक संयोगीभवन पावण्याच्या अनन्त मार्गांनीं व प्रमाणांनीं आपल्यास ज्ञात असलेले अनेक पदार्थ उत्पन्न करीत असतें. एवंच उत्क्रान्तीचें सामान्य मत, वरील क्लृप्ति बरोबर असल्यास, ह्या विषयाच्या संबंधानेंहि उदाहृत होतें, कारण एथें कल्पिलेल्या सरणीमध्यें वाढतें संकलन व वाढतें विविधजातीयत्व हीं अंतर्भूत होतातच.

ह्यापुढें विवेचन करण्याचा प्रश्न हा होताः—आमच्या मानसिक अवस्थांच्या संबंधानें अशीं सामान्य सत्यें काय आहेत कीं जीं अंतर्निरीक्षणरूपी अनुभवावर बसवलेल्या सिद्धान्तांच्या रूपानें सांगतां येतात, आणि ज्यांत त्यांच्या उत्पत्तीच्या संबंधानें कांहींच क्लृप्ति अंतर्भूत नसते ? मानसशास्त्रावरील तत्पूर्वींच्या लेखकांनीं मनाच्या बहुतेकांशीं रचनाविषयक विशेषांचा विचार न करतां व्यापारविषयक विशेषांचाच केला होता. उदाहरणार्थ, एक्वायनास यानें मनोव्यापारांचे स्मरण, विचार आणि सदसद्विवेक असे जे समूह केले आहेत, रीडनें स्मरण, अंतर्ग्रहण, न्याय व विचार असे जे केले आहेत, आणि डुगल्ड स्टुअर्टनें अवधान, अंतर्ग्रहण, विवेकीकरण, स्मरण, कल्पना,विचार, असे जे समूह केले आहेत, त्यांवरून हें दिसून येतें. ह्या निरनिराळ्या विभागांवरून मुख्यत्वेंकरून मानसिक क्रियेचे प्रकार व प्रमाणें दिसून येतात. ह्यांना असें वाटलें कीं, ह्यासंबंधानें पहिली गोष्ट करावयाची म्हणजे मानसिक अवस्थांचा एकंदर संचय ध्यानांत आणावयाचा, आणि नंतर त्यांचे विशेष व वर्तनें ह्यांवरून त्यांचे निरनिराळे

समूह बनवावयाचे. त्याप्रमाणें परीक्षण करतां असें सिद्ध झालें कीं, ज्ञानवृत्तेमध्यें ठळक रचनाभेद आहेत, आणि त्यांचा ज्ञानतंतुजालामधील जे रचनाभेद त्यांच्याशीं संबंध आहे. अत्यन्त व्यापक वर्गीकरण म्हटलें म्हणजे मनोविकार आणि मनोविकारांमधील संबंध हें होय; पैकीं मनोविकार ह्या मानसिक अवस्था असून त्या ध्यानांत येईल इतका वेळपर्यंत टिकत असतात, आणि त्यांच्यामधील संबंध हे केवळ क्षणभर टिकणारे असतात; त्यावरून ह्यानीं असें अनुमान काढिलें कीं, मनोविकारांचा निकट संबंध ज्ञानतंतूंत होणाऱ्या फेरबदलांशीं असून, संबंधांचा ज्ञानतंतूंच्या तातोळ्यामधून जे जोराचे प्रवाह होतात त्यांच्याशीं असतो. परीक्षणावरून आणखी असें सिद्ध झालें कीं मनोविकारांचा पहिला अत्यन्त व्यापक विभाग असा पडतो कीं, मध्यबिंदूपासून निघणारे मनोविकार किंवा मनाच्या उकळ्या, आणि बाहेरून निघणारे मनोविकार किंवा इंद्रियाघात. बाहेरून निघणाऱ्या मनोविकारांचा अत्यन्त व्यापक विभाग म्हटला म्हणजे हा कीं, पृष्ठभागावर उत्पन्न झालेले आणि आंतल्या भागावर उत्पन्न झालेले; आणि दुसरी अशी एक गोष्ट तेथें अर्थात् नमूद केली होती कीं, ह्या सर्व प्रकारच्या मनोविकारांचीं स्पष्ट किंवा मूळचीं स्वरूपें आणि अस्पष्ट किंवा पुनः जागृत झालेलीं स्वरूपें असतात. मनोविकारांच्या ह्या समूहांमध्यें निश्चितपणाच्या संबंधानें पुष्कळ वैविध्य आहे; म्हणजे ते एकमेकांपासून स्पष्टपणें भिन्न दिसण्याचीं प्रमाणें अनेक आहेत. उदाहरणार्थ, उच्चतम ज्ञानेंद्रियांपासून उ-

त्पन्न झालेले मनोविकार एकमेकांपासून अत्यन्त स्पष्ट-रीत्या मर्यादित झालेले किंवा विभागलेले दिसतात;आणि ज्या मानानें ते आंतून आंतून उत्पन्न होत जातील, त्या मानानें ते अस्पष्ट किंवा अंधक होत जातात; म्हणजे, एकमेकांपासून स्पष्टपणें विभागलेले दिसत नाहींत. आणखी यांच्या ध्यानांत असें आलें कीं मनोविकार परस्परांपासून विभागलेले किंवा परस्परांनीं मर्यादित झालेले दिसण्याचा तिखटपणा त्यांच्या सुसंगत असण्याच्या सामर्थ्याशीं म्हणजे दुसऱ्याशीं सहचारी होण्याच्या तत्परतेशीं संबद्ध असतो; कारण जेथें परस्पर मर्यादितपणा अंधक असेल तेथें असुसंगतता दृष्टीस पडते. आणखी एक सिद्धान्त असा ठरला कीं, जे मनोविकार इतरांनीं स्पष्टपणें मर्यादित असतील, आणि म्हणून जे झटकन् सुसंगत बनतात, ते ज्ञानवर्त्तेंतहि झटकन् आणतां येतात. पण आंतून उत्पन्न होणाऱ्या मनोविकारांसारखे जे ह्याहून खालच्या दर्जाचे असतील त्यांस पुनः ज्ञानवर्त्तेंत आणण्यास किंवा जागृत करण्यास अडचण पडते; आणि म्हणून बौद्धिकव्यापारांत त्यांचें अंग बेतांचेंच असतें. आणखी एक गोष्ट यांच्या ध्यानांत अशी आली कीं, ह्या ज्या गोष्टी मनोविकारांच्या संबंधानें खऱ्या आहेत त्या त्यांच्यांतील संबंधांच्या संबंधानेंहि खऱ्या आहेत. सारांश, इतर विषयाप्रमाणें ह्या विषयाच्या संबंधानेंहि असें आढळून आलें कीं, ज्ञानतंतुविषयक घटनेप्रमाणें मानसिक घटनेचींहि प्रगति उत्क्रान्तीच्या भाषेनें व्यक्त करून दाखवतां येण्यासारखी आहे. कारण निश्चितत्व, सुसंबद्धता,

आणि जागृतिक्षमता ह्यांनीं विशिष्ट अशा मानसिक अवस्थांच्या उच्चतर प्रकारांकडे जसें जावें तशी आपणास संकलन आणि विविधजातीयत्व ह्यांमध्येंहि प्रगति झालेली दृष्टीस पडते.

" सामान्य संघटना " आणि " विशिष्ट संघटना " ह्या भागांच्या संबंधानें एथें फारसें सांगण्याची जरूरी नाहीं; कारण पहिल्या आवृत्तींतील ह्या भागांत, व प्रस्तुतच्या आवृत्तींतील भागांत फारसा फरक केलेला नाहीं. त्यांच्या संबंधानें एक मात्र महत्त्वाची गोष्ट एथें सांगण्यासारखी आहे. ती ही कीं, पहिल्या आवृत्तीच्या वेळीं डार्विनचें " उपजातींचा उगम " हें पुस्तक प्रसिद्ध झालेलें नसल्यामुळें शारीरिक उत्क्रमणाप्रमाणें मानसिक उत्क्रमणाचेंहि एकच कारण ह्यानीं ध्यानांत घेतलेलें होतें, आणि तें इंद्रियव्यापारामुळें उत्पन्न झालेले फेरबदल वंशपरंपरेनें संक्रान्त होणें हें होय; पण वरील पुस्तक आतां प्रसिद्ध झालेलें असल्यामुळें, आणि " सृष्टीची निवड " किंवा " योग्यतमाचा तगाव " हें डार्विननें दाखविलेलें शारीरीक व मानसिक उत्क्रमणाचें कारण यांस मान्य झालेलें असल्यामुळें यानीं त्या अर्थाची टीप योग्य स्थळीं या आवृत्तींत दिली. या संबंधानें यांचें मत असें होतें कीं, मानसिक वाढीच्या एकंदर उच्चतर पायऱ्यांवर संवयीचा परिणाम हें सर्वांत बलवत्तर कारण असून, अत्यन्त हलक्या दर्जाच्या उपजतबुद्धी उत्पन्न होण्याचें एकटेंच नसलें तरी मुख्य कारण 'नैसर्गिक निवड' हें आहे. पण डार्विनचे ग्रंथप्रकाशनामुळें ह्या ह्यांच्या मतांत झाले " बदलामुळें

ह्या दोन भागांतील एकंदर विवेचनसरणीस फारसा धक्का बसलेला नाहीं.

पहिल्या आवृत्तींतून पांचवा भाग गाळलेला होता हें पूर्वी सांगितलेलेंच आहे. तो ह्या नव्या आवृत्तींत ह्यानीं घातला. त्यांत अशी कल्पना सांगून विस्तृत केलेली आहे कीं, ज्ञानतंतुजालांच्या रचनांची जी उपपत्ति लावावयाची ती, गति अल्पतमविरोधाच्या रेषेनें होते ह्या सामान्य नियमास अनुसरून होते, अशा धोरणावर लावावयाची. ही कल्पना ह्यांच्या डोक्यांत संघटनात्मक मीमांसेचा नकाशा रेखाटण्याच्या अगोदर कांहीं काळ आलेली होती. असो. ह्या कल्पनेस अनुसरून ज्ञानतंतूंच्या जनितीचें ह्या भागाच्या पहिल्या प्रकरणांत ह्यानीं विवेचन केलेलें आहे; आणि पुढील प्रकरणांतून त्याच धोरणावर सरल व संयुक्त ज्ञानतंतुजालाचें निरूपण केलेलें आहे.

ह्या शास्त्राच्या सहाव्या व सातव्या भागांत आलेल्या कल्पनांच्या संबंधानें एथें फारसें सांगण्यासारखें नाहीं. पैकीं सहावा जुन्या आवृत्तींतीलच बहुतेक आहे तसा घेतलेला आहे, आणि सातवा जरी बराच वाढविलेला आहे तरी त्याच्यांत पहिल्या आवृत्तींतील पहिल्या भागांत निरूपिलेल्या विचारसरणीचें विस्तृत स्वरूप आहे, आणि त्या भागांत नसलेल्या पुष्कळ नवीन कल्पना जरी ह्याच्यांत आहेत तरी त्यांचें विशेष कथन एथें करण्याचें प्रयोजन नाहीं.

" जन्यसिद्धान्त " ह्या नवव्या भागांत ह्यांच्या विचारवृद्धीची जी (कोणत्याहि विचाराचें प्रथम बीज उ-

त्पन्न होऊन मग त्याची हळूहळू वाढ होणें ही) सामान्यसरणी तींस अपवाद दृष्टीस पडतो. कारण ह्या ठिकाणीं उत्पन्न झालेल्या प्रश्नांस ह्यांस तावडतोब उत्तर द्यावयाचें होतें. सामान्य मानसशास्त्राचा विचार केल्यानंतर समाजशास्त्रासाठीं पूर्व तयारी म्हणून मानवी मानसवृद्धीचा विचार करणें ह्यांस भाग पडलें. सहचारी स्थितींत राहण्याची पात्रता येण्यास माणसाच्या अंगीं कांहीं मानसिक विशेष असावे लागतात, आणि म्हणून एथें असा प्रश्न उभा राहिला कीं, हे विशेष कांय आहेत ? आणि त्यांची उत्क्रान्ति कशी झाली आहे ? एतद्विषयक कल्पनांपैकीं एकीचें कथन एथें करूं. सामाजिक सहक्रिया उत्पन्न होण्यापूर्वीं, कळप करून राहणाऱ्या प्राण्यांमध्यें दिसते तसली कमज्यास्त प्रमाणानें एकमेकांच्या सन्निध राहण्याची आवड माणसामध्यें उत्पन्न झाली पाहिजे. आणि त्याच प्राण्यांप्रमाणें, पण फार ज्यास्त प्रमाणावर, त्याच्यामध्येंहि सहानुभूतीचा गुण, म्हणजे इतरांमध्यें व्यक्त होणारे मनोविकार आपल्याठिकाणीं उत्पन्न करण्याचा गुण, वृद्धिंगत झाला पाहिजे. म्हणून एथें यानीं असें दाखविलें कीं अशा प्रकारचा मनोवृत्तिविषयक स्वभाव बनणें हा मानसिक उत्क्रान्तीच्या 'सामान्यसरणीचाच एक भाग आहे. समाजांत राहिल्यानें मिळणारें जें शिक्षण, त्यास लहान प्रमाणावर सुरवात होऊन, त्याच्या योगानेंच हळूहळू सामाजिक सहक्रिया करण्याचें सामर्थ्य माणसामध्यें वृद्धिंगत झालें. सारांश, इतरत्रप्रमाणें एथेंहि हळूहळू उत्क्रमण झालें आहे!

१४. " समाजशास्त्राचीं तत्त्वें " ह्या ग्रंथांत ह्यां-

च्या कल्पनांची जी वाढ दृष्टीस पडते ती समजण्यास "मानसशास्त्राचीं तत्त्वें" हा ग्रंथ लिहिला जात असतां ज्या कांहीं गोष्टी घडल्या त्या ध्यानांत घेतल्या पाहिजेत. समाजशास्त्रावर ग्रंथ तयार करणें केवढें जोखमीचें काम होईल, त्यासाठीं किती सामग्री तयार करावी लागेल, आणि ती सगळी स्वतः गोळा करणें किती अशक्य आहे, हें ध्यानांत आणून १८६७ सालींच त्या कामीं मदत मिळविण्याचें ह्यानीं ठरविलें होतें. कारण ह्यांना त्या ग्रंथासाठीं रानटी समाजांपासून तों सुधारलेल्या समाजांत, समाजांच्या मुख्य मुख्य नमुन्याचें अध्ययन करावयाचें होतें, आणि त्या कामीं ह्यांस प्रत्येक प्रकारच्या समाजाची व्यापक माहिती पाहिजे होती. म्हणून ह्यांस आपल्या देखरेखीखालीं ही माहिती गोळा करण्यासाठीं एक-दोन मदतनीस नेमणें जरूर पडलें. ती माहिती व्यवस्थित रीतीनें गोळा करण्यासाठीं ह्यानीं पहिली खबरदारी अशी घेतली कीं, सामाजिक चमत्कारांचा पहिला विभाग रचनाविषयक चमत्कार व आणि व्यापारविषयक चमत्कार असा करावयाचा, आणि त्यांपैकीं प्रत्येकामध्यें नियामक आणि क्रियावान् असे पोटविभाग करावयाचे. अशी व्यवस्था केल्यामुळें समाजांमध्यें दिसणाऱ्या ज्या विविधजातीय गोष्टी, त्यांस सहज लक्षांत येण्यासारखें स्वरूप आलें, आणि त्यांची परस्परांशीं तुलना करून त्यांवरून व्यापक सिद्धांत काढणें सुलभ झालें. अनुमिति करण्यास अशा रीतीनें सुलभ झाल्यामुळें ह्यांच्या मतांत थोडेफार बदल होऊन गेले.

१५. 'समाजशास्त्राचें अध्ययन' हा जो यांचा ग्रंथ तो "संघटनात्मक मीमांसेचा" भाग म्हणून मुळींच नव्हता. पण सुदैवानें "समाजशास्त्राचीं तत्त्वें" ह्या ग्रंथारा प्रारंभ करण्यापूर्वी तो लिहिला गेला; कारण तेणें-करून तीं तत्त्वें समजण्यास जशी लोकांची तयारी झाली, तसा ह्यांच्या मनालाहि चांगला संस्कार मिळा-ला. त्या वेळचे सुशिक्षित (इंग्लिश) लोक, आणि त्यांचे कार्लाइल, फ्रूड, किंग्स्ले, इत्यादि नेते ह्यांस ह्या विषयाची मुळींच माहिती हा वेळपर्यंत नव्हती. "इतिहासशास्त्र" म्हणून असणें अशक्यच आहे असें ते म्हणत; आणि राजांच्या किंवा मुत्सद्यांच्या स्वप्नींहि नसलेलें, आणि इतिहासकारांच्या ध्यानांत न आलेलें, असें सामाजिक रचनांचें उत्क्रमण चाललेलें आहे ह्याबद्दल त्यांस मुळीं-च कल्पना नव्हती. म्हणून "सामाजिकशास्त्र आहे काय?" आणि "सामाजिकशास्त्राचें स्वरूप" ह्या दोन प्रकरणांत ह्यानीं असें स्पष्ट करून दाखविलें कीं, माणसाचा जीवनवृत्तांत आणि त्याच्या देहाची रचना ह्या दोहोंमध्यें जसला भेद आहे, तसलाच इतिहास व समाजशास्त्र ह्या दोहोंमध्यें आहे.

ह्या ठिकाणीं, फार वर्षांपूर्वी ह्यांच्या मनांत रुजत घातलेल्या बीजापासून सारखी स्वाभाविक वाढ झाल्या-बद्दलचा आणखी एक पुरावा दृष्टोत्पत्तीस आला. 'स-माजस्थिति' ह्या ग्रंथांत समाजदेह व व्यक्तिदेह ह्यांम-ध्यें जी तुलना केलेली होती ती करतांना दोहोंमध्यें दि-सणारें भागांचें परस्परावलंबन, आणि अगदीं स्वतंत्र स्थि-तीपासून बऱ्याच परतंत्र स्थितीप्रत प्रगमन, ह्या दोन गोष्टी

दाखविलेल्या होत्या, पण भागांचे निरानिराळे वर्ग किंवा त्यांच्या व्यापारांचे निरानिराळे वर्ग ह्यांमध्यें कांहीं मुळापासून भेद असल्याचें त्या वेळीं ह्यांच्या लक्षांत आलेलें दिसत नव्हतें. पण त्यानंतर दहा वर्षांनीं "सामाजिक इंद्रियजाल" म्हणून जो निबंध यानीं प्रसिद्ध केला त्यांत ह्या होन्ही देहांतील खर्चिक इंद्रियांमध्यें आणि दोहोंतील पोषक इंद्रियांमध्यें एकप्रकारचें साम्य यानीं दर्शविलें. त्यानंतर ही कल्पना ह्यांच्याठिकाणीं ज्यास्त निश्चित झाली होती. १८७१ च्या दिजंबरांत प्रसिद्ध केलेल्या "विशिष्टीकृत शासन" नामक निबंधांत ह्यानीं असें दाखविलें कीं, युद्धशील रचना आणि उद्यमशील रचना ह्या अनुक्रमें खर्चिक व पोषक रचना ह्या दृष्टीनें परस्परांपासून ज्यास्त ज्यास्त विभिन्नीकृत दिसत असून, त्यांना योग्य असे जे शासनाचे भिन्नभिन्न प्रकार त्यांवरूनहि तीं तशींच दिसतात. कारण पहिल्या संस्था फलदायक संयुक्त क्रिया उत्पन्न करण्यास जरूर अशा स्वेच्छाचारी एकतंत्री शासनाखालीं असून, दुसऱ्या संस्थांचें नियमन सहक्रिया करणाऱ्या भागांचें जें एकमेकांवरील वजन त्यानेंच होत असतें, आणि त्यांच्या व्यापारांच्या संबंधानें त्यांच्यावर एकतंत्री अधिकाऱ्यांचें दडपण नसतें. याशिवाय तेथें यानीं आणखी असें दाखविलें होतें कीं, उच्च प्रकारच्या व्यक्तिदेहांमध्यें मेंदूविषयक ज्ञानतंतुजाल आणि पोटांतील इंद्रियांसंबंधाचें ज्ञानतंतुजाल ह्यांमध्यें जो फरक दिसतो तो वरच्यासारखाच आहे. आणि पूर्वीपेक्षांहि ह्या ठिकाणीं दुसऱ्या एका अशा सत्यावर जोर दिला होता कीं, पहिल्यापासून

एकतंत्री शासनरचनांच्या वाढीचें कारण लढाई हें झालेलें असून लोकांचा लढाई हाच उद्योग ज्या मानानें प्रधान असेल त्या मानानें त्या संस्था जुलमी होत असतात. आणि लढाई जशी कमी वारंवार होऊं लागेल तसें पोषकसंस्थांमध्यें दिसणारी जी अनेकस्थित सहक्रिया ती जास्त जास्त ठळक होत जाते. ह्यावरून ह्यानीं असा एक सिद्धान्त बसविला कीं, समाजनमुन्यांचे जे निरनिराळे वर्ग पडतात ते मुख्यत्वेंकरून युद्धशील रचना आणि उद्यमशील रचना यांच्यामध्यें त्यांच्यांत जें प्रमाण असेल त्यावरून पडत असतात, आणि त्यांची ज्या मानानें वृद्धि किंवा क्षीणता होत जाईल त्या मानानें त्यांच्यांत (समाजांत) रूपांतर होत जातें.

१८७० सालीं " प्राणिपूजेचा उद्गम " म्हणून जो एक निबंध यानीं प्रसिद्ध केला त्यासहि एथें उल्लेख केला पाहिजे, कारण त्यामध्यें अंतर्भूत झालेल्या एका कल्पनेस " समाजशास्त्राचीं तत्त्वें " ह्या ग्रंथांत बरेंच विस्तृत स्वरूप यावयाचं होतें. त्या शास्त्राचा पहिला खंड यानीं १८७४ च्या जूनमध्यें काढिला. वरील निबंधाच्या तिसऱ्या प्याऱ्यांत यानीं असें म्हटलें होतें कीं, सर्व धर्मांचें मूल व स्थूल स्वरूप म्हटलें म्हणजे मृतपूर्वजांचें संतर्पण हें होय, जे पूर्वज अद्यापि अस्तित्वांत असल्याची, आणि असल्या वंशजांचें बरेंवाईट करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं असल्याची, कल्पना असते; आणखी त्यांत यानीं असें म्हटलें होतें कीं, समाजशास्त्राची तयारी करण्याकरितां सरलतर

मानवी समाजांतून चालू असलेल्या विचारसरण्यांचें मी विशेष लक्षपूर्वक अवलोकन करीत आहें.

१६. कोणताहि विषय जितका ज्यास्त संकीर्ण होत जाईल तितकीं त्याचीं कारणेंहि ज्यास्त संकीर्ण झालेलीं आहेत म्हणून समजावें; आणि कोणत्याहि गोष्टीचीं जितकीं ज्यास्त कारणें ध्यानांत येत जातील तितकें पूर्वीं ध्यानांत आणिलेलीं कारणें किती अपुरीं होतीं, हेंहि लक्षांत यावयास लागतें. समाजशास्त्रावरील ग्रंथांत अंतर्भूत झालेल्या कल्पनांचा इतिहास पाहतां ही गोष्ट स्पष्ट होते. हा ग्रंथ लिहितांना ह्यांच्या मतांत जे फेरबदल झाले ते " वर्णनात्मक समाजशास्त्र " या यांच्या ग्रंथामधील पुराव्यावरून व इतर कारणांवरून झाले. हा ग्रंथ लिहितांना अनुभवजन्यसिद्धान्तांचेंच महत्त्व अर्थात् सर्वांत ज्यास्त होतें.

' समाजस्थिति ' या ग्रंथांतच, संस्थांचा योग्यायोग्यपणा माणसांच्या शीलांवर अवलंबून असतो हें सत्य यांच्या ध्यानांत आल्याचा पुरावा आढळत होता. तो ' समाजशास्त्राचें अध्ययन ' या ग्रंथांत ज्यास्तच ठळकपणें आढळून आला. ह्यांना जबरीचा तिटकारा स्वभावतःच असल्यामुळें लहानपणीं ह्यांचा समज असा झालेला होता कीं, शासनसंस्था स्वतंत्र असल्या तर कोणत्याहि समाजाचें त्यापासून कल्याणच होईल. तद्वतच गुलामगिरीची ह्यांना अत्यन्त किळस असल्यामुळें तिच्या संबंधानेंहि ह्यांचा समज असा होता कीं, तिच्यापासून पहिल्यापासून सर्वांशीं अहितच झालेलें आहे. धर्मसंस्थांचा अधिकारहि यांस अगदीं नको होता; आणि

म्हणूनच धर्मभोळ्या समजुतींच्या संबंधानेंहि यांचा असा समज झालेला होता कीं, ह्या समजुती जशा चुकीच्या आहेत तशा घातकहि आहेत. पण वर्णनात्मक समाजशास्त्रांत या व असल्या गोष्टींच्या संबंधानें जो पुरावा यांच्या नजरेस आला त्यावरून हे व असले यांचे इतर समज अगदीं नष्ट झाले किंवा पार बदलून गेले. म्हणून समाजशास्त्रावरील ग्रंथांतील यांच्या पुष्कळ कल्पना जुन्या कल्पनांपासून उत्पन्न झालेल्या नसून अगदीं नव्यानें बनलेल्या होत्या; कारण त्यांपैकीं कांहीं जुन्यापासून स्वतंत्र असून कांहीं विरुद्ध होत्या.

प्रथम कोणत्याहि शास्त्राचे आधारस्तंभ आणि अनुभवजन्यसिद्धान्त द्यावयाचे हा जो क्रम यानीं जीवशास्त्र व मानसशास्त्र या ग्रंथांत स्वीकारिलेला होता तोच यानीं ह्याहि ग्रंथांत स्वीकारिल्यामुळें वर सांगितलेल्या फेरबदलांपैकीं कांहीं बऱ्याच अंशीं होऊन गेले होते. उदाहरणार्थ, माणसामध्यें सामाजिक सहक्रिया उत्पन्न होण्यास जे स्वभावविशेष असावे लागतात त्यांजकडे जें यांचें लक्ष गेलें तें हे आधारस्तंभ हुडकण्यामुळेंच गेलें. मृतांच्या दुय्यमांवर जो सर्वत्र विश्वास दृष्टीस पडतो त्याच्याशीं प्रत्येक धर्मभोळ्या समजुतीचा संबंध आहे हें पुष्कळ प्रकरणांत ह्यानीं स्पष्ट करून दाखविलें; आणि त्यावरून असेंहि स्पष्ट झालें कीं सर्व धार्मिक विधींचा उगम भुतांचें संतर्पण करण्याचे किंवा त्यांस संतुष्ट करण्याचे प्रयत्न करणें ह्यांत आहे. ज्या अनेक प्रकारच्या पुराव्यांवरून ही गोष्ट दिसून आली त्यावरून दुसरें असेंहि दिसून आलें कीं मृत शास्त्या-

ची सत्ता कायम राहते किंवा कदाचित् वाढतेच असा जो माणंसाचा समज होतो त्यामुळें जिवंत शास्त्याच्या सत्तेस दुजोरा येतो. ह्याचा परिणाम असा होतो कीं जे सामाजिक संयोग प्राथमिक माणसांत एरवीं कायम राहिले नसते ते कायम राहण्यास मदत होते. हीहि अत्यन्त महत्त्वाची कल्पना ह्यांस आतां नवीनच प्राप्त झाली, आणि जुन्यांपासून उत्पन्न झाली नाहीं. तद्वतच राजकी आणि गुलामगिरी ह्या संस्था सामाजिक उत्क्रमणाच्या क्रमांत सहजगत्याच उत्पन्न होत असून समाजांस उच्चतर अवस्था प्राप्त होण्यास ह्या पायऱ्यांवरून ते गेलेच पाहिजेत असा जो दृढ समज यांच्या मनामध्यें सबळ पुराव्याच्या जोरावर उत्पन्न झाला तोहि अगदीं नवीनच होता. तद्वतच लढाई ही जरी कोठेंहि आणि केव्हांहि अगदीं द्वेष्य आहे तरी ती सुधारणेस कारणीभूत झालेली आहे ही गोष्ट यांस नाखुषीनें कबूल करणें भाग पडलें. कारण लढाईच्या योगानें समूहांचें संकलन होतें, म्हणजे साध्यांचे संयुक्तसमाज बनतात, आणि संयुक्तांचे पुनःसंयुक्त, आणि पुनःपुनःसंयुक्त असे समाज बनतात, आणि अशा रीतीनें मोठालीं राष्ट्रें बनतात. एवंच एकंदर सेंद्रिय जगामध्यें जिचे दांत व नखें रक्तानें लाल झालीं आहेत अशा सृष्टीच्या निर्घृणशिक्षणानें उत्क्रमण जसें शक्य झालेलें आहे, तद्वतच सामाजिक जगामध्यें समाज एकत्र संकलित होण्यास, आणि सामाजिक घटना पक्क होण्यास सामान्यतः असलेंच निर्घृणशिक्षण कारणीभूत झालेलें आहे. एवंच योग्यतमांचा टिकाव आजपर्यंत जरी लढाईच्या साधनांनीं

झालेला आहे तरी आतां सामाजिक उत्क्रमण अशा पायरीवर येत आहे कीं पुढें तो टिकाव शांतीच्या साधनांनीं होऊन जाईल असें मानण्यास हरकत नाहीं.

आतां समाजशास्त्राचे जे निरनिराळे भाग त्यांत येणाऱ्या विशिष्ट कल्पनांचा विचार करूं.

" समाजशास्त्राचे अनुभवजन्यसिद्धान्त " या ग्रंथांत समाजरूपी देह आणि व्यक्तिदेह ह्यांमधील साम्य सविस्तररीतीनें दाखविलेलें आहे; आणि प्रधानकल्पनेस दुजोरा देण्यासाठीं अनेक गौण कल्पना पुढें आणिल्या आहेत. पूर्वीप्रमाणें ह्या ठिकाणीं ह्या तुलनेला निर्विवाद आधार असा दाखविला होता कीं त्या दोहोंमध्यें त्यांच्या भागांची सहक्रिया असून त्यांमध्यें परस्परावलंबित्वहि असतें; आणि ह्यांच्याच योगानें सगळ्या देहाचें किंवा समाजाचें जीवित बनलेलें असतें आणि कायम राहतें. हीच कल्पना वृद्धिंगत होऊन तिच्या संबंधानें अशी एक गोष्ट यांच्या ध्यानांत आली कीं, व्यक्तिशरीरांमध्यें ज्या भागांची सहक्रिया होत असते त्यांचा एकमेकांशीं निकट किंवा प्रत्यक्ष संबंध असून, समाजशरीरांच्या भागांचा कमज्यास्त दूरवरचा किंवा अप्रत्यक्ष असतो. याबरोबर असेंहि त्यांत दाखविलें आहे कीं सजीव शरीरांत सहक्रिया शरीरघटकद्रव्यांतून पसरणाऱ्या अणुविषयक लाटांच्या द्वारा होत असून, समाजांत माणसामाणसामध्यें विचार व मनोविकार हे दाखविणाऱ्या खुणांच्या द्वारा ती होत असते. ह्याबरोबरच येणारा ह्या दोहोंमधील भेदहि तेथें सांगितला आहे. तो हा कीं, प्राणिदेहामध्यें संवेदक असा

एकच केंद्र असून, उच्चतर प्रकारच्या नमुन्यांमध्यें, इतर सर्व घटकभाग त्याच्या फायद्यासाठीं असतात, पण समाजदेहामध्यें जितक्या व्यक्ती तितके संवेदक केंद्र असल्यामुळें ते समूहाच्या फायद्यासाठीं असतात असें मानतां येत नाहीं. समाजदेह व व्यक्तिदेह ह्यांमधील हा मुळापासूनचा भेद लक्षांत घेतल्यानें दुसरी एक बाह्यतः नियमबाह्य दिसणारी गोष्ट स्पष्ट होते. ती ही कीं, संयुक्तक्रियेकरितां फार योग्य बनलेले समाज जोंपावेतों त्यांच्यांत युद्धशीलता प्रबल असेल आणि समाजसंरक्षण हाच प्रधान हेतु असेल, तोंपावेतों जरी उच्चतम म्हणून समजले पाहिजेत (कारण ते त्या बाबतींत उच्चतर प्राणिनमुन्यांशीं सदृश असतात), तरी शांततेची स्थिति आली म्हणजे संयुक्तक्रियेची स्वसंरक्षण व परातिक्रम ह्यांसाठीं आवश्यकता राहत नसल्यामुळें, ज्या समाजांत जबरीची शासनघटना क्षीण झाली आहे, आणि संयुक्तक्रिया व तिला योग्य अशा रचना जाऊन व्यक्तिक्रिया आणि पहिल्यापेक्षां कमी जबरीच्या शासकसंस्था उत्पन्न झाल्या आहेत, त्यांस उच्चतम नमुन्याचे म्हणून समजले जातात.

समाजशास्त्राचा तिसरा भाग जो "गृहसंस्था" त्यांतील कल्पनाहि पूर्वतर कल्पनांपासून उत्पन्न झाल्याचा फारसा पुरावा दिसत नाहीं. त्यांतील पहिली महत्त्वाची कल्पना " उपजाति, आईबाप, आणि संतति ह्यांचीं भिन्न भिन्न हितें " ह्या प्रकरणांत आलेली आहे: त्यांत असें दाखविलें आहे कीं, ह्या तिघांचीं हिताहितें जरी कांहीं बाबतींत परस्परसदृश आहेत तरी इतर बाबतींत

परस्परभिन्न आहेत. हलक्या नमुन्यामध्यें उपजातिसंरक्षणार्थ व्यक्तिजीवित व कल्याण ह्यांचे मोठाले बळी द्यावे लागतात, आणि आईबापांना मुलांकरितां, आणि मुलांना आईबापांच्या सामर्थ्याभावामुळें मोठाले त्याग करावे लागतात; पण उत्क्रमणाची जशी प्रगति होत जाईल तसे हे त्याग हळूहळू कमी होऊं लागतात. पुराव्यावरून दुसरा एक सिद्धान्त ह्यांच्या लक्षांत असा आला कीं स्त्रीपुरुषांमध्यें जे संबंध उत्पन्न होतात ते कांहीं अंशीं तीं समाजघटनेच्या ज्या पायरीवर जाऊन पोहोंचलेलीं असतील त्या पायरीस योग्य असेच असतात. उदाहरणार्थ, जेव्हां लढाई नेहमीं चालत असेल तेव्हां मृत्युसंख्या मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळें अनेक बायका करण्याची चाल हितावह असते. पुराव्यावरून दुसरी एक गोष्ट अशी दिसून आली कीं ज्या मानानें युद्धशीलता जोरांत असेल त्या मानानें स्त्रियांचा दर्जा हलका असतो, आणि ज्या मानानें उद्यमशीलता वाढत जाईल त्या मानानें मुलांच्या दर्जाप्रमाणें स्त्रियांचाहि दर्जा मोठा होत जातो. पण सर्वांत विशेष महत्त्वाचा सिद्धान्त हा आहे कीं कौटुंबिक जीवित आणि सामाजिक जीवित ह्या दोघांच्या नीतितत्त्वांमध्यें अत्यन्त महत्त्वाचा असा एक भेद कायम ठेविला पाहिजे. संततीच्या संबंधानें कौटुंबिकनीतीचें तत्त्व हें आहे कीं, ज्या मानानें मुलाची योग्यता कमी त्या मानानें त्याला फायदा ज्यास्त दिला पाहिजे (त्याकडे ज्यास्त लक्ष पुरविलें पाहिजे); पण सामाजिकनीतीचें तत्त्व असें आहे कीं व्यक्तीस फायदा द्यावयाचा तो त्याच्या

योग्यतेनुरूप दिला पाहिजे. आणि ह्या तत्त्वांच्या संबंधानें त्या ठिकाणीं असें प्रतिपादिलें आहे कीं विरुद्ध तत्त्वांप्रमाणें वागल्यास मुलांच्या संबंधानें नुकसान ताबडतोब होतें, आणि समाजाच्या संबंधानें कालान्तरानें होतें.

ह्याच्या पुढच्या भागांत (विधिसंस्था) पूर्वींची ह्यांची एक कल्पना नंतरच्या एका कल्पनेनें अगदीं उलथून पडलेली दिसून येते. राजकीय शासन हें सर्वीच्या मनांत प्राधान्येंकरून असल्यामुळें शासनाचें तेंच प्राथमिक स्वरूप होय असें सहजच लोक गृहीत करितात; आणि हीच गोष्ट ह्यानींहि गृहीत केलेली होती. पण " वर्णनात्मक समाजशास्त्रां "तील पुराव्यावरून अशी एक गोष्ट सिद्ध झाली कीं माणसांवर जीं अनेक प्रकारचीं नियंत्रणें चालतात त्यांपैकीं विधिनियंत्रण हें सर्वीच्या अगोदरचें आहे. ही गोष्ट ह्यांच्या लक्षांत अशा रीतीनें आल्यानंतर दुसरी एक महत्त्वाची गोष्ट अशी आली कीं एकंदर विधींचा उगम जेते आणि जित ह्यांच्यामधील संबंधामध्यें असतो; त्यांस अंगकर्तनें व विजयचिन्हें ह्यांजपासून सुरवात होऊन पुढें त्यांस नमनें, संबोधनप्रकार, नजराणे, भेटी, पदव्या, पट्टे, पोषाक, इत्यादि सर्व संतर्पक कृतींचें व भाषणांचें स्वरूप येतें. साध्या बीजापासून संमिश्र समूहाचें उत्क्रमण कसें होतें, आणि त्यांत वाढतें विविधजातीयत्व आणि निश्चितत्व कसें दृष्टीस पडतें, हें ह्या विधींच्या वाढींवरून स्पष्ट होतें. शेवटीं असें एक सत्य ह्यानीं प्रतिपादिलें कीं जिताचें जेत्याशीं जें वर्तन त्यांत विधीला सुरवात होते एवढेंच नाहीं तर त्याची वाढ चालली

असतां त्याचा युद्धशीलतेशीं असलेला संबंध कायम राहतो; कारण युद्धशीलता प्रबल असेल त्या मानानें हे विधी करणें आवश्यक आणि ठराविक असतें, आणि उद्यमशीलता वाढत जाईल तशी ही आवश्यकता आणि निश्चितता कमी होत जाते. युद्धशीलतेंत जन्मतःसिद्ध-स्थिति गर्भित होत असते आणि तिच्यांत विधिपालन येत असतें, पण उद्यमशीलतेंत कराराची स्थिति गर्भित होत असून तिच्यांत विधिपालन येत नाहीं, हें जें सत्य त्याचें वरील संबंध हें एक स्वरूप आहे.

पुढील म्हणजे पांचव्या भागांत राजकीय संस्था ह्या त्यांखालीं राहणाऱ्या लोकांच्या परिस्थितीस व स्वभावास अनुसरून असतात असें समजलें पाहिजे ही गोष्ट प्रथम सांगून, पुढें, समाजांत ज्या दोन प्रकारच्या सहक्रिया दृष्टीस पडतात त्यांच्यामधील त्यांच्या मुळापासून असलेला भेद व्यक्त करून दाखविला आहे. एकंदर समाजाच्या मिळून इतर समाजांविरुद्ध ज्या कृती होत असतात त्यांत समजूनउमजूनची सहक्रिया असते; आणि इतरांच्या गरजा भागवून स्वतांच्या गरजा भागविण्याच्या ज्या व्यक्तींच्या क्रिया त्या ते एकमेकांशीं संगनमत करून करीत नसल्यामुळें त्यांच्यामधील ही सहक्रिया जाणूनबुजून होत नसते; कारण अमक्यानें अमुक जिन्नस तयार करावा अशी व्यवस्था नागरिक कधीं करीत नसतात, किंवा त्यांच्या डोक्यांतहि आलेली नसते. साहेब म्हणतात, एथें हीं सत्यें सांगत असतांच पूर्वीं न सुचलेलें एक नवें सत्य लक्षांत आलें आहे, आणि तेंहि इतर सत्यांप्रमाणें समाजदेह आणि व्यक्तिदेह ह्यां-

च्यामधील साम्यावरून निष्पन्न होतें. तें हें कीं, समाजांत जसा वर सांगितल्याप्रमाणें समाजाच्या बाह्यक्रिया करणाऱ्या संस्थांच्या जाणूनबुजून च्या सहक्रियेमध्यें आणि समाजपोषण करणाऱ्या उद्यमसंस्थांच्या न जाणतां होणाऱ्या सहक्रियेमध्यें भेद आहे, तसाच मणक्यांच्या प्राण्याच्या इंद्रियांच्या, अवयवांच्या आणि मेंदू व पाठीचा कणा ह्यांमधील ज्ञानतंतुजालाच्या जाणूनबुजून होणाऱ्या सहक्रियेमध्यें, आणि त्यांचीं पोटांतील इंद्रियें आणि त्यांचें नियंत्रण करणारें ज्ञानतंतुजाल ह्यांच्यामधील न जाणतां होणाऱ्या सहक्रियेमध्यें भेद आहे.

ह्या एकंदर विधानांवरून गर्भित असें जें सत्य होतें तें हें कीं, राजकीय घटनेस लढाईपासून सुरवात होते, आणि त्याची वाढहि लढाईमुळेंच होते. प्राथमिक नायक जो मुख्य योद्धा तोच असतो. पुढें पुष्कळ पायऱ्यांवर लष्करी नाईक आणि दिवाणी नाईक हे एकच असतात; आणि नंतरच्या पायऱ्यांवर राजा जरी मुख्यत्वेंकरून दिवाणी नायकच बनतो, तरी तो नांवाचा लष्करी नायकच राहतो. अर्थातच प्रारंभीं लष्करी घटना आणि राजकीय घटना ह्या दोन्ही एकच असतात. नायक व उपनायक, राजे आणि लष्करी जमीनदार हे शांततेच्या वेळीं मुख्य व स्थानिक शास्ते असतात; आणि ते व हाताखालचे अधिकारी ह्यांच्यामधील दिवाणी हुकमत ही केवळ लष्करी हुकमत असते; आणि लोकवस्तीपैकीं दासवर्ग किंवा अलढवय्या वर्ग हा कमिसेरियाटचें, म्हणजे कोठावळ्याचें, काम करीत असतो.

आणखी एक सत्य, आणि तें अत्यन्त महत्त्वाचें

सत्य, एथें सांगावयाचें आहे. तें हें कीं, लढवय्या संस्था आणि उद्यमविषयक संस्था ह्या एका दृष्टीनें जरी सहक्रिया करणाऱ्या असतात, तरी दुसऱ्या दृष्टीनें विरोध करणाऱ्या असतात; आणि समाजाचा नमुना ठरवावयाचा तो त्या समाजांत कोणत्या संस्थांचें प्राबल्य आहे हें पाहून ठरवावा लागतो. युद्धशील नमुना ज्या मानानें प्रबल असेल त्या मानानें समाजांत जबरीची सहक्रिया, जन्मतःसिद्धस्थितीचें साम्राज्य, आणि व्यक्तीची पूर्ण अंकितता, हीं दृष्टीस पडतात; इकडे उद्यमशील नमुन्यांत स्वैच्छिक सहक्रिया, करारांचें साम्राज्य, आणि व्यक्तीचें स्वातंत्र्य हीं दिसत असतात. आणि त्या त्या लोकांत प्रचलित असलेल्या सर्व संवयी, मनोभावना, आणि कल्पना त्या त्या नमुन्याच्या सहचारिणी असतात.

ह्या शास्त्राच्या सहाव्या भागांत असें दाखविलें आहे कीं, प्रमुख लढवय्या निघाल्यानें जशी राजकीय संस्थांस सुरवात होते, त्याप्रमाणेंच धार्मिकसंस्था कुटुंबांतून जी पितृपूजा सुरू असते तिजपासून विशिष्ट पितृपूजा निघाल्यामुळें सुरू होतात. मृत नायकाचें संतर्पण सर्वांत ज्यास्त महत्त्वाचें बनतें; आणि त्याच्या ऐवजीं राज्य करणारा त्याचा मुलगा आणि त्याच्या नंतरचे शास्ते हे त्याचे प्राथमिक संतर्पक किंवा उपाध्ये असतात. अशा रीतीनें वीर, जेते, राजे ह्यांच्या पूजा उत्पन्न होऊन त्यांपासून अनेक देवपूजा आणि अनेक उपाध्येवर्ग ह्यांची उत्पत्ति होते; आणि पुढें विजयामुळें जेव्हां संयुक्तसमाज आणि श्रेष्ठ शास्ते ह्यांची उत्पत्ति होते तेव्हां त्याबरोबर पक्क असें धार्मिकसंस्थाजालहि

उत्पन्न होतें. अशा रीतीनें राजकीय संस्थांपासून भिन्नीकृत धर्मसंस्था कांहीं अंशीं त्यांच्याशीं प्रतिस्पर्धा करणाऱ्या आणि कांहीं अंशीं त्यांच्याशीं सहक्रिया करणाऱ्या असतात; त्या त्यांच्याशीं सहक्रिया ह्या अर्थी करितात कीं पूर्वीपासून आलेले कायदे अमलांत आणण्याच्या कामीं त्या संस्थांस त्या मदत करितात; आणि त्यांच्याशीं प्रतिस्पर्धा ह्या अर्थी करितात कीं, आपल्यास श्रेष्ठत्व मिळावें म्हणून त्या त्यांच्याशीं झगडा करितात; आणि त्या संस्थांचा अधिकार देवाकडून आलेला आहे अशी समजूत असल्यामुळें त्या बहुधा श्रेष्ठ बनतात. अशा रीतीनें धार्मिक घटना राजकीय घटनांपासून भिन्नीकृत झाल्या तरी राजकीय व्यापारांत त्यांचें अंग, पुष्कळकाळपोवेतों असतें. उदाहरणार्थ, धर्मोपाध्ये लढाईवर जातात, आणि शांततेच्या वेळीं न्यायाधीश व स्थानिक शास्ते ह्यांचीं कामें करितात. पण सामाजिक उत्क्रमण प्रगति पावत जाईल तसें ह्या दोन प्रकारच्या संस्थांमधील विभिन्नीकरण बहुतेक पूर्ण होऊन जातें. आणि धार्मिक संस्था राजकीय संस्थांपासून पृथक् होत असतां त्यांच्यांत ज्यास्त ज्यास्त संकलीभवन आणि विविधजातीयत्व दिसूं लागतें.

सातव्या भागांत वर्णिलेल्या "धंदेसंस्थां" चर्यां उत्क्रमणाकडे पाहतां ऐतिहासिक विषयांचें सामान्यतः करितात त्या दृष्टीनें अध्ययन किती निरुपयोगी आहे हें लक्षांत येतें. हलक्या समाजांतून दिसणाऱ्या गोष्टींचा गोळा करण्याचें आणि त्यांचें वर्णीकरण करण्याचें काम पुरें होण्याच्या पूर्वीच ह्यांना असें स्पष्ट दिसून आलें कीं

सर्व प्रकारचे धंदेवाले उपाध्येवर्गापासून विभिन्नीकरण पावून उत्पन्न झालेले आहेत. पण हें सामान्य सत्य त्या वेळीं लोकांच्या लक्षांत इतकें अल्प आलेलें होतें कीं, तें यानीं सिद्ध करून दाखविलेलें पाहून मोठाल्या सुशिक्षित लोकांना देखील आश्चर्य वाटलें.

ह्या शास्त्राचा शेवटचा भाग जो "उद्यमसंस्था" त्यांत उत्क्रमणविषयक कांहीं अर्थप्रचुर गोष्टी आलेल्या आहेत. श्रमविभाग ह्या विषयाचा विचार त्याच्या वाढीच्या दृष्टीनें करूं लागलें म्हणजे त्यांचीं कांहीं अपरिचित स्वरूपें लक्षांत येऊं लागतात. प्रारंभींच्या समस्वरूप स्थितींतून हळूहळू उत्पादन, विभजन, आणि विनिमय ह्या तीन भिन्न भिन्न सरण्या उत्पन्न होतात; आणि ह्या तीन सरण्यांपैकीं प्रत्येकीपासून मुख्य सरण्या व मदतनीस सरण्या असा विभाग उत्पन्न होतो. ह्या सर्व गोष्टी तेथें स्पष्ट करून दाखवून आणखी असें दाखविलें आहे कीं, ह्या सर्व सरण्यांचें परस्परावलंबन वाढत जाणें म्हणजे उद्यमविषयक संकलन होणें होय. पुढें श्रमविभागापासून श्रमनियमाकडे गेलें म्हणजे हें सत्य ध्यानांत येतें कीं हें नियमन आणि राजकीय नियमन ह्या दोघांचा उगम एकच असून मागून पहिलें दुसऱ्यांपासून हळूहळू विभिन्न होत जातें. पहिली पायरी ही असते कीं त्या पायरीवर टोळीचा प्रत्येक पुरुषघटक लढवय्या व शिकारी असून, स्त्रियांना करतां येत नाहींत अशा सर्व गोष्टी स्वतासाठीं करीत असतो; त्याच्या पुढची पायरी ही कीं ज्या पायरीवर जित माणसांस गुलाम करून ठेवितात; आणि त्यांच्यावर जो

अधिकार चालवितात तो राजकीय अधिकाराप्रमाणें केवळ जबरीच्या स्वरूपाचा असतो. तात्पर्य, या वेळीं सामाजिक जीवित आणि कौटुंबिक जीवित ह्या दोन्ही जीवितांमध्यें शास्ता व शासित हा संबंध दृष्टीस पडतो; कारण ह्या वेळीं मुलांसहि गुलामांप्रमाणेंच वागवीत असतात. पुढें कुटुंबपित्याबद्दल जरी पितृशास्त्याची उत्पत्ति झाली तरी उद्यमविषयक नियमन सरकारी नियमनाच्याच स्वरूपाचें राहतें. पुढें जेव्हां ग्रामवस्त्या उत्पन्न होतात तेव्हांहि पुष्कळ अंशांनीं हीच स्थिति कायम राहते; आणि जमातशासन सुरू झालें म्हणजे जरी स्वतंत्र अशी औद्योगिक क्रिया सुरू होते तरी ती जमातीचें जें जबरीचें अर्धवट राजकीय असें नियमन त्याला अंकित असतें. जन्मतःसिद्धस्थितीच्या आधारावर स्थापिलेल्या औद्योगिक नियमनाच्या प्राथमिक स्वरूपाऐवजीं कराराच्या स्थितीच्या आधारावर स्थापिलेल्या औद्योगिक नियमनाची जी स्थापना होते ती हळूहळूच होते; तात्पर्य, ह्या ठिकाणींहि उत्क्रमणाचा नियम उदाहृत होतो. असो. आतां ह्या नियमावरून स्थापिलेल्या सिद्धान्ताचें कथन करण्यच्या भरीस न पडतां, ह्या भागाच्या शेवटीं जें व्यापक सत्य निष्पन्न झालें आहे तेवढेंच एथें सांगूं. तें हें कीं, राजकीय नियमनाप्रमाणेंच औद्योगिक नियमनामध्येंहि उत्पन्न होणारे मुख्य भेद, " माणूस किती प्रमाणावर स्वताचा मालक आहे, आणि किती प्रमाणानें त्याच्यावर इतरांची मालकी आहे ? " ह्या प्रश्नामध्यें गर्भित होत असतात. स्पार्टासारख्या नेहमीं लढाया करणाऱ्या राष्ट्रां-

मध्यें नागरिक हा समाजाचा गुलाम असून समाजाच्या संरक्षणासाठीं आपलें सर्व सामर्थ्य आणि आपला जीव देखील खर्चणें त्यास भाग असतें; सारांश, अशा ठिकाणीं प्रत्येकावर इतर सर्वांची मालकी असते. पण उद्यमशीलतेची युद्धशीलतेमध्यें जसजशी भेसळ होत जाईल, तसतसा नागरिक स्वतावर ज्यास्त ज्यास्त मालकी संपादन करूं लागतो; आणि शेवटीं कर देणें, आणि लढाईच्या प्रसंगीं जरूरच पडल्यास लढाईवर जाणें, ह्याच्या पलीकडे त्याच्यावर समाजाची जबरी होत नाहींशी होते. तथापि तो बऱ्याच अंशीं जमाती किंवा कामकरीमंडळें वगैरेच्या जबरीस अंकित असतोच. म्हणजे, तो कांहीं अंशींच स्वताचा मालक असतो. जेव्हां पूर्णपणें शांत अशी स्थिति स्थापन होईल आणि करार करण्याच्या माणसाच्या अधिकारास मुळींच मर्यादा राहणार नाहीं तेव्हांच प्रत्येकजण स्वत:चा पूर्ण मालक होईल.

१७. " नीतिशास्त्राचीं तत्त्वें " ह्या ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकारणाच्या " वर्तनाचें उत्क्रमण " ह्या नांवावरूनच असें व्यक्त होतें कीं हे ह्या विषयाचा विचार नव्याच दृष्टीनें करीत आहेत. उत्क्रमण पावणाऱ्या वर्तनाचें नीति हें एक स्वरूप आहे ही कल्पना तद्विषयक प्रचलित कल्पनांपासून अगदीं भिन्न होती, पण ह्यांच्या ह्यापूर्वीच्या ग्रंथांतील कल्पनांना अगदीं धरून होती. ह्या ह्यांच्या विचारसरणीचें मूळ " समाजास्थिति " ह्या ह्यांच्या ग्रंथांत आलेलें होतें, आणि त्या ठिकाणीं ह्या मुळाचे कांहीं तंतू जीवशास्त्रांत, कांहीं मानसशास्त्रांत, आणि बरेच समाजशास्त्रांत गेलेले आहेत

असें दाखविलेलें होतें. ह्या तंतूंची आतां वाढ होऊन त्यांस मुळाच्या फांद्यांचें स्वरूप आलें ही गोष्ट नीतीचा "भौतिकदृष्ट्या विचार", "जीवशास्त्रदृष्ट्या विचार", "मानसशास्त्रदृष्ट्या विचार", "समाजशास्त्रदृष्ट्या विचार" इत्यादि प्रस्तुतग्रंथाच्या पहिल्या भागांतील प्रकरणांच्या नांवावरूनच व्यक्त होतें. एवंच नीतीचा जो ह्या ग्रंथांत ह्यानीं विचार केला तो अशा दृष्टीनें केला कीं नीति ही केवळ माणसाचें इतर माणसांच्या संबंधानें जें वर्तन तेवढ्याचाच विचार करीत नाहीं, तर त्याचें शारीरिक चापल्य, जीवविषयक व्यापार आणि मानसिक व्यापार ह्यांच्यासंबंधानें जें त्याचें वर्तन त्याचाहि विचार करिते. एवंच इतरांच्यासंबंधानें जीं माणसाचीं कर्तव्यें त्यांचाच केवळ विचार ह्यांस करावयाचा नसून स्वतःच्या संबंधाच्या कर्तव्याचाहि करावयाचा होता.

ह्या व इतर नीतिशास्त्राच्या आधारस्तंभांचा विचार केल्यावर, एतद्विषयक अनुभवजन्य सिद्धांत काय आहेत हा प्रश्न आला. ह्या मथळ्याखालीं ह्यांस निरनिराळ्या प्रकारच्या आणि समाजसुधारणेच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर असलेल्या समाजांमध्यें दिसणाऱ्या निरनिराळ्या वर्तनप्रकारांचा आणि "बरोबर व चुकीचें" एतद्विषयक किंवा शुद्धाशुद्धविषयक निरनिराळ्या कल्पनांचा विचार करावयाचा होता. नीतिविषयक कल्पनांच्या ह्या तुलनेवरून पहिला व्यापक सिद्धांत ह्यानीं असा बांधिला कीं, प्रत्येक ठिकाणीं शुद्धाशुद्धविषयक कल्पना आणि परंपरागत स्वभाव व सभोंवतालची परिस्थिति ह्यांवरून उत्पन्न झालेलें विशिष्टजी-

वित ह्या दोहोंमध्यें आनुरूप्य असेंत; आणि दुसरा व्यापक सिद्धांत असा काढिला कीं सर्व मनुष्यजाती-ला सामान्य अशी नैतिकबुद्धि किंवा जाणीव म्हणून कांहीं नसून, प्रत्येक समाजाची प्रत्येक पायरीवरील ही जाणीव परिस्थितीस अनुरूप अशी असते.•

ह्या शास्त्राचा तिसरा भाग "आत्मनीतीचीं तत्त्वें" हा असून त्यांत शारीरिक व मानसिक आत्महेतु योग्य व सुखकारक रीतीनें साधण्यासाठीं ज्या ज्या गोष्टी क-राव्या लागतात त्या सर्वांस नीतीचा आधार आहे असें सामान्य कल्पनेस अनुसरून प्रतिपादिलें आहे. ह्या भागांत बांधिलेले सिद्धांत जरी जीवशास्त्र व मानस-शास्त्र यांस अनुसरून आहेत तरी ते मुख्यत्वेंकरून अ-नुभवमूलकच आहेत; कारण खासगी वर्तनाचें निश्चि-तनियम-बाड बनविण्यास पुरेसे आधार उपलब्ध ना-हींत. कोणीं काय व किती उद्योग करावे हें जरी जी-वशास्त्रविषयक नियमांवरून ठरविलें पाहिजे तरी तें ज्याच्या त्याच्या स्वभावघटनेवरहि पुष्कळ अंशीं अ-वलंबून राहतें. तथापि ह्या बाबतींत बराच मार्गदर्शक असा एक सामान्य विचार त्या ग्रंथांत नमूद केला आहे, जरी त्याच्यावर विशेष जोर दिलेला नाहीं. तो हा कीं, जीवित होईल तितकें पूर्ण व सुखयुक्त करण्यास निरनिरा-ळ्या शारीरिक, मानसिक, वगैरे शक्तींच्या व्यापारांमध्यें योग्य प्रमाण ठेविलें पाहिजे; अमक्या एक शक्तीच्या व्या-पाराचा अतिरेक, आणि दुसऱ्या एकाद्या शक्तीच्या उप-योगांत कमतरता, असें होतां कामा नये. आपल्या सामा-जिक जीविताकडे पाहतां धंदेविभागामुळें हें प्रमाण बरेंच

बिघडून जातें; पण योग्य प्रमाण काय असलें पाहिजे ही जाणीव असल्यास ह्या बिघाडास आळाबंदा पडतो.

ह्या शास्त्राचा चवथा भाग जो "न्यायशास्त्राचीं तत्त्वें" त्यांत ह्यांच्या एकंदर लेखांस ज्या विषयानें ह्यानीं सुरवात केली होती त्या विषयाप्रत हे पुनः परत आले. "सरकारच्या कर्तव्याची योग्य मर्यादा" या लेखांत आणि नंतर "समाजस्थिति" या ग्रंथांत खासगी वर्तनाचें योग्य नियमन, आणि सामाजिक-समूहाचा प्रतिनिधि जें सरकार त्याच्याशीं व्यक्तींचे योग्य संबंध ह्यासंबंधानें निश्चित कल्पना स्थापन करण्यास यानीं खटपट केली होती; आणि आतां चाळीस वर्षांच्या अवधींत केलेल्या एकंदर अवलोकनाच्या व विवेचनाच्या अंतीं जे विचार यांचे बनलेले होते त्या विचारांच्या दृष्टीनें हे ह्या विषयाच्या विवेचनास पुनः लागले होते. तथापि 'समाजस्थिति' ह्या ग्रंथांत प्रतिपादिलेल्या मतांमध्यें महत्त्वाचा बदल करण्याचें प्रयोजन यांस पडलें नाहीं, उलट त्या ग्रंथांतील मूलतत्त्वाला त्या ग्रंथांत दाखविल्यापेक्षांहि जास्त खोल आधार आहे असें मात्र यांच्या नजरेस आलें. प्रत्येकाचें स्वातंत्र्य इतरांच्या तसल्याच स्वातंत्र्यानें काय तें मर्यादित होतें हें जें तेथें केलेलें विधान त्यावरून असें मत ध्वनित होतें म्हणून आतां यानीं दाखविलें कीं, ह्या मर्यादांच्या आंत प्रत्येकजण ज्या

कृती करील त्यांपासून होणारे फायदे व तोटे त्याचे त्यास मिळाले पाहिजेत; आणि जीवशास्त्रावरून असें दिसून आलें होतें कीं, हें तत्त्व दुसऱ्या एका अन्तिम सत्यावरून निष्पन्न होतें; तें तत्त्व हें कीं प्रत्येक प्राणी ज्याप्रमाणें आपल्या अस्तित्वास लागणाऱ्या आवश्यक गोष्टी बऱ्या किंवा वाईट रीतीनें करील त्याप्रमाणें त्याची भरभराट किंवा क्षीणावस्था झाली पाहिजे, त्याप्रमाणें तो जगला किंवा मेला पाहिजे; ह्या तत्त्वावरून असें व्यक्त होतें कीं समाज करून राहणाऱ्या प्राण्यांनीं करावयाच्या चळवळी इतरांच्या तसल्याच चळवळींनीं लादिलेल्या ज्या मर्यादा त्यांच्या आंत ठेविल्या पाहिजेत. एवंच इतर प्राण्यांमध्यें योग्यतमांचा टिकाव जसा अतिक्रमणरूप चढाओढीपासून उत्पन्न होतो, तसा समाज करून राहणाऱ्या माणसांमध्यें तो अतिक्रमणविहीन अशा चढाओढीपासून उत्पन्न झाला पाहिजे; आणि ह्यावरून गर्भित होणाऱ्या मर्यादा कायम ठेवणें, आणि त्या मर्यादांच्या आंत जे फायदे प्रत्येकास प्राप्त होतील ते त्याच्याकडे खात्रीपूर्वक राहूं देणें यांचें नांव न्याय. आणि सामाजिक वर्तनाचें हें अंतिम तत्त्व सैद्धिय उत्क्रमणाच्या सामान्य सरणीशीं ह्यानीं चिकटवून दिलें होतें.

नंतर " निवृत्त्यात्मक परोपकार " ह्याची न्यायतत्त्वाला जोड देणें आवश्यक आहे हें यानीं लक्षांत आ-

णिलें. समाजानें समाजरूपानें न्यायाची बजावणी होईल तितकी कसून करणें जरी समाजाचें कर्तव्य आहे, तरी समस्वातंत्र्याच्या नियमाप्रमाणें माणसास करतां येतील अशा कांहीं गोष्टी करण्यापासून त्यानें निवृत्त होणें हेंहि त्याचें कर्तव्य आहे. आणि हें विशिष्ट कर्तव्य ज्या समाजानें व्यक्तीस वाढविलें त्याचें ऋण फेडण्याचें जें प्रत्येकाचें सामान्य कर्तव्य त्यावरूनच निष्पन्न होतें. हें कर्तव्य समाजसुधारणेस मदत करून, आणि शुद्ध न्यायाच्याच दृष्टीनें जो जो फायदा घेतां येईल तो घेऊं देणार नाहीं अशा प्रकारच्या सहानुभूतीचें वळण लावून घेऊन, त्यानें बजाविलें पाहिजे. पण यासंबंधानें यानीं तेथें असेंहि नमूद करून ठेविलें कीं निवृत्तिरूप परोपकृतीनें केवळ न्यायरूप कृतीला जो हा आळाबंदा घालावयाचा तो किती घालावयाचा हें प्रत्येकाच्या खासगी विचारावर ठेविलें पाहिजे.

" प्रवृत्त्यात्मक परोपकार " हा जो नीतिशास्त्राचा शेवटचा भाग त्यांत यानीं मुद्दाम परोपकार करणें हेंहि प्रत्येकाचें कर्तव्य आहे असें दाखविलें आहे. " वर्तनाचें उत्क्रमण " ह्या प्रकरणांत ह्यानीं असें दाखविलें होतें कीं समाजाचे सर्व घटक उद्देशसिद्ध्यर्थ जेव्हां परस्परांस मदत करूं लागतील तेव्हां उच्चतम जीवित आणि म्हणून उच्चतम सुख ह्यांची प्राप्ति होईल; आतां यावरून हें उघडच होतें कीं, ही परस्परांना करावयाची

ची मदत जशी चांगल्या गोष्टी साधण्याच्या कामीं झाली पाहिजे तशी वाईट गोष्टी टाळण्याच्या कामींहि झाली पाहिजे. ह्या शेवटच्या भागांत ह्यानीं असें प्रतिपादिलें कीं, ज्या सामाजिक स्थितीमुळें माणसास सुखानें राहण्याचें सौकर्य प्राप्त होतें ती कायम ठेवणें आणि सुधारणें हें जसें प्रत्येकाचें अप्रत्यक्ष कर्तव्य आहे, तसाच हें कर्तव्य बजावण्यास जे मनोविकार त्यास प्रवृत्त करितात त्यांचें वर्धन करण्यापासून त्याचा फायदा आहे. कारण जी सहानुभूती इतरांचें दुःख कमी करण्यास प्रवृत्त करिते तीच सहानुभूति इतरांच्या सुखाचे भागीदार होणेंहि शक्य करिते, आणि म्हणून स्वसुखाला उंचतर करिते.

REFBK-0019172